

# ‘भारत’कार हेगडे देसाई यांचे निवडक अग्रलेख

खंड : १

संपादक : शशिकांत नार्वेकर



जन्म-१९३१ मृत्यू-१९९८

कै. शशिकांत नार्वेकर यांच्या कार्यमग्न जीवनाचे कलावेड आणि ध्येयधुंदी हे दोन विधायक पैलू. सृजनशील कलावंत आणि कृतिशील ध्येयवादी यांच्या पुढे नार्वेकर सदैव नतमस्तक होत. अशा थोरामोठ्यांचे आदरसत्कार करताना त्यांचे देहभान हरपे... १९४९ साली दिवंगत झालेल्या ध्येयनिष्ठ 'भारत'कारांचा सत्कार करण्याचं भाग्य काही नार्वेकरांना लाभलं नव्हतं... 'भारत'पत्राच्या दुर्मिळ संचिका तर एका अभ्यासकानं केप्याहून पणजीला आणून त्यांचा चिखल करून टाकला होता. जिद्दी नार्वेकरांनी सेंट्रल लायब्ररीत दिवस दिवस बसून 'भारत'च्या जीर्ण संचिकांतून 'भारत'कारांची ही वाङ्मयमूर्ती शोधून काढली... हा ग्रंथ म्हणजे आधुनिक गोमंतकाच्या त्या थोर प्रणेत्याची मोठ्या परिश्रमाने बांधलेली पूजा आहे... भगवंत आणि भक्त दोघांचेही हे चिरंतन स्मारक आहे !... ते नव्या पिढीला प्रेरणा देत राहील.. भारतकारांचा समाजप्रबोधनाचा वसा ती पुढे नेईल....

# ‘भारत’ कार हेगडे - देसाई यांचे निवडक अग्रलेख

## खंड - पहिला


संपादक

**शशिकांत नार्वेकर**

संपादन सहाय्य आणि परिपूर्ती

**प्रा. रवीन्द्र घवी**



‘भारत’कार हेगडे देसाई प्रतिष्ठान

कुसमण, केपे-गोवा

**‘भारत’ कार हेगडे देसाई यांचे निवडक अग्रलेख**
**आवृत्ती– पहिली : ७ जून १९९९**
**(कै. शशिकांत नार्वेकर प्रथम पुण्यतिथी)**

प्रकाशन क्र. : ३७

◆ **प्रकाशक :**
गोमंतक मराठी अकादमी,
राणी प्रमिला आर्केड,
१८ जून मार्ग, पणजी, गोवा. ४०३ ००१.

◆ **अक्षरजुळणी :** प्रवीण रणदिवे

**मुद्रितशोधन** : प्रवीण भोजराज


◆ **मुखपृष्ठ :** संज्योती ग्राफिक्स्, कोल्हापूर

◆ **पुर्नमुद्रण :**
०७ नोव्हेंबर २०१५
‘भारत’कार प्रतिष्ठान
कुसुमण केपे–गोवा

◆ © **‘भारत’कार हेगडे देसाई प्रतिष्ठान**

◆ **मुद्रक :**
चैतन्य ऑफसेट,
मिरजकर तिकटी, मंगळवार पेठ,
कोल्हापूर.

◆ **किंमत : स्वेच्छा मूल्य**



# कै. गोविंद पुंडलीक हेगडे देसाई

जन्म : १८८५ मृत्यू : १९४९

''लोकमतांचे यथास्वरूप आविष्करण करणे हें वृत्तपत्रांचे कार्य असतेच पण लोकमतास इष्ट वळण देणे हे वृत्तपत्राचे महत्त्वाचे कार्य आहे आणि ही दोन्ही कार्यें एकसमयावच्छेदे बजावणे हे 'भारता' चे आज पर्यंतचे धैर्य आहे.''

'भारत'कार गो. पुं. हेगडे देसाई



'भारत'कारांचे १९४९ पर्यंत वास्तव्य असलेली केपे येथील वास्तू.
१९६९ साली या वास्तूच्या जागी नवीन घर बांधण्यात आले.



'भारत'कार हेगडे देसाई व त्यांच्या पत्नी सुंदराबाई गो. हेगडे देसाई यांचे
'शांतीबाग' केपे येथील स्मारक

# अर्पणपत्रिका

*ज्यांनी आपल्या लेखणीने पोर्तुगीज सरकारची नाराजी पत्करून स्वत:वर एकूण ५० खटले ओढवून घेतले, चार वेळा शिक्षा भोगली, २५ हजार रुपयांची पदरमोड सोसली आणि मरेपर्यंत 'भारत' सारखे झुंजार पत्र जिद्दीने चालवून स्वातंत्र्यपूर्व कालातील बाणेदार गोमंतकीय मराठी वृत्तपत्र सृष्टीच्या इतिहासात नाव सुवर्णाक्षरांनी लिहावे अशी लोकोत्तर कामगिरी केली त्या कै. गोविंद पुंडलीक हेगडे देसाई यांच्या दुर्मिळ अग्रलेखांचे हे संपादन त्यांच्याच प्रेरक स्मृतीस अर्पण करताना गोमंतक मराठी अकादमीस धन्यता वाटत आहे.*

***पुर्नमुद्रण व पुर्नप्रकाशनाच्या निमित्ताने...***

*स्वर्गीय शशीकांत नार्वेकर संपादित आणि गोमंतक मराठी अकादमी प्रकाशित 'भारत'कार हेगडे देसाई यांचे निवडक अग्रलेख (नूतन खंड १ व खंड २) या ग्रंथाचे पुर्नप्रकाशन त्यांच्या १३०व्या जयंतीदिनी करताना 'भारत'कार हेगडे देसाई प्रतिष्ठानांस अतीव समाधान वाटत आहे.*

*दोन्ही नूतन खंड स्वातंत्र्यलढ्याचा व समाजकार्याचा त्यांचा वारसा अबाधित ठेवणाऱ्या त्यांच्या तीन पुत्रांच्या स्मृतीस अर्पण.*

## स्व. कृष्णकांत (कांत, कांता देसाई)




–धारवाड येथील महाविद्यालयीन शिक्षण चालू असतानाच १९४६ साली स्व. सदानंद विर्जीनकर सह केपे येथील जुन्या बस स्थानकावर सत्याग्रह –केपे न्यायालयाकडून ४६ दिवसांची सजा, तद्नंतर वडीलांच्या सल्ल्यानुसार मुंबई–बेळगाव येथून मुक्ति लढ्यात सक्रिय सहभाग –गोवा राष्ट्रीय काँग्रेसचे १९५६ पर्यंत सर कार्यवाहक –१९५७ ते १९६३ दरम्यान दादरा नगर हवेली प्रशासनाचे कायदा सल्लागार –१९६३ ते १९६७ पर्यंत गोवा संघ प्रदेशाचे पहिले गोमंतकीय अवर सचिव (अंडर सेक्रेटरी) कायदा विभाग.



## स्व. नरेंद्र (नरुबाब, नरुसर)

मॅट्रीक नंतर 'भारत' पत्राच्या प्रशासनात भरीव आणि सक्रिय मदत, 'उमलत्या कळ्या' ह्या 'भारत' पत्रात प्रसिद्ध होणाऱ्या सदराचे संपादन, वडीलबंधु कृष्णकांत ह्यांनी आपल्या सहकाऱ्यासोबत सुरू केलेल्या इंग्रजी प्राथमिक वर्गात शिक्षक म्हणून कार्यरत. वडीलांच्या मृत्यूनंतर पूर्ण वेळ शिक्षकीपेशा –इंग्रजी प्राथमिक वर्गाचे पूर्ण वेळ माध्यमिक शाळेत रुपांतर करण्यात मोलाचा सहभाग –मुक्ति लढ्यात भूमिगत कार्य चालूच –१९५४ मध्ये पोलिसांची घरावर धाड व अटक –मडगाव पोलिस स्थानकात स्वातंत्र्य सैनिक फेलिसियो कार्दोज सहीत तीन महिने स्थानबद्ध व नंतर सुटका –सर्व सार्वजनिक कार्यात सदैव अग्रेसर.

## स्व. नरसिंह (बाबू हेगडे)



माध्यमिक शिक्षण चालू असतानाच गोवा मुक्ति लढ्यात सक्रिय सहभाग –मॅट्रिकच्या परिक्षेच्या अवघ्या काही दिवसा आधी पोलिसांची घरावर धाड व अटक –प्रथम मडगाव व नंतर पणजी पोलिस स्थानकात 'आजेंत मोंतेर'कडून यथेच्छ 'पाहुणचार', नाक, कान व कमरेला कायमस्वरुपी बाधा –सैनिकी न्यायालयाने फर्मावलेली चार महिन्यांची सजा भोगून सुटका –उर्वरीत जीवन गोव्यातील एका खाजगी आस्थापनात निवृत्ती पर्यंत जबाबदारीचे कार्य.

# अनुक्रमणिका


- गो. म. अकादमी अध्यक्षांचे निवेदन ...अकरा
- प्रस्तावना 'भारत'कार कै. गो. पुं. हेगडे देसाई – शशिकांत नार्वेकर ...बारा
- परिपूर्ती – आधुनिक गोमंतकाचे प्रणेते – रवीन्द्र घवी ...एकवीस
- तया माझा दंडवत...! – भिकू हरी पै आंगले ...पंचेचाळीस
- मुखबंध ('भारत'चा पहिला अग्रलेख) ...१


## राजकीय अग्रलेख


गुलामांचा देश ........ ०९
राष्ट्रपुरुषाची शरीरशुद्धि........ १३
काय हा नेभळेपणा?........ १५
छडा लावलाच पाहिजे!........ १९
राष्ट्रीयत्वाची कल्पना व तिच्यांतील तारतम्यभाव ........ २२
पाश्चात्य राज्यकर्त्यात चांगले कोण? ........ २६
ही विचारभ्रष्टता नव्हें, तर काय?........ ३०
बुद्धि : कर्मानुसारिणी ........ ३३
१५ ऑगस्ट १९१३!........ ३७
स्वर्गस्थ पितरांचा संदेश ........ ४१
सरकारचीं कर्तव्यें........ ४४
समता की विषमता? ........ ४९
मुस्कटदाबी ........ ५३
स्वर्गीय राज्यसंस्थेची बदनामी ........ ५७
तपाअंती राज्य ........ ६१
साम्राज्य भ्रम ........ ६५
परिषदांचा मोसम ........ ६८
राष्ट्राचे पुढारी कोण? ........ ७१
हिंदी स्वराज्य ........ ७४
युक्ति कीं शक्ति? ........ ७६
भारतीयांचे ध्येय कोणतें असावे?–१ ... ७९
भारतीयांचे ध्येय कोणते असावे?–२ ... ८२
आशावादी झाले पाहिजे ........ ८५
भारतीयांचे ध्येय कोणते असावे?–३ ... ८८
भारतीयांचे ध्येय कोणते असावे?–४ ... ९१
स्वदेशी व बहिष्कार ........ ९५
भारतीयांचे ध्येय कोणते असावे?–५ ... ९७
भारतीयांचे ध्येय कोणते असावे?–६ . १०१
यथा राजा तथा प्रजा ........ १०६
स्वराज्याच्या वृथा वल्गना! ........ १०९
बोलशेविझम ........ ११२
रिपब्लिक व हिंदु नागरिक ........ ११५
राष्ट्रीय मोक्षप्राप्तीचा सोपानमार्ग ...... ११८
एक इशारा ........ १२०

भारतीय चळवळ ........................ १२२
गोमांतकाचे नष्टचर्य ...................... १२३
‘खरा’ देशाभिमान पाहिजे ............ १२५
नव्या सुधारणा यशस्वी
कशा होतील? ........................... १२७
सोन्याचे बोल! ........................... १२९
‘‘पुढें गती कैसी?’’ .................... १३०
हें स्वराज्य की साम्राज्य? ............ १३२
राष्ट्रीय कर्ममार्ग .......................... १३४
राजकारण ................................ १३६
पाहिजे ‘जातीचे’! ....................... १३७
आमचें स्वराज्य ......................... १३९
सरकार व मताधिकार ................. १४२
प्रागतिक संघाची स्थापना ............ १४४
गेली प्रांतिक परिषद ................... १४७
अंतःकरणें एकवटा! ..................... १४९
आमचें स्वराज्य! ......................... १५१
सत्यमेव जयते! .......................... १५२
आम्ही व आमचे शेजारी .............. १५४
आमचें भावी ध्येय ....................... १५६
लोकशाहीची लाट ...................... १५८
येती काँग्रेस व गोरक्षण ................ १६०
प्रागतिक संघ व निवडणूका .......... १६२
स्वदेशीव्रत आचरा ...................... १६५
स्वदेशीचा प्रभाव ........................ १६७
जोरानें हल्ला करा! ..................... १६९
निभाव कसा लागेल? .................. १७१
लोकमान्यांचें पुण्यस्मरण .............. १७३
लोकमत व सरकार .................... १७६
व्यवहारशून्यतेचें परिणाम ............... १७८
येत्या निवडणूका ........................ १८१
म. गांधीची योग्यता .................... १८४
सरकारचें ‘अकरा’ वाजलें ............ १८६
येत्या काँग्रेसीसाठी (पुर्वसूचना) ....... १८८
पाचवी प्रांतिक काँग्रेस .................. १९१
प्रागतिक संघाचे कार्य ................. १९३
उठा! जागे व्हा! ........................ १९५
भगवंताचे अधिष्ठान ..................... १९७
आमचें कर्तव्य लेखांक १ ............. २०२
आमचें कर्तव्य
लेखांक २ (पूर्वार्ध) ...................... २०९
आमचे कर्तव्य लेखांक २ (उत्तरार्ध) .... २१३
आमचे कर्तव्य, लेखांक ३ ........... २१६
वामनावतार .............................. २२२
प्रागतिक संघाची परिषद .............. २२६
प्रागतिक संघाची परिषद .............. २२९
प्रागतिक संघाची परिषद .............. २३३
प्रागतिक संघाची परिषद
यशस्वी करा! ............................. २३६
ऐक्य परिषदेचें कार्य ..................... २३९
हृदयविष्करण ............................ २४३
आक्षेपार्ह लेखाचे मराठीत
भाषांतर .................................. २४७
अखिल भारतीय हिंदु महासभा ....... २५०
त्रेचाळीसावी राष्ट्रसभा ................. २५३
सत्याग्रहाचें सामर्थ्य .................... २५४
शेजारीं काय चाललें आहे? ........... २५८

दडपशाहीचे पर्यवसान! .................. २६०
अरेरावीचा अनर्थ ........................ २६२
ब्रिटीश मालावर बहिष्कार
(१९-६-३०) ........................... २६५
स्वायत्त गोमांतक
(२७-११-१९३०)..................... २६७
अरेरावी .................................... २६८
गोमांतकस्थ हिंदूंचे ख्रिस्ती
समाजाशी कर्तव्य ........................ २७१
गोव्याचें नशीब!........................... २७३
तूस कांडून हाताला फोड!.............. २७६
सत्य व अहिंसा .......................... २७८
हें कसलें राजकारण? ................... २८०
वर्णभेदाचें भूत ............................ २८२
आपुण आपणांक आनी
देव समेस्तांक ............................ २८३
बाणेदारपणाचें उदाहरण ................ २८५
आम्हीं कोण? परसत्तेच
गुलाम व कुत्रे!............................ २८८
??? ...................................... २९०
जशास तसें!.............................. २९२
कायद्यांचा सुकाळ व
वृत्तपत्रीय नियंत्रण......................... २९५
कलकत्त्याच्या घडामोडी ................ २९७
दारांत उभें असलेलें संकट ........... ३००
हिंदुसभेसंबंधी जनतेच्या अपेक्षा ....... ३०२
मजूरपक्षाचें अधिकारग्रहण
व ब्रिटिश हिंदुस्थान...................... ३०६
शहाण्यांची जात व
देशाचा घात! .............................. ३०८
धर्म, जात आणि देश ................... ३१२
मडगांवच्या निदर्शनाचें दिग्दर्शन........ ३१५
प्रासंगिक विचार .......................... ३१६
फाळणी झाली, पुढें काय? ............ ३१८
पंधरा ऑगस्ट ............................ ३२३
ग्रहण निवळलें!............................ ३२६
हे आत्मबलिदान कीं
आत्मविनाश? ............................. ३२८
जो दुसऱ्यावरीं विश्वासाला!............. ३३१
दार समितीचा निराशाजनक
अहवाल .................................... ३३३


## सामाजिक अग्रलेख


सार्वजनिक चळवळ कां करावी?..... ३४१
आर्यभूमि कीं अनार्यांचा मुलूख? ..... ३४५
सुशिक्षितांचा धरसोडपणा?............ ३४७
जुगार अप्रतिबंधच राहणार काय?.... ३५०
ब्राह्मणांचें भूदेवत्व ........................ ३५३
मद्यपानाचा प्रसार ........................ ३५६
ब्राह्मणांवर गहजब ........................ ३६१
नोटिस .................................... ३६६

जाहीर खबर .............................. ३७०
सामाजिक सुधारणा ..................... ३७३
हा कोण व्यामोह? ...................... ३७६
परीक्षेची वेळ आहे! ..................... ३७९
आमचे डोळे उघडणार तरी कधी? . ३८३
आमचें कर्तव्य ............................ ३८६
हिंदु व ख्रिस्ती ........................... ३८८
एकीची आवश्यकता ..................... ३९०
गोमांतकीय हिंदुपरिषद .................. ३९१
असहकारिता! ............................ ३९५
हिंदु–ख्रिस्ती–ऐक्य ..................... ३९६
'हिंदु–समाज' ............................ ३९९
भंडारी विजय? .......................... ४०१
आधी कळस मग पाया रे ............. ४०३
एक सामाजिक प्रश्न–वरदक्षिणा ..... ४०५
प्रगतिपथ आक्रमा! ...................... ४०८
मद्यपान व हिंदुसमाज ................... ४०९
पतितपरावर्तन ............................ ४१२
स्वामी विवेकानंदांचे विचार
पतितपरावर्तन–हिंदुधर्माची मर्यादा ... ४१३
गोहत्येतून मुक्त व्हा!.................... ४१६
मद्यपान प्रतिबंध ......................... ४२१
पतितपरावर्तन ............................ ४२३
पतितपरावर्तन ............................ ४२४
बळी तो कान पिळी ..................... ४२५
तरुणांनो उठा! ........................... ४२६
जुना इतिहास ............................ ४२८
जुगार, सरकार व प्रतिकार............ ४३३
जुगार व हिंदुधर्मविचार ................ ४३५
गोव्यांतील गोरक्षण ...................... ४३८
आमची आजची तरुणपिढी ........... ४४२
जनसेवा हीच ईश्वर सेवा .............. ४४९
बुद्धिबळाचें पुढील धोरण .............. ४५४
शुद्धीची पुढील दिशा .................... ४५६
अस्पृश्यता निवारणाचें कार्य ........... ४६०
अस्पृश्यता दूर करा!
(लेखांक १ ला) .......................... ४६२
अस्पृश्यता दूर करा!
(लेखांक २ रा) .......................... ४६५
अस्पृश्यता दूर करा!
(लेखांक ३ रा) .......................... ४६८
अस्पृश्यता दूर करा!
(लेखांक ४ था) .......................... ४७१
वेश्याव्यवसायाचं उच्चाटन............. ४७४
शुद्धिकार्याला चालना .................. ४७७
कर्मवीर कर्वे............................... ४७९
शिष्टांचे स्वागत व कार्य ............... ४८१
असे उघडे तरी व्हा!.................... ४८६
समाचार घ्या!............................. ४८९
अनावृत्त पत्रास उत्तर ................... ४९१
एकमेकां सहाय्य करूं!................. ४९५
एकमेकां सहाय्य करूं................... ४९७

# निवेदन

गोमंतकाचे थोर आणि झुंजार पत्रकार कै. गो. पुं. हेगडे देसाई यांच्या 'भारत' पत्रातील ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालेल्या अग्रलेखांचे संकलन करण्याचे काम अत्यंत आपुलकीने, स्वाभिमानाच्या भावनेने आणि एका निदिध्यासाने कै. शशिकांत नार्वेकर यांनी हाती घेतले होते. त्यासाठी ते कितीतरी वर्षे समरसून काम करीत राहिले. त्यांच्या दुर्दैवाने त्यांनी संकलित केलेल्या अग्रलेखांचा संग्रह त्यांच्या हयातीत प्रसिद्ध करू शकलो नाही. तरीही त्यांच्या पहिल्या स्मृतिदिनी गोमंतक मराठी अकादमी तो प्रसिद्ध करीत आहे याचे समाधान वाटते. जाज्वल्य स्वातंत्र्यप्रेम, पुरोगामी सामाजिक दृष्टिकोन आणि मराठीचा ज्वलंत अभिमान या आपल्या जीवनात महत्त्वाच्या मानलेल्या निष्ठांचे दर्शन कै. नार्वेकर यांना या अग्रलेखांतून घडले. नव्या पिढीला त्याचा परिचय व्हावा आणि ऐतिहासिक महत्त्वाचा दस्तऐवज सर्वांना उपलब्ध व्हावा यादृष्टीने हे प्रकाशन निश्चितच उपयुक्त ठरेल. हा अग्रलेखसंग्रह कै. शशिकांत नार्वेकर यांच्या स्मृतीला वाहिलेली आदरांजली आहे. या पुस्तकाच्या सिद्धीसाठी त्यांचे परममित्र प्रा. रवींद्र घवी यांनी जबाबदारी उचलल्या मुळेच हा संकल्प वेळेत पुरा होऊ शकला.

**गोपाळ मयेकर**
अध्यक्ष
गोमंतक मराठी अकादमी

# प्रस्तावना

## झुंजार मराठी पत्रकार

## 'भारत' कार कै. गो. पुं. हेगडे देसाई

टिळक-आगरकर ह्यांच्या पत्रकारिता परंपरेबद्दल उत्साहाने, अभिमानाने नि आदराने नेहमी बोलले जाते. अभिमानाने बोलावे अशीच ती पत्रकारिता होती. ती पत्रकारिता ह्मणजे अग्निज्वालेसारखी तेजस्वी होती! अशा त्या अग्निज्वालेत उडी घेणे ह्मणजे स्वत:ला जाळून घेणे होते! जळणं हेच त्या पत्रकारितेचं कर्म होतं नि भूषणही होतं! पुरुषार्थ होता आणि देशभक्तीही होती! एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात त्या अग्नीज्वाला पत्रकारिता परंपरेतले अनेक पत्रकार दिसतात. गोमंतकातही विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात त्याच परंपरेतला एक पुरुषार्थी मराठीतही पत्रकार अग्निज्वालेत उभा असलेला दिसतो. त्या झुंजार मराठी पत्रकाराचे नाव होते! 'भारत'कार कै. गो. पुं. हेगडे देसाई!

दिनांक ७ नोव्हेंबर १८८५ साली जन्म झालेले गो. पुं. हेगडे देसाई प्राथमिक मराठी शिक्षण पूर्ण करून पोर्तुगीज शिक्षणाकडे वळले. पोर्तुगीजमधून त्यांनी वकिलीचे आणि फार्मसीच्या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेतले. या पोर्तुगीज उच्च शिक्षणामुळे त्यांना वकिली करता आली असती, फार्मसीच्या शिक्षणामुळे फार्मसीचा धंदा करता आला असता आणि उच्च सरकारी अधिकाराची नोकरीही करता आली असती. त्यांनी सरकारी नोकरी करावी अशी त्यांच्या आई-वडिलांची इच्छाही होती. परंतु त्यांनी सुखी जीवनाकडे पाठ फिरविली आणि पत्रकारितेच्या अग्निज्वालेत उडी घेतली. यामागे महत्त्वाच्या अशा तीन प्रेरणा होत्या. पहिली प्रेरणा होती ती १९१० साली पोर्तुगालात झालेली राज्यक्रांती! त्या राज्यक्रांतीत तेथील राजेशाही नष्ट झाली आणि प्रजासत्ताकाचा उदय झाला! राजेशाहीबरोबर तेथील कॅथलिक धर्ममार्तंडांचे राज्यसत्तेवरील वर्चस्वही संपले! गोमंतकातल्या हिंदू समाजाला या घटनेने अंधारमय जीवनातून प्रकाशात आणले! प्रजासत्ताकामुळे मिळालेल्या

नागरिक स्वातंत्र्याचा त्या काळच्या हिंदुसमाजातील नेत्यांनी जराही वेळ न दवडता हुशारीने, कौशल्याने उपयोग करून घेऊन गोमंतकात शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळ उभी केली. निस्तेज झालेला हिंदुसमाज या नव्या चळवळीने जागृत होऊन उठला आणि एका पुरुषार्थी पर्वाला प्रारंभ झाला. या नव्या पर्वाचे अध्वर्यु होते थोर समाजसेवक, पत्रकार डॉ. पु. वा. शिरगांवकर! डॉ. शिरगांवकर हेच हेगडे देसाई यांची दुसरी प्रेरणा होती!

महाराष्ट्रात चिपळूणकर, टिळक, आगरकर, परांजपे, लोकहितवादी इत्यादी पत्रपंडितांनी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक नि पत्रकारितेच्या क्षेत्रांत जे क्रांतिकारक पर्व निर्माण केले होते त्याचा विलक्षण प्रभाव हेगडे देसाई यांच्यावर पडला होता. हा प्रभाव ही त्यांची तिसरी प्रेरणा होती. त्यांच्या 'भारत' साप्ताहिकातील त्यांचे अग्रलेख वाचताना तिसऱ्या प्रेरणेचा वैचारिक प्रभाव स्पष्ट जाणवतो.

डॉ. शिरगांवकर यांनी 'प्रभात' नावाचे मराठी व पोर्तुगीज भाषेतले नियतकालिक त्यावेळी काढले होते. पोर्तुगीज विभागाचे संपादन हेगडे देसाई करीत असत. पत्रकारितेचा 'श्रीगणेशा' त्यांनी 'प्रभात' द्वारेच प्रथम गिरविला. 'प्रभात' चा पोर्तुगीज विभाग त्यांच्या प्रभावी लेखनाने त्यावेळी गाजला होता.

'प्रभात' मध्ये असतानाच आपण स्वत:चे पत्र काढावे, असे हेगडे देसाई यांच्या मनाने घेतले. वृत्तपत्राद्वारा लोकसेवा करण्याचा विचार हा टिळक-आगरकरी पत्रकारितेचा कणा होता. तो काळ भांडवलदारी वृत्तपत्रांचा नव्हता. संपादक-पत्रकार हाच वृत्तपत्राचा मालक असल्याचा तो काळ होता. ६ नोव्हेंबर १९१२ रोजी 'भारत' हे मराठी पोर्तुगीज भाषेतले द्विसाप्ताहिक जन्मास घालून हेगडे देसाई हे संपादकमालक झाले.

'भारत' हे नाव आपल्या साप्ताहिकासाठी निवडण्यात हेगडे देसाई यांचा तेजस्वी राष्ट्रीय बाणा दिसून येतो. पोर्तुगीजांच्या अतिरेकी राजवटीत 'भारत' नावाचे वृत्तपत्र काढणे हे एक मोठे धाडसच होते. हेगडे देसाई यांनी ते धाडस केले आणि आयुष्यभर ध्येयासाठी परकीय सत्ताधाऱ्यांशी झुंज दिली.

'भारत' नावामागची प्रेरणा ही भारतात त्याकाळी काँग्रेस चालवीत असलेला स्वातंत्र्य संग्राम हीच होती. आणि 'भारत' पत्राचे ध्येय होते– *'जनसेवा ही ईश्वर सेवा। त्याविण दुसरा धर्म न ठावा।'* आणि या ध्येयानुसार पोर्तुगीज हुकूमशाहीशी झुंज देत छत्तीस वर्षे त्यांनी 'भारत' पत्र चालविले. शेवटचा अंक छपाई यंत्रावर असताना दिनांक १५ ऑगस्ट १९४९ रोजी त्यांचे निधन झाले आणि त्याचबरोबर 'भारत' पत्राचाही अस्त झाला.

'भारत' पत्राची छत्तीस वर्षांची कारकीर्द न्याहाळताना टिळकयुगापासून गांधीयुगापर्यंतच्या भारतीय स्वातंत्र्य समराचा तेजस्वी इतिहास आपल्या नजरेसमोर उभा राहतो. विशेषत: पोर्तुगीज विभागातून भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा 'भारत' कारांनी लिहिलेला रोमहर्षक इतिहास अतिशय महत्त्वाचा आहे. 'भारत' चे अंक पोर्तुगाल आणि पोर्तुगीजांच्या इतर वसाहतीत जात असल्यामुळे स्वातंत्र्यासाठी हिंदुस्थानात काय चालले आहे याची तंतोतंत माहिती तेथील जनतेला मिळत होती.

टिळकयुगात हेगडे देसायांवर टिळकांच्या विचारसरणीचा विलक्षण प्रभाव दिसतो. पण त्याचबरोबर आगरकरांच्या समाजसुधारणा कार्यानेही ते भारावून गेल्याचेही दिसते. गांधीयुगात ते गांधीजींच्या तत्त्वज्ञानाशी हळूहळू कसे आकर्षित होत गेले हे पाहण्यासारखे आहे. १९२४ साली बेळगांव येथे गांधीजींच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशनात ते आणि त्यांचे अनेक मित्र उपस्थित राहिले होते. तेथे त्यांनी गांधीजींची भेट घेऊन त्यांना गोव्यात येण्याचे निमंत्रणही दिले होते. कार्यबाहुल्यामुळे गांधीजी त्यावेळी गोव्यात येऊ शकले नाहीत. परंतु त्यांनी 'भारत' ला आशीर्वादात्मक संदेश दिला होता. त्या अधिवेशनात आलेले कलकत्त्याच्या 'अमृतबझार पत्रिके' चे संपादक तुषारकांती घोष आणि मुंबईच्या 'संदेश' चे संपादक अच्युत बलवंत कोल्हटकर हे हेगडे देसाई यांच्यासमवेत गोव्यात आले होते आणि हेगडे देसाई यांच्या केपे येथील घरी पाहुणचाराला होते. अच्युत बलवंत कोल्हटकर हे तर हेगडे देसाई यांचे जवळचे मित्र होते.

'भारत' च्या पोर्तुगीज विभागात त्यावेळी राष्ट्रीय बाण्याचे मिनेझिस

ब्रागांझा, डॉ. टी. बी. कुन्हा, तेलु मास्कारेन्हस यांच्यासारखे थोर नेते लेखन करीत होते. तेलु मास्कारेन्हस यांचा 'देवतांचा मृत्यु' या शीर्षकाचा लेख 'भारत'च्या पोर्तुगीज व मराठी या दोन्ही विभागात प्रसिद्ध झाल्यामुळे पोर्तुगीज सरकारने 'भारत' वर खटला दाखल केला. पणजी येथील कोर्टाने संपादक, प्रकाशक नि लेखक ह्यांना दोषी ठरवून प्रत्येकी तीनशे रुपये दंड, कोर्ट खर्च आणि एक पंधरवडा 'भारत' पत्र बंद अशी सजा फार्मावली. या निकालाविरुद्ध उच्च न्यायालयात दाद मागण्यात आली, पण तेथे खालच्या कोर्टाने दिलेली सजा कायम करून दंडाची रक्कम दुप्पट करण्यात आली! ही घटना १९२८ सालची .

छत्तीस वर्षाच्या कारकिर्दीत 'भारत' कारांवर जवळजवळ पन्नास छोटे-मोठे खटले पोर्तुगीज सरकारने भरले. त्यापैकी काही खटले त्यांनी आपल्या वकिली कौशल्यावर जिंकले. तर अधिक खटले त्यांच्याविरोधी गेले. दोन खटल्यात आठ महिन्यांची तुरुंगवासाची सजा त्यांना झाली होती. काही खटल्यांत 'भारत'चे प्रकाशन बंद, दंड आणि पंधरा-पंधरा दिवसांच्या सजा त्यांना झाल्या होत्या. काही खटले पोर्तुगालपर्यंत त्यांनी नेले होते, पण त्यांत त्यांना अपयशच आले. या संदर्भात ३ जुलै १९३० च्या 'भारत' च्या अग्रलेखात ते लिहितात, ''पोर्तुगालच्या वरिष्ठ न्यायालयाने 'भारता'चे अपील फेटाळून अप्रत्यक्षपणे खालच्या न्यायालयाचा निर्णय कायम केल्याचे लिस्बोंअहून आलेल्या पत्रावरून कळते. अर्थात खटल्याचे कागद येथे पोचतांच ४ महिने कारावास व दोन हजार रुपये दंडादी रक्कमेची भरपाई ही शिक्षा आह्मांस भोगावी लागेल हे उघड होय. खेरीज अपीलासाठी सोसावा लागलेला ५००/६०० रुपयांचा भुर्दंड निराळाच! ध्येयसाध्यर्थ ब्रिटिश हिंदुस्थानांत जो आत्मयज्ञ दृष्टोत्पत्तीस पडत आहे व स्वदेशोद्धारार्थ जी प्राणांची होळी पेटत आहे, त्या मानाने उपरोक्त शिक्षा ह्मणजे 'दर्यामे खसखस' अशा स्वरूपाची असली तरी येथील एकंदर परिस्थितीचा विचार केला असता ती बरीच कडक आहे हे कोणीही मान्य करील...

''लोकाराधना अथवा सरकारी प्रेम संपादण्याचा विचार आमच्या मनास केव्हाच शिवलेला नाही. केवळ देशकल्याण व राष्ट्रीय तत्त्वांचा प्रसार

याच दुहेरी उद्देशाने ‘भारत’ चालविण्याची कंटकमय जबाबदारी आह्मी आमच्या शिरावर घेऊन ती कसलीच भीडमुर्वत न राखता पार पाडीत आलो आहोत.’’

पत्रकारिता हे हेगडे देसाई यांचे व्रत होते. त्यांच्या व्रताचा भंग करण्याचा प्रयत्न १९३९ साली गोवा गव्हर्नरने करून पाहिला. गव्हर्नरने त्यांना बोलावून घेऊन त्यांच्यासमोर प्रस्ताव ठेवला की, ‘‘गव्हर्नरपद व सेनापतीपद सोडून वाटेल ते अधिकारपद मागा, मी ते तुह्माला देतो. पण अट एकच ‘भारत’चे प्रकाशन बंद करा!’’ ‘भारत’ कारांनी तेथेच गव्हर्नरचा प्रस्ताव फेटाळून लावला! पत्रकार विकला जात नाही हे त्यांनी आपल्या कृतीने सिद्ध केले! या व्रतस्थ भूमिकेबद्दल दिनांक ५ एप्रिल १९३४ रोजी ‘भारत’ च्या अग्रलेखात ते लिहितात, ‘भारता’च्या संपादकाने स्वत:च्या वैयक्तिक हितासाठी राजवाड्यांत जाण्याची अपेक्षा कधी बाळगली नाही. तथापि कैदखान्यात सरकारी पाहुणचार उपभोगण्याचे भाग्य त्याने टाळले नाही! हांजीखोरपणे खुशामत करून सरकारची मर्जी संपादण्यासारखा वशिला ‘भारता’ कडे नसला तरी ह्या पत्राचा सरकारास इतका वचक आहे की, त्यातील प्रत्येक अक्षर वाचून पाहण्यात सरकार दक्ष असते. ह्यावरून सरकारांत ‘भारता’विषयी आदर नाही, असे ह्मणता येत नसून त्या आदराच्या जागी कदर वाटत आहे, असे ह्मणावे लागेल.’’

‘भारत’ मधून हेगडे देसाई यांनी जनतेवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध सतत आवाज उठविला आहे. केवळ लिहून ते गप्प बसले नाहीत तर त्या त्या प्रकरणी प्रत्यक्ष कृती करायलाही पुढे आले. केपे भागातील कावरे येथील वेळीप या मागासलेल्या समाजातील शेतकऱ्यांवर बड्या जमीनदाराने केलेल्या अन्यायाविरुद्ध ‘भारता’ ने मराठी व पोर्तुगीज भाषेतून जबरदस्त आवाज उठविला. जमीनदार व सरकार यांनी एक होऊन ‘भारता’ विरुद्ध कठोर उपाययोजना करण्यास सुरुवात केली. ‘भारत’कार आणि वेळीप शेतकरी हे बंडखोर आहेत. ‘लेनिनवादी’ बोलशेविस्त आहेत, असा प्रचार सरकारधार्जिण्या वृत्तपत्रांतून करण्यात आला. इतकेच नव्हे, तर काहींनी टिळकांप्रमाणे ‘भारत’ कार गोव्यात अराजक माजवीत आहेत, असाही

आरोप केला! या प्रकरणी ‘भारत’ कारांनी आपल्या वकिलीचा काळा कोट अंगावर चढवून न्यायालयात खटला लढविला. पोर्तुगालपर्यंत त्यांनी हे प्रकरण नेले आणि कावरे गावच्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला. एका पत्रकाराने स्वखर्चाने सामान्य शेतकऱ्यांसाठी दिलेला हा लढा मराठी वृत्तपत्राच्या इतिहासात अपूर्वच ह्मणावा लागेल!

अशीच महत्त्वाची दोन प्रकरणे ह्मणजे ‘गोव्यात गुलामांचा बाजार’ आणि ‘दीव प्रकरण’. ही दोन्ही प्रकरणे ‘भारत’ कारांच्या धाडसी व शोधक पत्रकारितेचे दर्शन घडवितात. आसामातील चहाच्या मळ्यांना मजूर पुरविण्यासाठी गोव्यात गुप्तरीतीने ‘गुलामांचा बाजार’ भरविला जात असे. गोव्याहून आसामात नेलेल्या मजुरांना तेथे गुलामासारखे राबविण्यात येते, हे कळताच ‘भारत’च्या मराठी व पोर्तुगीज विभागांतून त्यावर त्यांनी जोरदार शरसंधान केले. गोव्यातले ‘गुलामांच्या बाजारा’ चे दलाल मजुरांना आसामात नेऊन तेथील चहाच्या मळ्यात कसे विकतात याची माहिती ‘भारता’त प्रसिद्ध होताच पोर्तुगीज सरकार खडबडून जागे झाले. ‘भारत’ कारांनी कलकत्याच्या ‘अमृतबाझार पत्रिका’ आणि ‘फॉरवर्ड’ या दोन दैनिकांमार्फत हे प्रकरण अखिल भारतीय पातळीवर नेऊन इंग्रज सरकारला त्या मजुरांना न्याय देण्यास भाग पाडले.

‘दीव प्रकरण’ घडले १९३०-३१ साली. दीवच्या पोर्तुगीज गव्हर्नरच्या कुपुत्राने तेथील जनतेचा भयंकर छळ सुरू केला होता. त्याच्या अरेरावीने हैराण झालेल्या लोकांनी दीव नगरपालिकेच्या अध्यक्षांमार्फत ‘भारत’कारांना दीवला येण्याची विनंती केली. दिनांक ३० नोव्हेंबर १९३० रोजी ‘भारत’कार दीवमध्ये दाखल झाले आणि त्यांनी गुप्तपणे चौकशीला प्रारंभ केला. ते अनेकांना भेटले. त्यांच्या जबान्या घेतल्या. त्या जबान्यांतून गव्हर्नर-कुपुत्राच्या नानारंगी लीलांचे त्यांना दर्शन घडले तेथील काही सरकारी अधिकाऱ्यांकडूनही त्यांनी माहिती गोळा केली आणि एक अहवाल तेथेच तयार केला. त्यांच्या आगमनाची व गव्हर्नर पुत्राविरुद्ध अहवाल तयार केल्याची माहिती सरकारला मिळताच तो अहवाल दीवबाहेर जाऊ नये ह्मणून ते ज्या घरात उतरले होते त्या घरावर पोलिसांचा कडक पहारा

बसविला गेला. इतकेच नव्हे, तर त्यांच्यावर हल्ला करून तो अहवाल व महत्त्वाचे कागदपत्र हस्तगत करण्यासाठी गव्हर्नर-कुपुत्राने गुडांची योजना केली होती. दिनांक ४ डिसेंबर १९३० रोजी रात्रौ स्थानिक नागरिकांच्या मदतीने तेथून निसटण्याचा धाडसी बेत त्यांनी आखला आणि तो यशस्वीपणे पारही पाडला. 'लमाणी' खेडुताचा वेष परिधान करून 'भारत'कार त्या घरातून निसटले आणि जुनागड संस्थानात गेले आणि तेथून रेल्वेने त्यांनी मुंबई गाठली. मुंबईत पत्रकारांना 'दीव प्रकरणा' ची माहिती त्यांनी दिली. आणि गोव्यात पोचताच 'भारत' मधून त्या प्रकरणावर तोफा डागायला सुरवात केली. परिणामी दीव गव्हर्नरच्या कुपुत्राची तेथून उचलबांगडी झाली!

शोध पत्रकारितेचे हे उदाहरण मराठी वृत्तपत्रव्यवसायात १९३०-३१ साली घडून आले हे आश्चर्यकारक नव्हे काय?

राजकीय प्रश्नावर 'भारत' कारांनी धारदार व तेजस्वी लेखन केले आहे. 'गामाचें श्राद्ध' व 'कामोईशचे श्राद्ध' हे त्यांचे अग्रलेख अतिशय स्फोटक आहेत. पोर्तुगीज कवी कामोईशचे 'लुझियदश' हे काव्य ह्मणजे 'कालकूट' असे जळजळीत वर्णन त्यांनी अग्रलेखात केले होते.

पोर्तुगालचा हुकूमशहा डॉ. सालाझार याने आणलेल्या 'वसाहत' कायद्यावर (आक्त-कोलोनियाल) हल्ला करताना 'भारत'कार लिहितात. 'हिंदुस्थानची चळवळ यशस्वी होऊन त्यात गोमंतक प्रांत केव्हा समरस होईल तो होवो, पण त्यापूर्वी आह्मांपुढे असलेले एक पवित्रतम कर्तव्य पार पाडण्यास आह्मी अविश्रांत झटले पाहिजे. 'आक्तुकोलोनियाल' च्या (वसाहत कायदा) लज्जास्पद कचाट्यातून गोमंतक सोडवून तो पूर्ण स्वायत्त बनविण्याचा पथ आक्रमणे हेच ते कर्तव्य होय. आह्मी पोर्तुगाल सरकारचे 'मुंडकार' नसून आमच्या देशाचे 'भाटकार' आहोत हे सिद्ध करण्याचा समय येऊन ठेपला आहे.' (२०-११-१९३०)

१९३३ साली पोर्तुगालचे हुकूमशहा डॉ. सालाझारचे नाव बोरी पुलास देण्याची सूचना सासष्टी व फोंडा नगरपालिकांच्या अध्यक्षांनी केली तेव्हा 'भारत'कार त्यावर प्रखर टीकाप्रहार करताना लिहितात. ''परसत्तेचा

दीर्घकालीन दाब जितांची स्वाभिमानी वृत्ति तर चिरडून टाकतोच; खेरीज स्वातंत्र्य-सौख्यास मुकलेल्या जनतेत स्वार्थजन्य भ्याडपणा व घरभेदीपणा हे राष्ट्र-हितविघातक दुर्गुण भरमसाठ फोफावण्यास उपरोक्त दाब कारणीभूत होत असतो. आणि परसत्तेकडून जितांची होत असलेली मोठ्यांतली मोठी हानी ती हीच. बोरीच्या पुलास दोतोर सालझाराचे नाव देण्याची जी सूचना साष्टी व फोंडा या उभय तालुक्यांतील नगरपालिकांच्या अध्यक्षांकडून केली गेली, तिच्या बुडाशीही परसत्तेचाच दाब कोणालाही दिसून येईल. वस्तुत: 'आक्त कोलानियाल' द्वारा साहेबांनी आह्मांस निग्रोंच्या कोटींत ढकलेले असून पोर्तुगालचे 'मुंडकार' बनविले आहे. जो अपमान राजकाच्या ऐन अमदानीत पोर्तुगीज राष्ट्र करू शकले व धजले नाही तोचा अपमान करण्यास सदर साहेबांनी प्राजकांच्या सत्ताकालांत कोणाचीच पर्वा बाळगली नाही! आह्मांस 'इंदिसेन्स' व 'आसिमिलाद' बनवणारी 'असामान्य' व्यक्ती ह्मणजे सालाझारच! अशा 'अद्वितीय' पुरुषाचे नाव उपरिनिर्दिष्ट पुलास देण्याच्या कामी आमच्यातीलच 'आसिमिलादां' नी वकिली करणे ह्मणजे आमचे श्रीमुख रंगविणाऱ्याचा देव्हारा माजविण्यासारखे 'चिंतामणी' कृत्य होय, यांत संशय नाही! पण, परसत्तेच्या दाबाने सध्या माणुसकीस अंतरलेल्या 'नरपुंगवांस' त्याचे काय! खाना पीना मजा मारना! राष्ट्र मरो वा तरो-ह्याची त्यांना थोडीच काळजी!''

हुकूमशहा डॉ. सलाझारने वृत्तपत्रांवर प्रसिद्धपूर्व 'सेन्सॉरशिप' लादल्याने 'भारत'कारांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. मुद्रित झालेला सर्व मजकूर 'सेन्सॉर' करण्यासाठी केपेहून पणजीला ते घेऊन येत आणि 'सेन्सॉर' झालेलाच मजकूर मग त्यांना छापावा लागे. कधी कधी अग्रलेख आक्षेपार्ह ठरविला जात असे. मग ती जागा कोरी ठेवण्यात येई!

सामाजिक सुधारणांच्या बाबतीतही 'भारत' आणि 'भारत'कार आघाडीवर होते. १९२८ साली विनायक महाराज मसुकरांनी घडवून आणलेल्या शुद्धिकरणाच्या चळवळीत हेगडे देसाई सहभागी झाले होते. १९३० साली त्यांनी अस्पृश्यता निवारण चळवळीत स्वत:ला झोकून दिले होते. त्यांचे वैशिष्ट्य ह्मणजे ते कर्ते सुधारक होते. केपे येथील एका हरिजनाच्या घरात

श्रीसत्यनारायणाची पूजा करून त्यांनी तेथे भोजन केल्यामुळे त्यांना सामाजिक बहिष्काराला तोंड द्यावे लागले. अनेक सामाजिक रुढींवर लॉटरी-खेळावर, देवस्थानांतील महाजनांच्या मुजोरीवर लेखनातून त्यांनी आसूड ओढले.

गोमंतकातल्या देवदासींचा प्रश्न हाती घेऊन 'भारत'कारांनी एक क्रांतिकारक पाऊल टाकले होते. जांबावली येथे नरसिंह जांबावलीकर यांच्या निवासस्थानी हेगडे देसाई यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या एका सभेत 'गोमंतकीय मराठा गायक समाज' या संस्थेचा पाया घातला गेला. देवदासी पद्धत बंद करून समाजात सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने जोराने प्रयत्न 'भारत' मधून सुरू झाले. स्वत: हेगडे देसाई त्या समाजातील सुधारणावादी कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन गांवोगांवी प्रचार सभा आणि प्रवचने देत फिरायला लागले. ह्या प्रवचनांच्या वेळी ते देवस्थानांच्या महाजनांवर कडक टीका करीत असल्यामुळे साहजिकच महाजनमंडळी त्यांना विरोध करायला पुढे सरसावली. परंतु त्यांच्या विरोधाला तोंड देत 'भारत'कारांनी आपले कार्य चालूच ठेवले. हे कार्य एवढे कठीण होते की, खुद्द देवदासी समाजातील काही मंडळी देवदासी पद्धत बंद पडली तर देवाचा कोप होईल, असे युक्तिवाद करू लागली. अर्थात यामागेही महाजनांचा हात होता. अशाही परिस्थितीत अंधश्रद्धेवर कठोर हल्ले करीत काकोडे येथे आनंद काकोडकर, कांत जांबावलीकर, राजाराम पैंगीणकर इत्यादी त्या समाजातील कार्यकर्त्यांच्या सहकार्याने त्यांनी 'मराठा गायक समाजा'ची पहिली परिषद भरविली. तिचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. पुढे याच संस्थेतून बलाढ्य अशी 'गोमंतक मराठा समाज' ही संस्था जन्मास आली.

शैक्षणिक प्रश्नांवर 'भारत' मधून नेहमीच 'भारत'कारांनी नवे नवे विचार मांडले आहेत. गोमंतकात राष्ट्रीय महाविद्यालयाची आवश्यकता प्रतिपादन करताना ते लिहितात, 'विद्यालये ह्मणजे कारकून बनण्याचे कारखाने नाहीत की त्यांतून मुक्त झाल्यावर सरकारी गुलामगिरीकरिता अर्जांची भेंडोळी रवाना करावी व चातकासारखी उत्तराची मार्गप्रतीक्षा करीत स्वस्थ बसावे.' स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करताना त्यांनी स्त्री समर्थ होईल अशा शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन केली आहे.

मराठी-कोकणी वादाचा प्रारंभ १९६० च्या सुमारास झाला असून 'भारत'कारानी गोमंतकाची मातृभाषा मराठीच असल्याचा व तीच भाषा प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक स्तरावरील शिक्षणाचे माध्यम असले पाहिजे असा ठणठणीत पुरस्कार सतत केलेला आहे! एका अग्रलेखात ते लिहितात, 'ज्या समाजाच्या रक्तांत मराठी मिसळली आहे तो समाज मराठीचा अव्हेर करण्यास कदापि तयार होणार नाही ते उघड होय. हा समाज वगळून ज्या अल्पसंख्य जनतेला कोंकणीची जोपासना करण्याची इच्छा असेल तिच्या मार्गावर कोणीही आड येणार नाही, मात्र त्या कोंकणीवाद्यांनी मराठीची मान मुरगळून मराठीच्या जागी कोंकणीची स्थापना करण्याचा निरर्थक व नादान नाद धरू नये. गोमंतकीय हिंदूत मराठी इतकी मुरलेली आहे की, कोंकणीवाद्यांच्या प्रपितामहांनासुद्धा तिची हत्त्या करणे शक्य नाही.' (दिनांक ६ जून १९४६)

(अपूर्ण)

**– शशिकांत नार्वेकर**

# परिपूर्ती

## आधुनिक गोमंतकाचे प्रणेते

कै. शशिकांत नार्वेकर यांनीच मुख्यत: निवडलेल्या अग्रलेखांची एकूण पृष्ठसंख्या सातशे झाली आहे. त्यांचे राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक व संकीर्ण असे वर्गीकरण करण्यात आले असून राजकीय व सामाजिक विषयांवरील अग्रलेखांचा प्रस्तुत पहिल्या खंडात समावेश करण्यात आला आहे. उर्वरित विभागांतील अग्रलेखांचा दुसरा खंड करण्यात आला आहे.

पोर्तुगालात १९१० साली स्वातंत्र्य, समता, विश्व-बंधुता या तत्त्वत्रयीवर प्रजासत्ताक स्थापन झाल्यावर गोमंतकीय जनतेस जे आचार-विचार-उच्चारांचे स्वातंत्र्य लाभले त्याचा फायदा घेऊन गोव्यात मराठी

नियतकालिके सुरू झाली. ती सुरू करणारी मंडळी मुख्यत: तरुण होती आणि त्यांचा ध्येयवाद उत्कट होता. 'भारत'कार हेगडे देसाई हे त्यांच्यापैकी एक. त्यांनी आरंभी 'प्रभात' पत्र कसे चालविले आणि तिथे मतभेद उद्भवल्यावर त्यांनी स्वतंत्रपणे 'भारत' पत्र कसे सुरू केले त्याची हकीकत 'भारत' च्या पहिल्या अंकात 'मुखबंध' या अग्रलेखात आली आहे. तो अग्रलेख आरंभी दिला आहे. त्यातील तारुण्यसुलभ उत्साह, आवेश आणि निर्धार बघण्याजोगा आहे. 'रिपब्लिक' मुळे हिंदूमधील 'उल्हास' इथे दिसेल. म रेपर्यंत 'भारत'कारांचा उल्हास कायम होता.

राजकीय व सामाजिक विभागांतील अग्रलेखांवरून 'भारत'कारांच्या विचारांतील तेजस्वीता आणि मनातील कळकळ आजही जाणवते. टिळक-आगरकरांच्या पत्रकारितेने महाराष्ट्रात जी जागृती घडवून आणली तिचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला स्पष्टपणे दिसतो. ते राजकीय विषयात टिळकांसारखे जहाल तर सामाजिक विषयांत आगकरकरांसारखे बुद्धिवादी आहेत. महाराष्ट्रात 'राजकीय उलाढालींकडे डोळेझांक करून सामाजिक सुधारणेकडे पाहिल्याने जोर केला असता तर...' बरे झाले असते असे त्यांना वाटत होते. ह्मणजे ते नेमस्त राजकीय विचारधारेकडे झुकले होते असेही दिसते. शेवटी तर ते गांधीवादी झालेले दिसतात.

'भारत' पत्राचा काल हा या देशातील राष्ट्रवादाच्या उदयाचा काल होता. 'राष्ट्रवाद' ही पाश्यात्य संकल्पना होती. या संकल्पनेनुसार गोव्यासह संपूर्ण भारत हे एक राष्ट्र आहे अशी हेगडे देसाईंची धारणा होती. त्यांच्या या धारणेतील वेगळेपण मात्र नमूद करण्याजोगे आहे. 'राष्ट्रीयत्वाची कल्पना व तिच्यातील तारतम्यभाव' या विचारप्रवर्तक अग्रलेखात ते ह्मणतात, 'युरोपियन कल्पनांस अनुसरून राष्ट्रीयत्त्वाचा विचार आपण करीत आलो. या कल्पनेत राजकीय बंधनांचा अधिक विचार आहे. आपण तेवढा हा शब्द जशाचा तसाच इकडे वापरल्याने... राजकीय बंधनांचा इकडे निर्देश होऊन तज्जन्य भ्रममूलक कल्पनांस थारा मिळत असतो. वास्तविक त्या ऐवजी खरा शब्द ह्मटला ह्मणजे स्वत्व हाच होय.' भारतीय मानसात राष्ट्र या संकल्पनेत राजकीय आशयापेक्षा सांस्कृतिक आशय अधिक आहे, ही गोष्ट ते नमूद

करीत आहेत.  समाजाचे सांस्कृतिक स्वत्व लोकांना एकत्र आणते आणि ठेवते.

'रिपब्लिक'मुळे गोमंतकीयांना तत्त्वत: तरी नागरी स्वातंत्र्य लाभले होते आणि त्याचा लाभ खुबीने घेण्याचे धोरण हिंदूनी अवलंबिले होते. त्यामुळे एका सांस्कृतिक आवरणाखाली इथे राष्ट्रवादाची जोपासना झाली. या गोष्टीची जाणीव ब्युरोक्रेटस्ना (नोकरशहा) झाली असली पाहिजे. त्यांचे एकूण धोरण हडेलहप्पीचे होते. त्याची झळ 'भारत'करांना बसली हे त्यांच्यावरील ५० खटलेच सांगत आहेत. 'भारत'पत्र चालवताना त्यांना सतत तारेवरची कसरत करावी लागत होती आणि आपल्या सडेतोड लेखणीला क्वचितच लगाम लावावा लागत होता. 'समता की विषमता?' या अग्रलेखाचा समारोप करताना ते ह्मणतात, 'बोलणाऱ्याच्या पाठीमागे बहुजनसमाजाची तोंडे आ वासून उभी राहिली पाहिजेत. तेव्हाच त्या बोलण्याचा प्रभाव पडावयाचा...(पण तशी परिस्थिती नसल्यामुळे) प्रस्तुत विषयासंबंधाने जो प्रकार चालला आहे तो स्पष्टपणे नमूद करणे सुरक्षित नसल्यावरून येथेच थांबलेले बरे.'

लोकमान्य टिळकांनी ब्रिटिश राज्याविरूद्ध लढताना ब्रिटिशांच्या कायदेबाज वृत्तीचा शिताफीने उपयोग करून घेतला. त्यावेळी त्यांनी ब्रिटिश राज्य व त्यांची नोकरशाही यांच्यात तफावत करण्याची प्रतिभाशाली चाल खेळली, असे ह्मणतात. त्याच धर्तीवर 'भारत'कारांनीही आपली लेखणी लढविली. राज्यसंस्थेशी निष्ठा दाखवून त्यांनी नोकरशहांना धारेवर धरले असे दिसते. 'राष्ट्रीय मोक्षप्राप्तीचा सोपानमार्ग' या अग्रलेखात ते ह्मणतात, 'आमच्या नोकरशाहीला तिचा देशाभिमान शोषून, धैर्य गिळंकृत करून व नि:स्वार्थ बुद्धि अपहरून अगदी निकामी, कर्तव्यशून्य, भ्याड व पोटभरू बनविली आहे.' अशा नोकरशाहीवर टीकेची झोड उठवून ते लोकांत असंतोष पेटविण्याचे कार्य मोठ्या खुबीने करतात.

'राजकीय प्रकरणांपासून धार्मिक व्यवहारांची ताटातूट करणे हे रिपब्लिकचे एक उद्दिष्ट होते.' इकडे ध्यान वेधून ते 'रिपब्लिक' चा जास्तीत जास्त लाभ घेऊ पाहतात व लेखनस्वातंत्र्याचा उपभोग घेऊन सरकारी

धोरणांवर हल्ला चढवितात. 'भारत'कारांच्या या शाब्दिक भडीमाराचा लोप व्हावा ह्मणून त्यांना अनेक प्रलोभने दाखविण्यात आली पण ते त्यांना बळी पडले नाहीत. त्यांच्यावर कारावास लादण्यात आले पण ते खचून गेले नाहीत. शुद्ध आचारविचारांची एक नैतिक शक्ती त्यांना सतत प्रज्वलित करीत राहिली. त्यांच्या लेखनातील ही शक्ती अनुभवणे हा एक रोमांचकारी अनुभव आहे.

'भारत पत्र मुख्यत: हिंदुच्या हिताच्या उद्देशानें जन्मास आलेलें आहे...' 'हिंदूनी विशेषत: सुशिक्षित ह्मणविणाऱ्यांनी नेभळेपणा सोडून धडाडीने पुढाकार घेऊन सार्वजनिक कार्यं हाती घ्यावी.' या वाक्यांतून 'भारत'कारांच्या ध्येय धोरणांवर प्रकाश पडतो. हिंदूमध्ये राष्ट्रीय भावना जागृत करून त्यांना कर्तव्यनिष्ठ बनवावे अशा उदात्त हेतूने आणि दुर्दम्य आत्मविश्वासाने त्यांनी हे पत्र धडाडीने चालविले. त्यासाठी अनेक संकटे स्वत:वर ओढवून घेतली, घरादाराकडे, धनसंपत्तीकडे दुर्लक्ष केले आणि कुणी 'वेडेपीर' ह्मटले तरी त्याची पर्वा केली नाही. गोमंतकीय मराठी वृत्तपत्रसृष्टीत ते आपल्या शैलीदार लेखणीने आणि उत्कट ध्येयवादाने सूर्यासारखे तळपत आहेत.

'भारत'कारांनी लगतच्या महाराष्ट्रात आणि संपूर्ण देशात घडणाऱ्या राजकीय घडामोडीकडे गोमंतकियांचे लक्ष वेधणारे अनेक अग्रलेख लिहिले आहेत. त्यामागील त्यांचा उद्देश स्पष्ट आहे. 'भारतीय चळवळ' या अग्रलेखाचा समारोप करताना ते ह्मणतात, 'सरते शेवटी इतकीच अपेक्षा आहे की, भारतातील चळवळ प्रभावी रीतीने पार पडून ज्या स्वराज्यासाठी त्यातील रहिवाशी तळमळ करीत आहेत ते त्यांस लवकर प्राप्त होवो व त्यांच्या सार्वजनिक कृत्यांतील उत्साह पाहून आह्मांस (गोमंतकीयांस) प्राप्त झालेल्या स्वराज्याचा (रिपब्लिक) पूर्ण उपभोग घेण्यासाठी तसली स्फूर्ति उत्पन्न होवो. कांकी, तशी स्फूर्ति व उत्साह आह्मांत नसेल तर स्वराज्यापेक्षाही विशेष सुखकर राज्यपद्धती प्राप्त झाली तरी तिजपासून देखील आमची ऊर्जितावस्था होण्याची आशाच नको.' त्यांचे उद्दिष्ट 'स्वराज्य' हेच होते, ते प्राप्त होईतो 'सुराज्या'साठी लढत राहण्याचे त्यांचे धोरण होते.

हे अग्रलेख १९१२ ते १९४९ या काळात लिहिले गेले आहेत. त्याकाळात प्रचलित असलेल्या शुद्धलेखन पद्धतीनुसार ते स्वाभविकपणेच लिहिलेले आहेत. प्रस्तुत ग्रंथात त्याच पद्धतीनुसार आणि मुख्यत: मुळाबरहुकूम ते छापले आहेत. 'म्हणजे' हा शब्द 'ह्मणजे' असा ते लिहितात. 'ह्म' हे त्यांचे सर्रास लिखाण आहे. ते तसेच ठेवले आहे. यामुळे भाषेतूनच 'भारत'कारांच्या काळाचा बोध सहजपणे होतो, व त्यांचे आपल्या काळाच्या पलीकडे झेपावणारे द्रष्टेपण जाणवते. त्यांच्या विचारांच्या आकलनास मदत होते. प्रत्येक अग्रलेखाच्या अंती त्याच्या प्रकाशनाची तिथी इंग्रजी कालगणनेनुसार दिली आहे. तिनेही कालबोध होईल. मात्र मराठीतील नव्या शुद्धलेखनास सरावलेल्या वाचकांना वाचन थोडे गैरसोयीचे वाटेल. पण त्यास इलाज नाही.

'आंग, 'असी', 'कश्यास' अशी काही शब्दरूपे 'भारत' कारांच्या लेखनात पुनरावृत्त झाली आहेत आणि ती तशीच ठेवली आहेत. मूळ संहिता शक्यतो जशीच्या तशीच ठेवली आहे. परंतु 'भारत' हे साप्ताहिक पत्र होते. अशा पत्रातील लेखनाला 'घाईघाईतील साहित्य' (Literature in hurry) असे ह्मणतात. त्यामुळे मुळे छापताना, लिहून घेताना आणि मुद्रिते तपासताना नव्या, जुन्या शुद्धलेखनाचा मेळ घालताना किंवा दृष्टिदोषामुळेही काही चुका राहिल्या असणे शक्य आहे. दुसऱ्या खंडाअखेरी किमान अर्थविपर्यास होणाऱ्या शब्दांचे शुद्धिपत्रक देण्यात येईल. असे आश्वासन देऊन ठेवतो.

'भारत'कारांची भाषा मोठी जोरकस आणि जोमदार आहे. 'फरीक करणे' (चुकते करणे) असे स्थानिक शब्द आणि वाक्‌प्रयोग ते सहजपणे योजतात. अनेक पोर्तुगीज शब्द वा त्या भाषेच्या धाटणीचे शब्द ते सरसहा वापरतात. 'करील त्याचा कारभार आणि मारील त्याची तलवार.' अशा ह्मणींचा प्रयोजक वापर ते करतात. संस्कृत, हिंदी व मराठी समर्पक सुभाषिते वापरतात. यामुळे त्यांच्या विवेचनाची रोचकता वाढताना दिसते. ते प्रौढ, गंभीर बनते. क्वचित त्यांच्या लेखणीत बोजडपणा जाणवतो पण तो त्यांचा दोष नसून तत्कालीन मराठी लेखनशैलीचाच विशेष वाटतो. त्यांच्या शैलीत जे सौंदर्य आहे आणि जे आजही जाणवते ते त्यांच्यातील अदम्य

आत्मविश्वासामुळे आणि देशाच्या व समाजाच्या कळकळीमुळे. आपला देश, त्याच्या परंपरा, त्याचे गुण आणि त्याचे दोष, भारतकार कशाचेही वर्णन करीत असोत त्यातून त्यांची खरीखुरी कळकळ आणि खरीखुरी देशभक्ती प्रकट होत राहते. बुद्धिप्रामाण्याची कास धरून समाज सुधारणा करण्याचा बाणा जाणवतो. अशा लेखनात पुष्कळ कालबाह्य बाबी दिसू शकतात. त्या विशिष्ट काळाच्या चौकटीतच पहाव्या लागतात. मात्र सत्यनिष्ठा, देशभक्ती आणि कळकळ या गोष्टी कधी कालबाह्य होणाऱ्या नसतात. 'भारत' कारांचे लेखन आजही वाचनीय ठरते ते यासाठीच. या गोष्टींमुळेच या वृत्तपत्रीय लेखनाला काही चिरंतन मूल्य प्राप्त झाले आहे. त्यातील तेज आणि आवेश आजही कमी झालेला नाही. अक्षरवाङ्मय ठरावे ह्मणून असे लेखन केलेले नसते, पण आपोआपच ते अक्षरवाङ्मय ठरत असते. गोमंतकाच्या सांस्कृतिक पुनरुत्थानाचा ज्यांना शोध घ्यावासा वाटेल त्यांना 'भारत'कारांचे हे लेख वाचण्याशिवाय गत्यंतर नाही. गोमंतकात अवतरलेले 'रिपब्लिक' काहींसे योगायोगानेच अवतरले, त्यासाठी इथे मोठे उठाव झाले नव्हते, लढे झाले नव्हते. तसे होण्याजोगी परिस्थिती नव्हती.

पोर्तुगालात राज्यक्रांती झाली आणि तिचे फळ गोमंतकाच्या पदरात अनायासे पडले. या घटनेने काहीशा भांबावून गेलेल्या गोमंतकीय लोकमानसाचे सुंदर प्रतिबिंब या अग्रलेखांत पडले आहे. अशा परिस्थितीचा मोठ्या धैर्याने व चातुर्याने लाभ घेणारा 'भारत' कारांसारखा धुरंधर पत्रकार विचारवंत इथे निर्माण व्हावा, हे गोमंतकाचे भाग्य होते. त्याने घडवून आणलेली जोकजागृती, नव्या संस्थात्मक जीवनाची त्याने केलेली डोळस निगराणी हे पाहाण्याजोगे विशेष आहेत. या नव्या संधीचा जास्तीतजास्त फायदा उठवावा अशी लगबग त्यांना लागली आहे. त्यांची उत्साहमूर्ती सर्वत्र संचार करीत आहे, सर्वांना जागृत करीत आहे, आपला स्वार्थ बाजूस ठेवून, आपला आळस झटकून लोकांना ते कार्यप्रवृत्त करीत आहेत आणि त्यासाठी होतील त्या शिक्षा भोगीत आहेत, येतील त्या आपदा झेलीत आहेत, असे चित्र सातत्याने डोळ्यांपुढे उभे राहते. ते हृदयंगम आहे.

'बाणेदारपणाचे उदाहरण' या अग्रलेखात दोतोर प्रार्तिरिस दियस या

ख्रिस्ती गृहस्थाची कहाणी दिली आहे ती आता गोव्यातही विस्मृतीत गडप झाली आहे. दियस यांचा जन्म चिंचोणे येथे झाला. उच्च नैतिक आचरणाने तिमोरच्या गव्हर्नोदोर पदावर ते विराजित झाले. पण 'मी कोणत्याही बाबतींत प्राणापलीकडे जपतो, ती माझी अब्रू, मला अधिक प्रिय आहे. सबब माझ्या सध्याच्या अधिकारास साजेशा इमानाने एकाच मार्गाचें अवलंबन करीतों व तो मार्ग ह्मणजे माझ्या ताब्यांत असलेला हुद्दा मी आपल्या ताब्यात देतो.' असे बाणेदार उत्तर देऊन त्यांनी गव्हर्नरपदावर लाथ मारली. विश्‍वासास पात्र नसलेल्या माणसांना काढून टाकल्यावर वरील दडपणाला बळी न पडता पद सोडण्यास त्यांनी दाखवलेले धैर्य खरोखर मोठे आहे. अशा हकीगतींनी या अग्रलेखांना वेगळी लज्जत आणली आहे. मानवी जीवनाची ही अंगे त्यांनी नोंदवून ठेवली आहेत. ती आजही प्रेरक वाटतील. दोतोर दियस यांच्या उदाहरणावरून त्यांनी 'दोतोर दियश यांनी राष्ट्रीयत्वाची प्रौढी सांगणाऱ्या हिंदुसमाजात सुद्धा बहुतेक न दिसणारा दांडगा निस्वार्थी बाणेदारपणा दाखविला.' असा निष्कर्ष काढला आहे. तो त्यांच्या निर्मळ, गुणपूजक वृत्तीचा निदर्शक आहे. हे दोतोर दियस पुढे मनस्तापाने दिवंगत झाले...

'भारत'कारांचे वाचन विस्तृत आहे. त्याच्या खुणा जागोजाग दिसतात. त्यांच्या विचारांचा पल्ला फार मोठा आहे. जगातील घडामोडींच्या विस्तृत पटावर ते आपले विचार मांडीत जातात. ''पाश्‍चात्य राष्ट्रांनी भौतिक शास्त्रे व प्रवृत्तिमार्ग यांच्या जोरावर आमचे सर्व वैभव हरण केलेलें आहे.'' अशा एकेका वाक्यात त्यांनी केलेल्या समाजस्थितीच्या निदानाचे आश्‍चर्य वाटते. ते एक मोठे समाजप्रबोधक होते यात संशय नाही. या दृष्टीने 'वामनावतार' या अग्रलेखात त्यांनी एका पुराणकथेला दिलेला नवा कालसुसंगत अर्थ मोठा वाचण्याजोगा झाला आहे. आपले लोक जुन्या गोष्टींना चिकटून राहणारे आहेत. ह्मणून जुन्या गोष्टींतच नवा अर्थ भरायचा, हे महाराष्ट्रातील विचारवंताचे धोरणच 'भारत'कारांनी अवलंबिलेले दिसते.

१९१२ ते १९४९ या काळात गोव्यात, देशात आणि जगात घडणाऱ्या सर्व घडामोडींकडे त्यांचे बारीक लक्ष आहे. गोरगरीबांच्या नावाने राजकारण करणारा बोल्शेविझम कर्मठ धर्मसंस्थेला आव्हान देत आहे आणि

तो भराभर जगभर पसरण्यास वेळ लागणार नाही, याची जाणीव त्यांनी एके ठिकाणी प्रकट केली आहे. जपान मधील प्रगतीकडे ते लक्ष वेधतात.

कोणीही विचारवंत घेतला तरी त्याच्या काळाच्या काही मर्यादा त्याला पडतच असतात. 'रिपब्लिक' ने राजकारणापासून धार्मिकबाबींची फारकत केली आहे, हे त्यांना दिसत असले तरी भारतातील धार्मिक बहुविधतेचे भान आरंभी त्यांना आले होते का? अशी शंका वाटते. 'हिंदुस्तानांत धार्मिक भावनेच्या बळावरच अखंड एकी उभारणे इष्ट.' असे ते 'भगवंताचे अधिष्ठान' या अग्रलेखाचा समारोप करताना ह्मणतात (१९२३). आपल्या राष्ट्राने स्वत:ची घटना तयार करताना ज्या धर्मनिरपेक्षतेचा पुढे अवलंब केला त्याची जाण त्यांच्या लेखनात तेवढी दिसत नाही. ते वृत्तीने कर्मठ नाहीत, सनातनी तर मुळीच नाहीत, अन्य धर्मियांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन उदार आहे. तरी राजाश्रय लाभलेल्या ख्रिश्चन धार्मियांचे गोव्यातील अरेरावीचे वर्तन पाहून ते आपल्या हिंदुबांधवांना सुधारून त्यांच्यात एकी घडवून आणू पहात होते. त्या चौकटीत त्यांचे विचारविश्व सामावते. हा त्या काळाचा प्रभाव आहे. 'प्रागतिक संघाची परिषद' या लेखात मात्र ते असे ह्मणतात की, 'सर्व हिंदूंना एका केंद्रांत राहता यावे... आणि एकंदरीत इतर समाजाच्या बरोबरींने राहून, खांद्यास खांदा लावून आपल्या जन्मदात्या मायभूमीचे अंशत: पांग फेडिता यावे यासाठी एका संघटित संस्थेची आवश्यकता होती.' इथे ते आपल्या हिंदुत्ववादी विचारविश्वाची चौकट काहीशी मोडू पाहात आहेत, असे जाणवते. मूलत: ते बुद्धिप्रामाण्यवादी असल्याने त्यांच्या विचारांची दिशा इहवादी सर्वधर्मसमन्वयशील राज्याकडेच राहिली असती असेच दिसते. 'गोमंतकस्थ हिंदूचे ख्रिस्ती समाजाशी कर्तव्य' या लेखात तर ते स्पष्टपणे ह्मणतात की, 'हिंदूंकडून उपक्रमविल्या जाणाऱ्या राष्ट्रीय संस्था व चळवळी यांकडे ख्रिस्ती लोकांची आतुरतायुक्त सहानुभूती वळविण्याचा त्यांनी (गोमंतकीय हिंदू) मार्ग स्वीकारला असे झाल्याशिवाय तूर्तच्या परिस्थितीत गोमंतकातील राष्ट्रीय राजकारणाचे पाऊल पुढे पडणे शक्य नाही.'

खरे तर त्यांना स्पष्टपणे दिसत होते की, पोर्तुगीज 'रिपब्लिक'च्या घटनेतील आधारभूत अशा मुख्य कायद्याबरहुकूम त्या प्रजासत्ताक राष्ट्राने

ख्रिस्ती धर्म व राजसत्ता यांचा संबंध अजिबात तोडून टाकावयास पाहिजे होता. पण धर्मकर्मठपणाच्या समर्थनाप्रीत्यर्थ, ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराकरिता आपल्या क्रूरतर कृत्यांनी इतिहासात अजरामर झालेल्या व 'इंक्विझिशांव' (धर्मसमीक्षण) गोव्यात स्थापन केलेल्यांचे वंशज असे जे पोर्तुगीज यांच्या मनातून त्या ख्रिस्ती धर्माच्या अवडंबराचा मोह अद्याप जात नाही. 'या गोष्टीची अगदी वेगळी कडवी, प्रतिक्रिया होणे शक्य होते. त्यामुळेच 'भारत'कारांचा उदार आणि व्यापक राष्ट्रीय दृष्टिकोण नमूद करण्याजोगा वाटतो व त्यांच्याबद्दलचा आदरभाव वाढतो. 'धर्मापेक्षा, जातीपेक्षा जगांत काही श्रेष्ठतर आहे, आणि ते ह्मणजे स्वत:च देश होय.' (हिंदुसभेसंबंधी जनतेच्या अपेक्षा) या वळणावर ते क्रमाक्रमाने पोचले आहेत. एवढेच नव्हे तर' धर्म ही अस्तास जाऊ लागलेली एक 'भ्रामक' गोष्ट आहे. असे त्यांना वाटू लागले होते. (पहा : धर्म जात आणि देश.)

दीवप्रकरणी 'भारत'कारांनी शोधपत्रकारितेची केलेली कमाल या गोष्टीचा उल्लेख नार्वेकरांनी केलेला आहेच. त्या दृष्टीने 'अरेरावी' हा अग्रलेख मुद्दाम वाचावा. स्वत: 'भारत'कारांनी या साहसी पत्रकारितेचे वर्णन करताना ह्मटले आहे की, 'हा प्रकार कादंबरीतून वर्णन करण्यासारखा आहे, यात संदेह नाही.' पुढे असेही ह्मटले आहे की, 'सदर प्रकरणावर त्यांनी एक पुस्तक लिहिले आहे.' हे पुस्तक माझ्या पाहाण्यात नाही. कदाचित ते पोर्तुगीज भाषेत असेल. त्या अग्रलेखात शेवटी ह्मटले जाते की, 'दीवच्या एकंदर प्रकारामुळे असे ह्मणण्यास प्रत्यवास नाही, की आमच्या संपादकांचा जन्म केवळ बेमुर्वत अधिकाऱ्यांशी झुंजण्यासाठी झाला आहे.'

महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक चळवळींचा आणि मराठी वाङ्मयाचा गोव्यातील हिंदु समाजावर किती खोल प्रभाव पडत होता आणि त्यांच्यात राष्ट्रीय जागृती कशी होत होती, त्याचे उत्तम प्रतिबिंब 'भारत'कारांच्या या अग्रलेखात पडलेले दिसते. महाराष्ट्राचा हा परिणाम 'आनंदाची गोष्ट आहे.' असे त्यांना वाटत होते. या परिणामांमुळेच गोव्यातील संस्थात्मक जीवनाला आकार आला होता, हे त्यांच्या विवेचनातून जाणवते.

'भारत'कारांच्या लेखनात सर्वत्र संयम आणि समतोल दिसतो. अविचल निष्ठा आणि शांती दिसते. गोमंतकियांना 'कुत्रे' संबोधलेल्या पोर्तुगीज लेखाचा खरपूस समाचार घेणारे दोन अग्रलेख व गामाचा महोत्सव करण्यास निघालेल्यांच्या निर्बुद्धतेवर केलेले प्रहार हे वगळल्यास त्यांची भाषा कुठेही उपहासप्रधान बोचरी झालेली नाही. प्रतिपक्षावरील टीकेत विधायकता सुटलेली नाही. उपहास, उपरोध, विटंबना हा त्यांचा मार्ग नाही. कुणाची बदनामी करण्याजोगी असली तरी ते नामोल्लेख टाळतात. सूचक उल्लेख करतात. व्यक्तिद्वेष किंवा टर उडवणे हे त्यांच्या स्वभावात नाही. विषय राजकीय असो अथवा सामाजिक कर्त्या माणसाची विधायक दृष्टीच दिसेल. व्यापकता, उदारता, कळकळ, गुणग्राहकता, देशोन्नतीचा ध्यास, सामाजिक सुधारणांचा ओढा या गुणांमुळे भारतकारांचे लेखन समृद्ध झाले आहे. विधायक पत्रकारितेचा एक आदर्श त्यांनी निर्माण करून ठेवला आहे. देशकालवर्तमानाचे भान सुटू न देता त्यांनी हा आदर्श निर्माण केला आहे.

## राजकीय विचार

गोमंतकाचे पूर्ण स्वातंत्र्य हेच 'भारत'कारांचे अंतिम उद्दिष्ट होते. 'स्वायत्त गोमंतक' (२७.११.१९३०) या अग्रलेखात ते स्पष्टपणे ह्मणतात की, 'स्वयंनिर्णयाचे हे अभिनव तत्त्व गोमंतकास लागू केले तर पूर्ण स्वातंत्र्य प्राप्तिविना आमची राजकीय तहान भागणे शक्य नाही, असेच येथील खरें लोकमत ह्मणेल.' ते पुढे ह्मणतात. 'स्वायत्त गोमंतकाचे ध्येय खुद्द विधिमंडळांतून घोषित झालें असल्याने व त्याला सरकारने कोणतीच हरकत घेतली नसल्यानें, त्या ध्येयाचा उघडपणे पुरस्कार करण्यास कोणाचीही भीती बाळगण्याचे कारण नाही....' असे झाले तरच 'गोमंतकाच्या उद्धाराचा दरवाजा खुला होणार असून आमचे मुंडकारत्व' लय पावेल व त्याची जागा 'भाटकारत्व' व्यापील.

'भारत'कारांच्या राजकीय अग्रलेखांत लगतच्या ब्रिटिश हिंदुस्थानात चालू असलेल्या राजकीय घडामोडींवर, भारतीय पुढाऱ्यांच्या धोरणांवर मार्मिक भाष्ये केलेली आढळतात. जागतिक युद्धांचेही संदर्भ येतात. या

सर्व घटनांकडे ते किती अगत्याने आणि बारकाईने पहात होते ते दिसून येते. या सभोवारच्या घडामोडींच्या संदर्भासह ते गोव्यातील घडामोंडींचा अन्वयार्थ लावताना दिसतात. त्यामुळे त्यांच्या अग्रलेखांना विशाल आशय प्राप्त होतो. एका भिन्न राजवटीत, भिन्न परिस्थितीत राहणाऱ्या विचारवंताचे विचारमंथन ह्मणून त्यांच्या लेखनाला वेगळे महत्त्व आलेले दिसते. एखाद्या स्वतंत्र इतिहासकाराने लिहिलेल्या इतिहासग्रंथाच्या पृष्ठांसारखे महत्त्व त्यांच्या अग्रलेखांना द्यावे लागेल.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या अखेरच्या टप्प्यावर घडलेल्या घडामोडींवर भाष्य करणारे आणि स्वातंत्र्याच्या मंगल दिनाचे स्वागत करणारे काही अग्रलेख 'भारत'कारांनी लिहिले आहेत. ते मुद्दाम वाचण्याजोगे आहेत. भारत स्वतंत्र झाला की गोमंतकाचे स्वातंत्र्य दूर राहणार नाही. अशी त्यांची मनोदेवता त्यांना सांगत होती. ह्मणून ते 'स्थलकालविशेषाचा' विचार करून तारतम्याने भारतीय स्वातंत्र्याच्या प्रयत्नांतील काँग्रेसच्या ध्येयधोरणांना संमती दर्शवितात व विखंडित देशाच्या स्वातंत्र्याचे प्राप्त परिस्थितीत स्वागत करतात. फाळणीचे दु:ख त्यांना वाटते आहे आणि फाळणीला विरोध असणाऱ्यांच्या भावनांचीही ते कदर करतात, पण त्यांच्या 'लोडतक्यांच्या' निष्क्रिय राजकारणाचा निषेध करतात. ते गांधीजींच्या अहिंसक मार्गाचे उपासक झालेले दिसतात व गोव्यात सशस्त्र क्रांती करू पाहणारांचा मार्ग हा 'अनिष्ट मार्ग आहे.' असे सुचवितात. 'दहशतवाद हा एक अनिष्ट, अपेशी आणि अयशस्वी मार्ग पुष्कळ वर्षांच्या अनुभवाने ठरलेला आहे.' असा त्यांचा सल्ला आहे. गोव्याच्या स्वातंत्र्यासाठीही गांधीजींच्या विधायक कार्यक्रमांचाच अवलंब त्यांना प्रशस्त वाटत होता. गोव्याच्या स्वातंत्र्यासाठी मुंबईतून चालणाऱ्या समाजवादी पक्षाच्या राजकारणावर त्यांनी टीका केली आहे.

''अखिल भारतवासी लोकांपैकीच आह्मीदेखील आहोत हे पाहिजे त्यावेळी दिसून यावे.'' हे 'भारत'कारांचे धोरण होते. 'कारण गोमांतक हा ब्रि. हिंदुस्थानाशी इतका काही संलग्न झाला आहे.... त्यांच्याशी आह्मी इतकें काही तादात्म्य होण्याच्या मार्गास लागलों आहोंत, की आज त्यांच्याशी

फटकून वागण्याचा निश्चय करणें ह्मणजे आमच्याच हाताने आमच्याच पायावर कुऱ्हाड घालण्यासारखं आहे. आमची उन्नती अगर अवनती ब्रि. हिंदुस्थानाबरोबर होणार हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट दिसत आहे.' असे त्यांनी वाटे. 'चालू शतकात ब्रि. हिंदुस्थानात स्वराज्यप्रीत्यर्थ, ज्या प्रचंड चळवळी झाल्या त्यांना आह्मी पूर्ण सहानुभूती, शाब्दिक का होईना. देऊन आमचें कर्तव्य अल्पप्रमाणाने तरी बजावले आहे.' असे ते ह्मणतात. ते सार्थ आहे. भारतीय राष्ट्रवादाशी ते असे तद्रूप झाले होते. यात त्यांचा द्रष्टेपणा दिसतो. ते स्पष्टपणे ह्मणतात, 'हिंदुस्थान स्वतंत्र होणार व गोमंतक पोर्तुगीजांच्याच अंमलाखाली सदासर्वकाळ सौख्याने नांदणार काय? नाही. अर्थात शेजाऱ्यांच्या स्वतंत्रतेने दिपून जाऊन त्यालाही स्वतंत्र होण्याची इच्छा होईल.' या आशावादाने त्यांचे लेखन फुलून गेले आहे. टिळकांच्या राजकारणाचे ते पाठीराखे आहेत शिवाय महात्मा गांधीच्या नेतृत्वाची थोरवी त्यांना १९२२ सालीच उमगलेली दिसते. 'परमेश्वराने महात्मा गांधी यांच्यारूपाने (ह्या युगात) अवतार घेतला आहे' असे त्यांना वाटत होते. 'महात्माजींच्या असहकारितेच्या उपदेशाने उचंबळलेली लोकशाहीची लाट जबरदस्त आहे.' असा त्यांचा प्रत्यय आहे. आणि 'गोव्यातील अधिकारी वर्गाने वेळीच सावध व्हावे.' असा इशारा ते देतात. 'गोमंतकीय नागरिकांनी स्वदेशीची उपासना करणें योग्य होय.' असा सल्ला ते देतात. महात्मा गांधींबद्दल त्यांनी मोठ्या आदरभावाने लिहिले आहे.

'भारत'कार जन्माने हिंदू होते, पण ते खरेखुरे हिंदू असल्यामुळेच हिंदुत्त्ववादी झाले नव्हते. हे विधान वरवर पाहता आत्मविसंगत वाटेल. गोव्यातील हिंदूंची एकी हा खरेतर त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. ब्राह्मण्याची तरफ दारी करणारा एक अग्रलेख त्यांनी लिहिला आहे. कधीकाळी तरी चातुर्वर्ण्य आदर्श स्वरूपात अस्तित्वात असावा, असे मत प्रतिपादणाराही अग्रलेख त्यांनी लिहिला आहे, तरीही त्यांच्या लेखनाला कडव्या हिंदुत्ववादाचा किंवा पुनरुज्जीवनवादाचा वास येत नाही. हिंदूंची भरभक्कम एकी व्हावी ह्मणून हिंदू एकता परिषद, हिंदुमहासभा स्थापना, प्रागतिक परिषदा, अस्पृश्यता निवारण मोहीम, गोमंतक मराठा गायक परिषद, शुद्धिचळवळ किंवा पतितपरावर्तन

मोहीम अशा अनेक चळवळी त्यांनी केल्या किंवा त्यांत भाग घेतला. फार काय हिंदूंच्या श्रद्धेच्या गोमातेचेही रक्षण-गोरक्षण-त्यांनी पुरस्कारिले आणि हे सारे हिंदूची एकी उघडउघड डोळ्यासमोर ठेवून केले. त्यामागचा राजकीय हेतू त्यांनी लपविलेला नाही तरीही ते हिंदुत्ववादी वाटत नाहीत.

शुद्धिचळवळीत सुमारे ८००० गावड्यांचे शुद्धिकरण १९२० च्या सुमारास घडून आले, असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

कारण ते क्रमाक्रमाने गांधीवादी होत गेलेले दिसतात. हिंदुमहासभेच्या 'लोडतक्क्याच्या' राजकारणावर ते टीका करतात.

लोकसंख्येत गोव्यात हिंदू हे ख्रिश्चनांच्या बरोबरीचे असून शिक्षण, नोकऱ्या, राजकारण इ. सर्व क्षेत्रांत मागे पडत असल्याचे त्यांना दिसत होते. हिंदूवर होणारे जुलूम त्यांना दिसत होते. त्यांची राजकीय, सामाजिक अवहेलना त्यांना दिसत होती. राज्यकर्ते ख्रिश्चन असून, ख्रिश्चन धर्माचे पक्षपाती आहेत हे त्यांना दिसत होते. या अन्यायाच्या रास्त जाणवेतून ते हिंदू एकीचा पुरस्कार करतात. राजकीय सामाजिक न्याय हे त्यांचे धोरण आहे. संघटित धर्माचे वर्चस्व गाजविण्याचा हेतू त्यांच्या लेखनात कुठेही नाही. परमत सहिष्णुता आणि उदारता ही तत्त्वे त्यांच्यात मुरलेली आहेत. 'भारत'कार ज्याला सामाजिक स्वत्व ह्मणतात ते हिंदूंच्याबाबत तरी हेच आहे! ह्मणजे खरेखुरे हिंदू असल्याने ते हिंदुत्ववादी नाहीत. शिस्तबद्ध, कडवी, संघटित धार्मिकता त्यांच्यात नाही. यामुळेच त्यांच्या राष्ट्रवादी जाणीवाही भराभर व्यापक, उदार होत गेलेल्या दिसतात.

## सामाजिक विचार

राजकीय विषयांवरील अग्रलेखांखालोखाल सामाजिक विषयांवरील अग्रलेख ' भारत' कारांनी लिहिले. काही अग्रलेख दोन्हीत सामावतील असे आहेत. राजेशाहीच्या काळात आणि धर्मांतरांच्या छायेत गोमंतकीय हिंदूच्या सार्वजनिक चळवळींचे महत्त्व ते आरंभी सांगतात. त्या काळात हिंदूचे संघटन हाच त्यांचा मुख्य हेतू दिसतो. त्यानुसार ते समाजसुधारणेचे उपाय सुचवितात. हिंदूतील वर्णव्यवस्था चांगली ह्मटली तरी ती मूळच्या आदर्श स्वरुपात

राहिलेली नाही, सर्वच वर्णियांना आपल्या विहित कर्मांची जाण राहिलेली नाही. समाज 'नासक्या रुढींनी' ग्रस्त झाला आहे, इकडे ते लक्ष वेधतात. 'ज्ञानसंपादन व सृष्टिनिरीक्षण' यासाठी परदेशगमन सुरू करण्यास सांगतात. जातिसंस्थेने निर्माण केलेली अव्यवस्था सुधारण्याकडे लक्ष वेधतात. 'सगळा हिंदुसमाज एकजीव व्हावा.' असे त्यांना वाटते. या वळणावर ते काहीसे पुनरुज्जीवनवादी आहेत. 'वैदिक काळी एकरूप असलेल्या हिंदुसमाजाची कालाच्या तडाख्यांनी हजारो शकलें झाली. ती एकांत एक बसवून हिंदुसमाज पूर्ववत एकजीव करणे.' हे त्यांच्या सामाजिक विचाराचे एक सूत्र दिसते. गत शतकांत आपल्या देशात सुरू झालेल्या समाजप्रबोधनाच्या काळात एक धारा याच सूत्रानुसार सामाजिक व धार्मिक सुधारणा करू पाहात होती. 'भारत'कार आरंभी तरी त्याच धारेतील विचारवंत होते.

'भारत'कारांनी 'राष्ट्रपुरुषाची शरीरशुद्धि' या अग्रलेखात 'एकनाथ, तुकोबाराय' या साधुसंतांचे एके ठिकाणी 'समाजसुधारक' असे वर्णन केले आहे. सामान्यत: गोमंतकीय मानस संतांकडे भक्तिमार्गी सत्पुरुष ह्मणून पाहते. हेगडेदेसाई संतांकडे वेगळ्या दृष्टीने पाहतात असे दिसते आणि त्यातून संतांमधील सुधारकी सामाजिक जाणीवा आणि १९ व्या शतकातील समाजसुधारकांतील मानवतावादी आध्यात्मिक कळवळा यांची वेगळी सांगड मनात निर्माण होते.

त्याकाळी बाह्मणवर्ग हाच कर्ताकरविता वर्ग होता. महात्मा फुल्यांच्या शिकवणीने बहुजनवर्गात जागृती होऊ लागली होती आणि ब्राह्मणांच्या वर्चस्वाला आव्हाने मिळत होती. महाराष्ट्रात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद बोकाळला होता. 'भारत'कारांनी ब्राह्मवर्गाला अनेक दूषणे दिली आहेत आणि ब्राह्मण जातीची तरफदारीही केली आहे.

'भारत'कारांनी आपल्या कळकळीच्या अग्रलेखांत ज्या सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला आहे त्यापैकी आता काही झाल्या आहेत आणि काही अद्यापही झालेल्या नाहीत. त्याबद्दल बरेच चर्वितचर्वण झालेले आहे. पण 'भारत'कारांना कोणकोणत्या सामाजिक बाबींवर लिहावेसे वाटले ते पाहणे आजही मनोरंजक ठरावे. त्यावरून तत्कालीन गोमंतकातील समाजचित्र

आपल्या डोळ्यापुढें उभे राहाते.

'भारत'कारांच्या सामाजिक अग्रलेखांत मद्यप्राशन आणि जुगार या दोन व्यसनांविरुद्ध लिहिलेले अनेक लेख आहेत. ही दोन्ही व्यसने पोर्तुगीजांमुळे इथे आली आणि त्यांनी ख्रिश्चन आणि हिंदू समाजाचा घात केला, अशी प्रतिपादने आहेत. या व्यसनांमुळे नैतिक अध:पात होतो व संसाराची धूळधाण उडते, या गोष्टींचा विदारक प्रत्यय येईल, असे ते लेखन आहे. दंतकथांचा विषय झालेल्या 'पेगुशेट' या जुगाऱ्याची कथा लक्ष्मणराव सरदेसाईंनी लिहिलेली आहे. तिची पार्श्वभूमी हेगडे देसाईंच्या लेखनात दिसते. 'मद्याला न शिवणारे किंबहुना विषवत् मानणारे सच्छील हिंदु आहेत. पण तो अपवाद... बहुजन समाज दु:स्थितीत बुचकळी खात असेल तर राष्ट्राचे तारण कसे होणार?' अशी कळकळीची पृच्छा ते करतात.

गोव्यात बोकाळलेल्या वेश्याव्यवसायास 'समाजसुधारणांतर्गत एक प्रमुख बाब' असे ते मानतात. या व्यवसायास बळी पडलेल्या स्त्रियांबद्दल त्यांना कणव वाटते. 'वेश्यांना बिघडविणाऱ्या जन्तूंना भस्मसात करून टाकण्याचा अलीकडील सुशिक्षितांनी एकसारखा प्रयत्न सुरू केला पाहिजे.' असे ते सांगतात. मंदिरांच्या परिसरात वाढीस लागलेल्या अनिष्ट रुढीचे निर्दालन करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला होता व पुढे त्यातूनच गोमंतक मराठा समाजाचे आंदोलन उभे राहिले आणि तो समाज रूढींच्या बंधनांतून मुक्त होऊन प्रतिष्ठेने वावरू लागला हे आपण पाहतोच. 'भारत'कारांबद्दल या समाजाला मोठी कृतज्ञता वाटते. 'भारत'कार केवळ बोलके सुधारक नव्हते तर कर्ते सुधारक होते. गोव्यातील 'वाचावीरांच्या' विसंगत वर्तनावर ते कडक टीका करतात.

गोव्यातील 'हिंदु-ख्रिस्ती ऐक्य' हा 'भारत'कारांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. 'इन्क्विझिसांवा' तील भीषण क्रूरतेच्या स्मृती हिंदु सामुदायिक मनातून 'रिपब्लिक' आले तरी पुसरल्या गेल्या नव्हत्या. 'हिंदू समाजाचे तोंड पूर्वेकडे अखिल भारताकडे वळलें व ख्रिस्ती जनतेचे तोंड पश्चिमेकडे अर्थात युरोपियन आचारविचारांकडे वळले.' अशी स्थिती होती. सरकारी

पाठिंब्यामुळे सर्व क्षेत्रांत ख्रिश्चन समाज पुढारला गेला आणि हिंदू समाज चारशें वर्षे मागे पडत राहिला. 'रिपब्लिक' आल्यावर मात्र ही स्थिती राहिली नाही. हिंदूमधील परिवर्तनशीलता गतिमान बनली. 'भारत'कार ह्मणतात, ''जी कार्ये चारशें वर्षात ख्रिस्तीधर्म करू शकला नाही तीच कार्ये करण्यास दडपणातून मुक्त झालेलें हिंदुत्त्व दहा वर्षांच्या आत सिद्ध झालें हेंच काय तें आमच्या धर्माचें रहस्य.'' हिंदुधर्मातील ही परिवर्तनशीलता त्यांना दिसते तशीच स्वत्व टिकवून ठेवण्याची जिद्दही दिसते. ते ह्मणतात, 'पाश्चात्यांचे जे अनुकरण करावयाचें तें हिंदुसंस्कृती कायम ठेवूनच केले पाहिजे त्याची पूर्ण जाणीव हिंदूस आहे.' 'मूळ आर्यत्व न सोडता' सुधारणा करावयाच्या या आगरकरांच्या मंत्राचे स्मरण इथे होते. चारशें वर्षांच्या खडतर आपदा सहन करीत हिंदू हे हिंदू ह्मणून इथे टिकून राहिले ते वरील बाण्यामुळे. अशा स्थितीत हिंदुख्रिश्चन ऐक्य कसे व्हावे? 'भारत'कार ह्मणतात की हिंदुत्त्व कायम ठेवून प्रगतिपर पेहराव चढविलेले हिंदू व पाश्चात्याभिमुख झालेले ख्रिश्चन यांनी परस्पर सहानुभूती बाळगून गोव्याचे हित केले पाहिजे, ही प्रक्रिया खडतर आहे याची जाणीव त्यांना आहे.

'गांधीजीच्या असहकारिता तत्त्वाच्या रामबाण औषधाची आमच्या सामाजिक व्यथांवर योजना केल्यास त्या पीडेचा समूळ नायनाट होऊन व अशाने आमच्या समाजास जोम व प्रफुल्लता येऊन तो ताजातवाना व कर्तव्यदक्ष होईल आणि आपले योग्य स्थान पटकावण्यास सहज (सिद्ध) होईल.' असे त्यांना वाटत होते.

समाजधारणेत विवाहसंस्था ही महत्त्वाची बाब. या बाबतील अनेक अनिष्ट रुढींचे निर्दालन करण्यासाठी त्यांनी तरुणवर्गाला आवाहन केले आहे. त्यांनी तरुणांसाठी एक सहाकलमी कार्यक्रम दिला आहे. हुंड्याची चाल सर्वांत घातक दिसते. तिच्यावर त्यांचा कटाक्ष आहे. विवाहासाठी वधुवरांच्या वयाची वाढ, परस्परांची संमती आणि अनुरुपता, लग्नातील डामडौली खर्चात कपात इ. उपाय ते सुचवितात. तसेच तरुण पिढीच्या शिक्षणावर अधिकाधिक भर द्यायला हवा. किंबहुना समाज सुशिक्षित झाल्याविना सुधारणा होणे नाही. अशी त्यांची धारणा आहे. ख्रिश्चन

समाजाच्या तुलनेत हिंदुसमाज शिक्षणात मागे आहे आणि त्यामुळे तो सर्वच बाबींत मागे पडत आहे, असे त्यांना वाटते. 'ज्ञानप्रसारार्थ चंहूकडून प्रयत्न सुरू झाले पाहिजेत. तरच हळूहळू चालू असलेली हिंदूची प्रगती न थंडावतां योग्य प्रमाणात चालू राहील.'

गोव्यातील अनेक चळवळींना 'भारत'कारांनी जाणते मार्गदर्शन केले व आपल्या पुढारपणाने त्या चळवळी पुढे नेऊन दाखविल्या. अशा चळवळीत पतितपरावर्तन किंवा शुद्धिचळवळ ही एक महत्त्वाची चळवळ आहे. या चळवळीचा त्यांनी मोठ्या नेटाने पाठपुरावा केला. त्या चळवळीतील अंतर्गत ताणतणाव खुबीने निवारण केले. सामाजिक सुधारणांचे एक टोक राजकीय सुधारणांशी निगडीत असते, याची त्यांना जाण आहे. ह्मणून मसुरकर महाराजांच्या ब्रह्मचारी आश्रमाने गोव्यातील धर्मांतरित गावडा समाजाच्या शुद्धिकार्याची जी मोहीम आखली तिला पाठिंबा देतात व सरकार दरबारी खेटे घालून 'धार्मिक बाबतीत सरकारचा हस्तक्षेप असणार नाही.' असे अभिवचन पोर्तुगीज गव्हर्नरांकडून मिळवतात. या खटाटोपामागे त्यांचा असा दृष्टिकोण दिसतो की, 'ख्रिस्ती लोकांचे हिंदुधर्मात परावर्तन झाल्यास हिंदूंचे नांव वाढणार आहे व जी आज हिंदुलोकसंख्या जवळजवळ ख्रिस्ती लोकसंख्येबरोबर आहे ती चटदिशी वृद्धि पाऊन, हिंदूंचा राजकीय दराराही त्यांच्या सामाजिक बलानें, सरकारी दरबारांत व इतर समाजांत प्रसृत होणार आहे.'

पुनर्धर्मांतरणासंबंधीचे स्वामी विवेकानंदांचे विचार स्पष्ट करणारी एक मुलाखत 'भारत' कारांनी पुनर्मुद्रित केली आहे. ती आजही मुद्दाम वाचावी अशी चिंतनीय आहे. 'भारत' कार गोव्यातील शुद्धिचळवळीत मनाने एवढे का गुंतले होते ते त्यावरून ध्यानी येईल.

'भारत'कारांच्या सामाजिक विचारांतील एका बाबीकडे मी वाचकांचे लक्ष वेधून ठेवतो. 'हिंदु-समाज' हा छोटा लेख त्यादृष्टीने महत्त्वाचा आहे. त्या लेखात ते ह्मणतात की, 'वाङ्मय शिक्षण राष्ट्राच्या उन्नतीचें एक महत्त्वाचे साधन असले तरी खरी उन्नति त्या राष्ट्राच्या सांपत्तिक स्थितीवरच अवलंबून असते.' 'सामाजिक सुधारणा होऊन समाजाची प्रगती होण्यासाठी

आर्थिक उन्नतींची गरज असते, हे त्यांच्या ध्यानी आले आहे. त्यासाठी त्यांनी जपानचा आदर्श आपल्या वाचकांपुढे मांडला आहे.' 'उदरंभरण कसे होईल हीच विवंचना ज्यांच्यामागें लागलेली आहे त्यांची डोकी नवे शोध लावण्यालायक शांत असतील काय?' असा त्यांचा सवाल आहे. न्यायमूर्ती रानड्याप्रमाणे सर्वगामी, विधायक, समाजचिंतन करणारे आणि गोव्याच्या अंतरंगाचा ठावठिकाणा लागलेले, असे 'भारत'कार होते ही गोष्ट इथे दिसून येते. यातच त्यांची खरी थोरवी आहे.

'भारत'कारांनी 'भारतोदय' या नावाचे मासिकही सुरू केले होते. त्याचे ब्रीदवाक्य होते. 'उद्योगाच्या घरी ऋद्धिसिद्धि पाणी भरी' आणि उद्देश होता, 'जनतेला देशा उद्योगधंद्यांचे महत्त्व पटवून सेवावृत्तीविषयी तिटकारा उत्पन्न करावा.' या वरुनही त्यांना समाजसुधारणेसाठी धनसंपत्तीचे महत्त्व समजले होते असे दिसते.

'भारत'कारांच्या जन्मशताब्दी वर्षात त्यांच्या अग्रलेखांच्या संग्रहाची कल्पना पुढे आली आणि नंतर कै. शशिकांत नार्वेकर यांनी तिचा पाठपुरावा केला. त्यांनी तासंतास सेंट्रल लायब्ररीत बसून बरेच अग्रलेख स्वत: लिहून काढले. काही अग्रलेखांच्या झेरॉक्सप्रती करून घेतल्या. हे काम मोठ्या जिकिरीचे होते. त्याकामी श्री. राजेश परब यांनी बरेच लेखनसहाय्य त्यांना केले. विजया मिराशी यांनीही काही अग्रलेख आपल्या सुवाच्च अक्षरात लिहून काढले. अग्रलेखांच्या वर्गीकरणाच्या टप्प्यावर कै. नार्वेकरांनी मला संपादन कार्यात सहभागी करून घेतले. अनेक साप्ताहिक सुटींच्या दिवशी आह्मी दिवस दिवस बसून अग्रलेखांचे वाचन, वर्गीकरण केले. प्रत्येक अग्रलेखाखाली प्रसिद्धी दिनांक घातला. काही अग्रलेखांचे कालनिर्देश भारतीय कालगणनेनुसार नोंदलेले आढळले. त्यांचे इंग्रजी कालगणनेत रुपांतर करताना प्रत्यक्ष त्याकाळची पंचांगे पहावी लागली. अकादमीचे ग्रंथपाल श्री. पांडुरंग ठाकून यांना अभ्यासकांना संदर्भ पुरविण्यात मोठा आनंद होतो. आमची पंचागांची अडचण ध्यानी येताच त्यांनी दुसऱ्या दिवशी तत्कालीन पंचागांचा मोठा जीर्ण संच आमच्यापुढे ठेवला. तो संच त्यांचे आजोबा कै. महेश्वर गणेशभट्ट ठाकूर (आमोणे) यांनी जमविलेला होता. श्री. गणेश विष्णुभट्ट

ठाकूर (आमोणे) यांनी तो जतन केला आहे. आह्माला त्या पंचांगांचा फार उपयोग झाला आणि तिथी तारखांचा खात्रीशीर मेळ घालता आला. वर्गीकरणाच्या या टप्प्यावर कै. नार्वेकर यांनी डॉ. सोमनाथ कोमरपंत आणि अकादमीच्या प्रियोळकर संशोधन केंद्राचे तत्कालीन संचालक डॉ. प्रल्हाद वडेर यांचेही थोडेफार सहाय्य घेतल्याचे स्मरते. वर्गीकरणावर अखेरची नजर टाकून प्रस्तावना लेखन बाकी राहिले असताना नार्वेकरांचे आकस्मिक निधन झाले. 'भारत'कारांच्या अग्रलेखांच्या संग्रहाच्या प्रकाशनाचा त्यांचा ध्यास अपुरा राहिला... नार्वेकरांनी स्वत: पत्रकारिता केली होती. पत्रव्यवसायाच्या मूलतत्त्वांचे त्यांना  भान होते. एक झुंजार गोमंतकीय मराठी पत्रकार ह्मणून त्यांना 'भारत'कार हेगडेदेसाईंबद्दल अतिशय अभिमान वाटे. त्यांचा ध्यास अपुरा राहणे शक्य नव्हते. अकादमीने नार्वेकरांच्या प्रथम स्मृतिदिनी हा ग्रंथ प्रकाशित करण्याचा चंग बांधला आाणि ७०० पृष्ठसंख्येचा हा ग्रंथ आता सिद्ध झाला असून त्याचा पहिला खंड वितरणास खुला झाला आहे. कलेपुढे धुंद आणि ध्येयापुढे विनम्र होणाऱ्या नार्वेकरांच्या आत्म्यास त्यामुळे समाधान वाटत असेल असे मला वाटते. नार्वेकरांनी या अग्रलेखांचे वाचन करताना चार वह्या भरतील एवढी टिपणे काढली होती. वेळेच्या बंधनांमुळे त्या टिपणांचा पूर्ण वापर मला करता आला नाही. पण या अग्रलेखांच्या अभ्यासकांना ती उपयुक्त आहेत. दुसऱ्या खंडाच्या अखेरी त्या टिपणांच्या आधारे विस्तृत लेखन करण्याचा माझा मानस आहे. एक झुंजार पत्रकार श्री. नारायण आठवले यांनी या ग्रंथाच्या प्रकाशनप्रीत्यर्थ २० हजार रुपयांनी देणगी अकादमीस दिली आहे. हा ग्रंथ लवकरात लवकर प्रसिद्ध व्हावा असा ध्यास त्यांनाही लागला होता. त्यांच्याच हस्ते ग्रंथप्रकाशन होत आहे. हा उपक्रम अंशत: तडीस गेला याचे मला समाधान आहे.

कै. नार्वेकरांच्या निधनामुळे या ग्रंथाच्या निर्मितीत मी बराच गुंतत गेलो. नार्वेकर हयात असते तरी त्यांनी मला असे गुंतवून ठेवले असतेच. खरे तर मी मनानेच या ग्रंथाच्या संपादनात गुंतून पडलो होतो. कै. नार्वेकरांच्यासह 'भारत'कारांचे अग्रलेख वाचतानाच ही मानसिक गुंतवणूक घडली. १९१० सालच्या पोर्तुगालातील क्रांतिकारक 'रिपब्लिक'ने गोमंतकीय हिंदूमध्ये जे

जागरण घडवून आणले. त्यांच्यात जो उल्हास निर्माण झाला त्याचे मनोज्ञ प्रतिबिंब भारतकारांच्या अग्रलेखांत पडले आहे. सांस्कृतिक आवरणाखाली फुलून आलेल्या राष्ट्रवादी जाणिवांचा हा आविष्कार पाहणे हा एक साक्षात्कारी अनुभव आहे, असे मला वाटले. एकूण मराठी वाचकांनाही हाच अनुभव येईल, असा विश्वास मला वाटतो. रिपब्लिकच्या काळात गोव्यात घडून आले. सांस्कृतिक उत्थान हे एक अपूर्व पर्व आहे. गोव्याच्या अभ्यासकांना त्यातून खूप बोध होईल.

मुद्रितशोधन करताना काही संस्कृत अवतरणे तपासताना प्रा. ह. वि. उपाध्ये व प्रा. गोपाळराव मयेकर यांचे सहाय्य मिळाले. सर्व अवतरणे त्यांना दाखविता आली नाहीत.

काही व्यक्तिविषयक व पोर्तुगीज शब्दांच्या स्पष्टीकरणात्मक टीपा आवश्यक होत्या. पण वेळेच्या बंधनामुळे त्या देणे या खंडात शक्य झाले नाही. त्या दुसऱ्या खंडाच्या अखेरीस परिशिष्टात देण्यात येतील.

या ७०० पानी दोन खंडांतील ग्रंथाच्या अक्षरजुळणीचे काम सौ. गीता सावंत यांच्या 'अक्षररचना' या संगणक केंद्रात नीता अमृते यांनी केले आहे. कै. शशिकांत नार्वेकरांच्या प्रथम पुण्यतिथीचा प्रकाशन मुहूर्त चुकू न देता वेळेत काम करताना त्यांनी बरेच कष्ट घेतले आणि हा ग्रंथ ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचा असल्याने तो शक्य तेवढा निर्दोष करण्यासाठी आत्मीयतेने काम केले. गोविंद नाईक यांनी आपल्या कुंचल्याने ग्रंथाने मुखपृष्ठ सजविले आहे. या सर्वांनी मला पूर्ण सहकार्य दिल्यामुळे आणि अकादमीने कामाची संधी दिल्याने हा पहिला खंड अल्पावधित वाचकांच्या हाती देता आला आहे. पुढील खंडही लवकरात लवकर तयार होईल, असा विश्वास वाटतो आहे.

## 'भारत'कारांचा वारसा

'भारत'करांचा भरवसा गोव्यातील तरुण पिढीवर होता. 'आमची आजची तरुण पिढी', 'जनसेवा हीच ईश्वरसेवा' हे अग्रलेख गोव्याच्या आजच्या पाठ्यपुस्तकांत समाविष्ट करून आजच्या नव्या पिढीपुढे

मांडण्याजोगे आहेत. त्या अग्रलेखांतील विधायकता, आर्जव, कळकळ, उपदेश कधी शिळा होणार नाही. महात्मा फुले आणि लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे आणि समाजसुधारक आगरकर यांच्या पंक्तीतच आपले ‘भारत’कार बसतील! एरवी किंचित बोजड वाटणारी त्यांची शैली या लेखांत विलक्षण प्रासादिक झाली आहे. समाजसेवेच्या आंतरिक उमाळ्यांतून त्यांचे शब्द प्रवाहित झाले आहेत. जनसेवेचे कंकण बांधलेले ‘भारत’कार सात्त्विकपणे ह्मणतात, ‘‘संन्यासधर्माचा असा विपरित अर्थ झाल्यामुळेंच हिंदुस्थान अधोगतीला पोहोंचला आहे. हिंदुसमाजाच्या धर्मगुरुंनी पाषाणाच्या निर्जीव मूर्ति सोन्यारुप्याने मढवून आपल्या डोळ्यांचे पारणे फेडण्यापेक्षा या चालल्याबोलत्या जिवंत देवांकडे आधी पहावे व त्यासच संतुष्ट करावे. हेच देव आपल्या राष्ट्राच्या उपयोगी पडणारे आहेत.’’ जनसेवेतच ईश्वरी उपासना पाहणाऱ्या संतांचा कळवळा इथे ‘भारत’कारांच्या लेखणीतून पाझरत असल्यासचा अनुभव येईल. ‘आपल्या धर्मगुरुनी ख्रिस्ती धर्माच्या मिशनरींकडे पहावे ह्मणजे ते लोक निराश्रित लोकांकडे आपण होऊन कसे धाव घेतात, ते दिसून येईल.’ ‘देवाकरिता मनुष्यें नसून. मनुष्यांकरितांच देवांचे अस्तित्व आहे.’ अशा कळवळ्याने आणि सात्त्विक संतापाने त्यांचे हे लेख ओतप्रोत भरून गेले आहेत.

हेगडे-देसाईचे आर्थिक, धार्मिक, भाषिक व अन्य संकीर्ण विषयांवरील निवडक अग्रलेख दुसऱ्या खंडात समाविष्ट केले आहेत. त्यांच्या संबंधीचे विवेचनही त्या खंडाच्या प्रस्तावनेत केले आहे. त्यावरून गोमंतकाच्या जीवनाचा सर्वांगीण विचार करणाऱ्या या थोर मराठी पत्रकाराच्या सम्यक् दृष्टीचा परिचय होईल. पेशवाईच्या काळात ‘थंड गोळा’ होऊन पडलेल्या महाराष्ट्राच्या जीवनाचा सर्वांगीण विचार करून न्यायमूर्ती रानडे यांनी समाजप्रबोधनाचा पाया घातला, असे ह्मणतात. ‘न्यायमूर्ती रानडे हे त्यांच्या काळातील देशातील सर्वांत शहाणे गृहस्थ होते.’ असे मत प्रा. नंदी या बंगाली अभ्यासकांनी अलीकडील एका ग्रंथात मांडले आहे. ईश्वरावर श्रद्धा ठेवून आपल्या विधायक विचारांनी समाज सुधारणा करण्याचे व्रत त्यांनी आचरीले. जुन्या काळातील साधुसंतच त्यांच्यारूपाने त्या काळात

अवतरले आणि देशकालवर्तमानानुसार समाज सुधारण्याचे कार्य त्यांनी पोक्तपणे केले, असे अभ्यासकांना वाटते. 'भारत'कार हेगडे-देसाई त्याच परंपरेतले विधायक दृष्टीने व स्वतंत्र प्रज्ञेचे गोमंतकीय विचारवंत होते, असे ह्मटल्यास ते वावगे ठरणार नाही. 'भारत'कारही तशाच धीरगंभीर, शांत, विधायक वृत्तीने वावरताना दिसतात. त्यांच्या अग्रलेखांत वारंवार एकनाथ तुकोबाराय या साधुसंतांची वचने येतात. 'धर्म हा भ्रम आहे.' अशा वळणावर जरी शेवटी ते पोचले होते आणि 'शेवटची वीस वर्षे ते मंदिरातही गेले नव्हते.' अशी आठवण त्यांचे चिरंजीव नरेंद्र हेगडे-देसाई यांनी सांगितलेली असली तरी 'बुडती हे जन देखवेना डोळा' हा साधुसंतांचा कळवळा त्यांनी कधी सोडलेला दिसत नाही... समाजाच्या भौतिक स्थितिगतीपासून कायम दूर राहिलेल्या देवस्थानांच्या संस्थानांबद्दल त्यांना अगत्य नव्हते, केवळ परमार्थाचा विचार करणाऱ्या आपल्या धर्माबद्दलही त्यांना फार आपुलकी नव्हती. पाषाणाच्या मूर्तीतील नव्हे, पण रंजल्या, गांजल्या माणसांतील देवत्व त्यांना दिसत होते. त्या देवत्वाचेच ते पुजारी होते. हिंदू असो, ख्रिश्चन असो, पोर्तुगीज असो माणसाची अवहेलना त्यांनी कुठेही केलेली नाही. गोमंतकियांना गुलाम बनविणाऱ्या पोर्तुगीज सत्तेविरुद्ध त्यांना तीव्र संताप वाटे तो मानवाच्या अप्रतिष्ठेमुळे. स्वातंत्र्य, समता, विश्व बंधुता या मूल्यांवरील निष्ठेमुळे, हुकूमशाही, राजेशाही वृत्तीचा ते धिक्कार करतात पण माणूस ह्मणून ख्रिश्चनांची, पोर्तुगीजांची योग्य ती कदर ते करतात. 'भारत' व्यक्तीचा मिंधा नाही तर तत्त्वाचा बंदा आहे. 'व्यक्तिविषयक कुरापती बाजूस ठेवून ऐन मुद्यांसंबंधाने विवेचन.' ही त्यांची वचने केवळ युक्तिवादासाठी घेतलेल्या पवित्र्यासारखी नाहीत, ती त्यांची पवित्र जीवनधारणा आहे. 'सर्वेषाम् अविरोधेन' या धोरणाने गोमंतकीय लोकजीवनाचा परवशतेत रुतून पडलेला गाडा चालता करावा, होता होईल तो पुढे न्यावा, सर्व माणसांना प्रतिष्ठेचे जीवन लाभावे, अशा उदात्त हेतूने त्यांनी 'भारत' पत्र आमरण चालविले. गुरुवारच्या अंकाची जुळवाजुळव त्यांनी करून ठेवली आणि सोमवारी त्यांना देवाज्ञा झाली. १८ ऑगस्ट १९४९ च्या गुरुवारचा अंक मग निघाला नाही... पुढे 'भारत' पत्र बंदच झाले. 'भारत' पुढे चालवणारा

संपादक निर्माण झाला नाही.

'भारत'कारांच्या व्यक्तिमत्त्वात क्रांतिकारकत्व नव्हते, पण सर्वांना पुढे नेण्याचे शहाणपण होते. हे शांत शहाणपण हा त्यांचा चिरंतन वारसा आहे, हे आपण निरंतर ध्यानी ठेवले पाहिजे... 'भारत'कारांना मी प्रत्यक्षात कधी पाहिले नव्हते. पण या ग्रंथाच्या निमित्तानं त्यांची साधुवृत्तीची वाङ्मयमूर्ती माझ्या डोळ्यांसमोर उभी राहिली. मी तिला मनोमन वंदन केलं... या ग्रंथाचे गोव्यातील आणि महाराष्ट्रातील सर्व वाचकही या वाङ्मयमूर्तीला असेच मनोमन वंदन करतील असा विश्वास मला वाटतो. जगात क्रांती करायला निघालेले सर्व वाद पराभूत झाल्यावर माणसांतील समंजस, शांत शहाणपणाशिवाय दुसरा कोणता आधार दिसतो? आपापले काम करून माणसे निघून जातात. त्यांचे वाङ्मयधन मागे उरते. ते पाहिलं की आपल्याला कोणता वारसा मिळाला आहे, ते पुढिलांना उमगतं. या ग्रंथानेही अशीच उमज पडेल. या ग्रंथाचा ध्यास धरून कै. शशिकांत नार्वेकरांनी आणि त्यांचा ध्यास तडीस नेऊन गोमंतक मराठी अकादमीने एक उपकारक कार्य पार पाडलं आहे. मराठी वाचक त्यांचे ऋणी राहतील.

***– रवीन्द्र घवी***

# ग्रंथ पुर्नमुद्रित करण्याचे प्रयोजन

'भारत'कारांचा सहवास आम्हा नातवंडाच्या नशिबी नव्हता पण त्यांचे कर्तृत्त्व, विचारसणी आम्हाला आमच्या वडील माणसांकडून समजली आणि त्यांच्या विचारांच्या छायेतच आम्ही वाढलो.

आमच्या मते 'भारत'कार हे एक महात्मा होते. त्यांनी त्या काळात लिहिलेले वाङ्‌मयरुपी अग्रलेख हे हृदयस्पर्शी आणि समाजसेवेचे व्रत, तन, मन आणि धन अर्पण करून केलेले आहेत, ह्यात तीळमात्र शंका नाही. त्यांचे विचार त्याच काळात नाहीत तर आज सुद्धा प्रेरणादायी आहेत.

जरी 'भारत'कारांचा पत्रकारितेचा वारसा चालवण्याची आमची पात्रता नाही तरी त्यांनी घेतलेला समाजसेवेचा वसा जो त्यांच्या अग्रलेखरुपी वाङ्‌मय धनातून आमच्याकडे आहे, तो नव्या पिढीपर्यंत पोहचवावा आणि नव्या पिढीने त्यातून प्रोत्साहन, त्यांच्या विचारातून मार्गदर्शन घेऊन समाज तसेच देशाच्या उन्नतीसाठी पाऊले टाकावीत अशी आमची नम्र भावना आहे. ही आमची नैतिक जबाबदारी आहे, असे आम्ही मानतो.

हा ग्रंथ पुर्नमुद्रित करण्याची देवाने आम्हाला दिलेली बुद्धी हे 'भारत'कारांच्या पुण्याईचे फळ आहे असे आम्ही येथे नमूद करू इच्छितो. त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची एक संधी आम्हाला दिली हा एक परमेश्वराचा आशीर्वाद आहे असे समजतो.

'भारत'कारांनी 'जनसेवा हीच ईश्वरसेवा' हे व्रत धरून 'भारत' चालविले. ''जे जे आपणासी ठावे। ते ते दुसऱ्यांसी द्यावे।।, शहाणे करूनी सोडावे सकल जन'' ह्या संतवाणीनुसार हा ग्रंथ पुर्नमुद्रित करून त्यांचे थोर समाज प्रवर्तक वाङ्‌मय नवीन पिढीसमोर ठेवताना आनंद वाटतो.

***– 'भारत'कारांची नातवंडे***

# तया माझा दंडवत...!

साडेचारशे वर्षे, विशेषतः गोमंतकीय हिंदू जनता, निस्तेज आणि मृतप्राय अशा वातावरणात वावरत होती. शिवाय अंधकारमय जीवन, भयभीत आणि विकलांग अशी शरीरे घेऊन हिंडणाऱ्या गोमंतकीय जनताजनार्दनाच्या कलेवरामध्ये प्राण ओतण्यासाठी स्वतःचे प्राण गमावण्यापर्यंत ज्या एका विभूतीप्राय व्यक्तीने आपल्या खंबीर वृत्तीने हिंदूंच्या आत्मोन्नतीसाठी पत्रकारीतेचे कार्य हाती घेतले त्या प. वा. भारतकार श्री. गोविंद पुंडलीक हेगडे देसाई यांचे या घटकेला अत्यंत विनयशील भावनेने स्मरण करण्यासाठी नतमस्तक होण्यास मला भाग पडते.

गोमंतक मराठी अकादमीचे अध्यक्ष प. वा. श्री. शशिकांत नार्वेकर ज्यांनी आपला जीव मराठी भाषेसाठी, मराठी अस्मितेसाठी आणि गोमंतक मराठी अकादमीच्या प्रगतीसाठी झिजविला आणि त्यातच आपले प्राण गमावले, त्यांची दृष्टी भारतकार हेगडे देसाई यांच्या कर्तृत्त्वावर खिळून न राहाते तर ते एक अद्भूत नवल ठरले असते. भारतकारांना ते आपला गुरू मानीत. नार्वेकरांनी काही काळ पत्रकारितेत घालवला होता. भारतकारांच्या पत्रकारीतेचे महत्त्व जाणून त्यांचे अग्रलेख ग्रंथरुपाने प्रसिद्ध करावेत असा ध्यास त्यांनी घेऊन तो पूर्ण करण्यासाठी दिवसाची रात्र करून, भारतकाराचे अग्रलेख एकत्र करून, त्यातल्या प्रखर अशा अग्रलेखांची निवड केली आणि त्यांच्या प्रकाशनांचे कार्य करता करताच अकाली निधन पावले. म्हणूनच त्यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त त्यांचे अपूर्ण राहिलेले कार्य अकादमीने पूर्ण करून ७ जून १९९९ रोजी दोन खंडामध्ये ते अग्रलेख प्रकाशित केले. आज हे खंड पुनर्मुद्रित करण्यासाठी भारतकार हेगडे देसाईंचे नऊ नातू एकत्रित पुढे सरसावले आहेत. अकबराच्या दरबारातील नवरत्नासारख्या या वारसारत्नांशी बरोबरी करणे जरी त्यांना आवडले नाही तरीदेखील आपल्या कुटुंबातल्या थोर पूर्वजाचे आणि त्यांच्या कार्याचे स्मरण करण्याची जी भक्तियुक्त श्रद्धा त्यांनी बाळगली त्याबद्दल त्यांचे कौतुक करणे माझ्या सारख्या असंख्य वाचकांना भावल्याशिवाय राहणार नाही.

भारतकार वै. गो. पुं. हेगडे देसाई यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८८५ या रोजी झाला. हा एक योगायोग म्हणावा लागेल. कारण निस्तेज गोव्याला उब देण्यासाठी जे काय भारतकारांनी केले तेच कार्य अखंड भारताला आपल्या गुलामगिरीची जाणीव करून देण्यासाठी दीड महिन्याने म्हणजे २८ डिसेंबर १८८५ या दिवशी 'इंडियन नॅशनल कॉंग्रेस' भारतीयांमध्ये स्वातंत्र्य संग्रामाची चळवळ करण्यासाठी

उदयास आली. हा एक चमत्कारिक योगायोग नव्हे का? भारतातील अनेक राष्ट्रीय वृत्तीच्या नेत्यांनी लोकांमध्ये आपल्या गुलामगिरीचे जागरण निर्माण करण्यासाठी प्राण वेचले, त्याच प्रमाणे साऱ्या हयातभर गोमंतकीयांच्या परावलंबीतांची जाणीव देण्यासाठी पत्रकारीतेसारख्या शस्त्राची मूठ हाती धरून ती अखेरपर्यंत सैल सोडली नाही. किंबहुना 'भारत'चा शेवटचा अंक मशीनवर असताना त्यांनी आपला अखेरचा श्वास घेतला. यापेक्षा स्वातंत्र्यासाठी अधिक ते दिलेले दान कोणते बरे असू शकेल?

या पत्रकारितेला वाहून घेण्यासाठी तीन प्रेरणा कारणीभूत ठरल्या. पहिली प्रेरणा होती ती १९१० साली पोर्तुगालात झालेली राज्यक्रांती! त्या राज्यक्रांतीत तेथील राजेशाही नष्ट झाली आणि प्रजासत्ताकाचा उदय झाला! राजेशाहीबरोबर तेथील कॅथॉलिक धर्ममार्तंडाचे राज्यसत्तेवरील वर्चस्वही संपले! गोमंतकातल्या हिंदू समाजाला या घटनेने अंधारमय जीवनातून प्रकाशात आणले! प्रजासत्ताकामुळे मिळालेला नागरिक स्वातंत्र्याचा त्या काळच्या हिंदूसमाजातील नेत्यांनी जराही वेळ न दवडता हुशारीने, कौशल्याने उपयोग करून घेऊन गोमंतकात शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतीक चळवळ उभी केली. राज्यशासनामध्ये हिंदूंचा प्रवेश होऊ लागला. पण वर्चस्व ख्रिश्चन समाजाचे असायचेच.

या चळवळीमुळे एका नव्या पर्वाला सुरुवात झाली जिचे अध्वर्यु होते थोर समाजसेवक, पत्रकार डॉ. पु. वा. शिरगावकर. हेगडे देसाई यांची ती दुसरी प्रेरणा ठरली. डॉ. शिरगावकर यांनी 'प्रभात' हे मराठी आणि पोर्तुगीज भाषेतून नियतकालीक सुरू केले. पोर्तुगीज विभागाची जबाबदारी भारतकार हेगडे देसाई यांनी स्वीकारली होती. कालांतराने त्यांचे मतभेद झाल्यामुळे ६ नोव्हेंबर १९१२ रोजी 'भारत' हे स्वतःचे नियतकालीक प्रत्यक्षात आणले. अगदी स्वतःच्या जबाबदारीवर.

महाराष्ट्रात टिळक, आगरकर, चिपळूणकर, लोकहितवादी, परांजपे इत्यादी पत्रपंडितांनी राजकीय, सामाजिक, सांस्कृतीक, शैक्षणिक नि पत्रकारितेच्या क्षेत्रांत जे क्रांतिकारक पर्व निर्माण केले होते त्याचा विलक्षण प्रभाव हेगडे देसाई यांच्यावर पडला होता. हा प्रभाव ही त्यांची तिसरी प्रेरणा होती.

'भारत' हे साप्ताहिक सुरू करण्यापूर्वी त्यांनी एक विशिष्ट 'ध्येय' आगरकरांसारखे आपल्या डोळ्यांसमोर ठेवले होते.

''लोकाराधना अथवा सरकारी प्रेम संपादण्याचा विचार आमच्या मनांत

केव्हाच शिवलेला नाही. केवळ देशकल्याण व राष्ट्रीय तत्त्वांचा प्रसार याच दुहेरी उद्देशाने 'भारत' चालवण्याची कंटकमय जबाबदारी आम्ही आमच्या शिरावर घेऊन ती कसलीच भीड मुर्वत न राखता पार पाडीत आलो आहोत.''

''हिंदुस्थानची चळवळ यशस्वी होऊन त्यांत गोमंतक प्रांत केव्हा समरस होईल ते होवो, पण त्या पूर्वी आम्हापुढे असलेले एक पवित्रमय कर्तव्य पार पाडण्यास आम्ही अविश्रांत झटले पाहिजे.''

''हुकूमशहा डॉ. सालाझार यांनी आणलेल्या आक्तुकोलोनियालच्या (वसाहत कायदा) लज्जास्पद कचाट्यातून गोमंतक सोडवून तो पूर्ण स्वायत्त बनविण्याचा पथ आक्रमणे हेच ते कर्तव्य होय.''

''आम्ही पोर्तुगाल सरकारचे 'मुंडकार' नसून आमच्या देशाचे 'भाटकार' आहोत हे सिद्ध करण्याचा समय येऊन ठेपला आहे.''

हे ध्येय समोर ठेवून अखेरपर्यंत निर्भिडपणे कोणाचीही पर्वा न करता गोमंतकात स्वातंत्र्य कसे मिळवता येईल याचा ध्यास त्यांनी घेतला होता. त्यासाठी त्यांनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांत काम करणाऱ्यांच्या कार्यकर्त्यांनी धीटपणे आणि स्वतंत्रवृत्तीने पावले टाकून जनतेच्या मनांत आत्मोद्धाराचे वातावरण निर्माण केले पाहिजे ही मते त्यांनी अत्यंत निर्भिडपणे मांडलेली आहेत. कायद्याच्या कचाट्यात न सापडता अत्यंत कठोरपणे पोर्तुगिजांच्या विरुद्ध आपली मते ठामपणे मांडण्याचे व्रत त्यांनी अखेरपर्यंत पाळले. त्यासाठी त्यांना पन्नास खटल्यांना तोंड द्यावे लागले, अधुनमधून महिन्या महिन्यांचा कारावास भोगावा लागला, आणि पंचवीस हजार रुपयांपेक्षा अधिक आर्थिक झीज सोसावी लागली. पोर्तुगीज सरकार त्यांच्या साप्ताहिकाची विशेष दखल घेत असे.

एकदा त्यांना गव्हर्नर साहेबांनी बोलावून घेतले आणि त्यांच्या समोर एक प्रस्ताव ठेवला :-

''सिन्योर हेगडो देसाय, गव्हर्नर आणि सहसेनापती ही पदे सोडून तुम्ही कोणतेही उच्च पद मागा; सर्व सुखसोयींनी युक्त अशा तऱ्हेने तुमचा मान राखला जाईल. पण ते 'भारत' पत्र बंद करा.'' त्यावर ते लगेच उत्तरले, ''माझा जन्म पोर्तुगालसाठी झाला नसून तो आम्हा गोमंतकियांच्या उन्नतीसाठी लढण्यास झालेला आहे. तेव्हा कृपा करून अशी आमिषे माझ्यासामोर तरी ठेवू नका.'' असे परखड उत्तर देऊन ते बाहेर पडले. ते स्वतः वकील आणि फार्मासिष्ट होते. एखादे औषधाचे दुकान अथवा वकीलाचा कोट अंगावर चढवला असता, तर लौकिक कीर्ती आणि

पैसा याची कमतरता भासली नसती. पण देशकार्यासाठी त्यांनी ते वर्ज्य मानले.

सामाजिक बांधिलकीचा प्रश्न हाती घेऊन त्यांनी देवदासी बंद करण्याचा विडाच उचलला होता. शिवाय देवालयातील महाजनांची कृष्णकृत्ये त्यांना मान्य नव्हती. म्हणून महाजनांचा रोष हयातभर आपल्या शिरावर घेतला. प्रसंगी त्यांच्या विरुद्धही महाजन उठले होते. मसुरकरांनी धर्मांतरांचा प्रश्न जो हाती घेतला होता त्याला संपूर्ण पाठिंबा आपल्या साप्ताहिकांतून आणि ठिकठिकाणी सभा घेऊन त्याचे समर्थन केले होते. देवदासींच्या प्रश्नाला समर्थन मिळवण्यासाठी ठिकठिकाणी प्रचारयंत्र त्यांनी अंगीकारले होते आणि 'मराठा गायक समाज' ही संस्था स्थापन करण्यास सहयोग दिला होता. आज त्या संस्थेचे नामकरण 'गोमंतक मराठा समाज' असे झाले आहे.

भारतकारांनी गोमंतकाची मातृभाषा 'मराठीच' असल्याचे प्रतिपादन करून तीच भाषा प्राथमिक, माध्यमिक आणि उच्चमाध्यमिक स्तरांवरील शिक्षणाचे माध्यम असले पाहिजे, असा ठणठणीत पुरस्कार सतत केला आहे.

एका अग्रलेखात ते लिहितात :-

ज्या समाजाच्या रक्तात मराठी मिसळली आहे तो समाज मराठीचा अव्हेर करण्यास कदापि तयार होणार नाही हे उघड होय. हा समाज वगळून ज्या अल्पसंख्य जनतेला कोंकणीची जोपासना करण्याची इच्छा असेल तर तिच्या मार्गावर कोणीही आड येणार नाही, मात्र त्या कोंकणीवाद्यांनी मराठीची मान मुरगाळून मराठीच्या जागी कोंकणीची स्थापना करण्याचा निरर्थक व नादान नाद धरू नये. गोमंतकीय हिंदूत मराठी इतकी मुरलेली आहे की कोंकणीवर त्यांच्या प्रपितामहांनासुद्धा तिची हत्या करणे शक्य नाही. (६ जून १९४०) याचे प्रत्यंतर आज आम्हाला पाहायला मिळते. मराठी भाषेत आज दहा (१०) दैनिके गोमंतकात वाचायला मिळतात तर एकमेव कोंकणी दैनिक 'सुनापरान्त' निराधार आणि वाचक वर्ग न मिळाल्याने बंद पाडावे लागले.

अशा प्रकारचे व्यक्तिमत्त्व आम्हा गोमंतकियांच्या भूमीला प्राप्त झाले ही श्री गोमंतदेवीची एक प्रकारे कृपाच म्हणावी लागेल. अशा थोर राष्ट्राभिमान्याला अत्यंत विनम्रपणे अभिवादन करून आणि ही संधी मला मिळाल्याचे भाग्य समजून त्या थोर आत्म्याला मी ही शब्दांजली वाहून प्रणाम करतो.

***(भिकू हरी पै आंगले)***

*मठग्राम गोमंतक*

# अधिक माहितीसाठी संदर्भ साहित्य


**गडकरी माधव,** ‘भारतकार हेगडे देसाई’, असा हा गोमंतक, पणजी. १९७४, पृ. २१० – २१७

**दाते शंकर गणेश,**
**काळे दिनकर विनायक,**

**बर्वे, शंकर नारायण,** ‘मराठी नियतकालिकांची सूची’, मुंबई १९६९, (या सूचीत संपादक हेगडे देसाई यांचा संक्षिप्त परिचय आहे. त्यात ‘भारतोदय’, ‘मराठा गायक मित्र’, ‘स्वयंसेवक’ व ‘भारत’ या कालिकांच्या संपादनात ते होते, असा निर्देश आहे. ‘प्रभात’ पत्राचा निर्देश नाही.)

**नार्वेकर शशिकांत,** ‘झुंजार मराठी पत्रकार ‘भारत’कार कै. गो. पुं. हेगडे–देसाई.’ (पुस्तिका), गोमंतक मराठी अकादमी, पणजी, १९८४

**नार्वेकर शशिकांत,** टिळक–आगरकरांच्या परंपरेतील झुंजार पत्रकार भारतकार हेगडे–देसाई, नवशक्ती, मुंबई?

**पैंगीणकर अजीत,** ‘महाराष्ट्रात’ केसरी तसा गोव्यात ‘ओ भारत’ (डॉ. गोविंद हेगडे देसाई यांचे कार्य), नवप्रभा, पणजी दि. १५.८.१९८४ (१८ ऑगस्ट १९४९ च्या अंकाची तयारी करून ३ दिवस आधी भारतकार निधन पावले. तो अंक प्रसिद्ध झाला नाही आणि नंतर ‘भारत’ बंद पडले.)

**प्रभू–लवंदे रामचंद्र नारायण,** गोविंद पुंडलीक हेगडे देसाई यांचे चरित्र, नवीन गोवे १९३०.

**राणे जयसिंगराव,** ‘कोमोइशचे लुझिशदश ह्मणजे कालकूट’ दै. गोमंतक, पणजी (२.११.१९८२) (या लेखात भारतकारांचा ‘कामोईशचे श्राद्ध’ हा दि. १७ जुलै १९२४ च्या ‘भारत’ पत्रातील संपूर्ण अग्रलेख

उद्‌धृत केला आहे. त्यावर ‘काळाच्या उदरात भविष्य काळाची उत्तरे लिहिलेली असतात’ असा अभिप्राय लेखकाने दिला आहे. भारतकारांचे द्रष्टेपण त्यातून दिसून येते.)

**सुखटणकर जगन्नाथ स.,** ‘पोर्तुगीज राजवटीतील स्वातंत्र्य लढ्याची पाने (१५१०–१९४७), पणजी, १९९२’ (या ग्रंथात रिपब्लिकमुळे गोव्यातील हिंदुजनतेत झालेल्या जागृतीचे व त्यातील ‘भारत’ कारांच्या सहभागाचे वर्णन आहे. तसेच आकस्मिक आलेल्या रिपब्लिकामुळे ‘गोमंतकीय रात्री पारतंत्र्यात झोपी गेले आणि सकाळी स्वातंत्र्यात जागे झाले.’ अशी यशवंत सूर्यराव सरदेसाई यांची आठवण दिली आहे.)

**हेगडे–देसाई गोविंद पुंडलीक,** सातवड्याची कथा, भारत, केपे, १९४७, (हेगडे देसाई यांनी ‘भारत’ पत्रात १९४७ च्या वर्षात ‘तोच मी’ या टोपण नावाने आपली आत्मकथा लिहिण्यास सुरवात केली होती. ती आत्मकथा ‘भारत’ च्या संचिकांत पडून आहे. ‘ भारत’ च्या संचिका पणजी येथील सेंट्रल लायब्ररीच्या संदर्भ विभागात उपलब्ध आहेत.)

**हेगडे–देसाई नरेंद्र,** ‘संकटांनी आयुष्य घेरलं तरी’ रविवारची नवप्रभा, पणजी, ६ नोव्हें, १९८४ (भारतकारांच्या जन्मशताब्दी निमित्त भारतकारांच्या आठवणी, पूर्वार्ध, शब्दांकन, शशिकांत नार्वेकर)

**हेगडे–देसाई नरेंद्र,** ‘संकटांनी आयुष्य घेरलं तरी’ रविवारची नवप्रभा, पणजी, १३ नोव्हें. १९८४ (भारतकारांच्या जन्मशताब्दी निमित्त भारतकारांच्या आठवणी, उत्तरार्ध, शब्दांकन, शशिकान्त नार्वेकर)

# ‘भारत’कार कै. गो. पुं. हेगडे देसाई पुरस्कार

‘भारत’कार हेगडे-देसाई यांची जन्मशताब्दी १९८४- १९८५ या वर्षभरात विविध उपक्रमांद्वारे गोव्यात साजरी झाली. त्या उपक्रमांचा एक भाग ह्मणून गोमंतक मराठी अकादमीतर्फे १९९१ पासून प्रतिवर्षी ७ नोव्हेंबर रोजी ‘भारत’ कारांच्या जन्मदिनी ‘भारतकार कै. गो. पुं. हेगडे-देसाई पुरस्कार’ मराठी पत्रकाराला (गोमंतक आणि महाराष्ट्र) प्रदान केला जातो. आजवर कै. पु. रा. बेहरे, श्री. व्दा. भ. कर्णिक, श्री. गोविंदराव तळवलकर, श्री. जयवंतराव टिळक, कै. विद्याधर गोखले, श्री. माधव गडकरी व श्री. नारायण आठवले या ज्येष्ठ पत्रकारांना तो पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले आहे. आता हा पुरस्कार दर तीन वर्षांनी दिला जाणार आहे.

मराठी भाषा परिषदेने हा स्तुत्य उपक्रम सुरू केला. त्या संस्थेने कै. पां. वा. गाडगीळ, श्री. बा. द. सातोस्कर व कै. ना. भा. नायक यांना हे पुरस्कार प्रदान केले.

*''लोकाराधना अथवा सरकारी प्रेम संपादण्याचा विचार आमच्या मनास केव्हांच शिवलेला नाही. केवळ देशकल्याण व राष्ट्रीय तत्त्वांचा प्रसार याच दुहेरी उद्देशाने 'भारत' चालवण्याची कंटकमय जबाबदारी आह्मी आमच्या शिरावर घेऊन ती कसलीच भीडमुर्वत न राखता पार पाडीत आलों आहोंत.''*

**– भारतकार**

*'''भारता' प्रीत्यर्थ मी २५ हजारांवर द्रव्यहानि सहन केली आहे बारा महिन्यांचा कारावास भोगला आहे. सरकारी दरबारात व कचेऱ्यांत पदरमोड सोसून असंख्य वाऱ्याही केल्या आहेत. प्रापंचिक सुखांना अंतरलो आहे. पण इतकेंही असून मी मला त्यागी मानीत नाही. ज्या देशभक्तांनी स्वदेश कल्याणासाठी सर्वस्वाचा उन्हाळा केला व प्राणही पणास लावले, त्यांच्यापुढे त्यागी ह्मणून घेण्यास मला काडीचाही अधिकार नाही अशी माझी प्रामाणिक समजूत आहे.''*

**– तोच मीच**

(गो. पुं. हेगडे–देसाई)

'सातवड्याची सत्यकथा' भारत १९४७

# ‘भारत’कार हेगडे-देसाई यांचे निवडक अग्रलेख

## खंड - पहिला

**शक्यतों कायद्याच्या कक्षेंत राहून आह्मीं गोमंतकाच्या कल्याणार्थ प्रेरणात्मक होणारी निर्भीड विचारप्रणाली वाचकवर्गा पुढें मांडलेली आहे. कोणत्याहीं एका पक्षाच्या, मतांच्या किंवा लोकक्षोभाच्या आहारीं न जाता सर्व पंथाच्या नि मतांच्या लेखकांना 'भारता'तून आपलीं मतें मांडण्यास अवसर दिला आहे. हेंच आमचें धोरण ह्या पुढेंहि चालू राहिल.**

***भारत, दि. ३०.३.१९२९***

## ‘भारत’चा पहिला अग्रलेख

# मुखबंध

नव्यानेंच जन्म पावलेल्या ‘भारत’ पत्राचा हा प्रथमांक आज वाचकांच्या हाती जात आहे. अशा प्रसंगी या कामी सर्वसंमत होऊन बसलेल्या रुढीस अनुसरून प्रथमपरिचयादाखल, आपली दिशा, हेतु, कार्यक्रम, इ. वाचकांसमोर मांडणे हे आमचे पहिले कार्य होते; परंतु असे कांही योगायोग येऊन भारताचा जन्म झालेला आहे की, त्यांमुळे वरीलप्रमाणें वाचकांस आमचा प्रथम परिचय करून देण्याची आवश्यकता आज राहिलेली नाही.

भारत कां निघाला हे आज गोमांतकांतील लेखनवाचनाभिरूचि असलेल्या ज्यांच्याशी भारताच्या मुलाखती होतील, सर्वांस आधीच ठाऊक झालेलें आहे. पूर्वाश्रमांतील त्याचे स्वरूप व त्याची कामगिरी ही सर्वांपुढे आहेतच. आणखी परिचय तो कोणता करून द्यावा व त्याची जरूरी ती काय?

एवढे खरें की, जरी समाजसेवेचे व्रत पत्करून आज भारत लोकांपुढे प्रगट होत आहे, तरी त्याच्या प्रगटीकरणाची तयारी काही मुद्दाम करण्यात आली नव्हती. आपण होऊन सर्व काही जुळून येऊन सहजगत्याच ती झालेली आहे. आणि यामुळेंच ज्या एका सुत्रचालकाच्या प्रेरणेनुसार जगांतील यद्ययावत् व्यवहार घडून येतात, त्याच्या अतर्क्य लीलेचाच हा एक प्रभाव आहे असे मानून, त्यावरील दृढ श्रद्धेनेंच हे कार्य हाती घेऊन आह्मी पुढें सरसावलों आहोत. संकल्पाबाहेर अतर्कित व चमत्कारिक असे योग कधी कधी आपोआप जुळून येऊन एखादे कार्य घडत असते. आणून कधीही न येणारे, तर यावयाचे झाले ह्मणजे आपोआप येणारे, असे हे योग असतात व ह्मणूनच त्यास योग ही संज्ञा देण्यात येत असते. भारताच्या जननाला असाच एक योग कारणीभूत झाला आहे.

मराठींत निघणाऱ्या एखाद्या वर्तमानपत्राची आज किती तरी काल पावेतों आपल्या गोमांतकांत उणीव भासत होती आणि त्यांतही पोर्तुगीज

राष्ट्रांत लोकसत्तेची द्वाही फिरून तद्नुसार गोमंतक स्थांनास प्राप्त झालेल्या नूतन परिस्थितीत तर ही उणीव विशेष स्पष्टपणे भासू लागली.

नूतन परिस्थितीचे प्रतिबिंब तरुणांच्या मनावर पहिल्याप्रथम उमटतें ही गोष्ट लक्ष्यांत घेता, वर सांगितल्याप्रमाणे आता विशेष जोराने पुढें येणारी ही अडचण कधी दूर व्हावी या विवंचनेत, पूर्वी वेळोवेळ अनेक प्रसंगानुरोधांनी पुन: पुन: एकवटणाऱ्या व आज भारत प्रकाशक भारतमंडळांत समाविष्ठ झालेल्या, आह्मा तरुणांची मने चूर होत रहावी हे साहजिक आहे.

पण नवीन वर्तमानपत्राची उभारणी करणें ही गोष्ट बरीच जबाबदारीची, आणि निदान त्यावेळी तरी आमच्या शक्ती बाहेरची होती. तेव्हां असा हा नवा आटाप करण्यापेक्षां, (त्यावेळीं) पूर्वीच अस्तित्वांत आलेलें व प्रागतिक धोरणाकडे ओढा दाखवणारे जें प्रभात पत्र, त्यासच मंडळीच्या सहाय्याची अनुकूलता झाल्यास तें उदयोन्मुख होईल व सुव्यवस्थितही चालेल असें दिसून आल्यावरून, मालकांच्या विचारें तेंच पत्र मंडळीनें हातीं घेतलें.

याप्रमाणे अडीच महिनेपर्यंत ते पत्र चाललें, तथापि तेवढ्या अनुभवानें मालकांस ती व्यवस्था नापसंत होऊन मंडळीत व त्यांच्यात बेबनाव आला व तद्नुसार प्रभाताची व आमची फारकत होऊन, आमच्यापासून मिळालेली, 'मधली स्थिति' सोडून देऊन 'येरे माझ्या मागल्या' या ह्मणीप्रमाणे प्रभातकार पूर्वस्थितीवर गेले.

या प्रकारांमुळे आह्मांपासून जन्मास आलेल्या, परंतु आधार तुटल्यानें निराधार झालेल्या वरील 'मधल्या स्थिती' ला अपत्यप्रेमामुळे झेलून धरणें आह्मांस भाग पडलें, तसेंच पूर्वस्थितींतच कुंचबत न राहता तींतून भावी स्थितीत जायला तिची जरूरी आहे. असे आह्मांला वाटल्याने तिला तसें झेलून धरणें हे आह्मांस इष्टही पण दिसलें. या दोनही कारणांमुळे वरील मधल्या स्थितीस आश्रय देण्याकरितां वर्तमानपत्रासाठी उभारल्या गेलेल्या भारत प्रेसला त्यांचा अंतरलेल्या सोबतीऐवजी नवा सोबती देण्याकरतां, शिवाय प्रस्तुत उद्दिष्टाखाली एकवटलेली आमची संघशक्ति कार्याभावी विस्कळीत होऊन न जातां तशीच कायम टिकून आजवरच्या अनुभवांती तिचे दिसून आलेले

सुपरिणाम पुढेही तसेच घडत रहावे याकरिता, पूर्वी केलेल्या स्वार्थत्यागांत हरप्रयत्न करून नव्याने भर घालून आह्मी जी शक्तीबाह्य मेहनत घेतली, तिचे दृश्यफळ या नात्यानें 'भारता'चा उदय आज झालेला आहे.

'भारत' हे आपल्या परमप्रिय, परमपूज्य अणि परमपवित्र अशा देशाचे नांव आहे. सुदैवाने तेंच छापखान्यास योजलें गेलें. पुढें वरील कारणामुळें त्याच्या निर्वाहासाठी जी मंडळी अस्तित्वांत आणणें भाग पडले, त्या मंडळीस तेच कायम करणे उचित वाटलें आणि आज त्याच मंडळीच्या प्रयत्नानें प्रसिद्ध होणाऱ्या पत्रालाही पण आह्मी तेच वंदनीय नांव देत आहो.

वाईटापासून बरें निष्पन्न होण्याचे प्रसंग कितीदा आणि किती तरी येतात 'कल्याणकारक मार्ग हे प्राय: विघ्नाभिभूत असतात' असें जें विद्धानांनी ह्मटले आहे, त्याचा तरी अर्थ हाच आहे. दु:खांतूनच सुखाची किंमत भारी असते, इ. जे थोर लोकांचे बहुतेक अनुभव, त्यांच्याकडे लक्ष्य दिलें ह्मणजे झाला हा प्रकार केवळ अनिष्टच झाला असे आमच्याने ह्मणवत नाही.

'भारता'सारखा अमोल व जगद्वंद्य असा राष्ट्रीय ग्रंथ निर्माण होण्यास देखील जें कारण झालें, तें आपसांतील बेबनाव, भाऊबंदांतील वैमनस्य व तज्जनित कलह हेंच होय. लाखों शूर वीरांचे देह धारातीर्थी अर्पण करविणारा हा प्रसंग तत्काल दु:खदायी नव्हता काय? अविचारजनित दु:खसंवेदनेने ''ज्याच्या साठी राज्य, भोग आणि सुखे यांची इच्छा करायची तेच हे स्वकीय मनुष्य जर प्राणाची, द्रव्याची पर्वा न ठेवता युद्धास तयार होऊन उभे राहिले आहेत, तर त्या स्वजनांचा नाश करून रक्ताने माखलेले हे भोग भोगण्यापेक्षां मला तें राज्यही नको, ते भोगही नकोत व जीवितही नको.'' असे ह्मणणाऱ्या अर्जुनाला ज्ञानामृताचे घुटके घ्यायला लावून 'बाबारें कर्तव्यासाठी कर्तव्य कर' असा दिव्य सदुपदेश देणारा, अखिल भारत वर्षास वंदनीय होऊन राहिलेल्या भारताचा सारभूत असा गीतारूप अमृतस्पंदी ग्रंथ हा कशाचें फळ आहे?

भुवनपावनी रामकीर्ती विस्तार पावण्याला कैकयीसारख्या जहांबाज राजस्त्रीचा आपमतलबी आणि घातक दुराग्रहच कारण झाला

नाही काय? फार काय सांगावे, संत मंडळीला ललामभूत होऊन राहिलेल्या तुकोबारायांसारख्याची अंत:करणास झोंबणारी अभंगवाणी इतकी नि:शंक, आणि ह्मणूनच बाणेदार आणि सरस निघायला कारण जो निस्पृहपणा व त्यालाही कारण जें वैराग्य ते पूर्णपणे आंगी वाणायला जे कारण झालें ते त्यांच्याच शब्दांनी सांगायचे झाल्यास 'बाईल कर्कशा' हे होते. अर्थात् तुकोबारायांच्या वाणीचा प्रासादिकपणा हा त्यांच्या खाष्ट बायकोच्या प्रसादाचे फल आहे असे ह्मटलें पाहिजे.

तात्पर्य, अनिष्ट प्रसंग हे इष्टप्राप्तीचे असतात, असा जर पुष्कळवेळा अनुभव येतो, तर आह्मींही आमच्या सदिच्छेच्या आड येणारी विघ्नें ही परमेश्वरी संकल्पप्रेरित, अतएव भावी कल्याणाची द्योतक अशी असली पाहिजे असे का मानू नये! ''नाहि कल्याणकृत्कश्चिदुर्गतिं तात गच्छति'' ह्या त्यांच्याच स्फूर्तिदायक उक्तीवर निष्ठा ठेऊन वागावें आणि कार्यास प्रवृत्त व्हावे यातच आमचें मंगल आहे.

येथवर अनुबंधचतुष्टयांचे निदर्शन झालें. आता ज्या योगेश्वराच्या प्रसादानें आज आह्मी या आमच्या कर्तव्यक्षेत्रांत पाय ठेवीत आहों त्यांचे मंगल अभिवादन करताना भारताचा सारभूत असा जो गीतारूप अमृतमय भाग, त्याचाही केवळ सार असा, सर्व भारतीयांच्या परिचयाचा, कोणत्याही शुभकृत्याच्या आरंभी ह्मटला जाणारा - संजयांने धृतराष्ट्रास उपसंहाररूपाने सांगितलेला, गीतेतील श्लोक या ठिकाणी मंगलार्थ उधृत करून आह्मी हा मुखबंध लेख पुरा करतों.

*''यत्र योगेश्वर: कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर:*
*तत्र श्री विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम"*

ज्या ठिकाणी योगेश्वर असा श्रीकृष्ण आहे, ज्या ठिकाणी पार्थासारखा धनुर्धरवीर आहे, त्या ठिकाणी लक्ष्मी, विजय, ऐश्वर्य व अढळ अशी नीतीही असावयाची अशी माझी बुद्धि आहे.

***प्रथमांक,***
*बुधवार, दिनांक ६ नोव्हेंबर १९१२*







**'भारत'कारांचे रिवण गोवा येथील जन्मस्थळ.**





'भारत'कारांना ठेवण्यात आलेले केपे येथील कारागृह.



श्रीमती. सुंदराबाई गोविंद हेगडे देसाई



'भारत'कार श्री. गोविंद पुं. हेगडे देसाई

# राजकीय अग्रलेख

*“स्वराज्यप्राप्ति हे ‘भारताचे’ मुख्य ध्येय असल्याचें सर्वांस माहीत आहेच. ते साध्य होण्यापूर्वी, निदान सुराज्यांतील सुखें नोकरशाहीकडून हक्काने मिळविण्याची पात्रता आमच्या लोकांत यावी व गरज पडेल तेव्हां जुलमाचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य जनतेच्या अंगांत यावें हे सक्रिय रीत्या सांगणें हेंच आपलें कर्तव्य आहे, असें भारतपत्र समजते.”*

**‘भारताचें १८ वें वर्ष’**
*अग्रलेख, दि. ६.४.१९३३*

# गुलामांचा देश

लोक दुसऱ्या देशावर किंवा तेथील लोकांवर हल्ला करून त्यांस पकडीत, व आपण बाजारांत दाणागोटा विकतो, तसे विकीत, ह्या विकल्या गेलेल्या लोकांस गुलाम अशी संज्ञा आहे. ही राक्षसी चाल प्रस्तुत प्रचारांत नाही, असे प्रतिपादण्यांकडे बहुतेकांचा कल आहे आणि ही चाल मोडल्याचे श्रेय सगळेचे सगळें आपल्या पदरांत पडावें अशीही काहीं लोकांची इच्छा आहे. ह्या वादांत पडण्याचे तूर्त आपणास कारण नाही. कोणत्याही देवदूततुल्य लोकांच्या प्रयत्नानें कां असेना, ही रानटी चाल खरोखरच नामशेष झाली की काळोखाचा ग्रास करणाऱ्या दिव्याच्या पोटांतून जसें काजळच निघतें, तद्वत गुलामगिरी नामशेष करणाऱ्या राष्ट्राच्या हातून नवे गुलाम तयार झाले, हें पाहणें आपणांस आज शक्य असलें, तथापि उचित नाही ह्मणून तीही बाजू आपण सोडून देऊ. गुलाम ही संज्ञा ज्यांस पूर्णपणें लागू होईल, असें कीटकवत् मनुष्यप्राणी ह्या जगाच्या पाठीवर तूर्त आहेत की नाहीत, आणि असतील तर त्यांच्या स्पर्शानें दूषित झालेला भूप्रदेश कोणता, हे आज आपण पाहूं.

पण अगोदर आपणांस गुलाम ह्या शब्दाचे स्पष्टीकरण समजून घेतलें पाहिजे. एखाद्या माणसास जुलूम जबरदस्तीनें त्याच्या देशांतून काढून दुसऱ्या ठिकाणी नेऊन विकलें, ह्मणजे तो गुलामागिरींत पडला, गुलाम झाला. अशी सामान्य समजूत असली, तरी ती सर्वांशी बरोबर नाही. विकला गेलेला मनुष्य सर्वस्वी परतंत्र झालेला नसतो. ज्याच्या अटकेंत तो सापडला असेल, त्याची ताबेदारी करणें त्याला सर्वथा अनिवार्य असलें तथापि त्याच्या वाचिक व मानसिक शक्ति त्याच्या ताब्यांत असतात. धन्यांची नोकरी बजावीत असतांना मनांतून स्वदेशाचें कल्याण चिंतणें त्याला साध्य असतें आणि स्वजनांचा उत्कर्ष व्हावा, अशी ईश्वराशीं प्रार्थना त्याला मुखावाटें करतां येते. ह्मणजे काया, वाचा आणि मन हे जे मनुष्यत्वाचें तीन घटक, त्यांपैकी अगदी निकृष्ट जी काया, तिजवर पारतंत्र्यबंधनाचे फेरे चढल्यामुळे तेवढ्या पुरता तो गुलाम

होतो. तरी बाकीच्या  दोन शक्तीसंबंधानें तो स्वतंत्रच राहतो. ह्यावरून गुलाम, गुलामगिरी व ती नामशेष केल्याबद्दलच्या श्रेयांची ओढाताण, हें सगळें कनिष्ठ दर्जाच्या एक तृतीयांश गुलामासंबंधाने आहे, असे ह्मणण्यास हरकत नाही. आणखी गुलाम ह्या व्यापक शब्दानें, अंतर्बाह्य शक्तींचा लय झाल्यामुळें जे दास बनले असतील, अशा व्यक्तींचा आपणास बोध होत असतो, त्यापक्षी उपरिनिर्दिष्ट कनिष्ठ दर्ज्यांच्या गुलामांचा ह्या कोर्टात समावेश करणें बरोबर होणार नाही. अर्थात अशा लोकांचा निर्देश दुसऱ्या कोणत्या तरी सौम्य शब्दानें झाला पाहिजे, न पेक्षां काया, वाचा आणि मन ह्या तीहींनी जे दास बनले असतील, त्यांना तरी दुसरा कोणताही कडक शब्द-बडागुलाम अशासारखा लाविला पाहिजे. नुसत्या शरीरावर दुसऱ्याचा ताबा चालूं लागला, की तो गुलाम ह्या सदराखाली येतो. हे जर खरे, तर काया वाचा मनानें जे दुसऱ्यांचे दास बनले असतील. त्यांना बडेगुलाम अशासारखी सुबोध संज्ञा देणे वाजवी आहे, हें कोणालाही नाकबूल होणार नाही.

ज्यांच्या हजारों पिढ्या पारतंत्र्यात गेल्यामुळें जे शरीरानें गुलाम बनले, धन्याने नेमलेले शब्द व स्वर पुटपुटण्यापलींकडे ज्यांच्या वाणीतून निसर्गसिद्ध उच्चार ऐकूं येण्याची मारामार, सद्सद्विवेकबुद्धीचा कोंडमारा करून वरिष्ठांस आवडेल असेंच भाषण करण्याची सवय ज्यांनी करून घेतलेली, व मिंधेपणाने जे वाचेनेंही गुलाम बनले, स्वोदरपूर्तीपलीकडे ज्यांच्या दृष्टीची धांव जात नाही, वनचरांसारखी अत्यल्प वस्तूनी तृप्ति, भिक्षुकीचा वेदांत हा हाडीमांसी खेळलेला, पावलोपावली देवधर्माखेरीज दुसरे काही दिसत नाही, जीर्ण रूढींस कवटाळून धरल्यामुळे आपण खड्ड्यांत घसरत आहोत हें स्पष्ट दिसत असतांही दृढ जागेवर पाऊल टाकण्याचा धीर ज्यांस होत नाही, नामशेष झालेल्या देवऋषिपितरांचे ज्यांना भय, जीर्ण धर्म व नासक्या रूढी ह्यांची दहशत, धर्माध्यक्ष लोकापवाद ह्यांची भीती, असल्या असंख्यात आपत्तींनी मनावर पगडा बसविल्याामुळे जे भ्रमानेंही गुलाम झालें आहेत, अशांना नुसतें गुलाम हे एकटे विशेषण लावणे हे अन्याय्य होणार हे कोणीही सांगेल. एकट्या शरीरानें परतंत्र होतो, तोही पण गुलाम, आणि काया-वाचा-मनानें परतंत्र होतो तोही पण गुलाम, असे कसें ह्मणता येईल? तीनही

बाबतीत गुलाम होतो, त्यांची गणना मनुष्य कोटींत करता येत नाही, असे उत्तर संभवनीय असलें, तथापि हिंदी लोक आणि हिंदुस्थान ह्यांची माहिती असणाऱ्यांकडून ते होणे नाही. असो. तर काया वाचा मनानें जे कोणी गुलाम झाले असतील, त्यांची गुलाम ह्या शब्दानें संभावना होणे नाही. ह्मणून 'बडेगुलाम' अशासारखी संज्ञा प्रचारात येणे अवश्य आहे. असे आह्मी ह्मणतो.

गुलाम आणि बडागुलाम ह्या शब्दांतील अंतर ध्यानांत धरून आपण हिंदुस्थानावरून नजर फिरविली तर ह्या अफाट भूप्रदेशांतील अति रमणीय, अति सुपीक आणि अति उत्कृष्ट भाग बड्यागुलामगिरींत राबणाऱ्या कोट्यवधी प्राण्यांच्या वास्तव्यानें दुषित झाला आहे, असा शोचनीय देखावा आपल्या नजरेस येतो! पृथ्वीच्या पाठींवर हिंदूस्थानसारखा देश नाही, तसेंच हिंदी लोकांसारखे बडेगुलामहि पण इतरत्र सांपडावयाचे नाहींत, असें कोणी ह्मटले तर तें अयथार्थ होईल, असें नाहीं. वीस कोटी लोक तीन हजार वर्षांवर गुलामगिरीत लोळत आहेत, असा देखावा इतिहासाच्या दुसऱ्या कोणत्याही पृष्ठांवर आढळेल, असे वाटत नाही. 'भोगादीगभयं' ह्या न्यायानें अति रमणीय भूप्रदेश हिंदी लोकांस उपभोगवयास सांपडला. ह्मणून तर अति अद्‌भूत गुलाम गिरीचा रोग भारतास जडला, अशी चिकित्सा ऐकूं येते. तीत तथ्यांश नसेल, असें कोणी ह्मणावें! तात्पर्य भारतांस लागलेला हा गुलामगिरीचा भयंकर रोग केवळ अद्‌भूतपूर्ण आहे, असे ह्मणण्यांस हरकत नाही.

राजकीय गुलामगिरी थोडाबहुत काळ भोगावी लागली नाही, असे लोक पृथ्वीच्या पाठीवर फारच थोडे निघतील. राज्याधिकारी स्वकीय असोत, लोक कार्यक्षम झाले नाहींत, तोंवर राजकीय गुलामगिरीची शृंखला सैल होत नसते. पण एकदा का जागृत झालेली जनता स्वराज्यसाधनार्थ तळमळूं लागली, की लवकर किंवा उशीरां तिची राजकीय गुलामगिरीपासून मुक्तता होतेच होते. आणि हिंदुस्थानही प्रस्तुत त्याच अवस्थेंत असलें, तरी त्याबद्दल विशेष काळजी करण्याचे कारण नाही. कां, की, राजकीय गुलामगिरी ही महद्‌आपत्ति नाही आहे. धार्मिक व सामाजिक बाबतींत जनता गुलाम बनवल्याखेरीज राजकीय गुलामी टिकणें शक्य नसतें. कायेनें गुलाम तो

वाचेंने व मनाने गुलाम बनत नसतो. तरी मनाने गुलाम बनलेला मात्र शरीरानें हटकून गुलाम होतो. आणखी हिंदी जनता धार्मिक, व तद्नुसारी सामाजिक, आणि ज्यांच्या उगमाचा शोध लागत नाही, अशा ग्रहणीय रुढींची दासी बनल्यामुळेंच राजकीय बाबतींतही तिला अध:स्थान प्राप्त झालें आहे. भारत उच्चस्थानापन्न व्हावें, त्याला प्राप्त झालेली राजकीय नीचावस्था नाहीशी व्हावी, अशी ज्याला तळमळ लागून राहिली असेल, त्यानें पहिल्यानें राजकीय नीचावस्थेत कारणीभूत झालेली धार्मिक व सामाजिक बाबतींतली गुलामगिरी नाहींशी करण्यास झटलें पाहिजे. उठल्यासुटल्या राज्याधिकाऱ्यांच्या नावानें खडे फोडण्यांत फायदा नाही. हिंदी लोक मनानें जोपर्यंत स्वतंत्र होणार नाहीतं. दगडधोंड्यापुढें माना वाकविल्यामुळे पाठीस आलेली वांक दुरुस्त करण्याची खटपट त्यास रुचणार नाही, जीर्णाभिमानाच्या भरी पडून समाजास भारभूत झालेल्या भटभिक्षुकांची ताबेदारी झुगारून देण्यास ते तयार होणार नाहीत, तोंवर विद्यमान सत्ताधारी लोक काय, किंवा दुसरे कोणी काय, कोणी तरी त्यांच्या मानगुटीवर बसलेलेच राहतील. गेल्या आठ दहा शतकांपासून हिंदी जनता स्वतंत्र तर नव्हती? तेव्हां सध्याचे राज्यसत्ताधारी कोठें होते? आपल्या मानेवरच्या जोखंडात कितीसा हलकेपणा होता? सारांश हिंदी जनता मनानें परतंत्र आहे तोंवर सध्याचे नसले तर दुसरे कोणी तरी तिच्या उरावर येतीलच येतील. गाडीचे मालक बदलले ह्मणून बैल काही गाडीवान होत नाही. त्याच्या नाकांतली वेसण जशीची तशी कायम असते. ह्याच न्यायाने हिंदी जनता मानसिक गुलामगिरीपासून मुक्त होणार नाही, तोवर तिला उच्चस्थान मिळणें मुळीच शक्य नाही. मग अशा हतभाग्य लोकांच्या संसर्गाने दूषित झालेल्या ह्या हिंदुस्थानांस कोणी गुलामांचा देश ह्मटले, तर त्यात वावगें ते काय झालें?

*(बुधवार, दि. १३ नोव्हेंबर १९१२)*

# राष्ट्रपुरुषाची शरीरशुद्धी

अव्यवस्थित आहारविहारांच्या योगें शरीरांत जें विजातीय द्रव्य संग्रहित होते, ते काढून टाकल्याखेरीज, ह्मणजे शरीराची अंत:शुद्धी केल्याखेरीज, बाहेरुन कितीही औषधोपचार केले, तरी त्यापासून काडीचेही हित होत नाही, ही गोष्ट  बहुतेकांच्या अनुभवातली असेलच. शरीरास हितकारक अशी द्रव्यें ज्यांनी ग्रहण करावयाची, त्या इंद्रियांची तोंडे जर विजातीय द्रव्यानें खेंचून पौष्टिक आहाराचा उपयोग तो कसा होणार? राष्ट्रपुरुषाच्या शरीरालाही हाच नियम लागू असतो. कालांतराने किंवा राजकीय उपाधींनी, अथवा हरतऱ्हेच्या कारणांनी समाजव्यवस्था बिघडून गेलेली असेल, तेथें राजकीय सुधारणेची पौष्टिक खुराक कितीही चालू केली, तरी त्यापासून फायदा बिलकून न होता, झाला तर थोडाबहुत तोटाच होतो. सामाजिक सुधारणेप्रीत्यर्थ जेमतेम हालचाल करून सगळा भर राजकीय सुधारणेवर दिला गेल्याकारणानें हिंदुमुसलमानांतील तीव्र मतभेद, जहालमवाळांच्या आणखी दोन नव्या जाति, अशा बऱ्याच गोष्टींचा प्रादुर्भाव हिंदुस्थानांत झालेला आपण प्रस्तुत पाहत आहो. राजकीय उलाढालींकडे डोळेझांक करून सामाजिक सुधारणेकडे पाहिल्याने जोर केला असता, तर ह्या गोष्टींस अवकाशच मिळाला नसता. एकनाथ तुकोबारायांसारखे समाज सुधारक विशेष प्रमाणावर उत्पन्न झाले असते, तर राष्ट्राची चिरकल्याणकारक सुधारणा झाली असती, किंबहुना राजकीय सुधारणे प्रीत्यर्थ ह्मणून निराळी यातायात करण्याची जरूरी राहली नसती परंतु थोडी दिशाभूल झाल्यामुळे सामाजिक सुधारणेवरचा नेट कमी होऊन तो राजकीय उलाढाली करण्यात खर्च होऊ लागला. त्यायोगें धड सामाजिक सुधारणाही नाही, आणि धड राजकीय प्रगतीही नाही, अशी स्थिती झाली आहे.

राजकीय बाबतीत राष्ट्रपुरुषाची प्रगती होण्यास ज्या एका गोष्टीची आवश्यकता असते, ती एकात्मता, सामाजिक सुधारणेखेरीज उत्पन्न होणार कशी? उच्चनीच्चत्वभाव, स्पर्शास्पर्श, सोवळेओवळेपणा इत्यादी कुत्सित विचारांनी जेथें शिथिलता आली आहे, जातिभेदजन्य अहमहमिकेंने परस्परांची

ताटातूट झाली आहे, हिंदुधर्मविध्वंसकांचा मारा पंचमवर्णरुपी एका मोठ्या भागावर चालत असल्याची जाणीव इतर अवयवांस होत नाही, आणि बळेंच कोणी करून दिली तरी तन्निवारणार्थ जरूर अशा उपायांचे अवलंबन करण्याची वांछा होत नाही, अशा आसन्नमरण राष्ट्रपुरुषाला राजकीय सुधारणेची जड खुराक पचणार कशी? आहारांतील पौष्टिक अंश ज्यांनी शोषून घ्यावयाचा, त्यांची वृत्ती ज्ञातिमत्सराने इतकी संकुचित झाली आहे, की मी आणि माझी सोवळी जात ही राषट्रपुरुषाची इंद्रियें आहेत, ह्याची जाणीव पार बुजून गेली आहे. मग जीवितास अवश्य असलेला सत्वांश शरीरास पोंचणार कोणाकडून? एकूण एक इंद्रियांस ज्याने सतत सांभाळून धरावयाचे, त्यांचे ज्ञानतंतु सतेज राखावयाचे तो मेंदुरुपी ब्राह्मण वर्ग सोवळेंओवळें, वेदोक्त पुराणोक्त, कर्मकांड ह्यांत गुटफटून स्वत्वसंरक्षणासदेखील नादान होऊन बसला आहे, अशा कुचकामी वर्गाकडून इतरांची उन्नति होणार कशी?

तर अशा प्रकारें कालवशात् हिंदुसमाजशरीरांत वेदोक्तधर्मबाह्य रुढीचें विजातीय द्रव्य सांचलेलें आहे, ते पहिल्यानें काढून टाकल्याखेरीज, समाज कार्यक्षम होणें शक्य नाही. निव्वळ एकतंत्री, त्यानंतर राजसत्ताक आणि आतां तर स्वर्गीय लोकसत्ताक, अशा राज्यपद्धती गोमंतकस्थांस लाभल्या. परंतु आदिलशाहींत जशी हिंदुसमाजाची स्थिती होती. तीत मोठासा फरक झालेला आहे. असे ह्मणता येणार नाही, तोंड बंद केलेला घट एखाद्या कूपांत, नदींत किंवा महासागरांत नेऊन बुडविला, तरी त्याच्यात पाण्याचा एक तरी बिंदु शिरणें शक्य आहे काय? असो. तर समाज कार्यक्षम झाल्याखेरीज बाह्यसृष्टींत कितीही फेरफार झाले, तरी समाजाचा काडीचाही फायदा होणे संभवनीय नाही. गेल्या शतकांत मागासलेली पण आज प्रमुखांत गणली जाणारी जपानसारखी राष्ट्रें आपल्या इतिहासाच्याद्वारें पुराणमताचा फाजील अभिमान बाळगून सुधारणेस पराङ्मुख होणाऱ्या लोकांस ह्या वरील तत्त्वांचा उपदेश करीत आहेत. सध्याच्या घडामोडींत टिकाव धरावयाचा असेल. तर हिंदुसमाजानें तसेंच आचरण केलें पाहिजे. पाश्चात्य किंवा नवें ह्मणून सगळें वाईट, असली कूपमंडूकवृत्ति शिथिल केली पाहिजे. वेदोक्तधर्मबाह्य अंधरुढींनी समाजात जी अव्यवस्था केली असेल, ती मोडून

समाज– वेदकाळी होता तसा, ज्ञातिभेद व तज्जन्य मत्सरविवर्जित– एकजीव केला पाहिजे. शरीरांत सगळे व्यवहार सुसूत्र झाले ह्मणजे शरीरपुष्टीकरिता ह्मणून निराळे उपचार करण्याची जरुरी नसते, तद्वत् सामाजिक सुधारणेच्याद्वारे सुधारणेप्रीत्यर्थ निराळी यातायात चालू करण्याची आवश्यकता राहणार नाही. आपल्या राष्ट्राचे खरे पुढारी, केवळ महर्षि, लोकछंदाची मातबरी न बाळगता हेच सत्य निर्भीडपणे जाहीर करीत आहेत तें सर्वांनी बिनतक्रार मान्य करून तद्नुसार आपलें आचरण ठेवलें पाहिजे. त्यायोगे आपल्या देशाची प्रगती खचित होईल.

*(बुधवार, दि. २० नोव्हेंबर, १९१२)*

# काय हा नेभळेपणा?

पोर्तुगीज मोनार्की जाऊन रिपब्लिक झालें, राजसत्ता जाऊन लोकसत्ता प्रस्थापित झाली, त्यावेळी खरोखरच आह्मां हिंदूस कितीतरी आनंद झाला होता. स्वकीय व परकीय प्रेक्षकांच्या नजरेस, इतर गोष्टींप्रमाणे ठळकपणें तोही यावा इतकें त्याचें स्वरूप व्यक्त झालें होतें. आणि त्यामुळें रिपब्लिक ह्मणजे हिंदूंना स्वराज्यच वाटत आहे की काय, अशी शंका पुष्कळांनी घेतली, रिपब्लिकच्या सर्वत्र प्रसिद्ध झालेल्या वर्णनांत हिंदूंचा तद्विषयक उल्हास याही एका मुद्द्यास बरेंच महत्त्वाचें स्थळ मिळें.

वास्तविक पाहतां रिपब्लिकची प्रस्थापना ही गोष्ट आनंदजनक खरीच पण ती कोणास, तर रिपब्लिकची खरीखुरी महती ओळखून त्यापासून आपले होऊ शकणारें योग्य हित करू जाणणारांस, लोकसत्ता असो, राजसत्ता असो, किंवा अप्रतिहत अशी बादशाही सत्ता असो, सर्वकाळी व सर्व स्थळीं, आपली एक ती एकच वृत्ती राखणारास, बादशाही सत्ता जाऊन राजसत्ता आली, किंवा राजसत्ता जाऊन लोकसत्ता आली, तर त्याबद्दल आनंद मानण्याचा अधिकार कोठून येतो? त्यांना स्वत:ला जर आपल्या निर्विकारित्वामुळें अशा स्थित्यंतरांपासून कोणताच फायदा होण्यासारखा

नसला, तर त्यांनी आनंद मानावा, उल्हास दाखवावा आणि उत्साह करावा तो कां? केवळ एक परिस्थिति जाऊन तिच्या जागी दुसरी आली (मग ती चांगली असो किंवा वाईट असो.) एवढ्याच करितां? तसें असलें तर फट् झालें की, नाचूं, उडूं लागणाऱ्या खेळ्यांच्या मेळांच्या उत्सवांत आणि आमच्या उत्सवांत फारसें अंतर आहे ते सुद्धा हे, की बिचारे खेळे चिरीमिरीच्या आशेनें नाचत उडत असतात आणि ही त्यांची आशा बहुतेकदा सफलही होत असते, परंतु आह्माला ही चिरिमिरीसुद्धा नसून आमचे उत्सव हे निवळ फुकटाची वारीच असतात.

केव्हांही झालें तरी, आपले कल्याण आपणच करून घेतलें पाहिजे, आपल्या स्वत:च्याच प्रयत्नांनी मात्र ते झालें तर होऊ शकेल, हे तत्त्व अगदी त्रिकालाबाधित सत्यमय असून ते कोणीही विसरता कामा नये. दुसरा कोणी तरी येऊन आपले कोटकल्याण करील अशी समजूत बाळगणें हा केवळ भ्रम होय. आणि त्याची भ्रामकता, स्वत:च्या व इतरांच्या वर्तमान व पूर्वकालीन अनुभवांच्या निरीक्षणांती कोणासही दिसून येण्यासारखी आहे. रिपब्लिकच्या आगमनानें अशा तऱ्हेनें आपले कोटकल्याण होईल अशी समजूत बाळगून, तीजमुळें जर हिंदु नागरिकांनी हा त्यावेळेचा आपला उत्साह प्रकट केला असेल, तर ती त्यांची फार मोठी चूक झाली असें ह्मटलें पाहिजे. रिपब्लिकच्या आगमनानें आनंद व उत्साह वाटण्यास खरोखरीच कारण होतें व आहे. पण ते वरील गोष्टीमुळे नसून त्यामुळें आह्माला आता स्वत:च्या प्रगतीचें प्रयत्न निर्वेधपणे करावयास जागा झाली आहे. एवढ्याच करता होतें व आहे. अशा स्थितींत या नूतन परिस्थितीचा फायदा घेऊन जर ते प्रयत्न आपण न करूं तर निवळ आत्मघातकी ठरू आणि आमचा उत्साह हा वर सांगितल्याप्रमाणे खेळ्यांच्या उत्साहाहूनही खालच्या दर्जाचा होऊन बसेल. पण जर आह्मी खरोखरी इष्ट दिशेनें वागून या परिस्थितीचा फायदा घेऊं, तर मात्र आह्मी आमचे खरें कर्तव्य बजावलें असें ह्मणण्यास जागा होईल. मनुष्यानें, केव्हांही झाले तर, कालानुसार वर्तन ठेवलें तरच या दारूण जीवनकलहांत टिकाव धरण्याची पात्रता त्याच्या अंगी येईल. या न्यायानें पाहतां, रिपब्लिकमधले नागरिक रिपब्लिकास लायक असलें किंवा

झालें तरच रिपब्लिकचें त्यांकडून चीज होईल आणि त्यांचे रिपब्लिककडून कल्याण होईल. उलटपक्षीं या दोनही आशा व्यर्थ होत.

वरील विचार निघण्याचे कारण, फोंडे महालांतील तूर्तची परिस्थिती व तेथील रहिवाशांचे तत्संबंधी दिसून आलेलें वर्तन हे होय. भारत पत्र मुख्यत: हिंदूच्या हिताच्या उद्देशानें जन्मास आलेलें आहे. गोमंतकांत हिंदूंच्या वस्तीचा प्रदेश ह्मटला ह्मणजे नवीन काबिजाद हा आहे. आणि या नवीन काबिजादीत बहुधा सर्व बाबतींत फोंडे महाल हा अग्रेसर आहे. यामुळे 'भारताची दृष्टि नवीन काबिजादीत व त्यांतल्या त्यांत विशेषेंकरून फोंडें महालाकडें पुन:पुन्हा वळावी हे साहजिक होय. काही काही बाबतींत फोंडें महालाने नवीन काबिजादीचें अग्रेसरत्व खरोखरींच घेतलेलें आहे. तसें व तें इतर बाबतींतही घेऊन खऱ्याखुऱ्या नागरिकतेचा (Civismo) कित्ताहि इतरांस फोंडें महालापासूनच मिळावा, अशी आमची मनापासूनची इच्छा आहे. पण या इच्छेनें प्रेरित होऊन जों जों आह्मी फोंडें महालाकडे वळतों, तों तों, आमची निराशाच होत जात आहे. सरकारी अधिकाऱ्यांपुढे लांगूलचालन, त्यांचे विषयी मनात अत्यंत भीती, आणि त्यांच्या तोंडून एक शब्द बाहेर पडला, की तद्नुसार वागण्याकडे वरील दोनही कारणांमुळें होणारी आत्यंतिक प्रवृत्ति, यांचीच चढती कमान आह्मांला तेथें दिसत आहे. आणि ही परिस्थिती जोपर्यंत टिकेल तोपर्यंत खऱ्या नागरिकत्वाचा उदय होण्याची आशा व्यर्थ होय. असें आह्मांस वाटतें.'

या वरील गोष्टीमुळें आणि नवीन काबिजादीत मुलकी खात्यांतील सर्व शाखांचे (आदामिनिस्त्रासांव, मुनिसिपालटी, कोमुनदादी, देवालयें इ.) अधिकार आद्मिनिस्त्रादोरांच्या एकाच व्यक्तींत एकवटत असल्यामुळे तराजूचा तोल बिघडून, अधिकाऱ्यांचे पारडे नेहमी खाली जावें आणि प्रसंगविशेषी त्यांच्याकडून या अप्रतिबद्धतेमुळें लोकमताची पर्वा न राहून प्रमाद घडावें, यांत काही फारसे आश्चर्य नाही. आश्चर्य ह्मटलें ह्मणजे त्यांस प्रतिकार न करणाऱ्या लोकांचेच होय.

विशेषत: सुशिक्षित ह्मणविणाऱ्यांनीच यांत पुढाकार घ्यावयाचा. पण सांगायला खेद वाटतो की, ते सुद्धा आपला समावेश वरील कोटींतच

करून घेतात. आणि त्यांतल्या त्यांत एखाद्या राजेंदीरसारख्या हुद्याचा अगर मुनिसिपालिटीच्या मेंबरासारख्या मानाचा तुकडा जर त्यांच्या तोंडावर पडेल, तर ते निव्वळ कुत्रीं बनून जातात. आणि मग वर्तमानपत्रांतून वगैरे काही मजकूर प्रसिद्ध झाल्यास त्यांचा निषेध करण्याकरिता काल्पनिक सभा भरवणें, आक्त रचणें, तारा पाठवणें, वरिष्ठ अधिकाऱ्यांपुढे तोंडपाठ केलेली भाषणें ह्मणून दाखवणें, वगैरे वगैरे कामांत आपल्या शिक्षणाचा विनियोग करून आपल्या अन्नदात्या अगर मानदात्या प्रभूंची यथाशक्ति सेवा बजावण्यातच त्यांना आपल्या जीविताची इतिकर्तव्यता वाटते!

असो तर अशी परिस्थिति असल्यानेच फोंडेच्या आद्‌मिनिस्त्रादोरांना श्रीशांतादुर्गादेवीच्या खजीन्यांतून बेकायदेशीरपणे, एक हजार रुपयांची भली मोठी रक्कम उकळतां येऊन तिचा विनियोग मनास येईल त्यां कार्याकडे करितां आला! या कामी त्यांस हरकत करणारा अगर त्याचा जाब घेणारा कोणीच मायेचा पूत निर्माण झाला नाही!! आणि कदाचित एखाद्याला हरकत घ्यावीशी वाटलीच तर इतरांकडून त्याला दाबण्यात आलें!!! हा सारा कशाचा खेळ? केवळ एका नेभळेपणाचा नव्हे काय? असा नेभळेपणा धरून कसें चालेल, आणि तो सोडण्याचें धैर्य ज्यांच्यांत नाही अशा राजश्रींनी देवालयांच्या अधिकारावर आरुढ होऊन असलीं अपेशें पदरात घेण्याची आकांक्षा तरी का धरावी? त्यांत काही प्रत्यक्ष फायदा तर नाहींना? मग जेथें असा फायदा नाही आणि केवळ दुष्कीर्ती मात्र होण्याचा संभव, अशा अधिकारांवर, केवळ कलावंतिणींवर वर्चस्व मिरविण्याकरतां (बाकी तें सुद्धां थोडेंच मिळते, यांच्या उड्या कां पडाव्या? केवळ समाजाच्या दुर्दैवाचें हें खेळ आहेत! आणि ते खेळणारे हरीचें लाल जोंवर हयांत आहेत तोंवर समाजाला चांगले दिवस येतील अशी आशा करणें व्यर्थ होय.)

*(बुधवार, दि. ४ डिसेंबर, १९१२)*

# छडा लावलाच पाहिजे!

अतिशय काटकसरीनें व स्पृहणीय स्वार्थत्यागांनी आपल्या पूर्वजांनी धर्मशिक्षणप्रसारार्थ जी संपत्ती जमविली होती, ती, ख्रिस्ति धर्मप्रसार करणाऱ्या मंडळीला सरकारी बागनेटांचा जोर मिळाल्याबरोबर एका क्षणांत आह्माला अंतरली, ही गोष्ट गोमंतकस्थ हिंदूच्या नजरेपुढून कालत्रयी दूर होणें शक्य नाही. वास्तविक पाहिले तर असा कडू अनुभव आलेल्या हिंदूंनी पुन: देवस्थानाच्या उर्जेकरितां असो, किंवा अन्य तऱ्हेनें धर्मशिक्षणप्रसार करण्याकरिता असो, मूळच्या कफल्लक स्थितींतून सार्वजनिक स्वरूपाचा धनसंचय करण्याच्या भानगडीत मूळींच पडूं नये. परंतु शत्रूंनी कितीही खेपा मध लुटला तरी पुनरेव मध तयार करण्यास मधमाशा जशा आपल्या हजर असावयाच्याच, तद्वत 'इंक्विजिशन' च्या वेळी कडाक्यांत धर्मसमीक्षण सभेनें व तत्कालिन सरकारी अधिकाऱ्यांनी हिंदू देवालयांची संपत्ति फस्त केल्याची जाणीव असतांनाही पुन: हिंदूनी देवस्थानांत संपत्ती जमविण्यास कमी केलें नाही. 'इक्विजिशन' च्या वेळी आमच्या देवालयांची संपत्ती जशी आह्मांस अंतरली, तशीच ती माजी राजसत्तेच्या कारकिर्दीत अंतरण्याचें प्रसंग आले होतें, परंतु त्यांतून अनायासें निभावून देवालयांतील संपत्ती सुरक्षित नसली, तरी अल्पस्वरुप हानीनें पार पडली खरी. मि. माशाद हे गव्हर्नर जनरल असतांना देवालयांच्या संपत्तीवर गदा येण्याचा रंग दिसत होता. तथापि तोही प्रसंग समूळ टळला नसला तरी लांबणीवर पडला. देवालयांची एकंदर संपत्ती नक्त नाण्यांच्या रूपांत सरकारी पेढीवर अनामत ठेवून, शेंकडा आठ आणे प्रमाणें मिळेल त्या व्याजांतून देवालयांचा खर्च चालावा अशा अर्थाची जी योजना पास होण्याच्या रंगात होती, तीस कायद्याचें स्वरून न मिळता ती मूळच्या स्थितीतच राहिली. अठराशें पंच्याण्णव साली झोलेले बंड मोडण्यात सरकारास अतोनात खर्च झाला होता, व तशा घालमेलीच्या स्थितींत देवालयांच्या संपत्तीवर सरकारची नजर गेली होती. आणि आजचा प्रसंगही तसाच आहे, हे डोळ्याआड करतां येण्यासारखें नाही.

राजकारणापासून सर्वथा अलिप्त असलेल्या संस्थांकडून सक्तीच्या

खुशीनें हजारो रुपये वसूल करणें, हे सध्याच्या आपत्प्रसंगास साजेसें असलें तरी, लोकसत्ताक पद्धतीच्या तत्त्वास अनुरुप झालें असें सहसा ह्मणतां यावयाचें नाही. ओढघस्तीच्या स्थितीत आलेल्या सरकारांस यथाशक्ति सहाय करणें हे आपलें पोर्तुगीज नागरिक या नात्यानें कर्तव्य आहे. सरकार व नागरिक ह्यांच्यांत दुजाभाव बाळगूं नयें हे सगळें खरें. एवढेंच नव्हें तर सक्तीच्या खुषीनें जितका पैसा देवालयांतून निघाला त्याहून ज्यास्त पैसा योग्य मार्ग धरल्यास घेतां आला असतां असें आह्मांस वाटते. तरी पण ज्या पद्धतीने तो काढला गेला, ती सरकारी दादीची पद्धत अत्यंत तिरस्करणीय आहे, असें ह्मटल्यावाचून आमच्याने राहवत नाही.

देवालयांच्या तिजोऱ्यांतून पैसा निघावा ह्मणून फोंडे महालाच्या आद्मिनिस्त्रादोरांनी जें कायद्याचें कलम पुढें केलें आहे त्याची आठवण... त्या वेळीं तिचेंही पण कौतुक करावेसे वाटतें. राजकारणांत प्रत्यक्षांत भाग घेणें हें देवालयांचे कर्तव्य नव्हे, अर्थात पोलिस शिबंदीच्या खर्चाकरिता ह्मणून देवालयांच्या तिजोऱ्यांवर सरकारी अमलदारांची नजर जाण्याचें काही कारण नाही. तशांत खर्चाच्या पैशांत आलेल्या सरकारांत कोणीकडून झाली तरी पैशाची मदत होणे जरूर, असें त्यांस वाटत असेल, त्यांनी ती योग्य मार्गाने मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

प्रस्तुत प्रकरणासंबंधाने सांगावयाचे ह्मणजे देवालयांच्या तिजोऱ्यांत जमलेल्या संपत्तीतून चालू खर्चाकरिता थोडा बहूत पैसा मिळावा, अशी इच्छा होती, तर देवालयांच्या महाजन मंडळाची बैठक भरवून त्यांजकडून तो घेतां आला नसता, असें नाही. किंबहुना मिळाला त्याहून कितीतरी पटीनें जास्त पैसा निघाला असता, आणि तोही आपखुशीनें कां की सरकारांस ह्या प्रसंगी पैशाची मदत हवी आहे, हे न समजण्याइतका अशिक्षित महाजन कोणीही नाही अशी आमची समजून आहे.

पण हा सरळ मार्ग सोडून, कायद्याच्या कलमाचा बागुलबोवा दाखवून, महाजन मंडळींस समजून न देतां तिजोऱ्यांतून जो पैसा काढण्यांत आला, त्या बेकायदेशीर वर्तनाबद्दल निषेध प्रगट करण्यास आह्मांस कोणतीच शंका वाटत नाही. अशा वाममार्गाने पैशाची जमावजमव करण्याची परवानगी

वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून उपरोक्त अंमलदारांस मिळाली असावी अशी शंका कोणीही घेणार नाही.

तात्पर्य, हा जो प्रकार झाला, तो अत्यंत बेकायदेशीर असून शिवाय प्रजेच्या योग्य हक्काच्या व मालमत्तेच्या संरक्षणसंबंधाने सरकारविषयी लोकांत अविश्वास उत्पन्न करणारा आहे, हे निर्विवाद होय. आणि अशी स्थिति असणें सरकार व प्रजा या दोघांनाही अनिष्ट असल्याने तिचा पुरा छडा लावणें हें प्रत्येक नागरिकांचे आणि त्यांतल्या त्यांत देवालयांच्या व्यवस्थेशी निकट संबंध असणाऱ्या महाजन मंडळींचे कर्तव्य होय.

निदान ''ह्मातारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावतो.'' या ह्मणीप्रमाणें या उपर तरी असा अधिकारातिक्रम होणें इष्ट नाही, या दृष्टीनेंही पाहतां महाजन मंडळींने या बाबतींत प्रयत्न केलाच पाहिजे. झुरळांनी (जल्ले) हिरें खाण्याचें दिवस पूर्वी एकदा येऊन गेले. त्यांचीच पुनरावृत्ति या बाबतीत स्वस्थ बसल्यानें, होऊं दिल्यासारखें होईल आणि तसें तें होऊं देणें ह्मणजे पुढें जाण्याऐवजी खेकड्याप्रमाणें मागें जाणेंच होईल.

दुसरी गोष्ट अशी, की जशी सध्याची राजव्यवस्था पूर्णपणे लोकसत्ताक स्वरूपाची आहे तशीच लोकसत्ताक स्वरूपाची आज आमच्यात असणारी एकच संस्था ह्मटली ह्मणजे महाजन मंडळ ही होय. या मंडळानें आपलें कर्तव्य यथायोग्य रीतीनें बजावणें ह्मणजे लोकसत्ताक व्यवस्थेस आपली पात्रता दाखविणें होय. असें असता या लहानशा लोकसत्ताकांत जर आपली अपात्रता प्रकट केली तर मोठ्या लोकसत्ताका (Republica) पासून मिळूं शकणाऱ्या फायद्यांची आशाच करावयास नको. ही गोष्ट लक्षांत घेतली असतां देखील वरील प्रकरणाचा पुरता छडा लावणें किती अगत्याचें व महत्त्वाचें आहे हें कळून येईल.

तरी श्री शांतादुर्गा, श्री मंगेश वगैरे संस्थानांच्या महाजन मंडळाने, ही गोष्ट मनावर घेऊन वरिष्ठ सरकारापर्यंत त्याची दाद लावून घ्यावी आणि संस्थानच्या तिजोरीतून बेकायदेशीरपणें निघालेली ही रक्कम काढण्याची जबाबदारी ज्यांच्यावर येत असेल त्यांपासून तिला कायदेशीर जाब घेण्याची

तजवीज करावी. नाही तर वरिष्ठांची मर्जी राखण्यासाठी स्वत:च्या पदरची पैही खर्च न करता परस्पर हलवायाच्या दुकानावर ब्रह्मार्पण सोडून लोकांचे हक्क तुडविण्याची या राजेश्रींची, खोड जावयाची नाही.

*(गुरुवार, दि. ११ डिसेंबर १९१२)*

# राष्ट्रीयत्वाची कल्पना व तिच्यांतील तारतम्यभाव

मागील अंकांत, आजच्या आमच्या एकराष्ट्रीयत्वाच्या वृद्धींशी (निदान गोमंतकांत तरी) इंग्रजी भाषेचा काही संबंध नसल्याचें आह्मी दाखविलें आहेच, आतां पोंर्तुगजीचा असा संबंध आहे की काय याचा विचार या खेपेस करावयाचा आहे.

पण त्यापूर्वी, या विषयाचा योग्य बोध वाचकांना व्हावा ह्मणून खुद्द एकराष्ट्रीयत्वाच्या अगर राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेच्या स्वरुपाविषयीं दोन शब्द सांगणें इष्ट दिसतें.

मनाच्या अगदी बाल्यावस्थेंत मनुष्याच्यांत स्वत: विषयीचा आपलेपणा (स्वत: पुरतें पाहणें) तेवढा असतो. व जसजसें त्याचें मन विकसित होत जातें, तसतसें आपलें दांपत्य (बायकामुलें), कुटुंब (भाऊबंद), समाज (जातगोत), राष्ट्र (जनपद), जग (एकंदर मानव समूह) व विश्व (सर्व स्थिरचरात्मक सृष्टि) या क्रमानें त्याचा विस्तार होत जातो. या एकंदर विस्तारांच्या मुळाशीं आपलेपणा उर्फ अहं-कार हा असतो व ह्मणूनच अहंकार हा सर्व संसृतीचें मूळ आहे असें आमच्या वेदांतादि तत्त्वग्रंथांतून सांगितलेंलें आहे.

आतां मानसिक नीच कोटींतून उच्च कोटीस जाणाऱ्यांकडून या अहं-काराच्या बाबतींत दोन मार्ग स्वीकारले जातात. पैकीं पहिला, अहंकाराला मारून टाकणें-आपपरभाव सोडून देणे, आपलेपणाच विसरुन जाणे, हा असून

त्याला निवृत्तिमार्ग असें नांव आहे. व दुसरा, या अहंकाराचाच विस्तार करीत जाणे सर्वात आत्मत्व आपलेपणा पाहणें सर्व ह्मणजेंच आपण असें समजणें हा असून त्याला प्रवृत्तिमार्ग ह्मणतात.

अत्यंत उच्च मानसिक अवस्थेंत हे दोन्ही मार्ग सारखेच फलदायी होत असतात. कारण, आपलेपणाची मर्यादा अतिविस्तृत (स्थिरचरात्मक सृष्टीपर्यंत) झाली, ह्मणजे या मर्यादेव्यतिरिक्त परकेपणा मानायला जागाच नसणार, अर्थात, आपलेपणाचा अभावच तो झाला. आणि प्रवृत्ति व निवृत्ति या दोन्ही तेथें एकत्व पावून अद्वैतवृत्ति प्रकट झाली. यामुळें उष्णतेचें समीकरण (सर्वत्र सारखी पसरुन देणें) ह्मणजेच उष्णतेचा नाश (संवदेना न देणें) ही गोष्ट जशी पदार्थविज्ञानशास्त्रांत सांगितल्याप्रमाणे व्यवहारांत आपल्या प्रत्ययास येते, तद्वत आपलेपणाचा अतिविस्तार ह्मणजेच आपलेपणाचा नाश हें वरील बाबतींतही दिसून येण्यासारखें आहे.

परंतु त्रिकोणातील भिन्न दिशांहून येणाऱ्या रेषा त्याच्या केंद्रांत शेवटच्या बिंदूत एकत्व पावत असल्या, तथापि त्या बिंदूच्या अलीकडे त्याचें एकत्व जसें संभवत नाही, तें झालें तर त्रिकोणाचें त्रिकोणत्व जसें नष्ट होईल, त्याप्रमाणे प्रवृत्ति व निवृत्ति या प्रस्तुत विषयांतील दोन रेषा वरील अद्वैतवृत्तीच्या शेवटच्या बिंदूंत जरी एकत्व पावत असल्या, तरी ह्या बिंदूच्या अलीकडच्या (मानुषता, राष्ट्रीयत्व, देशाभिमान, धर्माभिमान, ज्ञात्याभिमान, इ. इ.).... मर्यादांत त्यांचे एकत्व संभवत नाही, तें झालेंच तर आत्मनाशास कारण होईल.

निवृत्ति (आपलेपणाचा नाश) व प्रवृत्ति (आपलेपणाचा विस्तार) या दोहोंपैकी पहिला मार्ग हा ब्रह्मस्वरूपांत विलीन होणाऱ्या व जग मिथ्या समजणाऱ्या परमार्थसाधकांसच विहित असा असतो. कारण, बोलून चालून मिथ्या अशा या जगांत त्यांना काहीही करावयाचें नसते, ह्मणून जगाच्या दृष्टींनें त्यांचें अस्तित्व अगर नास्तित्व ही दोन्ही सारखीच असतात. पण ज्यांना जग मिथ्या मानून चालवायांचे नाही, आणि जगात आपल्याला काही तरी करावयाचें ह्मणून आहे असें ज्यांना वाटतें, त्यांनी प्रवृत्तिमार्गांसच अनुसरलें पाहिजे. व विशिष्ट मर्यादेपर्यंत आपलेपणा पत्करुन तद्व्यतिरिक्त प्रदेश परका धरुन चाललें पाहिजे.

उदाहरणार्थ, हिंदुस्थानचे राष्ट्रीयत्वच घेऊं. हिंदुस्थान हें आपलें राष्ट्र व त्या राष्ट्रांतील सर्व नागरिक आपलें भाईबंद समजणें त्यांच्याशी आपलेपणा पावणे या गोष्टींचा या राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेंत समावेश होतो, हिंदुस्थानचे नागरिक हे आपले भाईबंद मानायला अर्थातच, हिंदुस्थानाव्यतिरिक्त लोक हे आपले भाईबंद  नाहीत व त्यांचा देश तो आपला नव्हें हें मानणें जरुरीचें आहे व त्याशिवाय हिंदवासियांचे राष्ट्रीयत्व संभवत नाही हे उघड होय.

आतां आपलेपणा मानावयाचा तर तो होईल तितक्या विस्तृत प्रमाणावर मानावयाचा, पण तें न करतां विशिष्ट देश अगर लोकसमाज आपला मानून इतरांना परकें समजणें – आपलेणाचा विस्तार मुद्दाम मर्यादित करणें – ही कल्पना नि:पक्षपाती मनुष्याच्या दृष्टीला सकृद्दर्शनीं अप्रिय वाटण्यासारखीं अशी आहे. असें आहे तर मग ती ग्राह्य मानण्यांत का येतें, असा प्रश्न वाचकांच्या मनांत सहज उत्पन्न होईल.

याचें उत्तर 'विशिष्ट हेतु साधण्यांकरिता' असें आहे. भारताच्या ८ व्या अंकांतील अग्रलेखांत आह्मी सांगितल्याप्रमाणे मनुष्याच्या सुखमय आयुष्क्रमास ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत, त्या त्या सगळ्या त्याला एकल्याला, साध्य होण्यासारख्या नसल्याने, त्या साधल्यानें त्याच्याप्रमाणेंच ज्या इतर, अनेकांचे एकसमयावच्छेदेंकरुन हित होण्याचा संभव आहे, त्या सर्वांच्या समवायानें– एकीकरणानें– त्या त्याला साधावयाच्या असतात. ह्मणून या हेतूकरितां आपल्याशीं समान परिस्थिति असणाऱ्या सर्वांचे मिळून एक क्षेत्र बनवणें व त्यास अनुसरुन कार्यक्रमाची मर्यादा आखणें त्याला इष्ट– अपरिहार्य असते.

या गोष्टीस अनुसरुन अर्थात्‌च, ज्यांची ज्यांची ज्या ज्या बाबतींत परिस्थिति समान असेल, त्या त्या लोकांचें त्या त्या बाबतीपुरतें क्षेत्र मर्यादित होऊन तदनुसार राजकीय व औद्योगिक बाबतींत राष्ट्र व देश, सामाजिक बाबतींत वर्ग व ज्ञाति, कौटुंबिक बाबतींत कुटुंब व कुल, इ. क्षेत्रें निर्माण होत असतात व अनुक्रमें राष्ट्राभिमान अगर देशाभिमान, धर्माभिमान अगर ज्ञात्याभिमान, कुलाभिमान अगर स्वाभिमान, इ. कल्पनांच्या प्रेरणेच्या जोरावर त्या त्या क्षेत्रांतील कार्ये पार पाडण्यांत येतात. सुधारणा ही सर्व

बाजूंनी झाली पाहिजें हें जसे खरें, तसें या बाजूंपैकी प्रत्येकींचें क्षेत्र वेगवेगळें असल्यानें त्या त्या बाजूपुरतें प्रयत्न त्या त्या क्षेत्रातंच झाले पाहिजेत तरच ते सफल होतील, एरवी होणार नाहीत हेंही खरें आहे.

राष्ट्रीयत्वाची ही वरील मीमांसा असून आमच्यांतील सुशिक्षितांस कांहीशी नवीन भासण्याचा संभव आहे. पण याचें कारण हेंच, की आजवर युरोपिन कल्पनांस अनुसरुन राष्ट्रीयत्वाचा, विचार आपण करीत आलो. आणि युरोपांत इकडच्याप्रमाणें राष्ट्रीयत्वाच्या प्रत्येक बंधनाचे (भाषा, कुलपरंपरा इ.) क्षेत्र वेगळें असलें तरी तें फारसें महत्त्वाचें नसल्याने- त्या एकाच क्षेत्रांत सर्व बाजूंनी काम करणें त्यांना शक्य होत आहे. आणि या बंधनांत सर्वांत महत्त्वाचे जें राजकीय बंधन, त्याचाच केवळ वाचक असा शब्द जो राष्ट्रीयत्व (nacionalismo) त्यांच्या योगानें त्या सगळ्या बंधनांचा निर्देश होत आहे. हा शब्द जशाचा तसाच इकडे वापरल्यानें त्याच्या योगानें राजकीय बंधनाचाच तेवढा निर्देश होऊन तज्जन्य भ्रममूलक कल्पनांस थारा मिळत असतो. वास्तविक त्या ऐवजी खरा शब्द ह्मटला ह्मणजे स्वत्व हाच होय.

आतां या स्वत्वाची जीं अनेक बंधने, त्यांचा त्यांचा विकास व सुधारणा करण्याकरिता त्या त्या बंधनांस अनुसरुन वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य करणें हें जरी अवश्य असलें, तरीं, ज्या अर्थी प्रत्येक बंधनाचा एकमेकांशी, सर्वांचा राष्ट्रांशी व राष्ट्राचा जगाशीं हितसंबंध जखडला गेलेला असतो, त्या अर्थी एका क्षेत्रांतील कार्याचा दुसऱ्या क्षेत्रांतील कार्याशीं विरोध असतां कामा नये ही एकच गोष्ट या बाबतींत लक्ष्यांत ठेवलीं पाहिजे. बाकी ती सुद्धां फारशी महत्त्वाची नाही आहे. कारण, बऱ्या धोरणावर चालविलेली कार्ये अशीं परस्पराविरुद्ध कधींही होत नसतात.

यावर कदाचित् असा प्रश्न होईल की, सर्वांत महत्त्वांचे असें जर राजकीय बंधन, तर त्याचें क्षेत्र जें राष्ट्र, त्याच्या मर्यादांशीच बाकीच्या बंधनांच्या (धर्म, भाषा, समाज इ.) मर्यादा आणून कां भिडवूं नयेत? या मर्यादांच्या आंत बाकीच्या बंधनांची जी निरनिराळी क्षेत्रें आहेत, त्यातील सर्वसाधारण भाग एकत्र करून व तोच भावी कालांत राष्ट्राच्या त्या त्या स्वरूपाच्या सर्वसंमत बंधनादाखल होईल असें मानून त्याचाच पुरस्कार कां करू नये?

याचें उत्तर एवढेंच, कीं असे झाल्यास त्या योगानें आजचा आपलेपणा–स्वत्व–सुटेल, त्याची परंपरा नष्ट होईल व उलटपक्षीं राष्ट्रीयत्वाच्या कामींही असमर्थता येऊन (कारण, स्वत्वाच्या विकासाशिवाय राष्ट्रीयत्वाचा उदय होऊं शकत नाही) भविष्यकाल अनिश्चत होईल. उदाहरणार्थ, सर्व हिंदुस्थानांत भावी काळी एक भाषा होणें इष्ट आहे–नव्हे होईलच. आणि तो (राष्ट्रभाषेचा) मान हिंदी भाषेस मिळेल ही गोष्ट जरी आज सर्वसंमत असली, तरी तीकरितां जर आज महाराष्ट्रीयांनी आपली मराठी भाषा अराष्ट्रीय मानून ती विकसित – उन्नत करण्याचें सोडून दिलें, व हिंदीस कवटाळलें, तर हिंदीचा विकास (स्वत:च्या परकेपणामुळें) त्यांच्याने होणार नाहीच, शिवाय मराठीही अवनतावस्थेस पोंचून भाषा व समाज परस्परावलंबी आहेत हें लक्ष्यात आणतां तिचा तोच परिणाम महाराष्ट्रजनपदांवरही होईल. हा आत्मनाश नव्हे काय?

असो, तर एवढ्या विवेचनावरून वाचकांच्या सहज लक्ष्यांत येईल कीं, सर्वांत महत्त्वाचें असें जें राजकीय बंधन, त्याचा विकास करून राष्ट्रीयत्व साधण्याच्या कामीं आह्मां गोमंतकस्थांना त्या बंधनाशीं संबद्ध असणारी जी पोर्तुगीज भाषा, तिचे अवलंबन हें अत्यंत आवश्यक असें आहे. बाकी आजची एकंदर जागा वरील तात्विक विवेचनांत खर्च झाल्यानें याविषयीं व्यावहारिक दृष्ट्या जो विशेष विचार करावयाचा, तो दुसऱ्या खेपेस ठेवणें भाग आहे.

*(बुधवार, दि. १६ एप्रिल १९१३)*

# पाश्चात्य राजकर्त्यांत चांगले कोण?

पाश्चात्य लोकांनीं हिंदुस्थानचीं साम्राज्यसूत्रें बळकावण्यास पुष्कळ प्रयत्न केलें, परंतु हिंदी राज्यलक्ष्मीनें इंग्रज लोकांच्या आंगचे विशिष्ट गुण पाहून अखेरीस त्यांच्याच गळ्यांत माळ घातली, ही गोष्ट हिंदुस्थानच्या चिरकल्याणाच्या दृष्टीनें फार चांगली झाली, असें जुन्या पिढींतले विचारी

माणसांचें मत होतें, आणखी सध्याही जीं काहीं जबाबदार व अनुभववृद्ध माणसें आपल्यांत आहेत, त्यांनादेखील ही गोष्ट पूर्णपणें मान्य आहे. हिंदुसमाजांत माजलेली अव्यवस्था व त्यामुळें या राष्ट्रास प्राप्त झालेलें अध:स्थान व युरोपियन लोकांपैकी आंग्ल लोकांच्या आंगचा धूर्तपणा, देशकालवर्तमान ओळखण्याचें चातुर्य, धर्मोदाय इत्यादि गुणांमुळें त्याची झालेली चलती, ह्यांची वजाबाकी केली तर इंग्रजांच्याच बाजूकडे मनाचा ओढा झाल्याखेरीज राहत नाही. 'सत्यमेव जयते' हा सिद्धांत अबाधित मानावयाचा असेल, तर देखील इंग्रजांसच अग्रपूजेचा मान दिला पाहिजे. कां की, हिंदी साम्राज्य लक्ष्मीच्या प्राप्तीकरिता गेल्या दोन शतकांत जें आटोकाट प्रयत्न निरनिराळ्या लोकांकडून झाले, व घरची लक्ष्मी घरांतच स्थिर व्हावी, एतदर्थ हिंदुमुसलमान लोकांनी जे भगीरथप्रयत्न केले, ते सगळें निष्फल होऊन एकटें इंग्रजच ज्या पक्षीं विजयी झाले, त्या पक्षीं सत्यधर्मदृष्टीनें त्यांचीच किंमत इतरांहून जास्त असली पाहिजे हे उघड आहे. आणि युरोपांतील इतर राष्ट्रें व इंग्रज ह्यांच्यांत तुलनात्मक दृष्टीनें पाहिले ह्मणजे हीं गोष्ट स्पष्टपणें प्रत्ययास आल्याखेरीज राहत नाही.

पाश्चात्य राष्ट्रांत लोकसत्ताक राज्यपद्धतीची ध्वजा पहिल्याने उभारणारे फ्रान्स राष्ट्र इंग्रजांच्या मानानें फार उदार असेल, असें आपल्यातील बऱ्याच जणास वाटत असतें. साक्सन वगैरे लोकांपेक्षा लाटीन वंशाचे लोक सदय असतात, असा सामान्य समज आहे. आणि त्यास महत्त्व देऊन बोलावयाचे झालें, तर फ्रेंच लोक हिंदुस्थानचे प्रभू झाले असते, तर हिंदुस्थानास स्वातंत्र्यसुख लवकर लाभले असतें असें कबूल करणें भाग आहे. तरी पण आपण इतकं विसरतां कामा नये, कीं कोणाच्या अंगी काही गुण असले, तर तितकेच किंवा त्याहूनही अधिक दोष असूं शकतील. फ्रेंच राष्ट्राचें विशेष दोष कोणते, ह्याची यादी येथे उतरून घेण्याच्या भानगडींत न पडलो, तरी मिजासखोरपणा हा एकच परंतु महान अनर्थकारक दुर्गुण दृष्टीआड करितां येत नाही. ते कसेंही असलें, तरी उदारचरित ह्मटलेले फ्रेंच लोक आशियादिकांशी संबंध झाल्यावर देखील उदारवृत्ति राहिले असते कीं काय, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. लोकसत्ताक पद्धतीचें अधिष्ठान

ह्मटलेल्या स्वतंत्र फ्रांसचा स्पर्श झाल्याबरोबर आपल्या पाठीमागचा इंग्लिश पोलिसचा ससेमिरा चुकेल अशा बळकट आशेवर ब्यरिष्टर विनायक दामोदर सावरकरांनी फ्रेंच बंदरात बोट आल्याबरोबर अत्यंत परिश्रमाने गलबतावरुन पळ काढून फ्रान्सच्या स्वतंत्र भूमीचा आश्रय केला. परंतु फ्रान्साची उदारवृत्ति त्या प्रसंगी कोठें दिसली नाही. तसेंच फ्रेंच मुलखाचा आश्रय केल्यावर इंग्लिश पोलिसची भीति बाळगण्याचे कारण नाही अशा आशेनें चंद्रनगरादि फ्रेंच्यांच्या मुलखांत आश्रयास गेलेल्या बंगाली लोकांस गेल्या दोन वर्षामागील धामधुमींत कितपत स्वास्थ लाभलें हें वाचक विसरलेले नसतील. सारांश फ्रेंच लोक उदारवृत्तीचे आहेत असें गृहीत धरलें, तरी ती त्यांची वृत्ति सदैव अबाधित राहते असें मात्र ह्मणतां येणार नाही. अंधधर्मश्रद्धेनें मानव जातीस कलंकित करणारा धर्मावेश जेथून उदय पावला तो क्वाथोलिक धर्मगुरुंचा व्हांतिकन राजवाडा अजूनदेखील इतालींच्या राज्यकारभारावर वजन पाडींत असतो, स्पेन लोकांच्या स्वभावांतील गोम इतकी भेसूर रीतीनें रेखाटलेली आहे, की त्यांचे सान्निध्य त्यांच्याखेरीज इतरांस सुखावह होईल, असें वाटत नाही. पोर्तुगीज राष्ट्राचा अंधधर्माभिमान व त्या विकारास वश झाल्यामुळें त्याच्या हातून झालेले अनाचार लक्षांत घेतले तर पोर्तुगीज लोकांविषयी हिंदी लोकांच्या मनांत आदरबुद्धि नसण्याचीं जीं कारणें आहेत, ती अवास्तव आहेत, असें ह्मणतां येत नाही. अंधधर्माभिमानास वश झाल्यामुळें जेथील राज्यकर्ते प्रजेवर जुलूम करतात त्या राज्याला फिरंगाण ह्मणण्याची वहिवाट आहे. तर अशा प्रकारची राज्यव्यवस्था हिंदुस्थानास हानिकारकच झाली असती. आतां ती जुलुमी राज्यपद्धति नामशेष झाली आहे हें खरें, तरी फार जुनाट राष्ट्रीय दुर्गुण एकदम बदलल्याचीं उदाहरणें फारच थोडीं आहेत. पाठशाळेतील मराठी प्रोफेंसरच्या खुर्चीकरितां प्रस्तुत कायद्यांची जी पायमल्ली होत आहे, ती लक्षांत घेतली तर वरींल विधानाचा खरेपणा प्रत्ययास येण्यास उशीर लागणार नाही. असो. तर अनेक धर्मपंथ आणि असंख्यात जाती ह्यांनी गजबजलेल्या हिंदुस्थानच्या प्रकृतीत फिरंगी अंमल हिंदी लोकांस सुखावह झाला असता असें ह्मणतां येत नाही. इंग्रजांच्या स्वभावांत धूर्तपणा विशेष असतो. रोष ह्मणजे पाण्याच्या फेंसाहून कमी योग्यतेंचा. त्याची पर्वा ती कसली? असली

बेपर्वाइची भाषा बोलण्यांत येत असे, त्याचवेळीं हिंदी लोकांच्या आकांक्षा सफल करण्याचा बेत गुपचुप चालला होता, आणि पुढें खरोखरीच कायदे कौन्सिलची वाढ व फाळणींत सुधारणा करून लोकाराधनतत्परता दाखविण्यात आली. लोकसत्ताक राज्यपद्धतींत राजकीय कैद्यांना अमानुषरीतीनें वागवीत असल्याची ओरड युरोपांतील प्रमुख पत्रें आज करीत आहेत, तशी ओरड लाला लजपतराय बंदीत होते, त्यावेंळी हिंदी पत्रकारांनी केलीं नव्हती. चार शतकांहून अधिक काळ पोर्तुगीज सरकारच्या अंमलाखाली असतांही गोमांतकस्थ जनता स्वराज्यास लायक होत नाही, आणि खालसा झाल्यास पुरे एक शतकही झालें नाही अशा प्रांतांतील लोक प्रधानाच्या मांडीस मांडी ठोकून बसत आहेत, ह्यावरून तात्पर्य काय घ्यावयाचें? इंग्रजांच्या दृष्टीनें हिंदी राष्ट्रास विघातक असणारीं राजकीय चवळवळ तेवढी वजा केली तर इंग्रजी अमलांत पुष्कळ गोष्टी करण्यास प्रत्यवाय नसतो. आपल्या प्रांतीं तशीच स्थिति आहे, असें प्रामाणिकपणें ह्मणता येईल काय? पोर्तुगीज भाषेचें महत्त्व वाढविण्याच्या दृष्टीने इतर भाषांच्या शिक्षणप्रसाराच्या गळ्यांस नख लावण्याच्या पातकांचे समर्थन कोण करील तो करो. मराठी वगैरे भाषांच्या तुटपुंज्या शिक्षणानें राष्ट्राची जेवढीं हानी होईल असें दुःस्वप्न पडलें, त्याच्या किती तरी पटीनें भयंकर नुकसान आज दुराचारी वेश्या करीत आहेत. आणि त्यामुळें गोवा प्रांताचें नांव बद्दू झालेलें आहे! ह्या बाबतीत सुधारणा करून समाजाचें व परंपरेने नीतिमत्तेचें उद्दिष्ट ठरविलेल्या लोकसत्ताक पद्धतींचे शील सुधाऱ्णयाची जरूरी अधिकारीवर्गास वाटू नयें हें आश्चर्य नव्हें काय? आपल्याकडे रिपब्लिक राज्यपद्धती विजयी होण्यापूर्वीच इंग्रजी अमलांत दुराचारी लोकांच्या वर्तनास आळा घालणारे कायदे अस्तित्वांत आले होते. असो. असे लोकानुरंजनाचें अनेक प्रकार लक्षांत घेतले, तर इंग्रजाखेरीज इतर प्राश्चात्य लोकांची राज्यपद्धति पौर्वात्य लोकांस मनापासून आवडणारीं नाही असेंच मोठ्या कष्टानें ह्मणावें लागेल. आता असें ह्मणणें ही गोष्ट स्वाभिमानाची नव्हे, हें आह्मांस कबूल आहे, तथापि सत्यास स्मरुन बोलावयाचे झालें, तर कोणालाही असेंच सांगावें लागेल. हिंदुस्थानांस स्वराज्य असते, तर लोकांस अतोनात सुख लाभलें असतें हे खरे, तथापि

त्या प्रश्नाचा विचार आज कर्तव्य नसल्यामुळे ह्या बाजूचा उल्लेख येथे न आला तर त्यांत आश्चर्य नाही.

*(बुधवार, दि. ४ जून १९१३)*

# ही विचारभ्रष्टता नव्हें, तर काय?

''पोर्तुगालांत प्रस्तुत जी धामधूम चालू आहे, ती राजपक्षीय लोकांच्या चिथावणीनें उद्भवली नसून राजकीय प्रकरणांत हुतुतु घालणाऱ्या पुढाऱ्यांच्या विचार भ्रष्टतेपासून उद्भवली आहे. आणि तीच विचारभ्रष्टता आमचें राज्य आह्मांस मिळवून देईल, असा पूर्ण भरंवसा आहे.'' अशा आशयाचे उद्गार पोर्तुगालचे माजी राजे दों मानुएल ह्यांनी एका वृत्तपत्राच्या बातमीदाराशीं मागें काढलें होते. लोकांस सुराज्यसुखाचा लाभ व्हावा, एतदर्थ ज्यांनी आटोकाट प्रयत्नानें लोकसत्ताक पद्धती अमलांत आणली, ते पुढारी, रिपब्लिक स्थान झाल्यास पुरीं तीन वर्षेही झाली नाहींत इतक्यांत विचारभ्रष्ट झाले असतील काय, किंवा 'बुडत्यास गवताची काडीदेखील आपणांस तारूं शकेल' असें वाटत असते, त्या प्रमाणें पदभ्रष्ट दों मानुएल , क्षुल्लक गोष्टीला विशालरूप देऊन, ती आपणांस ह्या आपत्प्रसंगातून उद्धरील असा वायफळ भरंवसा घेऊन बसले आहेत की काय, ह्याबद्दल बऱ्याच लोकांना शंका वाटत होती, परंतु पोर्तुगालच्या अंत:स्थितीची ओळख असणाऱ्यांस माजी राजाची आशा निष्कारण आहे, असे वाटत नव्हते. पोर्तुगालांत प्रस्तुत अधिकाऱ्यांकडून जी कृत्यें होत आहेत, ती नीट लक्षांत घेतली तर दों मानुएलनीं बाळगिलेली आशा सर्वस्वी निराधार आहे, असें ह्मणतां येणार नाही. रिपब्लीकचे कट्टे पुढारी जर सध्याची स्थिति माजी एकतंत्री राज्यपद्धतीहून वाईट आहे असे उघड ह्मणत आहेत, तर प्रतिपक्षीय लोकांनी त्यापुढे दोन पावलें टाकून 'ह्या राज्यपद्धतीपासून उद्भवलेला असंतोष पोर्तुगालच्या गादीवर पुन: राजपुरुषांची स्थापना करील.' असे भविष्य वर्तविलें, तर त्यांत नवल तें कोणते? प्रागतिक कायदे, त्यांची सरळ अंमलबजावणी, शिक्षणप्रसार, इत्यादि शेंकडो अभिवचनें

रिपब्लिक पुढाऱ्यांनी लोकांस दिली होती. आणि आज पाहावें तर तेच पुढारी अभिवचनांत रेखाटलेल्या मार्गाच्या सर्वस्वी विरुद्ध दिशेने जात आहेत! पुढाऱ्यांच्या ह्या विचारभ्रष्टतेपासून राष्ट्र कसें सुरक्षित राहील, हीच काळजी आज विचारी माणसांपुढें आहे.

लोकांनी राजपक्षाची कास सोडून आपल्या पक्षास मिळावे, एतदर्थ पुढाऱ्यांनी लोकांस पहिल्यापहिल्यानें जाडी अभिवचनें कशी दिली, आणि लोकांच्या जोरावर अधिकारस्थानावर बसून असता ते लोकांना कसें चकवीत आहेत, हें इतके दिवस आपण पोर्तुगालच्या वृत्तपत्रांतील लेखांवरून कल्पनादृष्टीने अनुभवीत होतो, परंतु दुर्दैवाने त्याचा प्रत्यक्ष अनुभव आता आपल्या प्रांतास येऊं लागला आहे. आपलें सध्याचें गव्हर्नर साहेब, हे प्रमुख रिपब्लिकन पुढाऱ्यांपैकी एक आहेत हे सगळ्यांस माहीत आहे. आणि ह्मणूनच न्यायाधिशाच्या जागेवरुन त्यांची बदली गव्हर्नर जनरलच्या जागेवर व्हावी, अशी आपल्या प्रांतानें वरिष्ठ सरकाऱ्यांशी केलेली विनंती सफल झाली, त्यावेळीं आपण किती तरी आशा बाळगून होतो! हा न्यायमूर्ति आपल्या पतित प्रांताचा खचित खचित उद्धार करील, असा आह्मांस भरवसा होता. त्यांत आणखी अधिकारग्रहणप्रसंगी दिलेल्या अभिवचनांवरून तर आपल्यांतले बहुतेक आशाळू लोक भावी सुखांचा आस्वाद कल्पनासृष्टिंत घेऊं लागले होते, परंतु दुर्दैवाने तशा स्थितींत त्यांना फार काळ राहू दिलें नाही. राजकीय प्रकरणांपासून धार्मिक व्यवहारांची ताटातूट करणे हे रिपब्लिकचें एक उद्दिष्ट होते, शिवाय गव्हर्नर साहेब हे धर्मभोळेपणापासून अलिप्त आहेत, अशी प्रसिद्धी होती, आणि आपल्या प्रांतिक सरकारचा कारभार ख्रिस्ती धर्मसंबंधाने फारच गढूळ करून सोडला आहे, ही गोष्ट सर्वश्रुत होती. इतके असतांही आपल्या गव्हर्नर साहेबांकडून ह्या बाबतींत अद्याप ह्मणण्यासारखें काही झाले नाही, लष्करी लोकांचा वरचष्मा कमी करून तर सुशिक्षित लोकांस राज्य कारभारांत प्रवेश होण्याचें द्वार खुलें होईल असा लोकांस पूर्णविश्वास होता. हा विश्वास बाळगण्याचें एक विशेष कारण असें होतें की, गव्हर्नर साहेब स्वत: सिविलियन होते. अर्थात आजवर मागें खेंचल्या गेलेल्या 'सिविल' पेशाच्या लोकांस हक्कानें पुढे येण्याची संधी मिळणें अगदी रास्त

होते. परंतु खेदाची गोष्ट ही, की त्याही बाबतींत गव्हर्नर साहेबांनी लोकांची निराशा केली. इतकेंच नव्हे तर लष्करी लोकांचा वरचष्मा वाढविण्याच्या बाबतींत गव्हर्नर साहेबांचे वर्तन एखाद्या लष्करी पेशाच्या सुभेदारास साजेल असेंच आहे, वाढलेल्या सरकारी करांचें ओझें बरेंच हलकें होईल, अशी आशा धरून बसलेल्यांचीही फसगत झाली. रूपयाची किंमत कमी करून, व मुनिसिपालिट्यांनी पहिल्यानें मौजेनें सुरू केलेल्या 'वेठबिगार' पद्धतीचे ठरीव करांत रुपांतर करून करांच्या वाढीच्या इतिहासांत गव्हर्नर साहेबांनी आपले नावं कायम केलें, आणखी अशी कित्येक उदाहरणें दाखवितां येतील, की ज्यांची आठवण झाली असता निराशेचा एक जबरा सुस्कारा सहज निघाल्याखेरीज राहत नाही.

गोमंतकस्थांच्या मनोभूमींत उभारल्या गेलेल्या ह्या निराशेच्या घुमटावर प्रस्तुत गाजलेल्या 'लिसेव मुनिसिपाल' प्रकरणानें तर कळसच चढविला, असें ह्मणण्यास हरकत नाही. निषिद्ध मानलेल्या राजसत्ताक पद्धतींतले माजी गव्हर्नर जनरल आर्त इ. कोस्त हे स्वत: लष्करी पेशाचे होते. आणि लष्करी पेशाच्या लोकांस विद्येची विशेष आवड नसते. अशी सामान्य समजूत आहे. असें असतां ह्या गव्हर्नरांनी मडगांव व ह्मापसें ह्या ठिकाणी दोन लहान पाठशाळा स्थापन करून विद्यार्थ्यांची सोय लावण्याची उमेद बाळगिली होती. तशात राज्यक्रांती झाल्यामुळे कोस्त सोहबांची येथून उचलबांगडी झाली. पाठशाळांचें हें प्रकरण आजवर तसेच भिजत पडलें होते. त्यास सि. प्राजेरिस द कोस्त ह्यांच्या खटपटीनें चालना मिळून सरकारी ठरावाच्या द्वारे ते आता बाहेर पडले आहे. मागासलेल्या लोकांत शिक्षणप्रसार होऊन ते सुधारणा कामगीरीवर चढावे, असें इच्छिणाऱ्या प्रत्येक लोकहितेच्छु माणसास ह्या गोष्टीनें फारच संतोष व्हावा. त्यांतही शिक्षणप्रसाराच्या बाबतींत मोठमोठी आश्वासानें दिलेल्या डॉ. कौसैर द. कोस्त साईबांस तर परस्पर कार्यभाग उरकून यशाचा वाटा आपणास आयता मिळाल्याबद्दल अत्यानंद व्हावा. परंतु हें सगळें जागच्या जागी राहून डॉ. साहेबांनी, पाठशाळांची स्थापना ठरावाच्या रुपानें इतक्यात बाहेर पडू नये, ह्मणून बरीच खटपट केल्याचें प्रसिद्ध झाले आहे! आणि ती गोष्टी खरी असल्याचें सरकारी रीतीनें

कबूल करण्यात आले आहे. ह्या गोष्टींमुळे डॉ. साहेबांच्या मतौदार्याची तारीफ करणाऱ्यांची मान लाजेने खाली आल्याशिवाय राहणार नाही, व ह्या विचारभ्रष्टतेंमुळे लोकांसही उद्वेग उत्पन्न होईल ह्यांत संशय नाही. असो.

गोवा प्रांताचे कल्याण हेंच आमचें समाधान, असें वेळी अवेळी लोकांच्या कानात कोंबणाऱ्या सुविचारी डाक्टरसाहेबांच्या हातून वरच्यासारखे विचारभ्रष्टतानिदर्शक प्रकार झालेले पाहणें हें विचारी माणसांचे दुर्दैव होय. त्यांतल्या त्यांत, ह्या उदार गृहस्थाच्या हातून आपलें कल्याण होईल, अशा आशेंने ज्यांनी त्यांस गव्हर्नरच्या पदावर चढविण्याची खटपट केली, त्यांची सर्वस्वी फसगत होय. आपल्या वर्तनांचे गव्हर्नर साहेबांना कोणत्याही रीतीने समर्थन, करीतां येत असलें, तथापि 'शिक्षणप्रसार नको' एवढे त्यांच्या तोंडचे शब्दच त्यांची कीर्ति मलिन करण्यास पुरेसे आहेत, हें त्यांनी पक्के लक्षांत ठेवावे.

*(बुधवार, दि. १८ जून १९१३)*

# बुद्धि : कर्मानुसारिणी

मनुष्याचा मूळचा स्वभाव कसाही असला, तरी तो ज्या कृत्यांत व्यापृत झाला असेल, त्या कर्मास अनुरुप अशी त्याची बुद्धि बनते, असा वरील वाक्याचा अर्थ आहे. ह्या वाक्यांत वर्णिलेल्या गोष्टीचीं उदाहरणे व्यवहारांत हमेश दृष्टीस पडतात. आणि तीं तशींच फार प्राचीन कालापासून दिसत असल्यामुळें, उपरोक्त वाक्य सिद्धांतवत् मानलें जात आहे. आह्मी आज जी कांही गोष्ट सांगणार आहों, तीही वरील सिद्धांताचें अबाधित्व चांगलें सिद्ध करीत आहे. डॉ. कौसेर द कोस्त हे केवढेही जाड पंडित असले, तथापि ते मनुष्यच असल्यामुळें लौकिक सिद्धांतास हरताळ फांसण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत नसावें, हे चमत्कारिक नाही. अर्थांत, पवित्र न्यायासनावर बसून चोख न्याय देत असल्यामुळें जे अंतर्बाह्य खरीखुरी न्यायमूर्ति बनले होते, ते देवदूततुल्य डॉक्टरसाहेब, बऱ्यावाईट अनेक कारस्थानांनी जेथील वातावरण

गढूळ झालें आहे, त्या प्रांताधिपतीच्या स्थानावर विराजमान झाल्यावर भिन्नस्वरूपी झाले असें एकाद्यानें ह्मटलें, किंबहुना सप्रमाण सिद्ध केलें, तर त्याबद्दल रोष बाळगण्याचे कारण नाही.

दक्षिण आफ्रिकेत आज हिंदी लोकांची जी स्थिति आहे, तशीच माजी राजवटीत गोव्यांतील हिंदु लोकांची होती, असें ह्मटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. ख्रिस्ती अंधधर्माभिमानानें राजदंडाची मदत घेऊन चोहोबाजुंनी हिंदूंचा कोंडमारा केला, आणि बिचारे हिंदु अशा असहाय स्थितींत स्वत्वसंरक्षणाची यातायात करीत होते. ही तिरस्करणीय स्थिति न्यायप्रिय माणसांच्या मनांत अनुकंपा उत्पन्न करण्यास समर्थ होती खरी. तथापि न्यायप्रियतेचें दुर्भिक्ष्य आपल्या प्रांतात पराकाष्ठेचें असल्यामुळें हिंदूच्या स्थितींत बदल होणें दुर्घट होतें. स. १९१० पूर्वी हिंदुच्या स्थितीबद्दल खरा कळवळा जर एकाद्या न्यायप्रिय पोर्तुगीजांच्या मनात उत्पन्न झाला असेल, तर तो डॉक्टर साहेबांच्याच होय. त्यांच्याच प्रयत्नानें हिंदूंच्या गाऱ्हाण्यांची दाद पहिल्यानें पार्लमेंटांत लागली. ही गाऱ्हाणीं पार्लमेंटपुढें मांडताना डॉ. आल्मैद साहेबांनी जे भाषण केले, तें इतकें उत्कृष्ट होते, की निराश झालेल्या हिंदुसमाजाच्या मनांत पोर्तुगीज सरकाराविषयीं थोडी आशा उत्पन्न केली. सुदैवाने थोड्याच कालानंतर राज्यक्रांति होऊन नवयुगास सुरुवात झाली, पोर्तुगीज राष्ट्रांची सूत्र धारण करणाऱ्या मंडळांत आल्मैद साहेब निवडले गेले, व इकडे प्रांताधिपतीच्या जागीं डॉ. कौसेर साहेबांची नेमणूक झाली अर्थात्, हिंदूच्या स्थितींत स्पृहणीय फेरफार होणार, अशी भाकितें वर्तविण्यात आली परोत्कर्षसहिष्णु मंडळीच्या पोटांत तर आगाऊ तिडका उठूं लागल्या. त्यांत आणखी आरंभासच मुख्य मुख्य मुनिसिपालिटींत दोन दोन हिंदु मेंबर नेमले गेल्यामुळे व आद्‌मिनिस्त्रादोराच्या जागेवर एक हिंदु गृहस्थ स्थापल्यामुळे ख्रिस्ती समाजास फार दु:ख झालें परंतु हिंदुसमाजाविषयी तिरस्कारबुद्धि बाळगण्याचा सराव असलेल्या काबच्या राजवाड्यानें ख्रिस्तीसमाजास तशा स्थितींत फार काळ रखडत ठेवलें नाही.

कर्मानुसारिणी बुद्धि ह्मणतात, त्याचें प्रत्यंतर ह्या प्रसंगीं फार नामी आले. पंधराशे दहापासून एकोणवीसशें दहापर्यंत, चार शतके, फिरंगाणाच्या

सुभेदारांचे काम ह्मटलें ह्मणजें हरतऱ्हेनें हिंदुसमाजाचा संपत्तीशोष करून ख्रिस्ती समाजाचें हित साधणें, हिंदूंच्या संस्था, हिंदूंची भाषा व खुद्द हिंदुलोक ह्यांचा तिरस्कार करणें, धर्महीन, रानटी अशा कुत्सित संबोधनानें त्यांचा उपमर्द करणें, राजकीय बाबतींत हिंदुलोक डोकें वर न काढतील, अशी खबरदारी घेणे, अशा मासल्याचें होते. त्या सुभेदारीच्या जागीं हिंदुसमाजास आपलें हितकर्ते वाटणारे डॉ. कोसेर साहेब अधिष्ठित झाले. त्यामुळे न्यायखात्यांत असतांना जी दृष्टि निर्दोष होती, ती चार शतकेंपर्यंत सुलतानशाहींतील सुभेदारांच्या वास्तव्यानें जेथील हवा दूषित झाली, त्या राजवाड्यांच्या संपर्कानें थोडी बिघडून गेली. हिंदुत्वाचा तिरस्कार करण्याचें काम ज्यांचें त्या सुभेदारांच्या खुर्चीवर बसल्यावर हिंदुंविषयी मनात असणारी तळमळ नामशेष होऊन त्या तळमळींचे स्थान तिरस्कारानें काबीज केलें, तर त्यांत आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

राजसत्ताक पद्धतीकडून राष्ट्राचे व्यवहार सुरळीत होत नाहींत, ह्मणून ते लोकांच्या डोकीवरुन पुढाऱ्यांनी आपल्या हातांत घेतले पाहिजेत, असें प्रतिपादन करणाऱ्यापैंकी डॉक्टर साहेब हे एक होते, नव्हे आजही आहेत, परंतु गोव्यांतील हिंदुलोकांच्या डोकीवरुन पोर्तुगीज सत्ताधिकाऱ्यांच्या जुलमी अमलाचा वरवंटा चार शतकेपर्यंत एकसारखा फिरल्यामुळें त्यांची स्थिती फार शोचनीय झाली आहे, सबब ज्या सत्ताधिकाऱ्यांनी यांजवर दडपशाही केली होती. त्याच वर्गानें त्यांस सांवरुन पुढे आणले पाहिजे. हे पूर्वीचे तत्त्व ह्यांस आज मान्य नाही, अथवा त्यास अनुरुप असें आचरण त्यांच्याहातून होत नाही. ह्या स्थित्यंतराचें कारण स्थानमहात्म्याशिवाय दुसरें काही असेल, असें ह्मणता येईल काय?

महाराष्ट्रीय पुढाऱ्यांच्या सर्वमान्य 'केसरी' पत्रांतील लेख समजून घेण्यात ज्यांस समाधान वाटत होतें, त्यांतील उत्कृष्ट प्रतिपादनशैली, उदात्त विचारसरणी, लेखकांची अलोट महत्त्वाकांक्षा, साधुवृत्ति ही ऐन ज्यांचा प्रेमोदधि उचंबळत असे, त्याच साहेब बहादुरांस आतां, मराठी पत्राची गोष्ट नाके, प्रत्यक्ष मराठी भाषेबद्दल आदर वाटेनासा झाला आहे. हिंदुबद्दल तिरस्कार वाटला, तर त्यांच्या भाषेबद्दल सहनुभूति वाटणे दुर्घट आहे. ही

स्थिति होण्याचें कारण, आमच्या मतें फक्त ह्या प्रांताची सुभेदारी साहेब बहादूर माडगांवच्या न्यायासनावरुन एकदम पोर्तुगालच्या प्रधानमंडळांत जाते, अथवा ते न साधल्यामुळें प्रतिनिधि मंडळांत राहते, तर ते हिंदुसमाजाचें जास्त कल्याण झालें असते, पोर्तुगीज कायद्यांनी हिंदु लोकांची पिच्छेहाट केली आहे, त्यापक्षी नव्या कायद्यांनी त्यांची चलती करून मग समतेचे कायदे गोव्यांतील कारभारास लागू करावे, 'अशी गर्जना पार्लमेंट सभेंत त्यांनी केली असती. मराठी व गुजराती भाषा चांगल्या अवगत आहेत, परंतु पोर्तुगीजीचें ज्ञान नाही, अशांस प्रतिनिधी निवडण्याचा हक्क नाही, हें निवडणुकीच्या कायद्यांतले कलम गर्हणीय आहे. प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यांतील रद्द झालेल्या ६७ व्या कलमाचे भावंड आहे, असें त्यांनी प्रतिपादन केलें असते, आपल्या हातून मागे खेंचल्या गेलेल्या हिंदु नागरिकांस हात देऊन आपणच पुढें आणलें पाहिजे, इतके बोलूनच न राहतां अगोदर आपला हात त्यांनी पुढें काढला असता. परंतु आता तें सगळें मनोराज्य होऊन बसलें आहे. एरवीं फार ममताळू असलेली बाई सतीचे वाण घेतल्यावर आगीच्या डोंबाबरोबर लेंकरांनी केलेल्या कल्लोळास जुमानीत नाही, तद्वत सुभेदारींचे स्थान भूषविणारे साहेब बहादूर हिंदुंच्या गरजांनी आतां कळवळत नाहीत, नुसती मराठी किंवा गुजराती भाषा बोलणारे लाखो पोर्तुगीज नागरिक राजकीय प्रकरणांत होणाऱ्या घडामोडीसंबंधानें उदासीन आहेत. किंबहुना राष्ट्रव्यवहारानें त्यांस बहिष्कृत केल्यासारखें झालें आहे, हें त्यांच्या मनांत आता विषाद उत्पन्न करण्यास असमर्थ झालें आहे. इतर सगळ्या बाबतींत हिंदुलोक पोर्तुगीज नागरिक असावे, फक्त निवडणुकीच्या बाबतींत मात्र त्यास अधिकार नसावा, उपरी लोकांसारखे परकीय भावानें लेखले जावे, ही विषमता पोर्तुगीज मुत्सद्यांबरोबर पोर्तुगीज कायद्याची बदनामी करणार, असें त्यांस आतां वाटत नाही.'

ह्या एकंदर स्थित्यंतराचें कारण आमच्या मतें फक्त ह्या प्रांताची सुभेदारी. वर सांगितल्याप्रमाणें फिरंगाणच्या सुभेदारांच्या स्थानानें हिंदुविषयीं मनांत जी उदासीनवृत्ति बाळगली होती ती त्या स्थानाच्या संसर्गाने साहेब बहादुरांच्या गळी उतरली. हा उत्कृष्ट हिरा सुभेदारीच्या निकृष्ट धातूच्या

कोंदणांत बसविला गेल्यामुळे विशोभित झाला. त्याचे दिव्य किरण हिंदुसमाजावर पडून तो चकचकीत व्हावयाचा, तो होत नाहीं अशी निदान आमची तरी समजूत आहे. ती खोटी आहे, असें सिद्ध करून देण्याच्या भरीस पडण्यापेक्षां प्रांताधिपतीची कृपादृष्टि हिंदुसमाजावर पडेल ह्या खटपटीस लागणें जास्त हितकारक आहे.

*(बुधवार, दि. २७ ऑगस्ट १९१३)*

# १५ ऑगस्ट १९१३!

हा दिवस गोमंतकाच्या अर्वाचीन इतिहासांत, विशेषत: लोकसत्ताक राज्यपद्धति अमलांत आल्यापासून जो इतिहास तयार होईल, त्यांत ठळक अक्षरांनी लिहिला जाईल, ह्यांत कोणासच संशय वाटत नाही. सरकारी दवाखाना ह्मणजे मृत्यूचा दरबार आणि सरकारी डाक्टर ह्मणजे खरेखुरे यमराजसहोदर अशी जी लोकांची दीर्घकालच्या अनुभवानें ठाम समजूत बनून गेली होती, ती आपल्या अभिनंदनीय कामगिरीनें ज्यांनी पालटली, त्या डॉ. दीयस व डॉ. ओल्फांग ह्या वैद्यद्वयांस कारागृहवास भोगावयास लावून सरकारी अधिकाऱ्यांनी लोकांच्या मनोवृत्तीवर ह्या दिवशीं एवढा जबरदस्त प्रहार केला की, त्याची आठवण पांचपंचवीस वर्षेपर्यंत बुजणें शक्य नाही. दोन तपांहून अधिक काल सरकारची नोकरी इमाने इतबारें करून सरकाराकडून शाबास ह्मणवून घेऊन जनतेकडूनही ज्यांनी अपरिमित धन्यवाद मिळविले, त्या ज्ञानवृद्ध, वयोवृद्ध व वजनदार गृहस्थांची अगदीं ह्मातारपणीं, पेन्शन घेण्याच्या वेळीं, अशा खेदास्पद रीतीनें मानहानि करण्यात वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांनी मोठासा शहाणपणा दाखविला, असें प्रत्यक्ष सत्ताधिकाऱ्यांचें लांगूलचालन करणाऱ्यांनादेखील ह्मणतां आलें नाही, मग उघडउघड लोकमताचें प्रतिबिंब प्रगट करणाऱ्यांना कसें ह्मणतां येईल? 'शिष्यापराधे गुरोर्दंड' ह्या न्यायाने हाताखालील कामदारांच्या क्षुल्लक हलगर्जीपणाबद्दल उपरोक्त लोकमान्यांस शिक्षा देऊन लोकसत्ताक पद्धतीचे नि:पक्षपातित्व जाहीर

करण्याचा उद्देश सत्ताधिकारी दाखवीत असले, तरी तो इतका पारदर्शक आहे की, त्याच्या पाठीमागची 'अंदर की बात' निखालस झाकली जात नाही. नवीन राज्यपद्धतीबरोबर जी अनेक खुळें राज्यकारभारांत शिरूं पहात आहेत, त्यांपैकी प्रकृत प्रकरणास कारणीभूत झालेलें हें खूळ ज्या दिवशीं मूर्तसृष्टींत दृश्यमान होईल, त्या दिवशी अफलप्रद वाग्बाणांनी लोकप्रीति संपादन केलेल्या प्रांताधिपतीच्या फजीतीस पारावार उरणार नाही. बाकी गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झालेल्यास एकंदर वर्तमानपत्रांचे लेख वाचून पाहिलें तर हें फजीतीचें सत्र चालू झाल्यास बराच काळ झाला असावा, असेंच कोणासही वाटेल. इंतकेच नव्हे तर उपरिनिर्दिष्ट कारागृहवासानें लोकांच्या मनांतून आपले प्रांताधिपति अगदीं शेवटची पायरी ओलांडीत असावे, असें ह्मणावेंसें वाटेल. लोकमत हाच आपला वाटाड्या, असें ज्यांनी आरंभी लोकांस भासविलें होते, त्याच गृहस्थांच्या हातून लोकमताची पायमल्ली करणारें हें कृत्य पाहण्याचें ज्यांच्या नशिबीं आलें, ते खरोखर दुर्दैवीच ह्मटलें पाहिजेत.

''सरकारी कामदारांच्या हातून किरकोळ चुका झाल्या तर 'मनुष्य चुकीस पात्र आहे' ह्या तत्त्वाकडे लक्ष्य देऊन मी डोळेझांक करीन, परंतु नवीन राज्यपद्धतीच्या ब्रीदास काळिमा लागण्यासारखा ज्यांचा अपराध असेल, त्यांनी क्षमेची अपेक्षा मुळींच करूं नये.'' अशी ताकीद गव्हर्नरसाहेबांनी अधिकारारुढ होते वेंळी कामगारांस दिली होती. आणि प्रस्तुतची शिक्षा ही त्या आज्ञेची अंमलबजावणी होय, असें जे कोणी ध्वनित करीत असतील, त्यांस 'उल्यामार' वगैरे पत्रांनी बरेच प्रश्न केले आहेत. लिन्दोर्फ नावाच्या अंमलदारांने दमण येथील सरकारी जंगलांची नासधूस करून लक्षावधि रुपयांनी आपली तुंबडी भरली, त्यांस सरकाराकडून कोणती शिक्षा देण्यात आली? त्यांनी गाजविलेल्या नवाबशाहीची चौकशी करण्याकरितां जे कमिशन नेमलें होतें, त्यांजकडील रिपोर्ट अजून कां उजेडात येत नाही? आज दोन वर्षेपर्यंत प्रांतिक अस्वास्थास कारणीभूत झालेली सत्तरीतींल बंडाळी ही ज्यांच्या वर्तनाचा प्रतिध्वनि होय अशीच सामान्य समजूत आहे, त्या शिरजोर रोल पेरैर ह्यांस सरकारनें कोणते शासन केलें? उलटपक्षीं, ह्या गोऱ्या अमलदाराच्या इभ्रतीपुढे लक्षावधि लोकांच्या स्वास्थाचा नाहक बळी दिला नाही काय?

मार्किस पेरैर ह्यांजाविरुद्ध तर इतके लाजिरवाणे आरोप होते की, नवीन राज्यपद्धतीच्या अब्रूकरिता नसलें, तरी युरोपियनांच्या यशोरक्षणाकरिता तरी त्यांची उघड चौकशी होऊन अपराध्यास कडक शासन अवश्य मिळावयास पाहिजे होते. पण ह्या बाबतींत सरकारनें मूग गिळून बसण्यापलिकडे काय केलें आहे? लोकांच्या हिताचें निमित्त पुढें करून 'ओब्रेस पब्लिकस' खात्यानें सार्वजनिक पैशाची जी उधळपट्टी चालविली आहे. तिजबद्दल सरकारानें कानाडोळा करण्याहून जास्त काय केले आहे? अशा अनेक कायदेशीर प्रश्नांस सरकारमार्फत जी उत्तरें मिळाली, ती लोकांच्या आठवणींतून गेलेल्या फुल्लरशाहीची प्रतिमा डोळ्यांपुढे उभी करीत आहेत. आणि एकदा विवेकभ्रष्ट झाला की मग त्या माणसाच्या विनिपातास पारावार नसतो, अशा अर्थाचें जें सुभाषित आहे, त्यांचे प्रत्यंतर लोकप्रत्ययास आणीत आहेत.

आपल्या वयोवृद्ध गुरुंना ह्यातारपणीं जी आपत्ति प्राप्त झाली, तिजबद्दल खेद प्रदर्शित करण्याकरितां वैद्यकपाठशाळेच्या विद्यार्थ्यांनी दहा दिवसपर्यंत अध्ययन वर्ज्य केले. वास्तविक पाहिलें असतां, ही गोष्ट कौतुकास्पद होय. तथापि कौसेराधिष्टित सरकाराने तिला अत्याचाराचा रंग फांसून आपल्या अत्याचारावर मखलाशी चढविण्याचा प्रयत्न आरंभिला! आणि लोकांच्या पैशांतून जी एक वरिष्ठ शिक्षणाची शाळा चालली होती, ती चालू सालापुरती बंद करून विवेकभ्रष्ट माणसाचा क्रोधावेश पुराणांतरी वर्णन केलेल्या आसुरी वृत्तीसारखाच तीव्र असतो, हें लोकांच्या प्रत्ययास आणलें. आणखीं अशा प्रकारें १५ तारखेंस जी दडपाशाहीची इमारत सुरू केली होती, तिजवर सरस्वतीमंदिर विध्वंसाचा कळस चढवून आपलें नांव गोव्याच्या इतिहासांत चिरस्मरणीय करून ठेविले!

सैतानालादेखील आपल्या वर्तनाचें समर्थन बायबलाचा आधार दाखवून जर (पोर्तुगीजींतील एका ह्मणीप्रमाणें) करितां येते तर मग शिरजोर अधिकाऱ्यांस कायद्याचे संयुक्तिक आधार दाखवून आपल्या वर्तनावर मखलाशी करतां येणें कठीण आहे असें नाही. इंग्रजी न्यायदेवतेनें ज्याची उचलबांगडी करून आपली सुकीर्ति कायम राखिली, त्या फुन्नरखानांची एकंदर कृत्ये कायदेशीरच होती, अशी वर्तमाने खानबहादूर अधिकारावर

होते, त्या वेळीं पसरत असत आणि गोमंतकस्थांच्या तिरस्कारास पात्र झालेलें सध्याचें राजकारणदेखील कायद्यावर हुकूम झालेलें आहे, असें सरकारचे ठराव कंठरवानें प्रस्तुत सांगत आहेत! दर दिवसास सहा गैर हजिऱ्या मांडणे, अशा काल्पनिक, गैरहजिऱ्यांची अवेळी मोजदाद करणे, विद्यार्थी गैरहजर, नव्हे विद्यार्थ्यांनी शाळा सोडली, अशी कारणें लावून शाळा बंद करणे, ही सगळीं कृत्यें कायदेशीर! लिदोर्फ, मार्किस पेररै अशांचें वर्तन जेथें कायदेशीर दिसलें, तेथें शाळाधिकारी मंडळाचे अधिकार हिसकावून घेऊन काढलेले ठराव कायदेशीर दिसावे, हे साहजिक आहे.

मेडिकल स्कूलच्या विद्यार्थ्यांचा कौतुकास्पद स्वाभिमान पाहून सरकार डोक्यांत इतकी राख घालून घेईल, असें आरंभी कोणासच वाटलें नव्हतें, पक्षप्रतिपक्षीय वकिलांनी केलेल्या गिल्ल्यानें न डळमळतां नि:ष्पक्षपातानें निकाल करण्याचा ज्यांना सराव, ते पूर्वाश्रमीं न्यायमूर्ति असलेले आजचे सरसुभेदारसाहेब मुलांच्या खेळाने असे बेताल बनतील, असा तर्क कोणासही झाला नव्हता. परंतु माजी राजवटींत बिघडलेली स्थिति रिपब्लिकच्या ह्या पहिल्या गव्हर्नरांकडून दुरुस्त होईल, हा अजमास ज्याप्रमाणें सपशेल चुकला, तशीच प्रस्तुत प्रकरणांतही लोकांची फसगत झाली. इतकेंच नव्हे, तर वकीली डावपेचांत वाकबगार असलेल्या गव्हर्नरांपेक्षा आडदांड परंतु स्वभावानें साधाभोळा लष्करी अंमलदार गव्हर्नरच्या स्थानी असणें चांगलें असं आता वाटू लागले आहे. आजवर हरतऱ्हेच्या प्रसंगातून सरकारास जावें लागलें, लोकपक्षास हरविण्याकरिता बंदुकांच्या फैरी झाडाव्या लागल्या, तथापि लोकपक्षास नमविण्यासाठी किंवा एखाद्या युरोपियनांस स्थानापन्न करण्यासाठी सरस्वतीमंदिराचा चुथडा करण्याची दुर्बुद्धि माजी आउदांड लष्करी गव्हर्नरांपैकी एकासही झाली नाही. आणि दहापंधरा वर्षे सरस्वतीमंदिरांत वास केलेले हे राजश्री मुलांच्या खेळानें विवेकभ्रष्ट होत्साते स्वतःच्या कीर्तीबरोबर नवीन राज्यपद्धतीबद्दल लोकांच्या मनात असलेले प्रेम नामशेष होईल अशी कृति करीत आहेत, हे पाहणाऱ्यांचेंच दुर्दैव नव्हे काय?

लोकांनी आपल्या मनोभूमींत लावलेल्या आशातरुची एकेक डहाळी तोडण्याचे काम गव्हर्नरसाहेबांनी बरेच दिवसांपासून चालविले होतें. तरी तो

समूळ उपटून काढण्याचें निंद्य कर्म ते सहसा करणार नाहींत, अशी सामान्य समजूत होती. तथापि पोर्तुगालांत डॉ. आफोंस कोस्त साहेबांनी स्वैर वर्तन आरंभिलेले पाहिल्यावर अधिकाराचें घोडें बेलगामी सोडण्याचा मोह डॉ. कौसेर साहेबांस पडला. जणो काय नवाबशाही न चालविली तर आफोंस कोस्त साहेबांच्या मर्जीतून उतरण्याचा बळकट संभव होता. असो.

सारांश गेल्या महिन्याच्या पंधरा तारखेस प्रांताधिपतींनीं जो अत्याचार केला आणि पुढे इभ्रतीच्या भरीं भरून जी कार्यपरंपरा लोकनिदर्शनास आणली, ती इतकी अपूर्व आहे, की गोव्यांतील लोक तिची आठवण कधींही विसणार नाहीत. आणि असाच प्रकार जर पुढें चालणार असेल, तर वरिष्ठ सरकारनें ह्या स्वारीची उचलबांगडी जरूर करावी, अशी जी कित्येक प्रमुख पत्रांनी पोर्तुगाल सरकारशीं विनंति केली आहे, तिला दुजोरा देऊन आह्मी मोकळे होती.

*(बुधवार, दि. १० सप्टें. १९१३)*

# स्वर्गस्थ पितरांचा संदेश

‘‘पराधीन देशांत जन्म पावून समाजोत्कर्षाचें कोणतेंही काम न करिता जे मरण पावले असतील, त्यांस ह्या लोकीं जी गती मिळावयाची, तीच आह्मास तुमच्या स्वर्गस्थ पितरांपैकीं शेंकडा नव्याणवास मिळाली आहे. उपासतापास, व्रतेंवैकल्यें, भजनसप्ताही, वगैरे अनेक प्रकार मोक्षप्राप्तीकरितां ह्मणून आह्मी मृत्यूलोकीं केले, परंतु हिंदी समाजरुपी विराटपुरुषाची यथोचित सेवा आमच्या हातून लवमात्र झाली नसल्यामुळें आह्मांस मोक्षकवाडे साफ बंद झाली. नवरात्रांत फुकट ऐकलेला वेदांत, भजनी मेळ्यांत घातलेला हैदोस, आमरणांत केलेल्या अघोर पातकांच्या क्षालनार्थ प्राणज्योति विझतेवेळी भटजीकडून घेतलेलें सव्वा रुपयांचे प्रायश्चित, पोरांकडून वसूल केलेले पिंड, ह्यांपैकीं एकदेखील आमच्या कामास आलें नाही. कर्मानुसार ज्या स्थानीं एकदा आमची योजना झाली, तेथेंच विश्वाच्या अंतापर्यंत यापुढे आह्मीं खितपत पडणार! मग तुह्मी मृत्युलोकांत आमच्या नांवानें श्राद्धांचे ‘फेंट’ उभें

करू कितीही पक्कानें खा. किंवा क्षौरवपनें करा, आमच्या स्थितींत रतिमात्र सुधारणा होणें नाही. आह्मांस ज्या यातना भोगाव्या लागत आहेत, त्यांचे वर्णन करण्याची साफ बंदी असल्यामुळें त्या भानगडींत आह्मी पडत नाही. शिवाय आतां कितीही रडगाणें गाइलें, तथापि कर्मभोग थोडेच चुकणार असल्यामुळे आह्मांसही तें करण्याची मोठीशी उमेद नाही.''

वास्तविक पाहिलें तर अशा दुःखदायक स्थितींत पोरांटोरांची आठवण होऊ नये, परंतु प्रेम चमत्कारिक असल्यामुळे आह्मांस पूर्वाश्रमींची आठवण होते. तुह्मा वंशजांचें पुढें कसें होईल ही काळजी सदोदित ताप देते. राष्ट्रपुरुषाची उपासना शक्त्यनुसार न करितां सदैव आपल्याच ढंगांत मग्न असलेले आमचे वंशजदेखील शेवटीं ह्या नरकांत येऊन पडणार काय? स्वसुखनिरभिलाषी राहून केवळ कर्तव्याकरितां कर्तव्य करा, असा भगवंताचा संदेश न ऐकतां ते ह्या नरकपुरीचे वतनदार होऊन राहणार काय? स्वदेशबांधवांकरितां जिवापाड मेहनत केल्यामुळें मरणोत्तर अवर्णनीय सुखाचा उपभोग घेत असलेल्या पुण्यपुरुषांचा सहवास आपणास लाभावा, ह्यासाठीं ते किंचित प्रयत्न करणार नाहींत काय? परतंत्र लोकांची सुखें अति क्षुद्र, संपत्ति अति अल्प, समाधान अत्यंत दुर्मिळ असें असतांही त्या भिकार स्थितींत रममाण होण्याची दुर्बुद्धि ज्यापक्षीं आमच्या वंशजांत दिसत आहे, त्यापक्षीं आमच्याच सारखे सोहळे त्यांसही ह्या लोकीं अनुभवावे लागणार काय? असे अनेक विचार डोक्यांत हलकल्लोळ उत्पन्न करू लागले, कीं प्राप्त यातनांचे दुःख अनंत पटीनें तापदायक होऊं लागते.

आह्मांस आलेला अनुभव सांगून तुह्मांस ताळ्यावर आणावं ह्मटलें, तर हे कर्मभोग भोगिल्याविना मृत्युलोकीं येणें आतां आह्मांस शक्य नाही. अनंत काळच्या अनुभवाचा सारभूत असा भगवंताचा गीतारुपी संदेश ज्यांच्या कानी जात नाही, इतिहासपटावर रेखलेले भूतकालीन देखावे ज्यांच्या डोळ्यांस दिसत नाहीत, एकनाथ तुकारामासारख्या साधूंचा बोध ज्यांच्या अंत:करणांत ठसत नाही, वैदिक धर्मबाह्य ज्ञातिसंस्था उराशीं बाळगल्यामुळें प्राप्त झालेली सामाजिक अवनति ज्यांस असह्य वाटत नाही, नरकपुरीचे गुमास्तेच अशा वेश्या पवित्र देवस्थानांशीं संलग्न करण्यास ज्यांस लाज

वाटत नाही, सुधारलेल्या लोकांचा दीर्घकालिक सहवास ज्यांच्या नासक्या आचारविचारांत क्रांति उडवून आणण्यास असमर्थ, अशा निगरगट्ट, मृतप्राय, जीर्णाभिमानी लोकांवर आमच्या अनुभवाची कहाणीं ह्मणजे मोठासा परिणाम करू शकेल असेंही नाही.

आणि दुखणाइताला उपचार केले तर कांही तरी फायदा होण्याचा संभव असतो. कां की, उपचारांचे परिणाम ग्रहण करण्याची शक्ती त्याच्या इंद्रियांत शाबूत असते. मृतप्रायाला उपचार आणि मढ्याला श्रृंगार दोन्हींही सारखींच. उदाहरणार्थ पोर्तुगाल व हिंदुस्थान हे दोन देश घ्या. पहिलें राष्ट्र मागें पडले ते हलगर्जीपणामुळे. दुखणाइत पडले, राज्यकर्त्यांच्या आप्पलपोटेपणामुळे अत्यंत क्षीण झालें, परंतु हिंदुस्थानासारखें मृतवत झाले नाही.

देशाभिमानरूपी रक्ताशय ज्ञातिरुपी जंतूंनी बिघडवून टाकल्यामुळे नाड्या बंद झाल्या नाहीत, अज्ञानरुपी अर्धांग वायूनें वामांग लुळें करून सोडलें नाही, घरचा उंबरठा ओलांडण्यापुरती ताकद रुढींनीं ग्रासली नव्हती, अनीति, दुराचार, बिघडलेली दानत असल्या कष्टसाध्य रोगांनी शरीर जर्जर करून सोडलें नव्हतें, ह्मणून वैद्यांनी केलेले उपचार त्वरित  फलदायक झाले. तशा मासल्याचें उपचार हिंदुस्थानावर केले तर ते फलप्रद होतील असें तुह्मांस वाटतें काय?

एकूण हिंदी राष्ट्र मेलें आहे, मृत्युलोकांतील कारभार आटपल्यावर तुह्मी देखील आमचें वसतिस्थान भूषवायला याल असा आमच्या ह्मणण्याचा सारांश नाही. समाजसेवा, लोकशिक्षण, परोपकार इत्यादी कर्तव्यें उदात्त अंत:करणानें तुह्मी बजावाल, तर ज्या दिव्य लोकांत प्रस्तुता एकनाथ, रोहिदाससारखे साधु, शिवाजी-प्रतापसिंहासारखे शूर, वाशिंग्टन-बोंबार्दासारखे लोकसत्तास्थापक, लूथर -दयानंदसारखे धर्मक्रांतिकारक, सच्चिदानंद सुखांत तल्लिन झाले आहेत, त्या सुखाचा उपभोग तुह्मांलाही खात्रीनें मिळेल. क्षुद्र स्वार्थ, अल्पसंतोष, आप्पलपोटेपणा ह्यांचा त्याग करून उदात्त ध्येय, उच्च स्वार्थ, थोर महत्त्वाकांक्षा बाळगिली तर महत्पद हटकून मिळणारच. हिंदी तितके सगळे माझे भाऊ, माझें शरीर, माझें शिक्षण, माझी संपत्ति, ही माझ्या एकट्याकरितां नाहीत, माझें जन्म, माझें जीवित, माझा मृत्यु ही

सारीं हिंदी राष्ट्रपुरुषांकरिता आहेत, अशी भावना तुह्मी बाळगिली पाहिजे, धर्माच्या नावांवर खपल्या जाणाऱ्या रुढी, वर्णगुरु ह्मणविणाऱ्या भिक्षुकांनी त्यांस दिलेला टेंकू, आणि समाजगुरुंनी त्यांचे माजविलेलें स्तोम, हीं सपशेल मोडून टाकिलीं पाहिजेत, बालविवाह, विधवाकेशवपन, परदेशगमननिषेध, असल्यास एकतर्फी, तिरस्करणीय चालींचा त्याग करण्याला कचरतां कामा नये. देवस्थानांचे पावित्र्य कायम राखण्याकरितां त्यांस मुरळ्या, देवदासी, कलावती ह्यांच्या कचाट्यांतून सोडविलें पाहिजे, जनता सन्मार्गगामी व्हावी एतदर्थ ज्ञानप्रसार झपाट्यानें केला पाहिजे. सारांश दिव्य लोकांत जाण्यास ज्यांस पूर्ण मुभा आहे. अशा सुधारलेल्या लोकांनी व्यावहारिक बाबतींत जशी उन्नति साधली आहे, तशीच तुह्मीही साधली पाहिजे. मृत्युलोकांत ज्या राष्ट्रांचे स्थान नीच आहे, तेथील लोकांस ह्या लोकीं उच्चस्थान मिळेल, हें मुळींच शक्य नाही. ह्मणून राष्ट्राची उन्नति ज्या मार्गांनी होईल, त्या मार्गाचें तुह्मीं जरूर अवलंबन केले पाहिजे. कर्ममार्गाचें फाजील थोतांड माजवून मोठ मोठालीं श्राद्धें घालून, क्षौरवपन करून, क्षेत्रस्थ अडाणी गयावळांस पैसे चारून दिव्य लोकांत जाण्याची उमेद बाळगाल, तर अंती फसगत होऊन अखेर ज्या जागीं आह्मी खिचपत पडलों आहों, त्याच नरकांत तुह्मांसही खचित खचित लोळावें लागेल हें ध्यानांत ठेवा.

*(बुधवार, दि. २४ सप्टेंबर १९१३)*

# सरकारचीं कर्तव्यें

*''यथा हि गर्भिणी हित्वा स्वप्रियं मनसो ऽ नुगम् ।*
*गर्भस्य हितमाधत्ते तथा राज्ञाप्यसंशयम्।।*
*वर्तितव्यं कुरुश्रेष्ठ सदा धर्मानुवर्तिना ।*
*स्वप्रियं तु परित्यज्य यद्यल्लोकहितं भवेत् ।।''*

***महाभारत शांति पर्व***

भीष्मासारख्या राजनीतिविशारद पुरुषाचें हें शिरोभागीं घेतलेलें वाक्य प्रत्येक राज्यकर्त्या पुरुषानें आपल्या ह्रत्पेटिकेवर खोदून ठेवण्यासारखें आहे. धर्मराजास राजधर्माचा उपदेश करीत असतांना ते ह्मणतात, 'गर्भिणी स्त्री आपल्या मनास आवडणारे आहारविहार सोडून गर्भाला हितकर होतील अशाच आहारविहाराचें जसें सेवन करते, तसेंच धर्मशील राजानें आपल्या आवडीच्या गोष्टी सोडून ज्या ज्या लोकहितकारक गोष्टी असतील त्या त्या नि:संशय प्रचारांत आणाव्या.' असा भारी मोलवान उपदेश आहे.

समता, बंधुभाव, ऐक्य इ. उदात्त तत्त्वांच्या पायावर ज्या रिपब्लिक राज्याची इमारत उभारली आहे, त्या राज्याच्या प्रचालकांनी तर या वाक्याच्या अर्थाला कधीच विसरतां कामा नये. आह्मा पोर्तुगीज इंडियांतील लोकांना थोड्या काळापूर्वी ध्यानी मनीं नसतां एकाएकीं यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें मोनार्कीतून रिपब्लिकमध्यें आपण पडलों आहों असें ज्यावेळीं वाटले. त्यावेळीं या स्थित्यंतरामुळें आपणास आता कोणकोणत्या अननुभूत गोष्टींचा अनुभव घ्यावयास सांपडेंल, इ. तर्कवितर्कांनी आमची मनें भांबावून गेली होती. आणि तसें होणें साहजिकही होते. मोनार्कीच्या वेळेच्या कित्येक विषमभावमूलक चिरपरिचित जुलूमी गोष्टींचे डोळ्यादेखत झालेलें निर्मूलन पाहिल्यावर फार काळापावेतों हिंदी प्रजेस जाचक होणारा वर्णभेद-धर्मभेदादिजनित उच्चनीच भाव आता रिपब्लिकेच्या तत्त्वनुसार नाहींसा होईल. रिपब्लिकच्या दैवी सत्तेंत आह्मी सर्व प्रकारच्या भेदभावांना हळू हळू पारखे होऊ, इ. प्रकारची त्यावेळी आह्मांला बरीचशी आशा वाटू लागली होती. आणि ती आशा जास्त वृद्धिंगत होण्याला राज्यकर्त्यांकडून त्यावेळीं मिळणारी अभिवचनेंही पण बऱ्याच अंशांनी कारण झाली होती. पण आमचा व त्याबरोबरच आमच्या शहाण्यासुरत्या राज्यकर्त्यांचाही खडतर दुर्दैवयोग अजून संपलेला नसावा असें अलीकडे आपल्या लक्ष्यांत येऊं लागलें आहे.

प्रजेचा अभ्युदय करण्यांत राज्याच्या कल्याणाचा मार्ग असतो. प्रजा ही राज्यकर्त्यांहून परकी नाही. प्रजेंचें हित तेच राज्यकर्त्यांचे हित अशी भावना या रिपब्लिक राज्यांत देखील झालेली दिसूं नये हे मोठं आश्चर्य वाटते. प्रजा हाच राजा. प्रजेहून राजा ह्मणून कोणी निराळा नाही.

व्यवस्थेसाठी आपल्यांतून योग्य मनुष्याची निवड करून प्रजाच आपल्या तंत्रानें जें प्रजातंत्र राज्य चालविते, तें राज्य रिपब्लिक होय. इ. उदात्त दिसणारीं तत्त्वें अनुभवाच्या कसोटीस आज कितपत उतरतात हें पहावयास गेल्यास मन थोडेशे घोटाळतें. प्रजेला हव्या असलेल्या गोष्टी रिपब्लिक ह्मटलेल्या राज्यांत घडून यावयाला उशीर का लागावा? किंवा नको असलेल्या गोष्टींची बंदी व्हायाला आडकाठी कां असावी? असले विचारणीय प्रश्न उपस्थित होतात. कोणी ह्मणतील, आकाशांतला चांदोबा मागणाराला, तो त्याच्या हितचिंतक प्रत्यक्ष आईबापांकडून देखील मिळण्याचा संभव नसतो. किंवा औषध घेण्यास कंटाळणाऱ्या लहान मुलांस, त्यांच्या खुषीविरुद्ध त्यांच्या हितचिंतक आईबापांना तें जबरींनें पाजावें लागतें. तशांतला प्रकार झाल्यास तो रिपब्लिकच्या तत्त्वाविरुद्ध असे ह्मणतां येणार नाही. होय गोष्ट कबूल आहे. पण याच्याच विरुद्ध बाजूंची दुसरीं उदाहरणें घेऊनही दुसऱ्या बाजूकडे आपणास पाहिले पाहिजे.

पोटांत आग पेटलेल्या लहान मुलानें 'आई, मला भूक लागली आहे, कांही तरी खायला दे ग' ह्मणून सारखी ओरड चालविली असता, अथवा 'आई, माझे कपाळ ठणकतें किंवा पोटांत दुखते' ह्मणून पोर ते तळमळत असतां त्याच्याकडे मुळींच लक्ष्य न देता आपल्या घरधंद्यांतच निमग्न होऊन राहणाऱ्या आईकडे बेफिकीरपणाचा अथवा नैष्ठुर्याचा भाग बराच येतो हे कोणीही सांगेल. आता या वरील दोन्ही प्रकारच्या उदाहरणांतून आपल्या स्थितीत कोणतें उदाहरण लागू पडण्यासारखे आहे याचा विचार पाहतां पहिल्या प्रकारच्या उदाहरणांपैकीं आकाशांतील चांदोबा मागण्याइतका जाणतेपणा आज पोर्तुगीज इंडियांत रिपब्लिक सत्तेखाली राहणाऱ्या प्रजारूप अर्भकाच्या अंगी आलेला नाही, हे कोणीही सांगेल. उलट आईनेंच मुलाचें चित्त चांदोबाकडे वेधावें ह्मणून कडेवर असतांना 'बाळ! तो पाहिलास कां चांदोबा, किती छानदार दिसतो तो. पहा तरी त्याच्याकडे!' ह्मणून आपला हात वर करून बोटानें दाखविला असतांही हें भितरें पोर त्याच्या चकाकीकडे पाहून घाबरून तोंड खाली घालावयाचें! मग तो खेळण्यास मागण्याची गोष्ट एकीकडेच राहिली. दुसऱ्या उदाहरणांतील जबरीनें औषध पाजण्याच्या

मागण्याची गोष्ट एकीकडेच राहिली. दुसऱ्या अदाहरणांतील जबरीने औषध पाजण्याच्या संबंधानें पाहिल्यासही असेंच दिसेल. आपल्या आईचा धाक या लहानग्या मुलावर इतका आहे की, कसलेंही कडूविख औषध कां असेना, आईने वाटी पुढे करून तें पी ह्मटले की, तोंड वाकडें करीत तें निमूटपणें गटकन पिऊन टाकावयाचें. हूं कीं चूं करून आपली नाखुषी प्रदर्शित करण्याची पोरांची प्राज्ञा काय लागली आहे! तात्पर्य, या दोन्ही उदाहरणांची घटना आपल्या सद्य:स्थितीला जुळणारी नाही.

उलटपक्षींच्या उदाहरणांकडे पाहिल्यासही आपणास असें दिसून येईल की, पोटास प्रखर क्षुधा लागली. कावळे कावकाव करू लागले, तरी हें प्रजारुपी गरीब पोर भूक लागल्यावर खाऊं मागणें हा आपला धर्म आहे, हक्क आहे हें न कळल्यानें आईच्या धाकानें, आई कामांत गुंतली आहे, यावेळीं आपण खाऊं मागू तर ती संतापेल व आपणास कदाचित् मार बसेल, या धास्तीनें सोसवेल तितका भुकेचा आवेग सोसून व तो अनिवारच झाला तर दीनवाण्या मुदेनें आईकडे बघत राहून आपला उद्देश आईनें ओळखावा ह्मणून वाट पाहील. पण 'खाऊ दे' वास्तविक हक्काचे शब्द आईपुढे उच्चारावयास कचरेल. इतकें ते गरीब आहे. आईचा पुर्वानुभवजन्य दाब त्याच्या मनावर इतका आहे की, वरील शब्द उच्चारण्यास अत्यंत निकडीच्या वेळीं देखील त्याला धैर्यच होत नसते. पोटदुखी कळविण्यास तें भ्याड पोर असेंच शंकित होऊन सोसवेल तितकी कळ सोसून असतें. फारच असह्य वेदना झाली, तर कोनाकोपऱ्यात तोंड खुपसून मुळमुळ रडत बसेल. पण धीटपणाने आईच्या पुढें जाऊन अमुक एक वेदना आपणांस होते हें उघड सांगण्यास धजणार नाही. रडण्याचा हुंदका मोठ्यानें निघाल्यास आपल्या इच्छेच्या शमनार्थ तजवीज होण्याचें एकीकडे राहून उलट एकादी चापट खाण्याचा प्रसंग येऊं नये असेंच त्या धाकांत वाढलेल्या पोरास वाटण्याचा संभव असतो. आणि त्यामुळे तें पोर होतां होईल ती आपली इच्छा आईला कळविण्याची टाळाटाळ करीत असते. सोसवेल तेथवर सोसून ती वेदना असह्य झाल्यानंतरच कदाचित् एकाद वेळा रडण्याचा हुदंका या सोशीक पोराच्या आईच्या कानावर जावयाचा, अशी स्थिति आहे.

दृष्टांत सोडून वळावयाचें ह्मणजे पोर्तुगीज इंडियांतील नेभळट प्रजा अजून आपणांस पाहिजे असलेल्या गोष्टी नेटानें सरकाराकडे मागून घेण्याइतकी तयार झालेली नाही. व आपल्या इच्छेविरुद्ध होणाऱ्या सरकारी वर्तनास हरकत आणण्याइतकींही धीट झालेली नाही. सत्तरी प्रांतांत कधी कधी उत्पन्न होणारी बंडे ही असह्य पोटदुखीनंतर निघालेले रडण्याचे हुंदके होत. अशिक्षित अतएव अज्ञान, दुर्बल व नेभळया प्रजेला आपली पोटदुखी कळविण्यास रडण्याचा हुंदक्या वाचून दुसरें साधन तें काय असेल? आणि हा रडण्याचा हुंदका निघतांच आईने त्या दुबळ्या पोराच्या संरक्षणासाठी ठेवलेल्या दाईकडूनच जर जोरानें चापट बसली, तर मोठ्यानें ओरडण्यावाचून त्या पोराला गत्यंतरच नाही, अशी वस्तुस्थिति आहे.

सध्याचें नुकतेंच थंडावत चाललेंलें सत्तरकारांचे बंड हें वरील प्रकारचें ओरडणें होतें, हे आह्मी आमच्या प्रजावत्सल सरकारला प्रांजलपणानें सांगतो. हे ओरडणे सरकारच्या धाकाने ह्मणजे कडक उपायानें सध्या स्तंभित झालें आहे. पण सरकारनें या पोटदुखीवर औषध करण्याच्या बाबतींत हेळसांड करू नये, गरीब प्रजेला आपल्या कामदार लोकांकडून व प्रसंगविशेषीं नकळतच पण स्वत:कडून जें उद्वेग येण्यासारखें त्रास पोंचत असतील, ते स्वत: होऊन ओळखून (कारण प्रजा बहुतेक अज्ञान अतएव मुकी, स्वत:ची पोटदुखी आपल्या मायाळू आईस कळविण्यास दचकणारी असल्यानें तिची सर्वप्रकारची काळजी न सांगतां घेणें हें दयाळू सरकाराचें कर्तव्य आहे.) योग्य ते उपाय अमलांत आणण्याच्या प्रयत्नात लागावें आणि या सगळ्याच्या आधी आपल्या प्रजेस आपलें दु:ख कळविण्यास धैर्य येण्याचें जें मुख्य साधन, ज्याच्या योगानें मुकेपणा जाऊन बोलकेपणा येईल, असें शिक्षण देण्याच्या कामीं तर थोडा देखील विलंब करुं नये. प्रजेचें हित कशांत आहे हें प्रजेपेक्षां राजास आधीं आणि जास्त कळलें पाहिजे. आमच्या सरकारास तें फार उशीरा कळत आहे, व जितकें कळावें तितकें अजून कळलेलें नाही, असें मोठ्या दिलगिरीने या ठिकाणी ह्मणावें लागते.

असो, प्रस्तुत विषयाच्या प्रास्ताविक भागांतच आणि दृष्टांतादि साधनांतच मर्यादित जागा अडून राहिल्यामुळें तूर्त येथेंच मुक्काम करणें भाग

आहे. याकरिता, जन्मास येऊन हिंडू फिरुं लागलेल्या पोरांची तर गोष्ट राहोच, परंतु जन्मास येण्याच्या पूर्वीदेखील गर्भाशयांत असलेल्या पोटच्या पोरांची काळजी घेण्यांत आईला स्वत:ची आवड एकीकडे ठेऊन-पोराच्या हितास जपावें लागतें हें प्रजेचें पुत्रवत् पालन करणे हें ज्यांचें कर्तव्य ह्या राज्यकर्त्यांनी कधींही विसरू नये, हे आज शिरोभागीं घेतलेल्या नीतिवाक्यावरुन आपणास दिसून येणार आहे, इतकें सांगून आज येथेंच थांबतो.

*(बुधवार, दि. १ ऑक्टोबर १९१३)*

# समता कीं विषमता?

आशियाखंडात युरोपियन वैद्यक शिकविण्याच्या जितक्या पाठशाळा आहेत, त्यांत आपल्या गोवा प्रांतांतील मेडिकल स्कूल ही संस्था वयोवृद्ध आहे. ह्या संस्थेची कीर्ति वाढविण्यास ज्या ज्या गृहस्थांनी आपापल्या परी आजवर प्रयत्न केले, त्यांत डॉ. दोयस व डॉ. सिल्व ह्या सुप्रसिद्ध शिक्षकद्वयांची प्रमुखत्वानें गणना होते. गोमांतकस्थजनसमाज ह्या उभयतांचा किती ऋणी आहे, हे थोडक्यांत सांगावयाचे ह्मणजे मुख्याध्यापक डॉ. दोयस ह्यांचा पुतळा लोकांनी गेल्या सहा महिन्यामागें मोठ्या थाटानें स्थापून आपली कृतज्ञता व्यक्त केली, व डॉ. सिल्व ह्यांचाही सन्मान अशाच मासल्याचा करण्याचा बेत आहे, इतकें सांगितलें ह्मणजे पुरे. तर अशा प्रकारें सरकार व लोक ह्यांची दोन अडीच तपें एकनिष्ठपणें सेवा केल्यानंतर, ह्यातारपणीं त्यांची संभावना कोणत्या नमुन्याची झाली, ही गोष्ट सगळ्यांच्या स्मरणांतली असल्यावरुन, तिची आठवण नव्यानें करून वाचकांचा चित्तक्षोभ करणें प्रशस्त वाटत नाही. असो ह्या सन्मान्य प्रोफेसरांमागून मेडिकल स्कूलची सूत्रें एका युरोपिन डॉक्टराच्या हातांत देणार असल्याची बोलवा आहे, तिच्या सत्यासत्यतेसंबंधानें एव्हांच निश्चित असें काही सांगवत नसले, तथापि प्रस्तुत चोहोंबाजूंनी जो वारा वाहत आहे, त्याचा झोंक पाहिला, तर आशियाटिकांच्या उत्कर्षाचे जहाज वर्णद्वेषाच्या खाडींत अडकून पडणार असे ह्मणण्यास दिक्कत वाटत नाही.

गेल्या महिन्यांत युरोपियन पत्रकर्त्यांचा चर्चेचा विषय होऊन बसलेलें डॉ. गामा पिंत प्रकरण जरासें मागें पडतें न पडतें, तोच सि. कोंस्तास रोक द कोस्त ह्यांस पदच्युत केल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. हे उभयतां हिंदी गृहस्थ अद्वितीय पोर्तुगीझ वैद्य ह्या नावानें युरोपखंडांच्या ओळखीचें आहेत. त्यांच्या तोडीचा वैद्यक विशारद पंडित उभ्या पोर्तुगालदेशांतच नव्हे तर संबंध पोर्तुगीज राष्ट्रांत नाही. आणि ह्मणूनच यंदा लंडनांत भरणाऱ्या सर्वराष्ट्रीय वैद्यकपरिषदेस पोर्तुगीज राष्ट्रातर्फे त्यांस निमंत्रण आलें होते. सि. कोस्त ह्यांचे नाव माहीत नाही. असा वाचक विरळा. मोठ्या मिनतवारीनं बारदेश प्रांतातर्फे प्रतिनिधी ह्मणून पोर्तुगीज पार्लमेटांत बसलेले सि. कोस्त पुढें आपल्या विद्वत्तेनें, बुद्धिमत्तेनें आणि मुत्सद्देगिरीनें एवढ्या उच्च पदास चढले, की तसलें भाग्य फारच थोड्यांच्या वाट्यांस येत असेल. निरनिराळ्या राज्यांत पोर्तुगीस सरकारतर्फे ते वकील होते, व पुढें सर्वाधिकारी झाले. ह्या जागेवर असतांना त्यांनी पोर्तुगीज राष्ट्राची उत्कृष्ट कामगिरी केली. असो. तर अशा थोर योग्यतेच्या माणसांस कामावरुन दूर करून पोर्तुगीज सरकारने एतद्देशीय लोकांनी आपल्या मनोभूमीत लावलेल्या समतातरुवर जबरदस्त वार केला आहे, असे ह्मणण्यास मागें पुढे पाहण्याचें कारण नाही.

वरिष्ठ अंमलदार तितके झाडून सारें युरोपियन असावे हे विचार कदाचित माजी राज्यपद्धतींस शोभलें असते असें कोणी ह्मणेल तर ते देखील बरोबर होणार नाही. एकमुखी ह्मटलेल्या माजी राजसत्ता पद्धतींत एतद्देशीय लोकांची मोठी चलती होती, किंवा राजकारणांत निर्धास्तपणें व निष्प्रतिबंध वावरण्याची त्यांस मुभा होती, असें नाही. २१ सप्टेंबरसारखे चिरस्मरणीय दिवस गोव्यांच्या इतिहासांत नमूद झाले की ज्या दिवशी गोमंतकस्थनागरिकांची राजकारणांत डोकें वर काढण्याची उमेद काडतुसांच्या गोळ्याखालीं चिरडण्यांत आली होती, हें सगळें खरें. तरी पण तशा स्थितींत एतद्देशियांस डोकें किती वर काढतां येण्याची सवड सापडत होती, हे वरील दोघांही गृहस्थांच्या उदाहरणांवरुन लक्ष्यांत येण्यासारखें आहे. 'हिंदी गृहस्थ केवढाही सदाचरणी असला, तरी तो हिंदुस्थानांत अंमल चालविण्यास नालायक आहे.' अशी ओरड जबाबदार माणसें त्या काळी करीत होती.

तथापि डिस्ट्रिक्ट जज्ज व लष्करी खात्यांत जनरल, ह्या पदावर विराजमान झालेले बरेच हिंदी गृहस्थ आज हयात आहेत. आणि आज समतेच्या तुतारीची गर्जना कानठळ्या बसवीत असतां उच्चस्थानापन्न हिंदी गृहस्थ एक ना दुसऱ्या सबबीवर गडगडत खालीं येत आहेत, हें स्वार्थपर दृष्टीनें कौतुकास्पद वाटत असलें, तथापि नैतिक दृष्ट्या ग्रहणीयच होत, ह्यांत संशय नाही.

गेल्या ५ ऑक्टोबरला सुटलेल्या शेकडो तोफांच्या आवाजानें ज्या समतातत्त्वाचा विजय पोर्तुगीझ राष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांत दुमदुमवून सोडला, तें तत्त्व पोर्तुगीझ राष्ट्राच्या झेंड्यांवर लिहिलें गेल्यास आज २ वर्षे झाली. इतक्या अवधींत राजकीय बाबतींत गोमांतकस्थांचे पाऊल बरेंच पुढें पडलें असावें असा जर कोणाचा अजमास असेल, तर तो चुकीचा आहे, हें सिद्ध करण्यास मोठेसे आयास नकोत. 'आदमिनिस्त्रादोर' सारखेच जबाबदारीच्या जागांवरुन एकंदर सिवील हिंदी गृहस्थ दूर झाले आहेत ह्या एकाच गोष्टीवरुन विद्यमान सरकारचा काळ्या हिंदी लोकांवर विश्वास नाही ही गोष्ट स्पष्ट होते. व अविश्वास आहे तेथें अविश्वसनीय मानलेल्या माणसांविषयी तिटकारा येणें साहजिक आहे. अशा स्थितींत हिंदी लोकांचे डोकें वर यावें कसें? नाही ह्मणण्यास असंतुष्ट नेटीव शिक्षितांची तोडमिरवणी करण्याच्या इराद्यानें 'गांवावर वरात आणि दर्यावर हवाला' अशा मासल्याची 'रेजीस्त सिविलची निस्सत्व अंमलदारी तोंडावर टाकून फुकट धन्यवाद मिळविण्याचा प्रयत्न झाला आहे, हें मात्र खरें.'

सारांश गोव्याच्या राज्यकाराभारांत असो किंवा पोर्तुगालच्या राजवटींत असो, एतद्देशीय लोकांसंबंधाने प्रस्तुत जी उलथापालथ चालली आहे. ती पाहिली ह्मणजे पोर्तुगीज राष्ट्रदेवता एतद्देशीयांवर बरीच क्रुद्ध झाली असावी, असा संशय येतो, समतातत्त्वाचा घोष एकसारखा सर्वच चालू असतांना असा प्रकार व्हावा, ही गोष्ट प्रचलित राज्यपद्धतीच्या नांवास मोठीशी भूषणावह नाही. इंग्रजी हिंदुस्थानांत रिपब्लिक नाही, नव्हे त्याचें नांवही घेण्याची सोय नाही, अर्थात समतातत्त्वाचा घोष वेळी अवेळी कानी येण्याचा संभव नाही. असें असतांही स्टेट सेक्रेटरीच्या कौन्सिलांत हिंदी मेंबर बसूं शकतो. आणि आपल्या रिपब्लिकच्या राजवटींतून हिंदी

गृहस्थ एका मागून एक खड्यासारखे निवडून काढले जात आहेत, हा काय चमत्कार असावा, ह्याचा नीट उमज पडत नाही. गोमंतकस्थ हिंदुसमाज बड्या हुद्यांस नालायक आहे, असें ह्मणावें तर इंग्रजी हिंदुस्थानांतील त्यांचे देशबंधू व्हाईसरायांच्या मांडींशीं मांडी ठोकून राजकारणें करीत आहेत. पण इतकें लांब कशाला, खुद्द गोव्याचे पोर्तुगीज नागरिक इंग्रजी हिंदुस्थानांत मोठमोठ्या हुद्यांवर असलेले कोणास माहीत नाहीत? त्यापेक्षीं पात्रापात्रतेचा संबंध हा वगळण्याशीं नसून दुसरेंच काहीं तरी कारण त्याच्या बुडाशीं असावे, असा संशय येतो. माजी राज्यपद्धतीतलीं जबाबदार माणसें हिंदी अंमलदार हिंदुस्थानांतील पोर्तुगीझ मुलखांत जबाबदारींची कामें करण्यास लायक नाहीत असे उघड ह्मणत असत. आणि त्यावरुन पोर्तुगीज लोकांच्या मनांत हिंदी लोकांविषयीं अविश्वास वसत आहे. गोवा सरकारच्या मोठमोठ्या जागा गोवेंकरांच्या हातात दिल्या तर एकादे वेळीं पोर्तुगेजांविरुद्ध घोरपड उलटून हिंदुस्थानांतील मुलखास कायमचा रामराम ठोकावा लागेल असा संशय वसत आहे. असे स्पष्ट कळत असे. आतां तसें कळण्यास मार्ग नाही. उलटपक्षी 'तुह्मी आह्मी एक' असलीं गोडगोड वाक्यें तोंडानें उधळत असतात, त्या योगें नवख्या माणसाच्या बुद्धीस भ्रम होतो. तरी पण युरोपियनांच्या स्वभावाची ज्यांस बरीच ओळख आहे, त्यांना प्रस्तुत प्रकरणाच्या मुळांशी काय असेल, ह्याचा अंदाज होणार नाही, असें नाही आता इतकं खरें की, एखाद्याच्या दृष्टीस कांही काळबेरें दिसले. तथापि बोलणें हितकारक नाही. राज्यपद्धति राजसत्ताक असो, किंवा लोकसत्ताक असो, सत्ताधिकाऱ्यांविरुद्ध बोलावयाचें झालें तरी ते एकाकी करणें सुरक्षित नसते. बोलणाऱ्यांच्या पाठीमागें बहुजनसमाजाची तोंडें आ वासून राहिली पाहिजेत. तेव्हाच त्या बोलण्याचा प्रभाव पडावयाचा. निदानपक्षी बोलणारा सुरक्षित तरी राहतो. कायद्याच्या जाळ्यांत अडकत नाही. 'एकतर आह्मांला छळा, न पेक्षां आमची दहशत बाळगा, पण यःकश्चित मानून आमच्याकडे दुर्लक्ष केलेलें मात्र आह्मांस बिलकूल खपावयाचें नाही, असें ह्मणणारी व तदनुसार वर्तन करणारी लुई व्हेनिलो सारखीं निधड्या छातींची सत्यवक्ती माणसें केव्हांही झाली तरी दुर्मिळच असावयाची. ह्मणून सत्य तरी स्पष्ट बोलणें फारसें ऐकूं येत नाही. प्रस्तुत विषयासंबंधाने जो प्रकार चालला

आहे, तो स्पष्टपणें नमूद करणें सुरक्षित नसल्यावरुन येथेंच थांबलेले बरे.'

*(बुधवार, दि. ८ ऑक्टोबर १९१३)*

# मुस्कटदाबी

राज्यकारभार चालविण्याच्या जितक्या पद्धति आहेत, त्यांत रिपब्लिक ह्मणजे लोकसत्ताक, राज्यपद्धति श्रेष्ठ होय. कां, की, त्या राज्यपद्धतींत विशिष्ट लोकांकडेच राष्ट्राच्या बऱ्यावाईटाचा मक्ता न राहतां राष्ट्रांतील एकंदर लोकांच्या मर्जीनुरुप राज्यव्यवहार चालत असतो. अथवा असेंही ह्मणतां येईल, कीं ज्या राष्ट्राचा कारभार लोकांच्या इच्छेनुसार चालत असतो, तेथील राज्यपद्धति तेंच रिपब्लिक होय. लोकसत्ताक पद्धतीची महती ग्रंथकार गात असतात, तिचं खरें कारण ते हेंच, परंतु दुर्दैवाची गोष्ट ही, की वाङ्यांत नमूद झालेलीं तत्त्वें आणि प्रत्यक्ष व्यवहारांत घडणाऱ्या गोष्टी ह्यांत सदैव मेळ असतोच, असें नाही. किंबहूना विशेष महत्त्वाच्या प्रसंगी तात्त्विक विचार आणि व्यावहारिक आचार ह्यांत जमीन अस्मानाचें अंतर आढळतें. ज्यांचा देश त्यांच्याकरितां मोकळा असावा, हा निसर्गसिद्ध नियम ज्याप्रमाणें कांही बलवान स्वार्थी लोकांच्या हांवरेपणाखाली चिरडलेला आपण प्रस्तुत पाहतों, तद्वत लोकसत्ताक राज्यपद्धतीच्या उदात्त तत्त्वांची पायमल्ली झालेली पाहणें सध्या आपल्या नशिबीं आलें आहे. पण ह्यांत चमत्कारिक असें कांही नाही. स्वार्थीच्या जाळ्याचें पाश अतिशय कणखर असतात, त्यांस अंगबळाची जोड मिळाली, की मग विकृतीस पारावार नसतो. जगांत असा कोणताही प्रकार नाही की जो स्वार्थी लोकांच्या संसर्गानें दूषित झालेला नाही. तुह्मी कोठेंही पहा, तेथें स्वार्थलोलुप माणसांच्या विषारी पापमूर्तीचा सुळसुळाट हटकून दिसावयाचा. निर्दोष देवलोकाची कल्पना मानवांत दृढमूल होण्याचें कारण तरी हेंच स्वार्थी बलवंताच्या जुलमानें मानवीसमाज विकृत झाला नसता, सगळे निसर्गदत्त नियम सुरळीपणें चालले असते, तर देवलोक ह्मणून निराळें जग आहे. असें मानण्याची प्रवृत्तीच पडली नसती, अशी आमची समजूत आहे.

लोकसत्ताक राज्यपद्धतींत राष्ट्रीय सिंहासनावर राजपुरुष असतां कामा नये, अशी एक वहिवाट बनली आहे. वास्तविक पाहिले असतां, हा मुद्दा गौण स्वरुपाचा होय. मुख्य प्रश्न ह्मटला ह्मणजे राज्याचें बारीकसारीक व्यवहार एकंदर लोकांच्या किंवा त्यांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीच्या संमतीने चालावे, हा होय. पण आजकाल सगळ्या बाबतींत उलटापालट झालेली आपण पाहतों. मग वरील गोष्टी मात्र अढळ राहतील, हें कसें शक्य आहे! प्रस्तुत विषयांत गौण मुद्यास मुख्य स्थान मिळून महत्त्वाचे प्रश्न कोनाड्यांत रखडत पडले आहेत. एकमुखी राज्यपद्धतीहून शतपट जास्त जुलूम सत्ताधिकारीवर्गानें लोकांवर केला, तरी सिंहासनावर राजपुरुष नाही, अर्थात रिपब्लिक राज्यपद्धति आहे, ह्या नावांवर तो विकला जात आहे. दशरथी रामासारखा राजा असून तो कोळ्यामाळ्यांच्या सल्ल्याने राज्यशकट हांकीत आहे, तर त्या राज्यपद्धतीस लोकसत्ताक ह्मणण्यास काही हरकत नाही, उलटपक्षीं राजवंशाचा नायनाट झाला असून राष्ट्राचीं सूत्रें सामान्य लोकांपैकीं कांही जण बळकावून बसले आहे, व अधिकारमदानें अंध बनून लोकांवर मनसोक्त अरेरावी चालवीत आहेत, तर ते काही खरें रिपब्लिक होत नाही. लोकसत्ताक राज्यपद्धति खरीखुरी लोकसत्ताक असेल, तेथें जनसमाज असंतुष्ट राहणें कठीण आहे. आणि जनसमाज असंतुष्ट तर येथील राज्यपद्धति झोटिंगपाच्छाई नसली, तरी– एकमुखी आहे, असें मानण्यास अडचण नाही. आमचें राष्ट्र लोकसत्ताक पद्धतीनें चाललें आहे, अशी फुशारकी मारून, राजसत्ताक पद्धतीनें चाललेल्या देशांतील लोकांस, हिणविण्याचें एक साधन उपलब्ध होतें, तथापि फार दिवस 'अंदरकी बात' छपून राहत नाही. असलीं रिपब्लिक राष्ट्रें ह्मणजे 'नांव सोनूबाई आणि हातांत कथलाचा वाळा' ह्या ह्मणीची प्रत्यंतरें होत, हें विचारी माणसासच नव्हे, तर साधारण लोकांसही कळून येतें.

अयोग्य उपायांनी परक्यांचा मुलुख गिळंकृत केला आणि त्या जुलमी सांगाड्यास 'कायद्यानें स्थापलेले राज्य' अशी संज्ञा दिली, ह्मणून अन्याय नाहींसा होतो, असें नाही. 'ज्यांचा देश त्यांच्याकरिता' हे परम श्रेष्ठ कायद्याचें कलम. मनुष्याच्या कुजलेल्या मेंदूनें बनविलेले कायदे आणि

बसविलेले कर हे निर्दोष राहणें शक्य नाही. तसें निसर्गनिर्मित कायद्यानें नाही. ते काही काल जुलमांच्या ढगांखाली लोपून गेल्यासारखे दिसले, तरी अखेरीस उज्ज्वल तेजानें झळकावयाचे, असा अनुभव मनुष्यप्राण्यांस हजारो वर्षांपासून आला आहे. तथापि स्वार्थवश होऊन तो अन्याय करीत राहतो. आणि त्या अन्यायाचें मंडन व्हावें एतदर्थ विलक्षण कायदे करून ते सक्तीने लोकांकडून मान्य करून घेतो. तथापि असले लपंडाव फार काळ चालत नसतात. काळाच्या चाळणींतून अन्याय गळून जाऊन सत्य तेवढें शिल्लक राहणार, हें त्रिकालाबाधित तत्त्व त्यांस माहीत नसतें, असें नाहीं तरी पण आपली सद्दी चालत आहे, तोपर्यंत लोकांनी आपल्या वर्तनाविरुद्ध तक्रार करू नये, अशी त्यांची इच्छा असते. मुस्कटदाबी जन्मास येते, ती अशाच जुलमी सक्तीच्या पोटी.

रशियनशाही सारख्या एकतंत्री राज्यपद्धतींत मुस्करदाबी जन्मास आली, तर त्यांत आश्चर्य नाहीं. का कीं, त्या राज्यपद्धतींत राजपुरुषांची इच्छा किंवा लहर हाच कायदा असतो. 'माझी इच्छा हाच फ्रान्य राष्ट्राचा कायदा' असें नेपोलियन ह्मणत असे. तें वरील वहिवाटीस अनुसरून. तसा प्रकार रिपब्लिकची ध्वजा फडकविणाऱ्या राष्ट्रांत होणें, ही फार लाजिरवाणी गोष्ट आहे. भाषणस्वातंत्र्य हा रिपब्लिकन तत्त्वांचा उपमर्द करणें होय. हा उपमर्द करणारे अधिकारी रिपब्लिकचे अभिमानी ह्मणवीत असले, आपल्या सगळ्या शक्ती लोकसत्ताक राज्यसंस्थेच्या कल्याणार्थ खर्च होत आहेत, असें भासवीत असले, तथापि तेच त्या संस्थेचे शत्रू होत. भाषण स्वातंत्र्याचा दुरुपयोग होत असल्यामुळें निरुपायानें मुस्कटदाबी करावी लागली, असें जें अधिकारीवर्गाचें ह्मणणें असतें, त्यांत सत्याचा लेशही नसतो. आपल्या कृष्णकृत्यांविरुद्ध जाहीरपणें चर्चा होऊं नये, हाच मुस्कटदाबीचा गर्भित हेतु असतो. लोकसत्ताक पद्धतीच्या संघटनेंत नागरिकांचा भाषण स्वातंत्र्याचा हक्क अनुल्लंघनीय मानलेला असतो. पण प्रसंगविशेषीं शिरजोर अधिकारी त्या मर्यादेचा अतिक्रम करीतात. त्यायोगें समाजांत असंतोष उद्भवतो. तो परिणामी फार घातक होतो. राजसत्ताक पद्धती चालते अशा देशांतील धोरणी अधिकारी भाषण स्वातंत्र्यसंबंधाच्या बाबतींत जपून वागत असतात. भाषणस्वातंत्र्य अबाधित

राखलें तर असंतोषाचें गरळ वेळच्या वेळीं निघून जाऊन दिलसफाई होते, ती सुराज्यव्यवस्थेस हितकारक होते, हें त्यांच्या ध्यानांत असतें. अधिकारीवर्ग संबंधाने दिलसफाई होऊन प्रजेने संतोषानें वागावें, असा भाषण स्वातंत्र्य अबाधित राखण्यांत राजसत्ताक पद्धतीचा उद्देश असतो. लोकसत्ताक पद्धतींत जनसमाज हा धर्म आण अधिकारवर्ग हा चाकर असल्यामूळे भाषण स्वातंत्र्य ही सत्ताधिकारीवर्गाने मेहरबानीनें दिलेली देणगी असा अर्थ होत नसून, ती नागरिकांची एक बहुमोल संपत्ति आहे, असें मानण्यांत येतें. अर्थात ती हिरावून घेणारे अधिकारी हे बेकायदा दुसऱ्याची मालमत्ता हिरावून घेणारे, समाजंत जे नीतिभ्रष्ट लोक असतात त्यांच्याच दर्ज्याचे होत, असें ह्मणण्यास कायद्याची कोणतीही हरकत नाही. परंतु कृष्णकृत्यांविरुद्ध चर्चा होते ह्मणून भाषण स्वातंत्र्याचा हक्क जेथें हिरावून घेतलेला असतो, तेथें भाषण स्वातंत्र्य हिरावून घेणारे हे लोकसत्ताक राज्यपद्धतीचें सुयश चोरणारे चोर होत, असें ह्मणणाऱ्यांच्या मानेस कायद्याचा चाप बसण्यास उशीर लागत नाही. ह्मणून खरें बोलण्याच्या भानगडींत सहसा कोणी पडत नाही.

आपल्या नव्या करकरीत पोर्तुगीज रिपब्लिकच्या वहिवाटींतला गोवा प्रांत, ह्यांत वर उल्लेखिल्यासारखे अनन्वित प्रकार सत्ताधिकाऱ्यांच्या हातून होत नाहीत, हें आमचें महद्भाग्य होय. 'जोर्नाल द इंदिय' व इतर कांही पत्रांस बंदी झाल्याची बोलवा आहे हें खरें. तथापि हीं पत्रें बंद केल्याचें सरकारमार्फत जाहीर झालें नाही, त्यापक्षीं पत्रकर्त्यांच्या ढिलाईमुळें पत्रें बंद पडून अपयशाचे खापर अधिकाऱ्यांच्या माथ्यावर फोडलें जात असावें, असे गृहीत धरणें ठीक दिसतें. शिवाय अद्याप बरींच पत्रें प्रसिद्ध होत आहेत. पत्रकर्त्यांच्या डोक्यावरून कायद्याचा वरवंटा फिरल्याचें किंवा फिरणार असल्याचें अजून कोठें ऐकण्यांत आलें नाही. त्या गोवा सरकाराकडून उघड मुस्कटदाबी चालली आहे, असें सहसा ह्मणता यावयांचे नाही. अशाच मासल्याचा, लोकसत्ताक राज्यपद्धतीच्या नावांस साजेल असा, वर्तनक्रम ठेऊन अधिकारवर्गानें चांगला लौकिक मिळावावा अशी आमची मनापासून इच्छा आहे. अधिकारापासून बुध्दीला मोह होत असतो, हें खरें, तथापि तशा वेळी आपल्या आचरणाचें सुकाणूं बरोबर राखून जो अधिकारी प्राप्त प्रसंग

बिनखटका निभावितो, त्याचीच कीर्ति फार काळ टिकते. 'आली लहर तर केली बहर' असल्या उल्लू माणसाला व्यवहारांत मानधनाची प्राप्ति होणें मुष्कील आहे.

*(बुधवार, दि. १५ ऑक्टोबर १९१३)*

# स्वर्गीय राज्यसंस्थेची बदनामी

डॉ. कौसेर साहेबांसारखे सच्छील, नीतिमान पंडित गव्हर्नराच्या जागीं विराजमान होतील, तर माजी अन्यायी व दुर्वर्तनी सत्ताधिकाऱ्यांच्या गाफिलगिरीमुळे गोव्यांतील समाजव्यवस्थेंत जी घाण सांचली असेल, ती निघून जाऊन चिमुकला गोवा प्रांत, विशाल इंग्रजी हिंदुस्थानासचे केवळ नव्हें, तर अखिल आशिया खंडास आदर्शवत् होऊन राहील, अशी उमेद गेल्या तीन वर्षांपूर्वी लोकांनी मनात बाळगिली होती, परंतु ती विसरण्यासारखे जे अनेक प्रकार मध्यंतरी झालें, तें लक्ष्यांत घेतलें ह्मणजे विचारी माणसांची मनें खेदानें व्याप्त होतात. अर्थांत वरील मथळ्याचा लेख, हें दुसरें तिसरें कांही नसून तसल्याच एखाद्या कर्णकटू कर्मकथेचें तुणतुणें वाचकांच्या कानांशी वाजविण्याचा आज आमचा इरादा आहे, अशी वाचकांची ठाम समजूत झाली असली पाहिजे. आणि ती एका अर्थी वावगी नाहीं. यद्यपि गोव्यांतील बहुतेक भागांत चालणारा लष्करी अमल, वर्णद्वेषाग्नीच्या ज्वाळांनी होरपळलेला प्रदेश, मेडिकल स्कूल प्रकरणांत झालेला अनाचार ह्या किंवा असल्या प्रकारांचा उल्लेख आह्मी आज करणार नसलो, तथापि ज्या विषयावर दोन शब्द लिहिण्याचा आज आमचा मानस आहे, तो दुराचारी बायांच्या सुळसुळाटाचा विषय इतका किळसवाणा, अतएव तिरस्कारास्पद आहे, कीं नीतिदेवतेच्या दरबारांत पूर्वोक्त प्रकारांहून हाच ज्यास्त शिक्षार्ह ठरणार, ह्यांत शंका नाही. रिपब्लिकसारख्या स्वर्गीय राज्यसंस्थेच्या अमलांत अनिष्ट चालीच्या लोकांच्या वर्तनास आळा नसावा, किंबहुना त्यांना आपला धंदा राजरोसपणें चालवितां येऊन गोव्याचें नांव र्सत्र बद्

करण्याची सवड सांपडावी, हें फार लांछनीय होय. सत्ताधिकाऱ्यांच्या ह्या अक्षम्य शिथिलतेबद्दल कितीही कडक शब्दांनी निषेध प्रदर्शित केला, तरी तो थोडाच होणार.

युरोपियनांचा पादघात पहिल्यानें सोसल्याबद्दल अखिल हिंदी जनतेच्या तिरस्कारास गोवा प्रांत मागें जितका पात्र झाला नसेल,त्याहून किती तरी पटीनें तो आज दुराचारी बायांचें उगमस्थान झाल्याबद्दल झाला आहे. ह्या खेदजनक स्थितींत पालट केल्याचें यश माजी राजवटींतील अधिकाऱ्यांस मिळवितां आलें नाही, हें एका अर्थी बरोबरच होतें. कां, कीं तत्कालिन राजसत्ताच अनीतिदोषांच्या भारानें इतकी वांकलेली होती कीं, ती जमीनदोस्त होण्यास यत्किंचित धक्का पुरेसा होता. मग तिच्या अन्नावर पोसलेल्या अमलदारांच्या कर्तव्यक्षेत्रांत नीतिजीवनाचा भयंकर दुष्काळ जाणवल्यास नवल कसलें? दुराचारी लोकांनी समाजांत पसरविलेला रोग, ज्यांस व्यवहारांत उपदेश अशी संज्ञा देतात, तो वस्तुत: आयुर्वेदानें उल्लेखिलेला उपदेशरोग नसून, त्याचें खरें नांव फिरंगरोग असें आहे, आणि तो फिरंगी अर्थात युरोपियन लोकांच्या संसर्गाने हिंदीसमाजांत शिरला आहे, असा शोध एका चिकित्सकानें नुकताच प्रसिद्ध केला आहे. तर अशा मासल्याचा अहेर करणाऱ्या लोकांकडून नीतिदेवतेची अर्चा न झाल्याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण नाही. पण सध्याचा प्रकार निराळा आहे, निदान असावयास पाहिजे. प्रचलित राज्यपद्धती यद्यपि पूर्वोक्त लोकांच्या वंशजांनींच स्थापिलेली असली, आणि प्रस्तुत राजकारणांत प्रमुखत्वानें वावरणाऱ्या लोकसमूहांचे घटकावयव पूर्वींच्याहून भिन्न आहेत, असें मानण्यास सबळ पुरावें नसले, तथापि सद्यस्तन सत्ताधारी वर्गानें नीति हेंच ध्येय आपल्या नजरेपुढें ठेविलें असल्यामुळें, अनीतिकारक राजसत्तेच्या नादानपणामुळें लोकांत जो अनीतिप्रसार झाला असेल, तो काढून टाकून जनता निर्दोष राखणें हें त्यांचें अत्यंत जरुरीचें व अति पवित्र कर्तव्य होऊन बसलें आहे. रिपब्लिकची अब्रु राखणें असेल तर अधिकाऱ्यांनी ह्या नासक्या भागाकडे जरूर लक्ष पुरविलें पाहिजे.

दुराचारी लोकांच्या वर्तनास एकदम कडक मनाई करणें उचित, तरी अव्यवहार्य असल्यामुळें सत्ताधिकारी वर्गाच्या हातून तसें होणें कठीण आहे,

हें खरें, तथापि त्यांच्या वर्तनांत हळूहळू सुधारणा होईल, इतका बंदोबस्त राखतां येंणं अशक्य आहें, असें नाही. वास्तविक पाहिले तर तितकी कामगिरी माजी अधिकाऱ्यांकडून देखील होणं कठिण नव्हते. कां कीं माजी राजवटींतील पिनल  कोडांत अल्पवयीं मुलींस प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनें दुराचाराची दीक्षा देणाऱ्यांस शिक्षा सांगितल्या होत्या. सबब तितक्याकरिता निराळा कायदा घडविण्याची तसदी नव्हती. कायद्याची सक्त अंमलबजावणीच पुरे होती. पण ती कामगिरी त्यांच्या हातून झाली नाही. ही खेदाची गोष्ट होय. सबब अनिष्ट चालीच्या बायांस बेलगामी सोडून गोव्याचा दुलौकिक केल्याबद्दल माजी राजवटींतील  सत्ताधिकारी जबाबदार आहेत, हें उघड आहे. परंतु भूतकालिन गोष्टीबद्दल आतां हळहळत बसण्यापेक्षां वर्तमानस्थितींत सुधारणा होण्यासारखे प्रयत्न करणें जास्त शहाणपणाचें असल्यामुळें समाजगुरुंबरोबर प्रांतिक सरकार कोणत्या उपायांनी जागृत होईल, त्यांचेंच अवलंबन करणें अवश्य आहे.

माजी राजवटींतील पिनल कोडच आज अमलांत असल्यामुळें अनिष्ट चालीच्या बायांस जरब बसविण्यास सरकारास विशेष आयास पडणार नाहीत, हे कोणीही सांगेल. इंग्रजी हिंदुस्थानांत अमलांत असलेल्या कायद्यांच्या आंगी जरब बसविण्यापुरती शक्ति नसल्यामुळें इंग्रज सरकारानें तेवढ्याकरितां नवीन कायदा करू घातला आहे. तो बहुधा येत्या सालापासून अमलांत येणार, अशी आशा आहे. पोर्तुगीज पिनल कोडांतील नियमांचा व होऊं घातलेल्या इंग्रजी कायद्याचा आशय साधरणत: सारखाच आहे. इंग्रजी कायदा अमलांत येण्यास सुरवात झाल्यावर देखादेखीनें किंवा इंग्रज सरकाराच्या सुचनेवरून पोर्तुगीज सरकारनें जागृत होऊन कायदा परजळीत बसण्यापेक्षां अगोदरच स्वकर्तव्यदक्ष राहणें फार भूषणास्पद आहे. रिपब्लिक राज्यपद्धती ह्मणजे केवळ उदात्त भावानांचे साम्राज्य असल्यामुळें तिच्या मुलखांत दुराचारी बायांचा सुळसुळाट व्हावा. हें फार लांछनीय होय. त्या स्वर्गीय राज्यपद्धतीची उघड उघड बदनामी होय. ह्मणून त्या प्रकारची उपेक्षा करणें वाजवी नाही. राज्यपद्धति कोणतीही असली तरी लोकसमाजांत अनीतिव्यवहार वाढू देणें हें वाईटच आहे. त्यांत स्वर्गीय राज्यपद्धति अशा अभिधानानें संबोधल्या जाणाऱ्या रिपब्लिकला

तर तें केवढें अनिष्ट आहे, हें उघड करून कोणास सांगावयास पाहिजे! तशांत नीतिप्रसाराचा डंका न वाजविणाऱ्या शेजारी सरकारानें हातपाय हालविण्यास सुरवात केली असतांही पोर्तुगीज रिपब्लिकनें पूर्वपरंपरेने साजेलशी ढिलाई दाखवावी, हें फार निंद्य आहे. हर एक आपत्प्रसंगात सांपडल्याकारणांनें ह्या बाजूकडे लक्ष देण्यास पोर्तुगीज सरकारास आजवर सवड मिळाली नाही, ही सबब खरी असो व नसो. तिच्या सत्यासत्येचा विचार न करितां ती सरसा मान्य केली, तरी यापुढें सरकारच्या तर्फेनें कोणतीच सबब पुढें आणतां येणार नाही, कीं जी सरकारच्या ढिलाईमुळें लोकमतांत उत्पन्न झालेला तिरस्कार साफ काढून टाकण्यास समर्थ होईल. दुराचारास आळा बसेल, असा कायदा आपल्या प्रांतांत नव्यानें केला पाहिजे असें नाहीं, हें आह्मीं वर सांगितलेच आहे. पिनल कोडांत जे यद्विषयक नियम आहेत, ते कडकपणें अमलांत आणणें, एवढेंच सरकारने करावयाचें आहे. तें मन:पूर्वक करून कौसेराधिष्टित सरकार नवीन राज्यपद्धतीची बूज राखील, अशीं आमच्याप्रमाणेंच परप्रांतस्थ लोकाग्रणींस आशा आहे.

बाकीचें कसेंही असो, सरकारच्या देखरेखीखाली चालणाऱ्या देवस्थानांच्या आश्रयास दुराचारनिरत लोकांचें क्षेत्र विस्तार पावत असतें, हा लज्जास्पद प्रकार सरकारी कायद्याच्या सक्तकटाक्षास पात्र झाला, तरी तितक्यानें उत्पन्न झालेलें अशांततेंचे ढग बहुतेक नामशेष झाले आहेत. अर्थांत लोकसुधारणाकार्य हातीं घेण्यास फुरसत नाही. असा प्रकार होणार नाही. तेव्हां प्रांताधिपतींनी ह्या भागाकडे लक्ष पुरवावें, अशी समंजस माणसांनी अपेक्षा केल्यास कांही वावगें नाही. समाजांत सुधारणेची नवीं रोपें लावण्यापूर्वी अनिष्ट विषवृक्षांची कांटेरी झुडपें तोडून प्रदेश सुधारणाक्षम करणें, हेंच विचारी माणसांना ज्यास्त पसंत होईल, असें वाटतें.

*(बुधवार, दि. २९ ऑक्टोबर १९१३)*

# तपाअंती राज्य

शिरोभागीं दिलेलें वाक्य ज्या सुभाषिताचा पूर्वार्ध आहे, तें सुभाषित महाराष्ट्रीयांच्या माहितींतलें आहे. विशेषत: त्याचें उत्तरार्ध जें अनीतिमान 'राज्याअंती नरक.' तें तर महाराष्ट्रीयांचा परिचयांचे - निवळ घरोब्याचें आहे. ह्या उत्तरार्धांत ज्याचा निर्देश आहे, ती आपत्ति महाराष्ट्रावर ओढवली असल्यामुळे सगळें सुभाषित शिरोभागीं देण्याची आवश्यकता वाटत नाही. शिवाय त्या आपत्तीच्या निरसनाचे उपाय पूर्वार्धांत स्पष्ट रीतीनें सांगितले असल्यामुळें आणि महाराष्ट्राला त्यांचीच विशेष जरुरी असल्यामुळें पूर्वार्धच ठळकपणें पुढें मांडणें श्रेयस्कर वाटतें. असो.

कंदमुळें खाऊन, किंवा निर्जन रानांत व्रतवैकल्यांनी देहदंडन करून, जीवित कंठिणें, ह्याचें नांव तप, आणि तसें आचरण केल्यावर राज्यप्राप्त होते, असा हिंदुलोकांचा समज होण्यास कोणतीं कारणें झालीं असतील तीं असोत, पण त्याच्यायोगें हिंदुसमाज राजकीय सत्ताधिकाऱ्यांपासून पराङ्मुख राहण्यास बरीच सवड सांपडली, हें मात्र खरें. खडतर तपाचरण करणें हें सामान्य माणसांच्या आवाक्यापलीकडचें असून तें फक्त अलौकिक विभूतींना साध्य होणारें आहे, अशी समजूत झाल्यामुळें, अर्थात सामान्य व सहज लौकिक प्रयत्नांवर अलौकिकत्वाचा छाप बसल्यामुळें सामान्य जनतेला राजकीय, अधिकार संपादन करण्याचें, नव्हे इच्छिण्याचें, धाष्टर्य अव्यवहार्य वाटूं लागलें. व्रतवैकल्यें किंवा तत्सदृश इतर साधनें, प्राचीन कालीं झालीं तरी, राजकीय सृष्टींत क्रांति घडवून आणण्यास असमर्थच असलीं पाहिजेत, असें ह्मणण्यास दिक्कत वाटत नाहीं, पण त्याबद्दल आज वाद उपस्थित करण्यांत स्वारस्य नाही. जुनें तितकें सोनें ह्मणणारे जें कोणी असतील, त्यांच्या मोहबतीखातर आपण असेंच गृहीत धरू कीं, वर उल्लेखिलेल्या नमुन्याचें तप आचरल्यावर प्राचीन काळी राज्यप्रप्ति होत होती. परंतु आजचा काळ तसले लोकोत्तर चमत्कार दिसण्याचा नाही. राज्य किंवा राजकीय सत्ताधिकार प्राप्त होण्यास तप तर अवश्य आहेच. पण तें सुद्धां नवीन पद्धतीनें संपादलें पाहिजे. व्रतेवैकल्यांनी दिव्य शरीर संपादन केलेल्या विभूति पाहून

दिपणारे आणि राजकीय हक्कांची सनद त्यांच्या झोळींत घालणारे सात्त्विक प्रभू सध्याच्या कालांत पृथ्वीच्या पाठीवर असतील, असें विधान मूर्ख माणसाखेरीज दुसरा कोणी करणार नाही. दुसरें हेंही लक्ष्यांत बाळगिलें पाहिजे, की आजकाल निवळ एकतंत्री राज्यपद्धति जगावर कोठेही नाही. कोणत्या ना कोणत्या बाजूने लोकांचा दाब राजसत्तेवर निर्वेध चालतो. अर्थांत एकादी दिव्य विभूति पाहून कदाचित् कोणा राजपुरुषाला, शिवाजी महारांजासारखी, राज्याची सनद झोळींत घालण्याची इच्छा किंवा लहर आली, तर तिचा तादृश उपयोग होण्याचा संभव नसतो. सारांश राज्यसत्ता ज्याप्रमाणें बहुमुखी बनली आहे, त्याच न्यायाने त्या बहुमुखी राज्यसत्तेपासून अधिकारसंपादन करण्यास व्यक्तिश: तपाचरण बिलकुल उपयोगीं नसून ते समायिक पद्धतीनें झालें असले पाहिजे. शिवाय त्याची पद्धत नवयुगास अनुरूप असली पाहिजे, हें वर सांगितलेंच आहे.

राजकीय हक्क संपादन करण्यास हिंदी लोकांनी कोणत्या पद्धतीने तपाचरण केलें पाहिजे, हें बऱ्याच देवदूततुल्य हिंदी पुढाऱ्यांनी स्वत:च्या आचरणानें लोकांच्या नजरेपुढें मांडलें, आणि सध्यांहि त्यांचें तत्संबंधी प्रयत्न चालूं आहेत, परंतु काय असेल ते असो, हिंदुस्थानांत वास्तव्य करणाऱ्या हिंदी लोकांवर त्यांचा ह्मणण्यासारखा परिणाम झालेला दिसत नाही. कदाचित् ह्यास कांहीं अनिवार्य अडचणी असतील. किंवा तपाराधनतत्परता पाहिल्यावर उचंबळणारी भूतें त्या पवित्र कार्यास व्यत्यय आणीत असतील, अथवा हिंदी वातावरण निगरगट्ट असेल. हें काही असलें, तरी आधुनिक तपोनिधींनीं केलेल्या प्रयत्नांस नजरेंत भरण्यासारखें भव्य फळ आजवर आलें नाहीं, हें नाकबूल करण्यांत अर्थ नाही. इतरत्र मात्र हे प्रयत्न बऱ्याच अंशीं फलद्रुप झालेले दिसतात, ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. राजकीय हक्कांच्या प्राप्तीसाठी महात्मा गांधी ह्यांच्याधुरिणत्वाखालीं प्रस्तुत आफ्रिकेंत जें तीव्र तपाचरण चालू आहे. त्याचें मनन केलें तर, हिंदुस्थानांत नाहीं तर नाहीं, तरी इतरत्र, हिंदी जनता राजकीय अधिकार प्राप्तीसाठी कराव्या लागणाऱ्या दारूण तपश्चर्येत बरीच तरबेज झाल्याचें दिसून येते. केवळ पोटावरच नजर ठेवून देशात्याग केलेली जनता, परंतु तपोनिधि गांधींच्या

सहवासाने आणि सदुपदेशानें किती सात्त्विक बनली आहे. सत्यधर्मानिमित्त हालअपेष्टा सोसण्यास सज्ज झाली आहे, हें पाहिलें ह्मणजे मन आश्र्यचकित झाल्याखेरीज राहत नाही. प्रस्तुत आफ्रिकेंत हिंदी लोकांनी जी नि:शस्त्र प्रतिकाराची चळवळ चालविली आहे, तींत काही गोष्टी इतक्या चमत्कारिक आहेत, की त्या ऐकिल्यावर, हिंदुस्थानाच्या उत्कर्षाविषयीं अगदीं निराश झालेल्या हिंदपुरुषाच्या आंगात आशेचें जीवन नि:संशय संचरु लागले. गांधींचा उपदेश घेतलेले पोटभरु लोक, पण तपश्चर्येंत गांधीवर सरशी करून 'शिष्यादिच्छेत्पराजयम्' ह्या वचनाची आठवण देत आहेत. कुसुमाहून मृदु मानलेली स्त्रियांची मनें वज्राहून कठीण बनलीं आहेत. प्रसूतिसमय जवळ आलेल्या बाया दु:सह प्रसववेदना, तापदायक प्रवास, रानटी प्रदेशयांतील अडचणी इत्यादी आपत्ति खिसगणतीत न धरतां, किंबहुना तशा स्थितींत बाळंतपणा आल्यामुळे मृत्युमुखी पडलेल्या नवजात बालकांचा शोक विसरुन सुधारलेल्या युरोपियन लोकांचा राक्षसी खुनशीपणा जगजाहीर करण्याचें दारुण काम नेटानें करीत आहेत, ह्याबद्दल त्यांची स्तुति करावी, कीं आफ्रिकन हिंदी लोकांच्या मनोभूमींत उदात्त विचारांची पेरणी करून योग्य काळीं भरपूर पीक घेणाऱ्या गांधीचे अभिनंदन करावें, हें समजत नाही.

तपाच्या अंती राजकीय हक्काची प्राप्ति व्हावी, हा सिद्धांत अबाधित आहे. सत्ताधिकारीवर्ग कितीही जुलमी असला तरी त्या सिद्धांतास बाध आणण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत नसतें, ही खात्री इतिहासग्रंथाने लोकांस पुरविली आहे. पोर्तुगीझ व चिनी लोकसत्तावादी माणसाची तपश्चर्या फलद्रुप झाली आहे, आणि आर्यलंड व रशिया देशांतील तपस्व्यांचे उद्दिष्ट सफल होण्याच्या बेतात आलें आहे. आणखी अशीं शेकडो उदाहरणें प्राचीन व अर्वाचीन इतिहासातून देता येतील. किंबहुना असेंही ह्मणता येईल कीं, राजकीय सत्ताधिकारांच्या मनसोक्त उपयोग घेणारे जे लोकसमाज आज विद्यमान आहेत, ते कमीअधिक मानानें तपोनिष्ठच आहेत. अर्थात राजकीय अधिकारांस हपापलेलें जे कोणी भिकारी दिसत असतील ते तपोभ्रष्ट होत. तपश्चर्या आवडत नसलेल्यांनी राजकीय हक्कांची अपेक्षा करू नये. असा बोध राजव्यवहारशास्त्रापासून मिळतो. तो आपल्या आफ्रिकन देशबंधूंनी

आपल्या मानावर ठसवून घेतला आहे. असें सध्याच्या व्यवहारावरून दिसतें. ह्यां बोधास अनुरुप अशी चिकाटीं त्यांनी दाखविली, तर जयश्रीची माळ त्यांच्या गळ्यात हटकून पडणार. कदाचित् प्रस्तुतच्या सत्याग्रहाच्या चळवळींत हिंदी लोकांची मनकामना अपूर्ण राहिली, आणि काफर लोकांच्या देशांत सुधारलेल्या गोऱ्यांनी वसाहत केली तर त्यांची मनें काफरांसारखीच काळीं होतात, असा कटु अनुभव आला, तरी हिंदी लोकांची तपश्चर्या विफल झाली, असे ह्मणता येणार नाही. प्रत्यक्ष फायद्याच्या दृष्टीनें जरी कांही दिसलें नाही, तरी अप्रत्यक्षत: हिंदी राष्ट्रांच्या खात्यास ती पुण्याई खास जमा होऊन, राजकीय अधिकारांस हिंदी समाज लायक झाला आहे, अशी सुधारलेल्या सुविचारी माणसांची खात्री होईल. हिंदी समाजाच्या एका चिमुकल्या भागाच्या तपश्चर्येस एवढें फळ आलें, आणि विचारमूढ झालेल्या असंख्यात हिंदी लोकांच्या मनांत जागृति झाली, तरी आफ्रिकेंत सात्त्विक बायांनी, सुकुमार बाळांनी आणि सन्मान्य पुरुषांनी जी हालअपेष्टा सोसली, ती सार्थकींच लागली, असें ह्मणण्यास कोणीच  माघार घेणार नाही, अशी आमची खात्री आहे.

कालवशात् तपोभ्रष्ट झालेल्या हिंदीसमाजांतून गांधीसारखे, स्वार्थावर तिलांजली देऊन लोकसेवेकरिता कारागृहवास पतकरणारे, महात्मे निपजत आहेत, हें आपल्या हिंदी राष्ट्राच्या भावी उत्कर्षाचें सूचकचिन्ह होय. असल्यालोकोत्तर महात्म्यांची हाडे कैदखान्यात झिजून समाजाच्या पापाचं क्षालन व्हावयाचें असा नियम आहे. आणि प्रस्तुत आपल्यांतली  जीं नररत्नें कैदखान्याच्या उकिरड्यावर लोळविण्यांत येत आहेत, तीं ह्याच नियमास अनुसरुन होत. ह्याबद्दल सामान्य माणसांना विषाद वाटला, तरी विचारी माणसांनी खेद बाळगण्याचें कारण नाही, हिंदी राष्ट्राच्या भूतकालिन पापांचें क्षालन वर्तमान कालांतील निवडक माणसांच्या तपश्चर्येनेंच झालें पाहिजे. तरच भावी कालांत उत्पन्न होणारें आपले वंशज व्यवहारासंग्रामांत टिकून राहतील. हे ज्यांच्या दीर्घदृष्टीस उमगलें, ते आपले देशबंधु स्वार्थत्यागपूर्वक लोकसेवा करीत आहेत. गोमंतकांच्या सुदैवाने तसलीं थोडीं रत्नें आपल्या वाट्यास आलीं आहेत. भावी पिढ्यांस ज्ञानदान देण्याचा स्तुत्य उद्योग ती

प्रस्तुत करीत आहेत तो उद्योग यशस्वी व्हावा, ह्मणजे लोकांनी त्यांना यथाशक्ती मदत करून आपल्या वंशजांस सुबुद्ध बनवावें, अशी आमची मनापासून इच्छा आहे.

*(बुधवार, दि. २६ नोव्हेंबर १९१३)*

# साम्राज्य भ्रम

माणसाच्या डोक्याला भ्रम झाला असला, तर तो उतरण्याकरिता एखाद्या तीव्र औषधाचें डोळ्यांत अंजन करावें लागतें. आधींच विकृतीनें गांजलेला आहे, त्यांत आणखी अंजनाचा प्रयोग करून दुखणाईतास त्रास देणें, हा निव्वळ क्रुरपणा आहे. असली सकृद्दर्शनी कनवाळू दिसणारी, परंतु परिणामीं घातक अशी बुद्धि आपण ग्राह्य मानली तर दुखणाईत लवकर बरा होण्याची आशा नसते. हें ज्याप्रमाणें आपण व्यक्तिविशेषाच्या बाबतींत पाहतो तसेच तें सामुदायिक बाबतीतही प्रत्ययास येतें. एखाद्या समाजास अयोग्य समजुतींचा भ्रम झाला तर तो उतरण्याकरिता काहीं तरी कडक प्रयोग त्यावर होणें जरूर असतें. होईल आपोआप सुधारणा, तितक्याकरिता कडक इलाज कशाला पाहिजे, असली मवाळ भाषा पुढे आणून उपाय लांबणीवर टाकले, तर समाजाच्या दुर्गतीस लवकर आळा पडण्याची आशा नको, सबब समाजाचें कल्याण चिंतणाऱ्या कुभ्रमपरिहारक असें एकादें झणझणींत अंजन डोळ्यांत पडत असलें, तर त्याबद्दल कुरकुर करितां कामा नये. उलट तसा उपाय सहजासहजीं होत असल्याबद्दल परमेश्वराचे आभारच मानावे.

ही विचारसरणी मान्य करून हिंदुस्थानचा गेल्या शतकांतला इतिहास आपण वाचला, तर हिंदुस्थानचीं साम्राज्यसूत्रें पांचसात शतकें हातांत खेळविणाऱ्या मुसलमानी राजसत्तेची इतिश्री झाली, ही गोष्ट फार चांगली, असेंच ह्मणावें लागेल. मुसलमानी राजांच्या कारकिर्दीत हिंदूंना कोणी धर्मवेडे, इमाम, काफर अशा निंदाव्यंजक नावांनें संबोधीत असले, तथापि लष्करांतील मोठमोठ्या जागा त्यांना मिळण्यास अडचण नव्हती, इतकेंच नव्हे, तर

सेनानायकत्व किंबहुना मुख्य प्रधानकीची वस्त्रें त्यांना दुष्प्राप्य नव्हती आणि आता 'तुमचा धर्म, तुमचा वेदांत, तुमचें वाङ्मय, तुमचें शील फारच उत्कृष्ट आहे बुवां, तुमच्या उपनिषदांसारखे ग्रंथ जगावरील कोणत्याच वाङ्मयांत सांपडावयाचे नाहींत, रामायण, महाभारत हे तर काव्यसृष्टींतले हिमनगच होत. अशी हिंदूंची अघळपघळ स्तुति सर्वत्र ऐकूं येत असली, तरी लष्करांत लेफ्टनेंटची जागा हिंदूंच्या हातास कोणी लागूं देत नाही. स्वर्गलोकांत देव होणें हिंदूंना आज शक्य आहे असें कल्पितां येईल, परंतु प्रधानपदावर आरूढ होणें मात्र मुळींच शक्य नाहीं. हिंदूंच्या राज्यांत हिंद्वेतरांना सजा होणें कठीण नाही, मात्र हिंदूंना आज हिंदुस्थानांत प्रधान होता येत नाही. तर अशा महत्त्वाच्या सवलती हिंदूंना मुसलमानीं राज्यात लाभत होत्या खऱ्या. तथापि साम्राज्यसुख बराच काळ उपभोगल्यावर माणसांस जो मद चढतो, तसला मद मुसलमानी समाजाच्या कपाळास चढला होता. आणि त्या योगें त्यांची दृष्टि धुंद झाली होती. ह्या विकृतीपासून हे मुक्त होणे जरूर असल्यामुळे त्यांच्या डोळ्यांत कडक अंजन पडणें जरूर होतें. आणि राज्यसुख उपभोगलेल्या समाजास पारतंत्र्यासारखे, निदान राज्यभ्रष्टतेसारखे  दुसरें कोणतेही उपकारक औषध नसल्यामुळें हिंदी मुसलमानी राजांस तेंच औषध हवें होते. सुदैवानें ह्मणा, दुर्दैवाने ह्मणा, मुसलमानांच्या डोळ्यांत तशा मासल्याचें दिव्य अंजन पडलें, ही गोष्ट फार चांगली झाली, असें ह्मटलें पाहिजे. राज्यभ्रष्टतेंचे अंजन डोळ्यांत पडल्यापासून हिंदी मुसलमानांची दृष्टि साफ होत चालल्याचें लोकनिदर्शनास येत आहे. हिंदु हे आपले देशबंधू आहेत, हिंदूंशी फटकून वागल्याने आपली उन्नति होणें शक्य नाही, ही जाणीव त्यांच्यांत उत्पन्न होत आहे. फाजील धर्मभोळेपणा शिक्षित लोकांत दिसून येत नाही. कुराणांत सांठविलेल्या ज्ञानापलीकडे आणखी काही नाही, ही कोती समजूत हळूहळू मावळत आहे. एकंदरींत उपरोक्त अंजनापासून मुसलमानसमाजाचें हितच झालें आहे. असे ह्मणण्यास प्रत्यवास नाही. आणखी कल्पनादृष्टींनें भावी कालाकडे पाहिलें, तर जेवढ्या मुलखाचें राज्य मुसलमानांकडून गमावलें त्याच्या किती तरी पट मोठें साम्राज्य त्यांना मिळणार आहे, असें चक्क दिसून येते.

शोगनांच्या घासाघिशींत घुटमळणाऱ्या राजसत्तेस अमेरिकन आरमाराच्या कपतानानें धक्का दिला, त्या वेळीं जपानी लोकांच्या डोळ्यांवरील धुंदी साफ उतरली. त्या काळीं जपानाला राज्यसुख थोडेंच उपभोगास सांपडत होतें, त्या मानानें त्यांना उन्मादही थोडा चढला हाता. अमेरिकन कपतानानें घातलेल्या थोड्याशा अंजनानें ते साफ बरे झाले आणि अविकृत समाजाकडून जी कृति होणे शक्य असतें, ती त्यांच्या हातून झाली. आपले वर्णबंधु चिनी लोक ह्यांना यथाशक्ती शुद्धिवर आणून जपान्यांनी सगळ्या जगास अशी दहशत घातली आहे, की पुढें मागें पीतवर्णी लोकच सगळ्या जगाचे अधिपति होतील. ह्मणजे मानसिक सृष्टींत जपान्यांनी जगाच्या स्वामित्त्वावर हक्क शाबीत केला आहे, असें समजावयाचे. मुसलमान लोक तर शूरत्वांत फारच नांवाजलेंले. तें जर खरोखरच अविकृत होतील तर सगळ्या पृथ्वीचें राज्य कमावणें त्यांना अशक्य आहे, असें नाही. गेल्या पांच आठ शतकांमागे त्यांनी ह्या दिशेनें प्रयत्न चालविले होते, व त्यांत बरेंच यश संपादन केलें होतें. आज संयुक्त युरोपियन राष्ट्रांनी लुबाडलेंले तुर्की साम्राज्य, ही वरील प्रयत्नांची एक खूण होय. तर अशी अवाढव्य कामगिरी करण्याचा सराव ज्यांना आहे, त्यांच्या हातांना तसलें यश पुन: मिळणें असंभवनीय आहे.

मुसलमानांस आपल्या प्राक्कालिन वैभवाची आठवण होऊं नये ह्मणून संयुक्त युरोपियन राष्ट्रांनी आज कित्येक वर्षांपासून जी खटपट चालविली होती ती तूर्त बरीच यशस्वी झाली आहे. ह्मणजे तुर्की- बाल्कन युद्धांत तुर्कस्थान सर्वस्वी पराभूत होऊन आपल्या वैभवास मुकले आहे. झालेल्या तहानें युरोपांत थोडासा मुलूख तुर्कस्थानास, तुर्कास मिळाला असला, तरी तितक्यानें तुर्काचें यश राखलें गेलें असें नाही. किंबहुना युरोपांतून तुर्कांची हकालपट्टीच झाल्यासारखी आहे, असें ह्मणण्यास हरकत नाही. इतक्यानेंही युरोपियन राष्ट्रांचे समाधान होत नाही, असें वाटतें. त्यांनी आशिया खडांतील तुर्की राज्यांत व्यापार, संबंध अशा सबबीवर हात पाय पसरण्यास सुरवात केली आहे. आणखी सध्याची परिस्थिति जमेस धरून बोलावयाचें झालें तर पुढच्या पांच पन्नास वर्षांत जगाच्या नकाशांतून तुर्की साम्राज्य, नव्हे तुर्कांचें संस्थान, समूळ उपटून काढलें जाईल अशी चिन्हें दिसत आहेत. सारांश

हिंदुस्थानांतले मुसलमान आणि तुर्कस्थानांतलें मुसलमान आणखी थोड्याच वर्षांनी राजकीय बाबतींत देखील परस्परांचे भाऊ शोभण्यासारख्या स्थितीत येतील, हें बहुतेक निश्चित आहे.

ह्मणजे एकंदरींत 'दुखणाईत राष्ट्र' या नावांने ज्यास संबोधित असत त्या तुर्की मुसलमान समाजाच्या डोळ्यांत वैभवशून्यतेचे झणझणींत औषध पडलें आहे. तितक्यानें हिंदी मुसलमानांसारखा तुर्की मुसलमान समाजही शुद्धबुद्ध होईल, तर मुसलमानांच्या इतिहासांत उत्कृष्ट क्रांति होईल, ह्यांत संशय नाही. आमची तर अशीं पक्की खात्री आहे, की प्रस्तुत प्राप्त झालेल्या अपप्रसंगातूनच तुर्की समाजाचें नशीब उदयास यावयाचें आहे. यास कारणामुळें त्यांस प्राप्त झालेल्या विपत्तीबद्दल आह्मांस तादृश खेद होत नाही. समाज वैभवाची शिळा डोक्यावर होती ह्मणून तुर्क बुडाले, तुर्कच केवळ नव्हेत तर समाजाचा भार ज्यांनी ज्यांनी आपल्या डोक्यावर घेतला आहे, तेही असेच बुडणार. आणि तो डोक्यावरचा भार दूर गेल्यावर हलके होत्साते हळूहळू उन्नत होणार. इतिहासाची साक्ष अशीच आहे. तिच्यावर भरवसा ठेवून वागणें यांतच माणसाचे हित आहे.

*(बुधवार दि. २४ डिसेंबर १९१३)*

# परिषदांचा मोसम

कोणत्याही विचारणीय गोष्टीविषयी विचार करून विद्वज्जनानुरोधाने बहुमतानुकूल एखादा महत्त्वाचा निर्णय ठरविण्यासाठी आपल्या ह्या आर्यावर्तात फार पुरातन कालापासून परिषदा भरून चर्चा होण्याचा संप्रदाय आहे. ऋषीकाली अशा प्रकारचा हा प्रघात होता, असें आपणास उपनिषदादिकांवरुन समजतें. हा संप्रदाय फार चांगला व फायदेशीरही आहे. अलीकडेही आपल्या ह्या आर्यभूमीत त्या जुन्या संप्रदायाची उजळणी करण्याचें आपल्या लोकांनी मनांत आणलें आहेसें वाटतें. वस्तुत: अलीकडील परिषदांचे हे स्तोम जुन्याकाळच्या परिषदांच्या अनुकरणेच्छेनें माजले नसून, ज्या त्या कामात

पाश्चात्यांच्या अनुकरणाची जी आपलेकडे प्रवृत्ति पडत चालली आहे, तिचा हा प्रभाव आहे. आज काल काळी परिषद, माळीपरिषद, दैवज्ञपरिषद, नामदेव शिंपी परिषद, जैनपरिषद, लिंगाईत परिषद, सारस्वत परिषद, मराठा परिशद, क्षात्रैक्य परिषद, त्वष्टाकासार परिषद असा जो हा नाताळच्या संधीस परिषदांचा धुमाकूळ चालतो, तो राष्ट्रपुरुषाच्या निरनिराळ्या अवयवांस नीट नेटकेपणा, खंबीरपणा, टणकपणा आणण्यास कारणीभूत होईल किंवा 'पोट आणि अवयव' या गोष्टींत प्रतिपादन केलेल्या तत्त्वाप्रमाणे राष्ट्रपुरुषांच्या कमजोरपणास साधन होईल अशा प्रकारचा एक प्रश्न राष्ट्रपुरुषाच्या समोर उभा राहिला आहे.

राष्ट्रीय सभेची घडी सुरत येथे विसकटल्यापासून ह्या निरनिराळ्या परिषदा भराभर अस्तित्वांत आल्या असल्यामुळें वरील प्रकारचा प्रश्न विचारी पुरुषांच्या डोक्यांत येणें सुशक्य असलें तरी, ह्या निरनिराळ्या परिषदांपासून होणारें कार्य राष्ट्रीय सभेच्या उद्देशाशी विसंगत असें नाही. आणि त्यामुळें राष्ट्रीय धोरणास व्यत्यय येईल असेंही नाही. राष्ट्रीय सभेच्या मागून चालणाऱ्या सामाजिक परिषद, प्रांतीयपरिषद वगैरे परिषदांची कार्ये जर राष्ट्रीय परिषदेच्या मुख्य कार्यांस हरकत आणणारी नसून पोषक अशींच होतीं, तर निरनिराळ्या ज्ञातिसमाजांनी घटित असा हिंदी राष्ट्रपुरुष हा ज्ञातिपरिषदांच्या स्वरुपाने आपली निरनिराळी अंगें ताजीं तवानीं करू लागल्यास त्यांत त्याच्या शक्तीचा ऱ्हास होईल असें मानण्याचें कारण नाही. मात्र ह्या परिषदांनी उचललेली कार्ये स्वत:च्या पुरतींच अमलांत आणण्यापेक्षा होता होईल ती इतर ज्ञातिवर्गासही त्याच्यापासून पुढें येतां यावें असें धोरण राखलें पाहिजे. 'परोपकारास घरांतून आरंभ होतो' अशी जी एक ह्मण आहे. तद्नुसार आपल्या बरोबर इतर समाजांजेही कल्याण करण्याचा जर ह्या निरनिराळ्या ज्ञातिपरिषदांनी उद्योग चालविला, तर परिणामी ह्या परिषदांपासून राष्ट्रपुरुषाला बरेच सामर्थ्य येईल असा अजमास करणें चुकीचे होईल असें वाटत नाही.

आपल्या ह्या गोवा प्रांतापुरता विचार मनांत आणल्यास ह्या परिषदांच्या संबंधाने त्याचें थोडेसे हित झालेले दिसेल. गेल्या तीन वर्षाखाली येथें ह्मापशांत जे सं. गौ. सा. ब्राह्मण परिषदेचे दुसरें अधिवेशन झाले, त्यावेळी

त्या सभेंत शिक्षणसंस्था स्थापण्याचा विचार होऊन आणि 'सारस्वतविद्यालय' नावाची शिक्षणसंस्था उदयास येऊन तिची आज प्राथमिक शिक्षण देण्याची कामगिरी प्रशस्त रीतीनं चालली आहे. अभेदभावाने सर्वांस शिक्षण देण्याचें ह्या परिषदेने आरंभलेले हें सत्कार्य गोव्यासारख्या विद्येच्या बाबतींत मागसलेल्या प्रांतास भारीच उपकारक होईल अशी अशा आहे. नुक्तीच या संस्थेला सरकारांतून शाळेच्या इमारतीसाठी जागा मिळाली आहे व त्या ठिकाणीं शाळेसाठी इमारत उठविण्याची तयारीही चालली आहे. प्रत्येक ज्ञातिपरिषदेनें अशा सत्कार्यांत राष्ट्रकार्यास पुष्कळच हातभार लागेल. व्यक्ती ही जसी समाजाची घटक आहे. त्याप्रमाणे समाज हे राष्ट्राचे घटक आहेत. समाज ज्या मानानें सुव्यवस्थित, संघटित व सुशिक्षित बनतील त मानानें राष्ट्र उदयोन्मुख होणार आहे. या दृष्टीनें ज्ञातिपरिषदा हल्ली जे काम करीत आहेत, तें परस्परानुकूलतेनें परस्पर सहानुभूतिपूर्वक चालू राहिल्यास राष्ट्रसुधारणेच्या बाबतींत पुष्कळच उपकारक होण्याचा संभव आहे.

जुन्या काळच्या परिषदा तरी हेंच काम करीत असत असें ह्मणावें लागेल. आत्मोन्नति कशी होईल 'कोऽहं कथमिदं जातं कोऽवा कर्तास्य विद्यते' इ. विचार करण्यासाठी ह्या प्राचीन परिषदा भरत असत. 'मी कोण, हें दृश्य विश्व कसें उत्पन्न झालें, ह्याचा कर्ता कोण असावा, ह्या जगाची उत्पत्ति कशापासून झाली असावी? इ. प्रकारचा विचार तत्कालीन परिषदांना करावासा वाटे. सध्याच्या परिषदांना देशकाळ परिस्थितींच्या परिवर्तनामुळे. 'आह्मी कोण होतो, आमचे पूर्वज काय करीत असत, ही आमची स्थिति इतकी खालावलेली कां दिसते, ह्या परिवर्तानाचें कारण काय, आमच्या ह्या ज्ञातीची उन्नति कशानें होईल. आमच्या ज्ञातीच्या अवनतीचीं कारणें कोण कोणती आहेत?' इ. प्रकारचा विचार करावा लागतो व तदनुसार आपली ज्ञातिसुधारणा करण्याकडे शहाण्या लोकांच्या विचारा प्रमाणे वळावें लागतें. हें काम काही वाईट नाहीं. तें असेंच विचारपूर्वक चालल्यास त्यापासन पुष्कळ हित होणारें आहे.

सं. गौ. सा. ब्रा. परिषदेनें आजपर्यंत ज्ञातिसुधारणेंत बरीच आघाडी मारल्याचे दिसून येते. आपल्या हिंदुस्थानांत ज्ञातिपरिषदा हा पुष्कळ काळापर्यंत

चालत आलेला विषय. पण त्याचा अतिरेक प्रत्येक ज्ञातीत अनेकदा रुढ होऊन परस्परांपासून अलग राहून किंबहुना परस्परांशी बद्धकटाक्षतेने वागून एकमेकांस सहाय करण्याऐवजी एकमेकांचा पाडाव करण्याकडे होत असतो त्याचा यावच्छक्य प्रतिकार करण्याच्या कामीं या परिषदेनें फारच स्तुत्य कामगिरी केलेली दिसते. ज्ञातींतील निरनिराळ्या पाठभेदांचे पूर्णक्य करण्याकडें ह्या परिषदेनें जन्मत:च आरंभ करून तें काम फार समाधानकारक रीतीनें बहुतेक अंशी पार पाडलें आहे असें ह्मणण्यास हरकत नाही. पहिला पाऊस पडल्यावर विहिरीतले पाणी गढूळ होते. व ऐन पाण्यांच्या टंचाईच्या दिवसांत तें बिघडलेलें पाहून कित्येक उत्तानदर्शी माणसांना 'काय ह्या पावसानें घाण करून टाकली. हा न पडता तर फार चांगलें होतं. असें वाटतें. पण विचारी माणसांस तसें दिसत नाही. वर्षभर स्वच्छ व मुबलक पाणी ज्याच्या योगानें मिळावयाचें तो पाऊस प्रथमारंभी विहिरीतलें पाणी गढूळ करतो ह्मणून पडू नये होता, अशा सारखी अविचारी विचारसरणी, ज्या अज्ञानी मंडळींची असेल, त्यांची कीव करून शहाणे लोक पाऊस इच्छितात. तसेच ह्या सं. सारस्वत परिषदेविषयी शहाण्यालोकांचे मत आहे. थोडीशी अज्ञ मंडळी, जुन्यास चिकटून राहणारी अप्रबुद्ध मंडळी आज कुरकुरत असली, तरी हळूहळू ह्यांचाही हा दुराग्रह कमी होईल व तसा तो थोड्याशा अवधींत होत चाललाही आहे. इतर परिषदांतूनदेखील असेच जोराचे आत्मोन्नतीचे प्रयत्न होत जातील तर ह्या परिषदांच्या मोसमांत जो हल्ली जिकडे तिकडे समाज सुधारणेचा प्रयत्न चाललेला दिसतो, तो यशस्वी होऊन कालांति त्याची गोड फळें आजच्या नसलीं तरी पुढच्या पिढीस चाखायला मिळतील. परमेश्वर तसें करो.'

*(बुधवार, दि. ३१ डिसेंबर १९१३)*

# राष्ट्राचे पुढारी कोण?

पशुपक्षांदिकांच्या समूहांतसुद्धा असें दृष्टीस पडतें की त्यांमध्ये श्रेष्ठ मानलेल्या एकाच्या अनुरोधानें बाकी सर्व वागतात. तर त्या पशुपक्षांहून

अधिक सज्ञान व सुसंस्कृत बनलेला असा जो मनुष्यवर्ग त्याच्या निरनिराळ्या समाजांत निदान एकादा तरी पुढारी असणें वाजवीं आहे यांत संशय नाही. परंतु हें विसरता कामा नये, की असा पुढारी बनूं पाहणाऱ्या व्यक्तीमध्ये तितकी योग्यता मात्र असली पाहिजे. एकादा कोणी उठून कृति करून दाखविल्याविनाच आपण समाजाग्रणी ह्मणून इतरास सांगू लागेल तर त्याचे फोल बोल हास्यास्पद ठरून तो लोकोपहासास पात्र होईल हे निर्विवाद होय. लोकांचे धुरीण बनण्यांस 'टांकीचे घाव सोसून आंगी देवपण' आणिलें पाहिजे, किंवा 'लोककल्याण साधावयास प्राण करी घेतलेल' लोकांच्या दृष्टोत्पत्तीस आलें पाहिजे, तेव्हांच लोकांच्या मनांत त्या व्यक्तीविषयी पूज्यभाव उत्पन्न होईल! वरपांगी दिमाखाने किंवा भपक्याने होणें अशक्य होय. लोकहिताचीं कामें करण्याची उमेद बाळगून अथवा सर्व समाजाचे बरें भलें करावें या सद्हेतूनें प्रेरित होऊन प्रयत्न करणाऱ्या माणसांनी याकरिता तनमनधनाने राष्ट्रहितासाठी झटलें पाहिजे. असें झाल्यासच त्या लोकांची त्यांवर श्रद्धा बसून पुढारीपणाची खरीखुरी योग्यता त्यांमध्ये येईल. गोड भाषणें किंवा अनेक वायफळ भूलथापा या कामीं बिलकूल उपयोगाच्या नाहींत. आपलपोटेपणाची कामें साधून घेण्याकडेच जास्त लक्ष पुरवून सगळ्या राष्ट्राच्या हिताहिताकडे, सुखदुःखाकडे जे ढुंकूनसुद्धा पहात नाहीत अशांस पुढारी मानून राष्ट्रातर्फे किंवा समाजातर्फे प्रतिनिधि ह्मणून कोणत्याही कौसिंलांत मत देण्याचा अधिकारी त्यांवर सोपविण्यात काय हंशील आहे? तें प्रतिनिधित्व मिरविण्याचा अधिकार त्यांस कसा पोंहचतो? उलट त्यांच्या उपद्व्यापापासून एकादा सुखकर मार्गसुद्धा कंटकमय व्हावयाचा हें खास! या पुढाऱ्यांचे ध्येय असें असावें की, होता होईतोपर्यंत जनहितांची कामें राज्यसत्ताधिकाऱ्यांकडून करवून घेऊन राष्ट्रहित साधावें. अशा विचारांचे व आचारांचे पुरुष राष्ट्रांत किंवा समाजांत विरळा, ह्मणूनच ''नृपति जन पदानाम् दुर्लभ : कार्यकर्ता,'' हें वाक्य सुभाषितकारांनी लिहून ठेविलें आहे.

बहुतकरून प्रचारांत असें आढळून येतें, कीं राष्ट्राचें हित राजयकर्त्यांच्या हिताहून भिन्न असतें व राष्ट्रहिताच्या दृष्टीनें प्रयत्न केल्यास राज्यकर्त्यांच्या अवकृपेस पात्र होण्याचा संभव असतो, अशा आणीबाणीच्या

प्रसंगी सर्व राष्ट्राचे बरें वाईट या पुढाऱ्यांच्या हातीं असतें. व अशा वेळीं तर या पुढाऱ्यांनीं पुष्कळ खबरदारी घेतली पाहिजे. कारण की, त्या कामीं या पुढाऱ्यांस हरएक प्रकारचे जाच सोसावे लागून अखेरीस त्यांच्या जिवावरसुद्धां संकट ओढवल्याचें इतिहासांतरी दृष्टीस पडतें, परंतु अस्सल देशभक्तीनें ओतप्रोत भरलेल्या पुढाऱ्यांस राष्ट्रहितापुढें हीं सर्व दु:खें असह्य न होतां प्राण गेला तरी बेहत्तर ह्मणून तें लोकहितासाठी स्वत:सुद्धां बळी पडल्याचें तोच इतिहास साक्ष पटवींत आहे. ह्मणूनच अशा या थोर पुरुषांची उज्ज्वल कीर्ति दिगंतरी पसरलेली आहे. उलट पक्षीं राज्यकर्त्यांच्या कृपेच्या सांवलीच्या आधारास राहावयास मिळावें ह्मणून राष्ट्रहित तुच्छ मानून जे पुढारी राष्ट्रास अपायकारक अशा सत्ताधिंकाऱ्यांच्या कसल्याही बेकायदेशीर वर्तनाकडे कानाडोळा करूं लागतात तेव्हां सर्व राष्ट्राच्या सुखाचें मातेरें होऊन अखेरीस सर्व दु:खांस कारणीभूत झाल्याचें खापर त्यांच्या माथ्यावर फोडण्यास सगळें राष्ट्र मागें पुढें पहात नाही. आमच्या या ह्मणण्याचे सत्यत्व पहाणें असले, तर सध्याचें पोर्तुगालातील पुढाऱ्यांचेच उदाहरण पुरे आहे. पोर्तुगालास प्रजासत्ताक राज्यपद्धति प्राप्त झाल्यास आज ४,५ वर्षे झाली, इतक्या अवधींत सर्व काही स्थिरस्थावर होऊन राष्ट्रनौका सुरळीत चालावयाची, स्वार्थदृष्टि नष्टप्राय होऊन तिची जागा सार्वजनिक सुखलालसेनें भरावयाची परंतु हें इच्छित सत्कार्य साध्य न होतां उलट आधीच राजपक्षीय पुढाऱ्यांच्या बेसुमार आपलपोटेपणामुळें जेरीस आलेलें पोर्तुगीज राष्ट्र रिपब्लिकन पुढाऱ्यांत माजलेल्या यादवीने अधिकच निकृष्टावस्थेस पोंचण्याच्या पंथास लागलें!

यांवरून असें कोणी समजूं नये, कीं कोणत्याही राष्ट्रांतील पुढाऱ्यांत एकमेकांत मतभेद असणें हें त्या राष्ट्रास घातक असून तें कधीही शांतिसुखोपभोगास लायक होणार नाही. पुढाऱ्यांत मतभेद असूं नयें असें आमचें ह्मणणें नसून मात्र त्या मतभेदाचें पर्यवसान स्वार्थ साधण्यांस होऊन नये. दुसऱ्या शब्दांनी सांगावयाचे ह्मणजे, राष्ट्रांतील पुढाऱ्यांचा मतभेदाचा उगम स्वार्थात असूं नये. Quot Capitatol Cententive ह्मणजे 'व्यक्ति तितक्या प्रकृति' हें तत्त्व जोपर्यंत अबाधित असेल, तोंपर्यंत त्याचें दर्शक जो मतभेद तोही अर्थांत आपलें अबाधित्व कायम ठेविल्याशिवाय राहणार नाही, हें उघड आहे.

राष्ट्राचे पुढारी कोण? या शिरोभागीं लिहिलेल्या प्रश्नाचें उत्तर देण्यास वास्तविक पाहातां इतका पाल्हाळ करण्याचें कारण नाही. कै. भारत सेवक गोखले यांस ज्या सद्गुण समुच्चयानें लोकमान्य पुढाऱ्यांच्या योग्यतेस चढविलें ते गुण ज्यांत अंशत: तरी प्रकट झाले आहेत, अगर व्हावयास लागले आहेत त्यांची गणना राष्ट्राच्या पुढाऱ्यांत करणें योग्य आहे. इतकें सांगितलें ह्मणजे राष्ट्राचे पुढारी कोण? हा प्रश्न साहजिकरित्या सुटतो

*(बुधवार, दि. २६ मे १९१५)*

# हिंदी स्वराज्य

कालचक्राच्या फेऱ्यामुळें सध्या युरोपखंडांत पेटलेल्या महायुद्धाच्या वणव्यांत बहुतेक राष्ट्रें होरपळत आहेत. त्यांपैकी पुढें प्राप्त होणाऱ्या जयापजयामुळे किती राष्ट्रें सुरक्षित प्रकारें निभावून ऐश्वर्यानंद शिखरावर विहरत राहतील व कितीकांचा चक्काचूर उडून तीं नामशेष होतील हे कांही आज नक्कीं सांगवत नाही. प्रत्येक राष्ट्र आपल्यापरी शौर्याचा, वीर्याचा, ज्ञानाचा, शस्त्रास्त्रांचा कडेलोट करून शत्रुपक्षाचा सत्यनाश करावा व त्यास जेरीस आणून कधीच वर डोकें काढता न यावें ह्मणून जिवापार श्रम करीत आहे. 'युद्धस्थ कथा रम्या' हें जरीं खरें आहे तरीही युद्ध हा एक प्रकारचा प्रलयकालच होय. अनेक रणधुरंधर नरवीर आपले देह धारातीर्थी घालून राष्ट्रकल्याणाची व स्वामिभक्तीची कमाला करीत आहेत. अशा या भयजनक देखाव्याची मनांत थोडीसुद्धां कल्पना केल्यास अंगावर शहारे उभे राहून बुद्धि कुंठीत होते. या चाललेल्या बेसुमार जन संहारामुळें पुष्कळ कुटुंबे अनाथ बनून त्यांची मुलेंबाळें पोरकीं होऊन अन्नान्न दशेस पोंहचल्यास त्यांत आश्चर्यकारक असें काहीं नाही, पण याचा परिणाम अतितृष्णेनें धुंद होऊन विचारांध बनलेल्या राज्यकर्त्यांच्या निगरगट्ट मनावर कसचा होतो! 'अतिलोभे न कर्तव्यं चक्रं भ्रमति मस्तके' या ह्मणीप्रमाणे अतिलोभामुळेंच झालेला हा बुद्धिभ्रंश होय असें ओघानें ह्मणावें लागतें - चालू महायुद्धाच्या मुळाशीं

बीजरुपाने वसत असलेली  जर्मनीच्या कैसरची राज्यविस्ताराची भयंकर लालसा आतां पूर्णावस्थेप्रत पोंहचून सध्याचा घनघोर रणसंग्राम हा त्याचा बनलेला व जोरानें फोंफावलेला प्रचंड वृक्ष होय हें सर्वांस कळून चुकलेंच असेल, परंतु कांही अनिष्ट प्रसंग पुष्कळदां बऱ्यासाठींच येत असतात, या एका पाश्चिमात्य सुभाषिताप्रमाणें, हिंदी लोकांची राष्ट्रकार्यी कसोटी कशी उतरतें असे पाहण्याची सुसंधि आली आहे असें वाटते. योगायोग कांही विचित्र असतात असें ह्मणतात तें खाटें नव्हें.

सांप्रतच्या महायुद्धांत संयुक्त त्रिकुटांत जर इंग्लंडचा समावेश झाला नसता, तर आज पाश्चात समरभूमीवर आमच्या तरवारबहाद्दर हिंदी शिपायांच्या आंगची खरी मर्दुमकी सर्व युरोपियन राष्ट्रांच्या दृष्टीस पडून त्यांस तोंडात बोट घालून आश्चर्यानें थक्क होण्याचा प्रसंग येतो ना! आंग्ल सम्राट, जार्ज बादशहा यांनी एकनिष्ठेने लढणाऱ्या हिंदी सैन्याच्या स्वामिनिष्ठेविषयी त्याचप्रमाणें पराक्रमविषयी वेळोवेळी काढिलेले उद्‌गार आमच्या ह्मणण्याची पुरीं साक्ष पटवित आहेत.

वर जरी आह्मी चालू महायुद्धाच्या शेवटीं विजयश्रीची माळ कोणत्या त्रिकुटाच्या गळ्यांत पडेल हें आजच अजमावतां येत नाही, असें विधान केले आहे, तरी परोपकाराकरिता व धर्मासाठी लढणाऱ्या संयुक्त त्रिकुटाच्याच वांट्यास नि:संशय यशप्राप्ती होणार असें वाटतें, आणि या संयुक्त त्रिकुटांत इंग्रजी राष्ट्र संभवत असल्यामुळें हिंदवासियांचेही नशीब उघडून त्यांनी आजपर्यंत इच्छिलेलें स्वराज्य त्यांस खचित मिळाल्याशिवाय राहणार नाही व उच्च मनोवृत्तीच्या  दयाळू इंग्रज सरकारच्या हृदयांत त्यांजविषयीं दयेचा पाझर फुटून राणी व्हिक्टोरिया हिच्या जाहीरनाम्यांतील या वचनांस मूर्तस्वरूप खास येणार अशीं आशा करण्यांस सबळ जागा आहे, कां की, ज्या प्रमाणें सामान्य व्यवहारांत सुद्धा आह्मीं एखाद्या कामकऱ्यांस त्याच्या श्रमाचा योग्य मोबदला देत असतों व काम मनाजोगते झाल्यास त्यास जास्त खुष ठेवण्यास मागें पुढें पाहत नसतों, त्याचप्रमाणें कृपावंत व कृतज्ञ इंग्रजसरकार हिंदीसैन्यानें बजाविलेली योग्य कामगिरी पाहून व हिंदुस्थानच्या सगळ्या राजेरजवाड्यांनी पुष्कळवेळा निरनिराळ्याप्रकारें दाखविलेली सहानुभूति लक्षांत आणून

हिंदीजनांस अभिष्ट फल देऊन संतुष्ट केल्याविना राहणार नाही.

या आमच्या ह्मणण्यावर कांही लोकांचा असा आक्षेप असणें शक्य आहे, की चालू महायुद्ध संपून रणदेवतेनें विजयश्रीची माळ इंग्रजी राष्ट्र सामील झालेल्या संयुक्तांच्या गळ्यांत घातल्यावर लांबलचक व कर्णमधुर पदव्यांच्या शेल्या पागोट्याशिवाय हिंदी लोकांस आणखी कांही मिळणें शक्य नाही. परंतु अशा व्यक्तींस आह्मी निराशावादी असें ह्मणतो. आह्मांस तर असा भार होत आहे, की इंग्रज सरकार हिंदुस्थानास स्वराज्य दिल्याचें पुण्य पदरी घेण्यास कधीच माघार येणार नाही. आमचे गुण कळूं येतांच कानडाप्रांतास स्वराज्य देऊन आपलें दानशूरत्व प्रगट करण्यांत जसें कसूर केलें नाहीं त्याच प्रकारें सध्याचें महायुद्ध संपताच आह्मां हिंदवासियांसही तें देऊन आपली निष्कलंक कीर्ति जगाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनी लिहिण्यास लाविल्याशिवाय इंग्रज सरकार कधीं राहणार नाही अशी आह्मांस पूर्ण खात्री आहे व ती सफल व्हावी असें मनापासून इच्छितो.

*(बुधवार, दि. ९ जून १९१५)*

# युक्ति कीं शक्ती ?

*श्रीकृष्ण ह्मणे भीमा*
*मतिबल हेचि मान्य सुकवीतें ।।*
*भुजबल तें एकादे*
*समयीं तत्काल ओठ सुकवीतें ।। १ ।।*

मोरोपंत हे स्वत: सुकवी असल्यावरून वरील आर्येत त्यांनी भुजबलाचेंच वर्णन केलें आहे. व व्यवहारांत देखील युक्तीहून शक्ती कमी प्रतीची ठरते. ह्यावरून जर कोणी शरीरबलाकडे दुर्लक्ष्य करून बुद्धिसामर्थ्य वाढविण्याकडेच विशेष लक्ष पुरवील तर, तें त्याचें कृत्य एकदेशीय ठरून त्यास, शक्ती किंवा बुद्धि यांपैकीं एकीचाही फायदा योग्य प्रमाणांत घेता

येणार नाही. एकटीसच महत्त्व दिल्यास दुसरीच्या अभावीं ती कमकुवत ठरते. हें मठ्ठ डोक्याचें लठ्ठ पहिलवान किंवा पुस्तकांची उघड झांक करून दमलेले शिक्षित लोक सिद्ध करितात.

पण या दोनही युक्ति-शक्तिची सांगड होऊन त्यांचे एकीकरण झालें ह्मणजे त्यांच्या अंगी एक प्रकारचें अलौलिक तेज उत्पन्न होतें, व या तेजामुळें मोठीं कार्ये घडून येतात. उलटपक्षीं, ह्मणजे , एकीकडे भुजबल व दुसरीकडे मतिबल अशी स्थिति असल्यास दोंहोंचाही व्हावा तसा उपयोग होत नसतो, इतकेंच नाहीं, तर कधी कधी ह्या बलांचा परस्परांत झगडा चालू असतो व मतिबलाची सरशी होण्याऐवजीं भुजबलाच्या आडदांड कृत्यांपुढे त्यास हार खावी लागते. दोनही प्रकारच्या बलांस परस्परांची किती आवश्यकता आहे हें अडाणी लोकांचे मन वळविण्यासाठी, एका शहाण्या रोमनास 'पोट व अवयव या कहाणीचा कसा उपयोग करावा लागला, ह्यावरून स्पष्ट कळूनं येतें.'

आजपर्यंत कोणत्याही कामांत पुढें गेलेल्या लोकांत दोनही प्रकारचीं बले वसत आलीं आहेत. मग तीं एका व्यक्तींच्या ठायीं असोत, किंवा अनेक व्यक्तींच्या ठायी असोत. ह्याच कारणामुळें अर्जुन भीमादिकांच्या प्रचंड शक्तीचें चीज होण्यास 'न धरीं शस्त्र करीं मी' ह्मणणाऱ्या परंतु योग्य प्रसंगी युक्तीच्या चारच गोष्टी, सांगणाऱ्या मतिबल कुशल कृष्णाची सहकारिता आवश्यक झाली. हें पौराणिक उदाहरण झालें, ह्याचें सादृश्य, कालाच्या मानानें जरा दूरचें झालें तरी स्थळाच्या मानानें अगदीं नजिकचें, ह्मणजे महाराष्ट्रांत घडलेले पहावयास सांपडेल. ते हेंच कीं शिवाजी महाराजांस स्वधर्मस्थापनेंचे ध्येय साध्य करण्यास मावळ्यांसारख्या रानटीं लोकांशी स्नेह करावा लागला. व स्वभुजपराक्रमांवर फाजील विश्वास ठेविल्यामुळें शूर भाऊसाहेब विश्वासरावांसह पानिपत येथें पतन पावलें.

सारांश काय, कीं स्वत:ची कमी अधिक प्रमाणानें किंमत नसणारी वस्तू ह्या जगांत नाही, पण पुष्कळदां असें घडतें कीं, दोन किंवा अधिक वस्तूंच्या एकीकरणानें बनणारी वस्तू तिच्या घटकांच्या किंमतीहून जास्त मोल पावते. हिरा झाला तरी कोंदणांत बसविल्याने त्याचें तेज खुलतें, व तो वापरण्यालायक होतो. हीच गोष्ट मतिबल व भुजबल या संबधानें दिसून येते.

भाग्यरवि अस्ताम जातां जातां पश्चिमेकडून आलेल्या किरणांनी डोळे दिपल्यामुळें प्राप्त झालेली कर्तव्यमूढता,व पुढें थोड्या अवकाशानें, स्वराष्ट्रतेज हीनतेमुळें झालेली दिशाभूल यांची गांठ झाल्यानंतर त्या गडबडीत कित्येक सद्वस्तू हरपल्या, त्या अद्याप सांपडल्या नाहींत! त्याचवेळी आमच्यांतील कित्येक शक्तींचा लोप होत चालला व ज्या कांही थोड्या निसर्गाच्या कृपेमुळें काळाच्या तडाक्यांतून निभावल्या त्याचा उपयोग योग्यरित्या होत नसल्यामुळें त्या एकमेकांस सहायकारी होण्याऐवजी समाजविघातक झाल्या आहेत.

आजपर्यंत वयोवृद्ध माणसांत मुरत आलेली पुराणप्रियता व तदुत्पन्न 'आह्मीं स्वीकारलेला पंथ खरा' असें ह्मणण्याचा हेका, व तरुण मंडळींचा सारासार विचार न करितां नवीन असें काही दिसल्यास, आपल्या समजुतीप्रमाणें बरें वाईट ठरवून एकदम त्याग किंवा स्वीकार करण्याची प्रवृत्ति, ह्या दोन परस्पर विरुद्ध दिसणाऱ्या गोष्टी आहेत खऱ्या, परंतु त्या वयोमानास शोभणाऱ्या व त्यांच्या त्यांच्या स्वभावात अनुरुप आहेत असें ह्मणणें वावगें होणार नाही. बरेच दिवस एकाच स्थितींत घातल्यानंतर सतत सानिध्यामुळें एकादी गोष्ट प्रतिकूल असली तरी, तीच आंगवळणीं पडल्यामुळें, चांगली असे मानून चालणें वृद्ध माणसांस भाग पडतें, व दुसऱ्या बाजूनें, नुकताच वयांत येत असलेल्या तरुण माणसाची वृत्ति निसर्गतः चंचल असल्यामुळें निरनिराळी मतें, भिन्न पंथ व बहुविध धंदे पाहून त्याची स्थिति इतस्ततः भटकणाऱ्या फुलपांखरासारखी असल्यास नवल तें काय? ह्या दोनही वृद्ध व तरुण माणसांच्या शक्तींचा विनियोग निराळ्या दिशेनें होत गेल्यास त्या सुपरिणामकारक कशा व्हाव्या? वर वर पाहणारांस ह्या शक्ती जरी विशेष महत्त्वाच्या वाटल्या नाहीत, तथापि व्यवहारांतील अनेक भानगडींशीं टक्कर देण्यांत ज्यांची शक्ती क्षीण झाली आहे, तरी त्यांपाशी अनुभवजन्य मतिबल असतें, व वयांत येत असल्यामुळें ह्मणजे शारीरिक वाढ जोरांत असल्यामुळे मानसिक शक्ती जरा मंदावते, अशा तरुणापाशी भुजबल असतें. ह्या दोनही मति - भुजबलांचा एकदिलाने संयोग झाल्यास, आजपर्यंत कठीण समजलीं जाणारी कार्ये सहज घडून येण्यास उशीर लागणार नाही असें वाटतें.

*(बुधवार, दि. १६ जून १९१५)*

# भारतीयांचे ध्येय कोणतें असावे?

## (१ – सांप्रतचे जगाचें ध्येय – स्वराष्ट्रहित.)

मनुष्यजातीच्या उन्नतीला ध्येयाची फार आवश्यकता असते. रानटीलोकांना आपले ध्येय काय आहे हें ठाऊक नसतें. उदरपोषण करून आपल्या मुलांबाळांचें कसेबसें संगोपन करावें हाच काय तो त्यांचा व्यवसाय असतो. परंतु वन्यावस्थेंतून पार पडलेल्या राष्ट्रांची दृष्टी एकदम आपल्या संततीच्या पलीकडे धाव घेते. ज्या समाजांत आपण जन्मलों त्याची सर्वोत्कृष्ट उन्नति हेंच त्यांचे ध्येय होऊन बसतें. ज्या आर्यलोकांनी हिंदुस्थानदेश जिंकला त्यांचे ध्येय अशाच प्रकारचें असावें असें वैदिक वाङ्मयावरून अनुमान करतां येतं. परंतु त्या ध्येयाचा विकास आमच्या ह्या देशांत फारसा झाला नाही. ग्रीक आणि रोमन ह्या आर्यलोकांच्या शाखांनी समाजोन्नतींचे ध्येय आपल्या उराशीं घट्ट बाळगून त्याचा आपल्या वाङ्मयावर आणि आचरणावर पूर्ण ठसा उमटविला. प्लेटो आणि ऑरिस्टॉटल या ग्रीक तत्त्ववेत्यांनी समाजोन्नतीचें ध्येय डोळ्यांसमोर ठेवून आपल्या तत्त्वज्ञानांची रचना केली आहे. प्लेटोनें प्रजासत्ताक राज्यपद्धतीची जी आपल्या ‘रिपब्लीक’ नांवाच्या पुस्तकांत काल्पनिक उभारणी केली आहे, ती केवळ हें ध्येय साध्य करून घेण्यांसाठीच होय. रोमनलोकांनी हेंच ध्येय पुढें ठेवून रोमन बादशाहीची स्थापना केली, असें इतिहासावरून दिसून येईल.

मध्ययुगांत युरोपखंडांत ख्रिस्ती धर्माची लाट सर्वत्र पसरल्यामुळे समाजोन्नतीचें ध्येय मागें पडून कॅथलिक धर्माला आणि त्या धर्माचें आचार्य रोम येथील पोप यांना फाजील महत्त्व आले. त्या कालांत शास्त्रीय विचारांची प्रगति झाली नाही. हुशार माणसाने मठांत शिरून संन्यासी होऊन जपमाला ओढीत बसावे असा प्रकार सुरू झाला व सर्वतोपरी लोकोन्नतीच्या कामाची हेळसांड करण्यांत आली. पंधराव्या शतकाच्या शेवटीं हा प्रकार बदलण्यास सुरूवात झाली. या सुमारास युरोपखंडांतील सामान्य जनसमूह जागृत होऊं लागला.

युरोपांतील या जागृतीची दृश्य आणि अदृश्य अशी पुष्कळ कारणें असतील. परंतु त्यांतील एका कारणाचा येथें उल्लेख केल्यावांचून राहवत नाही, कां, कीं त्या गोष्टीचा संबंध आमच्या इतिहासाशीं जडलेला आहे. युरोपांत पाद्री/ लोकांचे वर्चस्व वाढत गेल्यामुळें आणि अरबस्थानांतून महंमदीय धर्माचें तुफान जिकडे तिकडे पसरत चालल्यामुळें एशिया मायनरमध्ये, इतिहास प्रसिद्ध धर्मयुद्धाला (क्रुसेडस) सुरुवात झाली. याचा परिणाम असा झाला, कीं हिंदुस्थानांतून स्थलमार्गानें युरोपाशी चाललेला व्यापार बंद पडला. पुढें जेव्हां तुर्कलोक कॉन्स्टॅंटिनोपल येथें कायमचें ठाणें घेरून बसले, तेव्हां त्या मार्गानें युरोपकडे जाणाऱ्या हिंदी व्यापारावर ते जबरदस्त जकात घेऊं लागले. ह्या कराच्या रुपानें जमविलेल्या पैशांच्या बळावर मोठें सैन्य जमवून तुर्कलोकांना मेसॉपोटेमिया, अरबस्थानांतील पवित्र स्थानें आणि इजिप्त देश जिंकता आले. अर्थात युरोपांतील लोकांना पूर्वेकडील मालाची महर्घता, किंबहुना टंचाई अधिकाधिक भासू लागली.

याचा परिणाम असा झाला, कीं युरोपांतील पुढारी लोक हिंदुस्थानाकडे जाणारा स्वतंत्र जलमार्ग सांपडतो, कीं काय या शोधास लागलें. या कामी खटपट करणाऱ्या धाडशी लोकांना राजाश्रय आणि लोकाश्रय मिळूं लागला. स्पेनच्या राजाच्या मदतीने कोलंबसानें पश्चिम दिशेकडे हिंदुस्थान देशाच्या शोधार्थ सफर केली. त्या सफरीत त्याला जी जमीन आढळली ती आर्यभूमीच असावी अशी त्याची  समजूत होऊन त्यानें तिला (India) हेंच नाव दिलें. पुढें वास्को-द-गामानें पोर्तुगालच्या राजाच्या मदतीने खरोखरच जलमार्गानें आर्यभूचा थांग लाविला. हाच युरोपखंडाच्या जागृतीचा आरंभ होय. पुढें मार्टिन लुथर याने पोप महाराजांची सत्ता झुगारुन देऊन प्रॉटेस्टन्ट पंथाची स्थापना केली. त्यामुळें लॅटिन भाषेंतील बायबलाचेंच नव्हें तर इतर लॅटिन आणि ग्रीक ग्रंथांची देशी भाषांतून भाषांतरे होऊं लागली. व ग्रीक आणि लॅटिन संस्कृतीचा युरोपवर पुन:पगडा बसला.

मध्ययुगांतील युरोपाचें ध्येय ह्मटलें ह्मणजे ख्रिस्ती धर्माचा सर्वत्र प्रसार करावा, इतर धर्मीयांचा पाडाव करावा, पोप महाराजांची सत्ता अबाधित वाढवावी, व येणेंकरून मोक्षाचा मार्ग सुधारावा. पण ग्रीक आणि रोमन

संस्कृतींच्या अभिनव प्रवाहानें आधींच पाद्री लोकांच्या अरेरावी वर्तनानें दुर्बळ झालेंले हे ध्येय पार वाहून गेले, आणि याच्या जागीं जुनें राष्ट्रोन्नतीचें ध्येय पुनरुद्गत होऊन तें नव्या जोमानें वृद्धिंगत झालें. पोपच्या खालोखाल युरोपियन राजांची आणि सरदारांची जी अव्याहत सत्ता चालू होती, तिला आळा पडण्यास सुरवात झाली. व्हॉलटेर आणि रुसो ह्या फ्रेंच ग्रंथकारांनी तर 'ना विष्णु: पृथिवीपति' ह्या कल्पनेला धुडकाऊन लाविले. राजा प्रजेचा स्वामी नसून सेवक आहे अशी विचारसरणी जोरानें पुढें आली. राजांच्या आणि प्रजांच्या भांडणात सरतें शेवटीं युरोप आणि अमेरिका या ठिकाणी राजसत्तेचा कसा पराजय झाला हें इतिहासाच्या वाचकांस सांगावयास नकोच.

सध्या स्वराष्ट्रोन्नति हें युरोपीय राष्ट्रांचें अत्युच्च ध्येय होऊन बसले आहे. धर्म, नीति, न्याय इत्यादि सर्व गोष्टी गौण ठरून आपल्या देशाच्या हिताला प्राधान्य मिळाले आहे. युरोपांतील कोणत्याही राष्ट्रांतील माणूस आपल्या देशातील आपल्या प्राणांची देखील आहुति देण्यास एका पायावर उभा असतो, हें कोणाला सांगावयास पाहिजे काय? आजला इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया, प्रशिया इत्यादी देशांतील लाखो तरुण आपल्या सर्व सुखांवर पाणी सोडून आनंदानें समरांगणांत आपुलें प्राण ठेवित आहेत, किंवा आजन्म लंगडें लुलें होत आहेत, तें कशासाठी? आपल्या राष्ट्राच्या इभ्रतीखातर युरोपिय लोक खर्ची घालणार नाहीत अशी कोणती गोष्ट आहे? एशिया खंडांतील राष्ट्रांपैकीं जपानने स्वराष्ट्रोन्नतीचे ध्येय प्रथमत: उचललें ह्मणण्यास हरकत नाही. जपानची उन्नति पाहून तरुण तुर्कांनीही आपलें धोरण बदललें व सुलतानाच्या सत्तेला आळा घालून जपानी पद्धतीवर राजप्रजासत्ताक राज्याची स्थापना केली. चीननें तर त्याही पुढे धाव घेतली. म्यांच्यू राज्यघराण्याचें आणि चीनीप्रजेंचें कायमचें वाकडें आल्या कारणानें चीनच्या बालराजाला पेन्शन होऊन घरीं बसावं लागलें, व चीन देशांत फ्रान्सच्या आणि अमेरिकेच्या धर्तीवर प्रजासत्ताक राज्यपद्धती सुरू झाली. त्या सगळ्या जगावर चाललेल्या क्रांतीपासून आमचा देश मुक्त राहणें शक्य नाही. गेल्या दहा वीस वर्षांत भारतीय तरुण पिढीच्या विचारांचीदेखील विलक्षण क्रांति घडून आली आहे. वेडगळ धार्मिक समजूति, जातिमत्सर, प्रांतिक एकलकोंडेपणा, ह्या

सर्व गोष्टींना हळूहळू फांटा मिळत असून त्यांच्या जागीं भारतराष्ट्रोन्नतींचे एकच ध्येय जोमानें फैलावत आहे. आमच्यांतील नानाप्रकारच्या भेदभावांनी आजपर्यंत जें नुकसान झाले त्याचा विचार केला असतां राष्ट्रोन्नतीच्या ध्येयाचें व त्याच्या प्रसाराचें अभिनंदन केल्यावाचून कोण राहिल? हें ध्येय पुढें ठेवल्याने परंपरांच्या कलहात वृथा खर्ची पडणाऱ्या आमच्या शक्ती एकवटून राष्ट्राचें हित त्वरित साध्य होईल. याबद्दल कोणता सूज्ञ माणूस शंका घेईल? परंतु हेंच ध्येय श्रेष्ठतम आहे असें कबुल करण्यास आह्मीं तयार नाही. ह्याची सर्व फळें गोड आहेत असे नाही. पण हा लेख फार लांबल्यामुळे राष्ट्रहिताच्या ध्येयाच्या साधकबाधक परिणामाचा विचार पुढील अंकावर टाकणें भाग आहे.

*(बुधवार, दि. १४ जुलै १९१५)*

# भारतीयांचे ध्येय कोणते असावे?

## (२ – स्वराष्ट्र हिताच्या ध्येयाचे, इष्टानिष्ट परिणाम)

राष्ट्रहिताच्या ध्येयाच्या इष्टपरिणामांचे दिग्दर्शन मागल्या लेखात झालेले आहे. तथापि त्या संबंधाने ह्या लेखांत थोडा विस्तार करणें अनुचित होणार नाही. चवदावें शतक संपल्यानंतर युरोपखंडामध्यें जी नवीन जागृति उद्‌भवली तिला राष्ट्रहितध्येयाचें पाठबळ मिळाले नसते. तर ती टिकाऊ झाली नसती. स्वराष्ट्रहितध्येयाचें पहिले उत्तम फळ ह्मटले ह्मणजे अमेरिकेत जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या अध्यक्षत्वाखाली संस्थापित झालेली प्रजासत्ताक राजपद्धती होय. ह्या राज्यपद्धतीचे सुपरिणाम अमेरिकेवरच झाले आहेत असें नसून त्या काळच्या युरोपीयन राज्यपद्धतीवर देखील घडून आले.

अमेरिकन राजक्रांतीचा पहिला परिणाम ह्मटला ह्मणजे इंग्लंडांतील राजसत्तेला कायमचा आळा बसला, व बहुतेक सत्ता पार्लमेंटच्या हातीं गेली. दुसरा परिणाम.... ब्रिटिशवसाहतीला स्वराज्य मिळालें. कानडा,

न्यूझीलंड, साऊथ आफ्रिका, आस्त्रेलिया, इत्यादी वसाहती जरी ब्रिटिश साम्राज्याचे घटकावय आहेत, तरी त्या अंतर्गत राज्यव्यवस्थेसंबंधाने सर्वथैव स्वतंत्र आहेत. ह्या वसाहतींतील लोक अमेरीकेंतील स्वतंत्र संस्थानांतील लोकांप्रमाणें मायदेशाबरोबर युद्ध करण्यास उद्युक्त झाले होते असे नाही. परंतु या काळच्या दूरदर्शी ब्रिटिश मुत्सद्यांनी स्वतंत्र संस्थानांत घडलेल्या क्रांतीची पुनरावृत्ति ह्या वसाहतीत घडून येऊं नये, ह्मणून त्यांना आगाऊच स्वराज्य देऊन टाकिले.

ह्याशिवाय अमेरिकन राज्यक्रांतीचा अप्रत्यक्षः सगळ्या युरोपियन राज्यपद्धतीवर परिणाम घडून आला आहे. फ्रान्स देशांत रुसो, व्हॉलटेर प्रभृति ग्रंथकारांनी त्या काळी अस्तित्वांत असलेल्या अरेरावी राज्यसत्तेवर आपल्या वागस्त्रांचा एकसारखा भडिमार चालविलाच होता. इतक्यात फ्रेंच सरकारचे आणि इंग्लंडच्या तिसऱ्या जॉर्ज राजाचें वांकडे येऊन, फ्रेंचांनी बरी मोठी सेना अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांच्या मदतीस पाठविली. अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा परिणाम त्या सेनेवर इतका तीव्र झाला. की फ्रान्सांत ही सेना परत आल्यावर थोडक्यांच काळांत भयंकर राज्यक्रांति घडून आली. तिचा सविस्तर इतिहास फार बोधप्रद आहे. तथापि स्थलाभावामुळें त्याच्या उल्लेखापलीकडे दुसरे काही करितां येणें शक्य नाही. फ्रेंच राज्यक्रांति धडून आल्यावर पुन्हां एकवार नेपोलियनसारख्या अरेरावी बादशहाचा उदय झाला. पण तेल आटून गेलेल्या दिव्यांच्या वातीची ज्योत मंद होत जाऊन पुन्हा एकवार जोराने प्रकाशाते व तेथल्या तेथेंच लय पावतें तद्वत त्या क्षय्य राजसत्तेचा प्रकार झाला. आमच्या शेवटल्या पेशव्यानें जसा तुकारामाच्या ग्रंथावर बहिष्कार टाकिला होता तसा नेपोलियनने रूसो आणि व्हॉलटेर यांच्या ग्रंथांवर बहिष्कार टाकिला. परंतु काही केले तरी अमेरिकेतील स्वतंत्र संस्थानाचे डोळ्यांसमोर असलेले उदाहरण नष्ट करितां येणे युरोपखंड पादाक्रांत करणाऱ्या नेपोलियनला शक्य नव्हतें. शेवटी बरीच वर्षेपर्यंत फ्रान्सदेशांत राजसत्तेची आणि प्रजासत्तेची खेचाखेची होऊन राजसत्तेला कायमचा फाटा मिळाला.

फ्रेंच राज्यक्रांतीचा परिणाम केवळ फ्रांस देशावर घडून आला, असें नसून सगळ्या जगावर घडून आला आहे. एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला

इटलीनें अस्त्रियाचें जूं झुगारुन देऊन तो स्वतंत्र झाला. जोसेफ मॅझिनी आणि गॅरिबाल्डी या देशभक्तांना आपला देश स्वतंत्र करण्यासाठी किती हाल सोसावें लागले हे सुशिक्षित माणसांस सांगावयास पाहिजे असे नाही. पण शेवटी त्यांच्या दीर्घोद्योगाला यश येऊन इटली देश स्वतंत्र झाला. १८७१ साली रशियाने फ्रान्स देशावर हल्ला करून जय मिळविला. आणि त्याच संबधिं सर्व जर्मन राष्ट्राचें एकीकरण घडवून आणलें. १९ व्या शतकाच्या शेवटीं जपाननें आपल्या संस्थानिकांना इजा देऊन आणि पदच्युत करून मिकॉडोच्या नामधारी राजसत्तेखाली आपलें एकीकरण केलें. चीन देशांत झालेली क्रांति तर अगदीच ताजी आहे. ही सगळी घडामोड लोकांचे ध्येय बदलल्यामुळें झाली आहे. 'ना विष्णु: पृथिविपति:' ही कल्पना रुसो, व्हाल्टेअ इत्यादि ग्रंथकारांच्या परिश्रमानें नष्टप्राय होऊन गेल्यामुळे व निर्दिष्ट केलेल्या निरनिराळ्या राष्ट्रांतील लोकांनी आपली राजकीय सुधारणा स्वराष्ट्रहिताच्या तत्त्वावर दृष्टी देऊन घडवून आणली आहे व त्यामुळे या भिन्न भिन्न राष्ट्रांतील लोक पूर्वीपेक्षा सुखी आहेत असें ह्मणणें प्राप्त आहे. .

आतां दक्षिण अमेरिकेंतील संस्थाने जरी प्रजासत्ताक आहेत, तरी त्यांची भरभराट झालेली नाही. तेथे अद्यापि दंगेधोपे होऊन शांततेचा वारंवार भंग होतो. मेक्सिकोचं प्रकरण अजून विझले नाही. यावरून कोणी असें ह्मणेल की, प्रजासत्ताक राज्यपद्धति काही श्रेष्ठ नाही. आमचा ह्याविषयी वाद नाही, देशांत प्रजासत्ताक राज्यपद्धति असो, किंवा राजप्रजासत्ताक असो, लोकांचे ध्येय जर स्वराष्ट्राहित हे नसेल, तर त्या पद्धतीपासून त्या देशाला यत्किंचित्  फायदा व्हावयाचा नाही. देशाहितावर दृष्टि ठेवून जेथे राजकीय सुधारणा घडून येते. तेथेच ती लोकांच्या सुखाभिवृद्धीला कारणीभूत होते. केवळ क्रांतिसाठीच क्रांति घडवून आणल्यानें काहीच फायदा होत नाही. यांची उदाहरणें पुष्कळ सापडतील.

राष्ट्रहिताच्या ध्येयाने राजकीय बाबतीत जशा सुधारणा झाल्या, तशा सामाजिक बाबतींत देखील झाल्या आहेत. पूर्वी इंग्लंड वगैरे देशांतून लहान मुलांस कामाला लावून त्यांचे हाल करीत असत. हा प्रकार आतां बहुधा बंद झाला आहे. मंजूर लोकांची स्थिति सुधारण्यासंबंधाने सर्व सुधारलेल्या

राष्ट्रातून फार काळजी घेतली जात आहे. इतर बारीक सारीक सामाजिक गोष्टींतदेखील पुष्कळ सुधारणा झाल्या आहेत. त्यासंबंधीचा विस्तारपूर्वीक विचार करण्याचें हे स्थल नव्हे, तथापि कांहींचा उल्लेख केल्यावाचून राहवत नाही. अमेरिकेत पुष्कळ संस्थानांतून मद्यविक्रयाला मनाई केली आहे, आणि चीन देखील ह्या पदार्थाला जोरानं बहिष्कार घालीत आहे.

स्वदेशप्रीतीच्या ध्येयाने, धार्मिक समजुतीनें हितावह क्रांति घडून आली आहे. उपाध्यांयांच्या अप्रतिबंध वर्चस्वाला आतां सर्वराष्ट्रांतून फार आळा बसला आहे. खुद्द पोप महाराजांनादेखील लोकव्यवहारांत ढवळाढवळ करण्याचे सामर्थ्य राहिले नाही. आमच्याइकडे ह्या धार्मिक विचारांच्या क्रांतीचा आह्मास प्रत्यक्ष अनुभव येत आहे. परदेशगमन केल्याबद्दल कांही वर्षांमागे आमचे धर्मगुरु बहिष्कार घालीत असत. आणि त्यामुळे विलायत पाहून आलेल्या गृहस्थास फार जाच सोसावा लागे. पण आजला ह्या बहिष्काराला विचारतो कोण? ह्या आणि दुसऱ्या सुधारणा ज्या आमच्या समाजांत घडून येत आहेत, त्या केवळ आगगाडी आणि आगबोटी यांच्या जोरांवर घडून येत आहेत असें नाही. हिंदुस्थानांतील मागासलेल्या प्रांतातून आगगाड्या झाल्या असून सामाजिक आणि धार्मिक बाबतीत सुधारणा झाल्याचें दिसून येत नाही. याचें कारण स्वराष्ट्रहिताचे ध्येय त्या प्रांताला नीट समजले नाही. किंवा ते तेथे जागृत नाही असें ह्मणावें लागते.

*(बुधवार, दि. २८ जुलै १९१५)*

# आशावादी झाले पाहिजे

हिंदुस्थानची भवितव्यता प्रस्तुत कालांत तागडींमध्ये लोंबकळत पडली आहे. एका बाजूस निराशामय गाढ तिमिर आणि दुसरीकडे ज्ञानदीप या परस्परांमध्ये आमच्या देशांत जोराचा झगडा चालला आहे. हा झगडा किती काळपर्यंत चालेंल हे सांगतां येणे कठीण आहे. इतकेच नव्हें तर या उभयतांमध्ये कोणाची सरशी होईल हा एक आपल्यापुढें मोठाच प्रश्न

आहे. असा प्रकार असल्यामुळें हिंदुस्थानांत अनेक तऱ्हेचे पक्ष उत्पन्न होणें अपरिहार्य आहे, एखाद्या देशांत निरनिराळे पक्ष असणें हें त्या देशाच्या उन्नतावस्थेचें व जिवंतपणाचे उत्तम द्योतक होय. हें जरी खरें असलें, तथापि ज्यांना देशभक्ती ह्मणजे काय पदार्थ आहे, आणि स्वार्थत्याग कशाशी खातात ह्यांचें ज्ञान अजून झालेलें नाही असे काही उदरभरू लोक एखादा विशिष्ट पक्ष घेऊन भांडत असलेले आपण पहातो, अशा वेळी, आपल्या पक्षाच्या वास्तविक धोरणाचा विपर्यास करणाऱ्या या वावदुकांना महत्त्व देऊन, आपण त्या पक्षांचे गौणत्व केव्हाही सिद्ध करितां कामा नये. शुद्ध हेतूने देशाच्या कल्याणार्थ जे पक्ष आपल्या देशांत अलीकडे उत्पन्न होऊं लागले आहेत हे ह्या देशाचें दुर्दैव नसून सुदैवच होय, असे नि:शंकपणें ह्मणता येईल. ह्या पक्षांचे दोन मूलविभाग पाडतां येतील. हे मूलाविभाग ह्मटलें ह्मणजे, आशावादी (Optimistas) आणि निराशावादी (Pessimistas) हे होत. असे विभाग करण्याचें कारण हें कीं, राष्ट्राचे वैभव अथवा अवनति ह्या दोन पक्षांच्या संख्याबाहुल्यावर अवलंबून आहे. समजा की, निराशावाद्यांचे प्राबल्य देशामध्यें फार झाले आहे. अशा स्थितींत या लोकांपासून देशाला काय फायदे होतील? आपलें मत लोकांसमोर मांडण्याचा प्रसंग आला असता ते असें उदाहरण देतील :-

''एखाद्या जमीनदाराला दोन लक्ष रुपयांचे वार्षिक उत्पन्न आहे आणि दुसऱ्या एकाला शंभर रुपये वर्षातून मिळत आहेत. अशा वेळी शंभर रुपये घेणाऱ्या जमीनदारानें पहिल्या जमीनदाराची बरोबरी करू पहाणें मूर्खपणाचे होईल कारण पहिल्या प्रकारचा जमीनदार आपणास जी संपत्ति येत आहे तिचा किंचित अंश आपल्या जीवनाकरितां खर्च करून उरलेली रक्कम व्याजाला लावील व त्याची संपत्ति भूमितीश्रेणीने वाढत जाईल. उलटपक्षी, दुसऱ्या प्रतीच्या जमीनदाराला आपलें उत्पन्न पोटाची खळगी भरण्याला तीन महिनेसुद्धां पुरणार नाही, असें अनुभवास येईल. मग ह्याला उपरिनिर्दिष्ट श्रीमंताची बरोबरी करणें तर सोडा, पंरतु गणितश्रेणीने देखील आपली वाढ करून घेण्याची आशा नको. वरील दोन जमीनदारांमध्ये जो भेद आहे तोच भेद हिंदुस्थान व इतर राष्ट्रांमध्ये आहे. तेव्हां या अत्यंत निराशामय स्थितीत

आह्मी एतद्विषयक उन्नतीकरितां झटणे हा कालापव्यय नव्हे काय? दुनिया झुकती है, तीजबरोबर आह्मी झुकनेवाले होणें यांतच शहाणपणा आहे.''

ही त्यांची वकिली सकृतदर्शनी तर्कशास्त्रसिद्ध वाटतें खरी, परंतु त्यांत काही तथ्य नाही असे आपणास थोडा विचार केला असतां आढळून येईल. ''वैद्यबुवा, तुह्मी मला पुष्टिवर्धक काही औषध देणार ह्मणता, परंतु तत्पूर्वी तुह्मी, स्वतःच रोड आहां त्याला काही उपचार करां ना.'' असें डॉक्टरला एखाद्या दुखणाइतानें सांगणे जितकें शहाणपणाचें आहे, तितकीच शहाणपणाची ह्या निराशावाद्याची वरील विचारसरणी होय.

आतां आशावाद्यांविषयी विचार करू. परंतु त्यापूर्वी हें लक्षांत ठेविलें पाहिजें की काही लोक हिंदुस्थानच्या भविष्यकालाविषयी अत्यंत निराश झाले असूनही अथवा आपल्या ऐतखाऊ आयुष्यक्रमांमुळे त्यांनी असें उत्तमपणे सिद्ध करून दाखविलें असताही ते आपण मोठे आशावादी असल्याचा आविर्भाव आणतात. हा त्यांचा आविर्भाव अर्थातच फोल स्वरूपाचा होय. व ह्मणूनच ह्या लोकांना ह्या पक्षांतून वगळले पाहिजे. आतां महाराष्ट्रांतील खरे आशावादी ह्मटलें ह्मणजे न्या. तेलंग, न्या. रानडे, ना. गोखले, सर डॉक्टर भांडारकर इत्यादि निष्काम कर्मयोगी होत. हे सर्व मोठें आशावादी होते व डॉ. भांडारकरांचा आशावाद तर दैवी स्वरूपाचा आहे. समाजसेवेच्या अत्यंत कंटकमय प्रदेशांतून जातांना जी संकटे अनुभवावीं लागतात, ज्या समाजाच्या कल्याणाकरितां आपण झटतो त्याच समाजाकडून जे अपमान सोसावे लागतात, ज्या यातना भोगाव्या लागतात इतकेंच नव्हे तर जो छळ सोसावा लागतो तो अत्यंत दुःखकारक होय. तो छळ वरील महात्म्यांच्या पूर्णपणें वांट्याला आला असूनही त्यांनी आतला आशावाद कधीही भंगू दिला नाही. मायदेशावरील त्यांच्या निस्सीम प्रेमामुळे त्यांनी तो त्रास सहन केला आणि आपलें काम दुप्पट आवेशानें चालू ठेविलें. उलटपक्षी ह्या महाराष्ट्रीय धुरंधरांनी जर निराशावादाचें अवलंबन केले असतें, तर त्यांच्या बुद्धिसामर्थ्यापासून आह्माला काय लाभ झाला असता? अर्थात काहीच झाला नसता. आणि हिमालय पर्वतावर ज्याप्रमाणें कितीएक ठिकाणी गुलाब वगैरे फुलझाडांच्या ताट्याच्या ताट्या फुललेल्या असतात व किती

एक प्रकारची झाडे पिकलेल्या उत्तम फळांनी लावलेली असतात पण ती फुले कोणी पाहिल्या वाचून व फळे चाखल्या वाचून तेथल्या तेथेच गळून कुजून जातात, त्याचप्रमाणे या पुढाऱ्यांच्या अंगी उत्तम गुण असूनही उत्तम कार्य करण्याची त्यांच्या आंगी योग्यता असताही केवळ त्यांच्या निराशावादीमतांमुळें त्यांचे हे सर्व गुण व्यर्थ गेले असते व त्यांच्या हातून आमच्या देशाला काहीच फायदा झाला नसता. तेव्हां आशावादामुळें जीं कार्ये होऊं शकतात तीं निराशावादानें कधीही होणें शक्य नाही आणि ह्मणूनच हिंदमातेच्या प्रत्येक सुपुत्राने आशावादाचें अवलंबन केलें पाहिजे. असें झाल्यानेंच आपले व आपल्या देशाचें कल्याण होणार आहे.

*(बुधवार, दि. ४ ऑगस्ट १९१५)*

# भारतीयांचे ध्येय कोणते असावे?

## (३– स्वराष्ट्रहिताच्या ध्येयाचे अनिष्ट परिणाम)

गेल्या लेखांत राष्ट्रहिताच्या ध्येयाच्या इष्टपरिणामांचे दिग्दर्शन केलें आहे. आतां ह्या लेखांत त्या ध्येयाचे अनिष्ट परिणाम कोणते ह्याचा थोडक्यांत विचार करूं. राष्ट्रीय ध्येयाचा सर्वात मोठा दुष्परिणाम ह्मटला ह्मणजे राष्ट्राराष्ट्रातील स्पर्धा हा होय. युरोपियन राजनीतीचे धोरण पाहिलें असतां असें दिसून येईल की, आपल्या राष्ट्राचें घोडें पुढें सरकावून इतर राष्ट्रांना मागें पाडावें याबद्दल सर्व राष्ट्रांत भयंकर चढाओढ चालली आहे, सध्यां जो भयंकर संग्राम चालला आहे हें त्या चडाओढीचेंच फळ होय.

गेल्या दोन तीन शतकांत जी युरोपखंडांत सुधारणा घडून आली, तिचें ध्येय राष्ट्रीयत्वापलीकडे न गेल्यामुळें तिजपासून मनुष्यजातीचें व्हावें तेवढें हित झालें नाही. रुसो, व्हॉल्टेर प्रभूति फ्रेंच ग्रंथकारांना ‘जशी आपल्या देशबांधवांच्या स्वातंत्र्याची चाड होती, तशी ती आपल्या शेजारच्या राष्ट्रांतील लोकांच्या स्वातंत्र्यासंबंधाने नव्हती असे ह्मणण्यास हरकत नाही. अथवा त्यांनी

जरी इतरांसंबंधाने सहानुभूतिपर उद्धार काढले असले, तथापि फ्रेंच लोकांनी तशा विचारांना फारसें महत्त्व दिलें नसले पाहिजे. नाही तर आसपासचे सर्व देश पादाक्रांत करण्यासाठी त्यांनी आपलें नेतृत्व नेपोलियनसारख्या अरेरावी आणि महत्त्वाकांक्षी माणसाच्या स्वाधीन केलें नसते. 'आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति' त्या न्यायानें फ्रेंच राष्ट्रानें शेजाऱ्यांकडे पाहिलें असतें तर आजला युरोपखंडावर आणि तद्वारा सर्व जगावर ओढवलेले संकट आलेंच नसतें. परंतु फ्रेंचाचें ध्येय आपल्या राष्ट्राचे हित साधणें एवढेंच असल्यामुळे त्यांच्या पूर्वजांच्या संस्कृतीला सर्वच गोड फळें आलीं असें नाही.'

आलसे प्रांतात मुळची वस्ती ट्युटॅनिक (जर्मन) लोकांची. परंतु ह्या प्रांताच्या मालकीसंबंधाने फ्रांस आणि प्रशिया देशांत जवळ जवळ एक शतकापर्यंत मारामारी चालली होती. शेवटी १४ व्या लुईच्या कारकिर्दीत हा प्रांत सतराव्या शतकाच्या शेवटीं कायमचा फ्रांसच्या ताब्यांत गेला. पण एवढ्यानें फ्रांसची तृप्ति झाली नाही. १८ शतकाच्या शेवटी आणि १९ व्या शतकाच्या आरंभी नेपोलियन बोनापार्तच्या धुरेखाली फ्रांसाने जी युरोपखंडभर धुमाकुळ माजविली, तिचा प्राशियाला अधिक ताण पोंचला. ह्या कारकिर्दीत प्रशिया नामशेष होतो कीं काय अशी सर्व युरोपियन राष्ट्रांना भीती पडली होती. परंतु इंग्लंड, रशिया आणि आस्त्रिया या प्रमुख राष्ट्रांचा मिलाफ झाल्यामुळें त्या वेळी नेपालियनचा वाटर्लु येथे पुरा पराजय होऊन त्याला संट हेलिना बेटाची कायमची हवा मिळाली आणि विनाशोन्मुख प्रशिया कसाबसा बचावला.

१९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत जर्मन लोकांविषयी युरोपांतील इतर लोकांचे असें मत होतें, की हे लोक तत्त्वज्ञानावर प्रेम करणारे आहेत, परंतु यांनी प्रपंचापयोगी शक्तींचा विकास केला नाही. (अमेरिकनांचें हिंदु लोकांसंबंधाने असेंच मत आहे.) जर्मनीत कांट, शोपेनहार, हेगेल इत्यादि तत्त्ववेत्ते झाल्यामुळें त्याला पंडितांचा देश ह्मणत हे ठीक होतें. परंतु जर्मन लोकांवर नेभळेपणाचा आरोप करण्यांत येत असे हें योग्य नव्हतें, व त्यामुळें जर्मनांचें पित्त खवळत असावें. जर्मनींत तत्त्वज्ञानाची जशी वाण नव्हती, तशी शौर्याचीही नव्हती. परंतु जर्मनांतील अन्तर्गत फाटाफुटींमुळें त्या शौर्याचा

भलताच परिणाम होत असे. इंग्लंडचें आणि अमेरिकेंतील संस्थानांचे युद्ध चालू असतां इंग्लडंनें आपल्या मदतीस पुष्कळ जर्मन शिपाई भाड्यानें नेले होते अशी प्रसिद्धी आहे. त्यावेळी जर्मनीतील एखाद्या संस्थानिकास योग्य द्रव्य दिले असतां तो आपले सैन्य भाड्यानें देत असे!

इतर राष्ट्रांकडून होणाऱ्या नेभळेपणाच्या आरोपामुळें आणि फ्रांसाकडून वारंवार झालेल्या उपमर्दामुळें जर्मन लोकांचे तत्त्वज्ञान परमार्थाकडून प्रपंच्याकडे इतके वळले कीं त्यानें जणू काय इतर देशांतील प्रापंचिक (समाज) शास्त्रांचा सूडच उगवला! नेपोलियनचा वाटर्लू येथें पराजय झाल्यावर प्रशियानें आपलें राष्ट्रीय ध्येय दृढ करून गुप्त रीतीनें लष्करी सामर्थ्य वाढविण्यास सुरुवात केली. पाहिल्यानें डेन्मार्क सारख्या लहानसहान राष्ट्रांत हात दाखवून प्रशियाची स्वारी आस्त्रियावर वळली, आणि त्याचा पराजय केल्यावर पन्नाससाठ वर्षे डोळ्यांत सलत असलेल्या आपल्या शेजाऱ्यांवर काही कुरापत काढून हल्ला केला. फ्रांसाला प्रशियाच्या गुप्त तयारीची माहिती नसल्यामुळें आपण क्षणांत विजयी होऊं व प्रशियाला पादाक्रांत करून टाकूं अशी घमेंड वाटत होती. परंतु १८६०-७१ सालच्या लढाईचा परिणाम असा झाला कीं प्रशियानें आल्सेंस प्रांत हिसकावून घेऊन दोनशें कोट रुपयांची खंडणी घेतली, आणि ह्या संधीचा फायदा घेऊन पहिल्या विलियमला सर्व जर्मनीचा बादशहा ह्मणून खुद्द पारिस शहरांत अभिषेक केला. ह्या दिवसापासून सर्व जर्मन संस्थानें प्रशियाच्या धुरीणत्वाखाली एकवटल्यामुळें आणि सर्व देशभर लष्करी शिक्षण सक्तीचें केल्यामुळें, जर्मनीचे सामर्थ्य भलतींकडेच वाढलें.

मैत्रीनें क्रोधाला जिंकावे, खळाला साधुत्वानें जिंकावे, कृपणाला दानानें जिंकावें, असत्याला सत्यानें जिंकावें, ही बौद्धनीति, किंवा 'ह्या गालावर लावली असतां तो गाल पुढें करावा आणि कोट मागितला असतां ज्याकिटही देऊन टाकावें ही क्रिस्तनीति, राष्ट्रीय ध्येयाचें बाळकडू प्यालेल्या युरोपियन राष्ट्रांना आवडावी कशी? जर्मनीनें उगवलेला सूड फ्रांसानें कसा विसरावा? किंवा झालेली गोष्ट होऊन गेली आतां आपण सख्यानें वागूं असें जर्मनीनें तरी कसें ह्मणावें? पण फ्रांस पडला दुर्बळ. त्याला कोणीतरी बळकट मित्र मिळाल्यावाचून जर्मनीपासून आपलें रक्षण करिता येणें शक्य

नव्हतें. अर्थात त्यानें रशियाशी मैत्री जोडिली. त्याबरोबर इकडे जर्मनीनें आपल्या पूर्वीच्या शत्रूची आस्त्रियाचीमैत्री संपादन केली! अशा रीतीनें ह्या दोन राष्ट्रांच्या चढाओढीनें सध्यांचा अभूतपूर्व संग्राम उद्भवला आहे. आणि त्यापासून पृथ्वीवरील सर्व लोकांना दु:ख भोगावें लागत आहे. युरोपांतील शास्त्रज्ञांच्या शक्ती मनुष्य जातीचें दु:ख कमी करण्यांत खर्च व्हावयास पाहिजे होत्या, परंतु दुर्दैवाने त्यांचा विषारी धूर आकाशयानांतून टाकण्यासाठी नवीन बांब वगैरे मारक पदार्थांचा शोध लावण्याकडे होत आहे! ड्रेडनाट्र जहाजें, हाविटझर तोफा वगैरे युद्धोपयोगी सामान उत्पन्न करण्याकडें जें सामर्थ्य लागलें आहे, तें जगातील दारिद्र्य कमी करण्याकडे लागलें असतें तर आज कित्येक देशांतील लोक आप्त इष्टांच्या मरणामुळें जे दु:खाचे उसासें टाकीत आहेत तें निघालें नसते. एवढेंच नव्हें, गेल्या १९१४ च्या आगस्ट महिन्यापूर्वी जगांत जें समाधान नांद होतें, त्यापेक्षां कितीपटीनें अधिक समाधान सर्व लोकांत पसरले असते? परंतु राष्ट्रीय ध्येय पडलें खडतर, तें जगांतील सर्व राष्ट्रांना संतोषाने थोडेंच नांदू देणारे आहे!

*(बुधवार, दि. ११ ऑगस्ट १९१५)*

# भारतीयांचे ध्येय कोणते असावे?

## (४ – स्वराष्ट्र हिताच्या ध्येयाचें अनिष्ट परिणाम)

राष्ट्राराष्ट्रांत होणाऱ्या कलहालाच राष्ट्रीय ध्येय कारणीभूत झाले असें नाही. तदनुषंगाने आणखी पुष्कळ दुष्परिणाम ह्या ध्येयामुळें घडून आले आहेत. समजा दोघां गृहस्थांचे आपल्या शेताच्या सीमेसंबंधाने भांडण झालें आणि त्यांतील एकानें दुसऱ्याचा खून करून तंट्याचा निकाल लावला, तर त्याला आपण काय ह्मणूं? परंतु राष्ट्राराष्ट्रांतील लढ्याचा निकाल ह्याच मार्गानें लागतो, आणि ह्याबद्दल कोणालाही विषाद वाटत नाही. एखाद्या राष्ट्राच्या अंगी जर बळ असलें, तर त्याने खुशाल दुसऱ्याच्या घरांत शिरावें, त्याची

नासधूस करावी, बायकापोरांना ठार मारावें, किंवा त्यांचे समूल अस्तित्वच नाहीसें करून टाकावें, आणि ह्या सर्व गोष्टी आपण आपलें हित साधित आहों! ह्या तत्त्वावर योग्य ठरवाव्या!

आजकाल एक गृहस्थ दुसऱ्याचा मित्र असून तो जर त्याच्या शत्रूस जाऊन मिळाला, तर त्याला आपण विश्वासघातकी असें ह्मणतो. परंतु राष्ट्रांच्या व्यवहारांत याच्या उलट न्याय आहे. आपला फायदा घडत असला तर मित्राला संकटांत सोडून देणें, किंवा त्यावर उघडपणे प्रहार करणें हें राजनीतीला पसंत आहे. एवढेंच नव्हे, तर आपल्या दोस्त राष्ट्राच्या नाशाने आपला फायदा होत असला तर मॅकेयावाली सारखे राजकीय धुरंधर पुरुष त्या प्रसंगाला अमोलिक संधी असें ह्मणतात. तात्पर्य

*सत्यावृताच परुषा प्रियवादिनी च*
*हिंस्त्रा दयालुरपि चार्थपरा वदान्या ।*
*निव्यरव्यया प्रचुरनित्यधनागमा च*
*वेश्यांगनेव नृपनीतिररनेकरुपा ।।*

*केव्हां सत्य वदे वदे अमृतही केव्हां वेद गोडही केव्हां अप्रियही, दयाळूहि असे केव्हा करी घातही । जोडी अर्थाहि जे यथेष्ट समयीं कीं वेचही आदरी । ऐसी हे नृपनीति भासत असे वारांगनेच्या परी ।।*

ह्या भर्तृहरीच्या वचनाचा ह्या सुधारलेल्या युगांतदेखील पूर्णपणें अनुभव येत आहे!

राष्ट्राच्या बळकटीने सैन्य आणि द्रव्य हे दोन पाये होत. केवळ सैन्य असलें आणि द्रव्यबळ नसले, तर पुष्कळ वर्षे लढाई चालू ठेऊन शत्रूला जेरीस आणतां येणे शक्य नाही. इंग्लंडच्या मागें जर द्रव्यबल नसतें, तर नेपोलियनाबरोबर कित्येक वर्षे चाललेल्या युद्धांत शेवटी इंग्लंडला यश आले नसते. नेपोलियनला ही गोष्ट चांगली माहित होती. ह्मणून इंग्लंडच्या द्रव्याच्या उगमाशीचं त्यानें घाला घालण्याचा एकदा प्रयत्न केला होता. इजिप्त देशावर स्वारी करून साधल्यास हिंदुस्थानही जिंकावा असा एकदा नेपोलियननें घाट घातला होता. हें सुप्रसिद्ध आहे. परंतु नेपोलियनची मसलत

शेवटास गेली नाही. त्याला इजिप्त देशांतूनच मोठ्या कष्टानें स्वदेशी जावें लागले इंग्रजाचा व्यापार खुला राहिल्यामुळे द्रव्यबळ कायम राहिले व शेवटी नेपोलियनला हार खाऊन इंग्रजांचा कैदी होऊन राहणें भाग पडलें.

हें द्रव्यबल संपादण्यासाठी आमचे प्राचीन राजेरजवाडे पदरीं मोठमोठे व्यापारी बाळगीत असत. त्यांना श्रेष्ठ असें ह्मणत. असें सांगतात, की कोसल देशांचा राजा प्रसेनजित याच्या राज्यांत कोणी श्रेष्ठी नव्हता, तेव्हां त्यानें आपला मेहुणा मगध देशाचा राजा बिंबिसार यांजपाशीं मागून धनंजय श्रेष्ठींला आपल्या राज्यांत नेले. चक्रवर्ति राजांची जी सात रत्नें सांगितली आहेत त्यांत श्रेष्ठी हें एक रत्न आहे. लढाई उपस्थित झाली असतां श्रेष्ठी आपल्या राजाला वाटेल तेवढा पैशाचा पुरवठा करीत असत. त्या प्राचीन तत्त्वाचाच नव्या युगांत विकास झाला आहे असें दिसून येतें. प्रत्येक सुधारलेले राष्ट्र आपला व्यापार पुढें ढकलण्याची जी अविश्रांत मेहनत करीत आहे ती का? आपल्या देशांत संपन्न व्यापारी असले ह्मणजे परराष्ट्राशीं युद्ध जुंपल्यावर त्यांच्या द्रव्याचा राष्ट्राला उपयोग व्हावा, हाच व्यापार वाढविण्याचा मुख्य हेतु आहे.

ह्यावर असा एक आक्षेप येण्याचा संभव आहे की, व्यापाराच्या योगें राष्ट्रांत आलेलें द्रव्य युद्धालाच उपयोगी पडतें हें ह्मणणें बरोबर नाही, कां, राष्ट्रांतील सर्व लोकांना सारखेंच सुख होते. परंतु दूरवर विचार केला असतां ह्या ह्मणण्यांत तथ्य दिसत नाही. परदेशचा व्यापार हस्तगत केल्यानें काही व्यापारी गब्बर होतात, पण गरीब लोकांची स्थिती न सुधारतां अधिक कष्टप्रद होत असते, असे पुष्कळ तज्ज्ञांचे ह्मणणें आहे, काहीही असो, आजला जी परदेशचा व्यापार हस्तगत होण्यासाठी धडपड चालली आहे, ती केवळ आपल्या देशांतील गरीब मजुरांस श्रीमंत करण्याच्या उद्देशाने खास नव्हे. आपल्या शेजाऱ्यांवर वरचढ करण्यास हे एक साधन आहे, असें जाणूनच युरोपियन राष्ट्रांत परदेशीय व्यापारांत एवढी चढाओढ दिसून येत आहे.

परंतु ह्या चढाओढीचा परिणाम कित्येक ठिकाणी मोठा विलक्षण झाला आहे. आपल्या व्यापारास उत्तेजन मिळावें ह्मणून अमेरिकेसारख्या देशांनी परक्या मालावर भयंकर जकात लादली आहे. अमेरिकेत ह्या जकातीचा

परिणाम असा झाला आहे, की जी जी अमेरिकेत बनलेली वस्तु युरोपात १ रुपयाला मिळते, तिलाच खुद्द अमेरिकेत १॥ रुपया पडतो! कित्येक देशांत आपल्या व्यापाऱ्यांना दुसऱ्या देशांतील व्यापाऱ्यांशी स्पर्धा करून त्यांचा पाडाव करितां यावा या हेतूने मोठ मोठाली बक्षिसे सरकारांकडून मिळत असतात. या जातीच्या बक्षिसाला बांउटी (Bounty) असें ह्मणतात. इंग्लंडच्या वसाहती आणि ताब्यांतील देश-हिंदुस्थान वगैरे-फार मोठे असल्यामुळे असले कायदे करण्याचा इंग्लंडवर प्रसंग आला नाही. परंतु तेथे देखील बाहेरच्या मालावर जकात ठेवावी असे ह्मणणाऱ्या युनियनिष्ट पक्षाचें दिवसेंदिवस पाऊल पुढें पडत चालले आहे. सारांश, देशात द्रव्य यावें ह्मणून व्यापार पाहिजे, व्यापार चांगला चालावा ह्मणून जकात ह्मणजे, आणि तिनं काम भागले नाही तर आपल्या व्यापाऱ्यांस 'बांउटी' देऊन पुढें केले पाहिजे!

आगगाडी आणि आगबोट ह्या साधनांमुळे सर्व राष्ट्रांत दळणवळण वाढून परस्परांविषयी गैरसमज दूर होण्याची पुष्कळच सोय झाली आहे. ज्यांचे परराष्ट्रांत मित्र नाहींत असें सुधारलेल्या राष्ट्रांतील सुक्षितांत फार थोडे लोक सापडतील. मजूर लोकांतदेखील सर्वदेशीय मजुरांचा संघ (International Socialist Congress) इत्यादिक चळवळीच्याद्वारे परराष्ट्रांतील आपल्या व्यवसाय बंधुंशी विशेष दळणवळण वाढत असून तद्वारा मैत्रिचा प्रसार होत आहे. परंतु एका राष्ट्रीयध्येयामुळे ह्या सर्व गोष्टीपासून जगाला जो फायदा व्हावयास पाहिजे आहे, तो होत नाही. एकदा राष्ट्राचा प्रश्न झाला ह्मणजे मजुरांच्या सभांत फुट पडते, राष्ट्राराष्ट्रांतील पंडित लोकांत वाग्ययुकद्धाला सुरुवात होते, आपल्या प्रतिपक्षांची वर्मेकर्मे काढण्यांत राष्ट्रातील वर्तमान पत्रांची जणुकाय शर्यतच लागते! आणि हें सर्व कशासाठी? राष्ट्रीय ध्येय आह्मी सोडून देण्यास तयार नाही आहोत ह्मणून!

*(बुधवार, दि. १८ ऑगस्ट १९१५)*

# स्वदेशी व बहिष्कार

मोठ्या कल्पना एकदां अस्तित्वांत येऊन त्यांना व्यवस्थित स्वरुप प्राप्त झाले ह्मणजे मग त्यां विषयीं गैरसमज होवो, त्यांना अडथळा येवो, किंवा त्यांचा पाडाव होऊन काही काळपर्यंत त्यांना कोपऱ्यांत पडावे लागो, त्यांचा नाश ह्मणून कधीही व्हावयाचा नाही हे तत्त्व त्रिकालाबाधित आहे. *‘सकृत्कन्दुकपाते नोत्पतत्यर्यः पतन्नपि।।’* या श्लोकांर्धातील ‘अर्थ असा:’ आर्य ह्मणजे थोर लोकांना यथार्थपणे किंबहूना सर्वथैव लागू आहे. त्याचप्रमाणे मोठ्या कल्पनांना तो कमी लागू आहे. असे ह्मणता येणार नाही. पाश्चिमात्य विद्येपासून आह्मां भारतींयाना जर कोणता एखादा मोठा फायदा झाला असेल तो विचारक्रांति हा होय, हें आपण उदार अंत:करणानें कबूल केले पाहिजे, आणि स्वदेशाची जी वाढती भावना आज तरुण पिढीतील लोकांमध्ये प्रसृत होत आहे, तिचा उगम पूर्णपणे या विचारक्रांतीपासूनच झालेला आहे. हेही कोणाला नाकबूल करिता येणार नाही. कारण ‘त्याचिष्टे बहु, पाथ्येयते महि स्वराज्ये’ अशाप्रकारचे ‘स्वराज्याविषयक शब्दप्रयोग वैदिक वाङ्मयांत देखील आढळून येतात हें जरी खरे असलें, तथापि स्वदेशी हा शब्द वेदकालीनशा काय परंतु अगदी अलीकडील ह्मणजे पेशवाई बुडाली त्या काळच्या वाङ्मयांतसुद्धा या शब्दाचा उल्लेख कोठेंही आढळून येत नाही. किंबहुना एतद्विषयक भावना या पन्नाशीपलीकडील लोकांच्या स्वप्नी देखील नव्हती असें साधार ह्मणता येईल.’ स्वदेशी संबंधाची कल्पना अलीकडील आहे हें जरी यावरून सिद्ध झाले असलें, तथापि ही भावना हिंदुस्थानांतील प्रत्येक व्यक्तीच्या अंत:करणात असणें अत्यंत जरूरीचें आहे. कारण स्वदेशीचा प्रसार होणे ह्मणजे अर्थशास्त्रदृष्ट्या स्वावलंबनानें संरक्षण तत्त्वाचा स्वीकार करणें होय. स्वदेशीचा अभिमान धरणें हे उत्कृष्ट स्वदेशाभिमानाचें द्योतक आहे. स्वदेशीच्या प्रसारार्थ शक्य त्या रीतीने खटपट करणं हें उत्तम आत्म- संस्कृतीचे लक्षण आहे. स्वदेशीविषयी अत्युत्कट प्रेम असणें हें सात्त्विक मनोवृत्तीचे चिन्ह आहे. बंगालच्या फाळणीनंतरच्या चारपांच वर्षात स्वदेशीविषयी बंग लोकांना अनिवार प्रेम लोटलें होतें व त्याचें प्रतिबिंब

महाराष्ट्रातही काही काळ उमटलेलें दिसत होते, परंतु ते प्रतिबिंबच. ती काही अंत:करणातील खऱ्या कळकळीपासून उत्पन्न झालेली संवेदना नव्हती. याचा खरेपणा सिद्ध करून देणारी अनेक उदाहरणें आढळतील. गोमांतकांत देखील त्यावेळी काही बऱ्यावाईट लोकांनी स्वदेशी संबंधीचा उपद्व्याप केला होता. एकदा दे. भ. आपल्या नातेवाईकांच्या घरी गेला व त्याच्यापुढें चहा आला ह्मणजे त्यानें एकदम ह्मणावे ''साखरेत गाईच्या हाडाची पूड असते. असे आतां सिद्ध झालें आहे. मी काही परदेशी साखर खात नाही.'' परंतु स्वदेशीची लाट निघून गेल्यावर आणि पुण्यातील काही वर्तमानपत्राच्या संपादकांच्या लेखनस्वातंत्र्याला चांगली थप्पड बसल्यावर स्वदेशीसंबंधीचें आमचें प्रेम लयास गेले. सायकलची गति ज्याप्रमाणे पुष्कळांशी तीत असलेल्या वाफेवर, अतएव पंपावर अवलंबून असते, तद्वत हा कांहीसा प्रकार झाला. हें सांगण्याचा आमचा उद्देश हाच, की स्वदेशीविषयीचे प्रेम क्षणिक असते. आणि ह्मणूनच जे लोक पूर्वी साखरेला अथवा कपड्याला शिवत नव्हते, तेच आज परदेशी साखरेच्या धृतकुल्यामधुकल्यापासून व उंच उंच विदेशी कापड्यांकडून आपल्या आयुष्याचा सदुपयोग करून घेत असलेले दृष्टीस पडतात. हा प्रकार अत्यंत लांछनास्पद आहे. तरी ह्या पासून आतांच्या पिढींतील तरुणांनी स्वतंत्र विचार करण्यास शिकलें पाहिजे व ज्या गोष्टी आपणांस राष्ट्रहिताच्या दृष्टीनं अवश्य केल्या पाहिजेत असें वाटतें त्या गोष्टी केवळ तत्त्वाकरीतां आणि मनाच्या समाधानाकरितां मरेपर्यंत अबाधितपणें आचरिल्या पाहिजेत.

स्वदेशीमध्यें कांही आवेशी देशभक्तांनी बहिष्काराची वल्ली घुसडून दिली आहे. ती आमच्या मतें अत्यंत अनिष्ट होय. परकीय देशांशी देवघेव व अदलाबदल केल्याशिवाय कोणत्याही राष्ट्राची भरभराट होणें शक्य नाही. ह्या 'देशभक्तांनी' आपली मत्सरग्रस्त बुद्धीं बाजूला ठेऊन प्रो. भाट्यांच्या 'अर्थशास्त्राची मुलतत्त्वे' ह्या उत्कृष्ट ग्रंथातील खालील गोष्टींचा विचार करावा. प्रो. भाटे ह्मणतात, ''स्वदेशी आणि बहिष्कार यांचा संयोग ह्मणजे अमृत– विषाच्या संयोगासारखा आहे. कारण स्वदेशी ही प्रेममूलक भावना आहे तर बहिष्कार ही द्वेषमूलक भावना आहे, स्वदेशी ही सात्विक

मनोवृत्तिची दर्शक आहे, तर बहिष्कार हा तामसवृत्तीचा दर्शक आहे. स्वदेशी खऱ्या स्वदेशाभिमानाची सूचक, तर बहिष्कार पदेशाच्या वैराचा सूचक आहे. स्वदेशी ही संमोहक शक्ती आहे, तर बहिष्कार ही भेदक शक्ती आहे.' सारांश, स्वदेशीची भावना अर्थशास्त्रदृष्ट्या, सामाजिक दृष्ट्या सर्वांशी हितकारक व प्रवर्तक भावना आहे. तरी देशाच्या सांपत्तिक स्थितीत सुधारणेच्या मार्गात अशा हितकर प्रवृत्तीचा आह्मी उपयोग करून घेणे श्रेयस्कर आहे. आणि त्याचबरोबर बहिष्काराच्या भूताला गाडून टाकण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

अशी एक गोष्ट सांगतात, की एकेवेळी विद्या ब्राह्मणांकडे गेली आणि त्याची विनवणीं करू लागली, की माझे रक्षण कर. तेव्हां त्या ब्राह्मणानें विचारले, की तुझे रक्षण कसें करायचे? तेव्हां तिनें सांगितले. *'असूयकाया नुजवेऽयताय । मा ब्रूहि मां वीर्यवती, यथा स्वाम्'* आह्मीही असेच ह्मणतो की बहिष्काराच्या हातांत स्वदेशी केव्हाही देता कामा नये. बाकी प्रथमच विधान केल्याप्रमाणे ज्या अर्थी स्वदेशीची भावना आमच्यामध्ये प्रसृत पावली आहे. त्या अर्थी तिजवर बहिष्काररुपी कितीही संकटे आली, तरी आतां आपल्याला भिण्याचे कारण उरलेलें नाही हें खचीत आहे.

*(बुधवार, दि. १ सप्टेंबर १९१५)*

# भारतीयांचे ध्येय कोणते असावे?

## (५ – विश्वहिताचे ध्येय)

गेल्या चार लेखांत राष्ट्रहिताच्या ध्येयाचा आणि त्याच्या साधकबाधक परिणामांचा विचार करण्यांत आला आहे. आतां राष्ट्रीय ध्येयाच्या इष्ट आणि अनिष्ट परिणामाची तुलना करून त्यांत आधिक्य कोणाचें हें पाहण्याची आमची इच्छा नाही, राष्ट्रीय ध्येयानें घडून येणारें इष्ट परिणाम आह्मास पाहिजें आहेत आणि अनिष्ट परिणाम नको आहेत. मग ते कमी असोत किंवा जास्ती असोत. ह्यासाठी आह्मांस दुसरा एखादा मार्ग

आहे किंवा नाही याचा विचार केला पाहिजे. राष्ट्रीय ध्येयाला उराशी घट्ट बाळगल्यामुळे सांप्रत जगांत चाललेला ब्रह्मघोटाळा आणि विलक्षण गुंतागुंत यांजपासून मुक्त होण्यास मनुष्यजातीला एकच मार्ग आहे, आणि तो सर्वांनी सध्याचें ध्येय सोडून विश्वहिताचे ध्येय स्वीकारणे हा होय.

विश्वहिताचे ध्येय अंगिकारणे ह्मणजें शस्त्रेंअस्त्रें टाकून देऊन संन्यास घेणें नव्हे, हें वाचकांनी लक्षात ठेवावे. याचा अर्थ इतकाच, की आज सर्व सुधारलेल्या राष्ट्रांतील लोक केवळ आपल्या राष्ट्रासाठी वाटेल ती गोष्ट करण्यास तयार होतात. त्यांनी ती करण्यापूर्वी तिच्यायोगें आपल्या राष्ट्राचेंच नव्हे तर एकंदर मनुष्यजातीचं हित होईल की नाही याचा नीट विचार करून मग कार्यास प्रवृत्त व्हावें. युद्धकलेसंबंधानें तर आमचें असें ह्मणणे आहे, की ज्या राष्ट्रांतून आजला सक्तिचे लष्करी शिक्षण चालू नाही त्या राष्ट्रातून ते चालू झाले पाहिजे. परंतु त्याबरोबरच राष्ट्रातील तरुण पिढीला विश्वहिताला देहापर्ण करण्याचे बाळकडू पाजण्यांत आले पाहिजे. इंग्लंडने वाटर्लूच्या लढाईत फ्रेंचांचा पराभव झाला ह्मणून त्या दिवशी उत्सव करणे, रशियानें फ्रेंचांची मास्को शहरांत फजिती झाली ह्मणून मुलांकडून जयघोष करविणें, किंवा अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थांनांनी इंग्लंडच्या राज्यसत्तेला झुगारुन देणाऱ्या स्वतंत्रतेच्या जाहिरनाम्याचा वाढदिवस लाखों रुपयांचे दारुसामान जाळून आणि अमेरिकेन निशाणें जिकडें तिकडें फडकावून साजरा करणें हल्लीच्या काळी तरी किती विलक्षण दिसतें बरे! वाडवडीलांनी जोडलेल्या वैराची आठवण तरुण पिढींत जागृत ठेवून आपल्या शेजारच्या राष्ट्राला खजील करणें व तद्द्वारा जुन्या मरणोन्मुख वैराला उद्दीपित करणें सुधारलेल्या राष्ट्रांना कसें शोभत असेल कोण जाणें!

मनुष्य जन्मला तेव्हा स्वतंत्र असून सर्व ठिकाणी तो बंधनात सांपडला आहे. एक दुसऱ्याचा आपण मालक आहे असे समजतो, तथापि तो इतरांपेक्षाही खालच्या पायरीचा दास असतो (Roussau's Social Contracts-I) असे कां व्हावे? रुसोने ह्याचा सर्व दोष राज्यपद्धतीच्या माथी मारला आहे. परंतु आमच्या मतें राज्यपद्धतीलाच सर्वथैव दोषी ठरविण्यापेक्षा मनुष्यजातीच्या मनांतील लोभ आणि द्वेष ह्या दोन मनोवृत्तीला ह्या कामी

विशेष जबाबदार धरलें पाहिजे.' 'शत्रुवरदेखील प्रेम करा' अशी वाक्यें सर्व धर्मांत सांपडतात. पण आचरणांत मात्र ह्या वाक्यांचा काही परिणाम घडून आल्याचे दिसत नाही. असे का? आपल्या शेजारच्या राष्ट्रासंबंधाने आपण इतके अज्ञान असतो, की त्याविषयी आपल्या मनांत वाटेल त्या गैरसमजुतींचे बीज आपोआप उगवूं शकतें, आणि राज्यकर्ते जेव्हां आपणास युद्धाला प्रवृत्त करितात तेव्हां वाटेल त्या शेजारच्या राष्ट्रांतील लोकांचा संहार करण्यास आह्मी उद्युक्त होतो! ही द्वेषबुद्धी एकाच राष्ट्रातील भिन्नभिन्न जातीत सांपडत नाही असे नाही. ह्या प्रांतात सारस्वत, कोकणस्थ, कऱ्हाडे, देशस्थ वगैरे जातीमध्ये किती सख्य आहे हे सर्वविश्रुतच आहे. शिवाय मधून मधून मराठे मंडळींचे वैदिक प्रकरण, हिंदुमुसलमानांची भांडणे इत्यादिक जाति द्वेषाचे प्रकार उपस्थित होतात ते निराळेच! तथापि ह्या सर्व जातींचा एका राष्ट्रांत अन्तर्भाव झाल्यामुळें त्यां मधील द्वेषाला मिळावा तेवढा वाव मिळत नाही. जाती-जातींतील द्वेष वाढविल्याबद्दल अशा बाबतीत पुढाकार घेणाऱ्या माणसास कायद्याप्रमाणे सरकारला शिक्षा करितां येण, आणि राष्ट्रीय ध्येयाचेंच सर्वत्र शिक्षण मिळाल्यामुळें अशी भांडणे मागें पडून विचारी पुढाऱ्यांचे लक्ष केवळ आपल्या राष्ट्राच्याच हिताकडें धावतें, परंतु राष्ट्राराष्ट्रांतील खटल्याचा निकाल लावण्यास वरिष्ठ सरकार नसल्या कारणानें त्यांतील भांडणांचा निकाल एका तलवारीच्याच जोरावर करण्याचा प्रघात पडून गेला आहे. आणि ह्मणूनच भिन्नभिन्न राष्ट्रांतील द्वेषाग्नि भडकून त्याचें पर्यवसान रणकंदन माजण्यास मुळीच उशीर लागत नाही!

मनुष्यजातीचा दुसरा मोठा शत्रु लोक होय. न्यायाची कोर्ट वगैरे स्थापना करून एका राष्ट्रातील व्यक्तीच्या लोभाला आळा घालण्याची खटपट करण्यात येते. पण राष्ट्राराष्ट्रांतील व्यवहारांत ह्या लाभराक्षसाला एका तलवारीशिवाय दुसऱ्या कशाचाच प्रतिबंध नसल्यामुळें तो उघड्या डोक्यानें खुशाल वावरत असतो! एकानें दुसऱ्याची जमीन बळजबरीनें घेतली तर कोर्टाची त्याला भिती असते. शिवाय शेजारीपाजारी त्यास नांवे ठेवतात. पण एका बलाढ्य राष्ट्रानें दुसऱ्या दुर्बल राष्ट्राला लांडग्या-कोकराचा न्याय लागू करून घशांत टाकलें, तर त्याला कोणाची भीती नसते! किंबहुना अशा

कृत्यांची, ज्या राष्ट्राला लाभ झालेला असेल त्या राष्ट्रातील लोक स्तुतिच करीत असतात.

शेजारच्या लोकांविषयी नाहक द्वेष आणि दुर्बळांवर सत्ता चालवून बादशाही मिरविण्याची हाव किंवा लोभ या मोनवृत्तीमुळें मनुष्य स्वतंत्र जन्माला आला असून दास्यांत सापडला आहे! रुसोप्रभृति फ्रेंच तत्त्वज्ञान्यांनी त्याकाळच्या राज्यपद्धतीला दोषी ठरवून तिच्या पाडावाचें बीज आपल्या लेखांत पेरुन ठेवले, परंतु फ्रेंच राज्यक्रांतीनें फ्रेंच प्रजा खरोखर मुक्त झाली काय? लुई गेला आणि नेपोलियन आला! किंवा तिसरा नेपोलियन गेला आणि दुसरा एखादा अध्यक्ष आला. पण त्यायोगें फ्रेंचांचें कितीसे हित झाले? आमच्या सारख्या मागासलेल्या राष्ट्रापेक्षा फ्रांन्स कदाचित सुखी झाला असेल. पण त्यामुळें तो दु:खपरंपरेतून मोकळा झाला असे ह्मणता येत नाही, फ्रेंच लोकांना आपल्या राज्यपद्धतीत सुधारणा पाहिजे होती खरी, पण आपल्यासारखे दुसऱ्यास लेखण्याचें तत्त्व त्यांना कबूल नव्हतें. आपले वर्चस्व दुसऱ्या राष्ट्रावर स्थापन करण्यासाठी फ्रेंच राष्ट्र सदोदित तयार असे, आणि एवढ्यासाठींच नेपोलियनसारख्या महत्त्वाकांक्षी माणसाच्या हाती सर्व सत्ता देण्यास फ्रांसानें कमी केले नाही.

फ्रेंच तत्त्ववेत्यांनी प्रतिपादलेले ध्येय मनुष्याची दास्यापासून मुक्तता– फ्रेंच लोकांनी आपणासारखेंच आपल्या शेजारच्या राष्ट्रास लागू करण्याचा प्रयत्न केला असता, तर मनुष्यजातीवरील पुष्कळ संकट परंपरा चुकली असती. परंतु त्याची मर्यादा फ्रेंच राष्ट्रापलीकडे न गेल्यामुळें युरोपांतील राष्ट्रांतील कलहाग्नि न विझतां वाढत गेला. आणि क्रमश: सध्याचा संग्राम माजला हे मागल्या एका लेखांत सांगितलेच आहे, आता घडलेल्या गोष्टी परत येत नाहीत. तथापि सांप्रत घडून येणाऱ्या हानीनें तरी सुधारलेल्या राष्ट्रांनी शहाणें व्हावे आणि चुकतें कोठें याचा नीट विचार करावा. शेजारच्या राष्ट्राला पादाक्रांत करण्याची किंवा दुर्बळ राष्ट्रावर स्वामित्त्व मिरविण्याची हांव बचनागाच्या मुळीसारखी गोड आहे. पण तिचा परिणाम किती भयंकर होतो हें निदान शहाण्या राष्ट्रांनी तरी जाणले पाहिजे, आणि त्याजवर अवलंबून असणाऱ्या दुर्बल राष्ट्रांना त्याच्या दुर्बलतेपासून मुक्त करून 'आपणासारिखें

करिती तात्काळ.' ह्या ध्येयानें सर्व जगाच्या फायद्यासाठी आपल्या योग्यतेस आणण्याचें प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत.

गेल्या महिन्यांत युनिव्हर्सिटीचे व्हॉइस चान्सेलर ह्या नात्याने भाषण करितांना लार्ड विलिंग्डन ह्यांनी ब्रिटिश साम्राज्याच्या (Empire) दृष्टीने विचारकण्यासंबंधाने आपल्या युरोपियन आणि हिंदी श्रोत्यांस उपदेश केला. पंरतु एवढ्याने जगावर आलेली संकट परंपरा नामशेष होईल असें आह्मांस वाटत नाही. एका साम्राज्याला दुसऱ्या साम्राज्याचा शत्रू उद्भवणार नाही कशावरून? तेव्हां अशा पायऱ्या चढत बसण्यापेक्षा विजेच्या पाळण्यांतून एकदम मजल्यावर जातात त्याप्रमाणें एकदम विश्वदृष्ट्या (Universally) विचार करण्याची सवय आह्मी आजच कां लावून घेऊं नये?

*हस्तदिभेदेन बहुप्रकार: कायो यथेच्छ: परिपालनीय:।*
*एवं जगभ्दिन्नमभिन्नदु: स्वसुखात्मकं तभैव।।*

*(बुधवार, दि. २२ सप्टेंबर १९१५)*

# भारतीयांचे ध्येय कोणते असावे?

## (६– विश्वहिताच्या ध्येयावर आक्षेप)

विश्वहिताचे ध्येय सकृदर्शनी जरी गोड वाटत असलें, तरी ते व्यवहार्य आहे काय? असा प्रश्न उपस्थित होणें साहजिक आहे. 'आई एकुलत्या मुलावर प्रेम करिते, तद्वत सर्व जगावर प्रेम करा, असें अडीच हजार वर्षापूर्वी बुद्धानें भारतीयांना मोठ्या कळकळीनें सांगितलें. क्रिस्तानें आपल्या शत्रूंवरदेखील प्रेम करा असा उपदेश पाश्चात्य राष्ट्रांना केला. '*ऐसें भाग्य कधी पाहता होईना। अवघें देखें जन ब्रह्मरुप।।*' असे साधुवर्य तुकारामबुवांनी उद्गार काढले. परंतु ह्या सर्व साधुसंतांच्या उपदेशानें जगांतील भांडणे थांबली आहेत काय? जर नाहीत, तर मग पुन: विश्वहिताचें ध्येय पुढें करून लोकांना उपदेश करण्याचा आव घालण्यात काय फायदा? सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ व पाश्चर

इंस्टिट्यूटचे अध्यक्ष एम. मोचिनकाफ् यांनी तर असें साफ ह्मटले आहे की, मनुष्याच्या ध्येयाची मर्यादा राष्ट्रहिताच्या पलिकडे जाऊ शकतच नाही.

एम्. मेचिनकाफ् भौतिक शास्त्रांत पारंगत आहेत याबद्दल शंका नाही. परंतु समाजशास्त्राचा त्यांनी नीट विचार केला असेल असें निदान त्यांच्या लेखांवरून तरी दिसून येत नाही. १८७० सालापूर्वी सर्व जर्मन संस्थानांचे संयुक्त राज्य होईल असे कोणास वाटलें असते काय? किंवा जपानांतील २८७ राज्यें मोडून त्यांचे एक बलाढ्य राज्य बनणार ह्या भविष्यावर १८५० साली कोणी विश्वास ठेवला असता काय? परंतु ह्या गोष्टी घडून आल्यामुळें आजला त्यात काही अशक्य आहे असें कोणास वाटत नाही. तर मग ह्याची पुढली पायरी चढणें मानवजातीला अशक्य कां व्हावें? अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचें उदाहरण पाहिले, तर सर्व राष्ट्रांची एकी होणें अशक्य कोटीतील आहे असें कोणी समंजस माणूस ह्मणणार नाही. अमेरिकेंतील हीं ४६ संस्थानें ह्मटली ह्मणजे निरनिराळी राज्येंच होत. असें असून ह्या सर्वांत चांगला एकोपा दिसून येतो. तर मग जगांतील सर्व राष्ट्रांत अशा तऱ्हेची एकी घडून येणें अगदींच दुरापास्त कां ह्मणावें? यावर असा एक आक्षेप येण्याचा संभव आहे, कीं अमेरिकेंतील संस्थानांना बाहेरचा सर्वसाधारण शत्रू असल्यामुळें त्यांची एकी घडून आली आणि ती टिकली. परंतु सगळ्या राष्ट्रांची मैत्री घडून आली असल्यास बाहेरचा शत्रू कोणीच न राहिल्यामुळें ती चिरस्थयी होणार नाही. जर्मन, आस्त्रिया आण तूर्क अशा विसदृश राष्ट्रांचे सख्य जुळेल. पण ते कोठपर्यंत? सर्वांना तिसरा कोणी शत्रू आहे तोपर्यंत पण असा कोणताच शत्रू नसू द्या. ह्मणजे ह्याच राष्ट्रात कशा मारामाऱ्या होतात पहा! गोष्ट खरी आहे. मनुष्याचे संच बनण्यास जीं कारणें झाली आहेत, त्यांत सामान्य प्रतिस्पर्धी असणें हें मुख्य आहे. पण सर्व मानवजातीला कोणी सामान्य प्रतिस्पर्धी नाहींत काय, की ज्यांच्या विरुद्ध जगांतील सर्व मनुष्यांनी एकवटून प्रयत्न केला पाहिजे? आमच्या मते असे शत्रू पुष्कळ आहेत. खुद्द युद्ध हाच एक सर्व मानवजातीचा मोठा शत्रू होऊन बसला आहे. ज्या इंग्लंडांत हजारो गरीब लोकांना राहण्यासाठी पुरेशी जागा मिळत नाही. जेथें शेतकऱ्यांना काबाडकष्ट करून देखील आपल्या कुटुंबाचें

नीट परिपालन करितां येत नाही, त्याच देशाला आज रोज पांच कोट रुपये ह्या भयंकर युद्धापायी खर्च करावे लागत आहेत. इंग्लडची ही स्थिति, मग इटलीसारख्या गरीब राष्ट्राची काय तारांबळ उडत असेल याची कल्पनाच केली पाहिजे! ह्या संग्रामांत लाखों प्राण्यांची आहुति पडत आहे ही दु:खाची गोष्ट खरी, परंतु ह्याहीपेक्षां भयंकर संकट ह्मटलें ह्मणजे मनुष्यजातीचे सर्व सामर्थ्य घरेंदारें इत्यादिक मनुष्योपयोगी पदार्थांच्या संहाराकडे लागलेलें दिसत आहे हे होय. नेपोलियनचे हल्ले, सबमरीननं चालविलेला जहाजांचा नाश आणि पोलंड वगैरे देशांतून शहरें व घरें यांची चाललेली धुळधाण पाहून या युद्धरुपीं राक्षसानें केलेली हानि आणखी पांच पन्नास वर्षांत भरून येईल की नाही याची शंकाच वाटतें!

पण जगांतील लढाया निखालस बंद केल्यातर टोगो, यामागात, नोगी, जोफ्रे, सर जॉन फ्रेंच, सर जॉन जेलिको, हिन्डेनबर्ग, आषिम्याकेन्सेन इत्यादिक जलस्थलचर युद्धवीरांनी आपलें शौर्य दाखवावें कसें? सर्व राष्ट्रांचें सख्य घडवून आणणें ह्मणजे नवरसांतील एका प्रमुख रसाला फाशीं देण्यासारखं नव्हे काय? माजी प्रसिडेंट रुसव्हेल्ट याचे ह्मणणे असें आहे, कीं राष्ट्रांतील युद्धोत्साह नष्ट होऊ लागला ह्मणजे त्या राष्ट्राच्या अवनतीला आरंभ झाला असें खास समजावें. इतिहासांतील उदहारणें देऊन ह्या सिद्धांताचे त्यांनी समर्थन केले आहे. आमच्या ह्या महाराष्ट्र देशाच्या इतिहासांतदेखील रुसव्हेल्टच्या ह्मणण्याला बळकटी येण्यासारखे उदाहरण सापडण्यासारखे आहे. जेव्हा मराठ्यांची तलवार गाजू लागली, तेव्हांच महाराष्ट्रांत तुकाराम, रामदास या सारखे संतशिरोमणी निपजले, मराठी वाङ्मयाला ऊत आला, शिल्पकलांना उत्तेजन मिळाल्यामुळे उद्योग धंद्यात देखील हा डोंगराळ देश पुढे झाला. व सर्व बाबतींत याची उन्नति होत गेली. पण शेवटल्या बाजीरावाच्या कारकिर्दीत मराठ्यांच्या तलवारी बोथट होत गेल्यामुळें आमची अवनति झपाट्यानें होऊन आह्मी रसातळास जाऊन पोंचलों. रोमन, ग्रीक इत्यादिक प्राचीन राष्ट्रांत जोपर्यंत योद्धे होते तोपर्यंत तत्त्वज्ञानीहि होते, पण योध्यांची उणीव भरासू लागली. ताप्तर्य राष्ट्रांतील युद्धोत्साह नष्ट झाल्याबरोबर योद्धें दिसेनासें होतात. आणि योद्ध्यांच्या अभावी राष्ट्राची अवनति त्वरित होते. मग युद्धानें

घडणाऱ्या थोड्याशा हानीला भिऊन जाऊन जगांतील वीररसच नष्ट करूं पाहतां हे अनुचित नव्हे काय? युद्धांमुळें शौर्याला वाव मिळाला नाही, तर मनुष्यप्राणी आळसांत बुडून सर्वथैव अधोगतीला जाईल!

आमच्या साहित्यकारांनी दानवीर, धर्मवीर, युद्धवीर, आणि दयावीर असे वीरांचे चार भेद सांगितले आहेत. युद्ध बंद झाले तर जगांतून युद्धवीर तेवढें नाहीसे होतील. परंतु बाकी तीन प्रकारचे वरी तरी राहतीलच की नाही? आणखी युद्धवीरांपेक्षा इतर तीन वीरांची योग्यता  कमी आहे असें कोण ह्मणूं शकेल? दुसऱ्यांचे प्राण वांचविण्यासाठी सर्वस्वाचा त्याग करणारे दानवीर, जीवावर येऊन ठेपलें तरी सत्य न सोडणारे धर्मवीर, किंवा मिस् नायटिंगेल आणि फादर डेमियन यासारखे दु:खितांवर दया करणारे व तदर्थ आपले प्राण देखील खर्चण्यास तयार असलेले दयावीर हेंच मनुष्यजातीचे खरे अलंकार होत. युद्धवीर समूळ नष्ट होऊन असे वीर पुढें आलें तर जगाची हानी झाली असं ह्मणण्यापेक्षां फायदाच झाला असें ह्मटले पाहिजे. एकाकाळी वन्यावस्थेत असताना मानवप्राणी आपल्या नखांनीच जमीन पोखरीत असे. परंतु त्याला कुदळीं सारख्या अवजारांचा शोध लागल्यामुळें नखांचा प्रयोग करणे बंद पडले व त्यायोगें नखें दुर्बळ होऊन निरुपयोगी झाली. आतां आह्मी असें विचारतो, की नखाला बळकट करण्यासाठी पुन:आडतांचा त्यागकरून नखांनीच जमीन उकरा असें कोणी सुज्ञ माणूस ह्मणेल काय? जर नाही, तर मग दानशौर्य, धर्मशौर्य आणि दयाशौर्य यांच्या उत्कर्षानें जर युद्धशौर्य लोपून गेलें तर तें पुनरुज्जीवित करण्यासाठी त्या सर्व उत्तम गुणांला फांटा द्या असें ह्मणणें किती शहाणपणाचे आहे बरे?

सामान्यलोक वीर आणि रौद्र ह्या दोन रसांची भेसळ करीत असतात. पण त्यात जमीनआसमानाचा फरक आहे. वीररसाचा स्वायिभाव ह्मणजे कायम टिकणारा गुण उत्साह आहे, आणि रौद्ररसाचा स्थायिभाव क्रोध आहे. अर्जुनाच्या अंगी वीररसाचा परिपोष दिसून येतो, पण भीम सेनांचे दु:शासनवधप्रसंगी आचरण रौद्ररसप्रधान होय. आता ही कसोटी जर आमच्या सांप्रतच्या योद्ध्यांला लावून पाहिली तर ते खरे वीर ठरतील असे वाटत नाही. शत्रूनें लहानसा अपराध केल्याबरोबर गांवेच्या गांवे जाळून

पोळून फस्त करणें, व्यापारी जहाजावर हल्ले करणें, नि:शस्त्र लोकांवर बाँब टाकणे इत्यादिक प्रकार वीररसाचा परिपोष न करिता रौद्ररसाचा मात्र परिपोष करतात, हें लक्षात ठेवलें ह्मणजे उत्तम वीररसाचा काळ संपला असेंच ह्मणावे लागते.

राष्ट्रीय उन्नतीला युद्धवीरच कारणीभूत होतात, ही समजूत कार्य-कारण भावाच्या विपर्यासानें उद्भवली आहे. राष्ट्रांत जागृति होऊं लागली ह्मणजे ती भिन्नभिन्न रुपांनी व्यक्त होते. कोणी तत्त्ववेतें होतात, कोणी राजकारणी निपजतात आणि कोसी संत होत. एकाच जागृतीची हीं भिन्न फळें असतात. इटलींत माझिनीसारखा तत्त्ववेत्ता झाला. त्याचवेळी ग्यारीबाल्डीसारखा योद्धा आणि काव्हूरसारखा राजकारणी पुरुष निपजला. आमच्या इकडे रामदास- तुकारामासारखे साधुपुरुष आले, त्याचवेळी शिवाजीसारखा योद्धा निपजला. पण शेवटल्या बाजीच्या वेळी जसा योद्ध्यांचा अभाव होता तसाच तत्त्वज्ञान्यांचा आणि साधुपुरुषांचाही अभावच होता. तात्पर्य राष्ट्रीय जागृति हे कारण असून शूर योद्धे प्रसिद्ध कवी, तत्त्वज्ञानी, राजकारणी पुरुष वगैरे तिची फळें होत.

आतां सर्व राष्ट्रांत सख्य घडून लढाया बंद पडल्या, तर एखाद्या राष्ट्रांत जागृति झाली असता युद्धवीर निपजण्यास वाव राहणार नाही ही गोष्ट निर्विवाद आहे. पण त्या जागृतीनें दानवीर, धर्मवीर, दयावीर पुष्कळ निपजतील, सृष्टींतील गूढ तत्त्वांचा शोध लावणारे शास्त्रज्ञ निपजतील, आणि त्या योगें जगाच्या सुखांत पुष्कळच भर पडेल. समजा, आजला जर्मनी आणि रशिया यांच्यात सख्य असतें, आणि लढाईचा संभवदेखील राहिला नसता, तर जर्मन योद्ध्यांकडून रशियन पोलंडची भयंकर हानि झाली नसती, जर्मनीचे युद्धवीर पोलांडात शिरले नसते, परंतु दानवीर आणि धर्मवीर शिरले असते. जर्मन शास्त्रज्ञांनी विषारी धुराचा शोध लावला नसता, परंतु पोलंडांतील गरीब शेतकऱ्यांची घरें अल्पखर्चात कडक हिवाळ्यात कशी गरम ठेवता येतील याला नवीन शास्त्रीय युक्ती त्यांनी शोधून काढली असती.

*(बुधवार, दि. १३ ऑक्टोबर १९१५)*

# यथा राजा तथा प्रजा

प्रत्येक धर्माधिकाऱ्यानें, राजधिकाऱ्यानें किंवा कोणताही अधिकार ज्या व्यक्तीच्या हातांत असेल त्यानें, आपली जबाबदारी ओळखून निर्मल हेतूने, प्रेमपूर्णअत:करणानें आणि उच्च व शुद्ध भावनेंने, स्वत:स विकारवश व स्वार्थपरायण होऊ न देतां, केवळ लोकहितरत असावें लागतें, ह्या कर्तव्याकडें जर त्याचें दुर्लक्ष होईल, तर त्यावर काहीनाकांही काळाने, आपल्या अधिकारांपासून पदच्युत होण्याचा प्रसंग आल्याशिवाय कदापिही राहात नाही, हा सिद्धांत त्रिकालाबाधित असून याची सदंड प्रचीति अनेक अधिकारी व्यक्तीस आली आहे, हें कोणत्याही राष्ट्राच्या इतिहासाची काही पृष्ठे चाळल्यावर व वस्तुस्थितीवरून चांगल्याप्रकारे निदर्शनास येते. जगामधे आजतागायत ज्या अनेक धर्मक्रांत्या झाल्या व त्यापासून जे निरनिराळै अनेक पंथ उद्भूत झालें त्यांची कारणें जर आह्मी शोधण्यास गेलों तर धर्माधिकाऱ्यांचा फाजील जुलूम व छळ ही होतीं, असें प्रत्ययास येतें. धर्मशास्त्राधिकाऱ्यांनी शास्त्र ही मानवांकरितां आहेत व मानव शास्त्रांकरितां नाहींत हें बारीक लक्षांत वागवून परिस्थित्यनुरुप त्यांत समाहिताच्या दृष्टीने योग्य ते फेरफार केले पाहिजेत. परंतु जर ते सारासार विचार न करिता 'तातस्य कूपामयमिति ब्रुवाणा:क्षारं जलकापुरुषा: पिबन्ति' अशा तऱ्हेच्या अंधपरंपरेस चिकटून राहून समाजहित दवडतील, तर मग त्यांस लोक मानीनासे होतात व अशा रीतीनें त्यांचे वर्चस्व व महत्त्व खालावत जाऊन एखाद्या 'रांडेप्रमाणे नित्यकर्मे संभाळण्यातच त्यांस सुख मानून घ्यावे लागते. सांप्रत समाज परदेशगमनप्रतिबंध, बालविवाह, बालवैधव्य, क्षुल्लक जातिभेद इ. खुळ्या व घातुक रुढींनी आणि समजांनी अवनत स्थितप्रत पोंचला आहे. धर्माधिकाऱ्यांनी ह्या गोष्टींचा योग्य रीतीनें ऊहापोह करण्याकरिता एकंदर आधुनिक विद्वान व जुने पंडित जमवून समाजास हितकर असा निकाल देणें अत्यंत आवश्यक आहे. परंतु या बाबतीत त्यांनी एकदम बेपर्वा दाखविल्यामुळें हिंदुधर्मात प्रार्थनासमाज, आर्यसमाज, थिओसाफी प्रभृति अनेक पंथ उत्पन्न होऊन त्या सनातन धर्माची वाताहात झाली आहे व

लोकांतही धर्म शास्त्राची चाल राहिली नसून त्याविषयी मोठा बेमुर्वतपणा वाढला आहे. हीच गोष्ट राजकीय बाबतीत सुद्धां हुबेहुब लागू होते.

देशांत कोणतीही राजपद्धति का असेना, ती राजसत्ताक असो, किंवा प्रजासत्ताक असो, नियंत्रित असो वा अनियत्रिंत असो, अथवा कोणत्याही प्रकारची असो, जोपर्यंत अधिकारीवर्ग जनतेसी प्रेमबद्ध व विश्वासून असेल, जोपर्यंत प्रजेचें जें हित तेंच आपले ही दृढ भावना त्यांच्या अंत:करणांत वास करील, तोपर्यंत त्या सुराज्यपद्धतीस कदापिही धोका पोंचणार नाही व त्या राष्ट्राची सदाच भरभराट होत राहिल. परंतु जर तो स्वार्थास व भलत्याच महत्त्वाकांक्षेला बळी पडून कर्तव्यमूढ होईल, तर मात्र त्यावर राजभ्रष्ट होण्याचा प्रसंग येऊन शिवाय जीवितासही धोका पोंचेल. अशा तऱ्हेच्या कर्तव्यमूढतेचे फळ चारपांच वर्षामागें पोर्तुगालच्या दुसऱ्या दोंमानुयेलला व चीनच्या बादशाहाला सडकून मिळालें. ह्या मुळें शेजारच्या ब्रिटिश हिंदुस्थानात कर्झनशाहींत लोकक्षोभाचा कहर उडाला होता. आता लॉर्ड हार्डीजच्या अमदानींत पूर्ण शांतता वसत आहे. दुसरे कर्तव्यपरायणतेचें जिवंत चित्र पहायचे असल्यास जपानकडें नजर फेंकावी. तेथील बादशहा ह्मणजे प्रजेचा दास आहे. त्याचा सर्व जोर ह्मटला ह्मणजे प्रजेला शांतता व सौख्य अखण्डीत कसे लाभेल, प्रजेची भरभराट कशी होईल व एकंदर बाजूंनी प्रजेचे पाऊल पुढें कसें पडेल हाच असतो. इतकेंच नाहीं तर प्रजेकरिता आपली सर्व सत्ता, अधिकार, राज्यपद व जीवित ही प्रजेच्या हवाली करण्यास तें मुळीच कचरणार नाहीत. त्याप्रमाणें आपल्या प्रजेविषयीं पूर्ण विश्वास, विलक्षण वात्सल्य व अवर्णनीय प्रेम त्यांच्या हृदयांत वसत असल्यामुळे प्रजेनेंही प्रसंगी आपल्या अधिपतिकरिता व राष्ट्रांकरिता तनमनधनासह जीवितही खर्चण्यास तयार असावें ह्यात आश्चर्य ह्मणण्यासारखे कांहीच नाही. राजा व प्रजा ह्यामध्ये हा, अशा तऱ्हेचा उदात्त टिकाऊ संबंध असल्यामुळे तो देश जगांतील उरलेल्या राष्ट्रांमध्यें आज अग्रगण्य होऊन, अवघ्या पन्नास साठ वर्षात वैभवाच्या शिखरास पोंचला आहे, ह्याच गुणामुळें चिमुकल्या जपानास रशियासारख्या प्रबळ व विशाल शत्रूस देखील सणसणीत थप्पड देतां आली. धन्य तो देश, व त्या देशांतील राजा व प्रजा! आह्मी तर त्या राज्यास अर्वाचीन रामराज्यच ह्मणतो!

समाजामध्ये हा अधिकाराचा अतिक्रम पुष्कळकडे होत असलेला दृष्टीस पडतो. त्यांतील एकाचविषयी दोन शब्द लिहून हातांत धरलेली लेखणी खाली ठेवावयाची आहे. हिंदुसमाजाचे मुलांचे किंवा मुलींचे विवाह आईबापांनीच योजलेल्या वधूंशी किंवा वरांशी होत गेले व सध्याही तो अधिकार योग्यरीतीने त्यांकडून बजाविण्यात येत नाहीं असे मोठ्या कष्टानें ह्मणावे लागते. आपण आपल्या मुलाकरिता योजलेली वधू रूपगुणशीलानें युक्त आहे. की काय, मुलगा त्या मुलीशी विवाहग्रंन्थीनेबद्ध होण्यास संमत आहे किंवा नाही, मुलांचे शिक्षण व लग्नाचें वय झालें आहे की होणे आहे, त्याकडें आईबापांनी दुर्लक्ष करून चालावयाचं नाही. आपल्या मुलाला जणेंकरून ह्या जोडीदारापासून शांतता लाभेल, व सुखासमाधानानें संसारशकट हांकता येईल, अशाबद्दलची पूर्ण काळजी घेतली पाहिजे. नाहीं तर पतिपत्नींत वितुष्ट शिरून आईबापांच्या अधिकारातिक्रमाची फळें त्यांस गृहस्थाश्रमांत भोगावी लागतात व अशा रीतीने सर्व जीवित दु:खी अस्वस्थतेंत त्यांस काढावें लागते. अशा तऱ्हेनें आईबाबांच्या हावरेपणामुळें जन्माची दु:खी असलेली दुर्दैवी जोडपी पावलोंपावली जिकडं तिकडें दृष्टीस पडतात व समाजावर अर्थातच राष्ट्रांवर ह्याचा अत्यंत वाईट परिणाम हातो. आईबाप आपल्या कर्तव्यास तूर्त पूर्ण विस्मरलें आहेत. मुलाच्या गळ्यांत, रोगाने गांठलेली, खुळानें पछाडलेली, डोळ्यानें आंधळी, कुब्जेसारखी सुंदर, व त्राटिके सारखी सुस्वभावी किंवा कशाही तऱ्हेची अजागळीसम पोरगी बांधण्यास कमी करीत नाहीत. इतकेंच नव्हें तर वधू वरापेक्षां वयाने थोर अशा तऱ्हेचे विचित्र विवाह आईबापांनी घडवून आणलेलें आमच्या ऐकिवांत आहेत. कोण ही बेजबाबदारी, विश्वासघात व कर्तव्याचा खून!! मुलांची किंमत ठरविण्याचा अधिकार मात्र ते उत्तम रीतीने बजावितात. ''आमचा मुलगा अमुक पर्यंत शिकला आहे. एवढ्या शिकलेल्या मुलांस हुंडा एवढाच की काय?'' इत्यादी शब्दांनी बापडा मुलीचा बाप मेला की वांचला ह्याकडे लक्ष न देता चापून हुंडा उपटावयाला कमी करीत नाहींत, कोणीही कदाचित जर यास मुलगी कुरुप असून शिवाय ढोंगी व थोडी खुळी आहे असें सांगितले तर त्यांस इंग्रजी कोटी लढवून ''त्यात काय? काळी किंवा कुरुप असली तर काय झाले? तिला

काय नाचावयाला जायचें आहे? थोडी रोगी व खुळी आहे ह्मणतां– बाकी आह्मी तिला पाहिली नाही ह्मणा– आह्मी तिला औषधपाणी करून शिवाय घरांतल्या तालमीत काही काळ वावरल्यानंतर चटकन सुधारुन जाईल.'' वगैरे उत्तर ठेवलेलेंच! आतांशा तरुणांमध्ये वधूची निवड स्वत:च करण्याचा प्रघात पडत असून आईबापांच्या निवडीस साफ नकार मिळत आहे. ह्यात नैतिक दृष्ट्या आह्माला तर काहींच वावगें दिसत नाही. तर होते ते योग्यच होतं असे आमचे मत आहे. जर आईबाप आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावितील, तर मुलें ही आईबापांच्या तन्त्रानें वागण्याच्या स्वकर्तव्यास केव्हांच विसरणार नाहीत. असो, तरी धर्माधिकाऱ्यांस, राजाधिकाऱ्यास, वगैरे अधिकारी व्यक्तीस आमचे एवढेंच सांगणे आहे की, लोकांचे तुमच्याविषयी कर्तव्यकर्म बजाविणें तुह्मी ज्याप्रमाणें लोकांविषयी आपलें कर्तव्यकर्म बजावलें त्यावर अवलंबून राहिल. दुसरें आपणास मानित नाहींत ह्मणून त्यांच्या नावांने खडें फोडण्यापेक्षा, आपण आपल्या जबाबदारी प्रमाणे वागतो, की काय ते पहावें, व अशा दृष्टीनें पाहाण्यास जर डोळें नसले तर, लोक आपणास मानीत नाहीत व ऐकत नाहींत ह्मणून कुरकुर कां करावी? वाईट तरी वाटून कां घ्यावें? एकंदरीत इतकेंच खरें, की 'यथा राजा तथा प्रजा'

*(बुधवार, दि. २४ नोव्हेंबर १९१५)*

# स्वराज्याच्या वृथा वल्गना!

तुह्मी दुसऱ्यांना मुक्त - स्वतंत्र करा, ह्मणजे तुह्मी स्वत: मुक्त झालांच ह्मणून समजा. तुह्मी आपल्या बायकांना ताब्यांत ठेवा, त्यांना गुलाम करा, ह्मणजे तुह्मीही गुलाम बनलाच ह्मणून समजा.

***– स्वामी रामतीर्थ***

स्वराज्य हा शब्द दिसण्यात सुंदर, उच्चारण्यांत सोपा व लिहिण्यास साधा ह्मणजे तीनच शब्दांचा आहे. परंतु त्या शब्दांची यथार्थ कल्पना मनात

बाणवून देण्यास त्या शब्दाच्या हजार नव्हे लाखों पटीनें शब्द वापरलें तरी तें काम अपुरेंच राहणार, ह्मणजे 'स्वराज्य' या शब्दाची महती अवर्णनीय आहे असेंच ह्मणणें भाग ठरते. स्वराज्य हं मुलाचें खेळणें नव्हें, किंवा सहज चालता बोलतां मिळणारी अशी सुलभ साध्य गोष्टही नव्हे. स्वराज्य प्रत्येक माणसाला अत्यंत प्रिय असते. परंतु ते कोणाकोणालाही मिळवितां येत नाही. त्यासाठी– त्या स्वराज्यासाठी– आपल्या अंगात तितकीं पात्रता आणावी लागतें व ती पात्रता योग्य वेळ व संधि साधून सरकारचें नजरेला आणवून मग स्वराज्याचें हक्क संपादन करण्याचें सौम्य प्रयत्न केलें पाहिजेत. ह्मणजे स्वराज्याचे हक्क एकादेवेळी प्राप्त होत असतात. एकादेवेळी ह्मणण्याचें कारण एवढेंच, कीं असें कांही देश आहेत, की जे स्वराज्याला पात्र झाले असूनही उदारमनस्क पाश्चात्य राज्यकर्त्यांकडून त्यांना हरहमेश वाटाण्याचा अक्षदाखेरीज काही लभ्य होत नसतें, हें आयर्लंड, पोलंड वगैरे युरोपियन देशांकडे नजर फेकली असतां दिसून येतें. यावरून जेथें गोरे, काळे, सुशिक्षित रानटी, जेतें व जीत असा संबंध असतो, इतकेंच नव्हें तर ज्या लोकांस पारतंत्र्य अंगवळणीच पडल्यासारखें झाले आहे त्या लोकांना आपण होऊन Short-Land पाश्चात्य राज्यकर्त्यांनी स्वराज्याचा अहेर करणें ह्मणजे कल्पना सृष्टीतसुद्धां अगम्य आहे असें ह्मणावे लागेल. आतां प्रस्तुत महायुद्धा अखेर ही गोष्ट कल्पना सृष्टीतून मूर्त कृतींत उतरेल असा काही जणांना भरवंसा वाटत आहे व तो कितपत खरा ठरणार हे पुढें पहावयाचें आहे.

'स्वराज्य' ही वस्तु जरी कष्टसाध्य असली आणि अंगांत पात्रता असलेल्या लोकांनासुद्धा ती मिळविण्यास जरी सायास पडत असलें तरी कालांतरानें तें स्वराज्य अत्यंत कद्रु अशा राज्यकर्त्यांनासुद्धा लायक लोकांना देणें भाग पडत असतें. अशी कैक उदाहरणें दृष्टीस पडतात. मात्र ज्या लोकांच्या अंगांत पात्रता नाही, त्या लोकांकडून जेव्हा स्वराज्याचा प्रचंड टाहो फोडण्यात येतो, तेव्हां अशा लोकांची कींव करावी तितकी थोडीच वाटतें. असल्या लोकांना स्वराज्य हें तर मिळत नाहींच, परंतु जगाकडून मात्र या उडाणटप्पू व शीघ्रकोपी लोकांचा सदैव उपहासच होत असतो. केवळ आपल्या पूर्वजांची अघळपघळ स्तुति करून त्यांची लांबीरुंदी मोजून त्यांचे

कौशल्य, त्यांची करामत, त्याचें शिल्पशास्त्र, त्यांचें नौकानयन शास्त्रातील अगाध नैपुण्य, त्यांची आश्चर्यचकीत समर कुशलता, त्यांची सैन्याची रचनापद्धती, त्यांचें यान आणि विमान, त्यांच्या पल्लेदार तोफा, त्यांच्या बायकांकडूनसुद्धा दाखविला जाणारा अतुल पराक्रम इत्यादिकांचे अवास्तव स्तोत्र गाऊन त्याच्या बळावर स्वराज्य संपादू पाहणारे लोक किती मूर्ख आहेत याची कल्पना सुद्धां दुःसह वाटते! पूर्वजांच्या फाजील अभिमानाच्या भरांत संध्येंतील चोवीस नामाप्रमाणे टपाटप उच्चारल्या जाणाऱ्या हजारों गुणांपैकी आज आमच्या अंगांत किती गुण वास्तव्य करीत आहेत याचें उत्तर कोणी देऊं शकेल काय?

आमचा गोमांतक प्रांत व शेजारचें ब्रिटिश हिंदुस्थान ह्यांमधील तुलनात्मक दृष्टींनें बोलावयाचें झालें तर आज जर आमच्या शेजाऱ्यांस कोणी स्वराज्य देण्याचें पुण्य पदरांत घेत असेल तर आह्मांला आणखी ५० वर्षे वाट पहाणें भाग आहे असें आमचें प्रामाणिक मत आहे. इतकेंच नव्हे तर ह्या पन्नास वर्षांनीसुद्धां जी राजकीय, औद्योगिक, शिक्षणपर वगैरे सुधारणा तिकडे अवघ्या शेंदिडशें वर्षाच्या अवधींत झाल्या आहेत व ज्या इतके पांचशें वर्षाच्या दीर्घ कालांतरी घडून आल्या नाहीत, त्याच आह्मी आणखी ५० वर्षात इकडे घडून येण्याची उदार कल्पना करतों. या वरून आह्मी कल्पनासृष्टींत किती वर भराऱ्या मारतों हें कळून येईल. जर कोणी आह्मांला असा प्रश्न केला, की 'काय हो, महाराष्ट्राचा व तुमचा इतका निकट संबंध आहे, की महाराष्ट्राच्या सुखदुःखावर कांही अंशी तुमचेंही सुखदुःख अवलंबून आहे. असें असतां ज्या असंख्य सुधारणा महाराष्ट्रांत आज झाल्या आहेत त्यांचाही कांही परिणाम तुमच्या गोमांतकांत झालाच असला पाहिजे. तर ह्याला आह्मी काय उत्तर देणार?'

असल्या कसल्या सुधारणा आज गोमांतकांत अस्तित्वांत आल्या आहेत की ज्यांच्या निवेदनानें आह्मांला वरील पृच्छकांचे समाधान करतां येईल? येऊन जाऊन सध्यां चालू असलेला आत्मघातकी शिक्षणप्रसार? होय? हाय! दुर्दैवी गोमांतका? तुझ्या भाग्यकालाची स्वप्नेसुद्धां आज आह्मांला उपभागूं मिळू नये काय? रिपब्लिकसारखी उत्तमोत्तम राज्यपद्धती

अनायासें प्राप्त झाली असता आज पांच वर्षाच्या अवधींत असा कोणता उजेड घालतात, कीं जेणें करून तुह्मांला स्वराज्याला लायक ठरवावें? अशा कोणत्या सुधारणा तुह्मी घडवून आणल्या आहेत, कीं स्वराज्यासारखें जोखमीचें व अत्यंत जबाबदारीचें काम तुमच्या शिरावर यावें? तर ह्या सर्व गोष्टींवरून असें ठरविणें सुलभ जाईल, की तुह्मी स्वराज्याला पात्र नाहींत, ही एक गोष्ट जरी सोडून दिली, तरी तुमच्या स्वतःच्या घरची गुलामगिरी बंद केली आहे काय? तुह्मी तुमच्या घरांत स्वराज्याचें हक्क दिलें आहेत काय? अग्निब्राह्मणांसमोर वर्णिलेल्या – शपथेनें अंगिकारलेल्या असहाय्य निर्बल अबलांना तुह्मी स्वराज्य कां देत नाही? शिक्षणासारख्या पवित्र कार्यात तुह्मी त्यांच्याशी पंक्तिप्रपंच कां करतां? तुह्माला एक कायदा व त्यांना दुसरा कां? ज्या कायद्यानें तुह्माला ६० त ७० वर्षाच्या बुढ्या वृद्ध कपींना तुमच्या अष्टवक्रा कुमारिका बली देतां येतात, तोच कायदा गरीब अनाथ व तरुण गतभर्तिकांना जन्मभर संन्यास वृत्तिने देहाची विटंबना करण्यांत इतका निष्ठूर कसा होतो? एकधर्मीय एकजातीय अशा तुमच्या अस्पृश्य वर्गांना तुह्मीं बहिष्काराच्या तीव्र शस्त्रांवर कां नाचवितां? तर जोपर्यंत तुमच्या घरांत चाललेली गुलामगिरी बंद करणार नाही तोपर्यंत तुमच्या ह्या स्वराज्याच्या वायफळ वल्गना वृथा आहेत असेंच आह्मी ह्मणतो.

*(बुधवार, दि. ९ फेब्रुवारी १९१६)*

# बोलशेविझम

पुष्कळ दिवसांपासून भयभीत करून सोडणारें संकट एकदां लयास जाऊन जरा कोठें सामसूम होण्याची आशा दिसत आहे, इतक्यांत दुसरें अगोरदरच्याहून मोठें संकट आपलें भयानक आगमन सूचवित असलें ह्मणजें मानवी सुखाचें क्षणभंगुरत्व दाखविणारें व मनावर कायमचा परिणाम करणारे एक उदाहरण पाहाण्यास सांपडतें. अरेरावी राज्यपद्धतीनें चालणाऱ्या झारशाहीचें उच्चाटन होतें न होतें, इतक्यांत बोलशेविकांची टोळधाड

युरोपाभोंवती घिरट्या–नव्हें, धांगडधिंगा घालूं लागली. संघशक्तीचा जोर प्रबळ आहे व त्यांतहि बोलशेविकांची टोळधाड ह्मणजे लोकसेवकांची टोळी अशी कोणाचीही समजूत पटण्यासारखी त्यांची तत्त्वें उदार असल्यावरून जेथें जातील तेथें त्यांच्या मताचा प्रसार होण्याचा संभव आहे.

लोकसंख्येने व क्षेत्रविस्तारानें मोठें असें रशियन साम्राज्य हें एक पुढेंमागे सगळा युरोप गिळंकृत करू शकणारे प्रचंड अस्वल अशी कांहीशी शंका युरोपियन राष्ट्रांत उद्भवली होती. या शंकेचा वृक्ष मोठा होतां होतां त्यास भीतीचे खांदे फुटू लागले. ह्याचें प्रत्यंतर रुसोजपानी लढाईच्यावेळीं केवळ राजकारणपटु मुत्सद्यासच आले नाही. तें सामान्य विचारी माणसांसहि आल्याशिवाय राहिलें नाही. युरोपबाह्य लोकांशी युरोपियनांचा संबंध येऊन पोंचला, की आपल्या लोकांची तरफदारी करण्या इतकी, स्वदेशप्रीतीहून उज्ज्वल अशी स्वातंत्र्य प्रीती अखंड आहे, असें युरोपियनांच्या कृतींत व उक्तीत दिसून येत आहे. इतक्यांत ऐनवेळी रशियाचा पाणउतारा जपानकडून होत असताना, किंबहुना एका प्रबल युरोपियन राष्ट्राची, लहानशा पौर्वात्य राष्ट्राकडून अवहेलना होत असताना सगळ्या पाश्चात्य राष्ट्रांनी तटस्थ वृत्ति स्वीकारली, त्यावरुन असें अनुमान काढण्यास सवड मिळाली असती, की बलाढ्य रशियन राष्ट्रांस, जपानसारख्या लहान राष्ट्राविरुद्ध साह्य करण्यांत जगाच्या नीतिदृष्टीनें मोठा अन्याय होऊन युरोपियन संस्कृतीस काळिमा लागण्याचा संभव असल्यामुळें युरोपियन राष्ट्रांनी युद्धांत भाग घेण्याचें टाळलें. वास्तविक रीतीनें पाहतां खरोखर तिऱ्हाईत राहून युद्धाच्या कोणत्याहि पारड्यांत वजन न टाकितां तटस्थवृत्ति स्वीकारुन मनाचा समतोलपणा राखणें हें जळत्या अग्नीत तेल न घालण्याच्या दृष्टीने स्तुत्य आहे. पण तसें करण्यांत पाश्चात्य राष्ट्रांचा तटस्थपणा जपानास संमतिदर्शक होता असें महायुद्धाकालानंतर, ह्मणण्यास संशय वाटत नाही. व उलटपक्षी एका बारांत दोन पक्षी मारण्याचा त्यांचा अंतस्थ हेतु होता. एकमेकांचा वरचढपणा असह्य वाटणाऱ्या प्रत्येक युरोपियन राष्ट्रांस असें वाटू लागलें कीं रशियास साह्य केल्यास, जपानचें शत्रुत्व, युद्धामुळे द्रव्यहानि व मनुष्यहानि, यामुळें स्वत:स येणारा कमकुवतपणा या गोष्टीपक्षां रशियाचा पाणउतारा होऊन त्यांत

असलेला दुबळेपणा आपल्या पथ्यावर पडेल. प्रत्येक राष्ट्रांस केवळ आपल्याच लोकांचा दरारा वाढवावा अशी अंतस्थ खुमखुमी असली, तरी तीस हेतूचा उदात्तपणा दाखवून, मोठे स्वरुप देण्यासाठींच सगळ्या खंडांच्या प्रीतीचा पडदा पुढें करून मागें आपलें इच्छित कार्य करण्यास तत्पर व्हावें लागतें. हा युरोपी बाणा किंवा आपमतलबी कावा महायुद्धामुळे जगास पडल्याशिवाय राहिला नाही. महायुद्ध ह्मणजे प्रत्येक राष्ट्राच्या अंत:करणात दडून व द्वेषाच्या पहिल्या झुळकेबरोबर पेट घेऊन चहूंकडे पसरलेली मत्सराग्नीची ठिणगी होय असें तर पाहण्यास मिळालेंच. शिवाय, युरोपखंडांतील लोकमत सारखें घुसळून त्यांतून अमृतरुपानें निघालेलें लोणी कोणतें आहें असें ह्मणाल, तर तें बोलशेविझम होय. हेंहि दृष्टीस पडले. अमृतरुपानें ह्मणण्याचा अर्थ हाच, कीं तें ज्याने चाखलें त्याच्या मनांतील समतेच्या भावना कधींच मृत ह्मणजे नाहींशा होणार नाहीत व लोण्यामुळें जिभेवर चढलेल्या रुचीपुढें, प्रचलित राज्यपद्धतीचे ताक लोकांस आंबट व पांचट लागावें हें स्वाभाविक होय. ह्मणून युरोपियन राष्ट्रांस युद्धसमाप्तीनंतर देखीव स्वस्थ बसूं देणारें एक संकट युरोप व आशिया या खंडाच्या नाक्यावर उत्पन्न झालें, स्वतःवर बेतून अंत:करणास पीळ पडला ह्मणजे, मानपान, हेवेदावे बाजूस राहून, जें काय अंत:करणांत दडी मारून राहिलें असेल, तेंच बाहेर पडते. असो.

युरोप–आशियाच्या मध्यस्थांनी उदित झालेला बोलशेविझम दोनहि खंडात आपली प्रचंड लाट पसरुन टाकितो कीं काय, अशी भीति उत्पन्न झाली आहे. तूर्त अफगाणिस्थानापर्यंत बोलशेविक लोक येऊन तर थडकलेच. ह्मणजे आजपर्यंत ज्या मार्गानें हिंदुस्थानावर विधर्मी लोकांच्या अनेक स्वाऱ्या झाल्या, त्याच मार्गासन्निध ते पोचले आहेत. पण, त्यांत विशेष हा आहे, की आजपर्यंत मागें आलेले लोक एका विवक्षित धर्माचे किंवा वर्णाचे होते. बोलशेविकांत तसा धर्माचा व वर्णाचा विवक्षितपणा नसून, लोकमताच्या उदात्त अंत:करणावर त्याची उभारणी झाली आहे. हेंच कारण ज्याचें जिकडे तिकडे स्वागत होण्यास पुरेसें आहे. आतां काळा–गोरा, असले विषमतादर्शक व अन्यायमूलक भेदभाव नाहींसे करून, हिंदी लोकमतास बोलशेविकांविषयी वाटू शकणारी आतुरता चिरडून टाकण्याबद्दलची सूचना

आमच्या राज्यकर्त्यांस देणें अस्थानीं होणार नाही. त्याचप्रमाणें हिंदी जनतेचेहि अशा वस्तुस्थितीकडे लक्ष्य जाणें उचित आहे, कीं एकतंत्री राज्यपद्धतीविषयी रशियनांची असंतुष्टता, शिक्षणाभावामुळें असलेंले अज्ञान, मोठा राज्यविस्तार इत्यादि गोष्टीमुळें बहुसंख्यांक व शूर रशियनांत एक प्रकारचा विस्कळितपणा येऊन रुसो-जपानीं युद्धाच्यावेळी रशियाच्या सैन्याची हालचाल करण्यास फार जड जात असे, अशी सबब सांगण्यात येत होती. पण झारशाहींतून स्वतंत्र झाल्याबरोबर त्यांत सुसंघटितपणा येण्यास त्याचें एकीकरण कारणीभूत झालें-व मत्सरानें झगडून  कमकुवत झालेल्या युरोपी राष्ट्राची मान हातांत धरील कीं काय इतका बोलशेविझम प्रबळ झाला आहे. समतेच्या पायांवर एकीची उभारणी झाल्याचा हा प्रभाव आहे, हेंच खरें.

*(बुधवार, दि. १ एप्रिल १९२०)*

# रिपब्लिक व हिंदु नागरिक

एका वाईट स्थितीऐवजी दुसरी यावयाची असली ह्मणजे ती चांगली असेल अशा पूर्वग्रहानें तिचें स्वागत करण्याकडे मनाचा कल सहज झुकतो. वर्षाकालापूर्वी उष्मा फार झाला, कीं दुर्दिन ह्मणजे वाईट दिवस घेऊन येणाऱ्या पर्जन्याचें आगमन शुभ वाटूं लागते व पावसाच्या दिवसांत सूर्यचंद्राचें दर्शन न झाल्यानें त्यांस पाहण्याविषयीं उत्सुक झालेल्या डोळ्यांस क्षणभर दिपवून टाकणाऱ्या विजा प्रिय वाटूं लागतात. ह्या गोष्टी दर वर्षी एकदा या क्रमानें घडत असल्यामुळें त्यांतील सत्य कोणासहि पटण्यासारखें आहे. आता, ह्या विचारसरणीची आठवण करून देणाऱ्या मुख्य मुद्द्याकडे वळूं.

इंक्विजिसांवाचे कडक धर्मनिर्बंध कांही काळानें ढिले पडले असले, तरी धार्मिक बाबतींत, हिंदु लोक ख्रिस्तीधर्मबाह्य असल्याच्या सबबीवरून, पोर्तुगीज नागरिकत्वाचें सगळें हक्क उपभोगण्यास नालायक आहेत असें समजण्यात येऊन मोनार्कीच्या अमदानींत त्यांस राजदरबारांत वगैरे मज्जाव होत असे, व हा मज्जाव राजदरबाराच्या देवडींत न थांबतां देवस्थानच्या

दरवाजापर्यंत पोंचून देवांस, देवळाबाहेर मिरवणुका काढण्याच्या कामीं हरकती होऊ लागल्या. कालांतरानें, ख्रिस्तीपेक्षा, त्याच्या पवित्र आईपेक्षा व स्वर्गीय बापापेक्षहि आपलें सामर्थ्य अधिक आहे असें हिंदूच्या देवांस दाखवावयाचें असल्यामुळें, आपणांस देवळांत कैदी बनवू पाहणाऱ्या राजसत्तेवर त्यांनी गदा घातली व राजाची कानउघाडणी कणखर शब्दांनी करण्याच्या बाबतीत तोंडझांक करून देवावर भार टाकून स्वस्थ बसलेल्या हिंदूंचे मनोरथ शेवटास गेले.

केवळ देवाच्या कृपेने सगळें मिळते ही गोष्ट खरी धरली तरी जे काय मिळतें ते पचविण्यासाठी मनुष्यानें श्रम केले पाहिजेत हें विसरुन कसें चालेल? देवाचा प्रसाद झाला तरी तो पचवून त्यांतील अनुग्रह साठविण्यास कमकुवत शरीर नालायक असतें. लोखंडाचें चणे खाऊन ते पचनी पाडण्याची योग्यता आल्याखेरीज ब्रह्मपदीं नाचण्याची पात्रता येत नाही असें खुद्द परमेश्वरच आपल्याशी एकरुप झालेल्या साधूच्या तोंडून उद्गार काढितो! असो.

प्रशस्त रीतीने देवकार्ये उरकण्याविषयीं कोणतीहि हरकत नाहींशी झाली, की देवळांतील उत्सव पार पाडण्यास उद्युक्त झालेलें हिंदु, समता, बंधुत्व व स्वातंत्र्य या तीन पायांच्या तिपाईवर अधिष्ठित झालेल्या रिपब्लिकाससुद्धां देवासारखे भजलें पण, रिपब्लिकदेवीकडून कोणताच प्रसाद न मिळतां 'लायकी पाहून पायकी' किंवा 'कर्तबगारी पाहून रोजगार' असा मंत्र तिजकडून उच्चारला गेला. ह्या मंत्रातील प्रत्येक शब्दांचा अर्थ पाहिजे तसा फिरवितां येऊनहि समतेचें उच्च तत्त्व त्यांत कायम आहे, असें दाखविण्यासाठी कितीही ओढाताण केली तरी जशाची तशी आकृति धारण करणाऱ्या रबराची स्थितिस्थापकता त्यांत भरपूर आहे असें प्रत्यही अनुभवास येतें. आधीं लायकी ह्मणजे पात्रता ठरविण्यांत किती भानगडी येतात हें पाहण्यासाठी पुढील गोष्टीकडे लक्ष दिल्यास 'स्थालीपुलाक न्यायाने' इतर प्रकारांविषयी थोडक्यांत फार कळून येईल. कोणत्याहि सरकारी कामांवर लायक मनुष्याची नेमणूक करण्याची गरज पडल्यावेळी ज्यास्त शिकून ते कार्य करण्यास पात्र अशाच माणसाची निवड व्हावयास पाहिजे. 'इस्कोल मेदिक' व 'इस्कोल नोर्माल' यासारख्या विशिष्ट धंद्यासाठी शिक्षण देणाऱ्या शाळांच्या मागोमाग, शास्त्रें व भाषा मिळून १०।२० विषय शिकविणाऱ्या लिसोवांचे

संपूर्ण शिक्षण घेऊन 'दिप्लोम' मिळविलेले विद्यार्थी थोड्या प्राक्टिसीनें कोणत्याहि खात्यातील काम चालविण्यास लायक असतां, कोंकुर्साची अडचण भासावी हें जरा चमत्कारिक वाटते. पाहिजे असेल तर, ह्मणजे फाजेंदासारख्या आंकडे मोडीच्या खात्यांत नेमणूक व्हाययाची असेल, तर गणितविषयांत व अर्थशास्त्रांत चांगले मार्क असलेल्या विद्यार्थ्यांची त्याजागी निवडणूक व्हावी, असें केल्यापासून लायकीसाठी परीक्षा (Concriso) घ्यावयाचा खर्च व भानगड चुकून काळाचा अपव्यय होणार नाही. व लिसेवांतील विद्यार्थ्यांस पुढील आशेनें जास्त शिकण्यास हुरुप येईल. यावर कदाचित् असा आक्षेप येण्याचा संभव आहे, की लिसेंवातील विद्यार्थी चांगले हुशार निघत नसल्यामुळेंच कोंकुर्साची यातयात करणें भाग पडतें. पण असें पहा, ६/७ वर्षांच्या अवधींत शिक्षणापासून कांहीच ग्यारंटी नसल्यामुळे कसाबसा अभ्यास करून 'दिप्लोमा' मिळविलेले विद्यार्थी, कोंकुर्साची जाहिरात 'बोलेती' वर प्रसिद्ध झाल्यानंतर मिळालेल्या ५/७ महिन्याच्या अवधींत हुशार व लायक होण्याचें बाजूस राहते, व भीड खर्चून त्यांस लायकी आणण्यासाठी मात्र कोंकुर्स उपयोगी पडतो. इतकेंहि करून त्यांस पायकी ह्मणजे पगार काय ह्मणाल तर थोडा! हेंच उलट पहा! समतेवर फाजील स्वातंत्र्याचा दाब पडला, कीं तिचें एक टोक खाली व दुसरें वर जाऊन, बड्या हुद्द्यावर एखाद्याची नेमणूक होण्याची वेळ आली, तर त्या कामांत तो निष्णात आहे की कांय, हें पाहण्याची गरज न पडतां कोणालाहि एका गुणाचें किंवा कधी गुण नसतांहि, अर्थात निर्गुणाचें चीज होऊन जागा मिळतात व खिशे भरून बाहेर पडण्याइतका भरपूर पगारहि मिळतो, असें तूर्त नेमण्यांत आलेल्या मामलेदारांच्या निवडणुकांवरुन ह्मणावें लागतें. व एकदां नेमला गेलेला इसम नालायक असें कधींच ठरत नाही. कां की, नालायक असता तर त्याजागी नेमणूक झालीच नसती! ही सबब पुढें येते. अशा ह्या लायकीपायकीच्या संबंधांचा अनुभव हिंदूस कमी, ज्यास्त मानानें आल्याशिवाय राहात नाही. देशावर आलेलें संकट एकट्याला कसें टाळतां येईल? पण, प्रत्येक गोष्टीस इलाज असतोच. ह्मणून आपल्यांत पात्रता आणण्याचा क्रम हिंदुंनी सोडूं नये. स्वराज्यकाळांत तिचा योग्य उपयोग झाल्यावांचून राहणार नाही.

*(बुधवार, दि. ८ एप्रिल १९२०)*

# राष्ट्रीय मोक्षप्राप्तीचा सोपानमार्ग

कोणत्याहि राष्ट्रांस सुधारणेचे वैभव शिखर गांठावयाचे असेल तर त्यानें स्वदेशाभिमानाचा सोपानमार्ग मोठ्या धिमेपणानें व उत्कट नि:स्वार्थ बुद्धीनें आक्रमिण्यास पुढें सरसावलें पाहिजे. सुधारणेच्या मोक्षाप्रत पोंचविणारी ही शिडी जितकी मजबूत असेल तितक्या लवकर अर्थात आपलें इष्ट ध्येय जें – सुधारणेचे वैभव शिखर–तें साध्य करून घेण्यास कोणत्याहि देशास फार सुलभ होतें, हें निर्विवाद होय. स्वदेशाभिमानाचा मजबूतपणा व सुधारणेचा मोक्ष प्राप्त होण्यास लागणारा कालावधि या दोन्ही गोष्टींत, गणितशास्त्राच्य भाषेंत बोलावयाचें झाल्यास, परस्परांत व्यस्तप्रमाणाचें नातें आहे, असें ह्मटलें पाहिजे. ह्मणजे जितकी स्वदेशाभिमानाची शिडी मजबूत असेल, तितक्या थोड्या काळांत  सुधारणेचा मोक्ष गाठतां येतो. मात्र ही मोक्षदायक शिडी चढूं इच्छिणाऱ्या राष्ट्रमुमुक्षूंत धैर्य व नि:स्वार्थीपणा हें दोन आवश्यक गुण प्रामुख्याने परिपूर्णतेला पोंचलेले असलें पाहिजेत.

आमच्या उपरिनिर्दिष्ट सिद्धांताचें त्रिकालाबाधित्व पटविण्यासाठी विशेष चर्चेची आवश्यकता नाही. प्राचीन किंवा अर्वाचीन कालांतील सुधारणेचा मोक्ष गांठलेल्या कोणत्याहि देशाच्या इतिहासाचीं थोडीशीं पत्रें चाळिलीं कीं राष्ट्रीय मोक्षाच्या प्राप्तीची गुरुकिल्ली वर नमूद केलेल्या साधनसमुच्चयांतच आहे, याची प्रचीति पूर्ण रीतीनें मनांत बिंबते.

हे सांगण्यास अगदीं सोपे, पण आचरण्यास फार कठीण, असे विचार लेखणींतून उतरण्याचें कारण ह्मटलें ह्मणजे सुधारणेचा मोक्ष लाभण्याप्रीत्यर्थ ह्मणून आमच्या दांभिक राष्ट्रचालकांकडून करण्यांत येत असलेला ‘सब गोलंकार’ हा  होय. या अधोगतीस ओढणाऱ्या ‘सबगोलंकारा’च्या विषारी कीटकांची वर्धनशक्ती इतक्या थराला पोंचली आहे, की तिनें आमच्या नोकरशाहीला तिचा देशाभिमान शोषून, धैर्य गिळंकृत करून व नि:स्वार्थ बुद्धि अपहारुन अगदीं निकामी कर्तव्यशून्य, भ्याड व पोटभरू बनविली आहे!

अशी स्थिति नसती तर राष्ट्राच्या तिजोरीची घालमेलीची अवस्था अवलोकूनहि आपल्या वेतनाची वाढ होण्यासाठी आमची अविचारी नोकरशाही 'सत्याग्रहा' चा दुराग्रह घेऊन खास बसली नसती! उज्ज्वल देशाभिमाना-भावामुळेंच आह्मी राष्ट्रीय अवनतीच्या घाणरेड्या डबक्यांत कुचंबत असून आत्मघाताचा पंथ आक्रमित आहोंत! धैर्याभावामुळेंच आमचा प्रिय देश सुधारणेचा किल्ला अतुल पराक्रमानें सर करण्यास निधड्या छातीनें उभा ठाकण्यसाचें सोडून देऊन भ्याड शिपायाप्रमाणें मागें मागें रेंगाळतच आहे! निःस्वार्थीपणा ही चीज कशाशी खातात, याची सपशेल विस्मृति झाल्यामुळेंच आमच्या राष्ट्रचालकांची स्वताच्या अगडबंब पोटापलिकडच्या आपल्या देशाच्या निकृष्टावस्थेकडे नजर जात नाही!

या राष्ट्रीय 'सबगोलंकारा' च्या महारोगावर वेळीच सयोग्य उपचारांची योजना व झाल्यास राष्ट्राची अधोगति ठरलेलीच असून, अवनतीच्या दुर्धर नरकांत आमचा प्रिय देश समूळ गाडला गेला जाईल, हें निःसंशय आहे, आमचें राष्ट्र अवनतीला पोंचू नये, त्याला सुधारणेचा मोक्ष प्राप्त व्हावा असें ज्यांस खरोखरच वाटत आहे, त्या सर्वांनी अर्थात आमच्या राष्ट्रपुरुषांत स्वदेशाभिमानाची शिडी मजबुत होण्याप्रीत्यर्थ आटोकाट प्रयत्न करण्याचें सामर्थ्य निर्मून, धैर्य व निःस्वार्थीपणा हे प्रमुख गुण त्यांत पूर्णांशी जागृत होतील, एतददर्थ अविश्रांत झटले पाहिजे. ही नवीन व तेजस्वी परिस्थिति तयार होतांच, तिजोरीस तूट पाडणारी स्वार्थी लूट, पगार वाढविण्यासाठी प्रत्यही भरत असलेला नोकरशाहीचा कोलाहलयुक्त बाजार व भ्याडपणामुळें सर्वत्र दृष्टोत्पत्तीस येत असलेली निंद्य व देशहितविघातक दुर्गणांची वाढ, इत्यादि अनेक गोष्टींचा निर्वंश होऊन आमचा प्रियतम देश थोड्या काळांत सुधारणेच्या वैभवशिखरावर विराजमान होऊन आपल्या कीर्तिसूर्याने सर्व जग प्रकाशमान करणार आहे, असें आनंददायक भविष्य वर्तविल्यास आह्मांस कोणी 'वेडेपिरांच्या' मालिकेंत खेंचील असें वाटत नाही.

*(गुरुवार, दि. १३ मे १९२०)*

# एक इशारा

''हिंदुस्थानासारख्या प्रचंड राष्ट्रास इंग्रजांनी पारतंत्र्यात जखडून टाकण्याचें मुख्य कारण ह्मटले ह्मणजे, प्रमुख राज्यकर्त्यांमध्ये वसत असलेले जातिभेद व मतविरोध हे होय. एरवीं एकदम सगळें युरोप जरी हिंदुस्थानावर तुटून पडतें, तरी सुद्धा हें त्यास, वरील कारणांशिवाय, शक्य होतें ना. ज्यावेळी, पाश्चात्य सुसंस्कृतिपुढें हिंदुस्थानाचा टिकाव न लागतां, तें हतबल होऊन इंग्रजांच्या हाती पडलें, त्या वेळची जपानची स्थिति पाहूं गेल्यास, ती बव्हंशी तशाच प्रकारची होती असें दृष्टोत्पत्तीस येईल, परंतु जेव्हां जातिभेदासारख्या क्षुद्र विचारांस थारा न मिळतां, दिव्यदृष्टीनें बडेलोक व इतर प्रजाजन हे आपापसांतील उच्चनीच भाव विसरुन जाऊन एकमेकांत मिळून मिसळून वागावयास लागले, आणि थोरांची व गरिबांची मुलें एकाच शाळेंत जाऊन एकच विद्या संपादन करूं लागली, तेव्हांच जपानची प्रगति होऊन तें कसल्याहि पाश्चिमात्य सुसंस्काराचा स्वीकार करण्यास लायक व कोणत्याहि बिकट परिस्थितीशीं तोंड देण्यास सामर्थ्यवान झाले.''

***– मार्कीस ओकुमा***

शुद्ध वातावरणांतील हे प्रगल्भ विचार आमच्या हिंदुस्थानांतील सगळ्या राजेरजवाड्यांनी, विद्वान राष्ट्राधुरीणांनी, लोकमान्य देशभक्तींनी, अतएव एकंदर सुसंस्कृत व्यक्तींनी मनन करण्यासारखे आहेत. लोकांच्या पुढाऱ्यांचे कर्तव्य एकमेकांतील उखाळ्या पाखाळ्या काढून समाजांत बजबजपुरी माजविण्याचें नसून, आमची उन्नति कशी होईल, आमच्यांत स्वावलंबन कसें येईल व देशाभिमानाची प्रज्वलीत ज्योत कशी पेट घेईल याचीच लोकांत जागृति करणें हे होय. खुशाल चैन भोगून मनसोक्त आचरण करणें हें राजेरजवाड्यांस इष्ट नसून प्रजा सुशिक्षित कशी होईल, तीस आपल्या स्वदेशाकडे असलेल्या कर्तव्यकर्माची ओळख कशी पटेल व तें बजावण्याचें सामर्थ्य तींत कसें निपजेल, याच गोष्टीचा त्यांस निदिध्यास लागला पाहिजे. देशभक्तांनी आपल्याच स्वदेशप्रेमाचा तोरा न मिरवतां इतरांतही हा प्रेमा कसा

उत्पन्न होईल व कामीं कसल्या उपायांची योजना करणें प्रशस्त आहे, याविषयी त्यांचे लक्ष वेधले पाहिजे. व अशा रीतीनें विचाराप्रमाणेंच आचारानेहि या तत्त्वाची जाणीव लोकांस करून दिली ह्मणजे, ते लोकांकडून धन्यवाद मिळविण्यास पात्र होतात. चार बगलबच्चा भाटांकडून 'शाबास' ह्मणवून घेणें सोपे, परंतु अखिल समाजाकडून वाहवा होणें कठीण असते. 'मी मोठा विद्वान, मी मोठा श्रीमंत, मला लोकांत मिसळून वागण्याचे काम नाही. किंबहुना देशसेवा मला माझ्या पोटापाण्यापेक्षा किंवा ऐषारामापेक्षां श्रेष्ठ नाही, अशी विचारसरणी असलेले सुशिक्षित, वरील मार्कीस ओकुमीच्या ह्मणण्याकडे लक्ष देऊन त्याप्रमाणे वागण्यास तयार होणार नाहीत तोपर्यंत आमची उन्नति कशी होईल, तीस आपल्या स्वदेशाकडे असलेल्या कर्तव्यकर्माची ओळख कशी पटेल व तें बजावण्याचें सामर्थ्य तींत कसें निपजेल, याच गोष्टीचा त्यांस निदिध्यास लागला पाहिजे. देशभक्तांनी आपल्याच स्वदेशप्रेमाचा तोरा न मिरवितां इतरांतहि, हा प्रेमा कसा उत्तन्न होईल व या कामीं कसल्या उपायांची योजना करणें प्रशस्त आहे, यद्विषयी त्यांचे लक्ष वेधलें पाहिजे. व अशा रीतीने विचाराप्रमाणेंच आचारानेहिं या तत्त्वाची जाणीव लोकांस करून दिली ह्मणजे, ते लोकांकडून धन्यवाद मिळविण्यास पात्र होतात व ती विचारसरणी नसलेले सुशिक्षित लोक देशांत हजारों जरी निपजले, तरी तें 'खाया काळ व भुईला भार' याच विशेषणास खचित पात्र होतील. असें मोठ्या खेदानें ह्मणावें लागते. प्रत्येकानें ऐपतीनुसार स्वोन्नतींसाठी त्याचप्रमाणें लोकसेवेसाठी थोडा बहुत तरी प्रयत्न केला पाहिजे जे असल्या आपल्या पवित्र कर्तव्याकडे कानाडोळा करितात त्यांस स्वदेशद्रोहाचे महापातक निःसंशय भोंवून कधी ना कधी जगाच्या न्यायासमोर त्यांस आपल्या कर्तव्यापराङ्मुखतेबद्दलचा जाब द्यावा लागेल. क्षुद्रस्वार्थास बळी पडून जेथें लोकहिताच्या कामास अधिकारी माणसें कसूर करितात तेथें खऱ्या ज्ञानसूर्याच्या उगवण्यास बराच कालावधि आहे, असें भाकीत करण्यास जड जात नाही. निसर्गाच्या रहाटांत जो पुढें जाईल तोच मागच्यास जिंकून आपल्या पाठीमागे गरगर फिरण्यास खास लावील. यासाठी, उशिरा कां होईना, हा इशारा, आमच्या गोमांतकस्थ हिंदु सुशिक्षितांस करणें योग्य वाटल्यावरुन देण्यांत येत आहे. त्याचा योग्य विचार

होईल अशी आह्मांस सबळ आशा आहे.

*(गुरुवार, दि. २० मे १९२०)*

# भारतीय चळवळ

आजकाल ब्रिटिश हिंदुस्थाानांतील राजकीय चळवळ इतकी जोरांत आहे की, ती जर मंद व्हावी ह्या हेतूने कसलेंहि दडपशाहींचे तीक्ष्ण शस्त्र योजिलें, तरी ते आपल्या चळवळींत खंड पाडण्याच्या बाबतीत बोथट आहे असे तेथील लोकांनी दाखविण्याचा निश्चय केला आहे. पंजाबच्या प्रकरणांत तर अरेरावी नोकरशाहीच्या शस्त्रांस प्रत्येक बळी पडलेल्यास कर्मवीरांकडून सिद्ध झालें की देह मेला तरी बेहत्तर पण ध्येय सोडवयांचे नाही. एक पक्ष सबळ व दुसरा दुर्बळ असल्यामुळें त्यांत ज्याची सरशी व्हावयाची त्याचीच झाली. पण त्यांत बायका मुलांच्या नैसर्गिक दुर्बलावस्थेकडे लक्ष्यसुद्धां देण्यांत आलें नाही! ह्या वरुन प्राचीन रोमन इतिहासांत घडलेल्या गोष्टीचें स्मरण झाल्याशिवाय राहत नाही. राजाकडून झालेल्या एका अबलेच्या छळामुळें एकदम सगळी प्रजा बिथरुन थोड्याच अवकाशात राजसत्ताक राज्याचें प्रजासत्ताक राज्यांत रुपांतर झालें, इकडे इतके जाज्ज्वल्य उपाय अमलांत आतांच आले नसलें, तरी मोठ्या वृक्षास फळें येण्यास इतर वनस्पतीच्या मानानें अधिक काळ लागतो व ती फळें नंतर पुष्कळ वर्षे पर्यंत मिळतात. ह्मणून आजच न झालेले एखाद्या गोष्टीचे परिणाम कधीही होणार नाहींत अशी कल्पना करितां येत नाही.

सुक्याबरोबर ओलें सुद्धां जळतें ही गोष्ट विशेष सत्यत्वानें पटण्यासाठी पुढील प्रकार पहा. आधींच वरील सारख्या अत्याचारांनी प्रज्वलित झालेल्या प्रजेच्या असंतोषात खिलापत प्रकरणाने भर पडली. वास्तविक पाहतां कोठें तुर्की राष्ट्र व कोठें हिंदुस्थान. ह्या दोहोंत कसलाही संबंध असेल तर तो धर्म विरुद्धतेचा! ज्यांनी हिंदु धर्माच्या रक्षणार्थ झटणाऱ्या शिवाजी महाराजांच्या कार्यात अडथळा करून हिंदूस सळो की पळो करून सोडिलें

त्या मुसलमानांचा तो देश त्यावरील संकटाने आज हिंदूस आनंद वाटावयास पाहिजे होता. पण वस्तुस्थिती विपरीत असून, 'मराठा तेतुका मेळवावा' ह्या तत्त्वाप्रमाणेंच 'हिंदी तेतुका मेळवावा' ह्या नव्या व्यापक तत्त्वास बाध न येण्याकरितां आमचें हिंदु बांधव जातभाईंच्या दुःखात समदुःखी झालेल्या हिंदी मुसलमानांच्या हातात, आनंदाने सलोख्याचा हात घालण्यास तयार झाले. तात्पर्य हेंच, कीं उत्साहानें चळवळ करण्यास कोणत्या ना कोणत्या कारणानें जास्त नेटानें चालू ठेवण्याास त्यांस कसलेंहि क्षुल्लक कारण पुरेसे होते. कारण एकादी बाब क्षुल्लक असली तरी महत्त्वाच्या माणसांनी तिला हातभार लाविला असतां तिच्यातील क्षुल्लकपणा नाहींसा होतो. असो.

सरते शेवटीं इतकीच अपेक्षा आहे की, भारतांतील चळवळ प्रभावी रीतनीनें पार पडून ज्या स्वराज्यासाठी त्यातील रहिवाशी तळमळ करीत आहेत तें त्यांस लवकर प्राप्त होवो. व त्यांचा सार्वजनिक कृत्यांतील उत्साह पाहून आह्मांस प्राप्त झालेल्या स्वराज्याचा पूर्ण उपभोग घेण्यासाठी तसली स्फूर्ति उत्पन्न होवो. कां की, तशी स्फूर्ति व उत्साह आह्मांत नसेल तर स्वराज्यापेक्षाहि विशेष सुखकर राज्यपद्धति प्राप्त झाली, तरी तिजपासूनदेखील आमची ऊर्जितावस्था होण्याची अशाच नको.

*(गुरुवार, दि. १ जुलै १९२०)*

# गोमांतकाचे नष्टचर्य

इकडील प्राव्हिंसियाल कॉंग्रेसच्या येत्या ४ थ्या अधिवेशनांत पिकाच्या कमतरतेमुळें होणारा धान्याचा तुटवडा, तो सुधारण्याचे योग्य उपाय व जमिनीच्या लागवडीकडे उपयोगांत आणण्याची अल्पश्रमी व सुसह्य अशी यंत्रे इ. विषयांचा खल होण्याचें ठरल्याचें आमच्या वाचकांस माहीत असेलच. वास्तविक पाहतां याविषयीचें सक्रिय, ज्ञानपूर्ण व 'चर्क्षुवैसत्य' असें उदाहरण आमच्या सरकारी शेतकीखात्यास उत्तम प्रकारें देतां आलें असतें व ते इष्टहि होतें. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही, कीं तें खातें फक्त दिखाऊ व भरभक्कम

पगार खात असल्यावरून व त्याचा उपयुक्ततेबद्दलची कोणासच खात्री नसल्यामुळें, वरील प्रकारचा लोकहिताचा प्रश्न काँग्रेससारख्या लोकपक्षीय सभेसच हाती घेणें भाग झाले. ज्या राज्यकर्त्यांची प्रवृत्ति लोकहिताच्या राजपथापासून च्युत होऊन, स्वार्थपर अशा कंटकमय आडवाटेंत शिरली, जेथें कलाकौशल्याचा प्रसार, उद्योगधंद्याची भरभराट आणि शेतीभातीची वाढ इ. प्रकारांनी देशाच्या समृद्धीस हातभार लावण्याचे पवित्रतर कार्य एकीकडेंच राहून, पगारवाढीसारख्या जळूनें सरकारी तिजोरीचे रक्त आटीवण्याचा सपाटा चालविला व वाढता शेतसारा, नवे नवे कर व दिवसेंदिवस सरकारी कर्जाची होणारी प्रगति इ. दुस्तर रोगांस वाव दिला– तेथील राज्यकर्त्यांची कीव येते व असे उद्‌गार सहज बाहेर पडतात, कीं हें 'प्रजेचे दुर्दैव' व राष्ट्राचें अध:पतन होय. आणि हे सगळें राज्यकर्त्यांच्या मठ्ठ डोक्याचें किंवा मुत्सद्यांच्या कवडीमोल राज्यकार्यकुशलतेचें द्योतक नव्हें तर काय? पारतंत्र्यगर्तेत आजन्म घालवावयाचा असल्यास सदरहू मार्गाचें अवलंबन करावें. ह्मणजे जरी प्रत्यक्ष ब्रह्मदेव अशा राष्ट्राची स्थिति सुधारण्यास पुढें सरसावला तरी त्यांस तें अशक्यच होईल. वरील विचार सुचण्याचें कारण ह्मटलें ह्मणजे गेल्या दिवसांत लिस्बन येथील सुप्रसिद्ध 'दियार्यु द नोनिसियस' या वर्तमानपत्राच्या रिपोर्टरनें डॉ. सांतान रोद्रिगीस् या प्रसिद्ध वैद्यकीय शास्त्रज्ञाची जी मुलाखत घेतली व जींत त्यांनी गोव्यातील राजकीय, सांपत्तिक इ. स्थितींचे शोचनीय वर्णन करून त्याचें यथार्थ चित्र रेखाटलें आहे हें होय. त्याचा थोडासा गोषवारा आह्मी खाली देत आहो :–

'पोर्तुगालच्या राजमुकुटांतील अत्यंत दैदिप्यमान व तेजस्वी अशा गोव्यासारख्या हिऱ्याविषयी काय सांगावे? त्याच्या त्या पूर्ववैभवांतील पोर्तुगीझ वसाहतींचे स्मारक अशा दोनच गोष्टी सध्या दृग्गोचर होतात. ठिकठिकाणीच येशुख्रिस्ताची प्रार्थनालयें व मोडून गेलेल्या भव्य अशा इमारतींच्या खाणाखुणा–आफोस–द–आलबुकेर्क या शूर योद्ध्यानें अत्यंत पराक्रमाने मिळविलेल्यसा पूर्वीच्या गोवा शहरांतील सर्व काही नष्ट झालें! फक्त काही चर्च व त्यांच्या भोवतालच्या टवटवित अश्या नारळीच्या झाडांच्या रांगा काय ती शिल्लक आहेत. इतर सुधारणांविषय ह्मणाल तर

तिकडे भोंपळ्याएवढें पूज्य, राज्यकर्त्यांनी ह्या विषयी कांहीच प्रयत्न केले नाहीत. आलबुकेर्कशिवाय मार्केज द पोंबाल या उदार मंत्र्यानें कांही नवीन सुधारणा गोव्यांत घडवून आणिल्या व या नंतरहि कांही सुधारणा करण्याचे प्रयत्न राज्यकर्त्यांकडून झाले, पण ते प्रतिकूल परिस्थितीमुळे यशस्वी झालें नाहीत.'

'आतां तिकडील जमिनीच्या लागवडीच्या सुधारणांकडें वळूं, तिकडे आज आठ वर्षापासून शेतकी खातें नावांचे सरकारी ऑफिस स्थापन करण्यांत आलें आहे. ह्या भपकेदार खात्यासंबंधी दर वर्षी सरासरी २,१४,२८८ रुपयांचा खर्च सरकार करितें! परंतु या खात्यापासून तदृश फायदा कांहीच नसून फक्त सरकारी जंगलांतील लांकूड तोडणें व तें विकून त्याचा फायदा घेणें इतकेंच काय तें चाललें आहे! फार काय? शेतकीविषयक एकादा सुधारणेचा प्रयत्न करून पाहणें झाल्यास एक 'कृषीभूमि' सुद्धां नाही!'

असो. वरील प्रकारचे उधळपट्टीचे प्रकार जेथें चालले आहेत त्या देशाचें दुर्दैव खडतरच ह्मणावयाचें. तिकडे सरकाररीत्या कसल्याहि देशोत्कर्षाच्या प्रयत्नांची अपेक्षा करणे वायफळ असून, लोकहिताच्या सभांनीचं हें सर्व ओझें आपल्या माथीं घेतल्याशिवाय गत्यंतर नाही.

*(गुरुवार, दि २९ जुलै १९२०)*

# 'खरा' देशाभिमान पाहिजे

सांप्रतच्या हलाख स्थितीच्या नरकांतून मुक्त होऊन खऱ्या राजकीय मोक्षाचा सौख्यदायक स्वर्ग गांठण्यास 'जातीच्या' स्वदेशाभिमानाची पोर्तुगाल राष्ट्राला फार आवश्यकता आहे, हें आमच्या वाचकांस सांगण्याची आह्मांवर आज नव्यानें पाळी आली आहे.

पोर्तुगालचें पूर्वीचें प्रधान मंडळ अधिकारभ्रष्ट होऊन त्या जागी नव्याची संस्थापना झाल्याचें वर्तमान आह्मी गेल्या अंकांत प्रसिद्ध केलेंच

आहे. रिपब्लिक राज्यपद्धतीची प्राणप्रतिष्ठा झाल्यास आज जवळ जवळ दहा वर्षे होत आली. या इतक्या थोड्या अवधीत सुमारें चारशें प्रधानांनी १९१० वर्षाच्या आक्टोबर महिन्याच्या ५ तारखेस लावलेल्या प्रजासत्ताक रोपास आपल्या राजकीय ज्ञानाचें पाणी शिंपडलेले असून त्यांतील जीवन रसाची वाढ होण्यासाठी अविश्रांत प्रयत्न केले असतांहि केवळ 'जातीच्या' स्वदेशाभिमानाच्या अभावामुळें पोर्तुगीज राष्ट्रांत सौख्यसूर्य उगवण्याची चिन्हें अजून दिसावयाला लागली नाहींत, ही अत्यंत खेदाची गोष्ट नाकबूल करण्यांत अर्थ नाही.

'जातीच्या' स्वदेशाभिमानाचा अभाव व 'गबाळ' लोकांचे प्राबल्य या दुहेरी कारणामुळें पोर्तुगीज प्रजासत्ताक राष्ट्राचे रोप फोफावत नाही. जो तो देशभक्त ह्मणवून घेणारा बहाद्दर स्व-आप्त-जन सुखप्राप्तीच्या मोहास बळी पडल्यावरून खरं राष्ट्रहित बाजूस राहून जेथें तेथें स्वार्थच बोकाळलेला नजरेस येतो. देशहिताची व्याख्या प्रचंड पोटाच्या घेरांतच लुप्त झाली असल्याने देशाचा अर्थ पोटांतच पार बुडून गेला आहे. तात्पर्य पोटापलीकडे नजर फेंकण्याची सदिच्छा ज्या मानानें 'देशभक्तांत' उत्पन्न व्हावयास पाहिजे होती, त्या मानानें झाली नसल्यामुळें देश सुधारत नाही.

'जातीच्या' देशाभिमानामुळेच शेवटच्या प्रधानमंडळाला आपली अधिकारसुत्रें ज्या कारणानें विसर्जन करावीं लागली तें कारण पाहिलें ह्मणजे सांप्रतच्या पोर्तुगीज लोकांच्या स्वार्थलोलुप वृत्तीची कींव केल्याशिवाय राहवत नाही. पदभ्रष्ट प्रधान मंडळानें कांही कामदारांच्या पगारवाढीचें बील पार्लमेंटात आणून तें पास करून घेण्याचा आटोकाट प्रयत्न चालविला. पार्लमेंटनें त्यास हरकत घेऊन सदरील बिलाविरुद्ध सपाट्याने गिल्ला सुरू केला. आपला स्वार्थ साधणें अशक्य झाल्यावरून 'बीलवाला' प्रधानमंडळ क्रोधाविष्ट होऊन त्यानें पार्लमेंटास रामराम ठोकला!

पदभ्रष्ट मंत्र्यांनी अधिकारसूत्रें ठेवण्याचें हें कारण 'जातीच्या' देशाभिमानाचें अभाव दर्शविणारें नव्हे काय? ज्या राष्ट्रांत 'बशीतील वादळांनी' प्रधानमंडळे बदलली जातात, ज्या राष्ट्रांत पगारवाढीचा भयंकर सैतान इतस्तत: धुमाकूळ माजविण्यास धजतो व ज्या राष्ट्रांत प्रत्येक

'देशभक्त' आपल्या अगडबंब पोटाबाहेर दृष्टि फेंकण्यास अपात्र झाला आहे त्या राष्ट्राचा देशाभिमान 'जातीचा' नसून, नकली, पोटार्थी व दिखाऊ आहे, असें विधान केल्यास आह्मांस कोणी अन्यायी ठरवितील असें वाटत नाही.

ही शोचनीय स्थिती बदलून खऱ्या सौख्याचा मार्ग गांठण्यास अर्थात खऱ्या देशाभिमानांचीच जरुरी आहे. जेव्हा तो प्राप्त करून घेण्यास आह्मी तयार होऊ तेव्हांच आमच्या दु:खसमुद्रास ओहटी लागून, सौख्य सागरात भरती येण्यास प्रारंभ होणार आहे, हें उघड होय.

*(गुरुवार, दि. ५ ऑगस्ट १९२०)*

# नव्या सुधारणा यशस्वी कशा होतील?

पोर्तुगालच्या कृपाप्रसादानों आह्मांस लाभलेल्या स्थानिक स्वराज्याच्या हक्कांत तत्त्वश: नवीन सुधारणा करण्यांत आल्या असून, ब्रिटिश इंडियेंतील हरेक कौन्सिलांप्रमाणे येथेंहि नव्या राजकीय संस्थांचे 'नवे राज्य' जुन्या स्वराज्याच्याच पायावर उभारण्याविषयीं आमच्या गव्हर्नरसाहेबांना पोर्तुगालहून तारेचा संदेश आला आहे. व या संदेशानुरुप नव्या संस्थांची घटना मुक्रर करण्यांत जुने स्थानिक पार्लमेंट गुंतून गेले आहे.

उपरिनिर्दिष्ट नवीन सुधारणांच्या औषधानें गोमांतकास जडलेला सांपत्तिक अवनतीचा महारोग कितपत हटेल, याविषयीं कोणतेही भविष्य वर्तविणें सध्या तरी शक्य नाही. मात्र खरें, कीं वरील औषधाबरोर नोकरशाहीच्या संख्येत छाटछाट करण्याचें जें एक पथ्य सुचविलें आहें त्या पथ्याची लक्ष्यपूर्वक अंमलजावणी झाल्यास रोग्याला बराच आराम वाटेल, असें छातीठोक विधान करण्यास कसलाच प्रत्यवाय नाही.

नुसत्या पथ्यानें कितीतरी रोग्यांची प्रकृति ताळ्यावर आलेली पाहाण्यांत येते. कित्येकदां तर वैद्य लोक पथ्यावरच विशेष जोर देतात व

रोग्याच्या अंगांतून रोगाची हकालपट्टी करण्यांत आपली कुशलता दाखवून पथ्याचें श्रेष्ठत्व सिद्ध करतात.

नोकरशाहीची छाटाछाट करण्याचे हें अत्यंत जोखमीचें व ह्मणूनच गुणवह पथ्य स्थानिक सरकारकडून निरपेक्ष व निर्भयपणें आचरलें गेल्यास आजारी गोमांतकास आराम पडून, सरकारी तिजोरीस नि:सत्व बनविणार तुटीचीं कीड मृत्युपंथास लागेल. व या दुष्ट कीडींचें मरण ह्मणजेच गोमांतकाचें रक्षण होय.

नोकरशाहीच्या 'गगनचुंबित' वृक्षाच्या डहाळ्या छाटून त्याच्या 'सावटीनें' रोडावलेलें राष्ट्रोन्नतीचें झाड फोफावण्यास जागा करुन दिल्यानें 'नवेंराज्य' सुखदायक होणार आहे, हें सिद्ध आहेच. परंतु त्या सुंदर झाडास वेष्टून राहिलेली पगारवाढीची विषारी वेल छेदून, त्यास अंदाजपत्रकांतील अनावश्यक व फाजील खर्ची कलमांचे खत लावल्यास, स्वराज्याची गोड व मधूर फळें चाखण्याचें भाग्य लवकरच प्राप्त होईल, हें तर अगदीं उघड आहे.

एतावता, नवीन सुधारणांच्या भव्य इमारतीस बळकटपणा येणेस सर्वथैव वर निर्दिष्ट केलेल्या उपायांच्या पायावर तिची उभारणी झाली पाहिजे. असें जोपर्यंत होणार नाहीं तोपर्यंत 'नव्या स्वराज्या' नव्या गोमांतकाची अपेक्षा करणें ह्मणजे आफ्रिकेंतील साहारा वाळवंटात नारळीच्या झाडांची लागवड करून त्यांच्या गोड फळांचें माधुर्य अनुभवण्यास हपापण्यासारखें हास्यास्पद आहे.

सवडीनुसार नव्या जुन्या स्वराज्याची सोपपत्तिक माहिती मराठी वाचक वर्गास करून देण्याचें अभिवचन देऊन या लांब होत असलेल्या चिमुकल्या लेखाची येथेंच परिसमाप्ति करितों.

*(गुरुवार, दि. २६ ऑगस्ट १९२०)*

# सोन्याचे बोल!...

आमच्या स्थानिक पार्लमेंटच्या मागील एका बैठकींत लठ्ठ नोकरशाहीच्या भक्कम पगारांचे प्रमाण कमी करण्याचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न निघला. कोणतेहि नवीन कर बसविण्यापूर्वी वरील कृत्यापासून होणारा फायदा दृष्टीसमोर ठेवणें अत्यावशयक असल्यानें, उपरोग्त पार्लमेंटच्या कांही लोकपक्षीय कौन्सलरांनी, सरकारी तिजोरीचें रक्त शोषून तिला नि:सत्व बनविणाऱ्या अगडबंब व अवाढव्य पगारांचे प्रमाण तिच्या सांपत्तिक शक्तीला रुचेल व पचेल, अशा स्थितीवर प्रथमत: आणण्याची जरुरी गव्हर्नरसाहेबांस भासविली. वास्तविक पाहतां जनतेनें निवडलेल्या मेंबरांचें हें ह्मणणें अगदी बरोबर होतें. काळा-गोरा, नेटिव-युरोपियन अशा तऱ्हेच्या क्षुद्र अतएव त्याज्य भेदांस त्यांनी आपल्या ह्मणण्यांत बिलकून थारा न देतां, केवळ मोठ्या पगारांनी छोट्या तिजोरीस पडणारी तूट नष्ट होऊन बसविण्यांत येणाऱ्या नवीन करांपासून जनतेस होतांहोइतो कमी कष्ट पडावे, ह्या एकाच पवित्र हेतूने उपरिनिर्दिष्ट मत त्यांकडून समप्रमाण मांडलें गेलें होते.

परंतु शांत व सम तावादी प्रांताधिपतींस लोकपक्षीय मेंबरांचा वरील युक्तीवाद पसंत पडला नाही. इतकेंच नव्हे, उलट त्यामुळें त्यांचा चित्तक्षोभ होऊन, साहेबमजकुरांच्या रिपब्लिकन तोंडातून खालील अर्थाची मुक्ताफळे निघाली :-

''जर तुह्माला पगार कमी करायचा असेल तर तो तुमच्या लोकांचा करा. पाहिजे असल्यास त्यांचा पगार जितका कमी ठरवावासा वाटतो तितका कमी ठरवा. अगर त्यांनी राष्ट्रकार्यार्थे मोफत झटालें, अशी खास व्यवस्था करा. माझ्याकडून त्याला ना नाही. पण युरोपियन लोकांच्या पगारांत मात्र कसलाहि ढवळाढवळ करणें मला बिलकूल मान्य नाही. कांकी, त्यांची येथें कशी स्थिति असतें हें मला पूर्ण अवगत असल्यानें, गोऱ्या नोकरशाहीचा पगार कमी होणें कोणत्याहि दृष्टीनें इष्ट नाही.''

समतावादी व राष्ट्रभक्त (!) गव्हर्नरांचे हे सोन्याचे बोल प्रत्येकानें

हृत्पटलावर खोदून ठेवण्यालायक असल्यामुळें ते आह्मी येथे दिलें आहेत. त्यांपासून वाचकांस पुष्कळ बोधामृत चाखण्यास मिळणार असून क्षुल्लक स्वार्थावर गदा येतांच दिखाऊ तत्त्वांची उघडपणे कशी होळी होते ह्याचेंहि ढळढळीत व ताजें उदाहरण त्यांस अनुभवावयास सांपडेल!

पण गव्हर्नर साहेबांच्या ह्मणण्याप्रमाणें त्यांच्या भक्कम पगारखाऊ गोऱ्या बांधवांची स्थिति जर खरोखर अत्यंत निकृष्ट व हलाखीची आहे, तर त्यांना डॉ. जाइम मोराइस स्वदेशाचा राजमार्ग सुधारण्याचा सरळ उपदेश कां करीत नाहीत? त्यांच्या अस्तित्वामुळें गोवा सरकारच्या तिजोरीस तोटा होत आहे. अशा स्थितीत जर राष्ट्रासाठी आपल्या लठ्ठ पगारांचे प्रमाण आमच्या सांपत्तिक शक्तीच्या आवाक्यांत आणण्यांस कबूल नाहींत, तर असल्या स्वार्थी नोकरशाहीकडून देशाचें हित तरी कसचें होणार?

बाकी, कित्येक गोरे अंमलदार येथें येऊन गब्रू बनलेले पुष्कळांनी पाहिलें असल्यामुळें साहेबमजकुरांच्या वरील बोलांत सत्यापेक्षां सोनेंच जास्त भरलेलें आहे, असेंच जनता ह्मणेल.

कसेंहि असो, गोष्ट खरी की, गव्हर्नरसाहेबांच्याहातून पगारांचे प्रमाण कमी तर झालें नाहींच. उलट करांचे प्रमाण मात्र बेसुमार वाढलें हें गेल्या अंकावरुन वाचकांस कळलेंच असल्यानें हे सोन्याचे बोल येथेंच आटोपते घेतो.

*(गुरुवार, दि. १४ ऑक्टोबर १९२०)*

# "पुढें गती कैसी?"

'पोर्तुगीज इंडियेंतील गव्हर्नरसाहेबांच्या, प्रेरणेवरून गोमांतकांत करांची वाढ करण्यांत येणार आहे.' अशी बातमी कांही दिवसांमागें एका, पत्रानें प्रसिद्ध केली होती. ती बातमी विश्वसनीय मानून आह्मीं व आमचे इतर कांही ख्रिस्ती व्यवसाय बधूंनी करवाढीविरूद्ध खरमरीत टीका केली होती, हें वाचकांस आठवत असेलच. परंतु वरील अफवा निराधार असून, ती केवळ

लोणकढी थाप आहे, असें आमच्या प्रांताधिपतीनें स्थानिक पार्लमेंटच्या गेल्या दिवसांतील एका बैठकींत अध्यक्ष या नात्यानें निक्षून सांगितलें, हें आतां महशूर आहे.

करवाढीची गोष्ट कल्पित असल्याचे कळून आह्मांप्रमाणेंच आमच्या वाचकांसहि आनंद वाटल्याशिवाय राहणार नाही, हें अर्थांत उघड आहे. परंतु या आनंदाच्या टिकाऊपणापेक्षां त्याच्या क्षणभंगुरत्वावरच विश्वास ठेवण्याविषयी लोकांच्या संशयीं मनात जास्त कल झुकेल. कां कीं, जरी आमचें सरकार कर वाढविण्याचें अमंगल, आततायी व अमानुष कृत्य होणार नाहीं, असें गव्हर्नरसाहेबांच्या मुखांतून वदवीत आहे, तरी जोपर्यंत नोकरशाहीचे पगार वाढविण्याच्या अप्रतिहत चालू असलेल्या पातकी कृत्यांस व इतर अनावश्यक 'छंददंगांस' आळा पडलेला दिसून येणार नाहीं तोपर्यंत डॉ. मोराईसचे बोल फोल नाहींत असें खात्रीपूर्वक मानण्याला गोमांतकीय जनता सहसा तयार होणार नाही.

कर वाढविण्यांत येणार नाहींत आणि नोकरशाहीच्या 'सुंदर उपवनांत' तर महाग खत भक्षक रोप पेरण्याच्या अखंड ढंगांचा रंग पालटणार नसून इतर छंदांचा 'सोनें तोळा रुपये सोळा' अशा प्रकारचा धंदाहि बंद पडणार नाही, हा चमत्कार नव्हे काय? परंतु जोपर्यंत सेंट झेवियर सारख्या धार्मिक संतांनीं राजकीय चमत्कार घडवून आणण्याची आपलीं पात्रता सिद्ध केलेली नाहीं तोपर्यंत वरील गोष्टींचे 'चमत्कारिकत्व, जनतेच्या मनांत ठसविण्याचें काम प्रत्यक्ष चार तोंडाच्या ब्रह्मदेवाससुद्धां अशक्य आहे. आमचे गव्हर्नर साहेब तर पडले एक तोंडी. त्यांच्याकडून काय होणार? असो.

तात्पर्य काय कीं, करवाढीची भीति समूळ नष्ट होण्यास गव्हर्नरसाहेबांचें स्थानिक पार्लमेंटांतील अभिवचन पुरें होत नाही. नुसत्या अभिवचनांनी ओलावा येण्यासारखी लोकांची मनोभूमिका इतकी कमी तप्त खास नाही. जोंवर बुरोक्रासीच्या भक्कम पगारांवर छाटाछाटीच्या गदेचा आघात करण्याचा धाडसी पराक्रम गाजविला जाणार नाही, जोंवर नोकरशाहीच्या वाढत्या वृक्षाच्या डहाळ्या छेदण्याचें बिकट पण अत्यावश्यक

काम करण्याचें सक्रिय धैर्य दृग्गोचर होणार नाही, व शेंवटी, जोंवर भरपूर दृव्योत्पादनाचें आधुनिक उपाय अमलांत आणण्याचा यशस्वी उपक्रम होणार नाही. तोंवर कसल्याहि राजकीय चमत्कारांवर विश्वास ठेवण्याला मनाची तयारी दाखविणें ह्मणजे निवळ गारुड्यांच्या नकली रुपयांनी श्रीमत बनण्याची शेखमहंमही इच्छा प्रगट करणें होय. ह्मणून राज्यकर्त्यांस आमची इतकीच प्रेमाची विनवणी आहे की, 'महाराज, गोमांतकाचें खरेंखुरें हित साधण्याचा तुमचा निर्धार आहे तर आधीं तुमच्या नोकरांचा पगार कमी करा; नोकरांची संख्या बेसुमार वाढलेली आहे. त्यांत छाटाछाट करा; व इतकेंहि करून करांचें उत्पन्न अपुरें ठरल्यास, योग्य व प्रामाणिक माणसांच्या जबाबदारीखाली द्रव्योत्पादनाचे सरकारी धंदे थाटून तिजोरीस पडणारी तूट भरून काढा. या शिवाय दुसरा तरणोपाय नाही. असें न झाल्यास शिरोभागीं केलेल्या प्रश्नाचें उत्साहजनक उत्तर मिळणें असंभवनीय आहे, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.'

*(गुरुवार, दि. १५ जुलै १९२०)*

# हें स्वराज्य की साम्राज्य?

''धन्य ते गोव्यांतील नागरिक, कीं ज्यांना न मागतां न झुंजतां समतावादी, स्वातंत्र्यप्रिय व उदार पोतुगालचे स्वराज्यदान दिलें! अहाहा! काय ते पुण्यवान गोमांतकीय रहिवाशी, कीं ज्यांना राजकीय दृष्ट्या स्वत:चा आर्थिक कारभार स्वत:च चालविण्याची सवलत मिळाली! आह्मीं जर तेथें जन्माला आलों असतों तर फार बरें झालें असतें.''

वरील उद्गार दारुण परवशतेनें जाचलेल्या आमच्या ब्रिटिश हिंदुस्थानांतील कांही लोकांच्या तोंडांतून निघालेलें आह्मी ऐकिलेले असल्याने आमच्या 'स्वराज्याचा' अल्प शब्दांत स्पष्ट खुलासा करून त्यांच्या भ्रमाचा भोपळा फोडण्याचें आज आह्मी योजिले आहे.

'स्वराज्य' ह्मणून जी उपनावांची अपूर्ण चीज पोर्तुगाल साम्राज्यानें उदारपणें आह्मांस नजर केली आहे. ती सर्व दृष्टींनीं 'औरच' आहे. आमचें

‘स्वराज्य’ निर्भेळ तर नाहीच – व अशाची आह्मांस केव्हांहि जरुरी नाहींच ह्मणा! पण ज्यांस साम्राज्यांतर्गत संज्ञा आहे असल्याहि प्रकारचें तें नाही.

आमच्या स्वराज्यघटनेनुरुप आह्मांस शिपाई, प्यादे, लहानसहान कारकून नेमण्याचा अगर त्यांना कामावरून दूर करण्यांचा ‘गव्हर्नरी’ अधिकार आहे! ह्मणजे गोव्याच्या पोर्तुगालाहून नेमणूक होऊन आलेल्या गव्हर्नरांस उपरोक्त महत्त्वाचा हक्क आहे! गोव्यांत काम करणारे इतर बडेबडे कामगार साम्राज सरकारकडून नेमिले जातात!

हरेक आर्थिक व ॲडमिनिस्त्रेटिव्ह बाबी संबंधाने गोवा सरकारास लोकपक्षीय सल्लागारांच्या मदतीनें पाहिजे तसले युद्ध, तह व सरहद्द बदलणें इत्यादि गोष्टी वगळून– कायदे तयार करण्याचा पूर्ण अधिकार आहे. पण ते अमलांत येण्यास त्यांना साम्राज्य सरकारची संमति पाहिजे! गोवा सरकारनें आपल्या कायद्यांच्या मसुद्याचें चोपडे–मग तें कितीहि फायद्याचें असो– साम्राज्य सरकारच्या दरबारांत रुजू केलें पाहिजे. तीन महिन्याच्या अवधींत ते मसुदें पास होऊन आले तर ते ज्या रीतीनें बनविण्यात आले त्या रीतीनें अमलांत आणण्यास गोवा सरकार मुखत्यार आहे. न पेक्षां साम्राज्य सरकारच्या इच्छेनुरुप त्यांची विल्हेवाट लावल्याशिवाय गोवा सरकारला अन्योपाय नाही! यदाकदाचित् साम्राज्य सरकारच्या विसरभोळेपणानें येथून गेलेल्या मसुद्यांस तीन महिन्यांच्या अवधींत त्याकडून कांहीच प्रत्युतर न आल्यास मात्र गोवा सरकारला त्या मसुद्यांस कायद्याचें स्वरूप देऊन ते अमलांत आणण्याचा हक्क आहे.

परंतु इतक्यांतच आमच्या मध्यमपदलोपी स्वराज्याचें वैभववर्णन संपत नाही.

‘साम्राज्य सरकारला गोवा सरकारच्या तिजोरीवर पाहिजे तेव्हां व हवा तसा हात मारण्याची पूर्ण मोकळीक असून, त्यास आळा घालण्याचें काम गोमांतकाच्या सामर्थ्याबाहेरचें आहे!’

थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे गोव्याचें स्वराज्य अशा प्रकारचें आहे, की त्यांत ‘पाहिजे तेव्हां व पाहिजे तसा हैदोस घालण्यास’ साम्राज्य सरकारला पूर्ण स्वातंत्र्य आहे!

तेव्हां आह्मीं ब्रिटिश हिंदुस्थानांतील आमच्या स्वराज्यानें(!) दिपून गेलेल्या बंधूंस विचारितो की :-

'हें स्वराज्य कीं साम्राज्य?'

*(गुरुवार, दि. २१ ऑक्टोबर १९२०)*

# राष्ट्रीय कर्ममार्ग

एकदां टीचभर पोटाचा कूटप्रश्न सुगम प्रकारें सुटला ह्मणजे, मनास मानेल तर, फुरसद असेल तर, स्वहितास कोणत्याच रीतीनें धोका न येईल तर, मग खुशाल देशहित हा शब्द काहींदा उच्चारण्यांतच कर्तव्याची परमवधि होते, असा, स्वत:चा समज करून दुसऱ्यांसहि तसेंच उमजवूं पाहणाऱ्यांस, असहकारितेचा कर्ममार्ग स्वीकारून स्वत:चा जीवितनिर्वाह कष्टप्रद करून घेणाऱ्या, ब्रिटिश हिंदुस्थानांतील राष्ट्रीय वीरांच्या कृतीबद्दल सहानभूतियुक्त विस्मय वाटल्याशिवाय राहणार नाही. एकदां, कोणत्या ना कोणत्या रीतीनें नोकरशाहींत शिरकाव करून दरमाही कुटूंबखर्च जेमतेम भागविण्यासारखा थोडा बहुत पगार मिळूं लागला, ह्मणजे त्यांस बिलगून राहून, त्याहून उच्च पायरीवर कसें पाऊल टाकितां येईल ह्या विवंचनेंत सांपडलेल्या कर्ममार्गी राष्ट्रभक्तांनी पटापट नोकऱ्या सोडण्यांत दाखविलेलें मनोधैर्य व निस्वार्थीपणा यांच्या विषयीं खरी कल्पना होणें शक्य नाही. कां, कीं जी गोष्ट प्रत्यक्ष आचरणापासून किती आयास पडतात हें समजणें कठीण, ती नुसती वर्तमानपत्रावर वाचल्यानें समजणें किती दुर्घट, हेंहिं पण कल्पनेनेंच थोडेंसें जाणतां येईल. तरी त्यांस स्वानुभव पाहिजें. न पेक्षां त्या गोष्टीचें महत्त्व कसे कळेल? आतां, केवळ 'दुरून डोंगर साजरे' ह्या ह्मणीच्याअन्वये जर ब्रिटिश हिंदुस्थानांतील राष्ट्रीय चळवळीकडें विहंगम दृष्टीनें पाहून समाधान मानतां येईल, तर असलीं स्वार्थत्यागाची कृत्यें करण्यांस तिकडील तसलींच माणसें पाहिजेत असें मानल्याशिवाय आह्मी बेजबाबदार ठरून त्या समाधानाची परिपूर्णता होणार नाही!

असहकारितेचा कर्ममार्ग स्वीकारणें ह्मणजे राजाच्या अनादरास पात्र होऊन उदरनिर्वाहास बिकट अवस्था प्राप्त करून देण्याप्रमाणेंच आहे. एकाहून एक तीव्र अशा दोन संकटांशी टक्कर देण्यांत स्वार्थत्यागाचें उत्कट व व्यावहारिक उदाहरण देणारें, तोंडानें उच्चारण्यापेक्षां किंवा दुसऱ्यांनी आचरलेलें विस्मयतेनें टकमक पाहण्यापेक्षां कृतीनें करून दाखविण्यांतच देशहित ह्या शब्दाची – त्याच्या थोर नांवांसारखी – योग्य बजावणी होत आहे, हें उघड सिद्ध करून देतात. ह्यावरून, स्वहितास कोणत्याच रीतीनें बाधा न आणितां जें काम करितां येईल त्यांस देशहित हें मोहक नाव देण्याहूनहि वेळीं प्रसंगी स्वहित धोक्यांत घालून सुधां आचरलेलें जे देशहित तेंच खरें राष्ट्रीय कर्तव्य होय. हें आमच्याच शेजारीं आह्मांस पाहण्यास मिळालें ही गोष्ट शुभ लक्षणाची आहे.

इतक्या निकट शेजारी चाललेल्या चळवळीचा परिणाम गोव्यावर होणें स्वाभाविक असून, आज ब्रिटिश हिंदुस्थानांत चाललें आहे तें फक्त त्या लोकांपुरतेंच, गोव्यातील लोकांचा त्याशी कोणताहि संबंध नाही, असें समजण्याइतकी गोमांतकस्थांची दृष्टि मंद झाली आहे हें मानणें देखील उचति होणार नाही. त्याशीं पूर्ण सहानुभूति ठेवणें हें तर आमचें कर्तव्य आहेच. शिवाय, त्यांच्यासारखे मनोधैर्य आमच्याहिकडून पडल्यास, दाखविण्याची तयारी ठेवून, त्या अखिल भारतवासी लोकांपैकीच आह्मीं देखील आहोंत, हें पाहिजे त्या वेळी दिसून यावें.

असहकारी लोकांशी सहानुभूति ठेवणें ह्याचा अर्थ असा नाही, कीं आह्मींही आतांच पोर्तुगीज सरकारशीं असहकरिता पुकारून त्याचें अनुकरण करावें! सुदैवानें तशी वेळ आली नाही. यदाकदाचित् आली असती, तरी असहाकारिता अमलांत आणण्यासारखी इकडे परिस्थिती नव्हे मन:स्थिति – अनुकूल नाहीं, असें मोठ्या दिलगिरीनें ह्मटल्याविना सत्याविष्करण होणार नाही.

आतां कोणी असेंही ह्मणेल, कीं ह्या असहकरितेचा परिणाम ह्मणजे नोकऱ्या गमावून बसणें हाच होय. हें खरें मानलें तरी आपल्या पोटापुरते न पाहतां, राष्ट्राची स्वराज्य – क्षुधा शमविण्याच्या कामीं तें हाल सोशितील

व आज पोटाचें नुकसान करणारे, स्वदेशासाठी, गोळीबारांस, ऐटीनें छाती अर्पण करून स्वराज्यास किती पात्र आहोंत ह्याची खातर जमा इंग्रजांस पटवून इच्छेप्रमाणे वांगणे भाग पाडितील – व शेवटी राष्ट्रीय कर्ममार्गापासून च्युत न होतां स्वराज्य मोक्ष साधितील तथास्तु.

*(गुरुवार, दि. २८ ऑक्टोबर १९२०)*

# राजकारण

आज प्रत्येक सुधारलेल्या किंवा सुधारू पाहणाऱ्या देशांतील लोकांस आपली राजकीय स्थिति शक्य तितकी उच्च दर्जाची असावी असें वाटत आहे. पण कामासाठी पाहिजे असलेली तयारी ज्यांनी केली त्यासंच ती स्थिति प्राप्त करून घेतां येते, हें फ्रान्सांतील राज्यक्रांतीनें उदाहरण घालून दिल्यापासून पाहण्यास मिळत आहे. सुधारणेची परमावधि झाली ह्मणजे, राजकीय स्वातंत्र्य मिळविता येते, हा जुना अनुभव खोटा ठरून कोणत्याहि रीतीने राजकीय स्वातंत्र्य मिळविलें ह्मणजे तो दशे सुधारला आहे असे मानण्यांत येतें.

कांही वर्षांपूर्वी ज्यांचा क्रयविक्रय केला जात असे, असे निग्रो–जे पारतंत्र्य हाच आपल्या जन्मसिद्ध हक्क असे समजत असत – तेच आज स्वातंत्र्याविषयी धडपडून आफ्रिका ही केवळ आपणा स्वताः साठीच हे तत्त्व प्रतिपादित आहेत. अशी काळीं हिंदी लोकांसारख्यांवर व त्यांतहि गोमांतकीय हिंदी लोकांवर आपल्या राजकारणांतील दोष लक्षांत घेऊन ते दुरुस्त करण्यांविषयी किती आतुरता दिसून आली! दोषांची दुरुस्ती करण्यासाठी अथवा करविण्यास भाग पाडण्यासाठी, अगोदर ते दोष कोणते व कसल्या स्वरुपाचे हे ध्यानांत घेतलें पाहिजे. ह्मणून इकडील लोकांस राजकारण समजून त्याचें आकलन करण्याची बुद्धि उत्पन्न झाली पाहिजे. इकडील राजकारण अरेरावीचें किंवा बेबंदशाहीने चाललें असल्यामुळे त्याकडे लक्ष्य देण्यास सुद्धां बहुतेकांस कंटाळा येण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ, मुर्गावच्या ज्युलगादाचें

कोमांर्कांत रुपांतर झालें असें ऐकून तेथें असल्या द्रव्यसंहारक व अनावश्यक घडामोडीची गरज नव्हती असें कित्येकांस वाटलें असेलच. पण इतक्यांत, जन्मित बालक ज्या प्रमाणें मृत जन्मून जन्ममृत्यूंच्या सांगडीची स्पष्ट व तादृश्य खात्री पाटविते, त्याप्रमाणें पोर्तुगीज कायद्यांच्या जन्माबरोबर त्यांच्या मागें मृत्यू लागतो असें कोमार्का ऐवजी ज्युलगादच कायम राखल्याचें ऐकून आश्चर्य वाटेल. पण ही गोष्ट गावो सरकारच्या तिजोरींत भर घालणारी आहे असें पाहून समाधानास थोडी तरी जागा असल्याबद्दल आनंद वाटतो. शिवाय बरें किंवा वाईट असलें, तरी तें आमचेंच राजकारण आहे, ह्मणून त्याकडेच लक्ष्य देणें हें आमचें आद्य कर्तव्य आहे हें सांगणे नकोच.

*(गुरुवार, दि. ११ नोव्हेंबर १९२०)*

# पाहिजे 'जातीचे'!

चालू नोव्हेंबरांत कॉंग्रेस प्रोव्हींसियालचे चौथें अधिवेशन व्हावयाचें असून त्याची तयारी करण्यांत बरेच दिवसांपासून खटपट चालली आहे. सरकारच्या सहानुभूतीच्या कृपाछत्राखाली वर्षांतून एकदां क्रॉंग्रेसची बैठक व्हावयाची असल्यामुळे व तींत सरकारी व बिनसरकारी लोकांस भाग घेतां येत असल्याकारणाने प्रजेची सगळी गाऱ्हाणी सरकारच्या कानावर पडून त्याचें निवारण करण्याचें कार्य सरकारकडून होण्याच्या बाबतीत, गोव्यांतील लोकांची आर्थिक उन्नतावस्था घडून येण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणे निरनिराळ्या व दूर ठिकाणाहून येऊन कॉंगेसांत एकत्र होणाऱ्या प्रतिनिधींनी गोमांतकच्या गरजा कोणत्या व त्यांतील अत्यावश्यक कोणत्या हें लक्षात घेऊन त्या सुधारण्याचे कार्य अमलांत आणणें सुलभ पडेल, हाच काय तो कॉंग्रेस प्रोव्हीसिंयाल अस्तित्वांत येण्याचा मुख्य उद्देश. पण तो सिद्धीस जाणें किंवा न जाणें हे कोंग्रेसिस्ताच्या कर्तव्यशीलतेवर अथवा कामचुकाऊपणावर अवलंबून आहे. एखादा उत्तम ठराव पास होणे, सगळ्या गरजांत अत्यंत महत्त्वाच्या गरजांचा ऊहापोह करून त्या निवारण्याची उपाययोजना करणें

गोव्यांतील विचारी लोकांच्या विचारसरणीच्या धोरणानें व एकदिलानें उन्नति मार्ग आंखणे, अशी एकाहून एक विशेष जबाबदारीची कृत्यें करणें, ही जशी कोंग्रेसची कर्तव्यें आहेत. तसेंच त्या पास झालेल्या ठरावांस सक्रिय अस्तित्वाचें मूर्त स्वरूप प्राप्त करून देणें हेंहि पण अतिशय जबाबदारीच्या कामगिरीचें आचरण आहे. ही गोष्ट विसरता येणार नाही.

सरकार हें प्रजेपाशी अनेक नियमांनी बद्ध झालेलें असते, पण त्या नियमाचे पाश अंगवळणी पडले असल्यावरून त्यांची आठवण त्यांस न राहणें हें स्वाभाविक आहे. ह्मणून ज्या वेळीं सरकारच्या कर्तव्याची जागृति करण्याचा प्रसंग येतो, त्या वेळीं त्या नियमाचे पाश प्रजेकडून आंवळल्यावांचून सरकारस आपल्या कर्तव्याची आठवण पडत नाही, असा अनुभव आहे. काँग्रेस प्रोव्हींसियाल कडून पास झालेले ठराव अस्तित्वांत येणें किंवा न येणें हे सरकारी सहायावर अवलंबित झालेले दिसेल, त्या वेळीं सरकारास तें देणें भाग पाडण्याकडे प्रयत्नाची शिकस्त केली पाहिजे. ह्या कामीं, ह्मणजे सरकारच्या कर्तव्याची जागृति करण्यासाठी अशी एक अगत्याची अट आहे, की प्रत्येक नागरिकांस स्वदेशाशीं आलें कळकळीचें कर्तव्य काय ह्याची जाणीव असली पाहिजे. सुधारणा झाली पाहिजे असें सगळ्यांसच वाटते. तथापि त्या कशा अंमलांत आणाव्या ह्या उपायांची जाणीव नसल्या कारणे 'योजकस्तत्र दुर्लभ:' ह्या न्यायाने, अखेरीस सुखकारक परिणाम दृश्य स्वरूपात पाहण्यास मिळत नाही. सबब सुधारणा पाहिजेत असें ह्मणून वरवर केवळ पांडित्य दाखविण्याकरिता काँग्रेसांत भाषण करून कार्यसिद्धीची अपेक्षा करणें ह्मणजे, तोंडानें भात ह्मटल्याबरोबर जेवण उरकल्याचा बहाणा करणें होय. पण अशानें खऱ्या भुकेंचे शमन थोडेंच होण्यासारखें आहे? ह्याच दृष्टिकोनानें काँग्रेसांतील भाषणें व ठराव याकडे पाहू लागलो, तर वरील क्षुधा तृप्त न होण्याची उपमा त्या ठरावांस सुधां लागू पडते असें दिसेल. मात्र क्षुधे ऐवजी पोटांतील अंतरीची तळमळ हे शब्द घेतले पाहिजेत. सारांश हाच, की आह्मांस आमचे कर्तव्य कळल्या खेरीज सरकारच्या कर्तव्याची ओळख होणार नाही व झाली तरी सरकारास त्याची कर्तव्ये करणे भाग पाडतां येणार नाही.

पुष्कळदां सगळ्याचें काम ते कोणाचेंच नव्हे असें समजण्याकडे बहुतेकांची प्रवृत्ति असल्यामुळें, काँग्रेसांत भाग घेण्याच्या कामी अनेकजण टाळाटाळ करितात. अशा रीतीनें होतें काय, तर सार्वजनिक कार्याची उत्सुकता न वाढतां शिथिल पडते. जर गोमांतकस्थांसच काँग्रेसविषयीं ओढा नाही. तर सरकारांवर त्यांचे वजन कसे पडावें? ह्याकरितां काँग्रेसांत भाग घेऊन तो अस्तित्वांत ठेवण्याचा स्तुत्य उद्देश तडीस नेण्याचें कार्य खोळंबू देऊन नये.

*(गुरुवार, दि. १८ नोव्हेंबर १९२०)*

# आमचें स्वराज्य

अति कृपणाला कल्पवृक्ष प्रसन्न व्हावा, पण त्याकडे काय मागून घ्यावें हें त्यास कळूं नये, मागण्याची इच्छा आहे, पण मागतां येऊं नये अशी एक चमत्कारिक अवस्था गोवा प्रांताची 'स्वराज्य' मिळाल्यावर झाली आहे. आकस्मिक श्रीमंती आल्यावर ती कशी उपभोगावी हें कांही काळपर्यंत दरिद्र्याला समजत नाही तशी गोवा प्रांताची स्थिति झाली आहे. ह्याचें कारण काय? भविष्यकाळीं अमुक होईल व तसें झालें ह्मणजे अमुक करीन, अशी एक प्रकारची पूर्वतयारी करावी लागत असते, तिचा अत्यंताभाव असल्यामुळे स्वराज्याचा उपभोग कसा घ्यावा हेंच समजेनासें झालें आहे!

ब्रिटिश हिंदुस्थानवासी पुढारी स्वराज्यसुंदरीच्या कृपाकटाक्षाकरितां कोण अट्टाहास करीत आहेत हे सर्वश्रुतच आहे. स्वराज्याकरितां ते नुसतेच अविश्रांत प्रयत्न करीत नसून अर्ध्या शतकापेक्षाहिं जास्ती काळपावेतों लढत आहेत. स्वराज्यसुंदरीची नुसती छाया दिसण्याचा संभव आहे न आहे, इतक्यांतच ती प्रसन्न झाल्यावर तिच्या योग्यतेनुरूप बडदास्त कशी ठेवावी हा प्रश्न त्यांच्यापुढे एव्हांच उभा राहिला आहे.

गोवा प्रांताला स्वराज्य लाभण्यापूर्वी अशी परिस्थिती उपस्थित झाली नव्हती. अखिल हिंदुस्थान राष्ट्रीय परिषद सारखीं परिषद भरावी लागली

नाही. जहाल व्हावें की मवाळ व्हावें, किंवा दोनही मतांचा अवलंब करून वेळ पाहून दुतोंडी व्हावें ही अडचण आली नाही. स्वराज्य संघ बनवावा लागला नाही किंवा गांवोगाव फिरून लोकांत जागृति उत्पन्न होण्यासाठी व्याख्यानें देण्याच्या एजन्साहि स्थापाव्या लागल्या नाहीत. असें असतां किंबहुना असें करण्यास वाव न देतां अकस्मात (?) चारशें वर्षांनंतर तिची आराधना केली नसतां स्वराज्यसुंदरी स्वाभिमान सोडून प्रसन्न झाली, तिची बडदास्त ठेविण्यांत येऊ नये यांत कांहीच आश्चर्य नाही!

कधींच न येणारा श्रीमंत पाहुणा आपल्या घरी यावा व त्याची योग्य बडदास्त ठेवण्यासाठी त्याच्या योग्य पदार्थांची पूर्व योजना झाली नसल्यानें यजमान किंकर्तव्यमूढ होऊन जावा, अशाच प्रकारची अवस्था गोवा प्रांतस्थ यजमानाची स्वराज्य पाहुण्याला पाहून झाली आहे.

स्वराज्याला पात्र असो किंवा नसो, मानसिक व सांपत्तिक उन्नति झालेली असो किंवा नसो, कलाकौशल्य व उद्योगधंदे यांची वाढ झालेली असो किंवा नसो, किंवा हरघडी जीवन कलहार्थ लागणाऱ्या क्षुल्लक पदार्थांकरितांसुद्धा परक्या कडे तोंड वेंगाडावें लागो, स्वराज्य मिळाले आहे एवढें खरें व याचे खरें इंगित आपणावरची राज्यपद्धतीची जबाबदारी काढून पळत्या चोराची लंगोटी पकडण्यांत आहे असें दिसून येईल. नाहींतर तंबाखु, मोटार, घोडागाडी, खटारें इत्यादिकांवर परवानगी खेरीज निराळे कर बसविण्याची सरकारास बुद्धीच उपजली नसती! बरें एवढें हें कराचें डोईजड बोजें खरोखर जनतेवर लादण्यांत आलें, तर त्यायोगें जी तिजोरीत भरती होईल त्याचा विनियोग कसा होईल, तर शिक्षणाच्या मिषानें नोकर शाहीचा पगार वाढविण्यात! नवें नवें हुद्दे निर्माण करून लठ्ठ पगार देण्यांत व चैन भागविण्यांत!!! बाकी जे खरें हक्कदार ते पाहिजे तर भीक मागून पोट भरोत.

वरील करांविषयीं विवेचन करतांना आमचे बंधु 'विद्याप्रसार' ह्मणतात की, तंबाखूवर जादा कर लादल्यानें तें व्यसन एक तर कमी होईल किंवा बेसुमार वाढेंल. बेसुमार कां वाढेल तें ते सांगत नाहीत. पैशाची किंमत कमी झालेल्या परिस्थितींत तें व्यसन कमी होणें दुरापास्त आहे हें दारुच्या

वाढत्या खपावरून सहज दिसून येण्यासारखें आहे. सरकारला गोवा प्रांताची व्यसनें कमी करण्याची सदिच्छा आहे, तर तें गोमांतकियांवरच जादा कर कां बसवितें? तंबाखूच्या आयातीवरच कां निर्बंध घालीत नाही? युरोपची दारु इकडे आणूं नये असा निर्बंध कां घालीत नाहीं? देशी दारूं अमुक ग्यालन पेक्षां जास्ती तयार करू नये किंवा आपल्या देशांत विकूं नये असा आळा कां घालीत नाही?

एवंच 'न मागतां दान देणाऱ्या' या दानशूर मंडळीचा हेतु गोवा प्रांताचे कल्याण करावें असा आहे, तर गोमांतकीय वस्तुस्थिति आलोकन करावयाला पाहिजे व हे जादा कर व लठ्ठ पगारवाली नोकरशाही गोवा प्रांताला झेपेल की काय याचा पूर्ण विचार करावयास पाहिजे.

नोकरशाहींत जे कोण एतद्देशीय लोक आहेत त्यांचें नुकसान होणार नाहींच. कारण इकडून दोन पैसे गेले तर तिकडून चार आणे मिळण्याचा संभव असतो ह्मणून हे लोक सुद्धां त्याच्याच तंत्रानें वागत असलेले दृष्टीस पडतात? एतद्देशीय नोकरशाहीची स्वार्थपरायणता व तद्देशीय नोकरशाहीचा बेदरकार कारभार यांची सांगड जुळावी हें साहजिक आहे. प्रजेनें स्वसुखासाठी निवडलेल्या नोकरशाहीची सत्ता स्वराज्य मिळालेल्या लोकशाहीवर 'नाकापेक्षां मोती जड' या न्यायानें अप्रतिहत लागू व्हावी हे अखिल जगांत पहिलेंच उदाहरण आहे!

प्रेसिडेंट विल्सन यांनी राष्ट्रासंघाची योजना सिनेटमध्यें मांडली असतांना सिनेटर रीड यांनी उच्चारलेल्या वाक्यांत हेंच रहस्य भरलें आहे. ते ह्मणाले, 'ज्या एकोणचाळीस कोटी लोकांत मूठभर परकी लोक आपला अंमल गाजवूं शकतात, त्या हिंदुस्थानाला आमच्याबरोबर बसण्याचा मान दिला जात आहे. अशा योजनेस धिक्कार असो!' व त्याबरोबरच स्वराज्य व मत स्वातंत्र्याचा अधिकार दिला गेला असूनही त्यांचा योग्य उपयोग न करितां नोकरशाहीचा जुलूम मुकाट्यानें सहन करणाऱ्या गोवा प्रांतस्थांच्या वृत्तीसहि धिक्कार असों!

*(गुरुवार, दि. १६ डिसेंबर १९२०)*

# सरकार व मताधिकार

आमच्या शेजारचें सरकार आपल्या प्रजेवर दडपशाहीचें तत्त्व अप्रतिहत कसें लागू करीत आहे व त्या योगें तिच्यांत कसा असंतोष माजला आहे हें अखिल हिंदुस्थानभर पसरलेल्या असहकारितेवरून दिसून येण्याजोगे आहे. रौलेट बिलानें हिंदुस्थानचें राहिले सुरलेलेहि हक्क नामशेष होतील या भयानें वेळींच त्याची निषेधरूपी प्रार्थना करण्यासाठी जालियानवालाबाग येथें जमलेल्या जनसमूहावर विमानांतून बाँब फेंकून, त्यांच्यावर मशीनगन्सचा मारा करून दहा अकरा वर्षांच्या अजाण पोरांवर राजद्रोहाचा चार्ज ठेवून व त्यांस काळ्यापाण्यासारख्या भयंकर शिक्षा ठोठावून, सरकारने जी सानुकंपा आपल्या प्रजेपुढें प्रदर्शित केली तीहि महशूर आहेच! यायोगें प्रजेच्या मनांत सरकाराविषयी किती सहानुभूति उत्पन्न झाली असेल हें दिसतच आहे!

रशियांतील ड्युमासभा व बोलशेविझम, तुर्कस्थानांतील प्रजासत्ताक राज्य, फ्रान्सची राज्यक्रांति व खुद्ध इंग्लंडांतील कॉमनवेल्थ च्या वेळची परिस्थिती ही जर अवलोकन केलीं तर त्या सर्वांच्या मुळाशीं काय दिसून येतें? इतकें मागें न जातां प्रस्तुतचाच आयर्लंडांतील धांगडधिंगा व हिंदुस्थानांतील असहकारिता यांचा विचार केला तर त्याच्या मुळाशीं काय आहे?

पोर्तुगालांत राज्यक्रांति कां झाली? या सर्वांचें एकच कारण आहे, व तें कोणतें, तर असंतोष सरकारनें मनमुराद वागतांना आपल्या प्रजेच्या सुखाकडें व हक्कांकडे कानाडोळा केला त्याचा तो परिणाम आहे व प्रस्तुतहि जी असहकारिता शेजारच्या राष्ट्रांत पसरली आहे तीहि प्रजेच्या हक्कांवर लत्ताप्रहार केल्यामुळेंच होय, हें ही उघड आहे.

सांपत्तिक स्थितीविषयी विचार केला तरी या बाबतींतहि पाश्चात्यांनी हिंदुस्थानावर वर्चस्व प्रस्थापित केले आहे. सहाशेंवर व्यापारी कंपन्या हिंदुस्थानांवर सध्या प्रचलित आहेत. त्यांपैकी पांचशें अधिक कंपन्या त्यांच्या मालकीच्या आहेत. एवंच बहुतेक व्यापारहि त्यांच्याच स्वाधीन आहे, असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाही. हिंदुस्थान सांपत्तिक दृष्ट्या व राजकीय

दृष्ट्या पूर्ण परावलंबी आहे. शिवाय त्या सरकाराला आपली नोकरशाही, आपलें वैभव, आपले आरमार, आपलीं विमानें वगैरेचा फाजील अभिमान असल्यामुळें त्याच्याकडून राज्याधिकाराचें अतिक्रण होणं साहजिक आहे. कारण रावणालासुद्धां असेंच वाटत होतें, पण गोवा सरकार शेजाऱ्याचें असलें अनुकरण करूं इच्छितें त्याला काय ह्मणावें? मुनिसिपालटीच्या निवडणुकीत लिहितां वाचतां येणाऱ्या लोकांना मताधिकाराचा हक्क असावा असे ह्मणणे योग्य आहे, पण पोर्तुगीज भाषेत लिहितां वाचतां आलें पाहिजे, त्याशिवाय मताधिकार नाही असें ह्मणणें हा कोणता न्याय? पोर्तुगीज भाषेच्या ज्ञानाशिवाय जर मनुष्याचें राजकीय अस्तित्व नाहीसें होते, तर अशा लोकांची, खानेसुमारी कां घेण्यांत येते? अशा मनुष्यांना आमचें सरकार हुद्याची जागा कां देतें? रावबहादूर केळेकर हे कितीसें पोर्तुगीज शिकले आहेत, ह्मणून त्यांना तो अधिकार देण्यांत आला! बरें, तो अधिकार निगेटीव (Negative) असें गृहित धरलं, तर दरमहा त्यांच्या खिशांत पडणारे आमचे शेंकडों रुपये, आमचें सरकार आपल्या तिजोरींतच साठवत आहेत असें समजते कीं काय? किंवा अमेरिकेंतील लक्ष्मीपुत्राप्रमाणें आपल्या संपत्तीचा व्यय कसा करावा ह्या विवंचनेंत पडून शेतकी सुधारणा हें एक खातें गोवा प्रांतस्थांवर लादण्यात आलें. आमच्या शेतकीखात्याची आठ नऊ वर्षांची कारकीर्द पाहिली ह्मणजे असेंच ह्मणावें लागते. तें असो. मताधिकार फक्त पोर्तुगीज भाषेनें अलंकृत झालेले आहेत अशानांच देण्यांत यावा या ह्मणण्यांत सरकारचा फक्त एकच हेतु दिसून येतो. आमचा ख्रिश्चन बंधुसमाज प्रस्तुत अधिक सुशिक्षित आहे, कारण हिंदुंना पहिल्यांदा व्हर्नाक्युलर शिकून मग पोर्तुगीज शिकावें लागते. पण त्यांना तीच एक भाषा शिकावी लागत असल्यामुळे तो समाज पोर्तुगीज भाषेंत अधिक निष्णात होणें अपरिहार्य आहे. गोमांतकीय ख्रिश्चन हे मूळचें हिंदु होते. पण ते बाटविले गेल्यावर धर्म भिन्नत्वामुळें व आचार भिन्नत्वामुळे हिंदु लोक त्यांना परके दिसू लागून युरोपियन लोकांशी त्यांचें विशेष संघटन सुरू झालें. या संघटनेचा परिणाम आमच्या सरकारच्या पोकळ डोक्यावर होऊन त्याला असें वाटूं लागले. की भाषेची अडचण मध्यें ठेऊन स्वराज्य दिलें तरी आपलेंच वर्चस्व कायम राहिल. अमेरिका ही युरोपियन लोकांनीच

बसविली, फिलिपायन बेटें, अमेरिकन लोकांनी भरभराटीस आणली एवढें असूनहि त्या त्या वसाहतवाल्यांनी आपल्या जातभाईंवर शस्त्र उपसून आपणास स्वतंत्र करून घेतले. ब्राझील देश पोर्तुगीज लोकांनी बसविलेला असूनहि तो स्वतंत्र झाला, हीं ढळढळींत उदाहरणें आमच्या सरकारच्या समोर असून ज्यांची पूर्व संस्कृति हिंदुत्वाची असून निरुपायानें त्याच्याशी संघटणत्व ठेवणें त्यांस भाग पडलें, असा आमचा ख्रिश्चन बंधुसमाज त्याच्या वर्चस्वास मदत करील असें मानणें मूर्खत्वाचें आहे. अंशत: हीहि जाणीव आमच्या सरकारास झालेली दिसते. तरी पण बाह्यत: तसें न दाखवितां एकीकडे त्या समाजास ते कुरवाळीत आहे व दुसरीकडे गोऱ्या लोकांची इकडे भरती करून त्यांना भरपूर पगार देऊन 'घर जळो पण निळू खेळो' हे धोरण स्वीकारीत आहे. गोऱ्या मिलिटरी सैनिकांच्या पगाराची भयंकर वाढ व नेटीव सैनिकाच्या पगारांत व अधिकारांत छाटाछाट ही वरील विधानास पुष्टीच देतात.

करांचें बोजड ओझें दिवसेंदिवस इतकें डोईजड होंऊ लागलें आहे, की त्याखाली गरीब प्रजेस चिरडून मरण्याची पाळी आली आहे व त्या योगानें प्रजेची अंत:करणें प्रक्षुब्ध झालीं आहेत, त्या प्रक्षुब्धतेची ज्वाळा कोठें व कशी अचानक पेट घेईल हें सांगणें अशक्य आहे. ह्मणून आह्मी सरकारास नम्र विनंति करतो की, ह्या जुलमी धोरणाचा त्याग करून ब्रिटिश हिंदुस्थानांत जी असहकारितेची भयंकर लाट उठली व त्यायोगें तिकडे सर्वत्र अस्वस्थता माजली आहे, तशी अस्वस्थता इकडे माजूं देऊ नये. अशा प्रकारच्या अस्वस्थतेचा प्रतिकार करण्याचें आपणास पूर्ण सामर्थ्य आहे, या समजुतीस थारा देऊं नये.

*(गुरुवार, दि. ३० डिसेंबर १९२०)*

# प्रागतिक संघाची स्थापना

ता. ३०-१-१९२१ हा दिवस आमच्या राष्ट्रीय चळवळीच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल, यांत बिलकूल संशय नाही,

कांकीं याच शुभ दिवशीं कसबा फोंडें येथें पानसुपारीच्या निमित्त भरलेल्या चिरस्मरणीय सभेंत खऱ्या देशहित स्फूर्तीचा उदय झालेला सर्वांस दिसून आला! याच मंगल दिवशी नव्या व जुन्या काबिजादींतील उत्साही देशभक्तांनी आपल्या प्रियतम मायभूमीसाठीं पाहिजे तसला व पाहिजे तेव्हां स्वार्थत्याग करण्यास तयार असल्याचें आपल्या आवेशयुक्त सुंदर भाषणांनी व नि:स्वार्थ देणग्यांनी जाहीर केलें! याच आनंदमय दिवशीं गोव्यांतील हिंदुनागरिकांनी विशेष गाजावाजाच्या भरीस न पडता अंत:प्रेरणेनें प्रागतिक संघ नांवाची हिंदुंच्या सर्व आंकांक्षा राजरोस तडीस नेणारी तेजस्वी संस्था स्थापून आपल्या सर्व चळवळींस संघटित स्वरूपाचें चलन दिलें!

थोडक्यांत सांगावयाचे ह्मणजे हिंदु देशभक्तांनी उपरोक्त, शुभ, मंगल व आनंदमय दिवशी एकंदर लोकहिताच्या चळवळीत दिसून येणाऱ्या कोणाचा पायपोस कोणांत नाही अशा शोचनीय प्रकारास कायमचा आळा घालून, अंत:करणाच्या तळमळीने देशहिवर्धक कृतीचे धोरण निश्चित केले. प्रेम, श्रद्धा व भक्ति या उच्चतम भावनांचा पूर्ण मिलाफ झालेला वरील सभेंत पहावयास मिळून, अत्यंत धन्यता वाटली, हें लिहितांना आह्मांस आनंदाचें भरतें येते. या अपूर्व समारंभाची उत्साहजनक हकीगत

*संक्षेपत: खालील प्रमाणें आहे....*

नवीन काबीजादीतर्फे बहुमतानें निवडून आलेले मेंबर दो. व्यंकटेशराव देसाई व त्यांचे मदतनीस श्री. शिवाजी दु. प्रतापराव मुख्य सरदेसाई यांस हिंदुसमाजाकडून 'विद्याप्रसार' कार्यालयांत मागें उल्लेखिलेली पान सुपारी देण्यांत आली. या आनंददायक समारंभाचे अध्यक्षस्थान श्री. गोपाळ हरी वैद्य यांनी सुशोभित करण्याविषयी प्रो. शांताराम शिंगबाळ यांच्या सूचनेला टाळ्यांच्या गजरांत अनुमोदन मिळाल्यावर अध्यक्ष स्थानापन्न झाले. त्यांनी सभेच्या सेक्रेटरीचें काम करण्यास आमच्या संपादकांस बोलाविलें काम करण्यास आमच्या संपादकांस यांसहि सभेचें अनुमोदन मिळतांच सभेच्या कामास सुरुवात झाली. प्रथमत:

प्रो. दत्ताराम गोविंद कामत यांनी पोर्तुगीज भाषेंत, पानसुपारींचें

महत्त्व समजावून दिले. या मंगल प्रसंगीच हिंदुसमाजाच्या आकांक्षांस मूर्त स्वरूप देण्याच्या संघटित प्रयत्नाची आवश्यकता इ. मुद्यांची योग्य प्रकारें मांडणी करून आमच्यांत सामाजिक व राजकीय सुधारणांची उत्तम रीतीनें जोपासना होण्यास, हिंदूंच्या सर्व चळवळीचें धोरण आजच निश्चित व्हावें असें सांगितलें. त्या नंतर

श्री. वासुदेव लक्ष्मण राजाध्यक्ष यांचे मनोवेधक व मार्मिक भाषण झाले. त्यांत त्यांनी निवडून आलेल्या प्रतिनिधींकडून लोकहिताची कामें योग्य प्रकारें बजाविली जाण्यासाठीं समाजाच्या व वर्तमानपत्रकर्त्यांच्या कर्तव्याचें धोरण कोणतें असावें याचें दिग्दर्शन केले. त्यांचे भाषण संपल्यावर.

प्रो. बाळकृष्ण वामन सावर्डेकर यांनी संघटित प्रयत्नांच्या शक्या-शक्यतेचा प्रश्न पुढें मांडून, त्यावर मुद्देसूद भाषण केलें व आमची उन्नतावस्था होण्यास अशा प्रकारचेच प्रयत्न झालें पाहिजेत असें सांगून याद्विषयींचा कार्यक्रम ठरविण्यास एक मंडळ नेमण्यांत यावें असें आपलें मत प्रदर्शित केले. श्री. सांवर्डेकरांमागून आल्मेद कालेजचें प्रो. श्री. दत्तात्रय व्यंकटेश पई यांचेंहि उपरोक्त विषयांवर जोरदार व स्फूर्तिदायक असे भाषण झाले. त्यांत त्यांनी समाजहिताची कामे शेवटास नेण्यास शब्दापेक्षा कृतीची, मनाच्या तळमळीची किती आवश्यकता आहे याचें स्पष्ट व निर्भिड भाषेंत विवेचन करून वरील वक्त्यांच्या भाषणांस आपलें अनुमोदन दिले.

नंतर पानसुपारी अर्पण करण्याचा समारंभ होऊन समारोपादाखल भाषण झाल्यावर सभेनें दहा मिनिटें विश्रांती घेतली. फिरून सभेस प्रारंभ होतांच अध्यक्षांच्या परवानगीने आमच्या संपादकानें

*'देव (देश) वसे ज्याच्या चित्ती, त्याची धरावी संगती'*

या तुकारामउक्तीवर प्रवचन केलें. प्रवचन आटोपतांच सभेंत मोठ्या उत्साहाने कसबा फोंडे येथें हिंदूंच्या सर्व सार्वजनिक हितसंबंधास जपण्यास योग्य अशा प्रागतिक संघ नांवाच्या संस्थेची मुहूर्त मेढ टाळ्यांच्या प्रचंड गजरांत रोवण्यांत येऊन तिची संघटना व तदंतर्गत इतर व्यवस्था ठरविण्यासाठी सात गृहस्थांची एक कामचलाऊ कमेटी निवडण्यांत आली.

या अत्यंत महत्त्वाच्या कामीं लागणाऱ्या खर्चाचा प्रश्न निघतांच अध्यक्षांच्या मेजावर रुपयांचा वर्षाव झाला. या एकाच गोष्टीवरून हिंदु समाजांतील सांप्रतची जागृति कागदी घोडे नाचवून टाकांची कारवाई करण्याची नसून, उलट तिचा उगम अंत:करणाच्या तळमळीपासूनच आहे, हें कोणासहि कळून येईल.

एकंदरीत फोंड्याची सभा राष्ट्रकार्याच्या दृष्टीनें किती महत्त्वाची आहे, हे आह्मी दिलेल्या अल्प माहितीवरून सभेस हजर नसलेल्या आमच्या इतर देशभक्तांस समजून येईल.

सार्वजनिक चळवळींत आजपर्यंत ज्या गोष्टींची आह्मांस उणीव भासत होती, ती फोंड्यांत जमलेल्या नि:स्वार्थी, निरपेक्ष व जोमदार देशसेवकांकडून भरून आल्याबद्दल आह्मी त्यांचे सकौतुक अभिनंदन करून, त्यांनी अत्यंत कळकळीनें आखलेला मार्ग पूर्ण रीतीनें यशस्वी होवो, अशी परमेश्वरापाशी श्रद्धापूर्वक करूणा भाकितों प्रागतिक संघकी जय!

*(गुरुवार, दि. ३ फेब्रुवारी १९२१)*

# गेली प्रांतिक परिषद

यंदाच्या काँग्रेसचे अधिवेशन निर्विघ्नपणें पार पडून त्यांत प्रमुखत्वानें शेतकी सुधारणेची सांगोसांग चर्चा करण्यांत आली, हें दुसरीकडे प्रसिद्ध झालेल्या काँग्रेस वर्तमानावरून वाचकांस कळलेंच असेल.

प्रांतिक परिषदेने शिरावर घेतलेला पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्याचें कार्य राष्ट्रहिताच्या दृष्टीनें किती महत्त्वाचें व व्यापक आहे. हें सांगण्याची थोडी सुद्धां जरूरी वाटत नाही. एकंदर गोवा प्रांताच्या मुख्य अन्नाची ह्मणजे तांदळाची टंचाई दूर व्हावी व चतकोर भाकरीसाठी ब्रिटिश हिंदुस्थानाकडें तोंड पसरण्याची लज्जास्पद स्थिति होता होईतो टाळावी, एतदर्थ त्या कार्याची दिशा विचारपूर्वक आखण्यासाठी गोव्यांतील सगळ्या महालांतील

प्रतिनिधी जमले होते. गेल्या वर्षी महागाईच्या आणि दुष्काळाच्या दिवसांत भरपूर पैसे असलेल्या श्रीमंतांस तसेच अन्नास मोताद झालेल्या गरिबांस सारखीच यातायात सोसावी लागून 'दे माय धरणी ठाय' अशी त्यांची झालेली अनुकंपनीय दशा कोणाच्याच स्मरणातून अजून गेली असेल! या साठी परिषदेंत ठरविल्याप्रमाणें एकसुद्धां ओसाड जमीन न राहूं देता, देशांच्या सुबत्तेस हातभार लावण्याचें पवित्र काम बजाविणें हें प्रजेचें त्याचप्रमाणें राजकर्त्यांचे कर्तव्य होय. काँग्रेसमध्ये पास झालेल्या ठरावांस मूर्त स्वरूप आल्यासच मात्र इच्छित ध्येय साधून गत आपत्तीची पुनरावृत्ति होणार नाही. उलट पक्षी काँग्रेसची सर्व शक्ति कागदांत किंवा बोलण्यांतच नष्ट झाली तर मात्र अर्थात सारेंच ओम फस् होईल हें उघड आहे. व कोणत्याहि मृत संस्थेपेक्षा काँग्रेसला जास्त महत्त्व येणें शक्य नाही.

यंदाच्या कांग्रेसांत घडल्याप्रमाणें, देशोपयोगी ह्मणून एकदां पसार केलेलें ठराव पुढच्या अधिवेशनांत अशक्य कोटींत गणून त्यांविषयी निराशाजनक उद्गार काढण्याचा उपद्व्याप चालूं ठेविल्यास कांग्रेसद्वारा आमची स्थिति सुधारणें कदापिही शक्य नाही, हेंहि लक्ष्यांत बाळगिलें पाहिजे.

उदाहरणार्थ, गेल्या काँग्रेसांत काचेच्या कारखान्यासाठीं उभारण्यांत आलेल्या 'आणाफंड' चा यंदाच्या परिषदेंत पुन:फन्ना उडून काँग्रेसची अब्रु कांचेप्रमाणेच फुटून जाते की काय, अशी क्षणभर भ्रांति उत्पन्न झाली होती, परंतु याद्विषयींच्या शंकाकुशंकांचे योग्य वेळी निरसन होऊन पुढील मार्ग आक्रमणें निष्कंटक झालें ही समाधानाची गोष्ट होय.

उपरोक्त स्थिति यंदाच्या पास झालेल्या देशयाच्या सुबत्तेच्या ठरावांच्या आड न येतां त्याचें कार्य उत्तमप्रकारें पार पडल्यास काँग्रेससाठी सोसलेली झीज, खिशास लागलेला चट्टा व या उन्हाळ्यांत पणजीमध्ये काढलेला त्रास यांचे साफल्य झालें असें आह्मीं समजू!

शेतकी सुधारणेकडें निकट संबंध असलेल्या गुराढोरांच्या संवर्धनांच्या विषयास पुढच्या कांग्रेसांत अग्रस्थान मिळालेलें पाहूनहि आह्मांस समाधान वाटलें. या उपयुक्त विषयांवर प्रत्येकांस सुचणारे विचार काँग्रेस भेटीस योग्य वेळी

कळविण्यास कोणीच अंतर करू नये अशी आमची आग्रहाची विनंति आहे.

शेवटी 'प्रागतिक संघा' चें वेळी पास केलेला ठराव पाळला गेल्यानें आह्मी आमच्या हिंदुबांधवांचें अभिनंदन करितों व यंदा जसें उत्साहानें त्यांकडून काम केले गेलें त्यापेक्षांहि जास्त उत्साहानें व नेटानें पुढच्या कांग्रेसांत भाग घेऊन ते देश विधायक कार्य करण्याचें कर्तव्य अत्यंत चिकाटीनें व उत्साहानें बजावतील अशी बळकट आशा आहे.

*(गुरुवार, दि. १० मार्च १९२१)*

# अंत:करणें एकवटा!

ह्मणजे कधीच भंग न पावणारी अशी राष्ट्रहितवर्धक एकी घडून येण्यास मिनिटाचाहि अवकाश नको, हा श्रीस्वामी रामतीर्थ यांचा अमृततुल्य उपदेश प्रत्यही नजरेसमोर ठेवून स्वदेशहिताप्रीत्यर्थ अविश्रांत झटल्याखेरीज स्वराज्याचा पल्ला गाठणें कदापिही शक्य नाही. एकीकडून ऐक्यसंवर्धनाबद्दल चित्ताकर्षक लेख लिहून दुसरीकडून 'उखाळ्यापाखाळ्या' नी आपल्या सैतानी वृत्तीस बहकूं देणारे प्राणी कदाचित उत्तम लेखक असूं शकतील, परंतु ते स्वदेशभक्त खास नाहीत, अशी आमची प्रामाणिक समजूत आहे.

आत्मप्रोढीसारख्या नीच मनोवृत्तीस बळी पडून दुसऱ्यांचे चावे घेण्यांत ज्यांना आपण स्वदेशाची उत्तम कामगिरी बजावतो असें वाटतें, त्या व्यक्तींकडून वास्तविक कोणाचेंच हित होत नसून, उलट त्यांचा स्वतःचाच मात्र हटकून नाश होत असतो असा शहाणे लोकांचा अनुभव आहे. अशी खरी स्थिति असतां देशहिताच्या अगडबंब नांवाखाली समाजंत व्यक्तीद्वेषानें हैदोस घालण्याचा ज्या कांही प्रेमशून्य, स्वार्थी व आपमतलबी गृहस्थांकडून प्रयत्न होत आहे त्याला काय ह्मणावें? परस्परांची अंत:करणें बुद्धिपुरस्सर दुखविली गेली, तर तीं लवकर एकवटण्याच्या स्थितीला पोंचतील काय? परकीयांकडून भलभलत्या मिषाने त्रास दिलें जातात त्यांचा उखाळ्यापाखाळ्यांनी वचपा भरून निघेल काय?

तात्पर्य, अंत:करणें एकवटून दृढतम ऐक्याने स्वराज्याची पवित्र गुढी रोवण्यास व्यक्तीद्वेषासारख्या निंद्य गोष्टींस कायमचा फांटा देणे जरूर आहे. प्रसंगी 'वेड्यांस वेडे ह्मणू नये, वर्म कोणाचें बोलू नये.' ही श्री समर्थांची शिकवण सतत ध्यानांत बाळगून कसलाहि गाजावाजा न करतां राष्ट्रदेवतेप्रीत्यर्थ आत्मसमर्पण करण्याला एका पायानें पुढें सरसावल्यासच मात्र स्वदेशोद्धार होणें शक्य आहे.

एकीशिवाय आमचा निभाव नाही. अशी ज्यांची पूर्ण खात्री झाली आहे. त्यांनी यापुढे तरी द्वेषमूलक विचारांस किंवा लेखांस बिलकूल थारा देता कामा नये. *'दुसऱ्याच्या दु:खें दुखवावे। परसुखें सुखवावे।। प्राणिमात्र मेळवावे। बऱ्याशब्दे।।'* ही श्रीसमर्थांची शिकवण कृतींत उतरविण्याचा ज्याला त्याला हव्यास लागल्याखेरीज अंत:करणें एकवटण्याची आशाच नको. व जोपर्यंत परस्परांची अंत:करणें प्रेमग्रंथींनी जखडली जाणार नाहीत, तोपर्यंत देशहिताच्या लंबेलंबे बाता निवळ वल्गना आहेत! अंत: करणें एकवटा! हा स्वामी रामतीर्थांचा दिव्योपदेश मन: पटलावर खोदून तदनुसार कर्तव्यदिशा आखल्यसच 'स्वराज्याचे' अंतीम ध्येय हस्तगत होणें शक्य आहे. नुसत्या बेजबाबदार चकाट्यांनी व अभिमानशून्य लेखांनी देशोन्नति साधण्याची मनीषा बाळगणें ह्मणजे हलाहल प्राशनानें आरोग्यवृद्धीची हांव बाळगण्यासारखे अत्यंत मूर्खपणाचें लक्षण आहे.

प्रिय बांधव हो, अंत:करणे एकवटा! आपापसांतील द्वेषभावास कायमची तिलांजली देऊन दिलसफाई घडवून आणा! वाईट मनोवृत्तीस सपशेल मूठमाती देऊन दिलजमाईचा शुभ झेंडा फडकवा!

द्वेष विसरा! उखाळ्या पाखाळ्या काढून भांडू नका. असें झाल्यासच मात्र अंत:करणें एकवटून राष्ट्रोन्नति होईल.

*(गुरुवार, दि. ३१ मार्च १९२१)*

# आमचें स्वराज्य!

'आर्थिक स्वराज्य' या जिभेंत पाणी उत्पन्न करणाऱ्या नावाखाली साम्राज्य सरकारनें आह्मांस अर्पण केलेला भाकरीचा तुकडा किती निरस आहे. याचे विवेचन आह्मी अनेकदा करीत आलो आहोच. परंतु या महत्त्वाच्या बाबतीत जनतेनें जितकें लक्ष घालावयास पाहिजे तितकें न घातल्यामुळें, प्रस्तुत विषयावर आज पुन्हा दोन शब्द लिहावयाचें योजिलें आहे.

ज्या कायद्यान्वयें पोर्तुगाल सरकारने आह्मांस आर्थिक स्वराज्याचा अहेर केला आहे, त्यांत स्पष्ट रीतीनें ह्मटलें आहे की, येथील सरकारकडून विचारी लोकमत व सांपत्तिक ऐपत या उभय गोष्टीस अनुसरून जें आर्थिक धोरण निश्चित केलें जाईल, त्यांत कसल्याहि सबबीने चंचूप्रवेश करण्याचा वसाहतीच्या प्रधानांस हक्क नाही. अर्थांत प्रांतावर नवीन कर लादणें अगर जुने कमी करणें, आवश्यकतेप्रमाणें नवीन उपयुक्त खाती निर्माण करणें अगर अनावश्यक व भपकेबाज 'ऑफिसांस' मूठमाती देणे इत्यादि वसाहतीच्या कायदेशीर व फायदेशीर कारभारांत वरिष्ठ सरकारास निष्कारण व 'अव्यापारेषु' ढवळाढवळीनें खळबळ उडवून देण्याचा कसलाच अधिकार पोंचत नाही हे उघड आहे.

परंतु फार दु:खाची गोष्ट ही, की विचारी लोकमत व सांपत्तिक ऐपत या दोन्हीबाजूकडें पूर्ण दुर्लक्ष करून, पोर्तुगालनें आमचें आर्थिक स्वराज्य अगदी 'निरर्थक' बनविण्याचा मारे हडेलप्पी व 'मुसळ प्रवेशी' सपाटा चालविला आहे. आह्मी व्यक्तिश: कितीही कंठशोष केला, कितीही रागावल्याची जाणीव करून दिली. कितीही तीव्र शब्दांनी नापसंती दर्शविली, तरी सुद्धा श्वेतवर्णीय युरोपीय बड्या नोकरशाहीच्या अनेकविध कृष्णकृत्यांनी आमची 'सनद' विधवेच्या शुभ्र कपाळा प्रमाणे 'पांढरी फटफटीत'करण्याच्या सैतानी मनोवृत्तीस काडीइतकाहि आळा पडलेला नजरेस येत नाही!

अशी अनुकंपनीय स्थिति यापुढें सतत चाललेली अवलोकणें, ह्मणजे मळमळित सौभाग्यांतच आनंदोर्मींच्या क्षीरसागरांतील दुर्मिळसुख

अनुभवनीय असल्याचा प्रत्यक्ष कबुलीजवाब देणें होय त्यापेक्षां उपरिनिर्दिष्ट दिखाऊ आवतोनोमीच्या सौभाग्यतिलकविरहित ढळढळीत वैधव्य दु:ख सहन करणें बरें नव्हे, असें सहसा कोणीहि ह्मणणार नाही!

ही गोष्ट झाली रुसव्याची. परंतु राजकीय 'प्रेमकलहांत' रुसव्यानें कुठें निष्पन्न झालें आहे? कांहीच नाही आणि आह्मांस तर स्वराज्याचा मान राखण्यासाठी आमची मान कापणाऱ्या बेजबाबदार व उल्लू मनोवृत्तीचा बिमोड करावयाचा आहे. आमच्या मानेवरचें वरिष्ठ सरकारच्या असह्य ढवळाढवळीचें जड जूं जमीनदोस्त करणें आहे.

कशाही प्रकारानें उक्त हेतु पार पाडणें अर्थांत जरूर आहे. आमच्या मतें हा हेतु तडीस नेण्याची जोखीम 'प्रागतिक संघाने' आपल्या शिरावर घेतल्यास, त्याला यश मिळाल्याखेरीज खास राहणार नाही, अशी आमची मनोदेवता आह्मांस सांगत आहे. ठिकठिकाणचें लोकमत अजमावून, प्रागतिक संघानें काळजीपूर्वक सदरीत हेतुसिध्यर्थ वरिष्ठ सरकारापाशीं नोटिशीवजा विनंति करण्याचा संघटित प्रयत्न केल्यास, त्यांत त्याला यश मिळण्यासारखी आजची स्थिति आहे, असें, संघाच्या प्रस्तुतच्या लौकिकामुळें, तसेंच त्याच्या शुक्लेंदुवत् वृद्धि पावणाऱ्या स्फूर्तिदायक लोकप्रियतेमुळें, आह्मांस वाटत आहे. दुसरें 'येत्नेन् सर्वे वश:' हें तर ठरलेलेंच आहे.

*(गुरुवार, दि. २२ सप्टेंबर १९२१)*

# सत्यमेव जयते!

'सत्या परता नाही धर्म', 'सत्य हेंच यशाचें मर्म' अशी व अशा अर्थाची अनेक वचनें आमच्या धर्म व नीतिग्रंथांत ठिकठिकाणीं आढळून येतात. त्यांवरुन सिद्ध होतें की, सत्याशिवाय दुसऱ्या कोणात्याहि नकली भावनेच्या ठिसूळ पायावर उभारलेल्या कार्यांत यशाची वाट पहात बसणें ह्मणजे मृगजलाच्या काल्पनिक पाण्यानें तृषा शांत करण्याची हांव बाळगण्यासारखे हास्यास्पद होय. सत्याचा महिमाच असा आहे, कीं

त्याच्या तेजाचा लोप क्षुद्र मनुष्याच्या नीच प्रयत्नांनी कदापिही होणें शक्य नाही. कांही काळ दिशाभूल होईल, परंतु अखेर सत्याच्या तेजोमय प्रकाशानें त्याच्या कपटपटु, स्वार्थलोलुप व राक्षसीवृत्तीच्या मायावी शत्रूची राखरांगोळी झाल्याखेरीज खास राहात नाही, असें जगाचा इतिहास कंठरवानें, सत्याच्या मार्गाकडे बोट दाखवून, सर्व मानवी प्राण्यांस बजावीत आहे.

पण कित्येक उतावळे व अदूरदृष्टि लोकांस, उपरिनिर्दिष्ट ऐतिहासिक शिकवण न पटूनच कीं काय, त्यांनी क्षणिक परिणामावर भिस्त ठेऊन असत्यासारखा गैरशिस्त अतएव अत्यंत त्याज्य मार्ग आक्रमिण्यास सुरुवात केली आहे. या आडवाटेनें त्याचें हित तर होणार नाहीच, उलट अकल्पित रीतीनें अशी एक वेळ येईल, की त्यांचा व त्यांच्या दुष्ट कृत्यांचा समूळ उच्छेद होईल. सृष्टिनियमच जर असा आहे, तर त्यांत बदल करण्याचें सामर्थ्य मानवास कसें प्राप्त होईल?

हे विचार मनांत उद्‌भवण्याचें कारण सि. प्राजेरीस द कोस्त यांचें बुडूं पहाणारें वजन हें होय. आज सरासरी दहा वर्षे होत आली, ते आमच्या वतीनें व प्रतिनिधीच्या सन्माननीय नात्यानें पोर्तुगीज पार्लमेंटांत देशोद्धार्थ आपल्या सुकुमार देहाचें रक्त आटवीत असल्याचा बहाणा करीत होते व ह्या बहाण्यांत त्यांनी इतकी आघाडी मारली होती, की ज्ञानी व देशभक्त अशासारखया पवित्र पदव्यांचा व विशेषणाचा त्यांजवर वर्षाव होत असे. पण बहाणा हें एक दिशाभुलीचें क्षणिक साम्राज्य माजविणारें असल्याचेंच स्वरूप असल्यावरून तें बदलून आतां सि. प्राजेरीस द कोस्तांच्या कृत्यांविषयी पोर्तुगालच्या जनतेचे डोळे उघडूं लागलें आहेत, ही समाधानाची गोष्ट होय.

पोर्तुगालच्या श्वेतवर्णीय बंधूंना साळसूदपणाच्या पांघरुणाखाली सि. कोस्तानी केलेल्या कृष्णकृत्यांचा संशय आला असून, तेथील कित्येक पत्रांत त्यांजविरुद्ध खरमरीत टीका प्रसिद्ध व्हावयास लागली आहे. देशभक्तीच्या मिषानें व्यक्त केलेली शक्ती देशाच्या कल्याणासाठी नव्हती, तर उलट आपल्या सोयऱ्यांच्या, शेजाऱ्यांच्या व मित्रांच्या उदरंभरणाच्या खास सोयीप्रीत्यर्थ होती हें एक दशक उलटल्यानंतर, उघडकीस यावयास लागलें असून, पोर्तुगालच्या राजकीय स्वर्गांत भपक्याच्या कृत्रिम प्रकाशानें चकाकणारा हा

कोस्तरूपी नकली तारा अस्तंगत होण्याच्या पंथाला लागण्याची स्पष्ट चिन्हे दिसू लागली आहेत. तात्पर्य कांही काळ दडपून ठेवण्यांत पराकाष्टा केलेलें सत्य बहाण्याच्या लोखंडी पिंजऱ्यांतून मुक्त होण्यास पहात आहे.

सिं. प्राजेरीस दे कोस्तांनी कसकशा रीतीनें वरिष्ठ सरकारच्या डोळ्यांत धूळ फेंकून इंडियेच्या तिजोरीचे दिवाळें वाजविण्याचा सपाटा चालविला होता, हें आज कोणास नव्यानें सांगण्याचें कारण नाही. त्यांना लिसेव नासियोनालाचा सेंत्राल केला व त्यांत अयोग्य व 'अशिक्षित' शिक्षकांची खोगीर भरती केली, इंस्तितूत कोमेंसियाल नावांचे विद्यालय स्थापन त्यांत आपल्या सगेसोयऱ्यांचा समावेश मोठ्या शिथाफीने करून घेतला, आवदीतोरीसारख्या अनावश्यक खात्यास जन्म देऊन तिजोरीचा मृत्यू जवळ आणण्यास हातभार लाविला, ठिकठिकाणच्या खात्यांतील नोकरशाहीचा बेसुमार पगार वाढवून, या देशाची सांपत्तिक स्थिति हलाख बनविण्याचे श्रेय संपादन केलें, एवंच बऱ्याऐवजी वाईटच गोष्टींनी सिं. कोस्तांनी आजपर्यंत नांव कमाविलें. असो.

परंतु आतां सत्याचा विजय व्हावयास लागला असून, सिं. कोस्ताचे खरें स्वरूप उघड होत आहे. यावरून सत्याचा लोप होणें कदापि शक्य नसून, तें दडपून टाकणाऱ्यांचाच मात्र उलट उपहास होत असतो, हें सिद्ध होत नाही काय? *'सत्यापरता नाही धर्म। सत्य हेंच परब्रह्म'* हेंच खरें.

*(गुरुवार, दि. ६ ऑक्टोबर १९२१)*

# आह्मी व आमचे शेजारी

हिंदुस्थानच्या कोणत्याहि नकाशावर विहंगम दृष्टि फेंकल्यास मालवणच्या खाली एक काळा ठिपका सहज दृष्टीस पडेल. बिचाऱ्या नकाशेकर्त्यांस या प्रांतांच्या परावलंबतेची इतकी कांही बालंबाल खात्री पटली आहे की, ते तो देश पोर्तुगीझ सरकारच्या ताब्यात असूनहि चंद्रनगर वगैरे प्रांतासारखे भिन्न रंगांत न देतां, बिनदिक्कत ब्रिटिश हिंदुस्थानांत

मिसळवून टाकितात. ह्या संबंधी त्यांना दोष देणें ह्मणजे आमचें अज्ञान प्रदर्शित करण्यासारखें आहे. कारण, गोमांतक हा ब्रि. हिंदुस्थानाशी इतका काही संलग्न झाला आहे, त्यांच्या आचार विचारांशी आमची इतकी कांही भेसळ झाली आहे, त्यांच्याशीं आह्मी इतकें कांही तादात्म्य होण्याच्या मार्गास लागलों आहोंत, की आज त्यांच्याशीं फटकून वागण्याचा आत्मघातकी निश्चय करणें ह्मणजे आमच्याच हातानें आमच्याच पायावर कुऱ्हाड घालण्यासारखे आहे. प्रो. आराऊज मासकारेंजस यांनी मी गव्हर्नर झालों असतो, तर ब्रि. हिंदुस्थानांतील मराठी वर्तमानपत्रे बंद केली असती, असें जें सांगितलें तें खरोखरच आमच्या स्थितीचा पूर्ण विचार करून ह्मटलें यात संशय नाही. याच वर्तमानपत्रांनी आह्मांस स्वत:संबंधी विचार करण्यास शिकविलें, आमची संस्कृति, देशाभिमान व स्वाभिमान जागृत केले. नखशिखांत युरोपियन बनून पोर्तुगालांतील बडाबापसे बेट्यांच्या नावाने 'व्हीवा' घालून आमच्या गुलामगिरीचें प्रदर्शन करण्यास लाज वाटूं लागली. आमचा प्रिय गोमांतक एके काळी वैभवशिखरास पोंचलेला होता. कला, कौशल्य, व्यापार, धंदा व बुद्धिमत्ता ह्या बाबतींत हार जाणणारा नव्हता असें असतां आज 'लंडन टाइम्स' सारख्या वजनदार पत्रानें 'गोमांतक' या नावांचा शिंपी व स्वयंपाकी प्रसवणारा देश आहे असें ह्मणण्यासारख्या निकृष्ट स्थितींत पोंचण्याची कारणें शोधण्याकरणे आमची प्रवृत्ति होऊं लागली, या सर्वांचे श्रेय आमच्या ब्रि. हिंदुबांधवांस आहे हें कोणासहि प्रांजलपणें कबूल करावें लागेल. आमची उन्नति अगर अवनति ब्रि. हिंदुस्थानाबरोबरच होणार हें सूर्यप्रकाशाइतकं स्पष्ट दिसत असतानांही त्यास खीळ घालण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे पूर्ण वेगांत असलेल्या धांवत्या आगगाडीस हातांनी थोपवून धरण्यास उद्युक्त होण्यासारखें दुष्कर व हास्यास्पद आहे, हे कोणासहि कबूल करावें लागेल.

चालू शतकांत ब्रि. हिंदुस्थानांत स्वराज्यप्रीत्यर्थ, ज्या प्रचंड चळवळी झाल्या त्यांना आह्मीं पूर्ण सहानुभूति, शाब्दिक कां होईना, देऊन आमचें कर्तव्य अल्पप्रमाणानें तरी बजाविलें आहे. कोणत्याहि इसमानें विवक्षित कार्यास हात घातल्यासनंतर तो आपल्या अनुयायांच्या प्रोत्साहना पेक्षां शेजारच्या तटस्थ लोकांच्या मताचें जास्त निरीक्षण करीत असतो.

व ह्या लोकांकडून जेव्हां त्यांना सहानुभूति मिळते तेव्हां त्यांस ज्यास्त स्फूर्ति, निदान मानसिक समाधान तरी मिळत असते. आतां ब्रि. हिंदुस्थानावर पूर्णपणें अवलंबून असलेला गोमंतक... कोरड्या सहानुभूतिमुळें आमचा नामर्दपणा दृग्गोचर होत असतो. परंतु आज चारशें वर्षांवर गुलामगिरींत खितपत पडलेल्या, स्वाभिमानास मुकलेल्या गोमांतकास विचारी व समंजस लोक दोष देणार नाहीत. आडांतच जर मुळींच पाणी नाही, तर पोहऱ्यांत कुठून येणार याची प्रत्येकाला जाणीव असते. परंतु या कोरड्या सहानुभूतीवरसुद्धा जेव्हां डामर फासण्याचा प्रयत्न करण्यांत येतो, तेव्हां मात्र या स्वयंमन्य शिलेदारांच्या अविचाराची कमाल होत असते.

तात्पर्य, आमच्या शेजाऱ्यांच्या हरेक देशहितविषय चळवळींना निरपेक्ष सहानुभूति दर्शविणें अर्थांत आमचें पवित्रतम कर्तव्य ठरतें, हें ओघानेंच सिद्ध होते.

*(गुरुवार, दि. ८ नोव्हेंबर १९२१)*

# आमचें भावी ध्येय

गोमंतकांतील 'आह्मी व आमचें शेजारी' या लेखांत ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकांशी आमचें कर्तव्य कोणत्या प्रकारचें असणें योग्य आहे, त्याचें थोडक्यांत विवेचन केलेंच आहे. या लेखांत त्याच विषयासंबंधी आणखी थोडीशी चर्चा केल्यास, ती अप्रयोजक ठरणार नाही, अशीं खात्री वाटतें.

काल, स्थल व स्थिति यांकडे बारीक दृष्टि वळवून विचार केल्यास, आह्मी व आमचे शेजारी कसे भिन्न नाहीतं, आह्मां परस्परांचा एकजीव कसा बनून राहिलेला आहे, व कालांतरानें आमचें हितसंबंध अलग होण्याऐवजी एकतानतेच्या ध्वनींत कसे मिसळून जाणार, हें तारतम्य ज्ञानाची ओळख पटलेल्या गृहस्थांस जास्ती विशद करून सांगण्याची आवश्यकता नाही.

हिंदुस्थान देश एके काळी वैभवशिखरावर विलसत होता. स्वतंत्रता देवीची यावर पूर्णं कृपादृष्टि होती, परंतु निसर्गाच्या नियमांस अनुसरून सध्यां तो वैभवहीन होऊन पारतंत्र्याचा घोर गर्तेत खिचपत पडला आहे. पूर्वीचे तेज मलीन होऊन, जुन्या वैभव काळचे पराक्रम आह्मांस आतां कल्पित गोष्ट वाटावयास लागल्या आहेत.

पण एक हिंदुस्थानाचींच अशी नीच अधोगति झाली, असें नाही. जुन्या रोम, ग्रीस व मिसर याहि थोर राष्ट्रांची तीच अवस्था झाली. यावरून असें मात्र समजतां कामा नये कीं निसर्गाचे कायदे अवनत स्थित्यंतरेंच प्रसवतात. वाईट गोष्टींप्रमाणें चांगल्याहि गोष्टी निसर्गाच्याच तेजस्वी प्रभावानें घडून येत असतात, हें विसरतां कामा नये.

या आमच्या ह्मणण्याची सत्यता, हिंदुस्थानांत सांप्रत अनेक चळवळींच्या स्वरूपांत दृष्टोत्पतीस येत असलेली जागृति स्पष्ट पटवीत आहे व विद्यमान काळांत परक्यांच्या त्रासदायक सत्तेखाली आसवें ढाळणारा हिंदुस्थान, भावी काळांत निसर्गाच्याच न्यायानें, स्वतंत्रतेच्या शुद्ध व पवित्र वातावरणांत सानंद विलसणार असल्याची शुभ चिन्हें जिकडें तिकडे भासूं लागली आहेत.

हिंदुस्थान देश स्वपराक्रमाच्या अतुल सामर्थ्यानें इंग्रजांची मगरमिठी फोडून पूर्ण स्वतंत्र होणारे हें खास, प्रश्न काय तो कालावधीचा, खुद्द इंग्रजांनाहि या गोष्टीची जाणीव नाहीं. असें नाही. आपल्या सार्वभौम सत्तेची, आपल्या अनियंत्रित कारभाराची व आपल्या अमानुष अत्याचारांची शंभर वर्षे भरत आली आहेत, हें ब्रिटिश नोकरशाही पूर्ण उमजून आहे.

हिंदुस्थान स्वतंत्र होणार व गोमांतक पोर्तुगेजांच्याच अंमलाखाली सदासर्वकाळ सौख्याने नांदणार काय? नाही. अर्थात् शेजाऱ्यांच्या स्वतंत्रतेनें दिपून जाऊन त्यालाहि स्वतंत्र होण्याची इच्छा होईल, हें निसंदेह सिद्ध आहे व ही इच्छा न्याय्य असल्यावरून तिला मूर्त स्वरूप आणण्याचे कामी आमचें शेजारी शेजारधर्माचें तत्त्व पाळल्याशिवाय कदापिही राहाणार नाहीत. निदान तें तसें त्यांकडून पाळलें जावें एतदर्थ एव्हांपासूनच धोरण ठेवण्याचा

मुत्सद्दीपणा आह्मी राखिला पाहिजे, हें उघड होतें.

उपरिनिर्दिष्ट भावी ध्येयाकडे नजर पुरवून गोमांतकांतील विचारी लोक हिंदुस्थानांतील प्रत्येक परदास्यविमोचक चळवळीस निरपेक्ष मदत करण्यास पुढें सरसावत आहेत. लो. टिळकांची स्वदेशी व बहिष्काराची चळवळ, म. गांधीचा असहकार योग, इ. इ. चळवळींशी गोमांतकांतील हिंदुजनता जर तादात्म्य पावत आहे, तर त्याचें कारण सदरील भावी ध्येय हेंच होय.

काल, स्थल व स्थिति या त्रयींकडे खोल दृष्टि भिडविल्यास हिंदु जनतेची ही तादात्म्य होण्याची भावना अव्यवहार्य आहे असें ह्मणण्याचें बेजबाबदार धारिष्ट कोण कारील?

*(गुरुवार, दि. १ डिसेंबर १९२१)*

# लोकशाहीची लाट

*परित्राणाय साधूनां।*
*विनाशायच दुष्टकृताम्।*
*धर्म संस्थापनार्थाय।*
*संभवामि युगेयुगे।*

भगवान श्रीकृष्णाच्या वरील उक्तीचें प्रत्यंतर पाहण्यास चालूं युगांतील जनतेस गेल्या युगांतील इतिहासाकडे धांव घ्यावी लागत असे. कारण दुर्जनांकडून साधुंचा छळ व धर्माची अवहेलना यांचा कळस होण्यास एक युगाचा काळ लागत असून, त्यावेळेस परमेश्वरास सद्धर्माची संस्थापना व दुर्जनांचा विनाश करण्यास ह्या जगांत अवतार घ्यावा लागतो. व तसा काल हल्ली आला असल्यामुळें वरील उक्तींत ध्वनित केल्याप्रमाणें परमेश्वरानें महात्मा गांधी ह्यांच्या रुपाने ह्या जगांत अवतार घेऊन आमच्या प्रत्यंतरासाठी मागील युगाकडे धांव घेण्याचा त्रास चुकविला आहे असें ह्मणावें लागतें.

गेल्या पंधरवड्यांतील ब्रिटिश हिंदुस्थानांतील चळवळीची जी

हकीकत प्रसिद्ध झाली आहे, तिच्यावरून पाहतां वैभवमदानें धुंद झालेल्या दुर्योधनासहित त्यांच्या शंभर बंधूंची होळी पांच पांडवांस हातांत धरून श्रीकृष्णास ज्याप्रमाणे करावी लागली, त्याचप्रमाणें पांच मुखांच्या जनतेस हातांत धरून महात्माजींना, अधिकारमदानें धुंद झालेल्या अधिकारी वर्गाची रग जिरवावी लागत आहे. स्वत:च्या अंधत्वामुळें आपल्या उद्धट पोरांपुढें कांहीही न चालून त्यांच्या दुष्टपणामुळें धृतराष्ट्रांस जसें आपले सार्वभौमत्व गमवावें लागलें त्याचप्रमाणे इंग्लंडास ब्युरोक्रॉसीच्या उद्धट व आततायीपणामुळे आयर्लंड व हिंदुस्थानवरील आपली साम्राज्यसत्ता गमवावी लागणार हें स्पष्ट दिसत आहे.

आज अनंत वर्षेपर्यंत एकंदर जग ज्या मार्गाच्या शोधांत होतें व महात्मा येशु ख्रिस्तांस ज्याची बरीच कल्पना झाली होती त्या, जगांत शांतता प्रस्थापन करण्याच्या मार्गाचा, ह्मणजे असहकार योगाचा शोध लावून त्याचा योग्य उपयोग केला असतां परिणाम काय होत असतों, हें महात्माजींनी जगाच्या निदर्शनास आणून दिलें आहे. ज्या कल्पनेच्या जोरावर ख्रिस्तानें महान अशा रोमन साम्राज्याच्या शक्तीची परवा न करितां, आपलीं तत्त्वें जनतेच्या अंत:करणांत भिनवून, आपल्या धर्माची प्रस्थापना केली, त्याच प्रत्यक्ष असहकारितेची तत्त्वें महात्माजींच्या उपदेशानें त्याच्या अनुयायांच्या अंतकरणांत इतकीं खोल रुजली आहेत, की इंग्लंडचा कधींही न मावळणारा सूर्य आपल्या तेजानें किंवा प्रखरतेनें त्यास दिपवूं किंवा तापवूं शकणार नाही. किंबहुना महात्माजींच्या सात्त्विक कृतीची संततधारा पडत वाढलेल्या जनतेच्या आत्मप्रत्ययाच्या रोपाला ह्या सूर्याचा कडकपणा कोमेजवूं शकणार नाही असें ह्मटलें पाहिजे.

महात्माजींच्या उपदेशानें उचंबळलेली ही लोकशाहीची लाट इतकी जबरदस्त आहे, कीं तिच्या पुढें ब्युरोक्रॉसीच्या हलक्या डोलाऱ्याचा निभाव लागणें कोणाहि विचारी माणसाला शक्य वाटणें संभवनीय नाही. किंवा पिनलकोडासारख्या गंजलेल्या व आमेंडमेंटसारख्या कच्चा लोखंडाच्या अधिकारी वर्गानें लोकमताच्या पाण्याशिवाय बनविलेल्या शस्त्राचा महात्माजींच्या असहकाररूपी तेजस्वी अस्त्राचा प्रतिकार करण्यास उपयोग

होईल असें ह्मणणें शुद्ध वेडेपणाचे आहे. भगवान श्रीकृष्णसारखे योगेश्वर महात्माजी व त्याच्या तालमींत तयार झालेली अर्जुनासारखी धनुर्धर जनता ज्या बाजूस आहे, त्या लोकशाहीचा विजय हा झालाच पाहिजे.

आमचा इकडील अधिकारी वर्ग ह्या गोष्टीकडे लक्ष देऊन वेळींच सावध होईल, तर प्रसरण पावणारी ही लाट इथपर्यंत आदळणें बंद होईल, अशी आशा करण्यास जागा आहे काय?

*(गुरुवार , दि. ५ जाने. १९२२)*

# येती कॉँग्रेस व गोरक्षण

हिंदुस्थान देश हा एक शेतकीप्रधान देश आहे. शेकडा ८०/८५ लोक शेतीवरच आपली उपजीविका करणारे आहेत. ही गोष्ट अनेक देशी परदेशी तज्ञानींहिपण सिद्ध करून दाखविली आहे, याबद्दल कोणताच वाद नाहीं. सरकार व लोक याच ह्मणण्यास पुष्टि देतात. आतां वस्तुस्थिति जर अशी आहे, आणि शेतकीच्या धंद्याला उत्तेजन मिळणें, त्यास लागणाऱ्या हरेक साधनांवर अवलंबून आहे, तर त्या साधनांची वाढ अथवा पैदास करणें यातच हिंदुस्थानचा तरणेपाय आहे. ह्मणूनच आमच्या गेल्या कॉँग्रेस प्रोव्हिंसियालनें, गोरक्षण हा विषय पुढल्या कॉँग्रेसच्या बैठकींत चर्चेसाठी घेण्यांत यावा, असें ठरविलें होतें. कॉँग्रेसच्या नियमास अनुसरून व्यवस्थापक कमिटीनें इतर अनेक विषयांबरोबर गोरक्षणावरहि निबंध मागविले होते. त्यास जागून कांही जणांनी तर त्या उपयुक्त विषयावर आपले निबंध पाठविले असतीलच, याबद्दल आह्मांस तिळमात्र संशय नाही. तथापि फिरून एकदा समाजबांधवांचे लक्ष 'धर्मार्थकाममोक्षाणि' या चार पुरुषार्थांची प्राप्ति करून देणाऱ्या या उपयुक्त विषयाकडे वळविणें भाग आहे.

या सृष्टीतील यच्चयावत् प्राण्यांत मुख्य जो मनुष्यप्राणी, त्याचा संसार सुखाने पार पडण्यांस लागणाऱ्या अनेक साधनांपैकी गुरें हें एक मुख्य साधन आहे. याची जाणीव आर्य लोकांना वेदकालापासून झाली होती.

वेदांतील देवतांच्या प्रार्थनांपर ऋचा वाचावयास घेतल्या, तर त्यांतून प्रार्थनेच्या शेवटीं 'बर्फाप्रमाणें शुभ्र दुग्ध प्रसवणाऱ्या शेंकडो गाई मला दे' अशी अर्थाची अनेक वचनें आमच्या ह्मणण्यालाच पुष्टि देत आहेत. सर्व धनांत श्रेष्ठ असें जे गोधन त्याचें दान देणें पुण्यप्रद अहे. मोक्षप्रद आहे असें हिंदुधर्मशास्त्र सांगतें. ह्मणूनच कोणत्याहि शुभाशुभ धर्मकृत्याच्या प्रसंगी गोदानाचेंच महत्त्व अधिक मानले आहे. कन्यादानाचें वेळीं वराला यथानुशक्ती गाईहि आनंद देण्याची चाल अद्यापहि आढळून येत असते. हिंदुधर्मानें पूज्य मानलेल्या गोमातेचा वध करणें पंचमहापातकांपैकी एक आहे असा निर्बंध घालून आमच्या शास्त्रकारांनी गोवधास बंदी घालून ठेविली आहे. वेद आणि पुराणें यांवरून इतिहासाकडे नजर वळविली, तर त्याकाळीं कित्येक रजपूत राजांनी गोवधाचें पातक घडू नये ह्मणून अपजय पत्करून आपली राज्यें मुसलमानांच्या हाती जाऊं दिली व प्रसंगी प्राणांचीहि पर्वा केली नाही असेंच दिसून येईल. श्री. छत्रपति शिवाजीमहाराज यांना मुसलमानांविषयीं इतका त्वेष येण्यास त्यांच्या हातून त्याकाळीं ठिकठिकाणीं होणारे गोवधच कारणीभूत झाले असावेत असें ह्मटल्यास अतिशयोक्त होणार नाही. कारण, यापुढें आपल्या नांवामागे 'गोब्राह्मण प्रतिपालक' हें विशेषण लावून घेण्यास त्यांनी भूषणच मानलें. असो.

वेद, पुराणें, इतिहास यांच्याकाळी देखील गुरांना जो इतका मान देण्यांत आला, त्यांचे जें इतकें महत्त्व मानण्यांत आलें, त्यास आमचा संसार सुखाचा व्हावा, आह्मांस व आमच्या मुलाबाळांत पोटभर दुधदह्यांचा, लोण्यातुपांचा खुराक मिळावा आणि आह्मीं धष्टपुष्ट होऊन पूर्णायुषी व्हावें हीच कारणें मुळाशीं असली पाहिजेत. दुसरी कोणतींहि असणें संभवनीय नाही.

इतिहासकालावरून वर्तमानकाळावर नजर फेंकली तर काय दिसेल? सर्वत्र हलाखीची स्थिति! दुष्काळ, महागाई, रोगाच्या साथी वगैरे वगैरे! सर्वांस पोटापाण्याचा प्रश्न कसा सोडवावा हीच विवंचना! पोटापाण्याचा प्रश्न सोडविणारें पहिलें साधन शेती आणि शेतीची उन्नति ज्याच्यावर अवलंबून आहे त्या गुरांचा भयंकर तुटवडा! असेल नसेल त्यांतील लाखों गुरें

कसाईखान्यात चाललेंली! त्यामुळें दूध नाही, दुभते नाही, ताकाचें पाणी सुद्धा मिळण्याची मारामार! इतकेंच नव्हे तर घर सारवण्यास शेण विकत आणावयाला पाहिजे! इतका घरावर शेणाचा सुकाळ! त्यांतून हिंदुस्थान मुक्त व्हावा ह्मणून शेजारच्या राज्यांत गोरक्षणाची चळवळ जारीनें सुरू आहे. महात्मा गांधीच्या प्रयत्नानें मुसलमानबंधु देखील महत्त्वाचें सहाय्य करीत आहेत. त्याचप्रमाणें ख्रिस्त बंधुंचीहि मदत मिळविणें अवश्य आहे. ती मिळविण्याचा योग ब्रि. हिंदुस्थानापुरता काँग्रेस प्रोव्हिंसियालनें आणून दिला आहे. तो साध्य करून घेणें हें आमच्या देशाभिमानावर अवलंबून आहे. ह्मणून सर्व हिंदु बांधवांस आमची प्रेमाची विनंति आहे, ती हीच की येत्या काँग्रेसांत त्यांनी मोठा भाग घेऊन शक्य त्या अनेक रीतींनी गोरक्षणाचा ठराव पास होण्यासारखे कळकळीचे प्रयत्न करावे आणि गोमातेची पांग फेडावी.

*(गुरुवार, दि. ९ फेब्रुवारी १९२२)*

# प्रागतिक संघ व निवडणुका

कोणत्याहि संस्थेचें अस्तित्व तिनें हाती घेतलेल्या कार्याच्या यशापयशावर अवलंबून नसून, त्या संस्थेचें कार्य अगर ध्येय बहुजमसमाजास प्रिय आणि मान्य होण्यावरच अवलंबून असते. हाच न्याय पोर्तुगीझ हिंदुस्थानची व विशेषत: येथील हिंदुसमाजाची सर्वांग सुंदर उन्नति घडवून आणावी या उच्च हेतुनें जन्मास आलेल्या 'प्रागतिक संघ' ह्या संस्थेसहि लागू आहे. प्रागतिक संघ स्थापन होऊन अद्याप पुरते एक वर्ष लोटलें नाही, ठिकठिकाणीं थोडें बहुत सभासद मिळविण्याशिवाय त्याच्या हातून कोणतेंहि कार्य झालें नाही ही गोष्ट खरीं असली तरी, आकस्मिक तऱ्हेनें लागोपाठ प्राप्त झालेल्या देपुताद व सेनादोर यांच्या दोनहि निवडणुकींत संघाने महत्त्वाचा मार्ग घेतल्यामुळें, संघाविषयी वसत असलेली लोकप्रियता सूर्यप्रकाशाइतकी सर्वांच्या प्रत्ययास येऊन चुकली आहे. संघानें निवडणुकींत भाग घेणें योग्य होते किंवा अयोग्य होतें याचा विचार करणें या प्रसंगी अप्रस्तुत

होणार आहे. तसेंच निवडणुकीत भाग घेतल्यापासून संघास कोणकोणतें फायदें होण्यासारखे आहेत हेंहि आजच सांगतां येणार नाही. अनुभवांती ते सहज दिसून येतीलच, परंतु सांगावयाचें आहे तें इतकेंच, की संघानें दोनहि निवडणुकींत भाग घेतल्याचें जाहीर होतांच, योग्यायोग्यतेचा विचार तात्पुरता बाजूस ठेवून, 'केवळ संघासाठी' अशा निर्धारानें ठिकठिकाणच्या हिंदुमतदारांनी दो. फ्रोइलान दे मेल, ले. कं. हेल्डेर रिबैर आणि का. ले. बोबेल मोंत यांस मते देण्याची अगर मिळविण्याची जीं पराकाष्ठा केली, तीच, संघाचे महत्त्व वाढत चाललें असून, बहुजनसमाजास ती संस्था उत्तरोत्तर प्रिय होत चालल्याचें द्योतक आहे. व यावरच संघाचें अस्तित्व अवलंबून आहे. संघाचा जन्म लोकांसाठीच झाला असला, तरी तो अद्याप लोकनियुक्त झाला नाही, हे येथे प्रांजळपणें कबूल करणें भाग आहे. तरी पण तात्पुरत्या निवडलेल्या कार्यकारी कमिटीनें तूर्त परिस्थितीचा सारासार विचार करून संघानें निवडणुकींत भाग घेऊन अमक्या अमक्या उमेदवारास सहानुभूति दाखवावी असं ठरविल्याचें जाहीर होतांच, अवघ्या ३४ दिवसांच्या मुदतीत हेल्डेर रिबेरसारख्या 'अल्पपरिचित' गृहस्थांस जवळ जवळ दोन हजार मतें मिळाली, ती केवळ समजांत संघाविषयींची आत्मिक भावना वाढत चालल्या मुळेंच होय. यावरून हिंदुसमाजांत या निवडणुकांसंबंधी एकमतच होते असें कोणीही आपला समज करून घेऊ नये. खुद्द संघाच्या चालकांत किंवा कार्यकारी कमिटींत जर मतभिन्नत्व दिसत होते, तर तें 'भिन्न रूचिह लोक:' या न्यायानें समाजांत दिसल्यास नवल नाही. समाज काय किंवा संस्था काय, त्यात मतभेद असणें संभवनीय आहे. किंबहूना मतभेद असणें हें समाजाच्या अगर संस्थेच्या जिवंतपणाचे लक्षण मानण्यांत येते. मात्र ते मतभेद प्रामाणिकपणाचे असावयास पाहिजेत.

एक अथवा अनेक व्यक्ती शहाणपणाच्या अगर विद्वत्तेच्या फाजील घमेंडींत समाजाने किंवा संस्थेने आपल्याच मतांचा पुरस्कार करावा, सर्व व्यवहार आपल्याच मतानें चालावा असा दुराग्रह धरूं पाहतील तर, तें सध्याच्या कालांत शोभणार नाही. पूर्वीचा बादशाही काळ जाऊन त्यांच्या मागोमाग सरदारशाहीहि निस्तेज होत चालली व आतां लोकशाहीचा काळ चालू

आहे. या काळांत, जें कांही बहुमतानें ठरलें गेले असेल तेच समाजानें अथवा संस्थेनें मान्य करावयाचे, हेंच सुधारलेल्या राजकारणाचें धोरण दिसून येतें. आमच्या हिंदुस्थानांत देवस्थानें, ग्रामसंस्था वगैरेंचा कारभार पुरातनकालापासून याच तत्त्वावर चालू असल्याचें सर्वांस ठाऊक आहेच. या नियमास अनुसरून संघाची सर्व कामें होत आहेत व यापुढेंहि ती तशींच चालवावयाची आहेत. गेल्या ता. १ डिसेंबर रोजी पणजी येथे व्यापारी संघाच्या दिवाणखान्यांत भरलेल्या जाहीर सभेंत अधिकार दिल्यामुळें आणि बहुमत निवडणुकींत भाग घेण्याच्या बाजूचे पडल्यामुळें, संघाच्या कामचलाऊ मंडळीनें बहुमतास मान देऊनच निवडणुकींत भाग घेण्याचें ठरविले का. क. चे सन्मान्य सेक्रेटरी श्री. पु. श्री. सुकेरकर यांचे मत तर विरुद्ध बाजूचे होते. त्यांचे ह्मणणें असे होतें की ''संघ अद्याप बाल्यदशेतच आहे. सभासद मिळविणें, कोंसेल्यानिहाय कमिट्या स्थापणें, मध्यवती मंडळ व कार्यकारी कमिटी निवडणें वगैरे कामें व्हावयाची आहेत, अर्थात यावरून आणखी इतरहि अनेक कारणांवरून निवडणुकीसारख्या वादग्रस्त प्रश्नांत शिरणें इतक्यांतच शहाणपणाचें होणार नाही.' उलट बाजूचें ह्मणणें पडलें, की 'संघाने राजकारणांत भाग घेऊनच समाजांत व सरकारांत आपलें वजन वाढवावयाचें आहे, इतर कामें हळूहळू होत राहणार, निवडणुका कांही फिरफिरून येणाऱ्या नाहीत, तेव्हां मध्येंच प्राप्त झालेल्या या संधीचा फायदा घेऊन संघानें आपलें कर्तव्य बजावनूच अनुभव मिळवावयाचा आहे, वगैरे वगैरे. हा वाद असाच चालू असता कमिटींतील मंडळीस, निवडणुकीस अगदी थोडे दिवस असताना संघानें तींत भाग घेण्याची ज्यास्त आवश्यकता वाटूं लागली. त्यानंतर घाईघाईनें काम करावें लागल्यामुळें रितसरपणांत थोडासा व्यत्यय आला व येणेंकरून परस्पर गैरसमजास जागा राहिली. परंतु त्यांत बुद्धिपुरस्सर असें कांहीच नव्हतें. उपरिनिर्दिष्ट मतभेद हें प्रामाणिक स्वरूपाचें होते. अर्थात त्यांत वैषम्यास थारा नव्हताच. याच संधीत 'उ येराल्द' वगैरें पत्रांतून संघाच्या सेक्रेटरीच्या नांवाने परस्पर विरोधी तारां प्रसिद्ध झालेल्या पाहून पुष्कळांनी संघाविषयी खोडसाळ विधानें करण्यास सुरवात केली आहे. तीं खोडून काढण्याच्या भरीस पडून, वाचकांच्या मेंदूस शीण देण्याची आमची इच्छा नाही. तथापि इतकें कळविणें

भाग आहे, की कोणत्याहि बाबतींत आपला मतभेद असला, तर तो संघानें मान्य केलाच पाहिजे असें ह्मणण्याइतके रा. सुकेरकर खास दुराग्रही नाहीत. त्यांनी आजपर्यंत संघाची बहुमोल कामगिरी केली आहे. आणि यापुढें ती तशीच चालविण्याचा त्यांचा दृढनिश्चय कायम आहे. संघाच्या ठरावांपुढें स्वत:च्या मतांचा न्यास करण्याइतकी त्यांची तयारी आहे. तरी पण आपलें मत स्पष्ट शब्दांनी पुढें मांडण्यास व विरुद्ध मतें आदरपूर्वक ऐकून घेण्यास ते कमी करीत नाहीत. एकंदरींत संघाचा सर्व लहानमोठा कारभार व व्यवस्था पूर्ण लोकमतानुवर्ति राहावीत असेंच इतर चालकांप्रमाणे त्यांचें धोरण आहे. झालेल्या प्रकाराबद्दल, कार्यकारी कमिटीत असो किंवा इतर हितचिंतक मंडळींत असो, कोणतेहि वैषम्य राहिलेलें नसून, यापुढें संघाचें काम जोराने चालविण्याचीच प्रवृत्ति सर्वांत दिसू लागली आहे हें सुचिन्ह होय. यापुढें संघाबद्दल कोणीही निराश होण्याचें कारण नाही. हस्तेपरहस्ते मदत करून त्याची कार्यक्षमता वाढवावी आणि संघ ह्मणजे हिंदुसमाज व 'हिंदुसमाज ह्मणजेच संघ' अशी ओळख सरकार व इतर जनता यांस पटवून द्यावी अशी आमची समाजबांधवांस प्रेमपूर्वक प्रार्थना आहे.

*(गुरुवार, दि. २३ फेब्रुवारी १९२२)*

# स्वदेशीव्रत आचरा

सार्वजनिक काकांच्या अमदानींत बीजरुपांत असलेल्या स्वदेशी चळवळीस १९०७ साली भरलेल्या राष्ट्रीय सभेंत लहानग्या झाडाचं स्वरूप प्राप्त होऊन, आज या झाडाचा गगनचुंबित वृक्ष बनू पाहात आहे. मध्यंतरी हरेक कारणामुळे सदरील झाड कोमेजू पहात होतें हें खरें, परंतु म. गांधीच्या आत्मिक जीवनाचा त्यांवर अप्रतिबंध वर्षाव झाल्यावरून त्याला नवपालवी फुटून, तो सांप्रत प्रफुल्लिततेच्या आनंददायक वैभवांत नादंत आहे.

स्वदेशी चळवळीचें महत्त्व किती थोर आहे, हें सिद्ध करण्यास तिचा उपरोक्त इतिहासच पुरे आहे. अर्थशास्त्राच्या गहन व जाड्या सिद्धातांची

त्याला आवश्यकता नाही. इतिहास ह्मणजे एका अर्थानें अनुभवच व जी गोष्ट अनुभवानें सिद्ध ठरते, तिला आपलें श्रेष्ठत्व खुलविण्यास तत्त्वज्ञानाची मदत नको आहे, हें सूर्यप्रकाशा इतकें स्पष्ट आहे.

हिंदुस्थानचें अंतिम ध्येय स्वराज्य हें आहे. आज ना उद्यां केव्हांतरी हिंदुस्थान स्वतंत्र झाल्याखेरीज खास राहाणार नाही, असें जरी असले तरी तें स्वराज्य होतांहोइतों अल्पकालांत हस्तगत होण्यास, तसेंच एकदां ते प्राप्त झालें ह्मणजे कायम-दीर्घकाल टिकवण्यास त्याला स्वदेशीचीच जोड पाहिजे. स्वदेशीशिवाय स्वराज्याचा लाभ अल्पावधींत होणें कदापिहि शक्य नाही. व यदाकदाचित झालाच, तर त्याची गोड व रसाळ फळें चाखण्यांस पुष्कळ काळ लाभणार नाही असा त्रिकालाबाधित सिद्धांत आहे.

म. गांधी जे आह्मांस खादी वापरण्यास कंठरवानें बजावीत आहेत, त्याचें मर्महि उपरिनिर्दिष्ट सिद्धांतांतच आहे. शिवाय खादीचा स्वीकार करणें ह्मणजे साधेपणाचेंहि तत्त्व पटल्याचें कबूल करणें होय. साधेपणा हा सात्त्विकवृत्तींचा पोषक असल्यामुळें तामसवृत्तीचा लोप होऊन, हिंदुस्थान सत्वगुणप्रधान बनणार आहे. याहिदृष्टीनें स्वदेशी चळवळीची योग्यता अत्युच्च ठरते, हें विसरतां कामा नये.

अशा या श्रेष्ठतम चळवळीकडे यापुढें दुर्लक्ष करणें आमच्या माणुसकीस शोभेल काय? स्वदेशांत उत्पन्न होणारा पवित्र माल लाथाडून, परदेशातून येणाऱ्या अपवित्र वस्तूंत आमचें देह व घरे गुरफटून घेणें यापुढें क्षम्य होईल काय?

ह्मणून गोमांतकीय नागरिकांनी स्वदेशीचीच उपासना करणें योग्य आहे. स्वदेशीच त्यांना खऱ्या व अस्सल स्वदेशी स्वराज्याचा लाभ करून देणार आहे. स्वदेशीमुळेंच शेवटीं त्यांना परमार्थाचेंहि खरें सुख उपभोगण्यास मिळणार आहे. तेव्हां स्वदेशीव्रत आचरण्यास हवे!

*(गुरुवार, दि. १३ एप्रिल १९२२)*

# स्वदेशीचा प्रभाव

स्वराज्यप्राप्ति स्वदेशीच्या प्रसारावर कशी अवलंबून आहे, हें आमच्या वाचकांस आह्मी अनेकदां पटवून दिलें आहे. स्वदेशी ह्मणजे स्वराज्याचा आत्मा आहे. स्वदेशीचे आत्मज्ञान झाल्याखेरीज स्वराज्याचा मोक्ष लाभणें दुर्लभ होय. 'खादीचा प्रसार झपाट्यानें करा ह्मणजे तुह्मांला हां हां ह्मणता स्वराज्य मिळेल' या म. गांधीजींच्या अनुभवी उक्तींतून उपरोक्त तात्पर्यार्थ निष्पन्न होतो हें कोणीही कबूल करील.

हिंदुस्थान देशावर जर आज कोणाची खरीखुरी सत्ता चालू आहे तर ती विलायती व्यापाऱ्यांची होय. या लोकांच्या स्वार्थी चिथावणीमुळेंच आज हिंदुस्थानांत नोकरशाहीकडून जिकडे तिकडे अत्याचार घडले जातात. हा आततायीपणा बंद होण्यास अर्थात तो उत्पन्न करणाऱ्या कारणांवर ह्मणजे त्या चिथावणीवर घाव घातला पाहिजे. चिथावणी संपुष्टांत आली, की अत्याचारानें 'राम' ह्मटल्याच ह्मणून समजावें व चिथावणीवर घाव घालण्यास 'स्वदेशी' हत्यारासारखे बेमालूम कार्य करणारें दुसरें हत्यारच नाही असें सिद्ध झालें आहे.

स्वदेशीच्या या अवर्णनीय प्रभावाचें प्रत्यंतर पहावयाचें असल्यास मार्च १९२० ते मार्च १९२२ पर्यंतच्या अवधींत स्वदेशीमुळें विलायती व्यापाऱ्यांवर घडून आलेला परिणाम लक्षांत आणला कीं पुरे. १९२० मार्च अखेर पुऱ्या होणाऱ्या तिमाहींत ३१० युरोपियन कंपन्यांची दिवाळी निघाली होतीं. १९२१ मार्चला पुऱ्या होणाऱ्या तिमाहींत या व्यापारी कंपन्यांच्या दिवाळ्यांचे प्रमाण ७५३ वर आले व या सालांतील हिंदी बहिष्काराच्या तडाख्यामुळें १९२१ मार्च अखेर पुऱ्या होणाऱ्या तिमाहींत तर एकंदर १९१२ कंपन्याची दिवाळी वाजली!

आणि हा स्वदेशीचा अत्यंत तेजस्वी प्रभाव ध्यानांत आणूनच महात्माजींच्या पत्नीनें खालील संदेश जनतेस पाठविला आहे. त्याचा गोमांतकांतहि उपयोग होईल अशी आह्मांस बळकट आशा आहे.

‘‘माझा संदेश वाचणारी माणसें सुसंपन्न स्थितींत असतील. पण आपल्या या प्रिय देशांतील बरेच लोक उपासमारी अनुभवित आहेत. याची त्यास आठवण करून देणें जरूर आहे. या गोष्टीची ज्यास खात्री पटवून घ्यावयाची असेल त्यानें खेडेगांवात जरूर जावे. मुंबई, अमदाबाद या सारख्या श्रीमंत शहरांतदेखील अत्यंत अनुकंपनीय स्थितींत राहाणारे आपले अनेक देशबांधव आढळतील.

अशा या गरीब लोकांस मदत न करता. आहे तशीच स्थिति चालू दिल्यास आज बऱ्या स्थितींत असलेल्या माणसांसहि कालांतरानें अन्नास मोताद होण्याची पाळी येण्याचा संभव आहे. गरीब लोकांनी असल्या दु:खद स्थितींत आणखी किती दिवस राहावें? ही दु:खें मुकाट्यानें सोसणारे लोक एकट्या हिंदुस्थानांतच आढळतील. त्यांच्या ओरडीकडे आपण आज लक्ष न पुरविले, तर आमचा देश बुडाला ह्मणून खास समजा. यासाठी आपण आपल्या आयुष्यक्रमांस नवीन वळण लावलें पाहिजे. श्रीमंतांनीं मोलमजुरी करणाऱ्या लोकांत मोकळेपणानें मिसळून त्यांच्या हालअपेष्टांचे पूर्ण निवारण करणे हे काम संपादन केले पाहिजे.

प्रजा सुखी तर आपण सुखी या ह्मणीचा सरकारास विसर पडलेला दिसतो. सरकारचे डोकें ठिकाणावर नाहीं असेंच दिसतें. पण सरकारप्रमाणें आमचे श्रीमंत लोकहि जर उदासीन राहातील तर आमचा देश ठार झाला असें समजावें. यासाठी आपण गरीबांच्या स्थितीकडे व्यापक दृष्टीनें आणि सहानुभूति पहावयास शिकलें पाहिजे.

आह्मी आमच्या मुलांस सरकारी शाळांच्या कोंदट हवेंत शिक्षण न देता राष्ट्रीय शिक्षणाच्या स्वतंत्र वातावरणात त्यांस विहार करू दिला पाहिजे. त्या ठिकाणी देशाभिमान ह्मणजे काय, हें त्यास समाजाविलें पाहिजे. साळीं आणि शेतकरी लोकांच्या देशानें परदेशी कापड विकत घ्यावें हें केवढे दुर्भाग्य! या गोष्टींचें त्यास ज्ञान होईल.

‘‘माझ्या प्रिय भागिनींनो! परदेशी कापड वापरणें किती पापमूलक आहे हें तुमच्या लक्ष्यांत येत आहे ना? तुह्मांला तलम कपडा हवा, तर

तुह्मी बारीक सूत कां काढीत नाही? स्त्रिया या सर्वांच्या मागून धर्म सोडीत असतात. स्वराज्य मिळविण्याच्या प्रयत्नाच्या आड हिंदी स्त्रियांचे तलम कपड्यावरील वेड उभे राहिलें असें ह्मणण्याची पाळी पुढील पिढ्यांवर न येवो ह्मणजे झाले.''

*(गुरुवार, दि. ४ में १९२२)*

# जोरानें हल्ला करा!

एखाद्या व्यक्तीला किंवा संस्थेला चित्ताकर्षक नांव देण्यांत आलें ह्मणजे, त्या व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून नांवाला अन्वर्थक अशी नावे कमाविण्याची चित्ताकर्षकच कृत्यें होत असतात. अशी गोष्ट नाही. नांव कर्ण असले ह्मणजे कृतिहि कर्णाचीच असते असा नियम बांधतां येत नाही. नांव व कृति या उभय गोष्टींत सदासर्वदा मेळ असतोच, असा प्रकार नाही.

या सर्वसाधारण सिद्धांताचें अगदीं जवळचे प्रत्यंतर पहावयाचें असेल तर आमच्या रिपब्लिक राज्यपद्धती कडे नजर फिरविली की पुरे. प्रजासत्ताक असें या पद्धतीचें नांव साऱ्या जगांत गाजत आहे. पण या 'नेहमी' नूतन राज्यव्यवस्थेनें प्रजेला कल्याणकारक अशी कितीशीं कृत्यें करून आपले नांव सार्थ केले आहे? उलट मोनोर्की सुद्धां जीं कृत्यें करण्यास धजली नसती, ज्यां कृत्यांमुळे तिचें तोंड काळें ठिक्कर पडलें असतें, तींच कृत्यें या प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या ऐन तारुण्यांत राजरोस रीतीनें आचरली जातात!

यावरून नाम व काम या परस्परांत नेहमींच मैत्री असते असें नाही. उलट पक्षी, शत्रुत्वाचेंच नातें त्यांच्यांत बहुतकरून डोकावतें असा अनुभव आहे. व अनुभवज्ञानाच्या भक्कम व टिकाऊ पायावर ज्या सिद्धांतांची उभारणी होत असते ते सिद्धांत फोल अथवा कवडीमोल ठरविणें सहसा शक्य नसतें.

पोर्तुगीज रिपब्लिकची मुहूर्तमेढ रोवल्यास आज दहा वर्षांपेक्षा

जास्ती काळ लोटला. या अवधींत तिनें कोणकोणती शतकृत्यें करून प्रजेला सुख दिले? प्रजेची प्रसन्नता प्राप्त करून घेण्यासाठी कोणत्या उदार व दिलदार धोरणांचा अवलंब केला? मोनार्कीपासून उद्‌भणाऱ्या क्लेशदायक यातना कमी करण्यांत  कितीसा पुरुषार्थ दाखविला?

'कांहीच नाही' असे या तिन्ही प्रश्नांना एकच उत्तर देतां येईल. परंतु पूर्वीची तरी 'परिस्थिती' असावी की नाही? छे! देशाच्या दुर्दैवानें रिपब्लिक स्थापन झाल्यापासून पूर्वीपेक्षांहि आतां आमची स्थिति जास्त धोक्याची बनली आहे. तिजोरीवर मनमुराद चरणारांची संख्या आतां पूर्वीपेक्षांहि जास्त वृद्धि पावल्यावरून सार्वजनिक संपत्तीला पडलेला तुटीचा खोल खड्ड जास्तच खोल खणला जात आहे. खर्च वाढीच्या नव्या कल्पनांना कल्पनातीत पीक येत असल्यावरून कल्पनेबाहेर लोकांच्या पैशाचा निर्भयपणें चुराडा करण्यांत येत आहे. व अशा या बेबंद कारभारामुळें पडत असलेली तूट भरून काढण्याच्या मिषानें करवाढीला पुढें करून व लोकमतांवर सत्तेची मूठ ठेऊन लूट जमविण्याचा सपाटा चालू ठेविला आहे! एवंच असा या नांवाच्या 'प्रजासत्ताक' राज्यपद्धतीचा सांप्रतचा नांवलौकिक आहे. असो.

पण या नावाच्या रिपब्लिकच्या नांवानें शंख करून अधिकाररूढ असलेली शंकनोकरशाही थोडीच ताळ्यावर येणार आहे! शंखध्वनि पेक्षां काही तरी जास्त उपयुक्त कार्य करणें सध्याच्या 'घोसाळकरी' कारभाराला व करभावाला कंटाळलेल्या लोकांचे कर्तव्य होय. 'जात आहेत ते दिवस खरे, उगाच या राजकारणासारख्या त्रासदायक भानगडीत कां पडा? कशा तऱ्हेचीं 'थंड' विचारसरणी बिलकूल कामानी नाही. उलट 'काय होईल तें होवो, कितीही त्रास सहन करावा लागला तरी हरकत नाही. देह जावो अथवा राहो, मला नाहक छळणाऱ्या क्रूर व निर्लज्ज शत्रूची हड्डी नरम केल्याशिवाय मी स्वस्थ राहाणार नाही, अशा विचारानें सनदशीर मार्गाची कास धरून कांही तरी कृति करावयास मोठ्या धैर्यानें स्वार्थत्यागपूर्वक पुढें सरसावलें पाहिजे.' 'खाना, पिना, मजा मारना' हा 'मट्टीमें मिल जाना' अशा सारखा सर्वथैव त्याज्य पंथ असल्यानें इष्ट ध्येय साध्य होईपर्यंत त्याला रजा देणें अत्यावश्यक आहे.

शेवटी इतकेंच सांगावयाचें आहे की, प्रसंग फार कठीण आहे. अत्यंत बिकट आहे. त्याकडे दुर्लक्ष केल्यास परिणाम वाईट होणार आहे. तेव्हां एकदिलानें सर्वशक्ती एकवटून प्रतिपक्षावर जोरानें हल्ला करा!

*(गुरुवार, दि. १५ जून १९२२)*

# निभाव कसा लागेल?

राज्यावर संकटपरंपरा कोसळावयास लागली ह्मणजे प्रजेनें निद्रानंदांत रममाण होतां कामा नये. तर जेणेंकरून राज्यावरील आपत्ति हटेल, तेणें करून प्रयत्न करण्यास पुढें सरसावले पाहिजे. अशा आणीबाणींच्या प्रसंगी प्रजेनें आपलें कर्तव्य ओळखण्यांत व तें तत्परतेनें पाळण्यात जिवापाड झटलें पाहिजे. व्यक्तीसौख्यांत गुरफटून राहून, सामुदायिक स्वस्थतेचा चुराडा न होण्यासाठी काळजीपूर्वक जपणें अत्यावश्यक आहे, यांत दुमत असणें शक्य नाही.

करवाढीच्या वणव्यानें गोमांतकांची असहाय्य प्रजा होरपळायास लागली आहे. करवाढीच्या प्रबल शत्रूनें तिला अगदीं निर्बल बनविलें असून, दैन्यावस्थेची हृदयास घरें पाडणारी स्थिति अनुभवावयास, सत्तेच्या बलावर अप्पलपोट्या सरकारनें तिला भाग पाडलें आहे. ताप्तर्य चोंहोंबाजूंनी करवाढीच्या अक्राळ विक्राळ पिशाच्याकडून आमची जनता निर्दयपणें पछाडली गेली आहे.

पण दुःखाची गोष्ट की, प्रजा आपलें योग्य रीतीनें कर्तव्य बजावण्यास अजून पुढें होत नाही. स्वार्थी नोकरशाहीची शकले करण्याची शक्कल काढणाच्या मार्गाला ती लागलेली अजून पहाण्यांत येत नाही. सर्व अक्कल एकत्र मिळवून, तिचा उपयोग करांचें पाणी करण्यास, ती एकजुटीनें झटत असलेली अजून दिसत नाही.

अशानें राज्याची स्थिती सुधारणें अशक्य होय. उलट ती दिवसेंदिवस बिघडत जाऊन एक दिवस असा येईल, की त्या दिवशी प्रत्येकाला आपल्या

'निर्जिव' अस्तित्वाचा पुरा पश्चात्ताप होईल. पण चोरांनी घरे लुटून एकंदर संपत्तीचा फडशा लावल्यानंतर दारांना लोखंडी कड्या लावून काय उपयोग होणार आहे? आमची तरी अशी समजूत आहे, की सरकार - तस्काराने करवाढीच्या बेबंद कारभाराने आमची घरे 'स्वच्छ' केल्यावर लोखंडी कड्यापुर्तासुद्धा पैसा आह्मांजवळ शिल्लक उरणार नाही! असो.

अशा स्थितींत प्रजेनें स्वस्थ बसणें महत्पाप होय. इतर पापांचे परिणाम भोगण्यास कदाचित कालावधि लागेल. पण सदरील महत्पापाची अनिष्टि फळें ताबडतोब चाखावी लागतात. असा सार्वत्रिक अनुभव आहे. अर्थात अशा प्रसंगी प्रजा आपल्या कर्तव्याला रजा देईल, तर भयंकर सजा भोगण्याच्या अवस्थेप्रत पोंचेल हें उघड होय.

तिजोरीस पडलेली तूट सध्या १७ लाखांची असून करवाढीचा सैतान इतस्तत: विहरत असतांहि ती तुटत नाही व प्रजेच्यामागचा हा घोर सुटत नाही. करवाढीच्या समप्रमाणातच तूटवाढ होत आहे. याचें कारण वाढत्या खर्चांच्या धांवत्या गाडीला खीळ घालण्याचें सामर्थ्य कोणातच राहिलेलें नाही.

नोकरशाही आपलें कर्तव्य विसरली आहे. व प्रजेला आपलें कर्तव्य बजावण्यास वेळ नाही. विसरभोळेपणा व वेळेचा अभाव अशा दुहेरी अडचणींत आमचा प्रांत चिरडत असून त्या त्याचा केव्हां नाश करतील याचा भरवंशा नाही. सत्ताधारी स्वकर्तव्यच्युत झालें ह्मणून प्रजेनें ख्यालीखुशालींत दंग असलेंच पाहिजें असें नाही! बाकी दरिद्री लोकांची ख्यालीखुशाली कशा रीतीची असेल ती दिसतेच आहे ह्मणा!

करवाढीवर आह्मी पुष्कळच लिहिलें आहे. कित्येक वाचक तर आह्मांस चर्चितचर्वणाचा दोष लावण्यास सुद्धां मागें पुढें पाहाणार नाहींत, परंतु करवाढींच्या अप्रिय परिणामाचें भेसूर चित्र आमच्या मन:चक्षूंसमोर नित्य बागडत असल्यावरून, त्याविषयी लोकांत होईल तितकी जागृति कमीच आहे, अशा प्रामाणिक समजानें आमच्यानें प्रकृत विषयाला इष्ट साध्य हाती येईपर्यंत सोडवत नाही. वेळ मिळेल तेव्हां आह्मी त्याचा यथामती समाचार

घेतल्याशिवाय कदापिच राहाणार नाही. हें येथें स्पष्ट जाहीर केलेलें बरें.

आह्मी एकतंत्री नोकरशाहीत आहों असें जे समजतात ते भयंकर चूक करतात. 'आह्मी एकतंत्री नोकरशाहींत नसून बहुतंत्री लोकशाहींत आहों असें त्यांनी पक्के समजून, सध्या दिसत असलेला नोकरशाहीचा वरचष्मा फोडून टाकला पाहिजे. एवंच नोकरशाहीनें राज्याला लावलेला करांचा वणवा, प्रजेनें– लोकशाहीनें स्वप्रयत्नाच्या जलसिंचनानें कायमचा नामशेष करण्यास एका पायानें तयार झालें पाहिजे, तरच आमचा निभाव लागेल.'

*(गुरुवार, दि. २२ जून १९२२)*

# लोकमान्यांचें पुण्यस्मरण

लो. टिळक इहलोक सोडून गेल्यास दोन वर्षे पुरी होऊन गेली. त्यांच्या पुण्यस्मरणार्थ खालील लहानसा लेख प्रसिद्ध करीत आहो. त्याचे 'भारता'चे वाचक श्रद्धापूर्वक मनन करून आपल्यास प्रिय देशाचा उद्धार होण्याप्रीत्यर्थ मनोभावानें झटतील अशी आह्मांस आशा आहे.

चोहोंबाजूनीं आमचा गोमांतक बिकट संकटांनी घेरला गेला आहे. 'करील त्याचा कारभार व मारील त्याची तरवार' या दुष्ट व बेबंद वृत्तीची छान जेथें तेथें पडलेली दिसून येत आहे. शांततेचे तर केव्हांच उच्चाटन झालें असून, दुःखितांच्या हृदयभेदक आक्रोशाने सर्व वातावरण थरारून गेलें आहे. अशा अनुकंपनीय स्थितींत सदरहू लेखाचा कांहीच उपयोग होणार नाही. असें कसें ह्मणतां येईल? असो.

पुण्यश्लोक पुरुषांच्या चरित्रांचे पठन व मनन वारंवार करावयाचें त्याचा उद्देश आत्मशुद्धी होय. आपण संसारातल्या गोष्टींत इतके गढून जातों, कीं आयुष्यांत आपलें कर्तव्य काय व तें आपण पार पाडीत आहों कीं, नाहीं याचें भान आपल्याला राहात नाही. पुण्यवंतांच्या चरित्राचें मधूनमधून स्मरण केलें ह्मणजे आपण शुद्धीवर येतों, व आपली बरी वाईट कृति तपासूं लागतों.

असल्या तपासणीशिवाय आपली सुधारणा कदापि व्हावयाची नाही. आपल्या श्रेष्ठ कर्तव्याची आपणाला आठवण व्हावी ह्मणूनच विसाव्या शतकांतील ह्या महान कर्मयोग्याच्या चरित्राचें स्मरण करण्याचें आपण आज योजिले आहे.

लो. मा. टिळक हे महान देशभक्त होते, इतकेंच नव्हे तर कार्यकर्ते राजकारणी पुरुष होते. त्यांच्या अंगीकृत कार्यास अपूर्व अशी जी यशसिद्धी मिळाली, त्यांत दैवाच्या कृपेचा अंश अत्यल्प होता. गणितशास्त्राच्या अभ्यासानें त्यांना कार्यकारणाचा खोल विचार करण्याची सवय लागली होती. कोणत्याही कार्यात भावी यशाच्या कल्पनेंने वाहून जाऊन कार्यास ते एकदम आरंभ करीत नसत, त्यांत येणाऱ्या अपयशाचा अडचणीचा व संकटाचाहि विचार ते करीत. यामुळें अडचणींत तें कधीही गांगरून जात नसत.

आपल्या आयुष्याच्या कर्तव्याची त्यांनी अशी आंखणी केलेली होती. त्यामुळेच अनिवार प्रसंगाच्या प्रचंड ओघाबरोबर ते कधीही वाहात गेले नाहीत. लो. मा. टिळकांच्या अगोदरच्या सुशिक्षितांचा मार्ग ह्मटला ह्मणजे *'आधी करावें उदरभरण। यथेष्ट मिळवावें धन।। क्वचित बोलावे राजकारण। आचरूंच नये।।'* असा होता. ह्या मार्गानें आपलें इच्छित कार्य व्हावयाचें नाही, आपल्या देशावर परकीय अंमलाबरोबर परीकय विचारांचे जें अनिष्ट दडपण पडलें आहे तें निघावयाचें नाही. त्याला सतत उद्योग केला पाहिजे इतकेंच नव्हे तर आपलें जिवितसर्वस्व अर्पण केलें पाहिजे, हाल अपेष्टा भोगल्या पाहिजेत. तरच आपण परीकय विचारांच्या दास्यापासून मुक्त होऊ. हा उद्योग, शाळा स्थापून, वर्तमानपत्रें काढून व व्याख्याने देऊन करावयाचा. अशा प्रकारची कार्याची दिशा त्यांनी संसारात पडावयाच्या अगोदर ठरवून टाकली. दुसरी गोष्ट ह्मटली ह्मणजे आपलें आचरण अत्यंत विशुद्ध ठेवावयाचें ही गोष्ट जर लो. मा. च्या लक्षांत न येती व त्यांचे खासगी व सार्वजनिक आचरण होतें तेवढें विशुद्ध ठेवण्यास ते न जपतें तर जनतेवर त्यांची छाप न बसून आपल्या देशाची स्थिति भयंकर झाली असती. असो.

आपल्याला काय करावयाचें व तें कसें करावयाचें याची आंखणी बरोबर करून नंतर ते कार्यास लागले. प्रथम न्यू इंग्लिश स्कूलला ते मिळाले

व त्या संस्थेत दहा वर्षे आपल्या आयुष्याच्या ऐन उमेदीची त्यांनी काढली, पण पुढेंपुढें ही संस्था सरकारी संस्थांची नक्कल होऊं लागल्याबरोबर ते त्यातून निघाले. लोकांनी व शिक्षकांनी जो स्वार्थत्याग करावयाचा तो सरकारी शिक्षण संस्थांची, जेथें राष्ट्रहिताचे शिक्षण मिळण्याची आशा नाही, निव्वळ नक्कल करण्याकरिता नव्हे अशा स्वार्थत्यागाला जगांत कवडीचीहि किंमत नाहीं असें त्यांनी पुढे एका प्रसंगी ह्मटलें आहे. शिक्षण संस्थेंतून निघाल्यावर लोकशिक्षणाचें काम त्यांनी केसरीद्वारें आजन्म केलें. हें करीत असतां त्यांस अनेक शत्रु उत्पन्न झाले. हे शत्रु परकीय लोकांतच होते असें नसून त्यांपैकी पुष्कळसे लो. मा. चे हिंदी बांधवच होते. हे हिंदी बांधव लोभानें, मोहानें, अगर भ्रष्टचित्त होऊन, जाणतां अजाणतां, पुष्कळदां राष्ट्रहित करितोसें दाखवून राष्ट्रद्रोह करीत. अशा वेळी लो. मा. ना त्यांच्यावर कडक टीका करावी लागे. तीन रुचून ते टिळक यांचा द्वेष करीत. ह्याच द्वेषाचा फायदा सरकारनें घेऊन लो. मा. टिळकांना अनेकवेळा तुरुंग दाखविला. शारीरिक हाल अपेष्टेनें गांगरुन जाण्याइतके लो. मा. कच्च्या दिलाचे नव्हते. उलट आपले मरण आपल्या डोळ्यांनी पाहून ठेवणाऱ्या सिद्धांच्या कोटीपैकी ते असल्यानें संकटानें त्यांना काम करण्यास दुप्पट बळ चढे. याची साक्ष प्रत्येक तुरुंगवासानंतर जास्त जास्त महत्त्वाची व अत्यंत बिकट अशी कामें हाती घेऊन त्यांनी पार पाडली आहेत. केसरींत लेख लिहून त्यांनी देशांत खळबळ करून सोडलीच, पण त्यांच्या व्याख्यानांच्या दौऱ्यांची ह्याही पेक्षां जास्त महत्त्वाचे कार्य केले. कांग्रेससारख्या संस्था काय करूं शकतात हे ओळखून कांग्रेसला अनुकूल प्रसंगी योग्य दिशा दाखवून तिल कार्यकर्ती बनविली. लो. मा. हे एक जिवंत स्फूर्ति असल्यासनें ते जी जी गोष्ट हाती घेत, तिला जिवंत करून सोडीत. यांची उदारहणें ह्मणजे राष्ट्रीयसभा, पैसा फंड, मद्यपान निषेधाची चळवळ, वगैरे होत. वंगभंग, स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण हे प्रश्न राष्ट्रीय करण्याला लो. मा. चेच प्रयत्न विशेषत: कारणीभूत झाले. ज्या ज्या गोष्टींत त्यांना राष्ट्रीयहित दिसे, ती ती गोष्ट ते हांती घेत. राष्ट्रहितार्थ आपला प्रतिपक्षी असलेल्या मनुष्यशींहि ते सहकारिता करीत. प्रसंगी स्वमतहि गुंडाळून ठेवीत. अशा प्रकारें स्वदेशाची अनन्य भक्ती त्यांनी

केल्यामुळेंच जनताजनार्दन त्यावर प्रसन्न होऊन त्यांना लो. मा. ही अपूर्व पदवी देता झाला. भक्त व देव हे सदैव एकरूपच असतात. ते इतके, की प्रत्येकाच्या प्रेमाला उपमा अन्याच्या प्रेमाची साजते, त्याप्रमाणेंच जनतेचे प्रेम टिळकांवर टिळकांच्या अनन्य प्रेम इतकेंच होते. यामुळेच हिंदुस्थान परकीय मताच्या छापेंतून बराच निघाला आहे. बाकीचा आपणाला काढणें आहे. तर प्रथम टिळकांच्या गुणांचें चिंतन करून त्याप्रमाणें आचरण ठेवणें अत्यंत अगत्याचे आहे त्यांच्या गुणांच्या अनुकरणाची बुद्धि त्यांच्याच आशीर्वादानें आपणाला प्राप्त होवो, अशी आज कोण बरें इच्छा करणार नाही?

*(गुरुवार, दि. १० ऑगस्ट १९२२)*

# लोकमत व सरकार

सांप्रत अधिकाररूढ असलेल्या गव्हर्नर साहेबांनी येथील राज्यकारभाराची सूत्रें आपल्या हातांत घेतल्यापासून तो आजतागायत जशी लोकमताची अवहेलना चालू आहे, तशी आह्मांला वाटतें, यापूर्वी कधीहि झाली नसेल. लोकमत ह्मणजे 'कांहिच' नाही अशी डॉ. मोरईसची चुकीची पण ठाम समजूत बनली असून 'हम करे सो कायदा' या अनुदार तत्त्वाचा मनमुराद उपयोग करण्याचा जणू त्यांनी विडाच उचललेला आहे, असें त्यांच्या एकंदर धोरणावरून विधान केल्यास सत्याचा अपलाप होण्याची भीति नाही.

आजपर्यंत उपरोक्त सुलतानी प्रांताधिकाऱ्यांच्या अमदानीत अनेक लोकहितविघातक कृत्यें केली गेली व जात आहेत. प्रत्येक प्रसंगी त्या त्या कृत्याविरुद्ध जनतेंनें स्पष्ट शब्दांनी आपली नापसंति दर्शविलेली आहे. पण या नापसंतीची बिलकूल पर्वा न करतां व लोकांच्या दु:स्थितीनें काहीच गांगरुन न जाता त्यांनी स्वत:चेचं घोडें पुढें दामटलेले आहे.

यावरून इतकें मात्र सिद्ध होतें, की त्यांनी येथील लोकांचा बोलघेवडेपणा व भ्याडपणा पूर्ण अजमावला असून, सरकारास दुष्कृत्यांपासून

परावृत्त करण्यांस अवश्य असलेला सक्रीय जोम येथें नांदत नाही, अशी त्यांची पूर्ण समजूत झालेली आहे. 'येथील लोक ह्मणजे दुरून कांही तरी बरळतात व प्रसंग आला, की शेपूट पायांत घालून जिभल्या चाटीत स्वस्थ बसतात, अशीच सिं. मोराइस यांची भावना झालेली दिसते. कसेहि असो, गोष्ट खरी, की त्यांनी येथील लोकमताचा मान न राखतां लोाकंची मान कापण्यांतच आपला ब्रिटिश मृत्सद्दीपणा व्यक्त केलेला आहे. असें मोठ्या कष्टानें ह्मणावे लागतें असो.'

उपरोक्त स्थिति गोमांतकीय प्रजेस किती अपमानकारक आहे हें विशद करून सांगण्याची जरुरी नाही. कोणत्याही प्रजासत्ताक राज्यांत लोक मतानुरोधानें एकंदर राजकीय कारभाराचे गाडे हांकले जाते. लोकमताविरुद्ध कसलीही गोष्ट तेथें आचरली जात नसते. पण येथें मात्र येथून तेथून सारा उलटा व्यवहार! अशा मानहानीच्या लाजीरवाण्या स्थितींत काळ कंठणे अत्यंत निंद्य आहे. अर्थात आपला गेलेला मान फिरुन कमाविण्यासाठी प्रत्येक नागरिकानें जिवापाड मेहनत केली पाहिजे हें उघड होतें.

ह्मणून लोकांना आची नम्र पण अत्याग्रहाची विनंती आहे की नागरिक हो, आतां स्वस्थ बसूं नका! तुह्मांवर राजरोस रितीनें करण्यांत येत असलेल्या अत्याचारांस तेजस्वी जबाब देण्यास कचरूं नका! सरकारच्या रोषामुळें प्राप्त होणाऱ्या त्रासजनक स्थितीनें नामर्द बनूं नका! जेथें तेथें अडवझुकीचे उपाय सनदशीर रितीनें अमलांत आणून सरकारास सळो की पळो करून सोडण्यांत मागें पुढें पाहूं नका! असें झाल्यासच मात्र गेलेला मान पुन्हा मिळण्याचा संभव आहे. नाही तर सध्या आहे त्यापेक्षाहि तुमची जास्त दुर्धर अवस्था होणार आहे, याची पक्की खूणगाठ बांधा! तुह्मी प्रजासत्ताक राज्याचे खरे कारभारी आहात. अद्वातद्वा उधळण्यांत येणारा सरकारी तिजोरींत पैसा तुमचा आहे. तुमच्या हिताविरुद्ध कोणतीही गोष्ट करूं जाणाऱ्यांस पूर्ण पारिपत्य करण्याचा तुह्माला निसर्गदत्त हक्क आहे. नोकरशाही ही तुमची दास आहे. तात्पर्य, नष्ट होऊ पाहत असलेला तुमचा स्वाभिमान जागृत करून हट्टी सरकारची हड्डी नरम करण्याच्या मार्गास तुह्मी ताबडतोब लागेल पाहिजे.

*(गुरुवार, दि. १४ सप्टेंबर १९२२)*

# व्यवहारशून्यतेचें परिणाम

पोर्तुगाल किंवा त्याचे वसाहतींत दिवसेंदिवस जो कर्जबाजारीपणा वृद्धिगंत होत आहे, याचें खरे कारण कोणतें याचा उलगडा केल्यास राज्यकर्त्यांच्या व्यवहारज्ञानशून्यतेलाच प्रमुख स्थान दिलें जाईल. पोर्तुगीज राष्ट्र हें ब्रिटिशासारखे व्यापारी पेशांचें नसल्यामुळें औद्योगिक बाबतींत जितकी उदासीनता पोर्तुगालांत वावरते त्याचें दुप्पट ती त्याच्या वसाहतींत दृग्गोचर होत असल्यास नवल नाही.

आमच्या या इतिहासप्रसिद्ध गोवा प्रांतावर पोर्तुगीजांचा अंमल सुरू झाल्यास चारशें अधिक वर्षे झाली. इतक्या अवधींत धार्मिक अवडंबरापायी जो पैशांचा चुराडा उडाला (त्यांत हिंदु देवालयाचा व इतर धानिकांचा जमिनजुमला जो इंक्विजींशनच्या वेळीं जप्त केला, त्याचाही अंतर्भाव होतो.) त्याची गणती केल्यास कोणाही विचारी व नि:पक्षपाती व्यक्तीस सरकारच्या या अरेरावी धोरणाची कींवच करावीशी वाटेल. ब्रिटिश अधिकाऱ्यांचें अशा वेडगळ प्रवृत्तीकडे सदैव दुर्लक्ष असल्यामुळें त्यांनी आपल्या हद्दीपर्यंत ज्या सुधारणा केल्या आहेत त्यांच्या शतांशानेंहि आमच्या सरकारनें शहरांत केलेल्या नाहींत.

वरील रकमेचा एक चतुर्थांश औद्योगिक बाबतीकडे विनियोग करण्याची सरकारनें तजवीज केली असती, तर आज गोव्यांत सदर बाबतींत दिसून येणारी निकृष्टावस्था खास दिसली नसती. याच कारणामुळे पोर्तुगीज राज्यकर्त्याचे हें व्यावहारिक अज्ञान नष्ट झाल्याशिवाय गोव्यांत कलाकौशल्यास थारा मिळेल असें वाटत नाही. याच विचारसरणीस अनुसरुन जर कोणीही ''पोर्तुगीजांचा अंमल असे पर्यंत गोव्यांत कोणत्याच तऱ्हेचे कारखाने अगर उपयुक्त औद्योगिक संस्था स्थापन होणें कठीण'' असें भाकित केल्यास, तें अस्थानी होणार नाही.

इकडील श्रीमंत लोकांची असावी तितकी औद्योगिक कारखान्याचें वाढीकडें प्रवृत्ती नाही. त्यातून सरकारच्या प्रोत्सहनाभावीही तें पुढें येत

नाहीत, हें जितकें खरें तितकेंच पोर्तुगीज सरकारच्या प्रसिद्ध लहरी सामर्थ्यास आपलें भांडवल बळी पडेल या भीतीनें ब्रिटिश हिंदुस्थानांतील लक्ष्मीपुत्रहि या प्रांतात कोणतीहि औद्योगिक संस्था स्थापन करण्यास पुढाकार घेत नाहींत, हेंहि तितकेंच सत्य आहे.

आमचें सरकार एखादी कापडाची गिरणी उभारण्यास सद्य : स्थितींत भांडवलाचे अभावी तिकडे दुर्लक्ष करतें, अशांतला भाग नाही. नवीन नवीन कर प्रस्थापित करून त्याचे मिषानें हजारो रुपये जमा करण्याची कल्पकशक्ति असलेली मठ्ठ डोक्याची नोकरशाही जर कुठें विराजित असेल तर पोर्तुगीज दरबारांतच!

शहर सुधारणारें मंडळ या संज्ञेचें एक खातें अस्तित्वांत आल्यास आज दोन वर्षे होत आली. त्यांचे पायी हजारों रुपये दरमहा गरीब प्रजेकडून वसूल केले जातात पण त्याचा विनियोग शहर सुधारण्याचें संकल्पाकडे न होतां मोठमोठ्या पार्ट्या, नाचतमाशें व अनियमित व अव्यवस्थित मोटार सर्विस, यांवाचून दुसऱ्या कोणत्याहि उपयुक्त कार्याकडे होत नाही. किंबहुना तसा तो करू न देण्याबद्दल विचारी पुढारी सरकारास भाग पाडीत नाहीत, हे प्रजेचे दुर्दैव होय.

या एकाच खात्याचा निधि एखादी औद्योगिक संस्था अगर कापडाची गिरणी उभारण्यासाठी मुक्रर झाला असता, तर पांच वर्षांच्या आंतच एक मोठी 'मील' अस्तित्वंत आली असती. पण इकडे कुणाचेहिं लक्ष्य जात नाही. किंवा उभयपक्षीं जाणून बुजून दुर्लक्ष करितात. याचें एक कारण वरील खात्याचें सदराखालीं नोकरशाहीत जो धुडगूस घालण्यास किंवा चैन उपभोगण्यास जी संधी मिळते ती अन्य तऱ्हेने मिळण्याचा संभव नाही.

अशी अनेक उदाहरणें दाखवितां येतील, काकी गव्हर्नराचे कारकिर्दीत सार्वजनिक सोयीसाठी जो एकके 'प्रोझेक्त' मुक्रर झाला तो दुसऱ्या गव्हर्नराचे आगमनानें गुलदस्तांत पडून राहावा. जणू काय माळवलेल्या गव्हर्नरांस कोणतेंच ज्ञान नव्हतें! मात्र त्यासाठी सरकारला कागद व छापणावळीचा खर्च, सरकारी गॅझेटिअर प्रसिद्ध करणें, कमिट्यांच्या नेमणुका व वृत्तपत्रांतून याबद्दल 'शाबासक्यांचा वर्षाव' इतक्या गोष्टी मात्र बिनचूक व्हावयाच्या!

मोठ्या आगबोटी बांधून त्यांची गोव्याहून आफ्रिका, पोर्तुगाल इत्यादि ठिकाणी डायरेक्ट येण्याजाण्याची दर्यावर्दी संस्था स्थापन करणें हा त्या प्रोझेक्तांपैकी एक होय. ज्या साहेबाने ही कल्पना काढली त्यांना मिळावें तसें सरकारकडून प्रोत्साहन मिळालें नाही, किंवा त्या साहेबांचे अंगी चिकाटीचा अभाव होता. ह्मणून ही अत्युपयोगी व्यवस्था कुठल्याकुठें नाहींशी झाली. आजच्यासारख्या महागाईच्या वेळीं ही कंपनी अस्तित्वांत असती, तर आज बराच मोठा फायदा व प्रजेची सोय झाली असती. पण याला राज्यकर्त्यांची व्यवहारज्ञानशून्यताच आडवी आली असें कष्टानें ह्मणणें भाग आहे.

बोरीच्या व इतर ठिकाणच्या फुलाचीही कामें अर्धवटच राहिली आहेत, यालासुद्धां वरील एकच कारण नडलें. सांगें येथील पूल तो काय, तो आज पांच सहा वर्षे तयार व्हावयास घातला आहे, तरी होत नाही, इतकी ज्या नोकरशाहींत काम करण्याची तत्परता(!) तिच्या हातून कोणतें शतकृत्य होणार, हें दिसतेंच आहे. याकरितांच गोव्यात 'पोर्तुगीज व्यापार' ह्मणजे 'अव्यवस्थित धंदा' अशी ह्मण रुढ होऊं पाहात आहे.

अगदी शेवटी स्थानिक लहान बोटीं (वाफोर) चा व्यवहार सरकानें 'आक्सावे' विकून जी रक्कम आली त्यांतून बोटींची खरेदी करून आपल्या तंत्रानें सुरू केला. वास्ताविक पाहूं गेल्यास या धंद्यांत वर्षांती बराच नफा होत असतांनाहि त्याला लागणाऱ्या जळाऊं लाकूड किंवा कोळसा इत्यादि सामानाचा पुरवठाहि आमच्या हुशार नोकरशाहीकडून होऊं नये या सारखी लाजीरवाणी दुसरी गोष्ट असू शकणार नाही. संबंध जंगलखात्याचा कारभार स्वत: सरकारकडे असून केवळ कंत्राटदारांचें भिडेस बळी पडून नुसतीच फुशारकी मिरवणारी नोकरशाही आपल्या व्यवहार ज्ञानशून्यतेंचें जें प्रदर्शन करीत आहे, याचें फार आश्चर्य वाटतें!

सदर बोटीच्या कारभारास आरंभ करतेंवेळी बोटींचे डागडुजीविषयीं व इतर हरएक व्यवस्थेसंबंधी जी मर्यादा आखली होती तिच्यावर हुकूम चालू न देता, 'हम करे सो कायदा' या तत्त्वान्वयें (बोटीच्या रिपेरेर व इतर रंग वगैरे देण्याचें बाबतींतील रक्कम चापून घेण्यांत मात्र मर्यादेचे उल्लंघन

बिलकूल झालेलें नाही!) नाहून आज बोटींची जी निकृष्ट अवस्था झाली आहे, तिच्याकडे वृत्तपत्रकारांनी कितीही कंठशोष केला, तरीही त्याकडे नोकरशाहीचें लक्ष्य जात नाही. यावरुन काय समजावें? आह्मी गेल्या एका अंकांत ह्मटल्याप्रमाणे एका बोटीनें अगर एका उतारुने तरी जलसमाधी घेतल्यावांचून सरकारचें डोळें उघडणार नाहींत हें खास.

बोटींच्या धक्क्यांचीही तीच गोष्ट. निदान प्रत्येक सहामाहीला तरी धक्क्याची व बोटीची अधिकारी तज्ज्ञांकडून पहाणी होऊन कुठे काय दुरुस्ती केली पाहिजे याकडे लक्ष्य दिलें असतें तर सगळेंच धक्के जे आज अगदींच डबघाईस आले आहेत, तसें न होतां त्यांनी कांही वर्षे काढली असती. आतां तर धक्क्यांचें सगळेंच काम नवें केल्याशिवाय गत्यंतर नाही. ह्मणजे जें कार्य तत्परतेंनें योग्य वेळी केल्यास पांच रुपये खर्चातून निभावले असतें, त्यास आतां पांच हजार रुपयें खर्च करणें भाग आहे. त्याचप्रमाणें बोटीच्या उत्पन्नातून ठराविक रिजर्वफंड साल अखेर काढून निराळा ठेवला असता तर, प्रती पांच वर्षातून एका बोटीनें सामान विकत आणण्यास सुलभ झालें असतें. तूर्तच्या कर्जबाजारीपणांत नवें धक्के बांधणे व नव्या बोटी तयार करणें मुष्कीलीचे असल्यामुळें, यापुढें जे कर्ज काढून, असोळणें वगैरे गांव विकून, अगर नवी करपट्टी बसवून ही बोटींची आणि धक्क्याची व्यवस्था होते तर पहावी!

सारांश असे पुष्कळ दाखले सापडतील, की पोर्तुगीज राज्यकारभारांत व्यवहारज्ञानशून्यतेचें स्तोम माजल्यामुळें कारभाराच्या गाड्यास खीळ पडण्याची दुश्चिन्हें दिवसेंदिवस जास्त प्रमाणानें दृग्गोचर होत आहेत!

*(गुरुवार, दि. २१ सप्टेंबर १९२२)*

# येत्या निवडणुका

येत्या नव्हंबर महिन्याच्या ५,१९ व २२ या तारखांस, अनुक्रमें मुनिसिपालिट्या, जुंतलोकालें व कायदेंमंडळ यांचे सभासद निवडण्याकरिता,

सभा बोलावण्यात आल्याचे सरकारी बोलेतीवर जाहीर झालें आहे. अशा रीतीनें निवडणुका दाराशीं येऊन दार ठोठावण्यास लागल्या तरीहि आह्मी या कुशीवरुन त्या कुशीवर वळण्याचें सुद्धां मनात आणीत नाही, हें आमचें अनाधिकारत्वाचें लक्षण नव्हे तर काय? लोकसत्ताक राज्यपद्धतीनें हिरवें तांबडें निशाण या आमच्या हिंदुभूमीवर फडकावयास लागल्यास आज बरोबर एक तप होऊन गेले, इतकेंच नव्हें तर घरबसल्या ''स्वयंसत्ताक पद्धतीचा'' मग ती नामधारी का असेना! अंमल सुरू झाल्यास तीन वर्ष होऊन गेली, तरी नागरिकत्वाचे स्वतंत्र अधिकार बजावण्याचें अद्याप आमच्या जिवार येत असतें. हें पाहिजें ह्मणजे, आज चारशेंअधीक वर्षेपर्यंत पारतंत्र्यात झालेल्या त्या स्वतंत्र व उदार राज्यपद्धतीस पात्र होण्यास किती काळ लोटणार आहे हें एक हरीच जाणें!!

परंतु आपल्या देशाचें दुर्दैव संपून आपल्या डोळ्यांदेखत त्यांस सुखाचे दिवस मिळावे याविषी विचार करणाऱ्या देशसेवकांनी कधीही निराश होता कामा नये. एका पिढीत न दिसणारे गुण कांही काळानें दुसऱ्या पिढींत दिसू लागतील असें धरून चालण्यास हरकत नाही. मात्र त्या दृष्टीनें कळकळीचें प्रयत्न झाले पाहिजेत.

वर सांगितल्याप्रमाणें करण्याचे प्रयत्न कोणी करावे हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे व तो हिंदुसमाजाच्या दृष्टीनें सोडविणें फार अगत्याचें आहे. धर्मवेड्या पोर्तुगेझ लोकांनी आपला पांढरा पाय येथें घट्ट रोवल्यानंतर तो आचंद्रार्क कायम राहावा ह्मणून आपला धर्म व संस्कृति याचा प्रसार करण्यास प्रारंभ केला. त्यासाठी त्यांनी कोणकोणत्या जुलमी, राक्षसी अतएव निंद्य मार्गांचा अवलंब केला, तें आज साधारण मानानें समजून आलेंच आहे. तरी पण तें अधिकाधिका समजणें फार जरुरीचें आहे. त्यांच्या त्या जुलमांस बळी पडून ख्रिस्ती झालेले लोक ''पडला जन्म गोड'' या न्यायानें त्यांच्या संस्कृतींतच गुरफटून गेले व आपला धर्म, आपले राष्ट्र, आपली भाषा, आपल्या चालीरिती वगैरेंस पारखे झाले. कालांतरानें पोर्तुगीझांच्या पराक्रमांस व भाग्यास उतरती कळा लागल्यामुळें त्यांच्या धार्मिक जुलमांसही आळा बसत चालला व तेव्हांपासून स्वत:चा धर्म बचावून कसाबसा जीव

धरून राहिलेले हिंदु लोक हळूहळू खऱ्या व बाट्या पोर्तुगीझांशी दळण वळण ठेवू लागले. आपल्या देशभाषेचें ह्मणजे मराठी भाषेचें 'मग ते तुटपुंजे कां होईना' शिक्षण सांभाळून पोर्तुगीझ भाषेचें ज्ञान मिळविण्याकडे कांहींनी आपला मोर्चा वळविला व त्या भाषेत सरकार दरबार करण्याइतकें प्राविण्य मिळविले. कांहीनी कामगार वर्गात आपला प्रवेश करून घेतला व अशा रीतीनें आपलें अस्तित्व सरकारच्या व धर्म आणि संस्कृति यांच्या योगानें प्रती सरकार बनलेल्या येथील ख्रिस्ती समाजाच्या निदर्शनास आणलें. सध्यांच्या लोकसत्ताक राज्यपद्धतीत तर त्यास बराच वाव मिळाला. हें सर्व जरी खरें असलें, आणि तसें होणें फार अगत्याचें असले तरी हा कायदा पदरांत पाडून घेणाऱ्यांना हिंदी संस्कृतीशी बेईमान व्हावें लागलें ही गोष्ट नाकबूल करतां येणार नाही. जसजसा ख्रिस्ताचा व आमचा परिचय वाढू लागला तसतसा त्यांनी उसन्या घेतलेल्या पाखिमात्य सुधारणेचा पगडा आमच्या लोकांच्या मनावर पडूं लागला. स्वतःच्या धर्माचे, स्वतःच्या चालीरीतींचे सोपपत्तिक ज्ञान होण्याजोगें शिक्षण न मिळाल्यानें, ख्रिस्ती शाळामास्तर, वरिष्ठ अधिकारी वगैरेंकडून होत असलेल्या हेटाळणीस प्रत्युत्तर देण्याचें सामर्थ्य आमच्यांत राहिलें नव्हतें व अशा रीतीने आमची बाजूच कमकुवत आहे असा आमचा आह्मांस भास होऊं लागला आणि अनेक कारणांनी कळत नकळत सुद्धां आमच्या आचरणांत पाश्चिमात्य सुधारणेंची छाप पडत चालली व त्यामुळें झालें काय, तर आचारविचार आहारविहार यांत मनस्वी फरक पडून त्याचे दुष्परिणाम सध्यां आह्मांस रोगाच्या साथी, दुष्काळ, महागाई वगैरेच्या रुपानें भोगावे लागत आहेत.

सुदैवानें इंग्रजी हिंदुस्थानांत चाललेल्या चळवळीनें, आमच्या लोकांस वरील गोष्टींची जाणीव होत चालली आहे. परंतु "समजतें पण उमजत नाही." अशी आमची स्थिति झाल्यामुळें त्यांतून मुक्त होण्यासारखे प्रयत्न आमच्या हातून व्हावें तसें होत नाहीत. परंतु पुढे दिसणाऱ्या निवडणुकींत भाग घेतांना आह्मांस याच दृष्टीनें पुढें पाऊल टाकिलें पाहिजे. मुनिसिपालट्या जुंतलोकालें आणि कायदेमंडळ यांत सभासद या नात्याने जाऊं इच्छिणारे आपली पुढील कामगिरी हिंदी संस्कृतीला धरून करणारे असतील, तरच

त्यांना आपले मत देणे व इतरांनीही द्यावी ह्मणून लोकमत तयार करणें रास्त होणार आहे. नाही तर ''जोडीचा सैतान खुनास झोंबतो'' या ह्मणीचे प्रत्यंतर पहावयाचें नशिबी येणार. या सर्व गोष्टींचा आपल्या मनाशीं विचार करून प्रत्येक मतदार, प्रत्येक हिंदु मतदार, आपलें मत योग्य उमेदवारांस देईल अशी आशा आहे.

*(गुरुवार, दि. १९ ऑक्टोबर १९२२)*

# म. गांधींची योग्यता

महात्मा गांधीची व त्यांनी रुढ केलेल्या उच्चतम तत्वांची योग्यता समजण्यासाठी एका अमेरिकन विद्वानाचे त्यांच्या संबंधाचें मत खाली देत आहों. त्याचा विचार आमचे वाचक श्रद्धापूर्वक करतील अशी आह्मांस आशा आहे.

''दंडाचा अवलंब न करणें, हा सत्यमार्ग आहे, अशी माझी खात्री असल्यामुळेंच त्याच्या प्रचाराचा उपदेश मी करितों. दंड नीतीनें न्यायमार्ग स्वीकारणे हा न्यायच नव्हें. तर स्वत:चे बलिदान करून न्यायारुढ होणें हेंच मानवजातीला उचित आहे. दंडापेक्षा क्षमा हें पुरुषार्थाचें अधिक उज्ज्वल शस्त्र आहे, क्षमा हें वीरांचे भूषण आहे.'' गांधी यांच्या चळवळींतील ही आंगे प्रमुख असल्यामुळेंच आपलें हें युद्ध ह्मणजे. धर्मयुद्ध आहे, असें ते ह्मणतात. दंडत्याग हा केवळ तात्पुरता उपाय ह्मणून नव्हे, तर तोच एक खरा मार्ग आहे, असा गांधी यांच्या बुद्धीचा निश्चय आहे. चिरकालिक स्वरुपाचा विजय आपणास मिळवायचा असेल तर त्याला हा एकच मार्ग आपणास मोकळा आहे. ते ह्मणतात ''दंडाचा पूर्ण अभाव हीच विजयाची पहिली कसोटी आहे. दंडाचं अस्तित्व शिल्लक असेपर्यंत विजय झाला ह्मणता येत नाही. जीविताचा आणि वित्ताचा नाश करण्याचा मार्ग हिंदुस्थानानें पत्करला तरी त्याचा उपयोग काय? खरा मार्ग ह्मटला ह्मणजे अत्यंत सहनशीलयुक्त अप्रतिकार हाच होय. विश्वघटनेंचें अबाधित कार्य आहे, हें ज्याला समजत

असेल त्यांच्या लक्ष्यांत या मार्गाचें रहस्य अगदी सहज येईल. विश्वबंधनें मूलत: जडरूप नसून ती शुद्ध चैतन्यमय आहेत. हा मुख्य मुद्दा लक्षांत आला ह्मणजे अप्रतिकाराचे रहस्य आपणांसमोर ढळढळीत उभें राहील आणि क्रोधाचा शब्द उच्चारण्याचें अथवा तलवार परजण्याचें कारणच आपणास नाही हेहि आपणास समजेल. फार काय आपण कोणाविरुद्ध एक बोटहि उभें करण्याची इच्छा आपणास होणार नाही.''

''या दंडत्यागनीतींत आणखीहि एक पुढची पायरी आहे. केवळ दंडाचा मार्ग केला ह्मणजे त्यांत सर्व काही आलें असें नाही. केवळ सहनशीलतेनें सर्व दु:खे गिळून बसणें हें या तत्त्वचें एकच अंग आहे, आणि यापुढें याचें दुसरें अंग सत्पुरुषार्थांचें आहे. हे अंग 'असहकारिता' हें होय. सहनशक्तीची क्रिया ही परोक्ष स्वरूपाची अथवा अव्यक्त क्रिया होय. तिच्या पुढील पायरी अपरोक्ष अथवा प्रत्यक्ष क्रिया असहकारिता ही होय. या करतांच हिंदुस्थानांतील नोकरशाही वा गाडा ज्या क्रियांवर चालतो, त्या क्रियांत तुह्मी कोणताहि भाग घेऊ नका, असा उपदेश गांधी आपल्या अनुयायांना करितात. ज्या राजकीय किंवा सामाजिक क्रिया नोकरशाहीच्या जीविताला अत्यावश्यक आहेत त्यांत हिंदवासियांनी कोणताहि भाग घेऊं नये, असा गांधी यांचा उपदेश आहे. याकरितां इंग्रजी वस्तुचा त्याग करण्यास ते सांगतात. हा त्याग पूर्णतेस पोंचला ह्मणजे नोकरशाहीच्या अंमलांच्या साऱ्या नाड्या आंखडून सत्तेला संधिपात होईल हें उघड आहे...''

''गांधी हे पूर्णत्व पावलेलें आणि विश्वरूप झालेलें महात्मा होत असा हिंदी लोकांचा विश्वास आहे आणि हा विश्वास अस्थायी नाही असें दिसतें. राजकारणाच्या बाबतीत गांधी हे लेनिन इतकेच कठोर आहेत. लेनिनचें पाय जसे जमिनीवर असत त्याप्रमाणें गांधीहि या बाबतीत व्यवहाराला पक्के चिकटून आहेत. आपलें साध्य प्रत्यक्ष सृष्टींत आणण्याकरिता लेनिन जितक्या चिकाटीने धडपडतात, तितक्याच चिकाटीने गांधीही आपलें अंगीकृत कार्य करीत आहेत. पण लेनिनप्रमाणें त्यांची बुद्धि रजोगुणी नाही. हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. शुद्ध चैतन्याचा आश्रय रोमेन रोलंड यांची बुद्धि ज्याप्रमाणे सोडीत नाही, त्याचप्रमाणें गांधी यांच्या बुद्धीलाहि या शुद्ध पुण्यमय वातावरणाचा

विसर पडत नाही. रोलंड यांचा विचार मनांत येण्यांबरोबर मला टॉलस्टॉय यांच्या मूर्तीचें स्मरण होते. लेनिन यांच्या आठवणीबरोबर नेपोलियन मला दिसूं लागतो. आणि गांधी यांचा विचार चितांत येताच माझ्या मन:चक्षुपुढें मूर्तिंत येशुख्रिस्त उभा राहतो. ख्रिस्ताचेच शब्द गांधीच्या मुखानें पुन्हां ऐकू येऊं लागतात. ख्रिस्ताप्रमाणेंच गांधी देहदंड भोगीत आहेत. मनुष्यजातीनें उन्नतिमार्गाला लागावें ह्मणून ख्रिस्ताप्रमाणे आपल्या जिवाची आटापीट ते करीत आहेत, आणि आपलें हें स्वर्गीय साम्राज्य पृथ्वीवर स्थापन करण्याचा उद्योग करीत असतां, ते वीराला उचित अशा स्थितीत देह सोडतील.''

''आपल्या शिष्टमंडळीसह येशुख्रिस्त कोठें परगावीं जात असतां त्याच्या शिष्टमंडळींत मोठा वादविवाद सुरू झाला, ह्मणून त्यानें चवकशी केली, तेव्हा एका शिष्यानें ह्मटले, सर्वश्रेष्ठ मनुष्य कोण याबद्दल आमचा वाद चालला आहे. त्यावर ख्रिस्तानें उत्तर दिलें, 'सर्वांच्या शिरोभागी बसण्याची इच्छा असेल, त्यानें सर्वांची सेवा करावी.' ख्रिस्ताच्या या उत्तराची आठवण आजच्या याप्रसंगी झाल्यावाचून राहात नाही.''

*(गुरुवार, दि. २१ डिसेंबर १९२२)*

# सरकारचें 'अकरा' वाजलें

आजपर्यंत आमच्या सरकारनें अनेक प्रकारचें नवें नवें खेळ खेळून जी अकलेची मनमुराद खैरात केली, ती कमी पडली ह्मणूनच की काय, त्यानें आता एक नवीन शक्कल काढिली असून तिची अंमलबजावणीहि या महिन्यापासून सुरू झाली आहे. शवप्रदर्शनानिमित्त सरकारनें मुनिसिपालटीकडून जुगार खेळण्याला परवानगी देववून जे आपल्या शहाणपणाचें प्रदर्शन (त्या शवप्रदर्शनाबरोबरच) अखिल जगासमोर मांडलें आहे, त्याचें किती अनिष्ट परिणाम भोगावे लागतील व त्याचें पर्यवसान कोणत्या वाईट स्वरुपांत परिणत होईल हे आजच सांगणें कठीण आहे. पण मागल्या एकंदर लक्षणांवरून व 'बुडत्याचा पाय खोलांत' या न्यायाला अनुसरुन हा घसरलेला पाय सरकारला

व त्यांच्याबरोबरच आह्मांलाहि कोणत्या खड्ड्यांत वाहून नेईल याचा नेम नाही, असे प्रस्तुत ह्मणायला हरकत नाही. ११-१५ हजार रुपयांच्या जबरदस्त मोहापासून पणजीचें स्थानिक सरकार आपले रक्षण करून घेण्याला शकलें नाही. ह्मणून या ११-१५ हजार रुपायांचया तोंड्यावर जुगाराच्या परवानगीचा हा भक्कम ओनामा घालण्यांत आला असें कोणालाहि वाटणें साहजिक आहे. आणि ह्यावरूनच पुढें कदाचित भरभक्कम रक्कम कोणी देऊ केली, तर त्या आमिषाला भुलून सरकार लुटारुपणालाहि परवानगी देईल की काय अशी जनतेला भीति वाटत असली तरीही त्यांत आश्चर्य नाही. कारण जुगार व लुटारुणा यामध्यें विशेषसा फरक नाही. फरक असेल तर तो हाच, की पहिला व्यवहार उभय पक्षांच्या संमतीनें होतो व दुसरा उभय पक्षांपैकी एकाची नाखुषी असतांना होतो. पहिल्या व्यवहाराचा परिणाम अनिश्चित व दुसऱ्याचा निश्चित असतो. पण दोन्हींचे पर्यवसान एकच 'धननाश' हें असते. एवढ्याशा चिटोऱ्याबद्दल ११००० हजर रुपये पणजी मुनिसिपालटीला मिळले, ह्मणून वास्तविक आह्मी सरकारचें अभिनंदन करायला पाहिजे. पण त्या चिटोऱ्याचें मूळ जनतेच्या धनराशीच्या मुळावर येणारें असल्यामुळें तसे न करितां आह्मांला त्याचा निषेधच करणें योग्य वाटते. आधींच सरकारनें प्रजेच्या सुखदु:खाकडे व आवांक्याकडे दुर्लक्ष करून तिला पळून काढणारी अनेक प्रत्यक्षाप्रत्यक्ष साधनांनी जनतेच्या पोटांवर गोलमारा चालविला आहे. त्यांतच जुगार परवानगीला योग्य वेळी आळा न पडून कायमचा समावेश करण्यांत आला. तर प्रत्यक्ष लुटीचें दुसरें साधन जी दरोडेखोरी तिचेही अवलंबन सरकारकडून होणार नाही. अशी खातरी कोणी बाळगावी?

'आधीं जाते बुद्धी व मग जाते लक्ष्मी' या न्यायान्वयें विनाशकाल जवळ आला ह्मणजे जसा बुद्धिभ्रंश होतो, त्याप्रमाणें सरकारला जुगार परवानगी सारखा जो भयंकर व भिकार सोहळा झाला, त्यावरुन नुसती बुद्धीच चळली आहे व भविष्यकालाच्या पोटांत कसल्याहि 'गुणी बाळाचा गर्भसंभव' नाही असें ह्मणणें बरेंच चुकीचे होईल असें आह्मांला वाटतें. परंतु फक्त जो बुद्धिभ्रंशच गृहित धरला तर 'साठी बुद्धि नाठी' हेंहि त्याचें कारण असू शकेल. चारशें अधिक वर्षे वयोमानपरत्वे गोवा प्रांतावरील पोर्तुगीज सत्ता वृद्ध

व खिळखिळी झाली आहे. तेव्हां वार्धक्यामुळेंहि नतद्रष्ट बुद्धिचा उदय झाला असावा. एरव्ही, जग पुढें पुढें चाललें असताना, अमेरिकेसारख्या अत्यंत सुधारलेल्या या देशांतील दारुबाजी अजिबात बंद करण्याबद्दल कडक निर्बंध घालण्यांत येत असताना व सर्वत्र व्यसनबाजीचे बंदीचे कायदे अस्तित्वांत येत असताना, या सरकारला महाबाजीपैकीच 'एका' बाजीला जुवाबाजीला– परवानगी देण्याचे कशाला सुचलें असतें? या जुवाबाजींमुळे मोठमोठी राज्यें, घरें धुळीस मिळालेली आहेत. जुगारामुळें पांडवांना वनवास भोगावा लागला. जुगारामुळेंच पुण्यश्लोक नलराजाला राज्यत्याग करण्याचें कपाळीं आले. ही उदाहरणें डोळ्यांसमोर असतांना जुगाराला प्रोत्साहन दिलें जावें ही केवढी खेदाची गोष्ट आहे? सरकारनें याचा ताबडतोब विचार केला पाहिजे. तसें न झालें तर 'विनाशकाले विपरति बुद्धि' असे ह्मणणें आह्मांला भाग पडेल.

*(गुरुवार, दि. २८ डिसेंबर १९२२)*

# येत्या कॉंग्रेसीसाठी (पूर्वसूचना)

१) आपली प्रोव्हिंसियल कांग्रेस कोणत्या महिन्यांत भरणार आहे हें सांगण्यास जरी योग्य आधार नाही, तरी पण यंदाच्या कोंग्रेसीत एका महत्त्वाच्या विषयाचा ऊहापोह होणार हें खास. हा विषय ह्मटला ह्मणजे 'गोरक्षण' हा होय.

गाई विषयी आपण पारमार्थिक दृष्टि बाजूला ठेवली, तरी पण व्यावहारिक दृष्ट्या हा विषय फारच महत्त्वाचा असल्यावरून त्याविषयी लिहिणें अप्रासंगिक नाही.

२) आपण आता सर्व तऱ्हेनें परस्वाधीन झालों आहो. आपल्या देशांत आपल्या उपजीविकेस पुरेसें अन्न नाही, वस्त्र नाही व लोकसंख्येच्या मानानें विचार केल्यास राहण्यास स्वतंत्र घरेसुद्धा नाहीतं अशी आपली सांपत्तिक स्थिती असतां प्रजासत्ताक राज्यांतील आपण स्वतंत्र ह्मणून मिरविणें शरमेंची गोष्ट आहे. करितां आपण स्वतंत्र होण्यास ज्या गोष्टींचा आपणास

पहिल्यांदा विचार करावयाचा असेल, तर तो आपल्या उपजीविकेचा प्रश्न सोडविणें होय. हा प्रश्न सुटल्याशिवाय आपल्या चळवळी, प्रगती व राजकीय घडामोडी कधीचं यशस्वी होणार नाहीत. करितां आपली स्थिति सुधारण्यास कोणता उपाय योजावा व त्यांत गाईचा किती उपयोग आहे याचा विचार करू.

३) आपल्याकडे पडीक जमीन, मुबलक पाणी पुष्कळ आहे. पण शेतांत काम करणारे लोक फारच कमी आहेत. ह्मणून त्या जमिनी पडिक राहिल्या आहेत. अशा जमिनींत निरुद्योगी सुशिक्षित तरुणांनी शेतीची वाढ करून आपल्या लोकांस आपल्या देशांत पुरेसें धान्य तयार केल्याशिवाय आपला तरणोपाय नाही.

बाहेरून तांदूळ येतो ह्मणून आपण पैसे जास्ती देऊनहि आपली दुपारची वेळ मारून नेतो. पण तिकडून निर्गत बंद झाल्यास आपली उपाशी मरण्याची पाळी येईल खास. यासाठी शेतीची वाढ करून आपली देशांतील भिकार स्थिती घालविली पाहिजे. इतकेंच नव्हे तर आपल्या देशांत आवश्यक कलाकौशल्य वाढविण्यास एक इंदस्त्रियल पेनिबँकेसारखी संस्था असणें योग्य आहे. याचे शेअर १ रुपयापासून असावे. आपली लोकसंख्या ५ लाख आहे. प्रत्येकाने एका रुपयांचा एक शेअर घेतल्यास पांच लाख रुपये भांडवल जमण्यास उशीर लागणार नाही. पैशांचा विनियोग मात्र आपल्या लोकांची सांपत्तिक स्थिती वाढवून कलाकौशल्यास मदत देण्यासाठीच झाला पाहिजे. याचा विचार कांग्रेस सारख्या संस्थेने हाती घेतल्यास फार चांगले व उपयुक्त कार्य होईल.

४) दुसरा जो विषय काँग्रेसीस्तांना सांगावासा वाटतो, तो गोव्यातील गोवधबंदीचा होय. लोकसंख्येच्या मानानें आपल्याकडे दुधातुपासाठी पुरेशा गाई नाहीत त्या नाहींत. पण शेतीसाठी सुद्धां गाई नसणें हें आमचें दुर्भाग्य होय. असें असतानां दिवसांतून केवळ जिव्हालौल्यासाठी २५ गाईंचा ह्मणजे वर्षातून ९० हजार गाईंचा वध जवळ जवळ आपल्याकडे होत असतो. हा वध बंद करणें देशोन्नतीच्या दृष्टीनें फारच श्रेयस्कर आहे. असा वध दिवसेंदिवस होत गेल्यास पुढें आपली स्थिती शोचनीय होईल यांत मुळींच संशय नाही.

याकरितां ही भावी आपत्ति दूर करण्यास योग्य उपाय योजिल्याशिवाय भागणार नाही.

५) पाश्चात देशांत मांसासाठी गाईला कधीच मारीत नाहींत. त्या कामी बैलांचा उपयोग करितात.याचें कारण गाईंपासून दूधही मिळतें व वंश वाढण्यास मदत होते. यासाठी इंग्लंड, फ्रान्स, स्पेन अमेरिका सारख्या सुधारलेल्या राष्ट्रांत तर गाईची जोपासना हिंदुस्थानापेक्षा जास्ती होत आहे. आपल्याकडे गाई फारच तर ५-७ शेर दूध देतात. पण युरोखंडांत बहुतेक देशांतून ५४-५६ शेर दूध देणाऱ्या गाई असल्यामुळें तिकडील लोकांस दूध दुभत्यास पंचाईत पडत नाही व त्यामुळेंच ते सशक्त असतात.

एकट्या स्वित्झर्लंड देशांत इतक्या गाई आहेत की, तेथील लोक गोदुग्धाच्या व्यापारावर कोट्याधीश झाले असून ते आपल्याकडील दूध सर्व देशांना पाठवूं लागले आहेत, नेसल्स, कोंदेसाद वगैरे डबे आपण वापरतांना पाहिजे ह्मणजे पुरे.

६) आतां हा होत असलेला वध आपणास कसा बंद करतां येईल याचा विचार करू. हा वध बंद करण्यास आपणास अनुभवशीर पुढाऱ्यांची जरुरी ज्या प्रमाणें आहे, त्याचप्रमाणे नि:स्वार्थी कळकळीवान प्रचारकांची आवश्यकता असून त्याकडून गोरक्षणाचें खरें महत्त्व लहान थोर लोकांस विशेषत: पटवून देतां आलें पाहिजे. त्यांच्याशी सहकारितां संभाळून त्यांची मांसभक्षणाची प्रवृत्ति पालटणे जरुर आहे. ठिकठिकाणच्या डाक्टरांचा गोमांसाविरुद्ध अभिप्राय घेऊन तो वृत्तपत्रांवर प्रसिद्ध केला पाहिजे.

आजचें युग जागृतीचें आहे. करितां सर्वांस कळतील अशा भाषांनी वेळोवेळी गोरक्षणांवर आपले विचार प्रगट केले पाहिजेत व अशा तऱ्हेनें लोकमत तयार करून सहकार्यतेनें हा हमेश होत असलेला गुरांचा संहार बंद करून शेती व व्यापार यांस गोरक्षणापासून किती फायदा आहे व आपल्या उन्नतीचें खरें मर्म हेंच आहे, हें ठिकठिककाणीं लोकमत जागृत करण्यासाठीं व्याख्यानाच्या रुपाने सर्वांस समजेल अशा कोंकणी भाषेत सांगितले पाहिजे. आपले हिंदुलोक गाईचें महत्त्व पूर्ण जाणतात व तिचें योग्य तऱ्हेनें पालन

करतात. पण ख्रिश्चन बंधूस मात्र हें अद्याप पटत नाही. ते त्यास उत्तम तऱ्हेंने पटवून या कार्यास त्यांची सहानुभूति मिळविली पाहिजे.

७) दुभत्या, विणाऱ्या व शेतकामाच्या उपयोगी पडणाऱ्या गाईंच्या संहारामुळें शेतीवर व दूधदूभत्याच्या पुरवठ्यावर होणारे दुष्परिणाम हिंदुप्रमाणें ख्रिश्चनासहि भोगावे लागतात. ते एकमेकांच्या साह्यानें त्या तऱ्हेनें सरकाराकडून कायदे पास करून, मुनिसिपालट्यांकडून प्रतिबंध करून हें कार्य यशस्वी करून घेतलं पाहिजे.

८) आपल्यांत ही तयारी झाल्यावर ताबडतोब हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांस कळवून त्यांकडून आपणांस साहाय्य मागवून तिकडून ज्या गाई इकडे मारण्यासाठी येतात त्यांचा बंद करण्याची खटपट करावीं इतकेंच नव्हें तर तिकडून मारण्यासाठी येणारे मुसलमान जे इकडे येतात त्यांनासुद्धा बंद करण्यांत येईल. चिकाटी, सहानुभूति व एकी मात्र पाहिजे. हें कार्य कॉंग्रेसीच्याद्वारें व्हावें अशी आमचीं कॉंग्रेसीस्तांजवळ नम्र विनंती आहे व त्यासाठी त्यांनी वर दिलेली कामें पहिल्यांदा हातांत घेतली पाहिजेत.

नुसत्या चटकदार मेमोरी प्रसिद्ध करून, व्याख्यानें देऊन, खुर्च्या अडवून व आपल्या सारख्या हलाख स्थितींत पैशांचा अनावश्यक वेंच करून विनाकारण वेळेचा व पैशाचा दुरुपयोग करणें योग्य नाही.

*(गुरुवार, दि. ८ फेब्रुवारी १९२३)*

# पांचवी प्रांतिक कॉंग्रेस

पूर्वी जाहिर केल्याप्रमाणें गेल्या ता. ११,१२ व १३ रोजी या कॉंग्रेसची अधिवेशनें पणजी मुनिसिपालटीच्या दिवाणखान्यांत 'येराल्दांचे' संपादक दो. कुन्ज यांच्या अध्यक्षतेखाली निर्विघ्नपणे पार पाडली. परिषदेच्या प्रथम दिवशींच्या अधिवेशनाला मामुलवहिवाटीला अनुसरुन ना. गव्हर्नर साहेब व इतर बडेबडे अधिकारी आपापल्या परिवारांसह हजर होते. ठिकठिकाणच्या प्रतिनिधींचे प्रमाण

जरी फार जास्ती नव्हतें, तरी अगदीं कमीहि पण नव्हतें. एकंदरींत पांचवी प्रांतिक कांग्रेस बाह्य दृष्टीनें प्रेक्षणीय झाली होती यांत संशय नाही.

अंतरंगाकडे दृष्टिकोण वळविल्यास कांग्रेसचें अस्तित्व प्रांतास लाभदायक झालेंच आहे किंवा या पुढें होईल या संबंधी मात्र मतभेद होण्याचा बराच संभव आहे. पोर्तुगालनें स्वीकारलेल्या 'हमकरेसो' धोरणामुळें जेथें खुद्ध लेझिस्लेतीव्ह कोंसेल्याच्या ठरावास बेमुर्वतखोरपणें धाब्यावर बसविण्यात येतें, लोक प्रतिनिधींच्या मताला थोडासासुद्धां मान देण्यांत येत नाही, त्यांचे ह्मणणें ऐकून घेणेसुद्धां महापातक गणलें जातें, तेथें कांग्रेससारख्या अर्धवट 'लोकसत्ताक' संस्थेच्या बरळण्याकडे कोण लक्ष देईल? जेथे धन्यालाच कोणी विचारीत नाही, तेथें चाकाराचा काय पाड?

असो. तात्पर्य ज्या स्थितींत व रीतींत सांप्रत कांग्रेस आपलें कार्य करीत आहे त्या स्थितींत व रीतींत राजकीय दृष्ट्या ती प्रांताला उपयुक्त होते किंवा होईल हा प्रश्नच आहे.

हा व इतर अनेक प्रश्न जर बाजूला ठेविले तर एक गोष्ट मात्र ठळकपणें नजरेस येते ती हीं की, कांग्रेसवर हिंदु समाजाचें वजन पडत चाललें आहे. थोड्यावर्षामागे ज्यांना कस्पटाचासुद्धां मान नव्हता, जेथें तेथें ख्रिस्ती समासजाकडून अनुवंशिक प्रवृत्तीमुळें ज्यांची अवहेलना होत होती, त्यांच्याच इच्छेसमोर त्या समाजाला मान वांकवावी लागली, हें गोहत्तेच्या प्रतिबंधास शक्य तितकी मदत करण्याचा ठराव एकमतानें कांग्रेसींत पास झाल्यानें, उघडपणें सिद्ध झाले. हा ठराव ह्मणजे हिंदूंचा विजयच होय. या विजयाची तेजस्विता वाढविण्याचा प्रयत्न हिंदुसमाज अधिकाधिक जोमानें कृतींत आणील अशी आशा केल्यास ती निरर्थक ठरेल असें वाटत नाही.

व्यापार व शेतकी यांच्या अभिवृद्धीला पोषक असे अनेक ठराव यंदां परिषदेंत पास झालें, हें फार उत्तम झालें, परंतु वास्को-द-गामाच्या शतसांवत्सरिक उत्सवाविषयी अध्यक्षांकडून करण्यांत आलेला उपक्रम मात्र आह्माला पसंत नाही. या उपक्रमाविरुद्ध तेथल्या तेथेंच निषेध व्यक्त व्हावयास पाहिजे होता.

वास्को द गामाचा काळाकुट्ट इतिहास, त्यानें हिंदूंवर केलेले अमानुष अत्याचार, हिंदूंची पूज्य देवालयें, हिंदूंचा पवित्र धर्म, हिंदूंचे नामांकित ग्रंथ इत्यादींची राखरांगोळी होण्याप्रीत्यर्थ त्यानें आचरलेल्या दुष्ट कृत्यांमुळे सरदहू शतसांवत्सरिक उत्सव भारतास कां मान्य नाहीं हे विशेष स्पष्ट रीतीनें सांगण्याचें कारण नाही. आमच्या दृष्टीनें वास्को-द गामाची किंमत एखाद्या दरोडेखोरांपेक्षां जास्ती ठरत नाही आणि उजळ माथ्यानें दरोडेखोरांचें उत्सव साजरे करण्याची जोपर्यंत अजून टूम आमलांत नाही, तो पर्यंत तरी वास्को द गामाच्या कसल्याहि उत्सवास हरकत घेणे 'भारत' आपलें कर्तव्य समजणार. मग या समजुतीमुळें त्याला कितीही लौकिक नुकसान सोसावें लागलें तरी हरकत नाही. असो.

कांग्रेसनिमित्त सिनेमा व मुलांचे खेळ दाखविण्याचा 'अजब तमाशा' करण्याचें कारण आह्मांस तरी निदान समजत नाही. 'अजब तमाशांनी' चित्तवृत्ति तल्लीन करून घेण्यासारखी देशाची खास मन: स्थिती नाही. सरकारी नोकर वेळेवर पगार मिळत नसल्यावरुन इतरेजन करांच्या मारानें हवादील झाल्यावरन दु:खांत होरपळत असतां, कांग्रेसला तमाशे आठवावेत, हें देशाचें दुर्दैव नव्हें तर काय?

सध्या कांग्रेससंबंधी लिहिलें तितकें पुरें आहे. त्यावरुन तिची, तिच्या धोरणाची व तिच्या चालकांची थोडीबहुत कल्पना वाचकांस होईलच. आमच्या मतें तिच्यांत कोणकोणत्या सुधारणा होणें जरुर आहेत हे सवडीनुसार लिहिण्याचें कबूल करुन वाचकांची सध्यां रजा घेतो.

*(गुरुवार, दि. २९ मार्च १९२३)*

# प्रागतिक संघाचें कार्य

कोणत्याहि सार्वजनिक संस्थेचा इतिहास पहा, तिच्या सुरुवातीला अडचणी ह्या ठेवलेल्याच. परंतु चिकाटीचीं माणसें असलीं ह्मणजे ती आपापले गैरसमज व मतभेद बाजूस सारुन त्या अडचणीस तोंड देऊन पुढील

कार्यास नव्या दमानें पुढें येतात. शुद्ध हेतु धरून काम करणारी माणसें असलीं ह्मणजे त्यांच्यासंबंधी, कितीही जरी गैरसमज प्रस्थापित केले तरी ते लवकरच नाहींसे होऊन त्यांच्या कार्याविषयी बहुजनसमाजाची सहानुभूति द्विगुणित होते. प्रागतिकसंघासारख्या मुख्यत्वें करून राजकीय उन्नतीसाठी स्थापन केलेल्या संस्थेविषयीं गैरसमज उत्पन्न झाल्यास नवल ते काय? ज्या ठिकाणी बहुजनसमाज स्वतंत्र बाण्यानें वावरण्यास शिकलेला नाही, किंबहुना ज्याचे विचारस्वातंत्र्य, कोणत्याहि कारणामुळें ह्मणा, काहीं विशेष व्यक्तींच्या स्वाधीन आहे, अशा ठिकाणीं नानातऱ्हेचे गैरसमज, जाणून बुजून अर्थविपर्यास व हेतुविपर्यास हें व्हावयाचेच. तशांत कार्य करण्याचा पहिला जोम मंदावला ह्मणजे गप्पीदास लोकांना चांगलेच फावतें. परंतु सुदैवानें असें ह्मणण्यास प्रत्यवास दिसत नाही, की प्रागतिक संघाचें कांही जणांच्या ह्मणण्याप्रमाणें पेंड खात पडलेलें घोडें आतां पुढें दामटण्यांत येत असून, ताज्या दमानें ते पुढील मुक्कामास जात आहे. गेल्या २४ तारखेस मडगांव येथे भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या व इतर सल्लागार मंडळीच्या बैठकींत असें ठरलें, कीं येत्या मे महिन्याच्या ५/६ तारखेस फोंडें महालांत प्रागतिक परिषद भरविण्यांत यावी. स्थळ मग पाहून ठरविण्यांत येणार असून सर्व सभासदांना निमंत्रण पत्रिका जाणार आहेत. परिषदेंत चर्चेस येणाऱ्या विषयांपैकी संघाच्या घटनेची पुनःरचना कार्यकारी मंडळाची निवडणूक व राजकीय निवडणुकींतील मताधिकारी हे होत. हा शेवटचा विषय फारच महत्त्वाचा आहे. गोमंतकांतील अर्धी प्रजा हिंदु असून बहुतेक साक्षर अशी आहे. परंतु पुष्कळजणांना पोर्तुगीज माहित नसून मराठी भाषा अवगत आहे. अशांना मतदार होण्याचा जो पूर्वी हक्क होता तो अलीकडील कायद्यांतून हद्दपार केला आहे, व त्यासंबंधी यत्किंचितीही चळवळ आमच्या पार्लमेंटांत प्रतिनिधींकडून झालेली नाही, ही गोष्ट सर्वांच्याच माहितीची आहे. आमच्या लेजिस्लेतीव कौंसिलचे मेंबर ना. दो. व्यंकटेशराव देसाई यांनी या संबंधी कौंसिलात ठराव आणून तो इकडे पासहि करून घेतला. पण त्याची अंमलबजावणी करण्याचा अधिकार वरिष्ठ सरकारकडे असल्यामुळें तेथपर्यंत आमच्या विनंतीची दाद लावण्याविषयी सनदशीन चळवळी करण्याचें प्रागतिक संघानें आपल्या शिरावर घेतलें आहे.

प्रागतिक संघाचा जन्म फोडें महालांत झाला व तेथेंच प्रागतिक परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचा योगायोग जुळून येत आहे हें त्या प्रांताचें महाभाग्यच होय.

संघाचा हेतु लक्षांत आणून जर संघाच्या सभासदानांनी आणखी सभासद मिळवून दिले व अशा प्रकारें येथील सुशिक्षित वर्गाची सहानुभूति संघाकडे वळविली, तर पुष्कळच कार्य होण्यासारखे आहे. प्रागतिक संघ ही एक राजकीय शक्ती आहे व ह्या शक्तीचा योग्य उपयोग करून घेणें हें येथील सुशिक्षित वर्गाचें कर्तव्य आहे. ही शक्ती लहानसहान नसून पुढें मागें गोमांतकांतील हिंदूंच्या राजकारणांत तिला बरेंच महत्त्व येणार आहे, असें मागच्या दोन निवडणूकींत संघानें भाग घेतला त्यावरुन जनतेच्या नजरेस आलेंच आहे. प्रत्यक्ष फळ असें एकदम हाती येईल असें आजच कोणासहि सांगतां येणार नाही. परंतु शुद्ध हेतुपुर्वक फळाशा न धरतां – कर्तव्यकर्म करणें प्रत्येकाच्या हातचें आहे हें विशेष सांगणे नकोच.

*(गुरुवार, दि. ५ एप्रिल १९२३)*

# उठा! जागे व्हा!

कालाच्या चक्रगतीप्रमाणें देशांतील लोकांची सत्ता आणि धर्म यांच्यांत क्रांती घडावयाची ती घडणारच. कोणत्या तरी एका राष्ट्राच्या सत्तेखालीं दुसऱ्या राष्ट्रानें राहावयाचे. एकानें दुसऱ्याला जिंकून सत्तेखाली आणावयाचें. अशा घडामोडी जगांत नेहमी चालत असतात, परंतु होईल ते होईल, ह्मणून भवितव्याकडे बोट दाखवितां कामा नये. प्राप्त झालेल्या आपत्तीतून स्वसत्ता व स्वधर्म याचें शक्य त्याप्रकारें संरक्षण करून देशाची इभ्रत कायम राखणें प्रत्येक रहिवाशाचें कर्तव्य आहे. आपल्या शूर पूर्वजांनी समशेरींच्या धारांखाली स्वतांच्या गर्दना घुसडून रक्तमांसाच्या नद्या यासाठींच वाहविल्या आहेत.

सांप्रतकाळी देखील तसाच कठीण प्रसंग असल्यानें आपण आपल्या पूर्वजांचें परिस्थितीनुसार अनुकरण करणे जरूर आहे. आणि या पूर्वीच तें केलें असतें तर आमचा देश जुलमीं राज्यकर्त्यांच्या अंमलांतून केव्हांच स्वतंत्र झाला असता. परंतु हें अनुमान 'आतेला मिशा आल्या असत्या तर तिचा काका झाला असता' या दरांत गणलें जातें! अशी स्थिती महाराष्ट्रांत निदान गोव्यांत तरी, खचित आहे. कारण आमच्या शूर पूर्वजांचा अभिमान आमच्यात आहे कुठे?

हिंदुसमाजाची आजची बेकी व दु:स्थिति आणि आमचेवर राज्य चालवणाऱ्या राज्यकार्य धुरंधरांची राज्यपद्धति या गोष्टी लक्षांत घेतां आह्मांस मेंढरांची उपमा योजिली गेल्यास तिला आह्मी अगदींच अपात्र ठरतों असें नाही!

गोव्यात पोर्तुगीज लोकांचा अंमल सुरू झाल्यापासून तो आजपर्यंत त्यांनी काय काय केलें आहे? कदाचित कांही केलें असलें तरी पोर्तुगीजांनी गोमांतकांत जी दिवाळखोरी चालविली व आतां चालवीत आहेत त्या मानानें तें करणें कांहीच नाही. अर्थांत गरीब रयतेच्या जिवावर ही दिवाळखोरी त्यांनी चालविली असून ती गोमांतकस्थांच्या चळवळीत कांही जीव नाही, तिला सधन लोकांचे पाठबळ नाही, ह्मणून चालली आहे. वास्तविक सधन, बुद्धिवान, विद्वान, मुत्सद्दी लोकांचा भरणा व ठिकाणीं कमी आहे असें मुळीचं नाहीं. परंतु बहुतेकांनी चळवळीच्या बाबतींत संन्यस्त वृत्ति धारण केल्यानें सगळें असून नसल्याप्रमाणेंच आहे.

राज्यव्यवस्थेसाठी नेमलेल्या कामदारांची वेतनें नियमित चालण्याकरतां सरकारनें रयतेकडून करभार घेणें वावगें नव्हें. तो घेतला पाहिजे हें खरें. पण त्यालाही मर्यादा ह्मणून आहे. ऊस गोड लागला ह्मणून मुळासकट खाण्यांत शहाणपणा नाही!

अनेक अव्यवहार्य रीतीनें पैसे उकळले जातात. आणि त्यांचा सद्व्य आमचें पोर्तुगीज सरकार तितक्याच मुत्सद्दीपणाननें करतें. एखादा कामदार कामावर असतां त्यास मिळणाऱ्या पगाराच्या दीड किंवा दोन पटीनें, तो

रिकामा होऊन घरी ‘विठ्ठल, विठ्ठल’ ह्मणत बसल्यावर त्याला पेन्शन! हें सरकारी औदार्य अचाट तर खरेंच पण या मांजराच्या खेळण्याचें उंदराचा जीव जातो!

कर बसवून त्याचा खर्च करण्याच्या चतुराईबद्दल पोट दाबून हंसूं येतें व ते कर सालोसाल फारीक करण्याचे त्राण हलाख होऊं लागलेल्या प्रजेंत दिवसेंदिवस नाही. यामुळें तिच्या पोटास चिमटा बसतो याचें दुःख वाटतें. त्याची क्षिती वाटत नाही. अशा निवडक धनकनकसंपन्नांची गोष्ट निराळी. पण इतरांनी हे सगळे माकडखेळ पाहून स्वस्थ असावे, ही त्याहूनहि दुःखाची गोष्ट आहे.

यावरून सगळी गोमांतकस्थ मंडळी याकामीं चळवळ करीत नसल्याने नालायक आहे, असें ह्मणणें नाही. गोव्यांत चळवळ आहे. पण लेख लिहिणें आणि व्याख्यानें देणें या पलीकडे त्या चळवळीचें क्षेत्र असहकारापर्यंत गेलें नाही. ह्मणजे तितका जोमदारपणाच आमच्यात नाही. आणि थोडीबहुत हालचाल करू लागलेल्या पुढाऱ्यास तोंडघशी पाडणार. ह्मणून सर्व स्वदेशबंधुभगिनींना आग्रहाची विनंती आहे की :-

उठा! जागे व्हा!

*(गुरुवार, दि. २४ मे १९२३)*

# भगवंताचे अधिष्ठान

पाश्चात्य राष्ट्रांचे वैभव, सामर्थ्य आणि ऐश्वर्य ही अवलोकन केली ह्मणजे कोणाहि हिंदी मनुष्यास आपला देश त्यांच्याच प्रमाणें वैभवशाली आणि सामर्थ्यवान व्हावा असें वाटणें साहजिकच आहे. सामर्थ्य असल्यावरच, राष्ट्राला वैभव प्राप्त झाल्यानंतरच राष्ट्र समर्थ राखतां येते. पण या गोष्टी राष्ट्र स्वतंत्र झाल्यानंतरच्या आहेत. पाश्चात्य राष्ट्रें स्वतंत्र झाली ह्मणूनच त्यांना आपलें वैभव आणि सामर्थ्य वाढविणें शक्य झालें. हिंदी लोक पारतंत्र्यात

खितपत पडलेलें आहेत. त्यांचे राष्ट्र स्वतंत्र केव्हा होईल, आणि तें स्वतंत्र होण्याकरिता त्याने काय काय करावयाचें आहे हा आज त्यांच्या समोर प्रश्न आहे. स्वतंत्र होतील, तेव्हाच मग आपलें राष्ट्र ते सामर्थ्यवान आणि वैभवशाली करून सोडतील. सध्या गोव्यास मिळालेलें नावांचें स्वातंत्र्यहि उपभोगावयाचें नाही. ज्या राष्ट्रास स्वातंत्र्याचें सुख लाभूनहि सुखाचें स्वातंत्र्य नाही, त्या राष्ट्राची गणना स्वतंत्र राष्ट्रांत करतां येईल काय? आह्मी आज ताळतंत्र नसलेलें स्वातंत्र्य उपभोगीत आहोत. करील त्याचा कारभार आणि मारील त्याची तलवार अशा प्रकारचा अनुभव आह्मां दैवहीन स्वतंत्र नागरिकांना येत आहे! इकडच्या कांही बेमुर्वतखोर लोकांची दांडगाई पाहिली ह्मणजे स्वातंत्र्याची मर्यादाच कळत नाही! इकडच्या बेजबाबदार आणि आशाळभूत नामदारांची कृत्यें पाहिलीं ह्मणजे स्वातंत्र्याचा अर्थच समजत नाही! नाम धारण करण्याच्या पूर्वी हे सरकारला चांगला हात दाखवितील असें वाटतें. आणि नंतर! बिचाऱ्या लोकांना ना मदार (मुख्या आधार) होऊन जाते. कोणत्याहि बिकट परिस्थितीच्यावेळीं आमचा सगळा आधार हे. पण स्वत:चा खाजगी फायदा हो असल्यास गरीब जनतेला तोंडघशी पाडण्यास ते सहसा कचरत नसतात. आज पहा. अगडबंब पगारवाढ, जबरदस्त कर लादणें वगैरे ह्यांच्या अनुमतीशिवाय होणें शक्य आहे काय? पुष्कळशा लोकांनी अर्ध्यापोटी राहावें आणि ठळक मंडळींने त्यांचा बिचाऱ्यांचा पैसा घेऊन चैन उडवावी! अशा प्रकारच्या अन्याय्य गोष्टी ह्यांच्या मदतीशिवाय होत असतील काय? आमचे नामदार असल्या गोष्टींस अनुमोदन देतात ह्मणजे काय? स्वतंत्र जनतेचे हे प्रतिनिधी जनतेच्या स्वातंत्र्याला मान खाली घालविण्यांस कां लावतात? यावरुन यांना स्वातंत्र्याची योग्यता समजत नाही कीं स्वातंत्र्याची गरज नाही? अशा प्रकारें स्वातंत्र्याची इभ्रत घालविणारे प्रतिनिधी ज्या राष्ट्रांत सुखानें नांदतात तें राष्ट्र स्वतंत्र कसलें? आह्मांला खऱ्या खुऱ्या स्वातंत्र्याची गरज आहे. आणि हें स्वातंत्र्य योग्य मोबदला दिल्याशिवायहि मिळणें केव्हांच शक्य नाही. जें राष्ट्र स्वतंत्र नाही, तें मृतराष्ट्रच होय. मृतराष्ट्रांतील कोणत्यहि उत्तम प्रकारच्या गोष्टी केव्हाहि कमी दर्जाच्या ठरतात. आमची गिर्वाण भाषा, आमचें तत्त्वज्ञान, आमची साधी आणि सरळ राहाणी पण उच्च प्रकारची

विचारसरणी, आमचा सनातन धर्म वगैरेंचा आज योग्य आदर राखला जातो काय? नाही. कारण ह्या सगळ्या गोष्टी जीत लोकांच्या, नाही तर, जेते लोक पहा! त्यांचा वर्ण सुरेख. त्याचा समाज पुढारलेला. त्यांचा धर्म अद्वितीय. त्यांची संस्कृति अप्रतिम. त्याचें सगळें कांही दुसऱ्या कुणालाच बरोबरी न करतांयेण्यासारखे हिंदुस्थानांतील कोणत्याहि उत्तम प्रकारच्या वस्तुबद्दल ते कसें वेडेवाकडें मत देत असतात! अजून ते अभिमानपूर्वक असें सांगतात, कीं जगांत त्यांचा अवतार इतर राष्ट्रांवर राज्य करण्याकरिता! सत्तेच्या बळावर ते आज काहीही बरळत असले तरी तें आज त्यांना शोभत आहे. आतां एवढें खरें की पाश्चात राष्ट्रे आहेत. ह्मणूनच सगळ्या जगावर त्यांची सत्ता चालत आहे.

राष्ट्रांत नांदणारी एकी हा राष्ट्राचा जीव होय. ती एकी मग कोणत्याहि भावनेच्या बळावर उभारलेली असो. पाश्चात लोकांच्या राष्ट्रीय भावनेविषयीं जितका आदरभाव आहे तितका त्यांचा देवाधर्माविषयीसुद्धां नाही. त्यांची धार्मिक भावना इतकी कांही नाजूक असते, की ते पाहिजे तेव्हां पाहिजे त्या धार्मिक पंथांत घुसत असतात. आज थिआसोफी, तर उद्यां ब्रॅडलॉ. आज कॅथलिक, तर उद्या त्या बलदंड नित्शेचा. हे त्यांचे फरक तत्त्ववादकरिता. समाजांतील रागरंग पाहून विशेषत: संपादण्याकरतां. पण त्यांची राष्ट्रीय भावना मात्र फार तीव्र आणि जोरदार असते. राष्ट्रीय भावनेच्या बळावरच त्यांची आज एकी नांदत आहे. हिंदुस्थानांतील लोकांची राष्ट्रीय भावना मात्र अगदींच कमी दर्जाची आहे. राष्ट्राचें हित हिंदूकडून मनोभावानें सांभाळले जात नाहीं आपल्या देशांत उत्पन्न होणाऱ्या वस्तूंवरच आपल्या गरजा भागवून घेणें आह्माला समजत नाही. आपल्या कांही विशिष्ट चालीरीती किंवा देशांतील पद्धती कायम राखणें आमच्या हातून होत नाही. प्रत्येक राष्ट्राला स्वत:चा ह्मणून एक निराळा राष्ट्रधर्म असतो. त्या राष्ट्रधर्मानुसार राष्ट्राला आपलें आचरण ठेवावें लागतें. तसें आचरण न ठेवलें तर राष्ट्रांत जोम राहात नाही. आणि राष्ट्रांत जोम नसल्यावर पाहिजे त्यानें येऊन पाहिजें तें लुटावें. आज पहा इंग्लंड, अमेरिका, चीन जपान वगैरे राष्ट्रें आह्माला निरर्थक वस्तु देऊन, आह्मांकडून अलोट पैसा नेत आहेत. हे

आह्मी जाणत असतांहि आमच्यानें त्या वस्तूंचा मोह सोडवत नाही. लहान मुलांकरिता खेळणीं पाठवून हिंदुस्थानांतून ते लाखो पैसा नेत आहेत, नाना प्रकारच्या फॅशनेबल वस्तु पाठवून इंग्लंड, अमेरिका वगैरे कोट्यावधी पैसे लुटीत आहेत. कॅनेडा, आस्ट्रेलिया वगैरे वसाहतींच्या ठिकाणी हिंदी लोकांना ते अगदीं वाईट रीतीनें वागवितात. कोणत्याच प्रकारचे हक्क देण्यास तयार नाहींत. पण आपले वर्तन त्यांच्याकडे पहा. आपण त्यांच्या वस्तू फार फार उत्सुकतेनें घेतो. अमुक जातीच्या कपड्यांचा पोषाख वापरणें सभ्यपणाचें. अमुक अमुक वस्तु नित्य अंगावर राखणें मोठेपणाचे. पण आमचा सभ्यपणा आणि मोठेपणा मँचेस्टरवाल्यांवरच अवलंबून आहे. उद्या जर ते कपडे वगैरे पाठविण्याचें बंद करतील, तर मग आमचा सभ्यपणा आणि मोठेपणा कांबळीत जाऊन दडून बसेल. महात्मा गांधीजींनी निरर्थक गोष्टींकरिता खर्च होऊन परदेशांत जाणारा पैसा इथेंच राहावा ह्मणून शिकस्त करून पाहिली, पण व्यर्थ! हें राष्ट्रधर्माच्या दृष्टीनें झालें. पण साधारण व्यावहारिक न्याय पाहायला गेलो तर ते जसे नजरेनें आमच्याकडे पहातात त्याचप्रमाणें आह्मी त्यांच्याशीं वागयला नको काय? पण आमचें अडतें इथेंच. आमच्यांत एकी नाही. आह्मी सगळी लाज सोडलेली. नाहीतर पाश्चात्य लोकांकडे पहा! ते लोक मनाचें इतके खंबीर, की त्यांची स्वत:ची कितीही वाईट वस्तु असूं दे. ती तीच विकत घेऊन जास्ती सुधारण्याच्या खटपटीत लागतील. आमचें तसें नाही. आह्माला खादी फार नाजूक आणि बारीक पाहिजे आहे. हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या वस्तू जर स्वस्त आणि देखण्या असतील तरच आह्मी विकत घेऊं! हिंदुस्थानांत तयार होणारा जाडाभरडा कपडा जर आह्मी आज वापरू तरच आह्मांला तो खपल्यानंतर जास्ती चांगला तयार करून वापरावयास मिळेल. हिंदुस्थानांत उत्पन्न होणाऱ्या वस्तूंवरच निर्वाह करण्याचें जर आह्मी ठरवूं, तरच नवीन नवीन चांगल्या चांगल्या वस्तु येथें निर्माण होतील. न समजल्या मुळेंच हें आमचें असें झालें. असं जर तुह्मांला आज कळून चुकलें आहे, तर पुढें तरी शहाणपणानें वागा. हिंदी लोकांनो! तुमच्या राष्ट्रानें उच्च स्थान पटकावावें असें तुह्मांला वाटत आहेना? तुह्मांला स्वातंत्र्याच्या सुखात डुलते रहावें असें वाटते ना? मोठ्या मोठ्या पुढारलेल्या

राष्ट्रांशी बरोबरीनें रहावें असें वाटतें ना? मग, नानाप्रकारच्या विलासांत दंग राहून तप न आचारल्याशिवाय आपलें ध्येय गांठतां येईल कांय? केव्हांच नाही. उलट पहा, ज्या राष्ट्रांतील लोकांना धर्माकरिता फकीर बनणें अवघड जात नाही. त्या राष्ट्रांतील लोकांना राष्ट्रकरिता फकिर वृत्ति धारण करणें कठीण जातें, यांत कांहीतरी गोम आहे. आह्मीं हिंदी लोक धर्माकरिता सगळें सांभाळूं. आह्मी धर्माकरिता प्राण देऊं. आह्मी धर्माकरितां स्वार्थत्याग करूं. तेव्हां धार्मिक भावनेच्या बळावरच एकीची इमारत उभारतां येईल. मग त्या इमारतीला स्वातंत्र्याचा कळस सहजच लावतां येईल. शिवाजी महाराजांनी धर्माकरितांच स्वराज्याची स्थापना केली. पूर्वी जनकादि राजें सुद्धां धर्मनिष्ठ ब्राह्मण वर्गाच्या आज्ञेनुसारच वागत असत. एकूण हिंदुस्थानचा इतिहास पाहातां धर्मालाच उच्च स्थान मिळत आलें आहे.

धर्माला उच्च स्थान दिल्याबरोबर हल्लीं सुधारणेंचें वारें लागलेल्या तरुणांस चीड येणें संभवनीय आहे. नवीन पद्धतीनें वागून आलेल्या तरुणांस धार्मिक विधीकरीता लागणारी उपकरणें गोळा करण्याचा प्रसंग आला तर घात होईल! पळीपंचपात्र घेऊन घंटा नाद करण्याचे ते दिवस गेले! अंग उघडें घालून, भस्माचे पट्टे ओढून धातूच्या मूर्तींसमोर देवाला आळवित धरणें धरून बसणें एखाद्या चांगल्या हुद्देदारास शाभेल काय? पैसे किंवा नाना प्रकारच्या वस्तूंची उपकरणें घेऊन जबरदस्त वशिल्याचा घंटानाद करीत एखाद्या वरिष्ठाला आळवित तिथें धरणें धरून बसण्यात भूषण आणि फायदा आहे! असो आह्मांस जी धार्मिक भावना जागृत करावयाची आहे, ती राष्ट्राला चांगलें दिवस यावेत ह्मणून. राष्ट्र नुस्तें स्वतंत्र होऊन चालत नाही. राष्ट्र धर्मशील, नीतिमान झाले पाहिजें भगवंताच्या अधिष्ठानावांचून खरी धर्मजागृती होणें शक्य नाही. ह्मणूनच भगवंताच्या अधिष्ठानाची आह्माला गरज आहे. पहा. राष्ट्र वैभवशील आणि सामर्थ्यवान होण्याकरितां स्वातंत्र्याची गरज. स्वतंत्रता एकीशिवाय मिळणे अशक्य. हिंदुस्थानांत धार्मिक भावनेच्या बळावरच अखंड एकी उभारणें इष्ट. धार्मिक भावना जागृत करण्याकरीता भगवंताच्या अधिष्ठानाची गरज.

*(गुरुवार, दि. १२ जुलै १९२३)*

# आमचें कर्तव्य

## लेखांक १

''ज्याची वर्तमानस्थिती अत्यंत खेदजनक आहे, आणि ज्याचें नजिकचें भविष्य आशाजनक नाही, अशा प्रकारचा जगामध्यें फक्त आपलाच देश आहे. ह्मणून आपल्या देशांतील तरुणांनी आपल्या मातृभूमीकरीता कोणत्याही देशांतील तरुणांपेक्षा विशेष स्वार्थत्याग केला पाहिजे.''

***– प. वा. नामदार गोखले.***

जगामधील सर्व राष्ट्रांमध्ये पुढें पुढें येण्याची धडपड चाललेली आहे. पाश्चात्य लोक आपला देश व समाज यांविषयींची कर्तव्यें योग्यरीतीनें बजावीत असून आपल्या देशाचें स्वातंत्र्य कायम राखण्याकरीता स्वार्थत्यागपूर्वक अविश्रांत श्रम करीत आहेत. अमेरिकेंतील निग्रो लोकसुद्धां योग्य कर्तव्य करून जगांत पुढें येत आहेत.

आमचे ब्रिटिश हिंदुस्थानांतील बांधव, ज्यांशी आमचें संबंध बहुतेक बाबतीत निगडीत झालेलें आहेत व ते जारीनें स्वार्थत्यागपूर्वक आपले कर्तव्य बजावीत असून आपल्या देशात उन्नतावस्थेप्रत नेत आहेत. हाजारों लोकांनी आपल्या घरादारांवर तिलांजली देऊन देशकार्यार्थ वाहून घेतलें आहे. तसेंच किती तरी तरुणांनी समाजसेवा संस्था काढून तनमनधन सत्यकार्यार्थ अर्पण केलेलें दिसत आहे आणि यामुळेंच, त्यांचा भविष्यकाल उज्ज्वल होण्याचा फार संभव आहे यांत बिलकूल शंका नाही.

पण आपला गोमांतकदेश फार कालापासून पारतंत्र्यांत अडकल्यामुळें लोकांना स्वकर्तव्यांचा विसर पडत चाललेला आहे. त्यांत आपला हिंदु समाज तर अत्यंत अवनतस्थितीत आहे. पूर्वजांनी मिळवून ठेविलेल्या इस्टेटीवर खाऊन पिऊन मस्त चैन मारावी, एखादी नोकरी किंवा धंदा करून पोट भरावें यांपेक्षा आपल्या देशांकरीता करावयाचें काही तरी श्रेष्ठ कर्तव्य आहे, ही भावना नष्ट झालेली आहे. आह्मा हिंदु लोकांच्या अंगी स्वाभिमान

नाही. स्वार्थत्याग करण्याची इच्छा नाही, देशाकरिता, तसेच समाजाकरिता वाहून घेण्याची तयारी नाही. यामुळें चारचौघांनी मिळून चालविलेली व मतभेद नसलेली अशी संस्था दिसत नाही. जिकडे पहावे तिकडे पक्षभेद व मतभेद दृष्टीस पडतात, प्रस्तुत काली खऱ्या लोकोपयुक्त अशा संस्थांना देणग्या देण्याची लोकांची प्रवृत्ति नसून त्यांजकडून अपात्री व क्वचित कृपात्रीही दान होत आहे. बोलक्या माणसांचा सुकाळ झालेला आहे, परंतु कर्तृत्ववान माणसें नाहीतच असें ह्मटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. एखादी संस्था काढून थोडें दिवस होतात न होतात तोच सभासदांचा उत्साह मावळूं लागतो. कांही संस्थांमध्ये तीव्र मतभेदांस सुरुवात होऊन सर्वच बाजार आटोपतो.

स्वामी विवेकानंदांनी एके ठिकाणी असें लिहिले आहे, कीं कोणत्याहि देशाची किती उन्नति झाली आहे हें पाहण्यास त्या देशांमधील लोकांनी चालविलेल्या दैनिक वर्तमानपत्रांची संख्या पहावी. ह्या दृष्टीने पाहूं गेल्यास आह्मी हिंदू लोकांचे एक सुद्धा दैनिक वर्तमानपत्र नाही, ह्यावरुन आह्मी हिंदू लोक किती अवनत स्थितिमध्यें आहो याची कल्पना येईल.

त्यांतल्या त्यांत थोडी आनंदाची गोष्ट ही, की हिंदुस्थानांतील विशेषत: महाराष्ट्रातील चळवळींचा परिणाम आह्मा गोमंतकीय हिंदू लोकांवर झाल्यानें आपणही आपल्या देशाकरीतां काही तरी केलें पाहिजे, याची जाणीव आह्मांमध्ये होऊ लागली आहे, आणि त्याप्रमाणें काही संस्था निघून आपलें कर्तव्य बजावीत आहेत. परंतु हे काम इतकें रेंगाळत व अल्प प्रमाणांत चाललें आहे, की त्यावरुनही आमच्या निकृष्टावस्थेची बरोबर कल्पना येईल.

अशा वेळी पाश्चात्य लोक तसेंच हिंदुस्थानांतील लोक आपल्या देशाकरीतां कसा स्वार्थत्याग करीत आहेत. त्यांचें समाजसेवेचें प्रयत्न कसकसें होत आहेत, तिकडील लोकांत उपयुक्त संस्थांना देणग्या देण्याची प्रवृत्ति कशी आहे, एकंदरीत ते लोक आपल्या देशाच्या उन्नतिकरितां कसकसें प्रयत्न करीत आहेत, त्यांची उदाहरणें आपल्या डोळ्यांसमोर आणून त्यांचें पुन:पुन: मनन केल्यास, आपल्या कार्यास विशेष चालना मिळून त्याला एक प्रकारचा जोर येईल. ह्मणून अशा प्रकारची माहिती देऊन आपण आपल्या ह्या प्रिय

गोमांतकाकरितां कार्य केलें पाहिजे, याचें थोडे दिग्दर्शन या लेखांत करण्यांचें योजिलें आहे. उदाहरणें जरी बहुतेक वाचकांच्या वाचण्यांत आलेलीं अशी असली, तरी वारंवार आपल्या दृष्टीसमोर आल्यास, त्यापासून तोटा न होतां उलट फायदाच होईल.

देशसेवा करण्यास सरसारवलेल्या प्रत्येक माणसाच्या अंगी जरुर असणारें गुण ह्मटलें ह्मणजे जाज्वल्य देशाभिमान, स्वार्थत्याग, लोकोत्तर कर्तव्यनिष्ठा, समाजसेवाविषयक प्रेम आणि शिस्त हे होत. आपल्या देशाकरिता काय वाटेल ते करू, पण देशकार्यापासून च्युत होणार नाही, ही भावना जागृत असली पाहिजे.

पाश्चात्य लोकांत असें गुण असल्यामुळेंच, ती राष्ट्रें स्वत:ची राज्यें चालवून, शिवाय दुसऱ्यांवरही राज्यें करीत आहेत. देशाकरितां होणारा त्यांचा स्वार्थत्याग, लोकात्तर असल्यानें हे लोक आपल्या सर्वस्वावर पाणी सोडतील, परंतु स्वातंत्र्य गमावणार नाहीत, तसेंच समाजसेवेचें त्यांचे प्रेम अलोट आहे. प्रत्येक राष्ट्रामध्यें भूतदयाप्रेरित कामें त्यांनी केलेली आहेत. त्यांची कर्तव्यनिष्ठा जाज्वल्य आहे. अशा प्रकारचीं उदाहरणें निरंतर डोळ्यांपुढे ठेवूनच, आपण कामास लागलें पाहिजें, ह्मणजेंच आपला देश उच्चपदाला पोहोचणार आहे.

प्रथमत: पाश्चात्य देशांत देशाकरितां व समाजाकरीता कसकसें प्रयत्न होत आहेत हें पाहू. या बाबतीत सुप्रसिद्ध लेखक सेंट निहालसिंग यांचें 'युद्ध आणि ब्रिटिश जातीची लायकी' या विषयावरील लेख वाचनीय आहेत. महायुद्धांत जय मिळविण्याकरीता इंग्लंडमधील मजुरांपासून श्रीमंतांपर्यंत सर्व लोकांनी आपली चैन वगैरे सोडून देऊन आपल्या देशाचे स्वातंत्र्य कायम राखण्याकरीता, कमालीचा स्वार्थत्याग केला. युद्धास सुरुवात झाल्याबरोबर मताभिलाषी बायांनी फर्मान काढून आली चळवळ बंद ठेवली, कारण कीं या अंतस्थ चळवळीपासून सरकारला त्रास पोचून युद्धकार्यात कमतरता पडूं नये. काही बायांनी तर सरकारास जरुर ती मदतही केली. राष्ट्रकार्याकरीतां आपलें सर्वस्व अर्पण करणाऱ्या या लोकांपासून आपण पुष्कळ शिकण्यासारखें आहे.

सेंट निहालसिंग ह्मणतात :- 'मी या बाबतीत प्रत्यक्ष पाहिलेले उदाहरण देत आहे. एक मनुष्य बायोस्कोप खेळांत विदूषकाचें काम करीत असे. त्याचें मूळचें नांव इब्रास असें असून हास्यरसोत्पादक कामें फारच उत्कृष्ट करीत असल्यानें लोक त्याला पिंपळ असें विनोदानें ह्मणत. युद्धापूर्वी याची कामें मी पुष्कळ वेळां पाहिली आहेत. पुढें युद्ध सुरू झाल्यानंतर कांही महिन्यांनी मी त्याचा खेळ पाहण्याकरीता गेलो असतां, त्याच्या शरीराकडें पाहून मला फार आश्चर्य वाटलें. त्याचें शरीर पूर्वीप्रमाणे अशक्त नसून फारच पुष्ट झालेलें होतें. त्यांस विचारतां त्यानें सांगितलें, की आपण मातृभूमीच्या सेवेसाठी आठवड्याला ७५० रुपयांवर लाथ मारलेली आहे. आपल्याला पलटणमध्यें फारच थोडें वेतन मिळत असून शिवाय पुष्कळ त्रासही भोगावा लागत आहे, तरी पण हे सर्व मी मातृभूमीच्या सेवेसाठी करीत आहे.'

अशा प्रकारें, महायुद्धाच्या वेळी मोठमोठ्या लोकांनी आपल्या दांडग्या उत्पन्नावर लाथ मारून, आपल्या देशांकरीता शिपाईगिरीची कामें केलेलीं आहेत. मोठमोठ्या अमीर उमरावांनीसुद्धा फलटनमध्यें शिरुन, आपल्या मातृभूमीची सेवा केली आहे.

ब्रिटिश सरकारनें महायुद्ध सुरू झाल्याबरोबर सव्वा अब्ज रुपये मागितले असतां, लोकांनी अगदी थोड्या मुदतीत मागणीपेक्षां जास्त रक्कम देऊन सरकारची चिंता दूर केली.

पुष्कळ स्त्रियांनी तर या कामी योग्य कर्तव्य बजावलें आहे. घायाळ सैनिकांकरीता खाद्यपदार्थ कपडेलत्ते वगैरे दिलेले असून, पुष्कळांनी 'रेडक्रॉस' सोसायटींत शिरुन सैनिकांची शूश्रूषा केलेली आहे. ह्या अल्प, उच्च दर्जाच्या स्वार्थत्यागामुळेच तो देश युद्धांत पूर्ण विजयी होऊन स्वातंत्र्योपभोग घेत आहे. ह्या लोकांचे उदाहरणे आपल्या लोकांनी सदैव डोळ्यासमोर ठेविलें पाहिजे.

मोगल बादशाहांच्या वेळी जे पाश्चात्य लोक इकडें आले व प्रसंगविशेषी बादशहाकडून देणग्या मिळायाचा योग आला, त्या त्या वेळी स्वत:चा फायदा बाजूला ठेवून आपल्या ज्ञातीच्या किंवा राष्ट्राच्या उन्नतीचें

कार्य साधून घेतलें आहे, पण असेंच प्रश्न आपल्या लोकांपुढे आल्यावेळी त्यांनी राष्ट्रहित बाजूला ठेवून देऊन स्वत:चाच भरपूर फायदा करून घेतला आहे. असो.

शिक्षणाकरीता पाश्चात्य लोकांनी केलेलें प्रयत्न वाखाणण्याजोगे आहेत. अमेरिकेतील शिकागो विश्वविद्यालयाचेंच उदाहरणे घेतल्यास पुरेसें होईल. या विश्वविद्यालयाकरीतां सुप्रसिद्ध कोट्याधीश रॉकफेलर यांनी ३ कोटी ३० लक्ष रुपये दिलेले आहेत. सर अँड्यू कॉर्नेजी यांनी २ कोटी १० लक्ष रुपयें देऊन शिल्प विद्यालय चालविलेलें आहे. जर्मनी, इंग्लंड वगैरे देशांतही ह्या लोकांनी शिक्षणाकरीतां मोठमोठ्या देणग्या दिलेल्या आहेत. इंग्लंडमध्ये आंधळ्या सैनिकांकरीता सर ऑर्थर पियर्सन यांनी शिल्प विद्यालय चालविलेलें असून, त्या लोकांना शिक्षण देण्याची व्यवस्था केलेली आहे. लंडनमध्यें कुमार्गी मुलांना योग्य तें वळण देऊन त्यांची पोटापाण्याची व्यवस्था करणाऱ्या किती तरी संस्था निघालेल्या असून, त्यांत शेकडों नव्हे हजारों तरुण माणसें स्वार्थावर तिलांजली देऊन काम करीत आहेत. अशा लोकांच्या योग्य कर्तव्यनिष्ठेमुळे त्यांचे देश पुढे येऊन जगांतील राष्ट्रांत प्रमुख स्थान पटकावून बसले आहेत.

ह्या पाश्चात्य लोकांनी समाजसेवेविषयी केलेले प्रयत्न आपल्या लोकांपुढे आणणें जरुर आहे. या बाबतीत प्रथमत: मुक्ती फौज या संस्थेचा उल्लेख करणें जरुर आहे. ही संस्था जनरल ब्रुथ यांनी काढली. या संस्थेला पूर्वी पुष्कळ लोकांनी विरोध केला, परंतु संस्थेचें काम डोळ्यापुढें येताच विरोध करण्याचें बंद करून पुष्कळ जणांनी मदत केली. सन १९११ मध्ये हिचा प्रसार जगांतील ५९ देशांत झाला होता. व भिन्न भिन्न चौतीस भाषांमध्ये तिचें वाङ्मय प्रसिद्ध झालें होते. सन १९१२ मध्ये हिच्या ८५८२ शाखा होत्या. केवळ ब्रिटिश कॉलनीमध्यें त्यांचे सव्वा लाख सैनिक आहेत. हिंदुस्थानामध्येही हिच्या पुष्कळ शाखा असून दुष्काळग्रस्तांना मदत, रोग्यांची सेवा, पतित लोकांचा उद्धार वगैरे कामें ती संस्था जोरानें करीत आहे.

ह्या संस्थेप्रमाणें टॉयनबी हॉल ह्या संस्थेची माहिती आपल्या डोळ्यांसमोर असणें इष्ट आहे. आज ही संस्था जी लोकोपयोगी कामें करीत

आहे त्यांची सविस्तर माहिती स्थलसंकोचास्तव देतां येत नसल्याने, मुंबईस प्रसिद्ध होणाऱ्या समाजसेवक मासिकाचा १९२१ सालचा फेब्रुवारी महिन्याचा अंक अवश्य वाचवा अशी आमची लोकांस सूचना आहे.

पाश्चात्य लोकांचे समाजसेवेविषयीचें प्रयत्न फार दांडगे आहेत, हे वर सांगितलेल्या उदाहरणांवरुन लक्षांत येईलच. परंतु आणखी एक उदाहरण देतो. एकट्या लंडन शहरांत ६०/७० हॉस्पिटलें आहेत. इतकेंच नव्हें, तर ज्या ज्या वेळीं अशा संस्थांच्या अडचणी लोकांपुढें जाहीर करतांच तेथील लोक शेकडो निनांवी रकमासुद्धा पाठवून संस्थांची कार्य पार पाडीत असतात.

ह्या लोकांच्या दोन प्रवृत्तीचे एक अनुकरणीय उदाहरण ब्राह्म समाजाचे उपदेशक पंडित शिवनाथ शास्त्री यांनी आपल्या आत्मचरित्रामध्ये दिलेलें आहे. ते ह्मणतात, इंग्लिश लोकांची दानवृत्ती पाहून आपण फार आश्चर्य चकित झालो. इंग्लंडमधील श्रीमंतांपासून गरिबांपर्यंत सर्व वर्गाचे लोक आपापल्या ऐपतीप्रमाणें दान करीत असतात. एक वेळ आपण असें वाचलें आहे, की एका सत्पुरुषानें एका संस्थेंकरीता १२ लक्ष रुपयांची देणगी निनावी पाठविलेली होती! आपण इंग्लंडात ज्या बिल्डिंगमध्ये राहत होतो त्यांतील कांही तरुणी सायंकाळच्या जेवणानंतर वर्तमानपत्र वाचीत होत्या. इतक्यात एक नवीन उभारलेल्या संस्थेची जाहिरात त्यांच्या वाचण्यात आली. त्याबरोबर एकीनें त्या संस्थेची सर्व हकीकत आपल्या आईलाही वाचून दाखवून आपणही काहीं मदत पाठविण्याची इच्छा दर्शविली. आईनें मुलीस आपला हिशेब पहाण्यास सांगून जी कांही शिल्लक राहिल ती पाठविण्यास सांगितली. त्याप्रमाणें त्यांनी ५ शिलिंगचा चेक त्या संस्थेकडे पाठवून देऊन आपले कर्तव्य बजावलें.

हिंदुस्थानांतसुद्धा ह्या लोकांनी केलेलें प्रयत्न वाखाणण्यासारखें आहेत. कितीतरी कुष्ठ रोग्यांसारख्या रोग्यांना या संस्थेकडून मदत मिळतें. मध्य प्रांतातील चांपा जिल्ह्यातील बिलासपूर येथे एका अमेरिकन मिशननें एक कुष्ठाश्रम स्थापन केलेला असून त्यापासून किती तरी कुष्ठरोग्यांचे संरक्षण केले जाते. याशिवाय ठिकठिकाणी त्यांनी हॉस्पिटलें चालविलेलीं आहेत. अशा तऱ्हेनें हे लोक समाजाविषयीचें आपलें योग्य कर्तव्य बजावीत

आहेत ह्यांत काहींच शंका नाही. विद्यार्जनाविषयी हें लोक आपले उत्तम कर्तव्य बजावीत आहेत. याची साक्ष या लोकांनी चालविलेल्या मोठमोठ्या लायब्ऱ्यांमधील ग्रंथसंग्रहावरूनसुद्धां पटेल. लायब्ररीमध्येच ३५ ते ४० लक्ष ग्रंथ असून ५६ हजार पोथ्या आहेत. तसेच अमेरिकेतील हॉर्डवर्ड युनिव्हर्सिटीच्या लायब्ररीमध्येही ८लक्ष ग्रंथ आहेत. बर्लिन मधील रॉयल लायब्ररीमध्येही १२ लक्ष ३० हजार ग्रंथ असून, ३० हजार पोथ्या आहेत. याशिवाय अनेक ठिकाणी मोठमोठ्या लायब्ऱ्या आहेतच. यावरुन या लोकांच्या विद्याप्रियतेचें कौतुक वाटणें साहजिक आहे.

संस्कृत भाषा हिंदुस्थानची. पण त्या भाषेचा चिकित्सक पद्धतीनें अभ्यास पाश्चात्य लोकांनी– विशेषत: जर्मन लोकांनी चालविलेला आहे. बर्लीन विश्वविद्यालयात आज, लुडस, ग्लासनैप आणि नोबल असें तीन संस्कृत भाषेचें अध्यापक आहेत, चीन विश्वविद्यालयाचें अध्यापक आफरेट यांनी हस्तलिखित संस्कृत ग्रंथाचे जर्मनमध्ये भाषांतर केलेले आहे. मि. रास डेव्हिड यांनी बौद्ध वाङ्मयाचें परिशीलन करून इतकें कांही वाङमय निर्माण केले आहे, की बौद्ध धर्माचें ज्ञान सर्व लोकांना आज सुलभ झालेलें आहे. असो.

या लोकांत शिस्त कशी पाळली जाते याचे एक उदाहरण ह्मणजे नेक नामदार व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंग्ज यांच्या दिल्ली प्रवेशनाकरीतां मिरवणूक निघाली असतां कोणी अत्याचारी माणसानें व्हाईसरॉय यांजवर बाँब टाकला! अशा आकस्मिक भयंकर प्रसंगीसुद्धा कांहीही गडबड होऊन न देतां जखमी माणसांना इस्पितळात पोहोंचवून मिरवणूक न थांबविता ठरविलेला कार्यक्रम अंमलांत आणला गेला!

असो. ह्या लोकांची अशी कामें आपण नित्य डोळ्यांपुढें ठेविली पाहिजेत. एक बंगाली लेखक ह्मणतो, की या पाश्चात्यांचे आमच्यावर राज्य आहे ते 'विघातक विधान' आहे. ते पुष्कळ अंशी खरें दिसतें. ईश्वरांच्या ठिकाणीं सर्व माणसें सारखी आहेत. त्याला भेदभाव कांही नाही. ज्याची योग्यता आहे तो श्रेष्ठ बनतो. व योग्यता नाही तो कनिष्ठ स्थितीला जातो.

हाच न्याय राष्ट्रासही लागू आहे. आगगाड्या, तारायंत्रे, विमानें, टेलिफोन, व इतर शास्त्रांतील शोध त्यांनीच लावलें नाही काय? वैद्यकासारख्या शास्त्रांत त्यांनी किती तरी शोध लावलें असून, आणखी लावण्याची त्यांची तयारी आहेच. मग त्या शोधांसाठी स्वत:च्या प्राणाचासुद्धां बळी देण्यास ते मागे पुढे पाहात नाहीत. हिमालय पर्वताच्या गौरीशंकरासारख्या आजपर्यंत अगम्य व अज्ञान असलेल्या शिखरांवर चढून जाण्यांस त्यांनी किती तरी प्रयत्न चालविलें असून संकटांची पर्वा न करतां ते प्रयत्न पुढे चालविण्याची त्यांची तयारी आहेच.

गोमांतकातील हिंदू बांधवांनों, हे लोक आपलें कर्तव्य कसें बजावीत आहेत ते पाहा, ह्मणजे आपणास आपल्या लोकांच्या स्थितीची कल्पना येईल व लोकांनी आपल्यावर राज्य चालविल्यास त्यांत वावगें असें काहींच नाही, असें दिसून येईल. या लोकांच्या अंगी असलेल्या गुणांचे सर्वतोपरी अनुकरण करण्यास आपण सदैव तत्पर असलें पाहिजें तरच खात्रीनें आपल्या देशाची उन्नति होईल. ब्रिटिश हिंदुस्थानातले आपलें बांधव अशाच प्रकारें आपलें कर्तव्य कसें बजावीत आहेत त्याचें दिग्दर्शन पुढील लेखाकांत करू.

*(गुरुवार, दि. २६ जुलै १९२३)*

# आमचे कर्तव्य,

## लेखांक २ (पुर्वार्ध)

ब्रिटिश हिंदुस्थानामध्येंही आपल्या देशाविषयी कळकळ उत्पन्न होऊन तेथें, पुष्कळशा संस्था निघून ते लोक आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावीत आहेत. पुष्कळ लोकांनी आपल्या मोठ्या उत्पन्नावर लाथ मारून, देशाला पूर्वीचे वैभव प्राप्त व्हावें, इतर राष्ट्रांच्या मालिकेंत आपल्या हिंदुस्थान देशास स्थान मिळावें, देशांतील लोकांची भरभराट होऊन आपासांतली वैमनस्ये नष्ट व्हावीत, याकरीता आपणाला कायमचे वाहून घेतले आहे. त्यामुळेंच

त्याचा भविष्य काल उज्ज्वल होण्याची पूर्वचिन्हें दिसत आहेत, अशांचीहि कांही उदाहरणें आपल्या लोकांसमोर असणें जरुर आहे, ह्मणून त्यापैकी कांही देण्यांत येत आहेत.

देशाला वैभवशाली करण्याकरीता ज्या कांही संस्था निघाल्या, त्यांत राष्ट्रीय सभेला प्रथम स्थान द्यावें लागेल. ती संस्था मूळ सतरा लोकांनी स्थापिली. त्यांत मुंबई इलाख्यांतील फक्त तिघे जण होते. ते रा. सा. मंडलिक, न्या. का. वि. तेलंग व दादाभाई नौरोजी हे होत. सभेची पहिली बैठक पुण्यास भरविण्याचे ठरविलें होते. परंतु पुण्यास आकस्मिकपणें कॉलरा सुरू झाल्यानें मुंबईस बैठक भरवावी लागली. ती पाहिली बैठक २८-१२-१८८५ रोजी गोकुळदास तेजपाळ संस्कृत कॉलेजच्या दिवाणखान्यांत उमेशचंद्र बानर्जी ह्यांच्या अध्यक्षेतेखाली भरली. त्या वेळी फक्त ७५ प्रतिनिधी होते. ही संख्या दुसऱ्या वर्षी वाढून ४२४ झाली. नंतर पुढे प्रत्येक वर्षी ही संख्या वाढतच जाऊन लागल्यानें आता प्रतिनिधींची संख्या नियमित करणें भाग झाले आहे. आज जरी संस्थेत दोन तीन पक्ष झालेले असलें तरी हिंदुस्थानांतील एकंदर लोकांना या संस्थेविषयी फार अभिमान वाटत आहे. स्वराज्याप्रीत्यर्थ हिंदुस्थानानें केलेल्या प्रयत्नांमध्यें या संस्थेचें नाव अजरामर राहील यांत शंका नाही.

दुसरी संस्था ह्मणजे प. वा. नामदार गोखले यांचा 'भारत सेवक समाज' हा होय. आपल्या देशांकरीता सर्वस्वावरपाणी सोडणारे तरुण ज्यावेळी आपल्या राष्ट्रांत तयार होतील, तेव्हांच कांही तरी देशकार्य होणार आहे असें त्यांनी पूर्णपणे कळून आल्यावरून त्यांना ही संस्था स्थापन केली. परंतु देशाच्या दुर्दैवामुळेच त्यांना फार थोडें आयुष्य लाभलें. नाही तर या संस्थेत आजच्यापेक्षां जास्त भरभराट झालेली दिसून आली असती. गोखल्यांची देशप्रीति जाज्वल्य होती. देशाकरीतां त्यांनी अविश्रांत श्रम केल्यामुळेंच त्यांना अकाली मरण आलें. त्यांच्यासारखें देशभक्त ज्या देशांत जन्माला येतात, तो देश खरोखर भाग्यवान होय! गोखलें व त्याची संस्था याविषयी अत्यंत आदर वाटतो. गोखल्यांची शिकवण अत्यंत उच्च दर्जाची होती. हिंदुस्थानांतील सामान्य जनता सुशिक्षित झाल्याशिवाय स्वराज्याचा पाया

मजबूत होणार नाही, हा त्यांचा अढळ सिद्धांत असल्यानें लोकशिक्षणाचें कार्य आंगावर घेऊन त्यांची वाढ व्हावी ह्मणून त्यांनी अविश्रांत परिश्रम केलें. शिक्षण सार्वजनिक झाल्याखेरीज समाज स्वराज्यास लायक होणार नाही. ह्मणून त्यांनी सक्तीच्या शिक्षणासारखी बिलें कौन्सिलपुढें आणली होती. तात्पर्य थोडक्यात सांगावयाचें ह्मणजे राष्ट्राची कुवत, राष्ट्राची इभ्रत सर्व बाजूंनी वाढली पाहिजे व त्याकरतांच सामान्य जनतेला शिक्षण देऊन समंजस करून त्यांचें ठिकाणी स्वाभिमान उत्पन्न केला ह्मणजे स्वातंत्र्याची खरी तळमळ उत्पन्न होईल. या शिकवणुकीप्रमाणे भारत सेवक समाज वावरत आहे. संस्थेचे प्रस्तुतचें अध्यक्ष नामदार शास्त्री यांनी आपल्या मोठ्या नोकरीवर तिलांजलि देऊन या संस्थेला वाहून घेतलें असून, त्यांनी पुष्कळ महत्त्वाचीं कामें केली आहेत. आज ते केनिया वसाहतीतील हिंदी लोकांच्या वतीनें काम करण्यास इंग्लंडमध्ये गेले आहेत.

ह्या संस्थेचे उपाध्यक्ष श्री. देवधर यांनी मोपला बंडाच्या वेळी मलबारांत केलेले काम लक्षांत घेण्यासारखे आहे. त्यांनी लाखो रुपयांचा फंड जमा करून मलबारची पुनर्घटना केली. हजारो निराश्रित कुटुंबांना अन्नपाण्याची मदत केली. हें भारत सेवक समाजानें केलेले काम लक्षांत घेऊन, तेथील लोकांनी ४००० रुपयांचा फंड जमवून त्या फंडास देवघर रिलीफ फंड असें नाव दिलें आहे. यावरुन तेथील कामाची कल्पना आपल्यास येईल. त्याशिवाय या संस्थेच्या शाखा नागपूर, अलाहाबाद, मद्रास इत्यादी ठिकाणी पसरलेल्या असून पंडित हृदयनाथ कुंझरु, शिवस्वामी अय्यर यांसारखे देशभक्त या संस्थेच्याद्वारा कार्य करीत आहेत, आणि हें सर्व काम उगाच गाजावाजा न करतां होत आहे. अशा या संस्थेची योग्यता काय आहे हें कळून येण्याकरतां, ता. २० जून १९२३ चा 'दैनिक ज्ञानप्रकाश' अवश्य वाचावा. ह्मणजे या लोकांच्या विधायक कामगिरीची कल्पना होईल व आपल्या गोमांतकांत मवाळ ह्मणजे देशबुडवें, सरकारची हांजी हांजी करणारे लोक असें समजलें जातें ते किती अस्थानीं आहे हे लक्षांत येईल. सामान्य जनता नेहमीं भावनाप्रधान असते. दूरवर विचारांचा तिच्या ठिकाणी प्रादुर्भाव झालेला नसतो. ह्मणून त्यांनी ह्या लोकांनी चालविलेले 'ज्ञानप्रकाश' पत्र वाचावें अशी

कळकळीची विनंति करतो. नामदार गोखले कैलासवासी झाल्यास आज ९ वर्षे होऊन गेली आहेत, पण त्यांची संस्था त्यांच्या शिकवणुकीप्रमाणे काम करीत आहे.

यानंतर लो. टिळकांची होमरुल लीग ही संस्था घेऊ. या संस्थेपेक्षा स्वत: लोकमान्यांनी केलेले काम लक्षांत घेण्यासारखें आहे. त्यांचा स्वार्थ-त्याग, धाडस, बुद्धिमत्ता देशाविषयी तळमळ वगैरे गुण घेण्यासारखे आहेत. त्यांनी केलेल्या अविश्रांत परिश्रमांमुळेच सामान्य जनतेंत स्वराज्याची कल्पना पसरली गेली. स्वराज्य मिळाल्याशिवाय हिंदुस्थानचें कल्याण होणार नाही. असा त्यांचा सिद्धांत होता. तयंनी 'केसरी' पत्राद्वारे केलेली जागृति हे मोठे कार्य. हें त्या पत्राचा गोमांतकीय लोकांमध्ये जो खप आहे, त्यांवरून सहज लक्षात येईल.

महात्मा गांधीजी यांनी देशाकरीतां फारच परिश्रम केले आहेत. त्यांनी सत्याग्रहाश्रमाद्वारे शिकविलेला मार्ग दिसण्यांत फार सोपा, पण आचरण्यास फार कठीण असा असल्यामुळें सामान्य लोकांच्या आचरणांत शक्य झालें नाही. त्यांचा स्वार्थ, त्याग, सत्यनिष्ठा, साधुत्व वगैरे गुण घेण्यासारखे आहेत. ते महात्मा आहेत यांत बिलकूल शंका नाही. परंतु लोकांच्या अंगी, ते सांगतील त्या प्रमाणें वागण्याची तयारी नसल्यामुळें आज त्या चळवळीचा फायदा झालेला दिसत नाही.

प. वा. माधवराव रानडे, दादाभाई नौरोजी आणि फेरोजशाह मेथा यांनी केलेली देशसेवेची कामें इतिहासात अमर राहतील.

तसेच स्वामी श्रद्धानंद (पूर्वाश्रमीचें लाला मुनशीराम) यांनी आपली हजारो रुपयें उत्पन्नाची जमीन आर्यसामजास अर्पण करून स्वीकारलेलें देशसेवाव्रत, पंडित मालवीय यांची कौन्सिलमधील कामें, लाला लजपतराय यासंनी अमेरिकेंमध्ये केलेली जागृति, पं. दास यांनी हजारो रुपयांच्या प्राप्तीवर दिलेली तीलांजलि वगैरे उदाहरणें अनुकरणीय आहेत. अशा लोकांच्या कर्तव्यतिष्ठेमुळेंच हिंदुस्थानचा भविष्यकाल अत्यंत उज्ज्वल होण्याचा संभव आहे, यात कांहीच शंका नाही.

यापुढें शिक्षणसंस्थांकडे वळू. हिंदुस्थानामध्ये ज्या शिक्षणसंस्था आहेत त्यात  हिंदु युनिव्हर्सिटी, डेक्कन एज्युकेशन, सोसायटी व महिला विश्वविद्यालय ह्या प्रमुख होत. हिंदु युनिव्हर्सिटी ही पंडीत मालवीय, सर सुंदरलाल व ॲनी बेझंट वगैरेच्या प्रयत्नांमुळेच स्थापन झाली.

*(गुरुवार, दि. २ ऑगस्ट १९२३)*

# आमचे कर्तव्य

## लेखांक २ (उत्तरार्ध)

प्रो. कर्वे यांचा स्वार्थत्याग फार दांडगा आहे. अगदी विश्रांति न घेतां, ते या संस्थेकरीतां परिश्रम करीत आहेत. पुष्कळशा तरुणांनी व स्त्रियांनी या संस्थेकरीता आजन्म वाहून घेतलें आहे. आज महिला विद्यापीठ व तिच्या शाखा मिळून ७०० विद्यार्थिनी शिकत आहेत. या विद्यापीठाचा मुख्य उद्देश स्त्रियांना योग्य असें शिक्षण मातृभाषेंतूनच देणें हा आहे. आपल्या गोमांतकामध्येंही एक कन्याशाळा निघण्याचें घाटत आहे. अशा संस्थेची आमच्या गोमांतकाला फार जरुर आहे. तरी या कन्याशाळेंला मूर्त स्वरूप आणनू देण्याकरीता, सर्व लोकांनी मदत करावी अशी कळकळीची प्रार्थना आहे.

समाज सेवेविषयीं आमचे ब्रिटिश हिंदुस्थानांतले बांधव सतत प्रयत्न करीत आहेतच. सेवासदन, स्पेशल सर्व्हिस लीग वगैरे संस्था समाजसेवेचें काम उत्कृष्ट रीतीनें बजावीत आहेत. सेवा सदन ही संस्था श्री. गोपाळकृष्ण देवधर व श्री. रमाबाई रानडे यांच्या नेतृत्वाखाली चालत असून, संस्थेचें कार्य जोरांत आहे. स्त्रियांना मिडवाईफ, नर्स, कसीदा, शिक्षण इत्यादी विषयांचे शिक्षण देऊन, कार्यक्षम करण्याकरीता संस्था प्रयत्न करीत आहे. या कामीं तिला बरेंच यश येत चाललें आहे, असें संस्थेच्या ठिकठिकाणीं ज्या शाखा स्थापन झाल्याचे दिसतें. त्यावरुन सहज लक्षांत येईल. अशा संस्थेची एक

शाखा गोमांतकांत असणें जरुर आहे.

याचप्रमाणें मुंबईतील सोशल सर्व्हिल लीग ही संस्था श्री. नारायण मल्हार जोशी यांच्या नेतृत्याखाली चालत असून, श्री. सहस्त्रबुद्धे, श्री. चित्रे यांसारख्या समाजसेवकांनी आपणांस त्या संस्थेकरीता वाहून घेतले आहे. या संस्थेने मुंबईतील परळ वगैरे ठिकाणीं मजुरांकरीता पुष्कळच कामें केलेली आहेत. शिवाय संस्थेची सविस्तरपणें लोाकंस माहिती कळण्याकरीता व समाजसेवेविषयी जनतेच्या मनाची प्रवृत्ति होण्याकरीता समाजसेवक नांवाचें मासिकही चालविलें आहे. शिवाय वारंवार हस्तपत्रकें, लघुपुस्तकें प्रसिद्ध करून समाज जागृति करीत आहेत.

असो. हिंदुस्थानांतील दानधर्म करण्याविषयी पुढें असलेली प्रमुख जात ह्मणजे पारसी लोक हे होत. ह्या लोकांनी मुंबई किंवा अन्य स्थळीं दानधर्मविषयक कृत्यें केलेली वर्णनीय आहेत. या पारसी समाजाची संख्या थोडी असूनही, त्यांनी एकट्या मुंबई शहरामध्येंच लहान मोठ्या अशा १११ संस्था चालविलेल्या आहेत. में. नौरोजी माणिकजी वाडिया या उदारधी पुरुषानें १ कोट रुपये धर्मादायाकडे दिले आहेत. आज या वाडिया चारिटी फंडांतून हजारों लोकांना धर्म, जाति वगैरे कांही भेदभाव लक्षांत न घेतां मदत होते. मे. टाटा यांनी रिसर्च इन्स्टिटट्यूटकरीतां ३० लक्ष रु. दिले आहेत. शिवाय या जातीतींल लोकांनी अनेक इस्पितळें शाळा, दवाखानें वगैरे चालविले आहेत. या जातींतील श्रीमंत लोकच तेवढे सार्वजनिक कार्याला मदत करीतात असें नसून, मध्यम स्थितींतील लोकही आपल्या शक्तीनुसार दानधर्म करीत असतात. पारशी लोकांनी चालविलेल्या दैनिक पत्रांतून अशा लोकांच्या देणग्यांची पोंच आलेली नेहमी दिसते.

मुंबईतील भाटे वगैरे लोकांनीही पुष्कळ संस्थांना मदत केलेली आहे. शेट प्रेमचंद रायचंद यांनी २ लक्ष कलकत्ता विश्वविद्यालयाच्या लायब्ररीकरितां, २ लक्ष रु. म्युनिसिपालटीकडे ब्लॉक टॉवर बांधण्याकरीतां दिले आहेत. गोकुळदास तेजपाल यांनी हॉस्पिटलकरीता १ ।। लाख व इतर कामांकरीता ७ लाख रुपये दिले आहेत.

सारस्वत ज्ञातीतील लोकांनीही बरीच कामें केलेली आहेत. सारस्वत

विद्यार्थी साहाय्यक मंडळी, सारस्वत दीनवत्सल संघ, वगैरे संस्थांची कामें अभिमानास्पद आहेत. श्रीमंत दाभोळकर या धनिक गृहस्थांनी पुष्कळ संस्थांना देणग्या दिलेल्या असून, त्यांचा दान प्रवाह अखंड चालू आहे. दाभोळकर स्कॉलरशिप पुष्कळांना मदत करीत असून, गोमांतकांतील ह्मापशांचें सारस्वत विद्यालय हें त्यांच्याच मदतीचें फळ होय. मडगांव येथील सारस्वत ब्राह्मण समाज या संस्थेच्या इमारत फंडाला ५०० रुपयांची मदत केली असून, गोमांतकांतील आणखी कांही संस्थांनाही साह्य केलें आहे. महापुरानें अनाथ बनलेल्या लोकांस श्रीमंतांनी नुकतीच दोन हजार रुपयांची उदार मदत पुरविली असून, खुद्द 'भारत  फंडास' पन्नास रुपयांचे निरपेक्ष साहाय्य केलें आहे. अशा प्रकारें गोमांतकाविषयीं, आपलें प्रेम त्यांनी व्यक्त केलें आहे.

आतां हिंदुस्थानांतील बांधवांनी इतर धार्मिक गोष्टींसारख्या बाबतीत केलेल्या कार्याकडें वळूं. धार्मिक बाबतींत रामकृष्ण मिशननें अमेरिकेत केलेले काम, आर्य समाजाचें शुद्धिकार्य, हिंदुमिशनरी सोसायटीचें पतित परावर्तन कार्य, वगैरे कार्ये योग्य प्रकारें चालली आहेत. ज्ञानार्जनाकरीतां ठिकठिकाणीं लायब्र्या वगैरे काढलेल्या असून, त्यापासून पुष्कळ लोकांना विद्येची आवड उत्पन्न होत आहे.

डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर, रा. ब. शंकर पांडुरंग पंडित, डॉ. राजेंद्रलाल मित्र, यासारख्या विद्वान गृहस्थांनी पुराणेंतिहासांचे संशोधन केलेलें आहे. डॉ. भांडारकर हे हिंदूभूमीतील एक अमूल्य रत्न आहे. डॉ. भांडारकरांनी केलेले कार्य लक्षांत घेऊन त्यांचे नांव कायम राहाण्याकरीता तेथील लोकांनी 'भांडारकर रिचर्स इन्स्टिटय़ूट' या नांवाची एक संस्था स्थापन केली आहे.

पुण्यांतील भारतेहिहास संशोधन मंडळ संशोधन करून लोकांपुढे आणण्याचें काम करीत आहे, राजवाडे, खरे, पारसनीस वगैरसारखे लोक या कार्यार्थ सतत प्रयत्न करीत आहेत. बंगालचे यदुनाथ सरकार यांचे प्रयत्न फार दांडगे आहेत. त्यांनी मराठ्यांच्या व मुसलमानांच्या इतिहासावर पुष्कळ पुस्तकें लिहिली आहेत. व त्या विषयांवर त्यांचा व्यासंग सतत चालूच आहे.

डॉ. रवींद्रनाथ टागोर यांनी पौर्वात्य व पाश्चात्य संस्कृतींचा मेळ घालण्याकरीतां, 'विश्वभारती' या नावांचे विश्वविद्यालय काढलें असून, त्यांचा ज्ञानप्रवाह अखंड चालू आहे.

याप्रमाणें ब्रिटिश हिंदुस्थानांत आपलें बांधव आपल्या मातृभूमींचे नांव उज्ज्वल होऊन ती पूर्वी प्रमाणेंच सर्व राष्ट्रांना आदर्शभूत व्हावी ह्मणून करीत असलेली खटपट यशस्वी होईल यांत अगदींच शंका नाही. आतां पुढील लेखांकात गोमांतकीय हिंदु समाजानें आपलें कर्तव्य कसें बजावावें त्याविषयी कांही सूचना करून हा विषय पुरा करू.

*(गुरुवार, दि. ९ ऑगस्ट १९२३)*

# आमचे कर्तव्य

## लेखांक ३

'हम कौन थे, क्या हो गये है और क्या होंगे अभी. आओ, विचारें आज मिलकर ये समस्यायें सभी.'

***– मैथिली शरण गुप्त***

आपल्या गोमांतकीय हिंदु समाजाकडे पाहिल्यास तो अवनतावस्थेंत आहे, हें कोणासही कबूल करावें लागेल. याविषयीं उल्लेख आह्मी प्रथमत: केलेला आहेच. पोर्तुगीज अमलाखाली झालेल्या धर्मक्रांतीमुळेंच लोकांना आपल्या जीवित्वाच्या अस्तित्वाची सुद्धां शंका येऊन, कांहीनी परप्रांताची वाट धरली. कांहीनी धर्मावर व ईश्वरावर श्रद्धा ठेऊन आलेल्या संकटास तोंड देऊन, हिंदु धर्म व हिंदु देवता याचें गोमांतांमध्ये संरक्षण केलें, याबद्दल आह्मीं आपल्या पूर्वजांचा फार अभिमान बाळगिला पाहिजे, व आभार मानले पाहिजेत. त्यावेळी जर त्यांनी धन दौलतीच्या आशेनें, धर्मत्याग केला असता, तर आज संबंध गोमांतक प्रांत ख्रिश्चन झालेलाच दिसला असता. व

आज जसे हे ख्रिश्चन लोक हिंदु संस्कृति, हिंदु आचार विचार, हिंदु तत्त्वज्ञान यांना पारखे झाले आहेत, तसेच आह्मी झालो असतो. यांत शंका नाही. त्यावेळी आलेल्या संकटामुळे व योग्य शिक्षणाच्या अभावी आपला हिंदु समाज कर्तव्यशून्य झालेला आहे. आपणाला जगांतील इतर समाजासारखे पुढें आलें पाहिजे, ही भावना जरी मनांत असली तरी पण राजकीय परिस्थिती अनुकूल नसल्यामुळें उच्च भावनेचा लोप होत चालला होता. इतक्यांत प्रजासत्ताक राज्यपद्धती सुरू झाल्यानें सर्व परिस्थिती बदलली, व समतेचा कायदा लागू झाला. ह्या वेळींच महाराष्ट्रातील चळवळीचा आपल्या समाजावर परिणाम होऊन आपले धर्म बांधव आपल्या देशाची सेवा ज्याप्रकारें बजावित आहेत, त्या प्रकारें आपणही कांही हालचाल केली पाहिजे याची जाणीव उत्पन्न होऊ लागली, परंतु संकट परंपरेत सांपडल्यामुळे आमच्या समाजाला कर्तव्यमूढतेची ग्लानि आलेली आहे. ही कर्तव्यशून्यतेच्या रुपानें सर्वास दिसत आहे. परंतु यापुढें ही स्थिति बदलण्याकरीता आपण शक्य ते प्रयत्न केले पाहिजेत. तसेंच आपल्या समाजामध्ये काय दोष आहेत, ते कसे सुधारले पाहिजेत, वगैरे प्रश्न डोळ्यांपुढे आणून त्याचा विचार केला पाहिजे. तरच आमचा निभाव लागेल, नाहीतर इतर देश पुढें जाऊन, आह्मी मात्र पुष्कळ मागें राहूं.

आपल्या गोमांतकांत देशहित भावनेनें प्रेरित होऊन ज्या संस्था काम करीत आहेत, त्या हाताच्या बोटानें मोजण्यासारख्याच दिसतात! हें असें कां व्हावें? आपल्या अंगी असे कोणते दुर्गुण आहेत की, त्यामुळें अशा संस्था उदयास येत नाहीत. याचा प्रथम विचार केला पाहिजे..

पहिला दुर्गुण ह्मणजे स्वार्थत्यागचा अभाव होय. स्वार्थत्याग ही भावना उच्च आहे. या भावनेनें प्रेरित झाल्याशिवाय कोणतींही मोठी कामें पार पडत नसतात. बौध धर्माचा इतिहास उदाहरणासाठी घ्या. या धर्माचा प्रसार सर्व धर्मापेक्षां जास्त होण्यास, त्या धर्माच्या प्रसारकांचा स्वार्थत्याग होय. स्वत: गौतमबुद्ध राजपुत्र होता. जगांत वैराग्याला मुख्यकारण दु:ख असतें, पण बुद्धाला कोणत्याच प्रकारचें दु:ख नसून, उलट विलासाचीं सर्व साधने त्याच्या बापानें त्याच्याकरीतां तयार केली होती. पण त्या सर्व

विलास-वस्तूंवर, प्रत्यक्ष बायकोवर, इतकेंच नव्हे तर नुकत्याच जन्मलेल्या एकुलत्या एका पुत्रावरसुद्धा लाथ मारून, मोक्षधर्माचा शोध लावण्याकरीतां व जगातील दु:खें शक्य तितकी कमी करण्याकरीता, अखिल मानव जातीला कर्म मार्गाचा योग्य उपदेश करून निर्वाणाची प्राप्ती करून देण्याकरीता, सर्वसंगपरित्यागपूर्वक अरण्याची वाट धरली, व नवा धर्म स्थापन करून जगावर शक्य तितके उपकार करून ठेविले. तसेंच सम्राट अशोक याचा मुलगा महिंद्र व मुलगी संघमित्रा यांनी पण एका सम्राटाची अपत्यें असताही सर्वस्वाचा त्याग करून धर्मोपदेशकाचें व्रत स्वीकारून धर्मप्रसारार्थ सिलोनचा मार्ग धरला! अशा स्वार्थत्यागी स्त्री-पुरुषांची वाढ त्या धर्मात झाल्यामुळेंच त्या धर्माची महति वाढून तो धर्म जगांतील बहुतेक सर्व देशांत पसरला, व त्याने जगाची शक्य ती सुधारणा केली.

हल्लींच्या ऐतिहासिक काळांतील महाराणा प्रतापसिंह, शिवाजी महाराज वगैरे देशभक्त राज पुरुषांची कामगिरी सर्वश्रुतच आहे. शिवाजी महाराजांना एखाद्या बादशहाची सुभेदारी मिळून, चैनीनें दिवस घालविता आले असते. परंतु आपल्या देशाकरीता काय वाटेल ते करू. वाटेल तितके कष्ट सोसूं, ही स्वार्थत्यागाची उच्च भावना त्यांच्या ठायीं जागृत असल्यामुळेंच महाराष्ट्रातील लोकांना  स्वातंत्र्य मिळालें. पुढेंही अशीच भावना टिकली असती तर आजचा इतिहास कांही निराळा झाला असता. असो.

गोमांतकीय बंधूंनो, ही उदाहरणें आपल्या डोळ्यासमोर आहेतच. इतकेंच नव्हेतर आपण वर्तमान पत्रांमधून ब्रिटिश हिंदुस्थानांतील हकिकती वाचतच आहो. दासबाबू सारख्यांनी आपल्या महिन्याच्या हजारों रुपये उत्पन्नावर लाथ मारिली वगैरे वगैरे आपण वाचतो. पंरतु यापैकी शतांश सहस्त्रांश तरी आपण आचरणांत आणतो काय? आपल्या समाजामध्यें असें एक तरी स्वार्थत्यागाचें उदाहरण दाखवितां येईल काय? याबद्दल आपणांला खरोखर लज्जा वाटली पाहिजे. आज आपण संस्था चालविण्याकरीतां लागणाऱ्या पैशांचा सुद्धा साधारणपणें स्वार्थत्याग करण्यास तयार असत नाही. अमुक झालें पाहिजें वगैरे घरी बसून पुष्कळ गोष्टी सांगतील.

परंतु पैशाचा प्रश्न आल्याबरोबर पुष्कळशा सबबी उभ्या करतील! गोमांतकीय बंधूंनो! आजपर्यंत ज्यांनी ज्यांनी आपल्या देशाकरीतां स्वार्थत्याग केला, त्यांच्या पुढें ह्या सबबी नव्हत्या काय? परंतु त्यांनी याकडे लक्ष न देतां आपल्या उद्दिष्ट कार्याकडे लक्ष दिलें, व त्यामुळेंच अशा लोकांच्या हातून देशोन्नतीचें कार्य घडून आले. आज आपल्या समाजामध्यें बोलणारे पुष्कळ आहेत, परंतु करणारे अगदींच कमी. अशा लोकांनी पुष्कळ बोलण्यापेक्षा कांही तरी करून दाखविल्यास आलप्या मातृभूमीची सेवा केल्यासारखे होईल. स्वार्थत्याग केल्याशिवाय कांहीही घडणें शक्य नाही. हें लक्षांत आणून या पुढें कामास लागलें पाहिजे.

आमच्यांतील दुसरा दुर्गुण ह्मणजे परिस्थितीप्रमाणे दान देण्याची प्रवृत्ति नसणें अथवा अपात्री दान देणें हा होय. आपल्याकडे पुष्कळ संस्था निघाल्या, परंतु टिकल्या मात्र नाहीत. याचें कारण इतर दुर्गुणांबरोबर लोकांच्या अंगी अशा संस्थांना मदत देण्याची जाणीव नाही हें होय. संस्था स्थापन होते वेळीं पुष्कळ सभासद होतील, परंतु महिन्या दोन महिन्यांत त्यांचा हा उत्साह मावळूं लागतो. महिन्यांची ४ आणे वर्गणी सुद्धां देण्याचें यांच्या जीवावर येतें. आपले लोक अनेक निरुपयोगी व चैनीच्या कामांत पैसा खर्च करतील. परंतु एखाद्या सार्वजनिक कार्याकरीता एक पैसासुद्धां देण्यास तयार होणार नाहीत. गोमांतकांतील हिंदु लोक अगदींच गरीब आहेत, त्यांना धर्मदायाकरीतां पैसा खर्च करण्याचें सामर्थ्य नाहीं असें नसून, आपल्या लोकांत अशा लोकोपयोगी कार्याकडे पैसा खर्च करण्याची असावी तितकी प्रवृत्तीच नाही हे होय. आपले लोक स्वत:ची श्रीमंती दर्शविण्याकरतां, लग्नमुंजीच्या वेळीं पाण्यासारखा पैशा खर्च करतील किंवा देवस्थानांतल्या उत्सवाची संख्या अधिक होण्याकरीता अगर पालखीला किंवा दरवाज्याला सोन्या रुप्याचा पत्रा मढविण्याकरीता, पाहिजे तितकी रक्कम ओततील परंतु लोकोपयोगी संस्थांना मदत देण्याचें मनांत सुद्धां आणणार नाहीत. गोमांतकांत देवळांची व त्यांत चालणाऱ्या उत्सवांची संख्या पुष्कळ आहे. त्यांत आणखी भर घालणें ह्मणजे पोटभर मिष्टान्न जेवलेल्यांना आणखी वाढणे होय. अशा उत्सवांची संख्या खरोखर योग्य ती ठेऊन, बाकीचे कमी करून त्या पैशांचा विनियोग परिस्थितीप्रमाणे लोकोपयोगी अशा कार्याकडे

केला पाहिजे. असें केल्यास ईश्वराचा कोप होईल ही सबब पुढें आणणारांनी हें लक्षांत ठेवावें की, ‘जसे लोक तसे त्यांचे देव’ हेंच खरे आहें. अगदी अशिक्षित लोकांच्या देवांकडे पाहिले असतां. त्यांचे देव हे त्यांच्या भावनेप्रमाणें अगर गरजेप्रमाणें निर्माण झालेले असतात, व ते कोंबड्या बकऱ्यांचा बळीही घेतात. त्याहून वरच्या पायरीच्या ह्मणजे मध्यम स्थितींतील लोकांचे देव, पालख्यांतून मिरवणारे व पलंगावर निजणारे असे असतात. आणि त्याहून पुढें गेलेल्यांचा ‘सर्व देवो विश्वकर्मा महात्मा सदा जनानां हृदये सन्निविष्ट:’ ह्मणजे ‘सर्व विश्वाचा कर्ता महान आत्मा देव मनुष्यांच्या अंत:करणामध्यें स्थित आहे’ अशा तऱ्हेचा देव असतो. यावरून काय सिद्ध होतें? लोकांच्या भावनाच बदलल्या पाहिजेत हें सिद्ध होत नाही काय? याकरीतां आपल्या लोकांनी धर्मदायाच्या कल्पना बदलून त्यांचा विनियोग योग्य कामाकडे केला पाहिजे.

तिसरा दुर्गण ह्मणजे प्रातिनिधिक संस्था चालविण्याची आमच्या अंगात लायकी नाही हा होय. एकदी संस्था काढून ती चार चौघांनी चालवून दाखविण्याची आह्मांस सवय नाही. आपल्याकडे पुष्कळ संस्था निघाल्या, हजारों रुपये वर्गणी जमा झाली. परंतु मतभेद व तंटे होतातच. व पुष्कळ वेळां याचा परिणाम फार वाईट होतो. आपली सर्व शक्ती अशा कामीं खर्च होते. आपल्यामध्ये  यांची उदारहणें पुष्कळच आहेत. गोमांतकामध्ये आज ज्या कांही संस्था आहेत. त्यांतील पुष्कळशा संस्था अंत:करणाच्या तळमळीनें उत्पन्न झालेल्या नसून, हमरी तुमरीवरच त्यांची उभारणी झाली आहे. अशा योगानें शेवटीं काय होतें? पक्ष करतेवेळीं आणलेला उत्साह कमी होतांच या संस्थाहि मरू लागतात. तेव्हां आपण आपलें कर्तव्य काय आहे याचा नीट विचार करून कामाला लागलें पाहिजे.

आपल्या लोकांपुढे कामाचा डोंगर पडला आहे. आज आह्मांस हरएक कामाकरीता दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहावें लागत आहे. सुशिक्षित व कर्त्या लोकांनी काढलेली प्रागतिक संघासारखी संस्था नीट चालत नाही, नव्हें तिची व्यवस्थित रीतीनें सुरुवात करतांही आली नाही. आमचाच एखादा धार्मिक बाबतींतला जरी झगडा असला तरी सुद्धां ख्रिस्ती वकिलांची मनधरणी केल्याशिवाय गत्यंतर नाही. गोमांतकांत आपल्या लोकांचे एक तरी

हॉस्पिटल आहे काय? यावरुन हिंदु लोकांत भूतदया हा गुणच नाही असा आरोप आमच्यावर केल्यास त्यांत वावगें असें कांहीच नाही असें वाटत नाही काय? गोमांतकीय बंधूंनो, शिमग्यासारख्या निंद्य व सर्वथैव बंद करण्यास योग्य अशा उत्सवाकरीता हजारों रुपये खर्चून ते चालविण्याची परिस्थिती आज आहे काय? आजची परिस्थितीत काय आहे, जगाची धडपड कशी चालली आहे, हें आपण पाहातच आहां. अशा भौतिक युगामध्ये आपला निभाव लागला पाहिजे व ह्या करीतां पाश्चात्य देशांतील लोक कशा प्रकारें आपलें कर्तव्य बजावीत आहेत, याची उदाहरणें नित्य डोळ्यांपुढे ठेविली पाहिजेत. आज जीवनार्थ कलह किती भयंकर वाढलेला आहे, याचा विचार करा. अद्याप चैन करीत बसण्याचे दिवस नाहीत, हें लक्षांत आणा. या करीतां गोमांतकीय तरुणांनो, आह्मी बरेच प्रयत्न केले पाहिजेत. स्थानिक कार्ये किती तरी आहेत. मद्यपानासारख्या निंद्य व भयंकर व्यसनांचा प्रसार तरुणामध्ये जोराने होत आहे, याची आपण वेळींच खबरदारी घेऊन पिछेहाट केली पाहिजे, व या करतां सुशिक्षित तरुणांनी मध्यपान निषेधक चळवळी हातांत घेतल्या पाहिजेत. पतितपरावर्तनासारखे कार्य करावयाचें आहे, त्याकरीतां अगोदर लोकमत जागृत केलें पाहिजे. हिंदुधर्म व ख्रिश्चनधर्म यांची तुलनात्मक विवेचनपद्धती लोकांपुढे मांडली पाहिजे. याची सर्व जबाबदारी नवीन सुशिक्षित पिढीवर आहे. त्यांनी प्रथमत: जनतेची भावना जागृत केले पाहिजे. सरकारी नोकरी ह्मणजे सर्वस्व हें तत्त्व सोडून आह्मी आपलें कर्तव्य योग्य प्रकारें बजाविलें पाहिजे. तरच आपल्या देशाची उन्नति होईल. आपला भूतकाळ अत्यंत उज्ज्वल होता. पण तो उज्ज्वल होण्यासाठी जसे प्रयत्न आमच्या पूर्वजांनी केले, तसेच प्रयत्न आपण आपला भविष्य काळ उज्ज्वल होण्याकरीता करावयास नको काय?

शेवटी, सुप्रसिद्ध हिंदी कवि मैथली शरण गुप्त यांच्या काव्यांतील तरुणास उद्देशून काढलेले उद्गार लिहून, ही विस्तार पावलेली लेखमाला पुरी करतो. *'हे नव युवाओ देशभर की दृष्टि तुमपर ही लगी है, मनुज जीवन की तुह्मीमें जोति सबसे जगमगी। दोगे न तुम तो कौन देगा योग देशोद्धा में, देखो कहाँ क्या हो रहा है आजकल संसार में।'*

*(गुरुवार, दि. २६ ऑगस्ट १९२३)*

# वामनावतार

वामनावतार हा अवतारमालिकेंतील पाचवा अवतार होय. पहिल्या पासून दहाव्यापर्यंत प्रत्येक अवतारांचा इतिहास पुराण रुपानें उपलब्ध आहे. त्यांत वामनावताराचा इतिहास भागवतांत फार मनोरंजक रुपानें लिहिला गेला आहे. कित्येक आधुनिक विद्वानांनी या इतिहासास उर्फ पुराणास कल्पित कादंबरीच्या सदरांत लोटून देऊन त्यांचा दर्जा कमी करण्याचा प्रयत्न केला आहे! तरी पण जर लालसायुक्त अंत:करणानें सूक्ष्म निरीक्षण केले असतां, या पुराणांतही पुष्कळशा गोष्टी, खुद्द इतिहासाप्रमाणेंच, मानवी व्यवहारास व समाजोन्नतीस उत्तम मार्गदर्शक असतात, असें आढळून येते. कादंबरीही जरी झाली, तरी ती तत्कालीन समाजस्थिति व लोकव्यवहाराचें चित्र मनोरंजक भाषेंत दाखविणारी असते. इतिहासकारांनी आपला इतिहास लोकांस रुक्ष वाटू नये, या हेतूनें त्याच इतिहासांतील पृथक-पृथक-प्रत्यक्षाप्रत्यक्ष गोष्टी मनोरंजक भाषेंत लिहिल्या जाण्याचा प्रघात घातला असावा. त्यापैकीच ही कादंबरी सदरांत लोटली गेलेली पुराणें होत. या पुराणांत पुष्कळसा तत्कालीन इतिहास मनोरंजक भाषेंत व रुपकरूपानें सांगितलेला असून त्यांत समाजोन्नतीचें मार्ग दिग्दर्शन केलेलें असतात. अशा पुराणांमध्ये वामनावताराच्या इतिहासाची गणना आहे. त्यांतील रुपकाचा उलगडा केल्यास त्यापासून फार बोध घेण्याजोगा आहे.

दैत्यवंशीय भगवद् प्रल्हाद याचा नातू व विरोचनाचा पुत्र बलीराजा यानें आपल्या सकलगुणसंपन्नतेच्या जोरावर देवांस पावलो पावलीं मान खाली घालावयास लावून त्यांचें सर्व वैभव हरण करून घेतले, ही स्थिति देवांस फार असह्य व अनिष्ट वाटून गतवैभव परत संपादण्याप्रीत्यर्थ त्यांनी चळवळ चालविली. शेवटी सभा, परिषदा वगैरे भरवून असें ठरविलें, की श्रीविष्णूनें वामनावतार घेऊन ह्मणजे ठेंगू बटूचें सोंग घेऊन बलीराजानें चालविलेल्या सर्वाजित यज्ञसमारंभास जावें व तेथें राजापाशी तीन पावलें भूमिभिक्षा मागावी.

ठरावाप्रमाणें श्रीविष्णूने वामन बटूचें सोंग घेतलें, व बलीराज्यांतील यज्ञ मंडपांत थेट प्रवेश करून बलीराजाची भेट घेतली. ब्राह्मणांस पाहातांच राजाने शिष्टाचाराप्रमाणे बटूचे सुस्वागत केलें. नंतर वामन बटूनें, आधीच ठरलेली, तीन पावलें भिक्षा मागितली व बलीराजानेंहि आपल्या व्रतास अनुसरुन भिक्षेप्रीत्यर्थ पाणी सोडलें व तीन पावलें जमीन पाहिजे तेथें मोजून घेण्यास बटूस सांगितले. इतक्यांत, वामन बटूनें एकाएकी, विश्वरूप घेऊन दोन पावलांत ब्रह्मांड व्यापिले, व तिसऱ्या पावलासाठी जागा बलीराजापाशी मागितली अशावेळी तिसऱ्या पावलांस ब्रह्मांडांत कोठेंच स्वमालकीची जागा राहिली नाही, असें पाहून राजानें आपलें मस्तक वामन बटूपुढे लवविलें, तेव्हां तिसऱ्या पावलाप्रीत्यर्थ बटूने बलीराजाच्या मस्तकावर पाय देऊन राजास पाताळांत लोटून दिलें. अशा रीतीनें देवांनी आपलें गतवैभव परत संपादन केलें. असा हा पुराणांतील वामनावताराचा इतिहास आहे.

आमच्यात हें तत्कालीन इतिहासाचें रुपक रुपांत केलेलें दिग्दर्शन होय. तेव्हां जरा तारतम्य ज्ञानाच्या दृष्टीनें पाहिल्यास, आमच्या आजकालच्या परिस्थितीवरसुद्धा, या रुपकरुपानें लिहिलेल्या इतिहासापासून पुष्कळसा बोध घेण्यासारखा आहे.

आजकाल आमची स्थिती वर वर्णन केलेल्या देवांसारखी झालेली आहे. पाश्चात्य राष्ट्रांनी भौतिक शास्त्रें व प्रवृत्तिमार्ग यांच्या जोरावर आमचें सर्व वैभव हरण केलेलें आहे. अशा स्थितींत वामनावतारापासून तीन पावलांत देवांनी जसें आपलें गतवैभव परत संपादन केलें, तशाच रीतीनें आज आह्मींही केलें पाहिजे. तरी या कार्यास वामनावताराचा इतिहास बराच मार्गदर्शक होऊं शकेल. तेव्हां वामनबटू व तीन पावलें याचा आधी विचार करू.

वामनावतार ह्मणजे कीर्तनकार सांगतात त्याप्रमाणें एक सुंदर, गुलजार व ठेंगू बटू, नसून लीनता व साधी राहणी असा त्या रुपकाचा उलगडा करता येईल. देवांनी आपल्या ऐषारामाच्या निद्रेंत आपले वैभव उर्फ स्वातंत्र्य नष्ट झालें असें पाहून लीनता व साधी राहणी स्वीकारली. लीनतेशिवाय बाहुबलाच्या जोरावरसुद्धा गतवैभव परत संपादितां येतें. पण दैत्य इतके प्रबल झालें होते की, बाहुबलाचा उपयोग करणें देवांस तत्कालीन

परिस्थित्यनुसार शक्य नव्हते. यावरुन देवांस वामनावताराचीच आवश्यकतां भासली.

अशीच-देवांच्या तात्कालीन स्थिति सारखीच- आजकाल आमचीही स्थिति झालेली आहे. त्यावरुनही आह्मांसही वामनावतार घेतला पाहिजे. ह्मणजे लीनता व साध्या राहाणीचें व्रत स्वीकारलें पाहिजे. सारांश जेत्या देशाप्रमाणें जीत देशांचीही उन्नति करून घेऊन गतवैभव परत संपादन करण्याचें असल्यास वरील 'व्रत' हें गणेश पूजन होय. असा पहिला बोध वामनावतारापासून घेतां येतो.

पुढें बटूनें बलीराज्यांत विश्वरूप घेतलें व तीन पावलांत देवांनी आपलें गतवैभव परत संपादिलें असें रूपक आहे.

येथे तीन पावलें याचा अर्थ 'एक यार्ड' नसून तीन कार्ये होत असा उलगडा घेतां येईल. व विश्वरूप घेतले याचा उलगडा- हीं तीन कार्ये फार व्यापक स्वरुपांत चालविली सार्वत्रिक स्वरुपांत आचरिली गेली - असा करीता येईल. तेव्हां गतवैभव परत संपादनार्थ देवांनी लीनता व साधी राहाणी याच्या पायावर तीन कार्ये फार व्यापक स्वरुपांत चालविली- असा वामनावताराच्या इतिहासाच्या रुपकाचा उलगडा होतो. तेव्हां ही तीन कार्ये कोणती याचा पुढें विचार करूं.

रुपकाच्या उलगड्यासाठी आधीं तिसरें पाऊल ह्मणजे तिसरें कार्य घेऊ, या कार्याच्याद्वारें देवांनी राजास पाताळांत लोटून दिलें ह्मणजे राजास पदभ्रष्ट केलें असे रुपक आहे. तेव्हा पदभ्रष्ट केलें ह्मणजे राजकीय सुधारणेच्या द्वारा देवांनी स्वराज्य स्वातंत्र्य मिळविलें असा त्याचा थोडक्यांत स्पष्टार्थ आहे.

आतां राहातां राहिल्या पहिल्या दोन पावलांचा ह्मणजे दोन कार्याचा विचार ही दोन कार्ये अशा रीतीनें बजावली गेली, की ती तिसऱ्या कार्यास फार पोषकच अशी होती. तेव्हां राजकीय सुधारणेस उर्फ स्वराज्य संपादनार्थ कोणचीं दोन कार्ये साहाय्यभूत होतात हें पाहिलें पाहिजे.

इतिहासांत जें घ्यावयाचें असतें तें त्यांतील 'कारण' व 'तत्त्व' होय.

कार्य घ्यावयाचें नसतें. कारण तत्त्वें व कारणें सम परिस्थितीत सर्व सामान्य असतात. कार्ये त्या त्या निरनिराळ्या परिस्थित्यनुरुप घडलेली असतात. शिवाजी महाराजानें एकीच्या जोरावर स्वराज्य संपादिलें या इतिहासापासून एकी हें तत्त्व घ्यावयाचें असतें व त्या तत्त्वाप्रीत्यर्थ जें कार्य करावयाचें असतें तें त्या त्या विवक्षित परिस्थितीवर अवलंबून असतें. असो.

सारांश, देवानीं पाहिलीं दोन कार्ये तिसऱ्या कार्यास ह्मणजे स्वातंत्र्य संपादनाच्या कार्यास पोषक अशीच आचरली इतकाच येथें बोध घेणें भाग आहे, कारण तत्कालीन देवांच्या व आज आमच्या गतवैभवाच्या वस्तुस्थितींत जरी साम्य असलें, तरी पण देवांच्या तत्कालीन परिस्थितीसारखी मात्र आजकाल आमची परिस्थिती नाही, यावरून तिसऱ्या कार्यास पोषक अशी पहिली दोन कार्ये देवांकडून अमुकच आचरली गेली याचा ऊहापोह करीतां ती, आमची सद्यस्थिति व कालदेश वर्तमानानुसारच ठरविणे भाग आहे.

तेव्हां या दृष्टीनें पाहिलें असतां, आमच्या गतवैभवाच्या पुनर्प्राप्तीसाठी आह्मी लीनता व साधी राहाणी याच्या पायावर व फार व्यापक स्वरुपांत आचरिलेली पहिली दोन कार्ये याच्या जोरावर राजकीय सुधारणा उर्फ स्वराज्यसंपादन हें जें तिसरें कार्य ते शिस्तीनें सर्व समंजसपणानें पुढें टाकिलें पाहिजे. असा बोध वामनावतार इतिहासापासून मिळतो.

याच कार्यपरंपरेने आमल्या अंगांत पात्रता आणून मिळविलेलं स्वराज्य तें खरें स्वराज्य होय, नपेक्षां मुद्दाम गळ्यांत बांधिलेले स्वराज्य – ह्मणजे कोंबड्यात उकीरड्यांत मिळालेलें रत्न होय.

तरी तिसऱ्या कार्यास ह्मणजे खरें स्वराज्य मिळविण्यास पोषक अशी पहिली दोन कार्ये कोणती असावी याचा आमच्या परिस्थित्यनुसार पुढें विचार करू.

*(गुरुवार, दि. १३ सप्टेंबर १९२३)*

# प्रागतिक संघाची परिषद

पोर्तुगीज लोकसत्ताक राज्यपद्धतीची अमदानी या आमच्या प्रांतात सुरू झाल्यापासून, हिंदु समाजास कोठे आपली मान वर काढण्यास फुरसत सापडली. पूर्वीची ती एकमुखी धर्मवेड्या कॅथोलिक पाद्रीच्या हुकुमतीनें चालणारी पदोपदी परधर्मीयांस बेमुर्वतपणें चिरडविणारी राज्यसत्ता नामशेष होऊन तिच्या जागी लोकमतानुवर्ती, धार्मिक बाबतीत तटस्थ, सर्वास समतेनें वागणारी, उदार मताची लोकसत्ता स्थापन झाल्यावर कोण सुविचारी मायेचा पूत आपला आळस झाडून जुलमाच्या बर्फाने गारठलेले हातपाय हलविल्यापासून राहील? पोर्तुगीज लोकांनी या देशात आपल्या सत्तेबरोबर क्रुसासही आणल्यानंतर येथील रहिवाशांना धर्माच्या नांवाखाली जो जुलूम, जी यातायात भोगावी लागली, तिची आठवण झाली तर डोळ्यात आसवे आणून तें दुःख हलके करण्यापलिकडे आमच्या हातून कोणतीच कामगिरी झाली नाही, व होणेही शक्य नव्हती. परंतु सुदैवानें राज्यपद्धतीतच बदल झाल्यामुळें आता ह्या बारा तेरा वर्षात कायदेशीर रीतीनें आमची नवी जुनी गाऱ्हाणी सरकारपुढें मांडून, दाद लावून घेण्याची सुसंधी अनायासे प्राप्त झाली आहे. तिचा योग्य फायदा घेता यावा, सर्व हिंदुंना एका केंद्रात राहता यावे, आपल्या गरजा काय आहेत ह्याचा विचारपूर्वक खल करीतां यावा, त्या येथील आणि मध्यवर्ती सरकारांत मांडून भागविता याव्यात या आणि एकंदरीत इतर समाजांच्या बरोबरीनें राहून, खांद्यास खांदा लावून आपल्या जन्मदात्या मायभूमीचे अंशतः पांग फेडितो यावे यासाठी एका संघटित संस्थेची आवश्यकता होती, ती आज दोन वर्षेपर्यंत मधून मधून आपलें अस्तित्व प्रकट करणाऱ्या प्रागतिक संघानें दूर केली आहे.

उपरिनिर्दिष्ट संस्था पोर्तुगीज हिंदुस्थानांतील सुशिक्षित व देशहिताकडे नजर देणाऱ्या गृहस्थांस काही अनोळखी नाही. या प्रांतातून पोर्तुगालच्या पार्लमेंटात व सेनेट सभेत, निवडून जाणाऱ्या प्रतिनिधींच्या निवडणुकीत भाग घेतल्यामुळें पोर्तुगालपर्यंत तिची ओळख वाढली आहे. या उभय निवडणुकांत तीस यश मिळाले नाही. हे जरी खरे असले तरी त्या दोनहि प्रसंगी तिला

आपल्यामागें असलेले लोकमत अजमविता आले. सरकारी अधिकारी, सदैव आह्मांस दूर सारण्यास, व हिंदु ह्मणजे रानटी लोक, त्यांना शिस्त नाही, त्यांना राजकारण समजत नाही. त्यांच्या हालचाली निर्जिव आहेत हा आपला आजपर्यंतचा समज चुकीचा – मूर्खपणाचा होता ही जाणीव होण्यास ह्याच निवडणुकी कारण झाल्या.

ह्या नंतरच्या काळात संघाकडून काहीच ह्मणण्यासारखी कामगिरी झाली नाही व वरवर जरी शिथिलता आलेली दिसत होती, ही गोष्ट लपवून ठेवण्यात अर्थ नाही, परंतु आलेली शिथिलता जावून संस्था कार्यक्षम होण्यास, सर्व हिंदूंची निदान त्याच्या सभासदांची एक परिषद भरविणे अगत्याचे आहे, असे कार्यकारी मंडळास वाटून, गेल्या मार्च महिन्यांत मडगांव येथें भरलेल्या मंडळाच्या सभेत परिषद भरविण्याचा व त्या कामी लागणारे सर्व अधिकार मंडळाचें उपाध्यक्ष डॉ. आत्माराम गोविंद बोरकर यांजकडे सोंपविण्याचा असे दोन ठराव सर्वानुमतें पास करण्यात आले व त्याप्रमाणे कार्यास सुरुवातहि झाली आहे. बहुतकरून येत्या नाताळाच्या सुटीत कवळे येथे परिषदेचे पहिले अधिवेशन भरणार आहे, असें ह्मणण्यास हरकत नाही.

अशा रीतीने कार्यकारी मंडळ व डॉ. बोरकर यांनी आपली जबाबदारी ओळखून ती पार पाडण्याच्या कार्यास आरंभ केला असून, लवकरच जाहीर पत्रके, आमंत्रण पत्रिका निघणार आहेत. तेव्हा या पुढें आपल्या वाट्यास येत असलेली जबाबदारी शिरावर घेण्यास ह्मणजे आपण संघाचे सभासद नसलो तर सभासद होऊन आपल्या आगमनांनी परिषदेची बैठक उत्तम रीतीने पार पाडण्यास, सर्व हिंदुजनतेंनें पुढे सरसावले पाहिजे. संघ ही संस्था सर्व हिंदूच्या हिताकरीता निर्माण झाली असल्यावरून ती सार्वजनिक आहे. तिच्या कार्यास सर्वांनी हातभार लावला नाही तर कार्यकारी मंडळाने आरंभिलेले हे महत्त्वाचे कार्य लोकमताचा जोर नसल्यामुळें लंगडे राहून, हिंदूसमाजाच्या जीवावर जीव घेऊन राहिलेली ही अत्यंत उपयुक्त संस्था हतबल व पोरकी होऊन तिची व पर्यायाने एकंदर हिंदुसमाजाची इभ्रत खालावल्यावासून राहणार नाही.

प्रागतिक संघ ही संस्था, कांही व्यक्तींनीच स्थापन केली असली तरी ती जाहीर रीतीने, राजधानीच्या शहरांत, कॉंग्रेस प्राव्हिंसिअलच्या बैठकीस

बहुतेक ठिकाणचे लोक जमलेले असतां, स्थापन झाली असल्यावरुन तिच्यावर सर्व हिंदूंची मालकी आहे. याची खात्री सध्यांच्या स्थितीत असलेल्या तिच्या नियमावलीवरून कोणासही करून घेतां येईल. संघाच्या स्थापनेस आपण हजर नव्हतो. किंवा सभासदांच्या पटांत आलें नाव नाही ह्मणून तो आपला होऊ शकत नाही, ही शंका जर कोणाच्या अंत:करणात वास करीत असेल. तर ती घालविण्यास त्यांनी ह्या होऊ घातलेल्या व लवकरच भरणाऱ्या परिषदेच्या पहिल्या अधिवेशनास सक्रीय हजर राहणे अगत्याचे आहे व आह्मी असेहि सांगू शकतो की परिषदेस जमणाऱ्या सर्व सभासदांस संघाबद्दल कधीही दुमत राहणार नाही.

परिषदेस हजर राहून शंकितांनी संघ सर्वांचा आहे, अशी खात्री करून घेतली ह्मणजे, संघाचा पाया बळकट आहे, त्याहून बळकट बनून त्याला आपल्या शिरावर असलेली कामे झेलून धरण्यास क्षीती राहणार नाही. व सदोदीत असाच आत्मविश्वास वाढत राहिला तर, आपल्या पुढें असलेलें ध्येय साध्य करण्यास संघास एक तपाचाहि अवकाश लागणार नाही.

हिंदु बांधव हो संसार हा एक प्रकारे संशयखोर आहे. त्याच्या नादी लागून 'काय होईल काय नाही' या निराशावादी मंत्राचा जप न करीता '*यत्नेकृते यदि न सिद्धति कोत्र दोष:।*' या वचनावर विश्वास ठेवून नुकत्याच रुजलेल्या व लोकमताच्या कुंडीत लहानाचा मोठा होऊन आपल्या फळापुष्पांनी समाजची तहानभूक निववू पाहणाऱ्या या संघाच्या रोपट्यास तुह्मी आपला ह्मणणार नाही काय? तुमच्या आश्रयावरच त्याचें जीवित अवलंबून आहे. त्याला तुमच्या शीतळ छायेत वाढू द्या. तुमची पांग फेडण्याची ताकद त्यांच्या अंगात आणण्यास त्याच्या मुळाशी प्रेमजलाचें सिंचन करून साह्याचे मनमुराद रक्त द्या. त्याची उपेक्षा करूं नका. त्याची आबाळ झाली तर, तो नेभळा, निर्जीव होऊन जाईल याची कल्पना करा. तुमची अपेक्षा सिद्धीस नेण्यास प्रागतिक संघासारखी एखादी संस्था हवीच होती, तर तिला दूर लोटून आकाशांतील ताऱ्यांकडे आशापूर्ण दृष्टीने पाहण्यांत कांहीच साध्य होणार नाही हें लक्षांत आणा आणि संघाचे सभासद होऊन परिषदेसहि आपल्या बुद्धीचा फायदा द्या. हीच तुह्माकडे आमची विनंती आहे.

प्रागतिक संघ :- ह्या संस्थेविषयी बरीवाईट चर्चा भारतात अनेकदां झालेली असून, संघ कार्यक्षम व्हावा, त्याच्या हातून अखंड लोकसेवा व्हावी व तो लोकप्रिय व्हावा इतकाच त्या चर्चेचा हेतू होता, हे वाचकांस कळुन चुकलेच आहे. संघाचें अस्तित्व नावापुरतें नसून, आपल्या पराक्रमानें हिंदु समाजाचें नाव राजकारणात अजरामर करण्यासाठी आहे. याची जाणीव संघचालकांत जिवंत राहावी असे कोणास वाटणार नाही? असो. आजच्या अग्रलेखांत ह्मटल्याप्रमाणे झाल्या गेल्या गोष्टींचा खल करण्यात वळ न दवडता सर्वांनी संघाची परिषद यशस्वी होण्यासाठी तनमनधनानें खटपट करावी, अशी सर्व हिंदुबांधवांस आग्रहाची विनंती आहे.

*(गुरुवार, दि. ६ डिसेंबर १९२३)*

# प्रागतिक संघाची परिषद

प्रागतिक संघाच्या या परिषदेमुळे कोणकोणतें विषय चर्चेस येण्यासारखे आहेत त्यांचे विवेचन आज आह्मी करणार आहो. प्रागतिक संघाची स्थापना होऊन आज जवळ जवळ अडीच वर्षे झाली, पंरतु अद्याप तिची कायम ह्मणण्यासारखी घटना झालेली नाही. जी कांही आहे ती केवळ कामचलाऊ स्वरुपाची अशीच आहे. येत्या परिषदेत बहुमतानें तीच जर पास झाली तर मग तिला कायम समजण्यात येईल. त्याचप्रमाणें संघाचें ध्येय काय असावे या बद्दलची चर्चा याच परिषदेंत होऊन नंतर त्या ध्येयास पोषक अशा साधनांचाहि विचार होणार आहे. आमच्या मतें परिषदेचें अंतिम ध्येय आजच ठरवितां येण्यासारखें नाही. तरीपण हिंदुसमाजाची राजकीय सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक वगैरे सर्व बाजूंनी उन्नति होऊन तो इतर ख्रिस्ती, मुसलमान, पार्शी समाजाच्या खांद्यास खांदा लावून, पोर्तुगीज रिपब्लिकच्या निशाणाखाली, पूर्ण स्वयंसत्ताक राज्यपद्धतिचा उपभोग घेण्यास पात्र होईल. एवढ्यापुरतें, सध्यांतरी असलें पाहिजें हें विचाराअंती कोणासही दिसून येईल. ध्येय ठरलें ह्मणजे त्या ध्येयाजवळ नेणाऱ्या साधनांची गरज

आहे. शिक्षणाला अग्रस्थान दिलें पाहिजे. सध्यां आमचा समाज घेत असलेलें प्राथमिक शिक्षण मराठी भाषेंतून असल्यामुळें कांही अंशी पद्धतशीर नसतें, कारण त्या बाबतीत होत असलेले प्रयत्न खासगी स्वरुपाचें असतात. वरून त्या शिक्षणाचा एकमेकांशी मेळ बसावा तसा बसत नाही. त्या पुढील शिक्षण सर्वस्वी परकी अशा पोर्तुगीज भाषेंत मिळत असल्यामुळे तें, अपुरें तुटपुंजे व लहानपणीच विद्यार्थ्यांची बुद्धी खुरडून टाकणारे असतें. ह्मणून गांवोगांव प्राथमिक शिक्षणाच्या मराठी शाळा सरकारी आश्रयानें स्थापन झाल्या पाहिजेत. सध्याचें गव्हर्नरसाहेबांनी शिक्षणासंबंधीचें बिल कायदे-मंडळांत आलें होतें. त्यावेळी त्यांत मराठी शाळांची तरतूद करण्यांत यावी ह्मणून, हिंदुसमाजाकडून जी चळवळ झाली तीस मान देऊन, त्यांत काही मराठी शाळांचा अंतर्भाव करण्यांत आल्या नंतर मग बिल पास झालें व वरिष्ठ सरकारच्या मंजुरीसाठी पोर्तुगालला रवाना झाले तें अद्याप तेथेचे भिजत पडलें आहे. तेव्हां त्या शाळा किती असाव्या, कोठें स्थापन व्हाव्या, त्यांत देण्यांत येईल तें शिक्षण कोणत्या धर्तीवर असावे यांचा विचार परिषदेनेंच केला पाहिजे. शिवाय मराठी भाषेची व्याप्ति प्राथमिक शिक्षणापुरतीच न राहतां तिला लिसेव, सेंत्राल, नोर्माल स्कूल, इंस्तितुत कोमेर्सियाल, या दुय्यम शिक्षणाच्या शाळांतूनहि देशी भाषेच्या नात्याने हक्काचे आसन मिळविण्याची आणि आज मराठी भाषाभिज्ञांस जो निवडणुकीचा हक्क नाही. तोहि मिळवून घेण्याची तजवीज परिषदेनेंच करणें प्राप्त आहे.

मराठी भाषा ही आह्मां अर्ध्याअधिक लोकसंख्येनें असलेल्या हिंदूंची मातृभाषा आहे. आमचें धार्मिक वगैरे सर्व प्रकारचे वाङ्मय त्या भाषेंत भरून राहिलें आहे. खासगी व्यवहारांत आमची बोली कोंकणी अशी दिसत असली, तरी ती मराठीचेंच एक प्राकृत व जुनें स्वरुप आहे. शिवाय मराठी भाषा बोलणाऱ्या दोन कोटी लोकांशी आमचें धार्मिक, राजकीय, औद्योगिक, शैक्षणिक वगैरे संबंध निगडित झालेले आहेत. व ते केव्हांहि तोडतां येणें शक्य नाही, हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. मातृभाषेंत मिळालेलें शिक्षण आईच्या दुधासारखें असून, परभाषेंत मिळालेलें शिक्षण दाईच्या दूधाच्या देखील किंमतीचें नसून, स्वत्वाची हानी करणारें आहे. कोणतेहि

सुधारलेलें राष्ट्र परदेशी भाषेंतून, आपल्या मुलांना शिक्षण देण्यास कबूल होणार नाही. पराधीनतेमुळें आह्मी आजवर हेळसांड केली त्याचा वचपा भरून काढण्यांस आजच्या या स्वतंत्रतेच्या, स्वयंनिर्णयाच्या काळांत आह्मांस राजरोस मुभा आहे. शेजारच्या इंग्रजी हिंदुस्थानांतील प्राथमिक शिक्षण, त्या त्या प्रांतात चालू असलेल्या देशी भाषांतूनच देण्यांत येत असते. इतकेंच नव्हें तर, तेथील तज्ञांच्या मागणीवरुन युनिव्हर्सिट्यांतून देखील देशी भाषांचा अधिकारानें प्रवेश झाला आहे. या सर्व विवेचनावरुन मराठी भाषेंतून शिक्षण मिळविण्यांस आह्मीं किती जोरदार व संघटित चळवळ केली पाहिजे हें दिसून येईल व हा प्रश्न सोडविणें प्रा. संघानें हाती घेणें किती अगत्याचें आहे हेंहि कळून येईल.

मराठी शाळांच्या नावांवर सरकार आज हजारों रुपये खर्च करीत असते, याबद्दल वाद नाही, परंतु उपयोगाच्या दृष्टीनें तर या शाळा वांझोट्याच ठरल्या आहेत. याचें कारण राजदरबारांत त्या भाषेला मान नाही हें होय. आपण रेजिस्त सिव्हिलखात्यांत गेलों तर मराठी सही घालतां येत असून सुधां निरक्षरतेचा छाप कपाळावर मारून घ्यावा लागून आपल्यतर्फे तिसरा साक्षीदार, पोर्तुगीज सही जाणणारा, बोलवावा लागतो. कोणत्याही निवडणुकांच्या प्रसंगी उमेदवार प्रतिनिधीच्या गुणावगुणाचें माप काढण्याचें ज्ञात असतांना आमच्यांतील बऱ्याच विचारी लोकांना मतदारीस मुकावें लागतें. ताबेलियावांच्या कचेरींत गेलों व मराठी सहीची ओळख पटवून मागितली, तर केवळ ताबेलियांव मराठी भाषेंत किंवा लिपीत अनभिज्ञ ह्मणून बरोबर दोघें साक्षीदार न्यावे लागून, शिवाय तिप्पट फीचा भुर्दंड भरावा लागतो. ही आमच्या भाषेची दैना होईल. तितक्या लवकर संपली नाही. तर आमची उन्नति होणें कदापिही शक्य नाही हें समजून आह्मीं आमचें पाऊल उचललें पाहिजे.

मराठी भाषाभिज्ञास निवडणुकांत भाग घेतां येत नसल्यानें आमचें राजकीय बळ किती खच्ची झालें आहे व त्यामुळें कायदेमंडळांतील लोकनियुक्त सभासद आणि सेनेट सभा व पार्लमेंट सभा यांत आमच्यातर्फे जाणारे प्रतिनिधी आह्मांकडे किती दुर्लक्ष करतात याची जाणीव फारच थोड्यांना असेल.

आमच्या गरजा भागवून घेण्यास आधीं आमचें राजकीय बळ जो मतदार वर्ग, त्याची वाढ होण्यास मराठी भाषाभिज्ञान मताधिकार मिळवून घेतला पाहिजे. कायदेमंडळाचे सभासद ना. व्यंकटेशराव सरदेसाई यांनी मार्गे एक बिल आणून पास करून घेतलें होते. तेंहि पोर्तुगालला जाऊन घोरत पडलें आहे. त्यास हालवून जों करण्यात परिषदेपुढेंच तो प्रश्न आणून सोडविला पाहिजे.

शिक्षण व मतदारी यांच्या बरोबरीनेंच गोरक्षण हाहि एक विषय हिंदूच्या जिव्हाळ्याचा आहे. व तो हाती घेऊन तडीस लावणें यांतच हिंदुसमाजाचा धर्माभिमान दिसून येणार आहे. फक्त गोमांतका पुरतेंच पाहिलें तर वर्षाच्या कांठी ५०-६० हजार गुरांचा कसायांकडून संहार होत असतो. यांत हिंदु जनतेच्या धर्मभावना दुखवल्या जातील, लोक दूधदुभत्यास महाग होतील किंवा गुरांवाचून शेती पडंग राहील, ही कल्पना गोमांसास चटावलेल्या ख्रिस्ती समाजांतील कांही पाश्चातलेल्या गृहस्थांनच्या आणि सरकारच्या लक्ष्यांत सुद्धां येत नाहीं. हें आमचें दुर्दैव तर खरेंच. पण त्याहिपेक्षां आमची मूकवृत्तीच बहुतांशी कारण झाली आहे. कॉँग्रेस प्रोव्हिंसिआलच्या शेवटल्या बैठकीत आचारणांत आणण्याइतकें महत्त्व सरकार व ख्रिस्ती लोक आह्मांस देत नाहींत, हें लक्षांत आणून परिषदेपुढेंच हाहि प्रश्न यावयास पाहिजे.

प्रागतिक संघानें किंवा प्रागतिक संघाच्या सभासदांनी निवडणुकांत भाग घेणें अत्यावश्यक आहे. आज कायदेमंडळ, सेनेट सभा, पार्लमेंट सभा, यांत आमच्या वतीनें झगडणारे सभासद, आह्मी निवडणुकांत भाग घेतल्याशिवाय, मिळणार नाहींत आणि जर करीतां प्रागतिक संघाच्या तर्फेनें जाणाऱ्या, आमच्या मागण्यांचा उच्चार, आचार व पुरस्कार त्या त्या लोकसंस्थांतून झाला पाहिजे, तर प्रागतिक संघानें ह्मणजें संघाच्या सभासदांनी निवडणुकांत सामील होऊन आपणांस मदत करतील अशा उमेदवारांसच निवडून दिलें पाहिजे. आतां स्थानिक ह्मणजे जुंत लोकालें व मुनिसिपालिट्या यांच्या निवडणुकींत प्रागतिक संघाने न पडलेलेंच बरें. कसेंहि असो. निवडणुकींत भाग घेतल्याशिवाय गत्यंतर नाही. परंतु तारतम्य ओळखून कोणकोणत्या निवडणुकांत भाग घेणें रास्त आहे. हें, परिषदेंतच ठरविणें भाग आहे. याशिवाय आर्यवैद्यकावरील बंदी उठवून त्यांस प्रोत्याहन

देवविणे, विवाह नोंद प्रकरणासंबंधीची रेजिस्त कायद्यांतील कांही कलमें बदलविणें, ख्रिस्ती धर्मास व ख्रिस्ती धर्मशिक्षणास होत असलेली सरकारी मदत काढविणें, कायदे कॉन्सिलांतील लोकनियुक्त प्रतिनिधींच्या जागांची लोकसंख्येप्रमाणें वाटणी करविणे, इ. विषय कांही कमी महत्त्वाचें नाहीत. त्यांचाही विचारपूर्वक खल होण्यास परिषदेची जागा योग्य आहे. त्या जागेची योग्यता वाढविण्यास आह्मी आमच्या आगमनानें व धनबुद्धिबलानें झटलें पाहिजे. आमच्या हांतून निर्धारपूर्वक कळकळीचें प्रयत्न झाले व प्रांतिक आणि वरिष्ठ सरकारपर्यंत आमच्या गरजा मांडण्यांत आल्या तर स्वतंत्रता, समता व बंधुता या त्रयींवर उभारलेलें व आपण होऊन जमाखर्चाचें व अंतर्गत कारभाराचे अधिकार आमच्या हाती देणारें पोर्तुगीज लोकसत्ताक सरकार आह्मांस नाखूष करणार नाही. अशी आमची मनोदेवता साक्ष देते. मात्र सर्व हिंदूनीं आपसांतील द्वेषभाव विसरुन जाऊन स्थानिक मतभेद बाजूस ठेवून, परिषदेच्या अधिवेशनास हजर रहावें व संघाला जोमदार बनवावें. एकवेळ संघाचें मंदिर ऐक्याच्या पायांवर उभारलें गेलें आणि परस्पर सहानुभूतीच्या तत्त्वानें साकारण्यात आलें तर पुढील कार्य नेटानें चालविण्यास सर्व शक्तीमान परमेश्वराचें अधिष्ठानहि त्याच मंदिरांत सापडल्याशिवाय राहणार नाही.

*(गुरुवार, दि. १३ डिसेंबर १९२३)*

# प्रागतिक संघाची परिषद

## जाहीर पत्रक

आह्मीं आमच्या नं. ३६ च्या अंकांत भाकित केल्याप्रमाणें प्रागतिक संघाच्या परिषदेचें हरएक कामकाज पाहण्यास कार्यकारी कमिटीनें निवडलेले मुखत्यार डॉ. आत्माराम गोविंद बोरकर यांकडून आलें आहे. आह्मा प्रमाणेंच तें इतर सद्गृहस्थांसहि रवान होणार यांत शंका नाही. या पत्रकांत संघ स्थापन झाल्यापासूनची सर्व माहिती थोडक्यांत पण खुलासेवार दिली आहे. ती वाचून, संघाबद्दल व होऊं घातलेल्या परिषदेबद्दल आमच्या समाजांत

कोणत्याहि मतभेदाला वाव मिळणार नाही, अशी आह्मांला खात्री वाटते. केवळ संघाने आरंभिलेलें कार्य यशस्वी व्हावें, परिषदेच्या निमित्तानें संघाची छाप सरकार व इतर समाज यांवर पडावी, या सदिच्छेची छाया या पत्रकांत स्पष्ट उमटलेली दिसतें. हें पत्रक प्रसिद्ध करून डॉ. साहेबांनी दाखविलेलें धोरण संघाचा पाया अधिकाधिक बळकट होण्यास कारणीभूत होईल, असेंच आह्मांप्रमाणेंच संघाच्या सर्व हितचिंतकांना वाटल्यास नवल नाही.

## पुढील कर्तव्य

कार्यकारी कमिटीचे मुखत्यार या नात्यानें संघाचे उपाध्यक्ष डॉ. बोरकर यांनी उक्त जाहीर पत्रकांच्याद्वारें संघाबद्दलचा खुलासा केलाच आहे. आतां संघाचे सभासद होऊन परिषद यशस्वी करण्याची जबाबदारी सर्व हिंदु समाजावर ओघानेंच आली आहे. जगांत चाललेल्या निरनिराळ्या चळवळींची वर्तमानें नित्यश: आमच्या वाचनांत येत असून सुद्धां, आह्मी मात्र मृतावस्थेंतच पडून राहणें संभवनीय नाही. क्षणोक्षणीं काळ बदलत आहे. त्याप्रमाणें 'न बदलाल तर मरून जाल' या श्री विवेकानंदांच्या उक्तीची आठवण ठेवून, आह्मांसहि शक्यनुसार हातपाय हालविल्याशिवाय गत्यंतर नाही. मोनार्कींत वारा उलट दिशेंनें वाहत होता. आता या रिपब्लिकांत योग्य दिशेने वाहत आहे. त्याचा फायदा घेण्यास यापूर्वीच खटपट करावयास पाहिजे होती, तरी पण एव्हांच जागें होऊन कार्याला लागणें श्रेयस्कर आहे व संघामार्फत भरणारी परिषद त्यास योग्य स्थळ आहे. हें जाणून आमच्या समाजांतील सर्व लहानथोर सुविचारी गृहस्थ कोणत्याहि खासगी मतभेदांस, पक्षभेदांस थारा न देतां, कार्यकारी कमिटीनें आरंभिलेल्या या परिषदेच्या कार्यास हातभार लावण्याचें आपलें 'पुढील कर्तव्य' बजावतील अशी आह्मी आशा बाळगितो.

## स्वागत कमिटी

संघाची परिषद फोंडें महालांत भरावयाची असल्यामुळें, स्वागतकमिटींत त्याच महालांतील गृहस्थांची निवड झाली आहे. या कमिटीच्यामागून स्वयंसेवकांची भरती व्हावयाची, तीहि तेथेंच होण्यास अडचण

नसली, तरी आमच्या तरुणवर्गास स्वयंसेवेचें बाळकडूं मिळावें यासाठी इतर महालांतील तरुणांसहि स्वयंसेवक होण्याची परवानगी असणें इष्ट आहे, असें आह्मांस वाटतें. स्वयंसेवक या नात्यानें परिषदेचें कामकाज जातीनें पाहण्यास मिळून त्या कार्यांतील थोडीतरी कामगिरी अंगावर घेण्याची स्फूर्ति तरुणमंडळींत दिसली, तर ती आह्मांस हवी आहे. कारण आज स्वयंप्रेरित बुद्धीनें स्वयंसेवाव्रतास वाहून घेणारी पिढीच पुढें पुढारी होण्यास लायक होणार आहे. हा दूरदर्शीपणा परिषदेच्या स्वागतकमिटीकडून दाखविला जाईल यांत संशय नाही. परंतु आह्मी आमचें कर्तव्य ह्मणून त्या दृष्टीने विचार करण्याची सूचना करितों.

## विद्यार्थी वर्ग

स्वागत कमिटीस सूचना केल्यानंतर विद्यार्थीवर्गाकडेहि वळणें रास्त आहे. या वर्गात श्रीगणेशाचें अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा देखील समावेश होत असला तरी स्वयंसेवक होण्याची लायकी मडगांव, ह्मापसें व पणजी येथील लिसेंवांतील दुय्यम व नोर्माल, इं. कुमेर्सियाल व मेडिकल स्कूल यांतील उच्च शिक्षण घेत असलेल्या प्रौढ विद्यार्थ्यांतच विशेष असूं शकेल. या वर्गानें स्वयंसेवक होण्याची कामगिरी पत्करल्यासच सोन्याहून पिवळें होणार आहे. त्यांनी मनावर घेतल्यास त्यांच्या पालकांकडूनहि त्यांना या समाजाहितवर्धक कामांत हरकत येणार नाही. ह्मणून त्यांनाहि या गोष्टीचा विचार करण्याची आग्रहपूर्वक सूचना होऊन ठेवितों. विद्यार्थीवर्गाशिवाय गांवोगांव स्वयंसवेक होण्यास लायक असे तरुण पुष्कळ असतील व आहेत हें आह्मी जाणून आहों. त्यांनीही यावेळी अहमहमिकेनें पुढं येऊन स्वयंसेवकांच्या यादींत स्वत:स नोंदून घेऊन संघास मिळतील तितके सभासद मिळविण्याची आद्य कामगिरी व त्यांच्या बरोबर परिषदेस हजर राहून सर्व कामांत स्वागत कमिटीस मदत करण्याची वगैरे हरेक कामगिरी पार पाडून संघाला जोरकस व स्थिर करण्याचें श्रेय घ्यावें आणि जगाला आपल्या जिवंतपणाची साक्ष पटवावी.

*(गुरुवार, दि. २० डिसेंबर १९२३)*

# प्रागतिक संघाची परिषद यशस्वी करा!

पोर्तुगीज हिंदुस्थानांतील सर्व हिंदूंच्या हितासाठी स्थापन झालेल्या प्रागतिक संघामार्फत भरविण्यांत येणाऱ्या वरील परिषदेचें १ लें अधिवेशन, येत्या २९/३० व ३१ या तारखांस, श्री स्थळ, कवळें येथें भरणार आहे, ही गोष्ट सर्वांना माहित होऊन चुकलीच असेल. संघाच्या कार्यकारी मंडळांचे मुखत्यार डॉ. बोरकर, यांनी प्रसिद्ध केलेलें माहितीपत्रक, परिषदेसाठी स्थापन झालेल्या स्वागत कमिटीनें पाठविलेलें आमंत्रणपत्रक आणि आमच्या शेवटच्या अंकाबरोबर निघालेलें पुरवणीपत्रक, यांच्या वाचनानें प्रागतिक संघ, त्यामार्फत भरणारी परिषद आणि परिषदेंचें कार्य यांविषयी आजकाल सर्वत्र पूज्यबुद्धी वाटत असून, डॉ. बोरकर, देसाई वगैरे मंडळींने कांही ठिकाणी जाहीर व खासगी रीतीनें आमंत्रणें देण्यास दौरा काढल्यामुळें त्यांत अधिकाधिक भर पडतच आहे. आजकाल जिकडे तिकडे संघाची परिषद हा एक बोलण्याचा विषयच होऊन बसला आहे. समाजांत देशहितासंबंधीचे, समाजहितासंबंधीचे विचार प्रसृत होणें समाजांत वसत असलेल्या दैन्याचा चटका बसून तें नाहीसें करण्याची तळमळ प्रत्येक अंत:करणांत उत्पन्न होणें हें कधींही झालें, तरी इष्टच आहे. परंतु, हे वाढीस लागलेले विचार जागच्याजागी नष्ट होऊं न देतां ते, वरीलसारख्या परिषदांतून विनिमयपूर्वक उच्चारुन दाखविले पाहिजेत. अशा रीतीनें विचारांचे पर्यवसान उच्चारांत होऊं लागलें, तर ते विचार आचारांत आणण्यास सुलभ झाल्याशिवाय राहात नाहीं व या कामीं समाजांतील सर्व शक्ती हळूहळूं एकवटूं लागतात, हें थोड्याशा इतिहासावलोकनानें कळून येईल.

आमच्या हिंदुसमाजांत देशहिताच्याकामी लावण्यासारख्या सर्व तऱ्हेच्या शक्ती आहेत, हें कोणासहि नाकबूल करतां यावयाचें नाहीं. संख्येनें जास्ती असलेल्या आमच्यांतील जमिनदार वर्गाची शक्ती, प्रत्येक शहरांतून, खेडेगांवांतून दिसणारी आमच्यांतील व्यापारी वर्गाची शक्ती, जुन्या अथवा नव्या शिक्षणानें मंडित असलेल्या आमच्यांतील सुशिक्षित वर्गाची शक्ती, ठिकठिकाणच्या व निरनिराळ्या सरकारी खात्यांतून काम करणारी

आमच्यांतील नोकरवर्गाची शक्ती आणि शेवटी रानेमाळ व खेडोपाडीं पसरलेल्या आमच्यांतील शेतकरी वर्गाची शक्ती एका केंद्रांत आणतां आल्यास तिच्या जोरावर समाजाचें केवढें मोठें कार्य होण्यासारखें आहे, याची कल्पना प्रत्येक सुशिक्षित अंत:करणांत उदित होत होती. मात्र ती व्यवहारांत आणून तिचा अनुभव घेण्यास आजच्यासारखी संधी आली नव्हती, ती प्रागतिक संघामुळें ह्मणा, अथवा उदार अशा लोकसत्ताक राज्यपद्धतींतदेखील अद्यापहि दिसत असलेल्या विषमतेमुळें ह्मणा, आज आह्मांस सुदैवानें प्राप्त झाली आहे. तिचा फायदा घेण्याचा अपूर्व उत्साह जिकडे तिकडे दिसावयास लागला असून, त्यामुळें समाजांतील सर्व विचारी व देशहिताविषयी तळमळणाऱ्या दूरदर्शी लोकांचे लक्ष परिषदेकडे लागलें आहे. ह्मणूनच आपल्या आगमनानें व धनबुद्धिबलानें परिषद यशस्वी रीतीनें पार पाडण्याचा सात्त्विक निश्चय त्याच्या विमल मुखावर प्रामुख्यानें झळकूं लागला आहे, हें सुचिन्ह नाही असें कोण ह्मणूं शकेल?

परिषदेच्या अधिवेशनाला मुक्रर केलेले स्थळ अनेक दृष्टींनी महत्त्वाचे आहे. ज्या उच्च व उपयुक्त ध्येयावर नजर ठेवून परिषद भरविण्यांत येत आहे, ते अल्पावकाशांत साध्य करून घेण्यास समाजांतील धनिकांची धनशक्ती, बुद्धिवंतांची बुद्धिशक्ती व बलवंतांची बलशक्ती एकमेकांशी निगडीत झाल्या पाहिजेत, हें आह्मी वर सांगितलेच आहे. त्या सर्व शक्ती जिच्याठायी पूर्णपणें भरुन राहिल्या आहेत, आणि ह्मणून जिला आदिशक्ती या नामाभिधानानें संबोधण्यांत येतें, त्या श्रीजगज्जननी शांतदुर्गा देवीचें तें मूर्तरुपानें बसण्याचें स्थान आहे. तिच्या चरणकमलांच्या आश्रयानं भरणाऱ्या ह्या परिषदेस कोणतीच कमतरता न भासतां ती सर्व बाजूंनी यशस्वी होऊन तिच्या हातून होणारी कोणतीहि चळवळ सिद्धीसच पावेल, अशी आमच्याप्रमाणेंच बहुतेकांची खात्री होऊन बसली पाहिजे.

हिंदुबांधवहो, प्रागतिक संघाची परिषद तुह्मांसाठीच भरत आहे. तुमचे विचार एकत्रित करून, त्यांपासून निष्पन्न होणाऱ्या तुमच्या गरजा भागविण्याची खटपट करणें हेंच तिचें उद्दष्टि आहे. तुमच्या अंत:करणांत खळबळ उडवीत असलेल्या देशहितकारक विचारांस चालना मिळावी

यासाठी परिषदेंपुढें कोणकोणतें विषय चर्चेस येणार आहेत, यांचें दिग्दर्शन संघाच्या उपाध्यक्षांकडून झालेलें आमच्या गेल्या अंकांतील पुरवणीपत्रकांत आलेंच आहे. आपण सूज्ञ व विचारवंत आहांत, आपल्या मनास देशहिताची कळकळ लागली आहे, कळकळीनें प्रयत्न करण्याची आपली तयारी आहे, हें सर्व दिसत असतां, आपण स्वत: जातीनें परिषदेस येऊन, मनांतील विचार उच्चारून दाखवून ते आचारांत आणण्याची शिकस्त करणार नाही काय? समाजांत दिसत असलेल्या सर्व तऱ्हेच्या शक्ती सुप्तावस्थेंत आहेत, त्यांना जागृत करून समाजकार्याच्या गाड्यास जोडण्याचें श्रेय तुह्मीं घेणार नाही काय? समाजांत वावरत असलेले नैराश्य आणि हाडींमासीं खिळून राहिलेली मूकवृत्ति व सरकारांत चालू असलेली विषमता घालवून देण्यास परिषदेला तुह्मीं कांहीच मदत करणार नाहीं काय? देश व समाज यांच्या हितसंबंधांचा प्रश्न आला की त्यावेळी आपसांतील चुरस, मत्सर, वैमनस्य, मानापमान इ. विसरून जाण्याइतकी मनाची उदारता हिंदुसमाजांत अद्यापही शिल्लक आहे हें आपल्या उदाहरणानें दाखवून देणार नाही काय? कोणत्याहि सार्वजनिक संस्था चालविण्याची अक्कल, या रानटी हिंदुसमाजांत नाहीं, असें ह्मणून आह्मांला पदोपदी व हरघडी हिणविण्यांत येत असतें. त्याचा फोलपण, तुमच्या कर्तबगारींनें जगाच्या निदर्शनास आणण्याची तजवीज करणार नाही काय? बोला, बोला, हें सर्व करण्यास तुह्मांला परिषदेला येणंच प्राप्त आहे. तुमच्या आगमनानें परिषदेच्या चालकांस उत्तेजन मिळेल, त्यांचा उत्साह दुणावेल, पुढील कार्य जोराने करण्यास अधिकाधिक हुरुप येईल हें विसरू नका. परिषदेचें सर्व काम बहुमतानें चालेल याविषयीं संशय घेऊं नका. हिंदुसमाजातील सर्व विचारांचें, सर्व वर्गाचें सर्व जातीचें गृहस्थ परिषदेंत सामील व्हावे व यामुळें तींत कोणतेंच वैगुण्य राहू नये अशीच चालकांची सदिच्छा आहे. विषयनियामक मंडळ निवडण्यापासून तें दुसऱ्या अधिवेशनास स्थळ पसंत करण्यापर्यंत जें काम परिषदेंत चालेल, त्यांत तुमच्या विचारांचा प्रामाणिकपणा, समतोलपणा, सत्यनिष्ठा, कार्यविषयी अढळ विश्वास दिसून आला, तर सर्व मतमतांतरांचे पर्यवसान एक ध्येय जवळ होण्याकडेच होईल, ही जाणीव जागृत ठेवा. निराशावादास फांटा देऊन आशावादीपणा बाळगा.

आपल्या सुविचाराचें स्वत्वाभिमानाचें, तत्त्वनिष्ठेचे आणि कर्तत्वशक्तीचें गांठोडें बरोबर घेऊन परिषदेला या परिषदेमुळें हिंदुसमाजाचें स्वरूप पूर्वीप्रमाणें उज्ज्वल दिसावयास लागावे,  हिंदुस्थानांतील हिंदुसमाज, ही एक जागृत शक्ती आहे, तिच्याकडे यापुढें दुर्लक्ष करून चालावयाचे नाही असें इतर समाजांना व सरकारी अधिकाऱ्यांना वाटावे, यासाठी स्वार्थत्यागपूर्वक लागेल ती कामगिरी करा व हिंदुसमाजाच्या जिवंतपणाची साक्ष सर्व जगाला पटवा ता. २९, ३० व ३१ डिसेंबर १९२३ हे दिवस पो. हिंदुस्थानांतील हिंदुसमाजाच्या इतिहासांत सुवर्णक्षरांनी लिहून ठेवण्यासारखी भरीव कामगिरी परिषदेच्या हातून होईलच होईल.

*(गुरुवार, दि. २७ डिसेंबर १९२३)*

# ऐक्य परिषदेचें कार्य

दिल्लीची ऐक्य परिषद कितपत यशस्वी झाली तिच्या कार्यात व वादविवादांत भाग घेणाऱ्या प्रतिनिधींपुढे असलेले प्रश्न किती बिकट होते व ते सोडविण्याच्या मार्गात असलेल्या अडचणींतून त्यांनी किती कुशलतेनें व धैर्यानें आपला मार्ग काढला ह्याची योग्य कल्पना आणण्यास परिषदेनें मोठ्या परिश्रमानें व बराच खल करून शेवटी पास केलेल्या ठरावांकडे लक्ष देणे जरुरीचे आहे. पहिल्या ठरावांत धार्मिक मतभेदांच्या नावाखाली होणाऱ्या अत्याचारांचा निषेध करण्यात आला आहे. कोणत्याहि प्रकारच्या धार्मिक समजुतींमुळे उत्पन्न झालेल्या कारणांचा निकाल बेकायदेशीरपणानें व दंडेलीनें न करतां तो प्रतिनिधिक पंचायतीकडून व ते शक्य नसल्यास सरकारी कोर्टांतून करण्यांत यावा असें परिषदेने ठरविले आहे. दुसऱ्या ठरावात अशा प्रकारची पंचायतीची व्यवस्था करण्यासाठी हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन व शीख समाजांच्या प्रतिनिधींची एक मध्यवर्ती पंचायत स्थापून त्याचा कार्यक्रम निश्चित केला आहे. तिसऱ्या ठरावांत वेगवेगळ्या जातीच्या व धर्मांच्या माणसांत ऐक्य उत्पन्न करण्यासाठी एका धर्माच्या माणसानें दुसऱ्या

धर्माच्या माणसाशी वागताना कोणत्या ढोबळ तत्त्वांचा अवलंब केला पाहिजे ह्या विषयींचा विस्तृत खुलासा करण्यात आला आहे. एकमेकांच्या धर्माची नालस्ती, देवस्थानांवर हल्ले, गोवध, मशिदीपुढें वाद्यें वाजविणें, धर्म परिवर्तन वगैरे वगैरे दंग्यास कारणीभूत होणाऱ्या गोष्टींचा विचार ह्या ठरावांत करण्यात येऊन त्यासंबधीची परिषदेची मतें नमूद करण्यांत आली आहेत. ठराव चार, पांच व सहाचे विषय अनुक्रमें पक्षांध वृत्तपत्रांतील मजकूर आणि अत्याचारांसंबंधीची त्याची जबाबदारी, मशिदी, देवळें इत्यादी इमारतींचा नाश व आर्थिक व सामाजिक जातिबहिष्कार हे आहेत. सातव्या ठरावतात ता. ८ हा ऐक्य दिवस मानून परिषदेच्या उपरिनिर्दिष्ट ठरावांना हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं दुजोरा मिळून तो स्वीकारण्यात यावे, अशी विनंती करण्यांत आली आहे. ह्या एकंदर ठरावंत म. गांधीच्या ऐक्यांच्या तत्त्वाला प्रमुख स्थान मिळाले आहे हें सहज दिसून येईल. ऐक्य परिषदेच्या कार्यास भारत मंत्री लॉर्ड लिव्हीयर, व्हायसराय साहेब, प्रांताधिपति व दुसरे बडे अधिकारी यांनी प्रसंगोचित संदेश पाठवून मदत केलेली आहे, हे आह्मी मागें नमूद केले आहे.

दिल्लीस असलेले वेगवेगळ्या धर्मांचे व मतांचे पुढारी हिंदुस्थानांतील लोकांचे योग्य व जबाबदार पुढारी होते हे वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेली त्यांच्या नावाची यादी, त्यांच्या बैठकींतील वादविवादांच्या हकिकती वाचल्यास कळून येईल. परिषदेस हजर राहण्यासाठी हकिम अजमलखान, स्वामी श्रद्धानंदजी व मौलाना महमंद अली ह्यांनी अशाच व्यक्तींची निवड केली होती, की कोणत्याहि विशिष्ट जातीच्या किंवा सांप्रदायाच्या लोकांस आपली मतें पुढें मांडतां आली नाहीत किंवा परिषदेच्या कार्यात आपणांस भाग घेता आला नाही अशी तक्रार करण्यास मुळीच जागा राहू नये. निमंत्रित मंडळींपैकी सर्वांनी त्यांना देण्यात आलेल्या या संधीचा फायदा घेऊन देशात शांतता उत्पन्न करण्याच्या प्रयत्नाच्या ह्या सत्कृत्यास हातभार लावला, ही समाधानाची गोष्ट होय, ख्रिस्ती धर्माच्या प्रतिनिधींनी, विशेषत: हिंदुस्थान व ब्रह्मदेशच्या मुख्य बिशपांनी व 'स्टेटसूमन' सारख्या अँगलो इंडियन पत्राच्या संपादकांनी, आपल्या ज्ञानाच्या व कळकळीच्या सल्ल्याचा व प्रत्येक

प्रकारच्या दुसऱ्या मदतीचा परिषदेस वेळोवेळी जो फायदा दिला व ती यशस्वी करण्यास प्रामुख्याने जो भाग घेतला त्याचा थोड्याशा शब्दांनी पुरेसा उल्लेख करणे अशक्य आहे. जातिजातीतील सलोखा वाढणे, हिंदुस्थानांतील ख्रिस्ती धर्मानुनायायांस व इंग्रजास आवश्यक वाटत असून हे घडवून आणण्यास मदत करणें त्यांना आपलं कर्तव्य वाटते, हें बिशप वेस्टकॉट, मि. मूर, मि. जेम्स वगैरे गृहस्थांनी त्या प्रसंगी दाखवून दिलें आहे. ख्रिस्ती व इंग्रज समाजांस ही गोष्ट भूषणास्पदच आहे. आपल्या मुलाखतीत व पत्रांत म. गांधीविषयी प्रेम व आदर व्यक्त करण्यात त्यांनी क्षुल्लक मतभेद बाजूस ठेवून ख्रिस्ती धर्माचे मूलभूत तत्त्व प्रस्थापित केले 'ह्या देशांतील प्रत्येक माणसोचं व आपल्या धर्माच्या शिकवणीस जाणाऱ्या खऱ्या ख्रिस्ती माणसाचें अंत:करण आपण चालविलेल्या प्रायश्चितव्रताच्या दृष्यानें हलवून गेल्या खेरीज राहणार नाही.' ह्या वाय. एम्. सी. ये च्या मि. जेम्स ह्या इंग्रजाच्या एका वाक्यांत इंग्रज समाजाच्या अंत:करणाचेचे व भावनांचे प्रतिबिंब पडलेलें आढळेल.

ह्या देशाच्या प्रत्येक भागांतून परिषदेस हजर राहिलेले पुढारी, ते दंग्यात सामील झालेले नसल्यामुळे दंग्यात भाग घेणाऱ्या लोकांचे खरे प्रतिनिधीच नव्हते व ह्मणून ह्या उप्पर दंगे होण्याची शक्यताच कायम राहते. ह्या दृष्टीने पाहता परिषदेने कोणते उपयुक्त कार्य केले? हा प्रश्न परिषदेचे शत्रू आज विचारीत आहेत. ह्या प्रश्नाचें उत्तर आपणांस असे देता येईल :-

हिंदु मुसलमानांच्या दंग्यांची कारणें एवढी क्षुद्र असतात, की त्यांना कारणें ह्मणणे प्रत्येक समंजस माणसास लाजिरवाणे वाटतें. दंग्याचे एकंदर स्वरूप पाहतां त्यांच्या मुळाशी धार्मिक भावना किंवा मतभेद असणे कोणत्याहि धर्माच्या कीर्तीस काळिमा आणणारे आहे. तरी पण हे दंगे फक्त बदमाश किंवा अशिक्षित लोकांकडून केले जातात असे ह्मणणे धाडसाचें होईल. आतापर्यंत झालेल्या दंग्यांच्या हकिगतीवरून असे दिसून येते की दंग्यांची सुरुवात जरी दोन्ही जातीच्या बदमाश वर्गाकडून करण्यात येत असली तरी दंग्याचा संबंध समाजाच्या बऱ्याच मोठ्या भागांकडे पोचतो. सुशिक्षित पांढरपेशा व जबाबदार वर्गाची अप्रत्यक्षपणे मदत मिळत असल्याखेरीज नुसत्या बदमाशांना लखनौ, दिल्ली, कोहाट वगैरे ठिकाणी झालेल्या दंग्यांसारखे भयंकर दंगे करून शांतता

भंग करणे शक्य होणार नाही. विशेषत: हिंदुस्थानाच्या लोकवस्ततीतील मोठ्या प्रमाणला आर्थिक, राजकीय व धार्मिक स्वत्वाची जाणीव नसल्यामुळे व ह्या विषयासंबंधी स्वत: विचार करून त्याप्रमाणें वागण्याएवढी जागृति त्यांच्या बाबतीत झालेली नसल्यामुळे ते पूर्णपणें परावलंबी बनलेले आहेत. ह्मणून त्यांच्या वर्तनाची जबाबदारी बव्हंशी समाजाच्या स्तंभावर सुशिक्षित व पुढारी ह्मणविणाऱ्या लोकांवर राहते. ही जबाबदारी प्रस्थापित करणें दिल्लीच्या ह्या परिषदेला आवश्यक वाटते. दिल्लीच्या परिषदेनें जबाबदार पुढाऱ्यांस एकत्र जमवून त्यांना आपापसातील मतभेदांचा विचार करण्याची व वेगवेगळ्या जातीच्या हिताकडे दुर्लक्ष न करता व्यापक अशी ऐक्याची योजना तयार करण्याची संधी आणून दिली. ह्या पुढाऱ्यांनी त्यांच्यापुढे असलेल्या प्रश्नांची चर्चा मोकळ्या मनानें केली व ती संपण्यात जवळ जवळ ७-८ दिवस लागते ह्यावरून सिद्ध होते. दंग्यासंबंधीचें परिषदेचे क्षेत्र मर्यादित होते हे अर्थातच कबूल केले पाहिजे. दंगे होणे किंवा न होणे परिषदेच्या हातांत नाही. ते अशक्य करण्यासाठी जरी परिषद बोलावलेली होती व ती यशस्वी झाल्यास शांततेचे, सहिष्णुतेचे ऐक्याचे कार्य चालू राहण्यास मदत मिळेल अशी जरी सर्वांची अपेक्षा होती. तरी तिनें पास केलेले ठराव सर्वत्र अंमलांत येऊन एकदम शांतता प्रस्थापित होईल अशी आशा करणे धाडसाचे झाले असते. ऐक्य परिषदेनें ऐक्य घडवून आणले नाही. तिनें ऐक्य घडवून आणण्याचा फक्त मार्ग आंखून दिला. तिनें ऐक्याच्या इमारतीची उभारणी केली नाही, तिनें फक्त त्या इमारतीचा पाया घातला. ऐक्याच्या मार्गात प्रगती करण्याचें, ऐक्याची इमारत उभारण्याचें काम अजून व्हायचे आहे. त्याला बराच अवधि लागण्याचा संभव आहे.

ह्या संयुक्त व प्रातिनिधिक परिषदेनें पास केलेले ठराव अंत:करणपूर्वक व निर्भयपणें आचरणांत आणणें हें समाजाच्या पुढाऱ्यांचें व विचारी माणसांचे कर्तव्य होऊन बसले पाहिजे. परिषदेस सामील झालेल्या पुढाऱ्यांस व लोकप्रतिनिधींस व्यक्तीस्वातंत्र्याचे तत्त्व सामाजिक व धार्मिक गोष्टींत लागूं करण्यात शक्य ती मदत प्रत्येक व्यक्तीनें दिल्यानेंच परिषदेने सुरू केलेलें कार्य यशस्वी होईल. एरवी हे ठराव कितीही उत्कृष्ट व संपूर्ण असले तरी निरुपयोगी ठरतील हें ध्यानांत ठेवणें अत्यंत जरुरीचे आहे. ह्या

ठरावांच्या स्वरूपाचा विचार केल्यास त्याच्या व्यापकतेमुळे ते व्यवहारात आणणे काणेत्याही माणसाला मग त्याची धार्मिक मते कितीही कर्मठ व आकुंचित असोत, सोपे आहे. एकंदर सातही ठरावांत कायद्याची भाषा किंवा कायद्याची सक्ती ह्यापैकी एकही गोष्ट नाही. त्यांत कोणत्याही धर्माच्या किंवा मताच्या माणसाला आपेक्षार्ह वाटणारी अशी कोणतीच गोष्ट नाही, हे न्यायाची व सत्याची थोडीशी तरी कल्पना असणाऱ्या प्रत्येक माणसास कबूल करणे भाग आहे. किंबहुना ह्या ठरावांत उल्लेख केलेली अशी एकही गोष्ट नाही, की जी सामान्य आचारणांत महत्त्वाची समजली जाण्याच्या किंमतीची ठरेल. माणसांमाणसातील वागणुकींत उपयोगात आणावयाचे साधे नियम ह्या ठरावांत क्रमवार मांडण्यात यावेत ह्या पेक्षां आमच्या नैतिक व मानसिक दैन्याच्या अद्योगतीचें दुसरे कोणते उदाहरण देतां येईल! आमच्या भ्याडपणाकडे, गुलामगिरीकडे स्वातंत्र्याची किंमत न ओळखणाऱ्या बुद्धिमतेकडे बोट दाखवून सुधारलेल्या जगानें आमचा उपहास करण्याचें दुसरें कोणतें सबळ कारण असूं शकेल? सध्याच्या परिस्थितीत, अस्वस्थेतच्या, अज्ञानाच्या अत्यंत निराशाजनक स्थितीत ह्या गर्द अंधकारांत व अधोगतीच्या ह्या खोल गर्तेत उजेडाची, दिव्य स्फूर्तीची, आशेची एक ज्योत एका कोपऱ्यांत तेवत आहे. भगवान श्री कृष्णानें, बुद्धानें पावन केलेल्या आमच्या ह्या अभागी देशांत अंधकाराचें राज्य संपूर्णपणें पसरण्यास अजून वेळ आहे. आजच त्याची पुण्याई संपलेली नाही अशी आपण आशा बाळगूं या!

*(गुरुवार, दि. २० आक्टोबर १९२४)*

# हृदयाविष्करण

*न वै राजा न राजसान्न न च दण्डो न च दण्डिक:।*
*धर्मे नैव प्रजा: सर्वा रक्षन्ति स्म परस्मरम्।*

लोकमताचा वारा कोणत्या दिशेस वहात आहे व त्या विषयी बेफिकीर राहिल्यास परिणाम काय होईल ह्याची आह्मी वरचेवर जाणीव

करून देत असतांहि अनियंत्रित अधिकाराचें तारुं भलत्याच दिशेस हांकण्यास नोकरशाहीची नादानवृत्ति प्रवृत्त होत आहे, ही अत्यंत असमाधानकारक गोष्ट तर खरीच, पण निदान आह्मांला तरी त्यात आश्चर्यकारक काय हें कळत नाही. गोमातकांत माजू घातलेल्या बेबन्दशाहीस कारणीभूत होणाऱ्या नोकरशाहीचें बेताल डोके बेफाम व बेदरकार बनूं न देण्यासाठी दिसण्यास अप्रिय पण परिणामी गोड अशा चार उपदेशाच्या गोष्टींचा त्यांस बोध देण्यास आह्मी  सरसावतो खरे परंतु आपला लांडा कारभार वाटेल त्यांत घुसण्यास सोकावलेल्या वशिल्याच्यावर त्याची मुळी सुद्धा परिणाम न होता पुन्हां ते कोरे ठणठणीत गोटेच राहातील ह्याची खूणगाठ आह्मी पूर्वीच बांधून टाकीत असतो. भारतीय युद्धापूर्वी दुर्योधनाशी शिष्टाई करण्यासाठी पांडवातर्फेचा वकील ह्या नात्यानें कौरव सभेत जातांना 'आपला अपमान झाला तरी बेहतर पण भावी अनर्थपात टाळण्याचा शक्यतोवर यत्न करावा, हा भगवान श्री कृष्णाचा हेतू होता हें जितके सत्यास धरून आहे तितकेंच 'फलनिष्पत्ति' काहीच होणार नाही ह्यची त्यास खात्री होती हे सत्यांश पूर्ण आहे. त्याच प्रमाणे इतिहासाच्या पुनरावृत्तिकडे ध्यान देऊन 'केवळ कर्तव्य ह्मणूनच, अधिकारी वर्गाची शक्य तेथें कान उघडणी व जरुर तेथे कान उपटणी करण्याचा आमचा हक्क आह्मा प्रस्थापित करीत असतो. नुसते नावांपुरतें कां होईना. लोकसत्ताक राज्यपद्धतीत वावरणाऱ्या गोमांतकीय लोकशाहीचें प्रमुख मुखपत्र असल्याने' 'भारता'वर लोकसत्तेच्या खातर मांडण्याची दुप्पट जबाबदारी पडलेली आहे. जनतेच्या हक्कास जपण्याची पहिली व हिंदुस्थानावरील प्रतिपक्षांच्या हल्यास प्रतिकार करणें ही दुसरीं. ह्याचा परिणाम कधी कधी असा होतो की आह्मास सरकार व ख्रिस्ती वर्ग या दोहोंकडून बहिष्कृत व्हावे लागते, सरकार तर 'भारता'स उघड उघड बंडखोर समजत असून ख्रिस्ती बंधूंना तो ख्रिस्तद्वेष्टा वाटतो पण ह्यामुळें आमच्या प्रगतीपर गतीस काहींच अडथळा येऊं शकत नाही. हें स्वाभिमानाचें फळ नव्हे तर काय?

'भारता' वर गेल्या आठवड्यांत गुजरला गेलेला खटला हे आह्मी अनुमान केलेल्या 'विनाशकाले विपरित बुद्धी'चे द्वितीय भ्रमण होय. 'बुडत्यांचा पाय खोलांत' ह्या ईश्वरी न्यायानुसार आमच्या अधिकारी

वर्गाच्या बुद्धिभ्रंशाचे प्रमाण दिवसेंदिवस कलेकलेनें वाढतच असून वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करण्यापर्यंत अरेराव बहाद्दरांनी मजल मारलेली पाहून अमलदारशाहीच्या पापांचे घडे भरल्याचें कोणी अनुमान केल्यास तें निराधार किंवा अनाठायी ह्मणता येत नाही. भारताची आशेवरील आसक्ति सुदैवानें अगर दुर्दैवानें इतकी जबर आहे कीं त्यास अजून पर्यंत तसें वाटत नाही. मात्र अरेरावी वर्गाची अरेरावी अशीच 'मागील खेपेवरून पुढे चालत राहिल्यास– नोकरशाहीनें आपल्या अरेराव पातशाहीच्या सोटेशाहीची सीमा लोकसमाजाच्या स्वाभाविक सहनशीलतेच्या परमसीमेस भिडविल्यास त्याचा परिणाम भीषण व भयंकर होऊन प्रक्षुब्ध लोकमताच्या त्वेषपूरित राहील आणि तेव्हा 'अवश्यमेव होणारा पाश्चाताप निरर्थक ठरून 'शिष्यापराध गुरुः'चा प्रकार होईल ही त्याला आज दिवसदेखील भीति वाटते. व तेवढ्यासाठींच 'भारत' बहकल्या बुद्धीच्या, बेदरकार वृत्तीच्या व बेकायदेशीर वर्तनक्रमाच्या अंमलदारांकडून चालवल्या जाणाऱ्या व अविचाराच्या उतरणीवर भर वेगानें धांवणाऱ्या गाडीचें भावी अनर्थ परंपरेपासून रक्षण करण्यासाठी दोन्ही हातानी लाल बावटा हालवून एकसारख्या कंठशोष करीत आहे, पण अधिकारी गुंगीने धुंद झालेल्या ड्रायव्हर साहेबांचा तिकडे कानाडोळा होत आहे व गाडी त्याच्या अंगावरुन नेण्याचा घाट घातला जात आहे. त्याला भारत काय करू शकेल? आपलें अंग चेंगरलें ह्मणून भारतास भीतीचा लवलेश देखील शिवत हा नसून 'पुढें काय?' ह्याच प्रश्नानें त्याला बेजार करून सोडले आहे!

जो लेख आरोपीत धरून 'भारता' वर सरकारकडून खटला भरण्यांत आला आहे, त्या पोर्तुगीज लेखाचें समग्र व शब्दशः मराठी भाषांतर भारताच्या येत्या अंकी मुद्दाम दिले जाईल. ज्याच्या दप्तरांत आमची सेवा चाकरी रुजु व्हावी अशी आह्मी इच्छा बाळगतो, त्या जनता रुपी जनार्दनाच्या नि:पक्षपाती न्यायासमोर तो जशाचा तसा ठेवण्यांत येईल. तो लेख आमूलाग्र शुद्ध अंत:करणानें, निर्विकार मनानें व पक्षपातहीन नजरेंनें वाचून त्याचे स्वस्थ चित्तानें मनन करणाऱ्या विचारी पुरुषाच्या डोळ्यांपुढें हें काय गौडबंगाल? हा प्रश्न उभा राहील. आमच्यामतें त्यात चुकीची विचारसरणी काहीच नसतां सरकारच्या केवळ दृष्टीदोषामुळें व अमलदारकीची वस्त्रें स्वीकारणाच्या

उल्लु लोकांच्या बुद्धिभ्रंशामुळे तो आरोपीत ठरविला गेला असल्यानें आह्मी त्याचे पुन:रुपांतर प्रसिद्ध करणार आहोत. हें ज्या कोणास कायद्यास सोडून असल्याचा संशय येईल त्यात आह्मी एवढेंच विचारण्याची परवानगी घेतों कीः

ह्या सुवर्णभूमीची द्वारें पांढऱ्या पायांच्या परकीयांस सताड उघडी टाकली जाऊन त्यांतील एकूण एक चिजवस्तू पसार केली जाऊन थोड्याच शतकांच्या अवधीत जीत एकेकाळी सोन्याचा धूर निघत होता त्या पुण्यभूमीच्या मालकांस *'भिक्षापात्र अवलंबिणे। जळो जिणें लाजिरवाणे।'* ही तुकोबांची अंभगवाणी कानांत दुमदुमत असतां वीत भर पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठी आमच्याच गाठोडीवर गब्बर झालेल्या गठडीयांपुढें नोकरीसाठी (भिक्षेसाठी) तोंड वासण्याचा प्रसंग येऊन त्यावेळी 'तुह्मी भारताकडे नोकरी मागा' असा गालफडात जिभली घालून जबाब दिला जावा व ह्या आमच्या नैतिक व आर्थिक अध:पतनास कारण झालेल्या गामाच्या पुण्य(?) तिथींत भाग घेण्याबद्दल हिंदूवर जबरी केली गेल्यास तें कायदेबरहुकूम असें आपण ह्मणूं शकाल काय? ज्या व्यक्तीनें आह्मां हिंदीवर अमानुष अत्याचार करून ज्याची नुसती आठवण झाल्यास अजून अंगांवर काटा उभा रहातो असा हिंदूंचा धर्मातरासाठी छळ करण्यांत पहिले प्रावीण्य पदक संपादन केले त्या व्यक्तीच्या उत्सव समारंभांत आपल्या वंशजांनी भाग घेऊं नये एतदर्थ स्वर्गातून आह्मांस संलग्न हृदयाच्या नेत्रपल्लवीनें निरोप पाठवून आमच्या हृदयास पाझर फुटावा ह्मणून डोळ्यांतून ढळाढळां अश्रुधारा गाळणाऱ्या पूर्वजांच्या विनवणींने हृदय पिळवटून गेल्यामुळें हिंदूनीं श्राद्धोत्सवात उदासीन वृत्ती स्वीकारली, ह्यासाठी त्यांना जुलमाखाली भरडून काढण्यांत आल्यास तें कायद्याबरहुकूम आहे असे आपणांस वाटते काय? राष्ट्रीय सभेस गेलेल्या सरकारी नोकरांतून एका विशिष्ट संस्कृत्यनुयायांची हकालपट्टी केली जात असल्यास त्यास कायद्याचा आधार आहे काय? कायदेबहाद्दरांनों! कायदे अमलांत आणण्याकरीताच नेमलेली नोकरशाही स्वत: कायदेमोडीत असतां इतरांनीच ते पाळण्याविषयी 'परोपदेशेपांडित्य' दाखविलें जावें व तेंहि लोकसत्तेच्या राज्यकारभारांत, हें कायद्याचे कोणते कलम?

सरकारच्या हातांत कायदा असेल, त्या मदाने तराजूचा कांटा ह्या त्या बाजूस झुकविण्याचें कौशल्य प्रतिपक्षाच्या मारवाडी डोक्यांत असेल पण सत्याच्या पाठिराख्या परमेश्वराचे पाठबळ 'भारता'स आहे!

*(गुरुवार, दि. २९ जानेवारी १९२५)*

# आक्षेपार्ह लेखाचे मराठीत भाषांतर

ज्या पोर्तुगालीनानें हिंदुस्थानचा मार्ग शोधून काढला असें साधारण नजरेस दिसतें त्या वास्को-द-गामाची पुण्यतिथी सरकार व सरकारावर प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष अवलंबून असलेले बगलबच्चे येत्या ता. २३,२४ व २५ रोजी पाळणार आहेत. ह्या समारंभात लागणारा सर्व पैसा वसाहतीच्या तिजोरीतून गोमांतकीय गंगाजळीतून-खर्च केला जावयाचा असून सरकारनें त्यासाठी १४ हजारांवर कांही रुपये मंजूरहि केले आहेत.

ज्यांच्याविषयी जित लोकांच्या अंत:करणांत तिळमात्रही आदर वसत नाही. उलट जित वर्ग ज्यांच्याविषयी निर्भेळ उदासिनत्वच धारण करतो अशा आपल्या कांही भावनांसाठी भिकार शांततेसाठी झटल्याहि चालेल-जित लोकांच्या पैशाची उधळपट्टी आजपर्यंत लाखो खेपा जेत्यांनी केलेली असून ही तदनंतरची खेप होय! खरेंच! लोकलबोर्डे, मुनिसिपालिट्या ह्यासारख्या संस्थाकडून आज दिवसा गामोत्सवाच्या तऱ्हेवाईक, कौतुकास्पद, चटकदार व औत्सुक्यवर्धक कार्यक्रमाच्या जाहिराती फडकविल्या जात असता लोकसमाज ह्या उत्सवापासून शक्य तितका दूरच रहात आहे. ह्या गोष्टी वरून आमच्या वरील विधानाची सत्यता पटते आणि ह्मणूनच जिज्ञासू जीवांच्या समाधानार्थ आणखी पुरावे पुढें करण्याचें कारणच उरत नाही. हे स्पष्ट व उघड ठरते.

पाश्चात्य सुधारणा आर्यावर्तास बहाल करणारा पहिला विजयी वीर ह्या नात्याने वास्कोडीगाम्याच्या नावें त्याची मृत्युतिथी आठवून सरकार व त्याचा बगलबच्चा अगर जो हुकूमवर्ग चैन, चंगळ पैशांचा धुराडा उडवीत

असतां आह्मी मात्र ज्या भूमीची औद्योगिक, भैगोलिक व व्यापारविषयक उपयुक्तता, नव्हे अनुपमता पाहून पोर्तुगालचा जाडा मुत्सद्दी आल्फान्सों अॅल्बुकर्क याला ती आपली राजधानी करावीसें वाटलें. आपल्या राजकारणाचें केंद्रस्थान करावेसें वाटले ह्या गोमांतकाच्या उन्नतीवर पाश्चात्य सुधारणेचा कोणता परिणाम झाला ह्याचा एकांतात बसून विचार करण्यात सर्व लोकांस आव्हान देतों.

गोमांत-मलबार किनाऱ्यावरील हा तुकडा सुधारण्याचे कंकण पोर्तुगालने हाती बांधल्यास आज चार शतकाहून अधिक वर्षे लोटली. इतकी वर्षे पोर्तुगाल ही भूमी ऊर्जितावस्थेत नेण्याची धडपड करीत आहे. तरीही प्रजेने अनंत हाल चालू २३,२४ व २५ तारखांस जे दृष्य दिसतें तें पुढीलप्रमाणें होय.

मनुष्ये नैतिक व शारिरीक बाबतीत धुळीस मिळालेली, कुटंबें, स्थितिस्थापकता किंबहुना आधार नसून लंगडी झालेली, सर्व समाज विरघळणाच्या, अध:पाताच्या स्थितीस पोहोचलेला, प्रेम व शक्ती ही ज्यांच्यापासून उत्पन्न होतात अशा उच्च सद्गुणांनी रहित कला कौशल्य शून्यवत, व्यापारधंद्यांना पूर्ण अभाव व निर्गत मालापेक्षां आयात मालाचा भरणा जास्त, शेतीभातीचें उत्पन्न कमी प्रमाणावर व उद्यांचा दिवस कसा ढकलेल ह्याची खात्री नसल्यामुळें जमीनजुमले पाडून टाकून परदेशगमनाची, वीतभर पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठी मातृभूमि वियोगाची प्रवृत्ति दिवसें दिवस वाढत्या प्रमाणांत आहे. मनुष्य जातीची जी दोन घोर दैन्यें दारु व तंबाकू ह्याचें लोक बेसुमार सेवन करीत सुटले आहेत. अध:पतनाच्या ह्या खोल गर्तेतून वर येण्याची दिशा आह्मांस दाखवून देणारा एखादा महात्मा ह्या पौर्वात्य देशांत सध्या कुठें दिसत नाही, पण हे सुधारणेचे परिणाम मात्र आमच्या उघड्या डोळ्यांनी दिसत आहेत.

गुन्ह्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. खून होत आहेत. विषप्रयोग तर 'मी, मी' ह्मणतच आहेत. चोऱ्या व स्त्रियांची अब्रुहानि ह्यांच्याविषयी तर बोलूंच नये. दारिद्र्याच्या सहकारी क्षयावस्थेने तर

आपली पाळेमुळें आमच्या ह्या देशांत बरीच पसरली आहेत व शेकडो, हजारो लोकांचा बळी ती रोज रोज घेतच आहे. उपदंश तर जिकडे तिकडे बोकाळलेला दिसत आहे. कांही तालुक्यांनी तर त्याचें प्रमाण लपून छपून का होईना हिंवज्वराबरोबर आहे.

लोकांना महाग झालेलें व शाळांनी दिलें जाणारें परिणामशून्य शिक्षण मिळत असतांहि निरक्षरतेचे प्रमाण भयंकर स्थितीत आहे. ज्ञानी लोकांच्या नुकसारन भरतीसाठी ह्मणून आह्मांपाशी चांगल्यापैकीहि काही निवडक मंडळी नाही. ग्रॅज्यूएट लोकांचे विध्वंसक पथक मात्र भरपूर आहे. व मंडली (एक प्रकारचा किडा) माडाचा जसा नाश करिते त्याचप्रमाणें हे लोक देशाचें नुकसानच करीत आहेत. बडे रस्ते व मोठेपॅलेस कागदी नकाशावर मात्र दिसतात. बाकी जे वस्तुस्थितीत टिकाव धरून आहेत ते जाण्यायेण्याला निवळ निरुपयोगी आहेत. नद्यांतून सफर करणाऱ्या वाफेच्या बोटींत बसणे, प्रवाशांना एक जीवावरचे संकटच वाटत आहे. हिंदी कलाकौशल्याची, जुन्या इमारतींची व ग्रंथांची इतिश्री केली गेली आहे. मग ती मूर्तिभंजक आवेशामुळें असो किंवा रक्षण करण्यात असमर्थ ह्मणून असो. पण प्राचीन कलाकौशल्या लुप्त झाले मात्र आहे. देशाची मूळ भाषा मेली मात्र नाही पण मरण्याच्या पंथास लागली आहे.

ह्या सर्वांचे तात्पर्य हेच की, आह्मी आज नैतिक, सांपत्तिक, शारिरीक व बौद्धिक दृष्ट्या खालावलेले आहोत.

खरोखर, आज आमचा देश असा करुणास्पद स्थितीत असतां स्मारकांसाठी हजारों रुपयांची उधळपट्टी करून आपल्या बागलबच्चासह मजा मारण्यास ही परिस्थिती उत्कृष्ट आहे! ह्याचे कारण हे की, जे लोक एकेकाळी उच्चतम स्थितीत होते, ते पूर्वकालीन एका घोडचुकीचा परिणाम ह्मणून बिघडण्याच्या पंथास लागले आहेत.

*(बुधवार, दि. २५ फेब्रुवारी १९२४)*

# अखिल भारतीय हिंदु महासभा
## शाखा गोमांतक

ता. २१ सप्टेंबर १९२८ रोजी ब्रिटिश हिंदुस्थानांतील जबलपूर येथें स्थापिलेल्या अखिल भारतीय हिंदुमहासभेची शाखा येथें उघडण्यांत आली. खरोखर ही क्रांति व हा क्रांतीचा दिवस गोमांतकीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिण्याजोगा असून पुढें मागें या प्रतिष्ठेचा दिवस सणाप्रमाणें दर प्रतिवर्षी गोमांतकांत हिंदुसमाजाकडून साजरा केला जाईल, अशी उमेद बाळगण्यांत अतिशयोक्तिचा अंगिकार केल्याचा दोष लागेल असें आह्मांस वाटत नाही. अखिल भारतवासीयांनी स्थापन केलेल्या संस्थेची ही गोमांतकीय शाखा असल्यामुळें तिचें ध्येय, घटना, कार्य व कर्तव्य ही अगोदरच ठरून गेली आहेत. व त्यांचीच अंमलबजावणी येथे होणार आहें हें उघड आहे. आह्मांला या शाखेचें महत्त्व वाटतें तें कित्येक शतकांपासून गोमांतकीय हिंदु समाज इतर भारतीय हिंदुसमाजापासून तुटून पडला होता तो पुन: साधण्यांत आला व त्यायोगें हिंदुजन निरनिराळ्या राजशासनाखाली असले तरी हिंदु तेवढे संघटीत व्हावेत या मूलभूत महासभेच्या हेतूचें हें प्रत्यक्ष आचरण असल्यामुळें, या घटनेस अतोनात महत्त्व आपोआपच प्राप्त झालेले आहे.

सोळाव्या शतकापूर्वी गोमांतक प्रांत एतद्देशीय राजशासनाद्वारें अखिल हिंदुस्थानाशी संलग्नित झालेला होता. पुढें पाश्चात्य सत्तेचा हिंदुस्थानावर उदय होऊं लागल्या पासून हे सांधे खिळखिळें होऊं लागले. परंतु सत्राव्या शतकांत हिंदुपदपातशाहीने पुन:डोकें वर काढल्यामुळें हा प्रांत भारतवर्षास जोडण्याचे पुन: प्रयत्न झाले होते. हिंदुपदपातशाहीची सत्ता औट घटकाच टिकल्यामुळें ते प्रयत्न निष्फळ झाले. त्या कालांत पोर्तुगीजांचा हिंदुस्थानच्या बऱ्याचशा भागावर अंमल चालत होता. गोमांतक त्यावेळी अत्यंत भरभराटीत असल्यामुळें पोर्तुगीजांची त्यावर नजर गेली व १५१० साली हा प्रांत त्यांच्या ताब्यात गेला. मद्रास, बंगला इत्यादि ठिकाणीं पोर्तुगीचें वर्चस्व असल्याने गोमांतक हिंदुस्थानापासून अगदीच अलग झाला नाही. परंतु पुढें अनेक

पाश्चात्य राज्य शास्त्याचें डोळे हिंदुस्थानांत वर्चस्व मिळविण्याकडे लागले व त्या काळांत त्याकरीतां त्यांची आपापसांत द्वंद्वेही उद्भवली. पोर्तुगीजसत्तेला तेव्हां असें वाटलें की सर्व एत्तद्देशीय हिंदुना आपल्या धर्माची दीक्षा दिली तर आपली सत्ता अबाधीत राहील. ही कल्पना जेव्हां भीषण मूर्त स्वरूप धारण करू लागली तेव्हां हिंदवासीय जनता हवालदील होऊन हा धर्मांतराचा त्रास चुकविण्यासाठी मिळेल त्यांच्या तोंडाकडे पाहू लागली. फ्रेंच, इंग्रज डच इत्यादि लोकहि स्थानिक जनतेची सहानुभूति मिळविण्यास टपून बसले होते. त्यांनी या परिस्थितीचा फायदा घेतला. इत्यादि कारणांनी हिंदुस्थानांतल्या पोर्तुगीज सत्तेचा नायनाट होऊन गोवाप्रांत तेवढा एक हिंदुस्थानचा महत्त्वाचा भाग त्यांच्या ताब्यांत टिकून राहिला. अंध धर्माभिमानामुळें आपण सत्ता गमावून बसलों हें पोर्तुगीजांच्या लक्ष्यांत न येतां, त्यांच्या ताब्यांत असलेल्या गोमांतकीय लोकांवर धर्मच्छलाचे प्रयोग अनन्वितपणें चालू झाले व मोनार्की नष्ट होईपर्यंत ते कमीअधिक प्रमाणानें चालू होते. पोर्तुगीजांचा हिंदुस्थानांशी असलेला संबंध सुटल्याबरोबर गोमांतकही निराळा पडला. निसर्गत: गोमांतक सह्याद्रीपर्वतश्रेणीमुळें विभक्त पडला होता. त्यांत ही निराळी व अगदीच अपरिचित शासनपद्धती व दळणवळणाचा अभाव. यामुळें अखिल भारतीय जनता गोमांतकाला जवळ जवळ विसरुन गेली होती.

गोमांतकाचें तें ऐश्वर्यशाली व्यापारी दळणवळण बंद पडलें. ही परिस्थिती दीर्घकालपासून तशी असली, तरी रेल्वे, आगबोटी यामुळें काहीं दळणवळण सुरू झाले. गोमांतकाची ओळख इतर हिंदुस्थानांतील हिंदुजनतेस होऊं लागली व कांही वर्षापासून गोमांतक व महाराष्ट्र अतएव हिंदुस्थान एकच आहे, अशा विचारलहरी जनतेत उठूं लागल्या. हिंदुस्थानच्या किंवा गोमांतकच्या दोघेही एकच दास्य भोगीत असून स्वत्व विसरले होते. त्याची जाणीव दोघांनाही झाली. संघटन कोणत्याहि गोष्टीस आवश्यक असतें. या तत्त्वानुसार हिंदुसंघटन करण्याच्या सद्हेतूने प्रयत्न सुरू झालें व त्यांत गोमांतकाचासुद्धां समावेश करण्यांत आला. परंतु मध्यंतरी 'गोमंतकीय हिंदुसभा' नावांची संस्था काही दिवसांमागें काही महत्त्वाकांक्षी लोकांनी गोमांतकांत स्थापन केली व त्यांत सर्व जातीचा समावेश करून घेतला

नाही. कदाचित ही चूक नंतर सुधारण्यांत आली असती, परंतु तिची घटना हिंदुस्थानापासून गोमांतकीय जनतेस अलग ठेवणारी दिसून आल्यामुळें ध्येयास विसंगत ह्मणून अखिल भारतीय हिंदु महासभेशी एकजीव होण्याची ताकद त्या संस्थेत नाही. गोमांतकीय जनतेस कोणत्याही दृष्टीनें हिंदुस्थानपासून अलग राहणें इष्ट नसल्यावरुन त्या संस्थेच्या अस्तित्वास न मानतां अखिल भारतीय हिंदुमहासभेचीच एक शाखा येथें उघडण्यात यावी असेच बहुमत दिसून आल्यावरुन तिची प्राणप्रतिष्ठा उपरिनिर्दिष्ट दिवशी गोमांतकांत केली गेली.

धार्मिकदृष्ट्या एकच असलेली अखिल गोमांतकीय व हिंदवासीय हिंदुजनता आपलेपणा अनुभूवं लागली होती, परंतु त्यांत दुही माजून गोमांतक त्या एकीतून निसटतो की काय अशी शंका प्रादुर्भूत झाली होती. पंरतु परमेश्वरी संकेतानुरुप तसा प्रकार न होता डोंगर मंहमदाकडे गेला नाही तरी महंमत डोंगराकडे गेला व अखेर ही विसकटलेली घडी पुन:नीट बसवण्याची संधी गोमांतकास लाभली.

संघटनेच्या पायावर एकंदर धार्मिक उन्नतीचें कार्य करावे हें या शाखेचें ब्रीदवाक्य असल्यामुळें कोणतीही व्यक्ती किंवा संस्था अशाच प्रकारचें कार्य करील त्यांशी ही शाखा सहकार्य करून, शक्य ती मदत पुरवील अशीच तिची रचना आहे. दुरीस येथे वाव नाही. एकंदरीनें गोमांतक वेळींच सावरला गेला व दुरीचे बीज नाहीसे करण्यास झटण्याचें एक अत्यंत महत्त्वाचे साधन उपलब्ध झाले.

या संस्थेचे सभासद वार्षिक चार आणे दिल्यानें होतां येतें. सभासदांत भेदभाव नाही. तूर्त या शाखेचें कार्यालय पणजी येथें ठेवण्यांत आलें आहे. अशा या उच्च ध्येयानें निर्माण झालेल्या सर्वव्यापी संस्थेशीं आमचे धर्मबांधव सहकार्य करतील अशी आह्मी आशा केल्यास ती फोल ठरेल काय?

*(गुरुवार, दि. २८ ऑक्टोबर १९२८)*

# त्रेचाळीसावी राष्ट्रसभा

यंदाची त्रेचाळीसावी राष्ट्रसभा सर्व दृष्टींनी अपूर्व झाली. कलकत्त्यासारखें भारताची गत राजधानी असलेलें भव्य शहर, बंगाली लोकांसारखे भावनाप्रधान लोक, सुभाषचंद्रांसारखा उत्साही नेता, आणि पंडीत मोतीलाल नेहरुंसारखे सन्माननीय अध्यक्ष लाभल्यामुळें यंदाच्या राष्ट्रसभेंत एकप्रकारचा अदम्य उल्हास दिसून येत होता. सर्वाआधी अध्यक्षांची मिरवणूक काढण्यांत आली ती तर हिंदुस्थानच्या आर्वाचीन इतिहासांत आपल्या प्रिय पुढाऱ्याचें केलेले असलें थाटाचें स्वागत नमूद नाही. रामायण, महाभारत आणि प्राचीन भारतीय इतिहासात विजयी सम्राटाचें स्वागत अशाच देवांसहि हेवा वाटेल अशी रीतीनें करीत असत. असें वर्णन आढळते. परंतु कांही कांही बाबतीत कलकत्यास निघालेल्या पंडित मोतीलालांच्या मिरवणुकीनें त्या मिरवणुकांवरहि ताण केली आहे. त्रीजगतास ताप देणाऱ्या रावणाचा पराभव करून कोदंडधारी प्रभू रामचंद्र जेव्हां अयोध्येस परत आले, तेव्हां अयोध्येच्या पौरजनांनी त्यांचे अशाच थाटानें स्वागत केलें होतें. त्या स्वारीत आपलें अठरा पद्में वानर स्वयंसैनिक घेऊन स्वातंत्र्यवीर सुभाषचंद्राप्रमाणे महावीर हनुमान मिरवणुकीची व्यवस्था ठेवीत होता. पंडित मालवीयजी वगैरे प्रख्यात भारतीय पुढाऱ्यांप्रमाणें बिभिषण सुग्रेवादी स्नेहि नपृति पाठीमागून रथांत बसून चालले होते आणि अयोध्येंतील पौरजनांप्रमाणेंच कलकत्यांतील पौरजनहि आपल्या प्रिय पुढाऱ्यावर अविरत सुमनवर्षाव करीत होते. श्रीराम चंद्राच्या सुवर्णरथाला त्यावेळी रत्नालंकार धारण केलेले चोवीस शुभ्र अश्व जोडले होतें असे वर्णन आहे. अश्वसंख्येंत कलकत्याच्या नागरिकांनी त्यावरही ताण केली यात संशय नाही.

भारतीय युद्धांत विजय मिळवून हस्तिनापुरात प्रवेश केल्यावर धर्मराज युधिष्ठिराचेंहि स्वागत हस्तिनापुरच्या प्रजेनेहि असेंच केले होते. शतसंख्या गंगोदाकानें भरलेले सुवर्ण कलश हाती घेऊन सुवासिनी स्त्रियांनी राजवाड्याच्या द्वारात युधिष्ठिराचें स्वागत केलें असें वर्णन आढळतें. देशबंधु नगरच्या महाद्वारांतहि शेकडों सुवासिनी व कुमारिका स्त्रियांनी गंगोदकानें

पंडितजीचें पादप्रक्षालन केलें व त्यांच्या आयुरारोग्याकरीतां शक्तीदेवी कालीमातेची प्रार्थना केली. कलिंग विजयानंतर सम्राट अशोकाचेंहि पाटलीपुत्राया नागरिकांनी याच गतीने स्वागत केलें होते. राजरस्त्यावर सुगंधी द्रव्याचें सडे घालून ते रस्ते गालीच्यानें सुशोभित केले होते व ठिकठिकाणी प्रचंड तोरणें उभारलेली होती असें त्या स्वागताचें वर्णन आढळतें. पंडितजींच्या स्वागतसमयी कलकत्ता नगरीही प्रचंड तोरणांनी शृंगारण्यात आली होती. सम्राट  हर्षवर्धनाच्या भारत दिग्विजयानंतर त्याने आपल्या कनोज राजधानीत प्रवेश केला त्या स्वारीचें वर्णन तर अतिशय रम्य आहे. गळ्यांत रत्नाच्या माला घातलेले वीस हजार हत्ती सर्वात पुढें चालत होते. प्रत्येक हत्तीवर एक अंबारी असून त्यात केशरी पोशाख केलेला एकेक योद्धा स्थित झाला होता. त्यामागून घोडेस्वार, त्यामागून पायदळ व त्यामागून सुवर्णाच्या रथांत बसलेला सम्राट हर्षवर्धन असा तो थाट होता.

प्राचीन वर्णनाशीं ताडून पहातांत या मिरवणुकींत सुवर्णाची व संपत्तीची ठळक उणीव दिसून येते. कदाचित या मिरवणुकीस राजसत्तेचें पाठबळ नसल्यानें ही कमरता दिसून आली असेल, परंतु भारतवर्षातील संपत्ति आटून गेली, त्याचाच हा बहुतांशी परिणाम असेल असा जर कोणी तर्क केला तर तो पूर्णपणें चूक ठरणार नाही. अठरा विश्वे दारिद्र्यानें गांजलेले भारतीय लोक आपल्या पुढाऱ्यांविषयी अंत:करणांत असलेली कृतज्ञता यापेक्षां थाटानें आणखी ती कशी दाखविणार? उत्साहाचा अतिरेक हाच कृतज्ञतेचा परम उमाळा असतो आणि संपत्तीपेक्षा अंत:करणाचा आनंद हेंच त्याचें गमक आहे.

*(गुरुवार, दि. १९ जानेवारी १९२९)*

# सत्याग्रहाचें सामर्थ्य

महात्मा गांधी यांनी हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य मिळवून देण्याकरीतां आरंभिलेली सत्याग्रहाची मोहीम फलद्रुप होणार की नाही

याबद्दल संपूर्ण जगांतील वर्तमापत्रांतील वाचकांमध्ये भवति न भवति चालली आहे. आजपर्यंत परपंत्र राष्ट्रांनी ज्या मार्गानें स्वातंत्र्य संपादन करून आपल्या राष्ट्रास उन्नतीस चढविलें, तो अत्याचाराचा व उघड लढाईचा मार्ग सध्याच्या हिंदुस्थानच्या स्थितींत अगदी शक्य नसल्यानें महात्माजींनी प्रस्तुत मार्ग चोखाळण्यास आरंभ केला आहे. अत्याचारानें स्वातंत्र्य संपादन करण्याचा संभव शेकडा ५० टक्के जरी असता, तरीही इतिहासांत अभूतपर्व असलेला हा मार्ग चोखाळण्यास महात्मा गांधीही सज्ज झाले नसते आणि यदाकदाचित आपल्या अहिंसा व्रतास अनुसरुन ते तयार झाले असते, तरी राष्ट्रानें त्यांना बहुमतानें पाठिंबा दिला नसता, हिंदुस्थानच्या सद्य:स्थितीत स्वातंत्र्याकरीता निर्वाणीचा प्रयत्न केला पाहिजे आणि जोपर्यंत सत्याग्रहापेक्षा जास्त चांगला मार्ग महात्माजींची वेड्यांत गणना करणाऱ्या लोकांना दाखवितां किंबहुना आचरणांत आणतां येत नाही तोपर्यंत गांधीना एकमुखानें पाठींबा देणें हेंच आज राष्ट्रांतील सर्व लोकांचे कर्तव्य आहे.

स्वातंत्र्यवाद्यांनी स्वार्थत्यागपूर्वक आचरणांत आणलेल्या मार्गतहि चुका दाखवून किंवा कल्पनेने उभ्या करून बहुजनसमाजाला भेडसावणारे दीर्घ शहाणे सर्वकाळी व सर्व देशांत निपजलेले आहेत. परकीय सरकारकडून आपणास जोपर्यंत येथेच्छ खुराक मिळत आहे, तोपर्यंत देशातील बुभुक्षित जनसमुदायाकडे यांचे लक्षच जात नाही. क्रांति हा शब्द ऐकतांच ते अगदी भिऊन जातात. आपल्यासमोर असलेलें पंचपक्कानांचें ताट कोणी ओढून नेत आहे की काय असें त्यांना वाटतें आणि चित्तवृत्ती भांबावून जाऊन मागचा पुढचा काहीं सुविचार न करता प्रचलित राज्यपद्धतीत क्रांति करू इच्छिणाऱ्या महात्म्याला शिव्या देण्यांत ते आपल्या सामर्थ्याचा उपयोग करतात, कारण भरीव विरोध करण्याइतकें सामर्थ्य किंवा नैतिक पाठबळ त्यांना मुळीच नाही. शठं प्रति शाठ्यं या न्यायानें इंग्रजासारख्या आपमतलबी व आसुरी सरकारास वांकविण्यात शाठ्य नीतीचाच उपयोग करणें जरी जरुर असलें तरी सत्याग्रहाचें शस्त्र अगदी बोथट आहे अशांतली गोष्ट नाही आणि नि:शस्त्र प्रजेला तर त्याशिवाय अन्य मार्गच उपलब्ध नाही. अमेरिकेत थोरो व रशियांत टॉलस्टॉय या लोकसेवकांनी यापर्वी त्या मार्गाचा अवलंब केला होता आणि

तो सत्याग्रह जरी तात्काल फलदायी झाला नाही, तरी त्याचे सुपरिणाम दिसून आल्याशिवाय राहिले नाहीत. वरील लोकसेवकांनी जरी सत्याग्रहाचे शस्त्र पूर्वी वापरिलें होतें तरी त्याचे खरे उत्पादक महात्मा गांधीच आहेत. हे शस्त्र दक्षिण अफ्रिकेंतील झगड्यांत महात्माजींनी प्रथम उपयोगांत आणिलें व त्याचा आठ वर्षे सतत उपयोग करण्यांत आला. व शेवटी त्या सत्याग्रहांत यश मिळवून सैतानी सरकारास वठणीवर आणण्याचे सामर्थ्य त्या शस्त्रांत आहे हें त्यांनी सिद्ध करून दाखविले.

दक्षिण आफ्रिकेंतील लढ्यांत विजय मिळविल्यावर सन १९१५ साली महात्माजी हिंदुस्थानांत आले. या वेळी सत्याग्रहाविषयी साहजिकच त्यांना आत्मविश्वास वाटू लागला होता. इतक्यांत गुजराथ प्रांतातील विरम गांव या गावीं जकातीच्या नाक्यावर चालणाऱ्या जुलुमाची कहाणी त्यांच्या कानावर आली. तात्काळ गांधीजी राजकोटला गेले आणि त्यांनी चाललेल्या जुलुमांच्या खरे खोटेपणाविषयी चौकशी चालविली. तेव्हा आपल्या कानावर आलेल्या सर्व गोष्टी खऱ्या असल्याचे त्यांना आढळून आले. त्याचबरोबर विरमगावात लोकांनी सत्याग्रह करण्याची तयारी करावी, असा त्यांनी जनतेला सल्ला दिला. हें वर्तमान त्या वेळच्या व्हॉइसराय लॉर्ड चेम्सफर्ड यास समजताच त्यांनी तें जकातीचे नाकेंच उपटून सत्याग्रहाचा काटा समूळ उपटून टाकला. हिंदुस्थानांत सत्याग्रहाला मिळालेला हा पहिला विजय होय. यावरुन सत्याग्रहाचे शस्त्र किती प्रभावी आहे तें कळून येते.

त्यानंतर मुदत बंदीनें बहिरदेशी जाणाऱ्या हिंदी मजुरांच्या गुलामगिरीचा १९१७ साली फारच बोभाट झाला. मजुरांच्या निर्यातीस बंदी करण्याबद्दल कौन्सिलात ठराव आले, जाहीर सभा झाल्या, डेपुटेशने झाली पण सरकारनें कोणासही दाद दिली नाही. तेव्हा गांधीजींच्या सल्ल्याने सत्याग्रह करण्याचें निश्चित झालें. हा तोडगा मात्र अचूक लागू पडला आणि थोडक्याच कालांत ही आसुरी गुलामगिरीची पद्धत कायमची बंद करण्यांत आली. गांधीजींनी आरंभिलेल्या सत्याग्रहाचा हा हिंदुस्थानांतील दुसरा विजय होय.

यानंतर चंपारण्यातील झगड्यास आरंभ झाला. युरोपियन मळेवाले निळीची लागवड करण्याच्या बाबतीत गरीब हिंदी शेतकऱ्यांवर अनन्वित

जुलूम करीत असल्याने ती पद्धति समूळ बंद करण्याकरीता गांधीजींना कंबर कसली व सर्व उपाय हरल्यानंतर सत्याग्रहाचा अवलंब केला. हा सत्याग्रह सहा महिनेपर्यंत चालला होता. शेवटी सत्याग्रही लोकांच्या अटी मान्य झाल्यानंतर हा सत्याग्रह बंद करण्यात आला.

चवथा सत्याग्रह खेडा जिल्ह्यात सारावाढ केल्यामुळे महात्मजींच्या नेतृत्वाखाली करण्यांत आला. ही सत्याग्रहाची लढाई कित्येक महिनेपर्यंत चालून कमालीचा स्वार्थत्याग केल्यामुळें ह्याहि लढ्यांत सत्याग्रहीच विजयी झाले. त्यानंतर १९१९ साली रौलेट कायद्यामुळें महात्माजींनी सत्याग्रह केला. या सत्याग्रहामुळें जालियानवाला बागेंत जरी सरकारने अनन्वित अत्याचार केले, तरी शेवटी रौलेट कायदा रद्द करणें सरकारास भाग पडले. ह्मणून हाहि सत्याग्रहाचा विजय समजण्यांस हरकत नाही.

ह्या नंतरचा सत्याग्रहाचा संग्राम बार्डोली येथे अवघ्या एका वर्षापूर्वी झाला. सरदार विठ्ठलभाई पटेलांच्या नेतृत्वाखाली हा संग्रम कसा यशस्वी झाला याची आठवण वर्तमानपत्रीं वाचकांस ताजी आहेच.

अशा रीतीनें सत्याग्रहाची मोहीम आजपर्यंत यशस्वीच होत आलेली आहे. आणि स्वार्थत्यागाची मूर्तिमंत प्रतिमा असे महात्मा गांधी यांच्या हातांत जोपर्यंत ही चळवळ आहे तोपर्यंत ती यशस्वीच होत जाणार यात संशय नाही. मात्र फलाची आशा सोडून निष्काम भावानें देशसेवा करण्यास तयार झालेलें सच्चे सैनिक महात्माजींच्या कार्यक्रमांत भाग घेण्यास धांवून गेले पाहिजेत. खरे देशसेवक कोण व बोलके कीर्तिलोलुप कोण याची पारख होण्याची ही नामी संधी आहे. भारतवर्षाच्या सर्व भागांतून महात्माजींना सक्रिय सहानुभूति मिळत आहे सध्या पैशाची त्यांना कांही आवश्यकता नाही. अंतर्बाह्य पवित्र असलेले सत्याग्रहीच त्यांना काहीच मदत करणार नाही काय? ज्यांनी कमवावें त्यांनी उपभोगावे हा जगाचा न्यायच आहे. गांधीजींना विरोध करणारा महाराष्ट्र सत्याग्रहास उन्मुख झाला, मग महाराष्ट्रांतर्गत गोमांतक जर स्वस्थ राहिला तर त्याने महाराष्ट्रीक ह्मणवून घेण्यात भूषण कोणते?

*(गुरुवार, दि. ३ एप्रिल १९३०)*

# शेजारी काय चाललें आहे?

महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानांत प्रस्तुत सुरु असलेल्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीनें ब्रिटिश साम्राज्य सत्तेचे धाबे दणाणले आहे. हे तेथें माजलेल्या दडपशाहीवरुन स्पष्ट होत आहे. दडपशाहीच्या पाशवी शक्तींत महात्मजींच्या शांतताप्रधान चळवळीचे नरडें दाबण्याचें सामर्थ्य वसत आहे या उथळ धमेंडीनें ब्रिटिश नोकरशाही त्या सैतानी शक्तीचा जिकडे तिकडे सर्रास उपयोग करीत आहे आणि 'प्राण गेला तरी बेहत्तर पण आरंभिलेल्या चळवळीतून माघार ह्मणून कधीच घ्यावयाची नाही.' अशा निर्धारानें जे देशभक्त सविनय कायदाभंगाच्या रणक्षेत्रांत मोठ्या शौर्यानें लढत आहेत. त्यांतील कित्येक प्रमुखांची 'शस्त्रीय' अधिकारी आहुति घेत असलेलें भेसूर दृश्यहि दिसूं लागलें आहे.

पण आनंदाची गोष्ट ही की, म. गांधीजी चळवळ दडपशाहीच्या दुष्ट कारवाईनें न नरमता उलट दिवसेंदिवस जास्त उत्तेजितच होत आहे. प्रमुख पुढाऱ्यांच्या पकडापकडीने ती पंगू न बनता, उलट त्यांच्याच प्रोत्साहनानें विशेष जोमानें प्रसूत होत आहे. सेनापतीच्या कारावासाने सैन्य गलितधैर्य न होता उलट सरकारच्या आहारांत पडत असलेल्यांची जागा तें अहमहमिकेनेंच भरून काढीत आहे. एवंच दडपशाहीला दाद न देतां, सत्याग्रहीवीर आपली चळवळ पोलादी नेटानें, अभंग चिकाटीनें व असामान्य धैर्यानें चालवीत आहेत, असेंच दिसून येत आहे. व दडपशाहीच्या पहिल्याच वावटळीनें सविनय कायदेभंग नेस्तनाबूद होईल, अशी जी साम्राज्यसत्तावादी इंग्रज मुत्सद्यांची अटकळ होती, ती निराधार होऊं लागली असल्यानें ते भांबावलें असल्यास नवल नाही.

सविनय कायदेभंगाच्या चळवळीचा शेवट हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्राप्तीतच होईल असें जरी निश्चयात्मक भविष्य वर्तविणें शक्य नसलें तरी त्या चळवळीनें ब्रिटीश साम्राज्यसत्तेच्या मदांध सिंहाचे गर्वहरण होऊन, हिंदुस्थानच्या प्रचलित राज्यकारभारांत लोकक्षोभशामक असेच नवे

नवे फेरबदल करणें त्याला भाग पडल्याविना खास रहाणार नाही. सविनय कायदेभंगानें निर्भेळ स्वातंत्र्यासचें भाग्य न लाभलें तरी 'स्वराज्या'चा मार्ग निष्कंटक होईल यांत मात्र यत्किंचितहि संदेह नाही. आणि स्वराज्यापासून स्वातंत्र्याचा पल्ला जास्त दूर नसल्यानें म. गांधीच्या चळवळीनें स्वातंत्र्याऐवजी स्वराज्यच मिळले, तरी कायदेभंगाची सार्थकता झाली, असेंच कोणीही ह्मणेल असो.

कायदेभंगाच्या चळवळींत स्वराज्याचें बीज असलें तरी कांही दीर्घ शहाणें तिचा फजितवाडा उडवण्याच्या 'अव्यापारेषु' व्यापारांत रंगलेले आहेत. म. गांधीच्या चळवळीत सदरील निंदकांना कसलाच 'अर्थ' आढळत नाही. उलट, महात्माजींच्या कायदेभंगांनें हिंदुस्थानचा भाग्योदय होण्याऐवजी हिंदुस्थानची राजकीय अधोगतीच होईल, अशी ते बोंबाबोंब ठोकीत आहेत. पण समाधानाची गोष्ट कीं गांधी विरोधकांच्या या रडव्या सुरांत आपला सूर न मिळवितां बहुजन समाज म. गांधीच्या मार्गानें दौडत आहे. खुद्द एकदां म. गांधींना 'वेडापीर' व 'पागल' समजणारा कांही महाराष्ट्रीय प्रदेश म. गांधीविषयींचा वैरभाव विसरुन त्यांच्या कायदेभंगाचा मन:पूर्वक व सक्रिय अनुकार करीत असल्याचें दृक्प्रत्ययास येत आहे.

बाकी, दीर्घ शहाण्यांची जात हिंदुस्थानांत व प्रस्तुत कालांतच निर्माण झाली आहे, असें नाही. ती सर्व स्थली व सर्व काली या ना त्या स्वरुपांत आढळून येतच असते. आमच्या या प्रांतांत थोडेथोडके कां दीर्घ शहाणें आहेत? त्यांच्यामतें देशभक्ती ह्मणजे असा धंदा की ज्यापासून कोणत्याच तऱ्हेचा उपसर्ग बाधत नाहीं व ज्यांत कोणत्याच स्वार्थत्यागाविना लोकांत बोलबाला उत्पन्न करण्याची 'धमक' असतें! हे 'गमक' दृष्टीआड करून जे लोक स्वराष्ट्रकल्याणार्थ आपलें जीवित व वित्त धोक्यांत घालीत असतात ते देशभक्त नव्हते, असा त्या दीर्घ शहाण्यांचा सिद्धांत असतो. नरिमन बजाज, गंगाधरराव देशपांडे, गांधीपुत्र देविदास व रामदास व इतर लोक हे राष्ट्र कल्याणार्थ निधड्या छातीनें कारावास पत्करीत आहेत. हे त्या दीर्घ शहाण्यांच्या मतें देशभक्त नसून त्यांच्या स्वार्थत्यागांत त्यांना राम दिसत नाही!

तरी बरें की, कार्यकर्ते लोक अशा स्वार्थतत्पर व उदरभरु निंदकांच्या निरर्गल प्रलापांनी वरमून न जातां, आपलें कर्तव्य सतत बजावितच असतात. कर्तव्य आचरणांत ते इतके गढून गेलेले असतात कीं त्यांना त्या दीर्घ शहाण्यांच्या मुत्सद्दी व मूर्ख कोल्हेकुईला कान देण्यास मुळीं फुरसतच नसते.

*(गुरुवार, दि. १७ एप्रिल १९३०)*

# दडपशाहीचें पर्यवसान

ब्रिटीश नोकरशाही व हिंदी प्रजाजन या उभयतांत उत्पन्न झालेली राजकीय तेढ तडजोडीने शमन पावेल असा जो कित्येकांचा कयास होता तो महात्माजींच्या अटकेमुळे आतां निष्फळ झाला आहे. जोपर्यंत म. गांधी सरकारचे सन्माननीय पाहुणें बनले नव्हतें, तोपर्यंत तडजोडीची शक्यता संभवनीय होती. उभय पक्षी 'देवाण घेवाण' होऊन सविनय कायदेंभगानें पेटविलेली असंताषोची प्रखर आग विझण्याला जें वातावरण पूर्वी अनुकूल होतें तें सरकारनेंच जाणून बुजून आतां नष्ट केलें आहे, आणि सविनय कायदेंभंगाचे जगद्वंद्य प्रणतेच सरकारी क्रोधाला बळी पडले असल्याने तडजोडीची अशक्यता लोकांपेक्षा सरकारलाच जास्त अहितकारक होईल असें ह्मणण्यास हरकत नाही.

एकदां महात्माजींचे 'भाई' मानलेलें पण प्रस्तुत सरकारजमा झालेले 'अल्ली' नी सरकार व गांधी यांच्यांत मध्यस्थी घडवून आणण्याची मध्यंतरी ऐट आणली होती. गांधी व व्हॉइसरॉय यांना पाठविलेल्या मध्यस्थीसूचक विद्युतसंदेशांचाही वर्तमानपत्रांतून गाजावाजा करण्यांत आला होता. पण त्याकडे सरकाराप्रमाणेंच महात्माजींनीही दुर्लक्ष केल्यामुळें मध्यस्थीचा प्रश्न तर चर्चेस निघाला नाहीच, उलट मध्यस्थीच्या अहंमन्य लुडबुडीनें मात्र माजी 'भाई' ची लोकप्रियता उतरली आहे. याचा पडताळा जगाच्या निदर्शनास आला.

तडजोडीचा कलह–शमक उपक्रम लाथाडून सरकारनें दडपशाहीचा कहर उडवून दिला असल्यानें लोकांतील असंतोषाचें क्रुद्ध वादळ निवळेल असें मानणें ह्मणजे परस्पर विरुद्ध दिशेनें प्रवास करणाऱ्या माणसांची मध्यंतरी गाठ पडेल असें समजण्यासारखें हास्यास्पद होय. दडपशाहीच्या दराऱ्यानें, शिक्षांच्या झोडीनें व गोळीबाराच्या पाशवी उपायानें चळवळीच्या बाल स्वरुपांतसुद्धां शांततेचा आभास उत्पन्न होणें आतां अशक्यप्राय झालें आहे. अंतस्थ असंतोषाची ज्योत तर पूर्वीपेक्षाही विशेष तीव्रतेने तेवत राहील आणि लोकक्षोभांचा स्फोट झाल्यावर सरकारी सत्तेचे पावशी सामर्थ्य एकदम लुळें पडेल. कारण सांप्रतचा मनु परवशतेला पोषक नसून स्वातंत्र्य संपादनासच प्रोत्साहक असल्यानें परसत्ता टिकवणारी १८५७ सालची शस्त्रें बोथट ठरत आहेत.

पेशावरप्रकरण, चितांगांगचे बंड, सोलापुरांतील ताजे दंगे, ठिकठिकाणी लोकांची मृत्युविषयी दिसून येणारी बेफिकीरी 'इष्ट ध्येय साध्य झाल्याविना कायदेभंग विसावा घेणार नाही.' असेंच नोकरशाहीचा बजावित नाही काय? राज्यनिष्ठा व्यक्त करणाऱ्या सभांस जी पूर्वी 'जी हुकूम' वाल्यांची अफाट व बिनबोभाट गर्दी उसळत असे ती आतां पूज्याखाली उतरली असून, ज्याला त्याला अराजनिष्ठा मिरवण्यांतच भूषण वाटत आहे. हें दृश्यहि परसत्तेचे आयुष्य संपुष्टांत आल्याचे निश्चयात्मक चिन्ह नव्हे काय? एकीकडून लोकांची स्वराज्यसंपादनार्थ आत्मसमर्पणाची असंदिग्ध तयारी व दुसरीकडून राजनिष्ठ पोटाळांचा पूर्ण अभाव, अशा भयानक पेंचांत नोकरशाही सांपडली असल्यानें, तिची मुक्तता केवळ लोकांच्या राजकीय आकांक्षा तृप्त करण्यावरच अवलंबून आहे, हें अर्थात कोणालाहि मान्य असलें पाहिजे.

हिंदुस्थानच्या अंत:स्थितीप्रमाणेंच त्याचे परराष्ट्रीय संबंधहि पेशावर प्रकरणानें गुंतागुंतीचे होण्याचा रंग दिसत आहे. इंग्रजांच्या तेथील अमानुष गोळीबाराला अनेक निरपराधी मुसलमान बळी पडल्यानें अफगाणिस्थानांत भयंकर लोकक्षोभ उत्पन्न झाला असून हाजी नावांच्या एका मुसलमान गृहस्थाच्या नेतृत्वाखाली अफगाणांतून एक लाख पठाण पेशावरविरुद्ध चालून

येत असल्याच्या वार्ता उठत आहेत. तसेंच पेशावरचा काबुली वकील पेशावर सोडून परत स्वदेशास गेल्याच्याही वदंता आहेत. त्यामुळेंच इंग्रज व अफगाण या उभय राष्ट्रांत लवकरच युद्ध पेटणें संभवनीय वाटतें. आणि एकदां का या युद्धाला सुरवात झाली ह्मणजें महायुद्धाच्या द्वितीयावृत्तीचे प्रदर्शन जगासमोर झालेंच ह्मणून समजावें! तुर्कस्थान, बलुचीस्थान, नेपाळ, चीन, जपान, रशिया, जर्मनी व कदाचित अमेरिका व इतर स्वयंनिर्णयतत्त्ववादी राष्ट्रांचाही एक गडगंज गट बनून इंग्रजांची जगांतील साम्राजसत्ता रसातळास पोंचविण्यास तो सज्ज होणे शक्य आहे. तात्पर्य ब्रिटिश नोकरशाहीनें महात्मा गांधीच्या अकरा मागण्यांकडे दुर्लक्ष करून आत व बाहेर भयंकर शत्रू उत्पन्न केले आहेत. हे शत्रू इंग्रजांच्या हिंदुस्थानांतील सत्तेचा केव्हा चक्काचूर उडवून देतील याचा नेम नाही. वस्तूस्थितीची जाणून बुजून बेपर्वा करून नोकरशाहीनें बळेंच हा प्रसंग आपणावर ओढवून आणला आहे. 'जसें करावें तसें भरावें, शब्द कुणावरी ठेवूं नये' असेंच तिच्या मुत्सद्देगिरीच्या बाबतीत ह्मणावें लागत नाही काय?

दु:खाची गोष्ट एकच की, लॉर्ड आयर्विन यांना म. गांधी, नामदार पटेल, पं. नेहरु वगैरे हिंद पुढाऱ्यांचे सल्ले नाकारुन व नोकरशाहाच्या हातांतले बाहुलें बनून आपल्या सत्ताकालाचा शेवट रक्तबंबाळ केला व स्वंदशोद्धाराच्या लालसेने धारातीर्थी पतन पावलेल्या महात्म्यांच्या पवित्र रक्तानें भिजलेल्या मार्गावरुन ते निजधामी गमन करणारे आहेत!

*(गुरुवार, दि. १५ मे १९३०)*

# अरेरावीचा अनर्थ

टाइम्ससारखी सरकारजमा पत्रें व तत्सम ब्रिटिश साम्राज्यसत्तावादि कांही लोक वगळले. तर सर्व हिंदुस्थान देश तेथे चालू असलेल्या निरंकुश व निर्लज्य दडपशाहीनें हवालदील झाला आहे, हाच तेथील प्रचलित परिस्थिति निरीक्षणाचा सार ठरतो. राष्ट्रीयांप्रमाणेंच, प्रागतिक, मुसलमान व ब्राह्मणेतर

लोक यांचेही दडपशाहीनें नाक आवळल्यामुळें त्यांच्या तोंडातूनही आतां वरवंटाशाहीविरुद्ध तीव्र निषेधपर उद्‌गार निघूं लागले आहेत. स्वसत्तेचें चिरगुट फाटूं नये ह्मणून ब्रिटिश नोकरशाही 'फोडा व झोडा' या मुत्सद्देगिरीचा अवलंब करताना हिंदूंविरुद्ध मुसलमानांना अथवा ब्राह्मणाविरुद्ध ब्राह्मणेतरांना जवळ करीत असली, तरी दडपशाहीच्या कठीण प्रसंगी इंग्रज सत्ताधारी सगळ्या हिंदी लोकांना सारखेच सतावून सोडतात. या गोपनाचा स्फोट झाला असल्यानें सर्व हिंदी राष्ट्र एकमुखानें पाशवी शक्तीप्रदर्शनाचा इन्कार करीत असल्यास अवास्तविक असें काहीच नाही.

हिंदी राष्ट्रांतील लोकप्रक्षोभाची एकसामानता सोलापुरांत दंग्यांत व दंग्यानंतर घडलेल्या अनेक सरकारी आत्याचारामुळें व्यक्त झाली. दंगा मोडून शांतता प्रस्थापित करण्याच्या नावांखाली नि:शस्त्र हिंदी लोकांवर सशस्त्र ब्रिटीश नोकरशाहीनें जी बेहद्द बहाद्दरी गाजविली ती फ्रान्स देशाच्या अकराव्या लुईसारख्या क्रुरतम गणलेल्या राजानें पाहिली असती तर त्या नरेंद्राचासुद्धा देह थरारुन 'घामाघुम' झाला असता. अकराव्या लुईचे क्रौर्यवर्णन इतिहासात पुढीलप्रमाणें आढळते.

हा क्रौर्याचा मूर्तिमंत पुतळा-व्याघ्र होता. कारण त्याच्या दुष्ट व दगडी हृदयांत स्वतःच्या बायका मुलांसंबंधीसुद्धा प्रेमाचा लवलेश आढळत नसे. तो आपणास ईशभक्त व साधुनिष्ठ ह्मणवून घेत असे. देवदेवीच्या प्रतिमापदकांनी तो आपला देह आपादमस्तक विभूषित करीत असे व असंख्य मानवी हत्यांबद्दल मुकुटावर आरुढ झालेल्या एका शिसवी कुमारीच्या मूर्तीपाशी क्षमेची याचना करीत असे. राजमहालासभोवती अनेक सूळ उभारले होते व मनमानेल तेव्हा व मन मानेल त्याला सुळावर चढविण्याची आज्ञा तो फर्मावित असे. मानव जातीचा तो राक्षस इतका कट्टा शत्रू बनला होता की आपल्या आराम मंदिराखाली एक खोली तयार करावयास लावून, त्यात चांडाळा करवी लोकांना हरतऱ्हेने गांजीत असे. हेतु हा की निर्बल व असहाय अशा या लोकांच्या कंठातून प्राण जातेवेळी निघणाऱ्यां आर्त स्वरांनी व किंकाळ्यांनी अंत:करणांत आनंदोर्मीचा सागरच खळबळावा आणि इतक्या थराला पोचलेल्या निष्ठुर दुष्टतेने त्याची क्रुरता तृप्त होत नसल्यानें

तो मुलांच्या हत्या करावयास लावून त्यांच्या रक्तानें स्नान करीत असे.

सोलापुर–प्रकरणांत पकट झालेली सैतानी अमानुषता प्रस्तुतच्या बदलेल्या मनूकडे नजर फेंकल्यास अकराव्या लुईच्या एकतंत्री राजवटीतील रक्तस्त्रांवापेक्षा विशेष निषेधार्ह ठरत नाही काय? सोलापुरांत दंग्यानंतर व शांततेच्या वेळी स्त्रियांच्या अबलतेकडे व मुलांच्या निरपराधित्वाकडे मुद्दाम दुर्लक्ष करून सुधारणेचा टेंभा मिरवणाऱ्या परसत्ता संरक्षणकांनी गोळीबारानें प्राण घेतल्याच्या ज्या वार्ता वातावरणातून प्रसृत होत आहेत त्या आमचेंच ह्मणणें सिद्ध करीत नाहीत काय? सोलापुरांत लहान प्रमाणांत जालियनवाला बागेचीच पुनरावृत्ति झाली, असें जे सांगण्यात येते ते खरें असल्यास, ब्रिटिश नोकरशाही माणसांतून उठली आहे, असें एखाद्याच्या तोंडून उद्‌गार निघाल्यास ते अयथार्थ कोण ठरवील?

सोलापूर–प्रकरणानें भडकलेल्या लोकक्षोभाच्या आगीवर 'विनंत्या' चा पाऊस पाडून तो शमविण्याची लॉर्ड आयर्विनने पराकाष्ठा चालविलेली आहे. परंतु दडपशाही प्रमाणेच विनंत्यांचा मार्गहि हिंदुस्थानांत उठलेलें क्रांतीचें वादळ शांत करण्यास समर्थ होणार नाही. अशीच एकंदर चिन्हे भासत आहेत. हिंदुस्थानांत पूर्ववत शांतता देवीचें साम्राज्य नांदण्याला आता एकच उपाय शिल्लक राहिला आहे. तो उपाय इंग्रजांनी स्वयंनिर्णयाच्या तत्त्वानुसार हिंदुस्थानला डोमिनियन स्टेट ताबडतोब बहाल करणें हा होय. वाटोळ्या परिषदेचा व सत्ताधारी इंग्रजांचा लांबलचक अभिवचनाचा बोजवारा इतका उडालेला आहे की त्यांवर आतां अज्ञान मुलांचासुद्धा विश्वास बसत नाही. महायुद्धाच्या कठीण प्रसंगी ब्रिटिश नोकरशाहीच्या थापेबाजीनें लोकमान्य टिळक व महात्मा गांधी कसे फसले व या हिंदी पुढाऱ्यांनी केलेल्या एक लाख रंगरूट भरतीची फेड युद्ध समाप्तीनंतर आपली हिंदुस्थानची सत्ता दृढतम वाटल्यावर तिनें कोणत्या रीतीनें केली या ताज्या गोष्टी लोकांच्या स्मरणांतून बुजल्या नसल्यानें, लॉर्ड अयर्विनची दडपशाही जशी सपशेल फसली तद्वतच त्यांच्या विनंत्याचें उपक्रमही निष्फळ ठरणार आहेत. दडपशाहीनें पक्षभेद मोडून एक झालेला हिंद देश

आतां विनंत्यांच्या मोहास बळी पडून राष्ट्रोन्नतीची आपली चळवळ थोपवील, असें मानणें ह्मणजे खऱ्या वस्तुस्थितीचें अज्ञान प्रगट करणें होय.

*(गुरुवार, दि. २२ मे १९३०)*

# ब्रिटिश मालावर बहिष्कार

## (१९-६-३०)

नशा, मग ती मदिरेची असो वा सत्तेची असो, मद्यप्याला जशी घातक असते तशीच सत्ताधाऱ्यालाही पण असतें, दारुच्या नशेंत दारुबाज व्यक्तीला आपली प्रत्येक कृति इतकी न्याय्य वाटते की, तिजविरुद्ध तक्रारणाऱ्यांची तो प्रक्षोभ व युक्तीवादानें नुसती हबेलंडी उडवून सोडीत असतो! पण मदिरेचा अंमल उतरल्यानंतर त्या आपल्या कृतीच्या आठवणीनेंच त्याच्या हृदयाची होळी होत असते.

जो नियम दारुबाजाला लागू आहे तोच 'सत्ताबाजाला' ही लागू पडतो. अनिर्बंध सत्तेनें मदांध बनलेल्या लोकांना आपला प्रत्येक अन्याय, प्रत्येक अत्याचार व प्रत्येक 'लगाव सोटा' न्याय्यच वाटून, पाशवी शक्तीच्या प्रदर्शनानें ते आपलें प्रत्येक कृत्य समर्थनीयच भासवितात. पण विरोधक बळाच्या गनिमी मारानें सत्तेची नशा थंडावली आणि अरेरावीला आळा पडला ह्मणजे ते आपोआपच अनुपात पावत असतात.

नशेच्या पचनी पडलेल्या व्यक्ती पागल बनते. संसाराबरोबरच ती आपल्या अब्रूचीही हत्या करते. दारुड्याचा अध:पात इतक्यावरच विराम पावता तर शास्त्रकारांनी मद्यप्राशनाची गणना पंचमहापातकांत खास केली नसती. पण मदिरेच्या तावडींत सांपडलेला प्राणी समाजस्थैर्य भंगण्यासही कारणीभूत होत असल्याने, अशा दुष्ट व्यसनांपासून लोकांना परावृत्त करण्याच्या हेतूनेंच समाजहितचिंतक नेत्यांनी मद्यप्राशनाची तुलना ब्रह्महत्तेच्या पातकाशी केली असावी. आणि ज्या अर्थी दारुच्या नशेने धुंद झालेल्याच्या

हातून घडणाऱ्या चाळ्यांना, सत्तेनें मदांध बनलेल्यांचे चाळे खाली पाहावयास लावीत असतात, त्या अर्थी सत्त-मदिराप्राशनाचें घोर पातक ब्रह्महत्तेपेक्षांहि किती तरी पटीनें भयंकर ठरल्यास नवल नाही.

सोलापूर प्रकरण, पेशावरचा गोळीबार, धारसाणा, विलेपार्ले व इतर ठिकाणी स्वयंसेवकांच्या बाबतीत ब्रिटिश नोकरशाहीनें व्यक्त केलेला कमालीचा दुष्टपणा इ. मदांध सत्ताधाऱ्यांचें चाळे परसत्तेचा पापी पराक्रम पराकोटीला पोंचल्याचें सिद्ध करीत नाही काय? आघाताला प्रत्याघात या न्यायानें परसत्तेच्या राक्षसी चोंचल्यांना जित लोकांकडून चांगले उत्तर दिलें जात असल्यानें तिला आपल्या 'शूर' कृत्यांचे योग्य पारितोषिक लवकरच मिळेल हे उघड आहे.

इंग्लंडला हिंदुस्थानावर सत्ता गाजवायला पाहिजे ती केवळ व्यापारी श्रेष्ठत्व कायम टिकविण्यासाठी हिंदुस्थानच्या बाजारांत आपला व्यापार खपवून इंग्लंड धनाढ्य बनलें आहे. तारवावर बसून तराजूनें पोंट भरण्यासाठी आलेले इंग्रज लोक तरवार गाजवून हिंदस्थानचें मालक झाले. आणि बऱ्या बोलानें आपल्या मगरमिठींतून हिंदुस्थानची सुटका करण्यास तें तयार नाहीत. हिंदुस्थानचा प्रश्न पार्लमेंटांत उपस्थित होतांच उदारमतवादी गणले जाणारे इंग्रजसुद्धा हुजुरपक्षापेशांही विशेष स्वार्थ प्रकट करीत असतात. येथून तेथून थेट 'बार्देसकरांची वई!'

इंग्लंडच्या मालावर पूर्ण बहिष्कार पुकारणें ह्मणजे इंग्रजी सत्तेच्या मर्मावर घाव घालणे हें अर्थात नितांत सत्य होय. व्यापारासाठी कायम होऊं पाहणाऱ्या सत्तेचा व्यापारच अशक्य करून टाकला ह्मणजे तिला आपलेंअस्तित्व अन्यथा वाटून ती आपोआपच ठिकाणावर येईल व जित लोकांचे ध्येय सहज साध्य होईल यांत संशय नाही. अशा दृष्टीनें ब्रिटिश मालाविरुद्ध सध्या जोरांत असलेला बहिष्कार कौतुकास्पद व अनुकरणीय ठरत नाही काय?

*(गुरुवार, दि. १९ जून १९३०)*

# स्वायत्त गोमांतक

## (२७-११-१९३०)

महायुद्धाच्या हलकल्होळांतून जे एक जगन्मान्य तत्त्व उत्पन्न झालें ते 'स्वयंनिर्णय' या नावाने ओळखलें जात आहे. या तत्त्वाचा निष्कर्ष हा कोणत्याही जित राष्ट्राची राजघटना त्याच्या लोकमतानुरुप ठरवली जावी आणि स्वयंनिर्णयाचें हें अभिनव तत्त्व गोमांतकास लागू केलें तर पूर्ण स्वातंत्र्यप्राप्तीविना आमची राजकीय तहान भागणें शक्य नाही, असेंच येथील खरें लोकमत ह्मणेल.

पण खरें लोकमत कोणत्या दिशेनें वाहत आहे हें ओळखून तदनरुप येथील राजघटना निश्चित करण्याची प्रवृत्ति जेते लोकांत दृगोचर होत नसल्यानें, निदान निर्भेळ स्वायत्ततेचें जें ध्येय आमच्या विधिमंडळांतील लोकपक्षीय सभासदांनी जाहीर केलें आहे, तें तरी संपादन करण्याचा कसून प्रयत्न करणें आमच्या लोकपक्षीय पुढाऱ्यांचें आद्य कर्तव्य तत्परतेनें बजावण्यास आह्मी पडेल ती झीज सोसण्यास अहमहमिकेंनें पुढें सरसावलें पाहिजे, यांत कोणताच संदेह नाही.

स्वायंत्त गोमांतकाचें ध्येय खुद्द विधिमंडळांतून घोषित झाले असल्यानें व त्याला सरकारनें कोणतीच हरकत घेतली नसल्याने, त्या ध्येयाचा उघडपणें पुरस्कार करण्यास कोणचीही भीती बाळगण्याचे कारण नाही. स्वायत्तता ह्मणजे काय व ती मिळविल्यानें गोमंतकाचा राजकारभार लोकहितकारक कसा होईल, या संबंधीची सोपपत्तिक माहिती जनतेला करून देऊन, स्वायत्ततेविषयी लोकांत जोराची उत्कंठा उत्पन्न होईल, अशा रीतीचे प्रयत्न झाले पाहिजेत. शक्य त्या ठिकाणी सभांचा किंवा संभाषणांचा उपक्रम करून स्वायत्तता संपादनांत आमचें राजकीय कल्याण कसें भरून आहे, हें लोकनिदर्शनास आणल्याविना यापुढें गत्यंतर नाही. ह्मणून आमची आमच्या पुढाऱ्यांस कळकळीची विनंती, कीं त्यांनी स्वायत्त गोमांतक

निर्मितीची चळवळ प्रमुखत्वानें उचलून धरून तिचा सर्वत्र प्रसार करण्याप्रीत्यर्थ कंबरा कसाव्या. यासाठी कांही काळ इतर चळवळींकडे थोडेंसें दुर्लक्ष करावें लागलें तरी त्याची पर्वा न करतां सर्वभार त्या एकाच चळवळीवर घालावा. त्यामुळें कदाचित अधिकारी वर्गाची अवकृपा होण्याचा संभव आहे. पण राष्ट्रहिताकडे दृष्टि देऊन ज्या ज्या मार्गांनी स्वायत्ततेचा विजय होईल, त्या त्या मार्गाचा अवलंब करून, इष्ट हेतु हस्तगत होईपर्यंत चळवळीला खंड पाडतां कामा नये. असें झालें तरच गोमांतकाच्या उद्धाराचा दरवाजा खुला होणार असून आमचें 'मुंडकारत्व' लय पावेल व त्याची जागा 'भाटकारत्व' व्यापील, प्रत्येकानें खूणगांठ बाधावी.

*(गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर १९३०)*

# अरेरावी

अरेरावी ही कोठून झाली तरी वाईट. पण ती जेव्हां सरकारी किंवा सरकारजमा लोकांकडून आचरिली जाते तेव्हां प्रजेचा क्षोभ होतो.

कोणी आगळीक केली तर योग्य शिक्षा होण्यासाठी अथवा नागरिकांच्या सुरक्षिततेस बाधा न येण्याकरीताच ज्या राजकीय अधिकारी सत्तेचा उपयोग व्हावा त्या राजकीय सत्तेने परिवेष्ठित असे लोक जेव्हा उत्शृंखल होतात तेव्हां त्यांस त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देण्यास प्रजापक्षीय जें कार्य करीतील तें सर्व योग्यच असें समजण्यांत आलें आहे.

अशा दृष्टीनें आज सगळें जग स्वराज्य मिळण्यापूर्वी निदान सुराज्य तरी मिळावें या एकाच उद्देशानें प्रेरित होऊन धडपड करीत आहे. पावसानें भिजविलें व राजाने मारले. तर कोणापाशी कागाळी नेणार? अशा अर्थाची कोंकणी भाषेंत जुन्या काळची एक ह्मण आहे. परंतु ह्या ह्मणीचा फोल पणा कालांतरानेंच सिद्ध झाला आहे. पावसाविरुद्ध ज्याप्रमाणें छत्रीची ढाल उपयोगी पडते. त्याच प्रमाणें सरकारी लोकांच्या अरेरावीवर रामबाण औषध ह्मणजे प्रजेची त्या लोकांविषयी उघड उघड बेपर्वा किंवा त्याहून कडक

उपायांचा अवलंब! असें सिद्ध झालें आहे.

सरकारनें ही स्थिती प्राप्त न होतां प्रजेकडून अधिक उणें आचरण घडवून आणण्यास कारणीभूत होऊ नये व आपल्या दोषामुळे प्रजेकडून उद्धवलेल्या राजद्रोहाचे भूत सरकारच्या मानगुटीवर बसू नये. ह्यासाठी सरकारी बगलबच्चांच्या अरेरावीस वेळीच आळा घातला पाहिजे. स्वत: अरेरावीचें आचरण करावें व जनतेच्या रोषास पात्र होऊन तिला अत्याचारास प्रवृत्त करावें व असे झालें ह्मणजे शेवटीं प्रजा अराजक झाली अशी कोल्हेकुई करावी, ही पाश्चात्य राज्यकर्त्यांच्या राज्यकारभारांतील गोम आज सगळ्यांच्या परिचयाची झाली आहे. ह्मणूनहि जनतेच्या व राज्यकर्त्यांच्या परस्पर हितसंबंधास कटु फळें न येण्याची खबरदारी घेऊन अरेरावीस आळा घालणें फार अगत्याचे आहे. दीव नगरपालिकेचे अध्यक्ष श्री. मोहनलाल फरसदास व तेथील प्रमुख नागरिक व पुढारी श्री. करसनदास मोतिचंद यांच्या विनंतीनें आमचे संपादक दीव येथील परिस्थितीची पाहणी करण्यास गेले होते. गेल्या ३०/११/३० रोजी ते तेथें पोंचल्यावर त्यांनी आपली चौकशी सुरू केली. सर्व तऱ्हेच्या लोकांच्या जबान्या घेऊन अवघ्या ४/५ दिवसांत त्यांनी आपलें काम पुरें केलें व ते तेथून परत येण्याच्या तयारीस लागले.

गेल्या ता. ४/१२/३० रोजी रात्रौ दीवहून मुंबईस जाणाऱ्या बोटीनें प्रवास करण्याच्या तयारीत असतां ते ज्या घरांत रहात होते त्यावर तेथील सरकारनें  कडक पहारा ठेवला! इतकेंच नव्हे तर त्यांच्यावर हल्ला करून कागदपत्र काढून घेण्याच्या इराद्यानें कित्येक मवाल्यांचीहि योजना करण्यात आली होती. असें मानण्यास भरपूर पुरावा आहे!

तेथील जनतेच्या कानांवर उपरोक्त प्रकार पोंचताच तिनें आमच्या संपादकांच्या देहरक्षणाची व्यवस्था करून, त्यांना सुखरुप जुनागड संस्थानांत रवाना केलें. आमच्या संपादकानें वेषांतर करून पोलिसांच्या पहाऱ्यातून बदमाश गुडांच्या हातावर तुरी दिली व दीवच्या भ्याड अधिकाऱ्यांना मनातील मांडे मनांतच खावयास भाग पाडले हा प्रकार कादंबरीतून वर्णन करण्यासारखा आहे, यांत संदेह नाही.

जुनागड संस्थानांत त्यांना प्राशीराड नावाचें जें पहिले स्टेशन मिळालें

तेथून त्यांनी नामदार गव्हर्नर जनरल सि. काव्हैर लोपीस व येथील वृत्तपत्रकार यांस तारेने दीवचा प्रकार कळीविला. मुंबईत पोंचल्यावर त्यांनी दीव येथे घडलेल्या एकंदर प्रकाराचें वर्णन सदरील अधिकाऱ्यांच्या कानी घातले. मुंबईहूनच पोर्तुगाल सरकार व वृत्तपत्रें यानांही तारा पाठवून सदर प्रकरणावर त्यांनी एक पुस्तकहि लिहिले आहे. या पुस्तकांत एकंदर दीवप्रकरणाचे सविस्तर वर्णन आलें असून त्याच्या वाचनानें दीवच्या भानगडीचे ज्ञान होण्यास सुलभ होणार आहे.

आमचे प्रिय व्यवसाय बंधू 'स्वयंसेवक' कार यांनी एक हजार रुपयांच्या मासिक वेतनावर वकिली करण्यास आमचे संपादक दीवला गेल्याची वार्ता प्रसिद्ध केली हाती. पण *'राजकारण करावें । परी गुप्तच ठेवावे'* या समर्थांच्या शिकवणीनुरुप त्या वेळी सदर बातमीचा आह्मी इन्कार केला नाही. खेरीज एक प्रकारें दीव सरकारची दिशाभूल होण्याच्या दृष्टीनें त्या बातमीचा भारतकाराला बराच उपयोग होण्यासारखा होता व तो तसा झालाहि, असें आमच्या संपादकाच्या पत्रावरुन कळतें. यावरुन असें समजावयाचें नाही की स्वयंसेवककरांनी आमच्या संपादकांवर कोणताहि दोष लावण्याच्या हेतूनें ती बातमी प्रसिद्ध केली होती. असें मानणें ह्मणजे केवळ कृतघ्नपणा होईल, त्यांना ही माहिती मिळाली ती त्यांनी प्रसिद्ध केली पण त्यांनी संपादकांवर कसलास दोषारोष केला नाही. हे एकच कारण स्वयंसेवकांरांचा सुप्रसिद्ध सरळपणा सिद्ध करण्यास पुरे आहे.

'भारत'कार या आठवड्यांत येथें पोंचणार नसून दीवचें प्रकरण ते जोरानें चालवणार आहेत. दीवच्या लोकांच्या डोक्यावरील अरेरावी सत्ता नेस्तानाबूद होईपर्यंत ते सरकारशी भांडणार असून त्या भांडणापासून उत्पन्न होतील त्या छळांस तोंड देण्याची त्यांची पूर्ण तयारी आहे. भारतकारांचा दीव येथील प्रवास दीवकरांना प्रोत्साहक झाला असून 'भारतकारांशी' पूर्ण सहकार्य करण्याचा त्यांनी निर्धार केलेला आहे.

दीवच्या एकंदर प्रकारामुळें असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाही, की आमच्या संपादकांचा जन्म बेमुर्वत व अरेरावी अधिकाऱ्यांशी झुंजवण्यासाठीच झालेला आहे!

मुंबई व पुणें येथील प्रमुख पत्रांतून दीव प्रकरणाची चर्चा होत असून, त्याची सविस्तर माहिती आह्मी आमच्या वाचकांस सवडी प्रमाणें देणार आहोत. सध्या परमेश्वरानें 'भारत'कारांची दीवच्या बदमाश गुंडांच्या तावडीतून सहीसलामत सोडवणूक केल्याबद्दल अनन्य भावानें करुणा भाकून या ओळी येथेच संपिवितो.

*(गुरुवार, दि. १८ डिसेंबर १९३०)*

# गोमांतकस्थ हिंदूंचे ख्रिस्ती समाजाशीं कर्तव्य

गोमांतकाच्या राजकीय हक्काचें भवितव्य काय असावें, असा प्रश्न आज खुद्द गोव्यातील लोकांच्या मनांत उद्भवल्याशिवाय राहणें कदापि शक्य नाही.

सभोवती इंग्लिश हिंदुस्थानांत सत्याग्रहाचा वणवा पेटत असल्यानें त्याची झळ लागत असल्यामुळें कर्तव्य जागृति होऊन आमचें भवितव्य काय होणार या विवंचनेत विचारी पुरुषाचें मन गढणें साहजिकच आहे.

एका ब्रिटिश साम्राज्यात संभवत असलेल्या विशाल हिंदुस्थान देशाची स्थिति निराळी व गोव्याच्या लहानशा टापूची गोष्ट निराळी. हे दोनहि प्रदेश जसे आकारानें व भिन्न राजकर्त्यांमुळे भिन्नत्व पावले आहेत तसेंच इतर कांही कारणामुळेंहि गोवा हा इतर कांही कारणामुळेंही इतर हिंदुस्थानाहून विशिष्ट अशा प्रकृतीचा प्रांत बनला आहे.

ब्रिटिश हिंदुस्थानांत हिंदूंची संख्या मोठी आहे. त्याचप्रमाणें तिकडे नोकरशाहींत असो अथवा इतर धंदेव्यापारांत असो हिंदूंचेच प्राबल्य आहे. असें असताहि ब्रिटिश हिंदुस्थानांतील राजकीय पुढारी स्वराज्यप्राप्तीचें ध्येय साध्य होण्यासाठी अल्पसंख्यांक असें जे मुसलमान, ख्रिस्ती, पारशी वगैरे समाज त्यांची सहानुभूति शक्य या रीतीनें मिळविण्यास खटपट करितात. अशा खटपटीचे फळ ह्मणजे तूर्त ब्रिटिश हिंदुस्थानांत सगळ्या धर्मांचे लोक

हातात हात घालून इंग्लिशांविरुद्ध सहकार्याने लढे लढवित असल्यावरुन ही सुसंघटीत शक्ती किती सुपरिणामकारी होत आहे हें सगळ्या जगाप्रमाणेंच आह्मीही विस्मयजनक दृष्टीने पाहत आहो.

खुद्द गोव्यांत पहावयाचे झालें तर हिंदु व ख्रिस्ती हे दोनहि समाज संख्येने समसमान आहेत टल्यास चालेल. परंतु नोकरशाही, धंदे, उद्योग, व्यापार या दृष्टीनी पाहिल्यास ख्रिस्तीसमाज किती तरी बाजूंनी वर्चस्व कमावून बसला आहे. असें असले तथापि, अपवादादाखल काही विचारी ख्रिस्ती व्यक्ती सोडून दिल्या तरी बहुजन ख्रिस्ती समाज पाश्चात्य संस्कृतीच्या खाद्य, पेय, चाली, रुढी यांचा त्यांवर पूर्ण पगडा पडला असल्यानें, ज्या राष्ट्रीय चळवळी ब्रिटिश हिंदुस्थानांत चालतात त्याबद्दल तो समाज उदासीनताच नव्हे तर चिडकार दाखवितो आणि खुद्द गोव्यांतील हिंदु ज्या सामाजिक किंवा राष्ट्रीय स्वरुपाच्या चळवळी करितात, त्यांकडे तो ख्रिस्ती बहुजन समाज एका प्रकारच्या संशयजन्य तिटकाऱ्यानेंच पहात असतो.

कां की ह्या ख्रिस्ती लोकांस असें वाटतें की, गोव्यांतील हिंदु ज्या चळवळी करितात त्या सगळ्यांचा ओघ ब्रिटिश हिंदुस्थानाशी आज ना उद्यां संगनमत करून ख्रिस्ती लोकांस दमनांत ठेवण्याकडे वाहत जातो.

ही त्यांच्या मनांतील साशंक वृत्ति घालविण्याचा प्रयत्न हिंदुसमाजाकडून होत नसतो, तर उलट, ती साशंक वृत्ति वाढविण्यासच हिंदूची वृत्ति अप्रत्यक्ष रीतीनें कारणभूत होत असते असें ह्मटल्यास चालेल.

जणूं काय हिंदु लोक ख्रिस्ती समाजास मनांतल्या मनांत अशी धमकी देतात की आह्मी हिंदु ह्या हरएक चळवळीं करून स्वराज्य जवळ आणण्याचे प्रयत्न करितो व एकदां स्वराज्याची सूत्रें हातांत आली ह्मणजे, त्या सूत्रांनी ख्रिस्ती समाजाचे हातपाय अशा प्रकारें जखडून टाकूं की पोर्तुगाल देशाहून गामा इकडे आल्यापासून आजवर ज्या हालअपेष्टा व उपसर्ग ख्रिस्ती लोकांकडून हिंदूस प्राप्त झाले आहेत त्याचें उट्टे एकदम काढूं!

हा प्रकार राष्ट्रीयदृष्ट्या घातक आहे. असा विसंगतपणा आमच्या स्वराज्याच्या दूरकरणास कारणीभूत होईल. ह्या करीतां इकडे चाललेल्या

चळवळी व संस्थां याकडे ख्रिस्ती समाजाच्या मनांत आदर व सहानुभूति उत्पन्न करणें हें गोमांतकस्थ हिंदूचें ख्रिस्ती समाजापाशी एक फार जरुरीचें कर्तव्य आहे.

धार्मिक दृष्ट्या हिंदु, ख्रिस्ती समाज भिन्न असले तरी राजकीय आकांक्षाची वाढ दोनहि समाजांत एकाच दिशेनें होणे अपरिहार्य होय.

ह्या वरुन गोमांतकीय हिंदु समाजांतील जबाबदार व विचारी माणसाचें राजकीय दृष्ट्या मुख्य कर्तव्य हेंच आहे की, हिंदुकडून उपक्रमविल्या जाणाऱ्या राष्ट्रीय संस्था व चळवळी यांकडे ख्रिस्ती लोकांची आतुरतायुक्त सहानुभूति वळविण्याचा त्यानी मार्ग स्वीकारला असें झाल्याशिवाय तूर्तच्या परिस्थितीत गोमांतकातील राष्ट्रीय राजकारणाचें पाऊल पुढें पडणें शक्य नाही.

*(गुरुवार, दि. २५ डिसेंबर १९३०)*

# गोव्याचें नशीब!

प्रत्येकास आपला भविष्यकाळ कोणत्या गोष्टींनी व्यापलेला आहे हें जाणण्याची जिज्ञासा उत्पन्न होते व ती जिज्ञासा तृप्त करणाऱ्या ज्योतिष शास्त्रज्ञाचीही पण तूट भासत नाही.

सध्या प्रांताची, देशाची, व खंडाची सुद्धा भविष्यें वर्तविण्याची नवीन टूम दिसूं लागली आहे. अशा स्थितीत गोव्याच्या नशिबांत काय लिहिलें आहे, हें जाणून घेण्याची इच्छा गोमांतकीयांच्या मनांत उदित होणें स्वाभाविक आहे.

स्वत:चे भविष्य जाणू इच्छिणारांकडून एक मोठें मनोदौर्बल्य दृग्गोचर हात असतें, की ते आपल्या बहुमोल वर्तमान काळाचा विनियोग भविष्यकाळ जाणण्याकडे करितात. इतकें असून देखील प्रत्येक जणांस जसा ज्योतिषी पाहिजे असतो की त्यानें जिज्ञासूंचा भविष्यकाळ उत्तमच आहे असे सांगावे, ह्या वस्तुस्थितीस अनुसरुन गोव्याचें उज्ज्वल असें भविष्य जाणण्याची अपेक्षा

प्रत्येक सुज्ञ गोमांतकीयास होणें योग्य आहे.

कर्म केल्याशिवाय त्याचें फळ प्राप्त होत नसतें असें अनुभव सांगतो. परंतु गोव्यास आलेला अनुभव सिद्ध करितो की त्यास कर्म केल्याशिवायच कांही फळें मिळाली आहेत. उदाहरणार्थ, गोमांतकीयाना काही प्रयत्न केल्याशिवाय त्यांस अचानक रीतीनें पोर्तुगीज राष्ट्राची प्रजासत्ताक कारकीर्द उपभोगण्यास मिळाली. बाकी पोर्तुगीज प्रजासत्ताकराज्याची व्याख्या करावयाची झाल्यास थोडक्यात असें सांगता येईल की तेथें राजा नाहीसा झाला व प्रजेतील जो कोण ताकतवान असेल त्याला राज्यपद भोगण्याचा मार्ग खुला झाला. पोर्तुगीज रिपब्लिकाच्या घटनेंतील आधारभूत अशा मुख्य कायद्याबरहुकूम त्या प्रजासत्ताक राष्ट्राने ख्रिस्ती धर्म व राज्यसत्ता यांचा संबंध अजिबात तोडून टाकावयास पाहिजे होता. पण धर्मकर्मठपणाच्या समर्थनाप्रीत्यर्थ ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराकरीतां आपल्या क्रुरतर कृत्यांनी इतिहासांत अजरामर झालेल्या व इंक्वीशिसांव (धर्मसमीक्षण) गोव्यांत स्थापन केलेल्यांचे वंशज असे जे पोर्तुगीज त्यांच्या मनांतून त्या ख्रिस्ती धर्माच्या अवडंबराचा मोह अद्याप जात नाही. ह्मणूनच, गोव्यास आपल्या कष्टाशिवाय यदृच्छेने प्राप्त झालेल्या पोर्तुगीज प्रजासत्ताक राज्याच्या नागरिकत्वाचे हक्क भोगीत असल्याचें छातीवर हात मारून सांगतां आले तरी पोर्तुगीज कृपाछत्राखाली विहरणाऱ्या इंग्रजीं (ख्रिस्ती देवळें) व फक्त एखाद्या करासारखी रकम वसूल करावयाची असल्यावेळीच सरकारास आठवत असलेली हिंदु देवळें यांतील भेदभावांची तफावत पाहण्याचें गोव्याच्या नशीबांत आले आहे.

एरवी कोणतीही स्थिति प्राप्त झाली तरी तीत गोव्यानें आनंदच मानून घेतला पाहिजे. कांकी, स्वत: परिश्रम केल्याशिवाय अनायासें ती प्रजासत्ताक पद्धति प्राप्त झाली. इतकें अल्पसंतुष्ट समाधान हेंच त्या आनंदास पुरेसें कारण असतें.

आज ज्या प्रकारचें आर्थिक स्वराज्य मिळविण्याची आटोकाट खटपट अखिल हिंदुस्थानांत चालली आहे, तसलें आर्थिक स्वराज्य आह्मांस मिळाल्यास बरेच दिवस झाले. परंतु त्याची इष्ट फळें चाखण्याइतकें मात्र गोव्याचे नशीब नाही. त्याचे कारण हेंच झाडाला उंच फळें लागली तरी

ती काढून घेण्याची ताकद अंगी असावी तेव्हांच ती हातास लागतील. कार्यसिद्धीस लागणारी ताकद नसल्यास नशिबास दोष देणें ठीक नव्हे.

गोव्यात ख्रिस्ती समाज संख्याबलानें हिंदु समाजा इतकाच असला तरी सांपत्तिक दृष्ट्या हिंदु समाज कमकुवत असल्यावरुन गोमांतकीय राजकीय परिस्थितीत अनुकूल फेरफार घडवून आणण्याजोगी पात्रता संस्कृतिभिन्नत्व पावलेल्या उभय समाजांत निदान तूर्त दिसून येत नाही.

अखिल हिंदुस्थानांत दुग्गोचर न होण्यासारखी परिस्थिती गोव्यांस प्राप्त झाली असल्याकारणानें, नशिबाची परीक्षा पाहण्यासाठी गोमांतकीयांनी गोव्याबाहेर जावे किंवा नशिबावर भरवंसा ठेवून गोव्यांतच स्वस्थ राहावें असा प्रकार झाला आहे.

सध्या देखील गोव्यानें हालचाल न करीतां उगीच राहून अखिल हिंदवासी लोकांच्या चळवळीमुळें मिळणाऱ्या स्वराज्याचा फायदा गोव्यास आपोआप मिळण्याची संधी प्राप्त झाली आहे असें असलें तरी भावी स्वराज्याचा पूर्ण फायदा घेण्यासारखी ताकद अंगी येण्याची लायकी मिळवण्यासाठी शक्य त्या बाजूनें तूर्त चालू असलेल्या स्वराज्यप्राप्तिकारक हिंदी लढ्यांत आह्मी गोमांतकीयांनी विशेषत: स्वदेशी वस्तूंच्या प्रचारानें तरी अवश्य भाग घ्यावा.

निदान अशा प्रकारचे आचरण आज गोमांतकीयांकडून न घडल्यास अखिल हिंदीवासी लोकांच्या स्वराज्यप्राप्यर्थ राष्ट्रकार्यी लागणाऱ्या अतुल आत्मत्यागाचा फायदा घरबसल्या मिळविण्याचा दोष आह्मा गोमांतकीयांच्या पदरांत पडल्याशिवाय राहणार नाही. सबब, गोमांतकीयांनी कर्तव्यशून्य राहून दुसऱ्यांनी मिळविलेल्या हिंदी स्वराज्याचा फायदा नशीबावर हवाला टाकून घेतला असें इतिहासांत नमूद करून ठेवण्याचा प्रसंग गोव्याच्या नशीबी येऊं नये असें मन:पूर्वक इच्छितो.

गोव्याचा भविष्यकाळ उज्ज्वल व्हावा असें ज्या गोमांतकीयांस वाटत असेल त्यांनी स्वार्थत्यागपूर्वक झटून स्वराज्य-साध्यर्थ अनुकूल अशी तयारी करण्याची एव्हांपासून खबरदारी घ्यावी व गोव्याच्या नशिबांत स्वराज्य

प्राप्ती आहे हें गोड भविष्य सत्य सृष्टींत उतरविण्याचा प्रयत्न सोडूं नये.

*(गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी १९३१)*

# तूस कांडून हाताला फोड!

शेजारच्या हिंदुस्थानांत जो स्वातंत्र्यसंपादनाचा लढा चालू आहे त्यानें खुद्द इंग्रज सत्तेपेक्षा येथील पोर्तुगीज सत्तेचीच जास्त तारांबळ उडवून दिली असल्याचें स्पष्ट दृश्य दिसत आहे. हा प्रकार अवलोकून सोम्यानें मदिरा झोंकल्यानें गोम्याला निशा चढली कीं काय, असा क्षणभर भास होतो. ज्या स्वराज्योन्मुख आक्रमणाला व स्वतंत्र्यपोषक भावनांना ब्रिटिश नोकरशाही पायबंदे घालूं इच्छित नाही, त्याच गोष्टीचा नुसता संशय किंवा किरकोळ तपशील आमच्या विद्यमान सत्ताधाऱ्यांचें धाबें दणाणण्यास कारणीभूत व्हावा हें आश्चर्य नव्हे काय? कोंबडा झांकून पहाट टाळण्याचा हा ह्यातारीचा प्रयत्न अजागळ पणाचा होत असला, तरी ह्यातारी आपला मुत्सद्देगिरीचा नगारा बडवीतच आहे!

साहित्यसंमेलन तें काय, पण त्याला ब्रिटिश हिंदुस्थानांतील चळवळी उपस्थित राहिल्यानें गोमांतकांत राजकीय क्रांतीचा वणवा पेटेल, या अवास्तविक, असमर्थनीय व असंभवनीय संशयानें आमच्या दूरदृष्टि सरकारनें मडगांवच्या संमेलन नगराला लष्करी थाटानें सजविलें. काळ्या गोऱ्या शिपायांचा तेथें घोळका जमविला व अशा रीतीनें क्रांतीच्या रक्तपातांतून आह्माला वाचविले! पोर्तुगीज सैन्यानें मराठी साहित्याला आपल्या कडींत आवळलें नसतें तर किती तरी घोर आपत्ति गोमांतकांवर कोसळली असती! महाराष्ट्र साहित्यसेवकांनी आमचा प्रांत खास हस्तगत करून पोर्तुगीजांना पोर्तुगालचा रस्ता दाखवला असता!

जें धोरण संमेलनाच्या बाबतींत आमच्या दीर्घ शहाण्या नोकरशाहीनें व्यक्त करून असामान्य कीर्ति मिळविली, तेंच धोरण मडगांव नगरपालिकेच्या दिवाणखान्यांत परलोकवासी पं. मोतीलालजींच्या स्मरणार्थ भरणाऱ्या सभेस

बंदी करून अधिकाऱ्यांनी प्रगट केलें. ब्रिटिश साम्राज्याचे प्रतिनिधी असे व्हॉइस रॉय लॉर्ड आयर्विन यांनी सुद्धा पंडितजींच्या शोचनीय निधनाबद्दल, त्यांच्या कुटुंबाला दुखवट्याचा संदेश पाठवून ज्या थोर पुरुषाविषयी आदर व्यक्त केला, त्याच विभूतीचें गुणवर्णन करण्यास गोमांतकीयांना प्रतिबंध! नेहरूंच्या निधनार्थ सभांवर सभा भरून आ-सेतु हिमालय हिंदुस्थान हादरुन गेला असतांहि ब्रिटिश नोकरशाही मूग गिळून स्वस्थ राहिली, पण पोर्तुगीज अधिकाऱ्यांना त्या एकाच सभेच्या कल्पनेनें थरथर कांपविलें!

हा चमत्कारिक प्रकार गोमांतकांत दिसून आला. अशाच तऱ्हेचें दृश्य परवां दीव येथें दिसून आले. तेथील कित्येक व्यापाऱ्यांनी श्रीरामनवमीच्या सणानिमित्त आपलीं दुकानें स्वयंस्फूर्तीनें बदं ठेवली होती, पण त्याच दिवशी सरदार भगतसिंग प्रभृतीनां फांशी दिल्याबद्दल इतरत्र हरताळ पाडण्यांत आल्यानें, उपरोक्त व्यापाऱ्यांच्या त्या साहजिक व सरळ कृतींत दीवच्या दीर्घ शहाण्या अधिकाऱ्यांस राजकारणांचा हेतु दृगोचर झाला व त्यांनी मारे कसून चौकशी चालवली! चौकशीचा शेवट रामा शिवा गोविंद, हें सांगण्याचें कारणच नाही ह्मणा!

उपरोक्त अधिकाऱ्यांचे धोरण काय दर्शवितें? खऱ्या वस्तुस्थितीचें पूर्ण अज्ञान नव्हे काय? असल्या बेलगामी धोरणानें हिंदुस्थानांत सांप्रत वाहत असलेला स्वातंत्र्याचा झंझावात पोर्तुगीज वसाहतींना बाधा करू शकणार नाही, असा आमच्या नोकरशाहीचा कयास असल्यास तो सपशेल चुकीचा आहे, हें एकादें शेंबडें मूलसुद्धा सांगूं शकेल. सदरील अरेरावी, उपाययोजनेने राष्ट्रीयत्वाचा प्रसार मंदावण्याऐवजी तो उलट वाढत्या वेगानेंच वृद्धिगत होईल, याची सरकारनें पूर्ण खात्री बाळगलेली बरी.

आघात हा प्रत्याघाताचा जनक असलल्यानें, व्यक्तीस्वातंत्र्यावर घाला घालणारे जे जे हुकूम सरकारकडून अमलांत येतील त्यांचा उपयोग राष्ट्रीयत्वाची भावना खुंटविण्याकडे न होतां, उलट तिला उसळी देण्यालाच भाग पाडील, असाच जगाचा इतिहास मुक्त कंठाने ग्वाही देत आहे. मग, असल्या वेडगळ चाळ्यांनी भांगावलेऱ्या वृत्तीचे  प्रदर्शन करण्यांत काय हंशील

आहे? उपरोक्त प्रकारांनी जनांत झालेली शोभा आमच्या नोकरशाहीला भानावर आणील, अशी आशा आहे.

*(गुरुवार, दि. १६ एप्रिल १९३१)*

# सत्य व अहिंसा

सर्वसाधारण जनतेची दानत शुद्ध व पवित्र बनल्यानिवा एखाद्या देशाची प्रगति होईल असे मानणें ह्मणजे अन्नाच्या सहवासांत शीतल छायेचा आस्वाद चाखण्याची लालसा बाळगण्यासारखे मूर्खपणाचें होय. ज्या राष्ट्राच्या मनांत आपली सर्वांगीण सुधारणा व्हावी, अशी आकांक्षा वसत असेल त्यानें प्रथमत: आपल्या जनतेची दानत सत्य व अहिंसा या दिव्यांतून तावून सुलाखून शुद्ध व पवित्र बनवण्याची पराकाष्टा केली पाहिजे. कारण सत्य व अहिंसा या उभय तत्त्वांची अनुभवी जाणीव ज्या लोकांना झालेली नसते ते उन्नतीचें वैभव उपभोगण्यास कधीही व कोठेंहि पात्र होत नसतात, अशी इतिहासाची शिकवणूक आहे.

सुधारणेच्या वैभवगिरीवर आज विलसत असलेल्या राष्ट्राचा इतिहास बघितल्यास, आमच्या उपरोक्त ह्मणण्याची सत्यता कोणलाहि सहज पटेल. इंग्लंड आपला व्यापारी व्याप जगभर पसरवण्यास कसें समर्थ झालें? अमेरिका व्यापाराच्या बळावर कुबेरी श्रीमंतीचें भाग्य भोगण्यास का पात्र झाली? महायुद्धाच्या वणव्यानें आपादमस्तक होरपळून गेलेली जर्मनी व्यापारी गतवैभव अल्पावधींतच पुनरेव हस्तगत करण्यास कशी 'नवजवान' बनली? आणि व्यापारी जगांत एका काळीं अत्यंत मागसलेला रशिया 'सत्य व अहिंसा' या तत्त्वांच्या जोपासनेस लागताच, कसें डोकें वर काढूं शकला? या सर्व प्रश्नांचे उत्तर प्रस्तुत लेखाच्या प्रस्तावनेंतच वाचकांना आढळून येईल.

'सत्य व अहिंसा' या तत्त्वांचा जनतेच्या दानतेशीं निकटवर्ति संबंध असल्यानें महात्मा गांधी सत्याची महति व अहिंसेचें श्रेष्ठत्व हिंदी जनतेंत

मुरवण्यार्थ अविश्रांत झटत आहेत. आणि जोपर्यंत हिंदी जनता महात्माजींची उपरोक्त तत्त्वें आत्मसात करून तद्नुसार आपल्या आचाराची दिशा बदलणार नाही, तोपर्यंत हिंदी राष्ट्र गत वैभव पुन्हा प्राप्त करण्यास कदापिहि समर्थ होणार नाही.

परसत्तेच्या पापी सहवासामुळें असो किंवा इतर दुसऱ्या कोणत्याहि कारणाने असो, सर्वसाधारण हिंदी जनतेची दानत आजला शुद्ध व पवित्र नाही, ही गोष्ट दुर्दैवानें खरी आहे. कोठेंहि जा, सुधारलेंल्या राष्ट्रांत दिसूनं येणारा सच्चेपणा आमच्यांत दिसून येत नाही. नुसती व्यापारी बाबत घ्या. फाजील नफेबाजीला बळी पडून सत्याची गळचेपी व अहिंसेची हत्या करणें ह्मणजे आमच्या सर्वसाधारण व्यापारी वर्गाचा हातचा मळ कमअस्सल मालाचे गुण व किंमती फुगवून सत्यापरी सत्याचा खून करून, गिऱ्हायकाच्या अंत:करणाचीहि हिंसा करणें ह्मणजे कित्येक व्यापाऱ्यांना कांहीच नाही. आणि जो नियम व्यापारी बाबीस लागू आहे, तोच इतर गोष्टीसहि लहानमोठ्या प्रमाणानें लागू पडत असल्यानें, हिंदी जनतेची दानत पावित्र्यशून्य बनली असल्यास आश्चर्य नाही.

'सत्य व अहिंसा' यांचा योग्य मान न राखला गेल्यामुळें, हिंदी राष्ट्राची सर्व साधारण दानत शुद्ध राहिलेली नाही. व दानत शुद्ध नसल्यामुळेंच कसल्याहि प्रगतीच्या मार्गाने आमची उन्नति होत नाही. अपवादात्मक उदाहरणें वगळल्यास आमची उपरोक्त विचारसरणी अनुभवसिद्ध आहे, असाच कोणलाहि निश्चयात्मक कबुलीजबाब द्यावा लागेल असो.

अर्थात् परसत्तेच्या मगरमिठींतूत आह्मांस मुक्त व्हावयाचें असेल, परसत्ता झुगारली जाऊन तिच्या जागीं स्वसत्तेचा झेंडा फडकला जाण्याची तळमळ आमच्यांत उत्पन्न झाली असेल, राजकीय मोक्ष गांठण्याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही क्षुद्र भावनांनी आमचें अंत:करण काबीज केलें नसेल, आणि सत्य व अहिंसा या महात्माजींच्या तत्त्वांची खरी ओळख आह्मांस पटली असेल, तरच मात्र परसत्तेचा लय होऊन, परदास्यपंकांतून हिंदी राष्ट्राची कायमची मुक्तता होणार आहे.

तात्पर्य, जोपर्यंत सत्य व अहिंसा या तत्त्वांवर आमची दानत उभारली जाणार नाही आणि आमच्या प्रत्येक कृतींत सत्य व अहिंसेची चमक चमकणार नाही, तो पर्यंत हिंदी राष्ट्र वैभवगिरीचें शिखर गांठण्यास समर्थ होईल, अशी आशा करणे व्यर्थ होय. दानत सुधरा, सत्याचे पाय धरा, अहिंसेला नमन करा आणि मग तुह्मांला जे पाहिजे असेल ते हमखास प्राप्त होईल याची बालंबाल खात्री बाळगा. असाच हिंदी राष्ट्राला म. गांधीचा उपदेश आहे.

सत्य व अहिंसा या तत्त्वांवरच आमच्या खऱ्या सौख्याची गुरुकिल्ली अवलंबून आहे. हे अर्थात उघड होय.

*(गुरुवार, दि. २८ मे १९३१)*

# हे कसलें राजकारण?

गोमांतक प्रांत हा पोर्तुगालचाच एक अविभाज्य भाग आहे, आणि पोर्तुगालदेश हाच आपला मायदेश आहे, अशी जी कल्पना येथील राजकारणांत पूर्वीपासून रुढ आहे, तिचें स्वरूप अजून नष्ट झालेलें नाही. आणि उपरोक्त समजूत अजून विद्यमान असल्यानें 'सरकारी अधिकाऱ्यांची मर्जी संपादून स्वत:चा व स्वपक्षीयांचा तळीराम गार करून घेणे' हा जो एकदां राजकारणाचा अर्थ होऊन बसला होता, तोच आजपर्यंतही कायम आहे. गोष्ट खरीं की, गोमांतक प्रांत हा पोर्तुगालापासून अलग होऊन स्वायत्त झाला पाहिजे या विचारसरणीचा एक अभिनव पक्ष गोमांतकांत उत्पन्न झाला असून, तो आपल्या मतांचा उघड प्रचार करीत आहे. पण तो तत्त्वनिष्ठ असल्यानें गोमांतकीय विद्यमान राजकारणांत मुळींच भाग घेत नाही. परसत्तेनें जनतेंत उत्पन्न केलेली स्वाभिमानशून्यता नष्ट होऊन तिच्यांत उज्ज्वल स्वदेशाभिमान निर्माण व्हावा, एतदर्थच या नव्या पक्षाचा पराकाष्ठेचा प्रयत्न सुरू आहे.

बाकी राहिलेल्या पक्षांचा कावा काय असतो याचें 'भारता' तून

अनेकदां दिग्दर्शन झालेंच आहे. हरतऱ्हेच्या शस्त्रांनी सरकारची कृपा संपादून अधिकाराच्या जागा हस्तगत करणें व त्या निसटून न जाण्यासाठी सरकारच्या प्रत्येक बऱ्यावाईट कृत्याची सत्यासत्याचा विचार न करता एकजात तरफदारी करणें– हा एका पक्षाचा 'राजकारणी कार्यक्रम' ठरलेला असतो तर एकजात सरकारला विरोध करणें हा दुसऱ्या पक्षाचा प्रोग्राम निश्चित झालेला असतो. सरकारची मर्जी संपादण्याची आशा कायमची फोल ठरल्यानंतरच 'एकजात विरोधी' पक्ष अवतीर्ण होत असतो हें ध्यानात ठेवण्यासारखें आहे.

*'राजकारण करावें । आणि पोट तुटुंब भरावें ।।'* असें ज्या 'राजकीय' आक्रमणाचें स्वार्थी ध्येय असते तिनें देशोन्नति कशी होईल? स्वदेशासाठी आत्मयज्ञ करण्याची भावना जनतेंत कशी उद्‌भूत होईल? आणि दीर्घकालीन परसत्तेनें जनतेंत उत्पन्न केलेली भ्याडवृत्ति अधोगतीस जाऊन देशाद्धारार्थ आवश्यक असलेली निर्भयता कशी फोफावेल?

विशेष दुःखाची गोष्ट ही की, लोकपक्षाची बाजू सरकारासमोर मांडण्यासाठी ह्मणून ज्या इसमांची विधिमंडळाच्या गणंगाचे जागीं निवड झालेली असते, तेच गृहस्थ सरकारी 'पॉलिसी'शी समरस घेऊन स्वतःचा किंवा स्वकीयांचा स्वार्थ साधण्यास नेहमींच एका पायानें तत्पर असलेले दिसतात! अशा स्थितीत लोकपक्षाचें अस्तित्व केवळ नाममात्रच बनून सरकारला हवें तसें वागण्यास सर्व मैदान मोंकळेंच मिळत असल्यास आश्चर्य आहे काय?

मग, गोमांतकांतील जुन्या परंपरेच्या 'राजकारणा' स 'पोटकारण' हेंच नांव विशेष सार्थ होतें, असें जें आह्मी नेहमी ह्मणतो, त्यात अतिशयोक्ति कोठे राहिली? 'पोटकारण' हेंच विशेषण प्रस्तुतच्या 'राजकारणा' ला लागू होतें हें अर्थात उघड होय. आणि ह्मणूनच अशा स्वार्थी राजकारणाला मूठमाती देण्याच्या निर्धारानेंच अभिनव पक्षाला जन्म दिला असून भारतांतून त्यानें आपलें ध्येय जगजाहीर केलें आहे. जुन्या राजकारणाशीं चालू असलेल्या झगड्यांत 'भारता'ला अनेक कष्ट सहन करावे लागत असतात ही गोष्ट खरी असली तरी अखेर विजयाची माळ आपल्याच गळ्यांत पडेल या श्रद्धेनें

त्याला त्यांचें काहीच वाटत नाही, हें येथें नमूद होणें इष्ट होय.

*(गुरुवार, दि. १८ जून १९३१)*

# वर्णभेदाचें भूत

'काळा-गोरा' हा भेद विद्यमान 'दितादुरा' च्या सत्ताकालात इतक्या तीव्रतेनें पसरुं लागला आहे की, पोर्तुगालला स्वताःचा पितृदेश मानणारे व पोर्तुगीजांना पितर समजणारे फिरंगाळलेले गोमांतकीय ख्रिस्तीही अगदीं बावरून गेलेले दिसतात. सदर भेदाची भरभराट सिव्हील व मिलिटरी नोकरशाहींतच होऊन थांबली नसून धर्माधिकाऱ्यांतही तो भेद मोठ्या डौलानें डोकावूं लागल्याचा प्रत्यय येत आहे. रायतूर-सेमिनारीच्या मुख्याध्यापकाच्या जागीं नेहमीं नेटीव्ह पाद्रीच नेमला जात असे, पण विद्यमान पात्रियार्कांनी उपरोक्त हुद्यावरच नव्हें, तर सेमिनारीच्या इतर अनेक अध्यापकांच्या जागींही युरोपियन पाद्रयांची नेमणूक केली आहे. या पंक्तिप्रपंचामुळें गोमांतकीय ख्रिस्ती 'मेंढरांत' भयंकर खळबळ उडाली असून वरिष्ठ 'मेंढरेराख्या' विरुद्ध ती दांत ओठ चावीत आहेत!

नम्रता, समता व बंधुता या तत्त्व त्रयीवर ख्रिस्तीधर्माची उभारणी झाल्याची फुशारकी ज्या लोकांकडून वेळींअवेळी मारली जावी, त्यांनीच वर्णभेदाचें बंड माजवून ख्रिस्ती धर्माला काळोखी फांसण्याचा आततायीपणा करावा हें केव्हांही निंद्यच होय. रायतूरच्या नेटीव्ह अध्यापकांचें मासिक वेतन तीस रुपये असून त्यांची राहणी अगदी साधी असते. परंतु नव्या युरोपियन शिक्षकांचा मासिक पगार नबाबी थाटाचा असून, खाण्यापिण्यात त्यांची चंगळ आहे. आणि अत्यंत दु:खाची गोष्ट ही की, उपरोक्त युरोपियन पाद्री आपल्या 'कानारी' बांधवांत न मिसळण्यासाठी बुद्धिपुरस्सर झटत असून, त्यांचें खाणेंपिणें सुद्धां स्वतंत्र व निराळ्या पंक्तीतूनच होत असतें! सेमिनारीतील जुना वर्णभेद नेस्तनाबूद करण्याच्या इराद्यानें स्थापण्यांत आलेला हा नवा वर्णभेद विशेष जाचक ठरत नाही काय? ख्रिस्ती धर्माची नम्रता,

समता व बंधुता ही तत्त्वत्रयी सदर वर्णभेदामुळें लाथाडली जात नाहीं काय? आणि धर्माची इभ्रत राखण्याचें ज्याचें आद्य कर्तव्य त्यांच्याकडूनच असा अनाचार भरदिवसा व उजळ माथ्यानें घडला जावा यापरतें ख्रिस्ती धर्माचें दुसरें दुदैव ते कोणतें?

पोर्तुगीज प्रजासत्ताकात समता, बंधुता व स्वातंत्र्य हीं तत्त्वें एकीकडून लाथाडली जात आहेत तर दुसरीकडून ख्रिस्ती धर्माधिकारी ख्रिस्ती धर्मतत्त्वांची अवहेलना करीत आहेत. अशा दुस्तर स्थितींत ख्रिस्ती लोकांची धुंदी उतरुन, त्यांच्यात राष्ट्रीय जागृति उत्पन्न होत असल्यास आश्चर्य आहे काय?

वाईटांतहि कधी कधी बऱ्याचें बीज असतें असें ह्मणतात, त्याचा ताजा पुरावा उपरोक्त परिस्थितीत नाही काय?

*(गुरुवार, दि. २५ जून १९३१)*

# आपुण आपणांक आनी देव समेस्तांक

'आपुण आपणांक आनी देव समस्तांक' अशी एक ह्मण कोंकणी भाषेंत प्रचलित आहे. 'आपण आपणास आणि देव सकळांस' हा त्या ह्मणीचा मराठी भावार्थ होय. पोर्तुगीज भाषेंतही हाच अर्थ ध्वनित करणारी ह्मण आहे.

उपरोक्त ह्मणींतील तत्त्व सत्य असलें. तरी व्यवहारांत त्याचा उपयोग केवळ व्यक्तीगत स्वार्थसाधनाप्रीत्यर्थच केला गेल्यास, समाजाचा उत्कर्ष होणें कठीण होईल. ह्मणून सार्वजनिक कार्यात सदर ह्मणीचा संकुचित अर्थ बाजूस सारून, राष्ट्रकल्याणार्थ उपकारक होईल असा तिचा दुसरा विस्तृत अर्थच आह्मी स्वीकारला पाहिजे. ह्मणजे 'आपण' ह्या शब्दाऐवजी 'आपला समाज' व 'आपले राष्ट्र' असें मानून समाजोन्नतीचें व राष्ट्रोद्धाराचें ध्येय हस्तगत करण्यास अंत: करणाच्या तळमळीने जित लोकांनी झटण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

दुर्दैवाने समाज वा राष्ट्रहितार्थ तनमनधनानें वावरण्याची प्रवृत्ति आमच्यांत असावायास पाहिजे होती तितकी नाही, हें कटु सत्य दृष्टीआड करण्यांत अर्थ नाही. व्यक्तीगत स्वार्थाची हांव बेसुमार वाढली असल्यानें, आमच्यांतील सामाजिक व राष्ट्रीय कार्ये कार्यक्षमता संपादून यशाचा पल्ला गांठण्यास फारशीं समर्थ होत नाहीत. काही गर्भातच विनाश पावतात तर कांही अल्पावधीतच नष्ट होत असतात. तात्पर्य स्वार्थाचा अतिरेक परमार्थाच्या आड येत असतो.

कल्पना करू, कीं स्वदेशकल्याणासाठी झटणाऱ्या एका व्यक्तीस सरकारचे हस्तक त्रास देत आहेत. स्वीकारलेल्या मार्गापासून तिला परावृत्त करण्याबद्दल अधिकाऱ्यांची शिकस्त चाललेली आहे. अशी स्थितीत त्या व्यक्तीस आपल्याच लोकांकडून प्रोत्साहन मिळण्याऐवजीं उलट नाऊमेदीचा मात्र भरपूर पाठिंबा मिळत असतो! त्यांची पुढीलप्रमाणें विचारसरणी असते. 'अहो, कुणी सांगितलें होतें त्याला ती भानगड उपस्थित कर ह्मणून! हें पडलें फिरंगी राज्य! रांडेच्या पोराला सांगितली आहे कुणी मुळीं पंढरीची यात्रा! ज्यानें त्यानें आपलें पान पहावें आणि पाटावर आरुढ होऊन स्वस्थ भोजन करावें! वगैरे वगैरे.'

उपरोल्लिखित अनिष्ट विचारसरणीमुळेंच 'मागेल ते द्यावें सुखी असावे' असें बहुजन समाजाचे राष्ट्रहितविघातक मत बनलें असल्यास नवल नाही. सरकारी अधिकाऱ्याच्या कृत्यांची कितीही तीव्र अन्याय्यता डोळ्यांत शिरत असली तरी तिकडे दुर्लक्ष करून 'सुखानें काळ कंठण्याच्याच' ध्येयामागें जो तो आपलें स्वार्थानें गाडें ढकलीत असतो.

या मानसिक अधोगतीचें पृथ:करण केल्यास काय आढळून येतें? 'आपुण आपणाक आनी देव समेस्ताक' या ह्मणींतील तत्त्वाचा संकुचित अनुकार, दुसरें काही नाहीं! ही दृष्ट प्रवृत्ति आमूलाग्र नष्ट होण्यास अर्थात मागें सांगितल्याप्रमाणे 'आपण' या शब्दाचें अर्थक्षेत्र आमच्या राष्ट्राइतकेंच विस्तृत होणे जरूर आहे. आणि ते तसें झाल्यासच मात्र सार्वजनिक प्रत्यही उपस्थित होण्याऱ्या अडचणी दूर होऊन, ती यशस्वी होण्याचा मार्ग निष्कंटक होईल.

जोपर्यंत कोणत्याही राष्ट्रीय कृत्याला प्रत्येक राष्ट्र-घटकाकडून आत्मीय भावनेनें आसरा मिळणार नाही. तोपर्यंत तें कृत्य दीर्घजीवि होणें अशक्य होय. आणि ही आत्मीय भावना निर्माण होण्यास Cada um para is e Deus para todos ही ह्मण कोणत्या अर्थानें व्यवहारांत आणणें प्रस्तुत काली आवश्यक आहे. याची जाणीव पुढारलेल्या समाजाने मागसलेल्या समाजास करून देण्याचा समय ठेपला आहे.

यांपुढे, सध्याच्या 'आक्तु कोलोनियालच्या सत्ताकालांत, आहे तीच स्थिति चालू ठेवणें अनर्थावह होईल. कदाचित् परक्यांच्या पचनींसुद्धा पडणें अशक्य नाही.'

तेव्हा, आमचा सुशिक्षित समाज आपलें उपरिनिर्दिष्ट कर्तव्य योग्य रीतीनें पार पाडून, राष्ट्राकडून धन्यवाद घेईल अशी आह्मांस आशा आहे.

*(गुरुवार, दि. ३ ऑगस्ट १९३३)*

# बाणेदारपणाचें उदाहरण

शिक्षणसंपादन करीतांना शेंकडा नव्वद विद्यार्थ्यांचा अंतिम हेतु नोकरी प्राप्त करुन घेण्याकडे केंद्रीभूत झालेला असतो. व एकदा नोकरी मिळाली ह्मणजे वरिष्ठांशी हांजीहांजी करून बढती कशी मिळवावी ह्याच विवंचनेंत त्यांचा बहुतेक सगळा वेळ जातो ह्मटल्यास चालेल.

कालेजें व युनिव्हर्सट्यांत शिकतांना विचारस्वातंत्र्याच्या लांब लांब बाता झोडणारे विद्यार्थी एकदां सरकारी नोकरींत शिरल्यावर त्याचें सगळे विचार आपली बढती व वरिष्ठांची हांजी ह्या गोष्टी भोवती भ्रमण करूं लागतात. अशा प्रकारच्या इसमांचा नोकर शाहींत ज्यास्त भरणा असतो. आणि निर्वाहाचें साधन ह्मणून, कांही पदवीधरांनी नोकरशाहींत शिरकाव केला असला तरी, आपल्या विचारस्वातंत्र्यास बाधा न आणता तत्त्वनिष्ठा कायम बाळगणारे तडफदारवृत्तीचे नोकरशाहींतील हिंदी नोकर पाहिले ह्मणजे

आमच्यांतून बाणेदारपणाचें उच्चाटण अगदीच न झाल्याची जाणीव होऊन समाधान वाटतें. प्रस्तुत विचार सुचण्याचें कारण ह्मणजे दोतोर प्रार्तिरिस दीयस ह्या ख्रिस्ती गृहस्थाची करुण कहाणी होय. ह्यांचा जन्म चिंचोणे येथे झाला. पोर्तुगालाच्या युनिव्हर्सिटीत त्यांनी हुशार विद्यार्थी असल्याबद्दलची ख्याति मिळविली. कुशाग्र बुद्धिमत्तेपेक्षा त्यांच्या उच्च नैतिक आचरणावरून ते ज्यास्त ओळखले जात.

शिक्षणक्रम संपविल्यानंतर तिमोर येथे देलेगादु द् प्रोकुरादोर द् रिपब्लिक (सरकारी वकील) या हुद्द्यावर त्यांची नेमणूक झाली व केवळ आपल्या अक्कलहुशारीनें व प्रमाणिक आचरणानें दो. भार्तिरिस् दीयस हें पोर्तुगीज राज्याचे मंत्रिमंडळ व अध्यक्ष यांचा विश्वास संपादन करूं शकले. ह्मणूनच तिमोर येथील गोव्हेर्नादोर रजेवर पोर्तुगाल येथें गेले असतां, त्या प्रांतांत अनेक बडे युरोपियन अधिकारी असतांहि, दो, मातीरेस दीयस यांची तात्पुरती नेमणूक त्या मोठ्या हुद्द्यावर करण्यांत आली.

ह्या मोठ्या अधिकाराच्या हुद्यांवर नेमणूक झाल्यामुळें हुरळून न जातां, दोतोर दीयस यांनी आपली नोकरी गैरमार्गांनी चालविणाऱ्या काहीं युरोपियन अधिकाऱ्यांची बदली दूरच्या गांवांत करून राज्यव्यवस्था उत्तम प्रकारें चालविली.

ह्या युरोपियन अधिकाऱ्यांची नेमणूक तिमोर येथील बड्या हुद्दयांवर करण्याविषयी दोतोर मार्तिरिस दीयस यांस पोर्तुगीज (मंत्री) मिनीस्त्र यांकडून खास तार आली. ह्या तारेचें दो. दीयस यांनी पाठविलेलें उत्तर बाणेदार व तेजस्वी असेंच आहे. त्या उत्तराचा सारांश असा–''तार पोंचली. त्या तारेंतील मजकूर अपमानास्पद व इभ्रतीची बेअब्रु करणारा आहे. मी हा हुद्दा मागून घेतला नाही. व त्यावर कायम राहावें अशी इच्छाही पण नाही. तो अधिकार चालविताना माझे आरोग्य बिघडले. आपल्या तारेंत कांही अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याविषयी मजकूर आहे. त्यांतील काही अधिकारी माझ्या विश्वासास पात्र नसल्यावरून त्यांस परत पोर्तुगालास रवाना करावं असें मी ठरविलें आहे. अशा अधिकाऱ्यांची पुन: इकडे नेमणूक करणें हें माझी अब्रु, इभ्रत व तत्त्वनिष्ठा यांविरुद्ध आहे. जीस मी कोणत्याही बाबतींत

प्राणापलीकडे जपतो, ती माझी अब्रु, मला अधिक प्रिय आहे. सबब माझ्या सध्याच्या अधिकारास साजेशा इमानानें एकाच मार्गाचें अवलंबन करीतों व तो मार्ग ह्मणजे, माझ्या ताब्यांत असलेला हुद्दा मी आपल्या ताब्यांत देतों. इत्यादि.''

दोतोर मार्तिरिस् दीअस यांच्या बाणेदारपणाचे उदाहरण प्रत्येक हिंदी तरुणानें व विशेषत: नोकरशाहीत शिरलेल्यांनी अवश्य ध्यानांत ठेवण्यासारखे आहे. तिमोर येथे बड्या हुद्द्यावर अधिष्ठित झालेले खुद्द पोर्तुगीज असे अनेक अधिकारी असतांही, तिमोरच्या गोव्हेर्नादोरचा त्या प्रांतात अत्यंत श्रेष्ठ व विश्वासाचा अधिकार, दोतोर दीयस यांच्या स्वाधीन करण्यांत आल्यावरुन त्यांची कर्तबगारी व लायकी सरकारदरबारांत पूर्ण कसोटीस उतरल्याचें पाहण्यास सापडते.

तर, दुसऱ्या बाजूनें, त्या सरकारी विश्वासाचा फायदा हांजीखोर वृत्तीने न घेतां, गरज पडली, व खऱ्या न्यायाची पायमल्ली होऊन आपल्या अधिकारी शीलास व पर्यायाने पोर्तुगालाच्या नीतिमत्तेचा धोका पोंचण्याचीं चिन्हें दिसू लागली. त्याच वेळी गोव्हेर्नदोरच्या बड्या हुद्द्याचा त्यांनी ताबडतोब राजीनामा दिला. ही गोष्ट विशेष समाधानानें नमूद करण्याचे कारण हेंच, की चार शतकापेक्षा जास्त कालावधि पोर्तुगेज लोकांची संस्कृति आत्मसात् करण्यांत गोमंतकीय ख्रिस्ती समाजानें आघाडी मारुन समाधान मानले. अशा स्थितींत हिंदी राष्ट्रीयत्वाची बुद्धि त्या समाजांतून नष्ट झाली असली, तरी स्वत्वाची जाणीव असलेले दोतोर दीयस यांसारखे तडफदार तरुण निपजतात ह्यावरून हिंदी समाजात खऱ्या आत्मप्रभावाची जाणीव करून देणारी उदाहरणें सांपडत असल्याचें पाहून हिंदी स्वाभिमान कायमचा नष्ट करणें, परकी संस्कृतीस कधीच साधत नाही, असें वाटतें.

गोमंतकीय हिंदु लोक आपणच तेवढे हिंदी स्वत्वाची व राष्ट्रीयत्वाची जोपासना करीत असतों असें समजतात, व गोमंतकीय ख्रिस्ती समाज हा गोमंतकांत हिंदी राष्ट्रीय उन्नतीच्या मार्गावरील मोठी अडचण आहे असें वेळी अवेळी ह्मटल्याशिवाय राहात नाहीत.

वस्तुत: गोमंतकीय खिंस्ती समाज सक्तीनें किंवा भक्तीनें हिंदी संस्कृतीस पारखा झाल्या सारखा वाटला, तरी त्याच समाजांत, दातोर दीयस यानी राष्ट्रीयत्वाची प्रौढी सांगणाऱ्या गोमंतकीय हिंदु समाजांत सुद्धा बहुतेक न दिसणारा दांडगा निस्वार्थी बाणेदारपणा दाखविला, ह्या बद्दल, त्या ख्रिस्ती तरुणाचें कौतुक करून, हिंदु व ख्रिस्ती समाजास त्याचें अनुकरण करण्याची सद्‌बुद्धि प्राप्त होवो असें इच्छितो –

दोतोर मा. दीयस हे वरील प्रकारानें नंतर दिवंगत झाले. हें कळविण्यास वाईट वाटते. पण, मनुष्य हा अमर नसल्यावरुन, आपल्या बाणेदार उदाहरणानें ते चिरस्मरणीय होतील ह्मणून समाधान वाटते.

*(गुरुवार, दि. १० ऑगस्ट १९३३)*

# आह्मीं कोण? परसत्तेचे गुलाम व कुत्रे!

'पोर्तुगीज साम्राज्य' या नावांचे एक नियतकालिक लिज्बोअ येथें प्रसिद्ध होऊ लागलें असून, पोर्तुगीज साम्राज्याची ओळख परराष्ट्रांना पटावी एतदर्थ त्यांतील लिखाण पोर्तुगीज भाषेशिवाय फ्रेंच व इंग्लिश या भाषांतूनही लिहिलें जाते. प्रस्तुत नियतकालिकाची छपाई, कागद व बाह्यांग ही उच्च दर्जाची असून, जाहिरातींचीही त्यांत रेलचेल असते! ही सर्व सजावट सालाजार साहेबांच्या सांपत्तिक सहाय्यानें अर्थात् सरकारी सहायानें 'साजरी' होत असल्याचा लोकांना दांडगा संशय आहे!

उपरोक्त नियतकालिकाच्या एका अंकांत 'पोर्तुगीज हिंदुस्थानविषयी' या शीर्षकाखाली एक लेख प्रसिद्ध झाला असून, त्यांत येथील जनतेवर लेखकांनें अत्यंत विषारी गरळ ओकलेलें आहे. मुंबई येथें प्रसिद्ध होणाऱ्या 'आंग्लो-लुजितानु' नामक पत्राच्या 'आक्तुकोलोनियाल' विरुद्ध लिहिण्यांत आलेल्या एका टीकात्मक लेखास उत्तर देण्याच्या मिषानें सदर गोऱ्या लेखकानें अपरिमित व अक्षम्य अपशब्दांनी येथील 'काळ्या आदमीची' नालस्ती केली आहे!

त्यांच्या मते, येथील लोकांची किंमत कुत्रे व गुलाम यांपेक्षां विशेष नाही. ''या कुत्र्यांना व गुलामांना पोर्तुगीजांनी समतेनें व चांगल्या रीतीनें वागविल्यामुळेंच ते शेफारले असून आपल्या हितकर्त्याविरुद्ध कृतघ्नतेनें उठत आहेत.'' असा त्या लेखकांचा कांगावा असून ''त्या काफर लोकांस झोडपून काढून इंग्रजांप्रमाणें त्यांस अत्यंत अनियंत्रित व हडेलहप्पीपणानें वागविण्याचें धोरण पोर्तुगीज साम्राज्यानें अमलांत आणण्याचा समय ठेपला आहे.'' असें त्याचें ह्मणणे आहे!

आमच्या देशांत आह्मी परक्याचें 'कुत्रे व गुलाम!' आह्मीच आमच्या देशांत 'कानेकु' 'रानटी' व 'अडाणी'! आमच्या संपत्तीनें परकीयांनी आपला खिसा गरम करावा, नाना तऱ्हेचें वैभव भोगावें व याचें परितोषिक ह्मणून उपरोल्लेखित अपशब्दांचा मारा आह्मां अन्नदात्यांवर करावा! यावरुन परसत्तेचा विनाशकाळ फार दूर नाही असें एखाद्या भावनाप्रधान 'इंदिजेन' देशभक्तानें विधान केल्यास तो अन्यायी ठरेल काय?

पण आपल्या उपकारकर्त्यांविरुद्ध गरळ ओकणारा हा नमकहराम व्हास्कु दे गामाचा समकालीन इसम असला पाहिजे. 'स्वयंनिर्णय' ह्मणून एक अभिनव तत्त्व जन्मास आले असून त्याला पोर्तुगाल देशाने आपली मान्यता दिली असल्याची वार्ता त्याच्या कर्णपथावर अजून आदळली नसावी. जगाला सुधारण्याचा मक्ता एक पोर्तुगाल राष्ट्राच्याच हातीं असून पोर्तुगीज सत्तेने येथील आपलें चंबूगबाळें गुंडाळल्यास, येथील जनता अधोगातीच्या नरकांत लोळू लागेल, असेंही त्या बापड्या गोऱ्या नरपुंगवास वाटत आहे! मूर्ख बेटा! आमच्या संस्कृतीच्या अज्ञानानें कांही तरी बरळला झालें! त्या दीडशहाण्याला आमच्या खऱ्या योग्यतेची थोडीतरी जाणीव झाली असती तर तो इतका भुंकला नसता! असो.

पोर्तुगाल ह्मणजेच आपली मातृभूमि असें मानणाऱ्या लोकांनी सदर लेखापासून धडा घेण्याचा समय ठेपला आहे. कितीही उच्च योग्यतेचा हिंदी गृहस्थ असो, जुंवीज वा देलगाद असो, एखाद्या खात्याचा मुख्याधिकारी असो, खंदा लेखक वा प्रतिभासंपन्न कवि असो, उच्च प्रतीचा वर्तमानपत्रकार

वा कायदेपंडीत असो – केवळ तो हिंदी ह्मणून त्यांची किमती एखाद्या गुलामापेक्षा किंवा कुत्र्यापेक्षा विशेष नाही, अशीच विचारसरणी 'पोर्तुगीज साम्राज्यवाल्या'ची झालेली आहे.

आतां तरी ते हिंदी लोक शुद्धीवर येतील काय? आपल्या बांधवांचा परसत्ताधिकाऱ्यांशी चुगलीखोरपणा करून पोट जाळणारे व स्वार्थ साधाणारे हिंदी पोटाळ व स्वार्थाळ नेटिव ठिकाणावर येतील काय? का होत असलेली 'शोभा' अपुरीच ह्मणून 'जणूं काय आपण त्या गांवचेच नव्हतं' अशा अश्लाघ्य धोरणानें 'कोणी वंदा कोणी निंदा, आपल्या स्वहिताचा धंदा' हेंच 'तत्त्व' आचरुं लागतील?

या सर्व प्रश्नांचे उत्तर देण्यास त्यांस एक उत्तम मुहूर्त लाभणार आहे. तो ह्मटला ह्मणजे चालू महिन्याच्या ता. २५ दिनचा होय. ह्या दिवशीं पोर्तुगीजांनी गोवें सर केलें त्याच्या वाढदिवसानिमित्त परसत्तेकडून आनंदप्रदर्शन उत्सव समारंभ होणार आहे. समारंभात जे हिंदी लोक भाग घेतील त्यांनी आपली योग्यता पोर्तुगीजांच्या कुत्र्यापेक्षां किंवा गुलामापेक्षा जास्ती नाही, हे विसरल्यास खरोखरच ते त्यांचे कुत्रे व गुलाम ठरतील, याची वाट काय?

*(गुरुवार, दि. २३ नोव्हेंबर १९३३)*

## ? ? ?

गतांकी प्रसिद्ध झालेल्या अग्रलेखावरुन पोर्तुगीज साम्राज्यांत गोमंतकीयांचे राजकीय स्थान कोठें आहे, हे आमच्या वाचकांस अवगत झालेंच असेल. आणि जोपर्यंत 'पोर्तुगीज साम्राज्या'त सरकारी मुद्रण नियंत्रणाच्या कायद्याची कसलीच पर्वा न बाळगितां छापण्यांत आलेल्या येथील जनतेस अत्यंत उपमर्दकारक व किळसवाण्या लिखाणाचा सरकाररित्या इन्कार केला जाणार नाही, तोपर्यंत आमची राजकीय किंमत फिरंग्यांच्या कुत्र्यांपेक्षा किंवा गुलामांपेक्षा विशेष आहे, असें मानण्यास दुसरें कसलेंच साधन नाही.

हिंदी लोकांनी आपल्या बुद्धिसामर्थ्यानें फिरंगी नोकरशाहींत सन्मानाच्या लागा पटकावल्या असल्या, वैद्यकीय व इतर खात्यांत ते फिरंग्यांच्या खांद्यास खांदा देऊन आपली असामान्य पात्रता सिद्ध करीत असले, हिंदी लोक विधिमंडळांत युरोपियन पोर्तुगीजांच्या शेजारीं बसून राज्यकारभाराची समानतेनें चर्चा करीत असले, आणि सरकाररीत्या 'तुह्मी आणि आह्मी एकच' अशी पदोपदीं घोषणा करण्यांत येत असली, तरी प्रत्यक्ष व्यवहारांत फिरंगी व हिंदी या उभयतांतील भेद केव्हांहि नष्ट झालें नव्हते, अजून झालें नाहीत व यापुढें ते होतील असें मानण्यासहि कसलाच सबळ पुरावा नाही. उलट आमचें सदर ह्मणणें सिद्ध करणारा पुरावा मात्र भरपूर आहे.

पोर्तुगीज सत्ताकाचे येथील पहिले सरसुभे मरहूम डॉ. कौसेरु दा कोस्त यांच्या कारकिर्दीत कोस्तसाहेबांची भेट घेण्यासाठी मुंबई गव्हर्नर आले होते. या बड्या पाहुण्याचें तोंड 'काळ्या आदमी' च्या देखण्यानें काळवंडू नये ह्मणून आपले हिंदी आजुदांत बडतर्फ करून त्यांनी त्यांच्या जागी युरोपियन साहायकांची नेमणूक केली! हिंदी गृहस्थ, मग तो पोर्तुगेजांचा जरी वंशज असला, तरी त्याची गणना 'काळ्या आदमी'तच होत असते. याची साक्ष तिसवाडी तालुक्याच्या ग्रामसंस्थांचे विद्यमान मामलेदार सि. कापितांव लोबात हे देतील.

खुद्द विद्यमान सरसुभ्यांच्या अमदानींत एका बड्या ब्रिटिश नाविकाच्या सन्मानार्थ उपक्रमिलेल्या एका 'खान्या'स 'काळ्या आदमी'स करण्यांत आलेला मज्जाव आमच्या उपरोल्लेखित ह्मणण्यासच दुजोरा आणीत नाहीं काय?

अर्थात् परकीयांनी 'अहो, गोमांतकीय लोक हो, तुह्मीं आणि आह्मीं मिळून एकच तुमच्यांत आणि आमच्यांत कोणतेंच राजकीय भिन्नत्व नाही' असें कितीही आव आणून सांगितलें तरी 'तुमचें तें आमचें आणि आमचें तें आमच्या बापाचें' हाच सिद्धांत त्यांनी पुन्हां एकदां सिद्ध केल्यासारखे होतें, दुसरें काहीच नाही. असो.

हिंदी लोक फिरंग्याचें व्यक्तिशः शत्रू नाहींत. त्यांचे अकल्याण व्हावें असें कोणासहि वाटत नाही. उलट 'स्वराज्यांचा शुभ दिवस उजाडेपर्यंत

उभयतांत स्नेहभावच नांदावा, अशी येथील जनतेची इच्छा आहे.'

पण ''कुत्रे, गुलाम, भ्याड, हलकट, पाजी'' अशा उपमर्दकारक अपशब्दांनी हिंदी लोकांचा फिरंग्यांकडून अपमान होऊं लागला तर तो स्नेहभाव कसा निर्माण होईल व कदाचित निर्माण झाल्यास कसा टिकूं शकेल?

*(गुरुवार, दि. २० नोव्हेंबर १९३३)*

# जशास तसें!

'पोर्तुगीज साम्राज्यांत' प्रसिद्ध झालेल्या त्या घाणेरड्या व हिंदी लोकांस उपमर्दकारक लिखाणांत फिरंगी संस्कृतीचें मुक्तद्वार आह्मां हिंदी लोकांस बंद करण्याची भीति घातलेली आहे! पण ख्रिस्ती धर्मसमीक्षण सभेनें येथें बजावलेली रुधिरप्रिय कामगिरी तसेंच पोर्तुगीज लोकांनी येथील हिंदु देवालयांचा केलेला क्षोभकारक विध्वंस या दोनच गोष्टी त्यांच्या संस्कृतीची अकरणरूपी थोरवी सिद्ध करण्यास पुऱ्या आहेत.

आजच्या पोर्तुगीज विभागांत सांफ्रांसिस्कु शाव्हियेर या प्रसिद्ध 'संता'चें त्यांनी आपल्या पोर्तुगालच्या वरिष्ठांस कोचीहून लिहिलेलें एक पत्र छापलेलें आहे. या पत्रांत ते त्या काळच्या पोर्तुगीज पाद्रीनां उद्देशून त्यांस चांचे लोकांच्या पंक्तींत बसवितात. 'एनकेन प्रकारणे'कसल्याही हीन मार्गाचा अवलंब करून द्रव्यसंपादन करणें हेंच सदर ख्रिस्ती भट आपलें कर्तव्य समजत, rapio, rapis ह्मणजे चौर्यकर्मातच ते आपलें बुद्धिसर्वस्व वेंचित असत, असा असंदिग्ध आरोप खुद्ध शाव्हियरानेंच त्या काळच्या ख्रिस्ती धर्मप्रचारकांविरुद्ध केला असल्यानें पोर्तुगीज संस्कृतीनें येथें कसला पराक्रम गाजविला आहे, याची जाणीव चुकून माकून राहिलेल्या अनभिज्ञांस होईल!

ह्मणे पोर्तुगीज संस्कृतीचें मुक्तद्वार आह्मां हिंदी लोकांना बंद करू! पण कोण नको ह्मणतो? खुशाल बंद करून आपला गाशा गुंडाळा! कारण पोर्तुगेज संस्कृतीचे दुष्परिणाम अजूनही आह्मांस भोंवत आहेत!

असो. प्रस्तुत अंकी 'प्रकाश' पत्रांत 'रमिंगट्न' यानें 'पोर्तुगीज साम्राज्या'तील लेखकास दिलेल्या उत्तराचा पूर्वार्ध देण्यात आला आहे. येत्या अंकी उत्तरार्धानें उपरोक्त लेखकाची उत्तरक्रिया कशी झालेली आहे तें आमच्या वाचकांस आढळून येईल.

आणि या उत्तरक्रियेवरून आपल्या घराची कौलें कांचेचीं असतानांही त्या उपटसुंभ लेखकानें दुसऱ्याच्या दगडी कौलांच्या घरावर दगडफेंक केल्यानें त्याचा कसा फजितवाडा उडाला आहे, याचें प्रत्यंतरही वाचकास येईल.

''साम्राज्यवादी चतुष्पाद''

'पोर्तुगीज साम्राज्य' नांवाच्या लिस्बोअ येथे निघणाऱ्या नियतकालिकांत एका कट्ट्या साम्राज्यवाद्याने 'पोर्तुगीज हिंदुस्थान विषयीं लिहिलेल्या लेखांत हिंदी लोकांची बदनामी करणाऱ्या खोडसाळ विधानांस उत्तर ह्मणून पणजी येथील लोकप्रिय 'प्रकाश' या पत्रांत शिरोभागीं दिलेल्या शीर्षकाखाली 'रमिंगट्न' या टोपण नावांने प्रसिद्ध झालेल्या तडफदार लेखाचा सारांश मराठींतून देण्यांत येत आहे.'

''पोर्तुगाल सारख्या दूर प्रांतांतून सदरहू लेखकांने आपले किळसवाणे व विषारी बाण सोडले ह्मणून सुटला. ब्रिटिश हिंदुस्थानांत राहून त्यानें ह्या शस्त्रांचा उपयोग केला असता तर थोबाडेच रंगवून घेतली असती. मरणकालचीं किंकाळी फोडून गतप्राण होण्याची पाळी देखील आली असती.''

प्रस्तुत लेखक गोव्यांत आला होता अशी कल्पना केल्यास, तो इकडे नेहमी पैशांचा संग्रह करण्यांत चूर झालेला होता असें वाटतें. ह्या दांभिक लेखकांने आह्मां हिंदी लोकांस गुलाम असें नांव देण्याइतकें मूर्खपणाचें धाडस केलें आहे.

आता इतक्यांत आपण कोण गुलाम होते तें पहाल. ज्या अर्थी त्या लेखकांने किप्लिंग या इंग्लिश ग्रंथकाराचे उतारे उद्धृत केले आहेत, 'यावरुन मीहि लॉर्ड बायरन या दुसऱ्या इंग्लिश ग्रंथकर्त्याचें नांव सुचवितो.'

लॉर्ड बायरन यांनी पोर्तुगीज लोकांस 'युरोपच्या शेवटच्या टोंकावर

राहणारे गरीब बिचारे गुलाम' अशी विशेषणें बहाल केलीं आहेत. आपल्या छपरांवर कांचेची कौले असलेल्यांनी शेजारच्या छपरांवर दगड फेकू नये. हें योग्य नव्हे काय?

लॉर्ड बेरेस्फीर्ड नावांच्या दुसऱ्या इंग्रजांनें पोर्तुगीज लोकांस जित ह्मणून कोणत्या प्रकारें वागविलें हें वाचण्यासाठी ओलिव्हैर मार्तिस ह्या खुद्द पोर्तुगीज इतिहासकाराचा पुढील उतारा वाचावा. ओलिव्हैर मार्तिस लिहितात, 'इंग्लंडने आह्मांस फ्रेंच सत्तेतून मुक्त केल्यापासून आह्मीं पोर्तुगीज इंग्लंडचे गुलाम किंबहुना भाडोत्री तट्टू बनलों होतो. बेरेस्फोर्ड हा आमच्या सेनेचा मुख्य सेनापति झाल्यामुळें तो प्रत्यक्ष राजाच बनला होता.'

इंग्लंडने तर पोर्तुगालची गणना नेहमी आपल्या वसाहतींत केली होती. तेथें रहिवास करणाऱ्या इंग्लिशांनी कोणताहि गुन्हा केल्यास त्यांची चौकशी पोर्तुगीज न्यायाधीशांकडून होत नव्हती, तर तेथें इंग्लंडनें नेमणूक केलेल्या अस्सल इंग्रजी न्यायाधीशांकडून त्यांची चौकशी होत असे. अशा प्रकारें पोर्तुगालचा दर्जा, तुर्कस्थान, चीन, यांच्या बरोबरीला गेला होता!

किती लांछनास्पद गोष्ट ही! असें असतां, इतरांस गुलाम ह्मणण्यास आपण पुढें सरसावावे! आपल्या घरांत काय चाललें आहे तें पाहून जीभ आटपा. आपल्या गोष्टी इंग्रजांनी ऐकल्यास ते आपणांस खदखदां हंसतील.

हलक्या लिखाणांत लेखणी मळविणारा तो लेखक जर आह्मा हिंदी लोकांस संकरयुक्त प्रजा ह्मणत आहे, तर त्या लोकांनी त्याजविषयीं इंग्लिश इतिहासकार काय ह्मणत आहेत तें पहावें. इंग्लिश इतिहासकारांनी 'पोर्तुगीज लोक संकरयुक्त होत व त्यांच्या शरीरांत निग्रो लोकांचे रक्त मिश्रित झालें आहे' असें धडधडीत विधान केलें आहे.

पण हे विधान इंग्लिश लोकांनींच केलें असतें तर गोष्ट निराळी होती. पेद्रु फेऱ्हांव नावांच्या पोर्तुगीज ग्रंथकारानें लौरिसाल येथील पोर्तुगीज लोकांविषी लिहितांना, ते 'अनीतिमान, भ्यांड व संकुचित वृत्तीचें, परस्परांविषयीं संशयखोर' असें ह्मटले आहे. व असें होण्याचें कारण त्याच्या मतें तें लोक संकरयुक्त होत.

हे साम्राज्यसत्तावादी लेखक ब्रिटिश हिंदुस्थानांतील हिंदी लोकांस इंग्रजांच्या वागणुकीविषयीं लिहितांना ह्मणतात, 'इंग्रज त्यांस क्षुद्र न निंद्य कीटकाप्रमाणें वागवीत आहेत. गुलाम समजून त्यावर सत्ता चालवित आहेत. ज्यावेळी हिंदी लोक त्यांस आखून दिलेल्या कक्षेबाहेर निघण्याचा प्रयत्न करतात त्यावेळी लाठ्यांच्या प्रहारांनी त्यांस शिक्षा देतात व कैद करतात. इंग्रज त्यांस नुसतें भय घालून गप्प राहत नाहीत, प्रत्यक्ष इजा करून दहशत घालतो. क्षमा करीत नाही, पण सूड घेतो. त्यांना हक्क देत नाही, पण त्यांवर कर्तव्याची जबाबदारी लादतो. त्यांना योग्य मोबदला देत नाही. तर त्याचें रक्त पिळून काढतो. तात्पर्य, हिंदी लोकांस गुलामगिरीत राबवीत असतो.'

असें विधान करणें ह्मणजे इंग्रजी लोकांची धडधडीत बदनामी करणें होय. आपण ही गोष्ट इंग्रजी हिंदुस्थानांत लिहिली असती तर आपणांस कैदखाना पाहणें खास नशीबीं आलें असतें (अपूर्ण)

*(गुरुवार, दि. ७ डिसेंबर १९३३)*

# कायद्यांचा सुकाळ व वृत्तपत्रीय नियंत्रण

जेव्हां राज्यकर्ते प्रजेच्या हिताविषयीं दक्ष असतात तेव्हां ते जनतेचे संबंध सुखसोईचे होऊन राज्यांत शांतता नांदविण्यासाठी निरनिराळें कायदे प्रसिद्ध करीत असतात.

पोर्तुगाल देशांतही सध्याचे राज्यकर्ते त्यांची पुण्याई सबळ ह्मणून त्यांस लाभले आहेत. ते अत्यंत कायदेबाज आहेत. अनेक वर्षांच्या अनुभवांती एक कायदा अव्यवहार्य वाटूं लागला. ह्मणजे त्याच्या बदली दुसरा कायदा करणें भाग पडतें.

अशा प्रकारच्या दुसऱ्या व नव्या कायद्यास अगोदरच्या कायद्याच्या इष्टनिष्टतेच्या दीर्घकालीन व अनुभवजन्य फायदा मिळाला ह्मणजे नवीन अवतरणारा कायदा सामाजिक व राष्ट्रीय जीवन व्यवहारांस उपयुक्त असाच

होणे स्वाभाविक असते, आणि अशा प्रकारे कायदा तयार झाला की, किरकोळ बाबीं शिवाय त्याची पुनर्घटना आवश्यक वाटत नसून तो कांही वर्षे तरी अबाधित चालला पाहिजे.

ही गोष्ट बुद्धिग्राह्य असली तरी पोर्तुगालच्या कायदे-प्रकशनास हा नियम लागू पडत नसून, कदाचित् राजकर्त्यांच्या तीव्र प्रजाहितदक्षतेमुळें, एक कायदा प्रसिद्ध होऊन कांही दिवस गुदरतात न गुदरतात तोंच त्या कायद्याची दुरुस्ती ह्मणून दुसरा कायदा अस्तित्वांत येतो व त्या दुरुस्तींत सुद्धां अपुरेपणा राहिला ह्मणून तिसरा कायदा निर्माण होतो. अशा रीतीनें ह्या ७१८ वर्षांच्या अवधींत २२७५६ पेक्षा अधिक कायदे अस्तित्वांत आले असून त्यांची वाढ एकसारखी होतच आहे.

गेल्या बोलेतीं ओफिसियालच्या १८ नोव्हेंबर इकडील नियतकालिकांत विचार स्वतंत्र्यास नियंत्रण करणारा कायदा प्रसिद्ध झाला असून त्याच्या क्षेत्रांत राष्ट्रीय व सामाजिक विषयांवर प्रसिद्ध होणारा मजकूर येत असतो.

त्या कायद्यात निर्दिष्ट केल्याप्रमाणें सदरील नियंत्रणाचा हेतु ह्मटला ह्मणजे समाजास अनिष्ट तऱ्हेच्या मतांची बाधा न होऊं देणे, ही होय. व त्याची अंमलबजावणी होतांना सत्य, न्याय, सुराज्य व्यवस्था व सामाजिक हित यापासून सार्वजनिक मत च्युत न होईल अशी खबरदारी घेतली जाईल.

प्रस्तुत कायदा वहिवाटींत असल्यास पोलिस खात्याच्या व मामलेदार कचेरीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून अगोदर पास करून घेतल्यावांचून छापलेला कोणताही मजकूर किंवा नियतकालिक प्रसिद्ध करण्याची मनाई झाली आहे. अर्थात् त्या अधिकाऱ्यांस मान्य नसलेले शब्द व लेख वगळून इतर बातम्या प्रसृत झाल्या पाहिजेत.

पोर्तुगीज भाषेव्यतिरिक्त इतर भाषांत प्रसिद्ध होणाऱ्या मजकुरावर व नियतकालिकांची तपासणी करण्यासाठी मामलेदारानें ती भाषा जाणणारा एक सरकारी नोकर अथवा तशा नोकराच्या अभावीं एकादा लायक दुभाषा नेमावा

असें पोटकलम आहे.

सेन्सरच्या अधिकाऱ्यांनी अतिक्रम केल्यास त्यांच्या ठरावाविरुद्ध गोव्हर्नोदोर साहेबांकडे तक्रार करण्याची सवलत ठेवण्यांत आली असून ह्या तक्रारीचा निकाल, पणजीच्या संपादकांनी निवडून दिलेल्या एका प्रतिनिधीच्या व कोंसेंल्यु दु गोव्हर्नोदोरच्या एका प्रतिनिधीच्या सल्ल्यानें, गोव्हेर्नादोर साहेबानें द्यावयाचा आहे. तक्रार-अर्ज करावयाचा तो साध्या कागदावर केल्यास चालतो.

*(गुरुवार, दि. १४ डिसेंबर १९३३)*

# कलकत्त्याच्या घडामोडी

परवां कलकत्ता येथे भरलेल्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या बैठकीमध्ये घडून आलेल्या अनेक प्रकारांमुळें भारतीय राजकारणाशी जिव्हाळ्याचा संबंध असलेल्या प्रत्येक देशभक्ताला कमालीचें दुःख वाटल्याखेरींज राहणार नाही. प्रस्तुत जगांतील आंतरराष्ट्रीय परिस्थिती फारच बिकट झालेली आहे. अगदी याचवेळीं हिंदुस्थानांतील अनेक लहान थोर राजकीय पक्षोपपक्षांमध्यें जेथें एकी, एकमत आणि सहकार्याची भावना असावयास पाहिजे होती, नेमकी त्याचवेळही काँग्रेसमध्ये फूट पाडण्यासारख्या आणखी अनेकविध घटना घडून याव्या, हें भारताचें दुर्दैव समजलें पाहिजे.

सुभाषबाबूंनी काँग्रेस पदावर आपली फेरनिवडणूक करून घेतल्यापासून ह्या दुहला उठाव मिळाला असेंच ह्मटलें पाहिजे. ही निवडणूक लढवितांना त्यांनी आपल्या सहाकाऱ्यांविरुद्ध जी कांही बेजवाबदार विधानें केली त्यामुळें त्यांना आपली निवडणूक जरी जिंकता आली, तरी ज्यांनी आज कैक वर्षेपर्यंत राष्ट्रकार्याची धुरा आपल्या खांद्यावर वाहून आपल्या बुद्धीच्या मगदुराप्रमाणें देशांत जें नवजीवन ओतलें, त्यांच्यासंबंधी भलभलतें आरोप करणें प्रसंगविशेषी तें सिद्ध करण्याचीही टाळाटाळी करणें, हें कारण ह्या दुहीच्या आगीमध्ये तेल ओतण्यासारखे घातुक झालें, ह्यांत संशय नाही.

स्वत: सुभाषबाबू हें एक भावनाप्रवण व सरळमनाचें लढवय्ये आहेत. त्यांना राजकारणाचें डावपेंच नि लहानथोर कृत्यांचे होऊं शकणारे दूरवर परिणाम सहजासहजी उमगूं शकणार नाहीत. म. गांधीसंबंधी त्यांना कमालीचा आदर आहे, त्यांच्या पुढारीपणावर त्यांचा विश्वास आहे, नेतृत्वाचीही त्यांना आवश्यकता वाटतें, तथापि कांही अकर्तृत्ववान व केवळ व्यवहारापेक्षा तत्त्वाच्या आहारी गेलेल्या वाचाळ सहकाऱ्यांच्या चढवणुकीमुळें त्यांची केव्हां केव्हां दिशाभूल होत असलेली दिसून येते. राष्ट्रीय सभेत फूट पडूं नये. तिची एकी अभेद्य आणि अखंडीत रहावी, अशीच त्यांच सद्भावना आहे. पंडीत गोविंदवल्लभ पंतांचा ठराव नियमबाह्य आहे, तो बाबूंना बंधनकारक होऊ शकत नाही. वर्किंग कमिटी बैठकीत महात्माजींचा सल्ला धुडकावून लावावा इत्यादि अनेक आततायी उपदेश त्यांनी पार धुडकावून लाविलें यांतच त्यांच्या श्रेष्ठ कॉंग्रेस-निष्ठेचे व गांधीविषयींच्या उत्कट आदराचें स्पष्ट द्योतक आहे.

प्रस्तुत कॉंग्रेसमध्ये जहाल व मवाळ किंवा डावें व उजवें असें दोन गट आहेत. ह्या दोन्ही गटांचें आत्यंतिक ध्येय जरी एकच असलें तरी तें साध्य करून घेण्याच्या मार्गात थोडा तात्त्विक मतभेद आहे. हें मतभेद आजचेंच नसून कॉंग्रेसच्या संस्थापनेपासून थोड्या फार प्रमाणांत अस्तित्त्वात असलेलें दिसून येतात. आजच्या मतभेदांना विशेष उग्र स्वरूप देण्यांत अनेक कॉंग्रेस विरोधी गटांची कारवाई असून ज्यांचें तेज कॉंग्रेसमध्ये पडूं शकत नाही व यामुळें अतृप्त स्थितीत असलेल्या वासनांचा उद्रेक निरनिराळ्या मार्गांनी व्यक्त करून आपल्या मत्सराग्नीची चूड राष्ट्रमंदिराला लावण्यास या अनिष्ट मार्गाची कांस त्यांना धरावी लागते.

आजची राजकीय मतप्रणालीची छाननी केली, तर असें दिसून येतें की अद्याप गांधीवादाची छाप जनतेवर फार मोठ्या प्रमाणावर पडलेली आहे. आठ प्रांतांवर याच मताशीं प्रामाण्य मानणारी मंत्रिमंडळें काम करीत आहेत. अशा परिस्थितीत आपल्या पक्षाचें बहुमत होईपर्यंत अंतर्गत अधिकाराची कोणतीही सूत्रें हातीं न घेतां आपल्या पक्षाची जोरदार संघटना करणें व तद्द्वारा कॉंग्रेसची सूत्रें हातात असणाऱ्या पक्षाला शह देणें हें सुभाषबाबूंचें

काम होतें. पण तपश्चर्या पूर्ण फळाला येण्यापूर्वीच वरप्रदानाला हपापलेल्या तपस्व्याप्रमाणे सुभाषबाबूंची स्थिती झाली आहे. आपल्या पक्षाचा दर्जा, शक्ती किंवा संघटना लक्षीं न आणतां ते जी उडी मारू पाहतात, ती बरीच धाडसाची आहे असें वाटल्याखेरीज राहत नाही. प्रसंगविशेषी निर्भेळ सुभाष पक्षाची वर्किंग कमिटी नेमावयाची झाली, पार्लमेन्टरी सबकमिटीची निवड करावयाची झाली किंवा प्रांतोप्रांती त्या पक्षाची मंत्रिमंडळें नेमावयाची झाली तर पुरेसें कार्यकर्ते पुढारी त्या पक्षांत सापडूं शकणार नाहींत. किंबहूना तसें सांपडतील असें मानलें तर विद्यमान धोरणापेक्षां विशेष धाडसी व जहाल कार्यक्रम अंमलांत आणण्याचा प्रसंग आल्यास त्यापासून उद्‌भवू शकणाऱ्या परिस्थितीशी तोंड देण्यास लागणारें पुरेसें बळ आज राष्ट्रांत आहे, असें मानणें ह्मणजे आत्मवंचनाच करण्यासारखें होईल. सुभाषबाबूंच्या निस्वार्थी प्रयत्नांना यश येऊन जर निर्भेळ स्वराज्य मिळालें, तरी जोपर्यंत आपल्यामध्यें तीव्र स्वरूपांत वावरत असणारें मतभेद, धार्मिक असहिष्णुता व जातीय तेढ यांचे प्राबल्य कमी झालेले नाही तोपर्यंत स्वराज्य मिळाले तरी तें एक क्षणही टिकवून धरतां येणार नाही. राजकोटच्या प्रजापरिषदेमध्ये सात प्रतिनिधी नेमतांना जेथें सत्तर जातीचें प्रतिनिधिपदाला युद्ध लागतें तेथे सहस्त्रजातीभेदांनी गिचमिड असलेल्या देशांमध्ये कोणता अनवस्था प्रसंग ओढवेल याची कल्पनाही करतां येत नाही. खुद्द कलकत्त्यामध्यें ऑल इंडिया काँ. कमिटीच्या अधिवेशनाच्या वेळी सुभाषबाबूंच्या अनुयायांनी जी हुल्लड उठवून अत्यंत आदरणीय व कमाल स्वार्थत्यागी पुढाऱ्यांशी सुभाषबाबूंच्या उपदेशाला कवडीची किंमत न देतां अत्यंत लज्जास्पद वर्तन केलें, त्यावरून हिंदी जनता शिस्त, संघटना यामध्ये किती मागासलेली आहे व अद्याप तिला किती शिकावयाचें आहे, हें कळून येण्यासारखें आहे.

वर्किंग कमिटी ही मिश्र स्वरूपाची असावी अशी सुभाषबाबूंची इच्छा होती. कार्याच्या दृष्टीनें पाहिलें तर अशी मिश्र कमिटी विशेष कार्य करू शकली नसती, असेंच ह्मणायला पाहिजे. जे मतभेद आज दिसले व ज्यांच्यामुळे आज इतके दिवस राष्ट्रकार्याच्या आड्याला खीळ पडून राहिली त्या मतभेदांनी दोन भिन्न मतप्रणालींची माणसें एकत्र आणून त्यांच्यामध्ये

वर्षभर द्वंद्वे खेळण्यास जागा ठेवावी हें मुळीच उचित नाही. ज्या पक्षाचें बहुमत असेल त्यांनी काँग्रेसची सूत्रें हाती घ्यावी व दुसऱ्या पक्षानें आपले बहुमत होईपर्यंत शक्य त्या प्रमाणांत दुसऱ्या पक्षाशी सहकार्य करून आपली संघटना जोमदार करीत राहणें हाच शहाणपणा आहे.

एका काळचें सच्चे पुढारी श्री. नरीमन, खरे हे जसे काँग्रेसद्वेष्ट्या लोकांच्या आहारीं जाऊन वेळी-अवेळी सकारण-निष्कारण आपल्या मानीव प्रतिस्पर्ध्यांना हाणीत सुटून राष्ट्रकार्याचा विचका करण्याच्या मोहास बळी पडले, तशी गोष्ट सुभाषबाबूंच्या बाबतीत घडून येणार नाही व आज नाही उद्यां हिंदी राष्ट्राच्या भवितव्याला खरी दिशा दाखविण्याच्या व त्याला इष्टध्येयाप्राप्त पोचविणाऱ्या कामी आपल्या देशभक्तीचा व धडाडीचा योग्य उपयोग करतील अशी आह्मा आशा करतो.

*(गुरुवार, दि. १८ मे १९३९)*

# दारांत उभें असलेलें संकट

युरोपला लागलेल्या स्वार्थाच्या भयंकर आणि अघोर तृष्णेमुळें लवकरच तेथें युद्धांचा वणवा भडकल्याखेरीज राहणार नाही, हे आता बहुतेक निश्चित झालें आहे. आज युगोपांतील प्रत्येक राष्ट्रानें जी युद्धाची अजस्त्र जमवाजमव चालविली आहे त्यामुळें संबंध जगच ह्या वणव्यांत होरपळून निघेल आणि त्याचें अनिष्ट परिणाम प्रदीर्घ कालावधिपर्यंत त्याला भोगावें लागतील हें उघड आहे.

चालू परिस्थितीची पार्श्वभूमि पाहिली तर या सर्व आपत्तीला कारण कोण आहे व कोण होणार हे कळून येण्याला बऱ्याच वर्षांचा एकंदर एतद्विषयक इतिहास हाताळावा लागेल. सकृत्दर्शनी ह्या होमकुंडांत जगाची आहुति देण्याला पुढें सरसावलेला खलपुरुष हिटलर मानला जातो. आज तसें दिसतेही आहे खरे, पण त्या बिचाऱ्याचा तरी यांत काय अपराध आहे?

आजच्या युंगांत न्यायअन्यायाच्या, नीति अनीतीच्या व्याख्या आणि कल्पना प्रत्येकाच्या हितसंबंधावर अवलंबून असतात. एका दांडगेश्वराला भुकेची वखवख उठलेली आहे, त्याला पोटभर खावयाला पाहिजे, तें मिळविण्याची त्याच्या अंगात धमक आहे, तर त्या शक्तीचा त्याने उपयोग करावा, हीच आजची नीति ठरेल. त्या संधीचा तो उपयोग करूं शकला नाही, तर मात्र ती अनीति होईल. दुसरा अशक्त एकाकी अगतिकतेमध्यें सांपडलेला जेव्हां मिळेल तेव्हांच त्याला लुबाडणें ही खरी तस्करनीति होय. त्याला ओरडूं दिलें, गलबला करूं दिले, तंडूभांडू दिलें, तर आसपासचा लोकसमुदाय धांवून येऊं शकेल, आणि प्राप्तसंधी वाया जाईल.

हिटलर आज आचरणांत आणीत असलेली नीति ही शाठ्य नीति होय. 'शठं प्रति शाठ्य' हें त्या नीतीचें आद्यतत्त्व आहे. गेल्या महायुद्धामध्यें जर्मनीला जमिनीवर लोळवून त्याला नामर्द आणि नादान करण्याची शक्कल किंचित काल जरी सफल झालेली दिसली, तरी रबरी चेंडूप्रमाणें आतां त्यानें फिरून उसळी घेतलेली आहे. आज जरी तो ह्मणतो, की माझे पिसडून काढलेलें पंख मला योग्य जागी असलेले दिसले पाहिजेत. जर्मनी आज तरी ही रास्त महत्त्वाकांक्षा बाळगतो, आणि तसें सांगतोही, माझ्या पानांवरून काढून घेतलेला ग्रास फिरून माझ्या तोंडांत फिरून पडला पाहिजे, असा हिटलर आज आग्रह घेऊन बसलेला आहे. ह्याच हिटलरच्या कृत्याला आक्रमण, अत्याचार, अन्याय वगैरे वगैरे संबोधिलें जात आहे. ह्या बाबतींत काय रास्त आहे, कोण न्याय्य आहे, नीति कोणला आहे हें पाहण्याचें जरी सोडून दिलें, तरी एक गोष्ट ठाम सिद्ध आहे ती ही की, कोट्यावधि निरपराधी माणसें ही लढाईच्या फोफाट्यांत भाजून निघाल्याखेरीज राहणार नाहीत.

गेल्या महायुद्धानें दिलेलें धडे व अनुभव इतकें ताजे व स्वयंसिद्ध आहेत, की तोंडानें जरी लढाईची खुमखुमी प्रत्येकाला असलेली दिसते, तरी ती प्रत्यक्ष व्यवहारांत उतरण्यास दिरंगाई व कालावधि लागत जात आहे. प्रत्येक राष्ट्र तोंडानें बोलतें, आपटबार काढतें. ह्याताऱ्याकोताऱ्यांनाही रणांगणावर जमविण्यास आदेश, संदेश देते. पण लढाईच्या पोकळ अभिनिवेशापलिकडे

त्याची मजल जात नाही. प्रत्येक राष्ट्राच्या मनांत काय आहे, हे जरी त्यांच्या आजच्या आलापाप्रलापावरून अजमावूं येत असलें, तरी खुद्द जगदीश याचें काय धोरण बांधून बसला आहे हें त्याचें त्यालाच ठाऊक!

एक गोष्ट खरी, की कोणत्याही परिस्थितीत युद्धाची संभाव्यता अजिबात टाळण्याचा प्रयत्न प्रत्येक राष्ट्राने केलेला असेल तरच जगाचा नाश थांबेल. कांही देवाणघेवाण करून प्रत्येकानें थोडीफार माघार घेऊन ज्वालामुखीच्या अनर्थकारक तोंडापाशी अगदी शेवटची घटका मोजीत उभें असलेलें हें महान संकट निवारण्याचे काम चालूं परिस्थितीप्रमाणे मानवी शिथील उपायांच्या शक्तीबाहेरचें असलेलें दिसत आहे. आतां आपणा सर्वांना तारणारा किंवा मारणारा सर्व सत्ताधीश परमेश्वर आहे. तो काय प्रेरणा हा अग्नि चेतविणाऱ्या राष्ट्रपुरुषांना देईल, दारांशी नेटानें टेकून उभी असलेली ही आपत्ति आत शिरेल, की बाहेरच्या बाहेर पराभूत होईल, हें पाहण्यासाठी फार दीर्घकालाची वाट पहावी लागणार नाही. कांही घडीवर हा प्रसंग ठेपला आहे, की तो साऱ्या जगाचा इतिहास उलथून पालथून टाकल्याखेरीज राहणार नाही.

*(गुरुवार, दि. ७ सप्टेंबर १९३९)*

# हिंदुसभेसंबंधी जनतेच्या अपेक्षा

सिमला परिषदेचा बोजवारा उडाला, यामुळें साऱ्या जगाला वाईट वाटलें, राष्ट्राचें एक पाऊल स्वातंत्र्याच्या दिशेनें पुढे पडलें असतें, ती संधी कांही दुराग्रही लोकांनी स्वत:च्या हटवादीपणामुळें घालविली याबद्दल प्रत्येक सुविद्य माणसाला हळहळ वाटली असली, तर नवल नाही. एक मुस्लिम लीग व दुसरी हिंदुसभा या दोन जातीय संस्था मात्र या शोकपर्यवसायी घटनेमुळे आनंदानें बेहोश होऊन गेल्या असतील. जीनांचा दुराग्रह सिद्धीला गेला व आपल्या शिवाय चाळीस कोटी लोकांचा भाग्योदय होऊं शकत नाही याचा गर्व त्याला होणें स्वाभाविक आहे. हिंदुसभेला आनंद झाला असेल तर तो मात्र याच्या उलट गोष्टीकरतां होय. एखाद्याला शेजाऱ्यानें लग्नाला

आमंत्रण करावें व कांही आकस्मिक कारणामुळें तें लग्न मोडावें ह्मणजे ज्याप्रकारचा आनंद त्याला होणें शक्य असेल, त्या प्रतीचा आनंद हिंदुसभेचा आहे. हिंदुसभेला परिषदेला पाचारण नाही, ह्मणजे स्वतंत्र अस्तित्व नाही. ह्मणजेच तिच्या मागें पूर्वपुण्याई नाही. काँग्रेस त्यामार्गे ६० वर्षांची पुण्याई आहे. लाखों लोकांनी तिच्याकरतां स्वत:चें बलिदान केलें आहे. कुटुंब संपत्ति, सुख आणि सत्ता यांच्यावर लत्ताप्रहार केला आहे आणि सुखासुखी असलेल्या सिंहासनावरून उठून पर्णकुटीचें कठोर सुख स्वीकारलें आहे. ह्मणूनच तर काँग्रेस ही जगाचें डोळें स्वत:कडे आकृष्ट करून घेणारी एक शक्तीमान आणि बलाढ्य संस्था झाली आहे.

हिंदुसभेबद्दल आमचें काहींच ह्मणणें नाही. स्वतंत्र रीतीनें दुसऱ्या कोणाशी विरोध न करतां जर ती स्वत:चे उत्थापन करून घेत असेल, तर ते हवेंच आहे. आज हिंदुस्थानांतच आणखी अनेक पक्ष आहेत. कम्युनिस्ट, किसान, कामकरी वगैरे पक्षांत परस्पर कांही मतभेद असलें, तरी काँग्रेसचे कार्य ओळखतात व काँग्रेसच्या छत्राखालीच काम करण्यांत धन्यता मानतात. काँग्रेसला स्वत:ची अशी स्वतंत्र जात नाही. राष्ट्रधर्म आणि हिंदी जात ह्यांनाच ती ओळखते व त्याच तत्त्वावर तिचें कार्य चाललें आहें ते साऱ्या राष्ट्राला मान्य आहे. ह्मणून तिच्या अनुयायांमध्ये दिवसेंदिवस महत्त्वाची भर पडत आहे. हिंदुसभा ज्या तत्त्वावर काम करूं इच्छितें किंवा करीत आहे ते कांही अज्ञान आणि हिंदु जात आणि धर्म या नांवावर क्षणिक जेवणाऱ्या लोकांतच लोभ पावणारें होईल. धर्मापेक्षा, जातीपेक्षा जगांत कांही श्रेष्ठतर आहे, आणि ते ह्मणजे स्वत:चा देश होय. त्याच्या सुखासाठी धर्माचा आणि जातीचा कुटुंबाचा आणि स्वत:चा त्याग केला पाहिजे, तरच देशाचा उत्कर्ष होणार यांत मुळीच संशय नाही.

काँग्रेसनें मुसलमानांना ज्या कांही फाजील सवलती दिल्या असतील, त्या तिला तशी इच्छा होती ह्मणून नव्हे, तर केवळ राष्ट्राच्या कल्याणासाठी एखादें लाडावलेलें पोर रुसले 'फुगले' तर आई त्याच्या इतर भावंडांपेक्षा त्याच्या पानावर एक पोळी जास्त टाकून तें थंड होईल तर पहाते. हिंदंमध्यें एकी होती. पुरुषार्थ होता, पराक्रम होता. तर मुसलमान शेफारते ना व इंग्रज

सरकारही त्यांना इतके डोयावर घेऊन नाचते ना. पण तसा पराक्रम हिंदूत नाही. त्यांच्यांत संघटना नाही, ऐक्य नाही, कळकळ नाही ह्मणूनच हिंदूंची ही दशा झाली आहे. जर हिंदूत वरील गुण असते, तर काँग्रेसच्या नांवानें बोटें मोडण्याचा प्रश्नच उपस्थित झाला नसता. काँग्रेस जर हें अवास्तविक हक्क किंवा सवलती मुसलमानांना देऊ शकते तर तें देऊं करण्याइतकी धमक हिंदूनी स्वतःच्या संघटनेमुळें का निर्माण केली नाही? 'या सवलती मुसलमानांना देणारी तू ग बया कोण? जा देऊ देत जा.' असा रोखठोक जवाब काँग्रेसला करून तिचा हात पकडण्याइतकें बल हिंदूंना का प्राप्त करून घेता आले नाही याचा विचार हिंदुत्वनिष्ठांनी करावयास नको काय?

हिंदुसभा काँग्रेसशी द्वेष करून किंवा स्पर्धा करून त्यांत यश मिळवील ही अशा व्यर्थ आहे. काँग्रेसच्या कार्याशी मनमिळाऊपणाने, प्रेमाने व स्वार्थत्यागाने जर सभेनें स्वत:ला तादात्म्य करून घेतलें, तरच ती लोकांच्या आदराला पात्र होईल काँग्रेसचे पुढारी बंदिस्त होते, ह्मणून सुरू झाल्यावर मार्गांत येणारे गाडे, पायगाडे चक्काचूर होऊन जातील, हिंदुसभेने नुसत्या वल्गना करून चालणार नाही, तर आपल्यामागें कोण आहे, लोकबल किती आहे हें पाहिलें पाहिजे. गांधीच्या दाराशीं निरोधन करणारा एक विक्षिप्त प्राणी निघाला आणि चार दोन शिवराळ स्वयंसेवकांनी काळ्या निशाणांचा पराक्रम दाखवून स्वत:चें हसें करून घेतलें. तेंच एका काँग्रेस पुढाऱ्याच्या दर्शनाला लाखो लोकांच्या झुंडीच्या झुंडी जमतात व त्यांना आवरतां हजारो स्वयंसेवक आणि पोलिस याची कामगिरी अपुरी पडते. काँग्रेस पुढाऱ्यांच्या भाषण श्रवणेच्छनें पांच पांच लाख लोक पाऊस, ऊन यांची पर्वा न करतां चार चार तास उभें राहतात. ही सारी पुण्याई लोडतक्यांवर बसून गांधी नेहरूंनी मिळविली नाही. तर त्यांनी देशासाठी सर्वस्व पणाला लावलें आहे. दारा, सूत, धन, पैसा यांची माया सोडलेली आहे. ह्मणून त्यांच्या शब्दाबरोबर काशीरामेश्वरपर्यंत सारा देश हादरून जातो. हिंदुसभेतील पुढाऱ्यांत ही पुण्याई नाही. डॉ. मुकर्जीचे नांव काँग्रेसच्या पॅनलमध्ये आहे. या अनधिकृत वार्तेवरच केळकरांसारखे देशभक्त त्या अधिकाराच्या स्वीकारासाठी आग्रह करूं लागले. काँग्रसनें ज्या हेतूनें प्रांतिक कारभाराचा राजिनामा दिला तो हेतु उधळून

लावण्यासाठी ह्मणूनच की काय अणे-खऱ्यांनी मोठ्या अधिकाराच्या जागा स्वीकारून देशहितापेक्षां स्वहित श्रेष्ठ असल्याचें प्रदर्शन करून दाखविलें. असले पुढारी ज्या संस्थेंत पहिल्या रांगेत पूजिलें जातात ती देशाची प्रतिनिधी कशी होऊ शकणार? ज्यांना कोणत्याही अधिकारांची आशा जन्मोजन्मी नाही असलें कांही थर्ड क्लास पुढारी मात्र तावातावानें काँग्रेसद्वेषाचें गरळ ओकीत आहेत व स्वत:च्या मलीन अंत:करण आणि वाणीमुळें अधिकाधिक अप्रियतेला कारणीभूत होत असलेले दिसून येत आहेत.

एवीतेवीं काँग्रेस करूं पाहत असलेला राष्ट्रघात टळलेलाच आहे. आता हिंदुसभेनें आपलें खरें स्वरूप दाखावें. सरकार, काँग्रेस आणि लीग ह्या त्रिमूतीबरोबर लढा करण्यास सज्ज झालेली हिंदुसभा आतां एकट्या मुसलमानांबरोबर लढा करून, त्यांना हिंदुस्थानाबाहेर कां चालवून देत नाही? किंवा इंग्रज सरकारचा राज्यकारभाराचा गाडा स्वत:च्या असहकारानें थोपवूं कां शकत नाही? नुसतें 'बालिश बहु बायकांत बडबडला' करून राजकारण पार पडत नसतें. त्याला स्वार्थत्यागाची धमक अंगात असली पाहिजे. हिंदुसभेची इतकी उपेक्षा वेव्हेल योजनेत झाली, की तिचें नाव देखील कोणी उच्चारलें नाही. तथापि सभेचें अभिमानी खरे आणि अणे आपापाल्या जागांना घोरपडी सारखें चिकटलेलेच राहिले. दुसरा कोणी असता तर ताबडतोब राजिनामा देऊन मोकळा झाला असता.

हिंदुसभेने स्वत:चे सामर्थ्य अजमावूनच पुढें पाऊल टाकण्याची आता वेळ आहे. काँग्रेसशी सहकार्य करून, जर ती आगामी निवडणुकांत कार्य करील तरच तिचें कार्य भूषणावह होईल. आपलें प्रतिनिधी उभें केल्यानें त्यांना यश कितपत मिळतें हें खुद्द पुण्यांतच यापूर्वी प्रचीतीला आलें आहे. तेव्हां स्वत:चें नाक कापून दुसऱ्यांस अपशकुन करण्यापेक्षां सर्वांनी मिळून परस्परांच्या हातांत हात घालून संकटाला तोंड देणेच फार आवश्यक होईल. काँग्रेसची हिंदुसभा होणार नाही. मात्र हिंदुसभा काँग्रेसमध्ये अंतर्भूत होऊं शकेल व या दोन लहानथोर शक्तीचें एकांत रूपात मिलन झालें, तर त्यामुळें ज्या कार्यासाठी काँग्रेस आतापर्यंत झगडत आली तें साध्य अल्पावकाशानें सिद्ध होऊन जाईल.

*(गुरुवार, दि. २ ऑगस्ट १९४५)*

# मजूरपक्षाचें अधिकारग्रहण व ब्रिटिश हिंदुस्थान

इंग्लंडच्या निवडणुकांचा निकाल लागून मजूरपक्ष प्रचंड बहुमतानं निवडून आला, यामुळें खुद्द इंग्रज लोकांनाच नव्हें, तरच साऱ्या जगाला कमालीचा आनंद होईल. मजूरपक्षाची या निवडणुकांत सरशी होईल अशी जरी अपेक्षा होती तर त्या जयापजयाचे पारडें इतकें अतर्क्य उसळी घेईल असें कोणालाच वाटलें नसेल. खुद्द चर्चिलसाहेबसुद्धां या पराजयाच्या प्रखर प्रहारामुळे अगदी दिङ्मुख होऊन गेले असतील. जर्मनीविरुद्ध आपण मिळविलेल्या जयामुळे इंग्रज लोक आपल्या पक्षाशीं कृतज्ञ राहतील व यापुढेंही जपानची जी वासलात लावावयाची आहे त्यांतही आपलीच जरूरी देशाला भासेल व ह्मणून आपला पराभव होणें शक्य नाही, असें टोरीपक्षाला वाटणें स्वाभाविक होतें. पण कदाचित मतदारांना असेंही वाटलें असेल, की मजुरपक्ष अधिकारावर असतां तर हेंच युद्ध गेल्या दोन वर्षामागें यशस्वी रीतीने संपविता आले असते आणि जपानही यापूर्वीच धुळीला मिळाला असता. अर्थात् टोरीपक्षाला ते करता आले नाही ह्मणूनच जनतेने त्या पक्षाविरुद्ध कौल दिला. मजूरपक्षाने यापूर्वीही दोन तीन खेप प्रधानमंडळ बनविलें आहे. पण त्यासाठी नेहमीच त्याला दुसऱ्या एखाद्या पक्षाच्या साहाय्याची जरूरी भासे. या खेपेस संपूर्णतया व कोणाच्याही तोंडाकडे न पाहतां स्वत:चे हुकमी असें प्रधानमंडळ बनवितां येईल, व त्या दृष्टीनें स्वत:ला योग्य वाटणाऱ्या सुधारणा बिनदिक्कत आणि बिनमुर्वत अमलांत आणणें शक्य होईल.

हिंदुस्थानच्या राजकारणावर या निवडणुकांचा परिणाम कमीजास्त प्रमाणांत झाल्याखेरीज राहणार नाही. या पूर्वीचा अनुभव जरी आशादायक नसला, तरी त्या वेळी जी एक विशिष्ट परिस्थिति होती, ह्मणजें मजूरपक्षाचे बहुमत हमखास नव्हतें, व त्यामुळें कोणताही निर्णय घेताना साधारणपणें दुसऱ्या प्रतिगामी पक्षाच्या मताला साहजिकच मान तुकवावी लागे, ती स्थिति आता राहिली नाही. शिवाय त्या वेळच्या व आजच्या परिस्थितींतही

महत्त्वाचे अंतर आहे. आज सारें जगच झपाट्यानें पुढें पुढें जात आहे. हिंदुस्थानचा प्रश्न हा एकट्या इंग्लंडचा राहिला नसून, त्यानें आतां आंतरराष्ट्रीय स्वरूप घेतलें आहे. त्याकडे अमेरिका, रशिया चीन वगैरें राष्ट्रांचे लक्ष्य आहे. मजूरपक्षानें नुकत्याच दिलेल्या अभिवचनांना आणि आश्वासनांना ते इतक्या लवकर हरताळ फासतील असें वाटत नाही. त्यामुळें टोरीपक्ष अधिकारावर राहिला असतां, तर या पूर्वीचेचं धोरण कायम राहिलें असतें, तें आतां मजूरपक्षाच्या अधिकारग्रहणामुळें बदलणें स्वाभाविक असून यासाठी हिंदुस्थानला या निकालामुळें विशेष आनंद वाटल्यास नवल नाही.

हिंदुस्थानचे स्टे. सेक्रेटरी अमेरीही पराभूत झाले. याबद्दलही एक प्रकारचा विशेष आनंद हिंदी लोकांना वाटणें स्वाभाविक आहे. अमेरीने हिंदी लोकांसंबंधी पुरेशी आस्था कधीच दाखविली नाही व नेहमीच त्यांच्या वास्तविक आकांक्षांना वाटाण्याच्या अक्षता लावल्या.

प्रस्तुत निकालावरून दुसरी एक गोष्ट अशी सिद्ध होत आहे कीं पूर्वीचीं धोरणें, तत्त्वें आणि कृति आजच्या जगाला मान्य नाहीत. मजूरपक्षाला एवढें प्रचंड बहुमत मिळालें त्याचाही निष्कर्ष हाच, कीं कांही तरी नव्या कार्याची, नव्या धोरणाची अपेक्षा अधिकारावर येणाऱ्या नव्या पक्षांकडून जनता करते. त्याची परिपूर्तता मजूरपक्ष कितपत शहाणपणानें करतों हें दिसून येण्याला आता विलंब लागणार नाही. हिंदुस्थानच्या बाबतीत मजूरपक्षाला आपल्या धोरणांत विशेष उल्लेखनीय फेरफा करावा लागणार, किंबहुना तसें करण्यातच मंजूरपक्षाला स्वत:च्या यशाचें चीज करण्याची संधी लाभणार यापूर्वी मजुरपक्षीय पुढारी ज्यावेळी अधिकारावर आले त्यावेळी पूर्वीच्या बोलण्यांत आणि प्रत्यक्ष कृतीत त्यांनी केव्हाच मेळ ठेवला नाही. असा त्यांच्यावर आरोप आहे. पण आह्मी वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे तें जर त्या वेळच्या परिस्थितीचें प्राप्तकर्म असेल, तर आज ते आपल्या वचनाला जागतील व जगांतील एका फार मोठ्या जमावाने उराशी धरलेल्या आकांक्षा फलद्रूप करून चाळीस कोटी लोक स्वत:चे कायमचें मित्र करून ठेवतील.

हिंदुस्थानांतील लोकही या संधीचा आणि घटनेचा कितपत फायदा घेणं उचित आहे हे जाणण्याइतकें बुद्धिमान आहेतच. स्वत:च्या पराक्रमावर

आणि लायकीवर मिळवलेलीच साधें टिकतांत. दुसऱ्याच्या कृतीनें किंवा दयेने लाचारीवर मिळविलेल्या सवलती आणि सुधारणांना तितकीशी शाश्वति नसते. हिंदी लोकांनी हा पराक्रम स्वत:च्या अंगी आणण्याला झटलें पाहिजे. स्वत:च्या पायावर उभें राहून व आपली लायकी सिद्ध करूनच आपली ईप्सितें साध्य केली पाहिजेत. त्याचा उद्धार व्हावयाचा किंवा करावयाचा असेल, तर आपण जाति, पक्ष, धर्म यांची सरहद्द ओलांडून स्वत:च्या देशविषयक भावनांच्या विस्तृत मैदानावर येऊन कार्याला लागावयास पाहिजे यांत संशय नाही.

*(गुरुवार, दि. ९ ऑगस्ट १९४५)*

# शहाण्यांची जात व देशाचा घात!

चालू महिन्यांतील हिंदुस्थानांतील दोन महत्त्वाच्या घटना ह्मणजे सर फेरोजशहा मेहता यांची शतवार्षिक पुण्यतिथी व लोकमान्य टिळक यांची पंचविसावी पुण्यतिथी ह्या होत. हे दोन्ही राष्ट्रपुरुष तत्कालीन परिस्थितीत आपापल्यापरी महत्त्वाचे होऊन गेले. श्री. मेथा यांनी रोवलेला राष्ट्रसभेचा वृक्ष पुढे लोकमान्यांनी जोपासून वाढीला लावला व महात्माजींच्या प्रयत्नांनी त्याला आजचें विशालत्व प्राप्त झालें. ह्या सर्वांची आणि इतरही अनेक देशभक्तांचा स्वार्थत्याग, राष्ट्रीय वृत्ति व देशहितविषयक आस्था ही सर्व आज हिंदुस्थान स्वातंत्र्य प्राप्तीच्या ज्या टप्प्यावर येऊन पोचला आहे तेथपर्यंत येण्यास कारणीभूत झाली आहेत यांत वाद नाही.

सर फेरोजशहा मेथा पारशी पद्धतीची पागडी घालीत असत, टिळक दक्षिणी पद्धतीची पगडी वापरीत व गांधी खादी टोपी घालीत. या सर्व पद्धती त्या त्या वेळाला उचित होत्या असें ह्मणणेंच योग्य होईल. त्यांतील कोणती एकच पद्धत चांगली होती व दुसरी वाईट होती असा वाद घालणें योग्य होणार नाही, एकदां कुशल वैद्य दुखण्याच्या स्वरूपाप्रमाणें किंवा त्याच्या बऱ्यावाईट वळणाप्रमाणें आपल्या उपचाराची दिश बदलतो. पहिल्या

आठवड्यांत जे उपचार वाजवी आणि लागू ठरले असते ते दुसऱ्या किंवा चौथ्या आठवड्यांतही तसेंच लागू झालें असते, असें ह्मणणें मूर्खपणाचें ठरेल. टिळकांच्या वेळी स्वराज्याप्राप्तींचे जे प्रयत्न झाले तेच एकमेव योग्य होते व त्यांचाच अवलंब पुढें केला असतां, तर स्वराज्य मिळाले असतें व आजही तसें केलें असतां स्वराज्य मिळेल असें प्रतिपादणें ह्मणजे स्वत:च्या अज्ञानाचें प्रदर्शन करण्यासारखें होईल.

टिळकांच्या वेळचें उपायच जर योग्य होते, तर टिळकांच्या हयातीतच स्वराज्याचा लाभ झाला असता. शिवाय टिळक शिष्यांचा अद्याप त्यांच्या स्वराज्यप्राप्तीतील साधनांवर विश्वास आहे व याच प्रयत्नांचा उपयोग आजही प्रामाणिकपणें तें करीत असतात. मग अद्याप स्वराज्याचा ठावठिकाणा कोठें नाही हें कसें? जर ते उपाय बिनचूक आणि रामबाण तर त्यांचा गुणही शीघ्र आणि यशस्वीपणें यावयाला नको होता काय? एकादें समीकरण सोडवून उत्तर काढल्यावर त्याचा ताळा घेण्याची पूर्वी पद्धत होती. उत्तर बरोबर असें वाटतें खरे, पण ताळ्याच्या निकषावर ते उतरत नाही. औषध रामबाण, तथापि थोडाही आराम न पडतां दुखणें वाढतच जात आहे. मग हेंच औषध गुणकारी हा आग्रह कसा टिकेल?

काँग्रेसनें अशी चूक केली, तसें करावयाला नको होतें, टिळक असते तर त्यांनी असें केलें असतें, असें केलें असतां तसें झालें असते अशा वल्गना टिळक संप्रदायी ह्मणविणारे लोक करीत असतात. टिळकांच्या पुण्यतिथीचा यांचा कार्यक्रम ह्मणजे टिळक गुणानुवाद आणि तोही टिळकांचेंच खाऊन! टिळकांचा 'केसरी' एक तर आहेच, शिवाय टिळक ट्रस्ट फंडांतून जे लोक या ना त्या निमित्तानें पोसले जातात, त्यांनी काँग्रेस चुकली, टिळक शहाणे होते ह्या कोरसांत स्वत:चा सूर न मिळवावा तर दुसरें काय करावें? टिळक पुण्यतिथीच्या निमित्ताने जे वाङ्मय कालपरवा प्रसिद्ध झालें आहे. त्यांत काँग्रेसला शिव्या व टिळक आणि त्यांच्या तूर्त पीठस्थ असलेल्या सांप्रदायाला आशीर्वाद हाच प्रकार दिसतो. दक्षिणा घेणारे ब्राह्मण यजमानाच्या पितरांना स्वर्ग न इच्छितील तर काय नरक?

टिळक मरून आज पचवीस वर्षे झाली. अद्याप स्वराज्याचा लाभ झाला नाही. स्वराज्य ह्मणजे कोणाकडे देऊन ठेवलेली ठेव नव्हें की ती सरळ जाऊन घेऊन यावी! तर ती बळजबरीने काढून नेलेली वस्तु, ती परत मिळविण्याच्या बाबतीत प्रयत्नही अमित आहेत व श्रमही पुष्कळ आहेत. एक उपाय करून पहावयाचा, त्यांत यश न आलें तर दुसरा, तोही फोल ठरला तर तिसरा असा सारखा प्रयत्न चालू ठेवावयाचा, एकदें समीकरण सोडवितांना अनेक रीति करून पाहाव्या लागतात. एकादा प्रयोग सिद्धीला जाण्यापूर्वी लाखो रुपयें खर्च होतात व शेकडों लोकांचें प्राण वेंचतात. ॲटम बाँब तयार करण्यासाठीं पन्नास कोटीं पौंड खर्च झाल्याचें प्रसिद्ध झालें आहे. त्यांत किती शास्त्रज्ञ कामाला आले असतील व किती तरी वर्षेही लागली असतील देव जाणे! सर्व प्रकारची साधनें सन्निध तयार असतांना जर इतका कालापव्यय होतो, तर गांधीसारख्या परावलंबी, स्वजनवंचित आणि परसत्ता दडपित पुढाऱ्याला स्वराज्य प्राप्तीसाठी शेकडों प्रयत्न करावे लागले व त्यांत कित्येक वेळा हारही खावी लागली तर नवल काय?

मनुष्याच्या स्वार्थत्यागाची कसोटी केवळ अंतिम ध्येय साधनांवर अवलंबून असूं शकत नाही. एकादा प्राणी पाण्यांत बुडत असला, तर त्याला वाचविण्यासाठी काठांवरील जो इसम तत्परतेनें उडी घेतो तो खरा स्वार्थत्यागी व त्याच्याच त्यागाला महत्त्व असतें. त्यानें उडी मारल्यानें कदाचित तो बुडणारा प्राणी वाचत नाही. हाही मरूं शकतो, पण त्याच्या अस्सीम स्वार्थत्यागाचें श्रेय मात्र वांया जात नाही. ''छा. पुरांत त्यानें उडी घ्यावयाला नको होती, थोड्याशा वेळापूर्वी उडी घेतली असती तर उपयोग झाला असता, बुडणाऱ्याला त्यानें पायाकडून न पकडतां डोक्यावरून पकडावयाला पाहिजे होते.'' वगैरे गप्पा सांगणारे काठावरील बघे हे शहाणें ठरलें, तरी त्यांचें जीवन अखेर भारवाहीच ठरतें.

काँग्रेसनें मुसलमानांना लाडाविलें हें एक या लोकांचें नेहमीचें पालुपद आहे. जीनांना देऊं केलें तें न केलें असतें तर आजचा प्रसंग येता ना असें त्यांचें ह्मणणें असतें. पण गांधीनी काय किंवा कोणीही काय जें केलें तें सुखासुखी केलें नाही. तशी आवश्यकता ह्मणून केले. रस्त्यावरून

सरळ मोटार हाकायाची हा नियम, तथापि मध्यें खळगा पडला असेल, तर मोटार बाजूला घ्यावी लागते. हिंदु मुसलमानांत परस्परांमध्ये जो गैरविश्वास, मत्सर, द्वेष आहे तो दूर होण्यास त्यांनी एकमेकांच्या निकट आलें पाहिजे व त्यासाठी थोडी देवाणघेवाण करणेंच इष्ट असतें. जोपर्यंत हिंदुस्थानाला स्वत:चें गमावलेले स्वातंत्र्य लाचारीने मिळवावयाचें आहे तोपर्यंत या अपमार्गाची कांस धरल्याखेरील गत्यंतरच नाही. पण तशांतही कॉंग्रेसचा मार्ग भ्रष्ट होता, चूक होता, आणि घातक होता किंवा आहे, असें ज्यांना वाटतें त्यांना तो सोडून अन्य मार्गानें जाण्यास कोणीही प्रतिबंध केलेला नाही. कॉंग्रेसचा चूक मार्ग सोडून, योग्य मार्गाने स्वराज्य संपादन प्रयत्नांत नेहमी दंग असलेलें हे वाचिवीर अद्याप इष्ट मुक्कामाला कां पोचत नाहीत हा प्रश्न आहे. कॉंग्रेस स्वराज्याचें द्वार उघडणार, तें उघडण्यासाठी छातीवर गोळ्या घेणार आणि हे खुशालचेंडू त्यावेळी बेगीबेगी येऊनजाऊन त्यांत स्वत:ची पथारी पसरविण्याची धांदल करणार!

लोकशाहींचें हे लोक फारफार भुकलेलें दिसतात! लोकसंख्येप्रमाणें ह्मणजे बहुमताला मान देऊन प्रतिनिधीत्वाची विभागणी व्हावी असें त्यांचें ह्मणणे आहे, हें एकीकडे ह्मणावयाचें व कोणत्याही कौन्सिलांत स्वत:चा एकही प्रतिनिधी नसणाऱ्या हिंदुसभेला सिमला परिषदेंत आमंत्रण नाही ह्मणून रुसल्याचे हत्तीच्या गंडस्थळावर बसलेलें एकादें धुंगुरटें हत्तीनें मान हलविल्यानें शेफारून माझ्याच ओझ्याचा भार दु:सह होतो ह्मणून ओरडावें, त्याप्रमाणें हिंदुसभा परिषदेचा सारीपाट उधळून लावील ह्मणून तिला आमंत्रण नाही अशा मूर्खपणाच्या वल्गना हे खेळत आहेत! जीनांना अल्पसंख्यानुयायी ह्मणून स्वतंत्र सवलती नकोत, पण यांना मात्र नमतवाले असले, तरी आमंत्रण पहिजे. कॉंग्रेसमध्यें राहून डेमोक्रसीची आराधना करण्याऐवजी दहा दहा माणसांचें पक्ष काढून हे हिंदुस्थानला स्वराज्य मिळवून देण्याचे डाव खेळत आहेत. दुर्दैव आपलें, की अशाही लोकांचे ह्मणणें आपल्याला ऐकावेंच लागतें!

कॉंग्रेस जर पूर्वीचें आपलें शुद्धी राष्ट्रीय धोरण स्वीकारील, तर आह्मी हिंदुसभावालें आंत येण्यांस तयार आहों असें त्याचें ह्मणणें आहे. पण

असल्या लोडतक्क्यावरील पुढाऱ्यांना कोणीही असाच प्रश्न विचारील की, 'बरें, तुह्माला जर आंत यावयाचें असेल, तर बहुमत करून गांधीची पीडा दूर सारण्याच्या बेतानें तुह्मी लोकशाहीच्या भक्तांनी कां येऊं नयें? तुह्मी अमुक कराल, तर आह्मी अमुक करूं ही संबंधीसर्वनामाची भाषा की? तुह्मीं आंत यावें, लोकमत स्वत:च्या बाजूस वळवावें व बहुमतानें कारभार चालवावा. कोण कोणाला अडवितें?'

*(गुरुवार, दि. २३ ऑगस्ट १९४५)*

# धर्म, जात आणि देश

जगांत आज अस्तित्वांत असलेल्या अनेक धर्मांतील आद्य तत्त्वांप्रमाणे त्या त्या धर्माचें अनुयायी प्रामाणिकपणें वागत आहेत, असें कोणीही ह्मणणार नाही. कोणत्याही एका धर्मांतील उत्तमोत्तम तत्त्वांचें महत्त्व कळल्यानेंच इतर धर्मांतील लोक त्यांत परिवर्तन करून घेतांत, असें वाटण्याला कारण नाही. खरें बोलावयाचें ह्मणजे धर्मावर कोणाचीही श्रद्धा नाही, निदान आज तरी बहुजन समाजाची नाही व आणखी पांच पचवीस वर्षांनी धर्माचें नाव शोधायला ऐतिहासिक ग्रंथालयें शोधावी लागतील, की काय याचा संशय वाटत आहे. अशा या अस्ताला चालूं लागलेल्या एका भ्रामक गोष्टीमुळें आज मात्र आपलें नुकसानच फार होत असलेलें दिसतें. मनुष्य केवळ त्या त्या धर्मांतील आईबापाच्या पोटीं जन्माला येत असतात. ह्मणूनच त्या त्या धर्मांचे अनुयायी मानलें जातात. पण एरवी त्यांच्या आचरणांत किंवा वागणुकीत त्या धर्माचा आदर कोणत्याही रीतीनें प्रतीत होत असलेला दिसत नाही. जीनांना नमाज पडण्याची मुळीच सवय नसेल, किंवा 'अल्ला हो अकबर' या शब्दांचा उच्चार त्यानें जन्मांत एकदांही केला नसेल, सावरकरांच्या गळ्यांत जानवे बहुतेक नसेलच व असलें तरी तें पैशाच्या पेटीची किल्ली अडकविण्याच्या उपयोगापुरतेंच. गायत्री मंत्राचा जप व्रतबंधाच्या वेळीं बापानें कानांत सांगितलेला असेल तेवढा, त्यानंतर त्याची

त्यांना आज स्मृतिही राहिली नसेल व असली तरी तो एक धार्मिक पवित्र मंत्र ह्मणून नव्हे तर साधें संस्कृत वाक्य ह्मणूनच होय. परंतु या धर्माच्या गदा घेऊन आपापली राजकीय ईप्सितें साध्य करण्यासाठी हे रणशूर आज दंड थोपटून उभे आहेत.

धर्माचा उपयोग अर्थांत आपलें सामाजिक जीवन सुधारण्याच्या कामी अधिक करून घ्यावयाचा असतो. ज्याचें सामाजिक जीवन पवित्र आणि आदर्शवत् असतें ते लोक शारीरिक दृष्टीनेंही आघाडीला असतात व शारीरिक बलाढ्यता ज्यांना लाभलेली असते तेच राजकीय कारभार चालविण्यास लायक ठरतात. ह्मणजेच धर्माचा अप्रत्यक्ष संबंध राजकारणाकडे जरी येत असलेला दिसला, तरी आज अशा प्रकारें धर्म आणि जाति ह्या आपल्या राजकीय प्रगतीच्या मार्गांत भयंकर अडथळा होऊन बसल्या आहेत व परस्पर तेढ, मत्सर आणि द्वेष यांचें किळसवाणें प्रदर्शन करीत आहेत. असें तें होऊं देतां कामा नये.

जातीय तेढ किंवा धार्मिक तेढ समाजांत वाढविण्यास मूर्ख व अज्ञानी लोकच कारणीभूत होत असतात. जितकें जितकें अज्ञान अधिक तितकें तितकें धार्मिकतेचें व जातीयतेचें कैफ अधिक चढते. ज्या समाजांत शिक्षण विशेष आहे व त्याची वाढही होत आहे, तेथें अंधश्रद्धा, फाजील धर्मश्रद्धा लोप पावते. तात्पुरत्या भावना चेतवून अज्ञान लोकांना प्रक्षुब्ध करण्यासाठी या गोष्टींचा उपयोग झाला. तथापि अंती त्यांची कृत्रिमता, आणि खोटा परिणाम दिसून आल्याखेरीज राहत नाही. धर्माच्या नांवाखाली जीनांनी जो मुसलमान समाज जवळ केलेला दिसतो तो शिक्षणानें बुद्धिवादी झाला, तर एक क्षणही त्या धर्माच्या कोंडवाड्यांत राहणार नाही. आज जीनांना किंवा मुसलमानांना धर्मासाठीं राजकीय हक्क पाहिजेत. देशाचें वाटोळें झाले तरी पत्करेल. पण धर्माच्या जीवावर उभारलेलें कृत्रिम संकट असल्या अज्ञानांना जास्त महत्त्वाचे वाटतें. खुद्द जीना धर्माला मुळीच महत्त्व देत नाही, किंवा धर्म बुडाला तरी तो मुळीच डगमगणार नाही. पण ज्या या कैफावर तो मुसलमान समाज डुलवूं शकतो तें तसेंच राहण्यांत त्याचा फायदा आहे व त्यासाठींच त्याची विशेष धडपड आहें हें निराळें सांगण्याची आवश्यकता नाही.

हा दूरीभाव नाहीसा होण्यासाठी सर्व जातींत सख्य, सलोखा आणि सद्भाव वाढण्याची फार फार आवश्यकता आहे. याचसाठी परवा श्री. राजगोपाळाचारी यांनी स्त्रियांना पदवीधर करतांना आंतरजातीय विवाहांची आवश्यकता प्रातिपादिली. जितकें जितकें भिन्न जातींमधलें अंतर शीघ्रतेनें कापलें जाईल व या ना त्या नात्यानें आपण अधिक निकटवर्ति होऊं असें प्रयत्न विशेष प्रमाणावर झाले पाहिजेत, हें उघड आहे. आपल्यांत आंतरजातीय तर सोडाच, पण एक गोत्रीय विवाहसुद्धा घडवून आणण्याची कोणाला धमक नाही. आज अशा या कृत्रिम अडथळ्यांमुळे आपल्या समाजाची प्रगति खुंटलेली नाही. विषम विवाह, योग्य वधुवरांमध्ये विवाह संबंध घडून येण्यास प्रत्यवाय, निर्जीव व दुबळ्या संततीची उत्पत्ति, हत्या इ. अनेक आपत्ति ओढवल्या जातात. निधड्या छातीनें जितके पुढें पाऊल टाकणें शक्य आहे तितकें टाकून आपण आपल्या अंतिम ध्येय साधनाच्या मार्गांत असलेलें काटेंकुटें कापून काढलें पाहिजेत.

गोव्यांत अलीकडेच हिंदुसभा नांवाची एक हिंदुहितरक्षणाला जपणारी ह्मणून संस्था स्थापन झाली आहे. आह्मी अशा संस्थांच्या कार्याच्या बाबतीत जरी बहुधा निराश असलों, तरी तिच्याकडे तूर्त कुतुहलपूर्वक पाहण्यासतरी कोणतीच हरकत नाही. अंतिम कार्य ज्या दृष्टीनें व्हावयास पाहिजे त्या आवेशानें आणि धडाडीनें कार्याचा वेग ठेवावयास पाहिजे व त्यासाठी जी चिकाटी नि:स्वार्थीपणा आणि संयम पाहिजे तो अंगी येण्यास आणखी किती पिढ्या जाव्या लागतील हे समजत नाही. गोव्याचा लहानसा टापू असला, त्यांत परिमित अशा कार्यकर्त्यांचीच जरी आवश्कता असली, तरी तितकेंही लाभण्याचें भाग्य आपल्या नशिबी नाही. एखाद्या विशिष्ट कार्यास जन्मभर वाहून घेतलेली अशी स्वार्थत्यागी माणसें येथें जन्माला येण्याची जरी मुष्कील, तथापि अगदी स्वत:ची आवश्यक खाजगी कार्यें करूनही फावला वेळ समाजकार्याला किंवा देशकार्याला देणारी माणसें आपल्यात फार क्वचितच आढळून येतात. अशा कार्यकर्त्यांची परंपरा वाढली पाहिजे. तरच आपल्या देशाची उन्नति होणार. केवळ धर्म, जात कुटुंब या आकुंचित गोष्टींकडे लक्ष्य पुरवून मुख्य देशकार्य बाजूला सारणें केव्हांही योग्य होणार नाही.

*(गुरुवार, दि. १६ ऑगस्ट १९४५)*

# मडगांवच्या निदर्शनाचें दिग्दर्शन

क्रांतिवीर डॉ. लोहिया यांचें गोमंतकांत आगमन झालें व त्यांच्या भाषणाला मडगांव शहरांत वाव न लाभल्यानें जनतेंत प्रक्षोभ पेटला व जेथें तेथें त्यांची निदर्शनें निहाळण्यास मिळाली. जनमनाच्या आकस्मिक प्रेरणेविना प्रस्तुत निदर्शनांना अन्य कोणत्याही शक्तीनें चालना दिली नाही. नेत्याचें नाव नसतांना त्याचा आपोआप उठाव झाला व कांही किरकोळ अपवाद वगळलें, तर नामदार गव्हर्नर व पोलिस अधिकारी यांच्या सामोपचारी व दिलदार धोरणामुळें सदर निदर्शनाचें पर्यवसान दंग्याधोप्यांत, धरपकडीत किंवा रक्तस्त्रावांत होऊं शकलें नाही, ही समाधानाची गोष्ट होय.

सदर निदर्शनांत उर्फ आंदोलनांत प्रत्येक आंदोलकानें स्वत:च नेतृत्व स्वीकारलें होते. त्याला 'बोलविता धनी' निराळा नव्हता. जो तो स्वत:च्या जबाबदारीवर हालचार करीत होता. दुसऱ्यांच्या हुकुमाच्या हांकेची वाट न पहाता तो आपला मार्ग चोखाळीत होता. याचा अर्थ हा, की त्या निदर्शनाच्या बऱ्या वाईट परिणामाचें श्रेय एकाद्या विशिष्ट पुढाऱ्याच्या अगर संस्थेच्या पदरांत पाडतां येत नाही, तें प्रत्येक आंदोलकाच्या पदरांत पडतें, ही गोष्ट वादातीत आहे.

आकस्मिक उद्‌भवलेल्या त्या निदर्शनाचा फायदा घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्याची आगंतुकी कित्येकांनी चालविली आहे. गोमंतकाचें राजकीय भविष्य ठरविण्याचा जणूं काय आपला अधिका आहे. अशा अभिनिवेशानें ही आगंतुकी पडद्याआड भीतभीत चांचपडत आहे! जनमतनिदर्शक अशा कसल्याच संघटनेचा कौल नसलेल्या ह्या एकलकोंडी आगंतुकीचा इष्ट परिणाम जनतेवर कसा होऊं शकेल? भित्री आगंतुकी मर्द आंदोलकांचें मार्गदर्शन कसे करूं शकेल? अर्थात् दिशाभूल करणारी ही आंगतुकी निषेधार्ह आहे हें कोणीही मान्य करील.

लोकजागृतीच्या दृष्टीनें समर्थक होणारीं ही निदर्शनें त्या त्या समयापुरतीं मर्यादित असावी लागतात. ती सतत चालू ठेवण्याची उठाठेव

करण्यांत कसलाही अर्थ नाही. ध्येयप्राप्तीच्या अथवा सिद्धीच्या दृष्टीनेंच नव्हे, तर 'नित्य मरें त्यास कोण रडे?' असा अनवस्था प्रसंग न ओढवण्यासाठी निदर्शनाचा काल प्रासंगिक असावा लागतो. प्रपंचाचा प्रश्न ज्यांना दैनंदिन व्यवहारानें सोडवणें भाग असतें, तेंच लोक सदर निदर्शनांत प्रामुख्याने भाग घेत असल्यामुळें त्यांच्या संसाराचा विचका होऊं नये ह्मणून उपरोक्त विचारसरणी व्यक्त करावी लागत आहे, हें न सांगतांही कळण्यासारखे आहे.

मडगांवच्या निदर्शनाच्या हेतूची मीमांसाही समस्वरूपी आढळून येत नाही. प्रस्तुत विषयावर प्रसिद्ध झालेल्या मडगांवच्या 'आ व्हॉज दा इंदीय' दैनिकांतील मजकुरावरून त्या निदर्शनाचा निकटवर्ति संबंध भारतांतील प्रचलित आक्रमणाशीं जोडला गेल्याचें स्पष्ट होतें, तर 'उ यराल्द' पत्रांतील श्री. यव्हाग्रियु जॉर्ज यांच्या लेखांत पुढील आशयाची विधानें आहेत. मडगांवच्या चळवळीचा उद्देश येथील पोर्तुगीज साम्राज्य सत्ता नष्ट करावयाचा नाही. तसेंच हा आमचा प्रांत स्वतंत्र भारतांत सामावयाचाही पण नाही. सभा स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य व धर्म स्वातंत्र्य ही स्वातंत्र्ये मिळविणें, म्युनिसिपालट्या पूर्ण लोकसत्ताक करणें, विधिमंडळांत लोकप्रतिनिधींचें बहुमत प्रस्थापणें व त्यांच्या सल्ल्यानें एकंदर प्रांताचा कारभार हाकलां जाणें व सरकारी समारंभाच्या प्रसंगी व अन्य कोणत्याही वेळीं हिदीं संस्कृतीला व माजी व आजी हिंदी श्रेष्ठींचा अपमानकारक उल्लेख टाळणें इ. तपशील मडगांवच्या निदर्शनाच्या मुळाशीं मुरतो असें श्री. जॉर्ज यांचें ह्मणणें आहे. उपरोक्त विविध मीमांसेच्या पृथःकरणांत आह्मी संध्या पडत नाही. आज त्या निदर्शनाचे नुसतें दिग्दर्शन करून वाचकांची रजा घेतो.

*(गुरुवार, दि. ४ जुलै १९४६)*

# प्रासंगिक विचार

आचार्य विनोबा भावे यांनी भीतीच्या भावनेचें मार्मिक विवेचन केलें असून, ही भावना आमूलाग्र नेस्तनाबूद झाल्याविना माणसाला कोणत्याही

क्षेत्रांत यशप्राप्ती कदापिही शक्य होत नसते, असे त्याचें मत आहे. माणसाला आत्मा असतो व तो अमर आहे अशी एकदा मनाची अढळ खात्री झाली, ह्मणजे भयानें भांबावून जाण्याचें कारणच उरत नाही. अर्थात् आचार्यांचें हें भीतीचें विश्लेषण सार्वजनिक सत्कर्त्यें व सार्वजनिक कार्यकर्ते यांनाच प्रामुख्यानें मार्गदर्शन होणारे आहे हें उघड होय.

महात्माजींच्या तत्त्वज्ञानांत मुरलेल्या आचार्यांना भीती ह्मणजे, 'कोणत्या झाडाचा पाला' वाटावा हें सार्थच होय. महात्माजी व त्यांचें अनुयायी यांच्या कोशांत भीति हा शब्दच मुळीं आढळत नाही. महात्माजी कथित सत्याग्रह व अहिंसा ही अभेद्य व अचल धैर्यावर अधिष्ठिली आहेत. लोककल्याणाविना अन्य कोणत्याही गौण गुणांना तेथें बिलकुल थारा नाही. 'धर्मासाठी मरावें' ही श्रीसमर्थांची शिकवण त्यांना मान्य असली, तरी *'मरोनि अवघ्यासि मारावें। मारतां मारतां घ्यावें। राज्य आपुलें।।'* ही श्रीरामदासांची विचारसरणी गांधीजींच्या मतप्रणालीविरुद्ध आहे. दुसऱ्या शब्दांनी सांगावयाचें ह्मणजे 'परोपकारार्थ आत्यंतिक आत्मक्लेश' हेंच महात्माजींच्या तत्त्वज्ञानाचें सार आहे. या आत्यक्लेशांत साहजिकच आत्मबलिदानाचा समावेश होतो.

महात्माजी व त्यांचा अफाट शिष्यगण यांचा मार्ग ज्यांना लोककार्यांत चोखाळावयाचा असतो, त्यांनी आधी भयाची बिलकूल गय करतां कामा नये, स्वार्थाच्या नादी लागू नये, पडेल तें कष्ट शांतचित्तानें सहन करण्याला मागेपुढें पाहूं नये, व प्राण जावो अथवा राहो, ध्येयापासून च्युत होता कामा नये. तात्पर्य, गांधीजींच्या अनुयायी ह्मणविणाऱ्यांनी 'नाव सोनूबाई पण हाती कथलाचा वाळा' अशी स्वत:ची गत न होण्याबद्दल अत्यंत कणखर वृत्तीनें सार्वजनिक क्षेत्रांत वागलें पाहिजे.

'भित्र्यामागें ब्रह्मराक्षस' ही प्रचलित ह्मण ज्यांना अवगत आहे त्यांना सार्वजनिक कार्यांत भयाची भावना किती अधोगामी व विघातक आहे हे त्वरित पटल्याविना राहणार नाही. भीतीनें इष्टध्येय तर हस्तगत होत नाहीच, मात्र अपकीर्तीचा कलंक पदराला इतका 'घट्ट' चिकटतो, की तो तेव्हांही धुतला जाणें शक्य नसतें.

कोणासाठी, कां व कशासाठी उपरोल्लेखित विचार प्रसिद्ध होत आहेत हें न सांगतांही कळणारें आहे. त्या विचारप्रकाशनानें कोणाचाही कळून नकळून उपमर्द करण्याचा आमचा उद्देश नाहीं. ज्यांना ते विचार लागूं होतील त्यांनी आत्मनिरीक्षण करावें व यापुढें स्वत:ची व इतरांची दिशाभूल होणारी निदर्शनें टाळावी. सार्वजनिक कार्य हे 'गबाळाचें काम नोहें.' 'त्याला जातीचें पाहिजेत' नुसते बोल बोलणें सोपे असते, पण करणी करतांना प्रत्यक्ष प्राणावर बेतण्याचा संभव प्राप्त होत असतो. हे सार्वजनिक क्षेत्रांत वावरू इच्छिणाऱ्यांनी कधीही दृष्टीआड करतां कामा नये. सार्वजनिक कार्य रेटण्याची पूर्णतया पूर्वतयारी असल्याविना जो त्या 'फंदा'त पडेल त्याच्या हातून त्या कार्याच्या विचक्याशिवाय दुसरी कोणतीच उपयुक्त गोष्ट पार पडणें शक्य नाही.

लोकहिताच्या सार्वजनिक प्रांगणांत पदार्पण करूं इच्छिणाऱ्या सज्जनांनो आधी भीतीच्या भावनेस मूठमाती द्या! नंतर स्वार्थाचा होम करा! निर्विकल्प मनाने आत्मक्लेशांना सज्ज व्हा! लाठी-काठी हल्ल्याची व कारावासाची तमा तुह्मांला वाटणार नाही! हें लक्ष्यांत ठेवा, कीं जो कोणालाही भीत नसतो, त्यालाच भीत असतात! महात्माजींना ब्रिटिश साम्राज्यसत्ता कां गांगरतें याचें मर्म जाणून घ्या व त्यांच्या तत्त्वज्ञानाचा अनुकार करा! 'उचलली जीभ व लावली टाळ्याला' या अनुचित प्रकाराला कायमचा पायबंद घाला! यांतच देशाचें खरें कल्याण सामावतें हे विसरूं नका!

*(गुरुवार, दि. २५ जुलै १९४६)*

# फाळणी झाली, पुढें काय?

हिंदुस्थानची फाळणी झाली ही घटना दु:खद असली, तथापि अपरिहार्य अशीच होती. कांही गोष्टी अशा असतात, कीं त्या घडत्या असतां तात्पुरता शोक, संताप आणि उद्वेग उत्पन्न होतो, पण अंतिम परिणामाच्या दृष्टीनें त्या गोड करून घ्याव्या लागतात. हिंदुस्थानची फाळणीसुद्धां याच

स्वरूपाची आहे. ती कोणाला नको होती, नको आहे, ती न यावी, न प्राप्त व्हावी ह्मणून सर्वांनी जंग जंग पछाडलें, हजारों निरापराधी लोक बळी दिले. तथापि शेवटीं परिस्थितीच अशी उत्पन्न झाली कीं फाळणीला अश्रू ढाळीत संमति द्यावीच लागली.

ही फाळणी झाली ती कां झाली, कशी झाली, कोणाकडून झाली, कोणत्या परिस्थितींत झाली ह्या गोष्टी हिंदी राजकारणाचें आरंभापासून परिशीलन करणाऱ्यांना अधिक विशद करून सांगण्याची आमच्या मतें आवश्यकताच नाही. पण जग हें दिसतें तसें नसतें किंवा असावयास पाहिजें तसेंही नसतें. प्रत्येक मनुष्य घडलेल्या घटनेचा, मग ती कशीही घडो, स्वत:च्या फायद्याकरतां उपयोग करून घेतो. कचेरींतल टेबलावरील रब्बर उंदीर पळवतो, पण एकादा कारकून आपल्याला नावडत्या असलेल्या आपला सहकाऱ्यांवर वहिमं येईल अशी रीतीनें तेच उद्‌गार काढतो. 'रब्बर नाहींसा होण्याला बुवा कोणतेंच कारण दिसेना. गणपतराव तेवढे अखेरपर्यंत टेबलाशीं घुटमळत होते व तेच मात्र सर्वांच्या मागून निघाले.' या एका वाक्यानें त्यांनी आपल्या सोबत्याचा प्रामणिकपणा संशयास्पद ठरवून टाकला. याचप्रमाणें या फाळणीच्या बाबतींतही प्रकार झाला आहे. या फाळणीला कारण काँग्रेस झाली असून काँग्रेसच्या प्रमादशील धोरणामुळें ही फाळणीं हिंदुस्थानच्या बोकांडी बसली असा कांही काँग्रेसद्वेष्ट्यांचा दावा आहे.

प्रथमत: आपण हें पाहिले पाहिजे, कीं काँग्रेस ह्मणजे काय? काँग्रेस ह्मणजे एक व्यक्ती नाही किंवा कांही अवघ्या व्यक्तीही नाहीतं. गांधी, नेहरू, पटेल हे राष्ट्राचे पुढारी असले, तथापि ते अंमलांत आणीत असलेलें धोरण हें राष्ट्रानें निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी आंखलेलें असतें. फाळणींला सुद्धा सऱ्या राष्ट्राची संमति आहे. फाळणी अयोग्य आहे ह्याची जाणीव असूनही ती अपरिहार्य ह्मणून तिला राष्ट्राने संमति दिलेली आहे व ती निर्विकार मनानें विचार करणाऱ्यांना केव्हांही योग्यच दिसेल. राष्ट्रानें जें ठरविलें तें हिशोबी वृत्तीनें ठरविलें आहे. फाळणींमुळें नुकसान झालें व फायदाही झाला. फायदा व नुकसान याचा आढावा काढला तर फायद्याच्या सदरांत जास्त गुण पडतील. 'कांही नुकसान न होतां स्वातंत्र्य पदरी पडले, तर राष्ट्राला हवेंच होतें. आरंभी

आरंभी फाळणीला काँग्रेसनें विरोधच केला तो याचसाठी. पण वस्तुस्थितीच अशी बळकट होती कीं त्या विरोधाचा कांहीच उपयोग झाला नाही. आणि हा विरोध असाचा चालू ठेवला, तर त्याचे दुष्परिणाम शेवटीं इतक्या भयंकर थराला गेले असते, की पारतंत्र्याची पकड कायमची हिंदुस्थानच्या मानगुटीवर राहाती व रक्तपात, हत्या, जाळपोळ, बलत्कार, बाटाबाटी वगैरेचा नंगानाच हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यांतून चालू राहिला असता.'

आरंभी काँग्रेसने फाळणीला विरोध केला तो तरी जनतेच्या धीरावरच. पण जनता ह्या कसाला उतरली नाही. लक्षावधि निराधार आणि असहाय्य माणसें गुंडांच्या लीलांना बळीं पडली व कोट्यावधि रुपयांची संपत्ति जळून आणि नासून गेली. लक्षावधि मुलें पोरकी झाली, हजारों आईबापें संतान विहीन बनली, अपंग आणि जखमी लोकांच्या संख्येला तर सीमाच राहिली नाही. अंत:करण जाग्यावर असलेल्या पुढाऱ्यांना ही भयप्रद आपत्ति पाहावली नाही. फाळणी पुरवली, पण हे हाल नकोत अशाच आत्यंतिक मनस्तापानें ह्या फाळणीला देशानें संमति दिलेली आहे. चाळीस कोटी लोकांतून कांही लक्ष माणसें मेलीं तरी काय हरकत होती, असें ह्मणणाऱ्या ज्या दुर्जनांनी आसपास उठलेल्या दंग्यांच्या नुसत्या अफवानीं स्वत:ला कडी कुलपांत कोंडून घेतलें त्यांना हलवायाच्या घरावर परस्पर तुळशींपत्र ठेवण्यास अर्थात् कोणतीच हरकत नव्हती! ज्या लोकांकडे देशाचें काडीचेंही प्रतिनिधित्व नाही त्यांची टीका ह्मणजे जहाल बडबड करणाऱ्या लोकांची निष्फळ बडबड होय, असेंच जरी मानलें तरी अज्ञ जनता त्यामुळें घोटाळ्यांत पडून जाते व गोंधळ हा माजतोच.

स्वत:ला काँग्रेसपक्षाची ह्मणविणारी कांही पत्रें ह्या धुळवडींत भाग घेतात, यांत मुळींच आश्चर्य वाटायाला नको. कारण या पत्रांना आपण काँग्रेसच्या बाजूची पत्रें असें जें समजतों तेंच मुळांत चूक असतें. काँग्रेस पत्रांना पत असतीं व स्वत:च्या पत्राचा प्रारंभीचा जम बसविण्यासाठी ती ही कातडी पांघरतात. एकदा हा जम बसला ह्मणजे मग ती आपलें खरें स्वरूप व्यक्त करतात, आपण करीत असलेल्या काँग्रेस सेवेबद्दल त्यांना लगेच पुढारी होण्याची हांव सुटते व तें मिळेनासें झाले, ह्मणजे मग ती काँग्रेसपक्षावर

किंवा ज्या पुढाऱ्यांच्या प्रभावानें त्यांचें तेज फिक्कें पडतें त्यांस दुगाण्या झाडण्यास सुरवात करतात.

कागदावरील नियंत्रण उठलें व वृत्तपत्रांना जन्म देण्यास कित्येक वर्षे वळवळणाऱ्या आज्ञानप्रसूत संपादकांची इच्छा सफल झाली. काँग्रेसवर टीका करणें हें आज एक देशप्रेमाचें लक्षण समजलें जात आहे. जो तो ह्मणतो, गांधीना हकला, नेहरू पटेलांचें नेतृत्व झुगारून द्या. आह्मीं ह्मणतों अवश्य, अगदीं रास्त, पण त्यांच्या जागी ही धुरा धारण करण्यास दुसरीं कोणी लायक माणसें तरी दाखवा. कोण गद्रे, थत्ते कीं केळकर, केतकर, की अंबेकर, तटणीस ही धुरा वाहण्यास समर्थ ठरतील? गांधी नेहरूंना लाथा मारून हांकलून दिल्यावर त्यांनी आज साठ वर्षे तपश्चर्या करून ब्रिटिशांच्या पकडींतून जो देश मुक्त केला. त्या देशाला नव्या नवलाईनें नटविण्यास आतां आयत्या वेळीं कोणाला पुढें घालतां तें तरी सांगा.

हिंदुमहासभेच्या माणसांचें राजकारण ह्मणजे लोडतक्यावरील राजकारण विशेषत: महाराष्ट्रीय पुणेंकर, सभावाले तर मुरब्बी आरंभी सावरकरच द्विराष्ट्रवादाचे पुरस्कर्ते होते. 'हिंदुस्थान हिंदुका नही किसीके बापका' वगैरे गीतें त्यांच्याच मुखांतील होत. महायुद्धांत इंग्रजांना साह्य करून हिंदुस्थानावरील पारतंत्र्याला कांही काल पुढें ढकलण्यास व आज पाकिस्तान अमलांत आणण्याला इंग्रजांना पुरेसें आयुष्य पुरवण्याचें महत्कार्य ह्याच महाभागांनी केले. आज त्यांनी ठोकलेल्या विषवृक्षाला फळें आली आहेत. उबवत घातलेलें अंडें फुटलेलें आहे, तरी त्याचें जनकत्व नाकारण्याचा हट्टहास हे सभावाले करत आहेत व त्याचें पाप काँग्रेसवर लादीत आहेत! काँग्रेसचा कार्यक्रम प्रामाणिकपणें आचरला असता, किंवा स्वत:चा असा दुसरा प्रभावी कार्यक्रम या ढोंगी लोकांकडे असता, तर आज देश असा अगतिक आणि अशक्त मुळींच बनला नसता. काँग्रेसच्या कार्यक्रमाला जर संमति दिली व काँग्रेसच्या महासागरांत हे लोक विलीन झाले, तर त्याचे अस्तित्व तेथेंच संपेल. कार्य न करतां पुढारीपण तेथें लाभत नाही. किंवा आयत्या पिठावर रेघा ओढत पुढारीपण मिरवण्यालाही वाव नाही व याचसाठी काँग्रेसनें काहींही केलें तरी यांचे रडगाणें थांबणार नाही. डॉ. मुकर्जीसारखे

कांही वजनदार सभावादी पुढारी सोडून दिले, तर बाकी सारा शुकशुकाटच व ह्मणूनच या पक्षाचा एकही उमदेवार केव्हां कोठें निवडून येऊं शकला नाही.

काँग्रेस पुढाऱ्यांच्या मुत्सद्दीपणाला दोष देऊन आज हे लोक जीनापुढे आरत्या ओवाळीत आहेत. जीनांचा जय झाला असा वरपांगी दिसतो खरा, पण खरा जय ब्रिटिशांचा झाला आहे. ब्रिटिशांच्या फायद्याचे होतें, ह्मणून जीनांना पाकिस्तान लाभलें आहे. जीनांचाच तो पराक्रम असता तर त्यांना खंडित पाकिस्तान स्वीकारावे लागले नसतें. जीनाचा विजय हा मुसलमानांच्या अज्ञानावर आधारलेला आहे. इस्लाम धोक्यांत आहे, काफि रांच्या राज्यांत मुसलमानांना स्थान नाही, वगैरे घोषणांनी अज्ञ आणि कडव्या मुसलमानांची जीनानी भुरळ घालून पाकिस्तानाला आवश्यक असलेली दंडेली आणि अत्याचार करावयास प्रवृत्त केलेले आहे. आता पुढेंही पाकिस्तान द्यावयाचें असेल, तर त्यांना शक्यतो हे कैफ सतत देत राहिलें पाहिजें व तसे ते करण्याला चुकणार ही नाहीत.

जीनाचा खरा जय किंवा पूर्ण जय आज झालेला नसून यापुढें व्हावयाचा आहे. त्याकरीता त्याला आह्मीं हिंदुच मदत करणार आहोंत! कोणत्याही बऱ्यांवाईट साधनांनी जीना मुसलमानांत ऐक्य घडवून आणीत आहे. तर आपण हिंदु एकमेकांचे दोष आणि अवगुण निवडीत बसून हिंदूच्या शक्तीच्या ऱ्हासाला कारणीभूत होत आहों. दंगेघोपे यापुढें तरी कसे बंद होतील? जीना अधिक मग्रुर, माजोरी आणि संघटीत होऊन विशेष कठोर हल्ले हिंदुस्थानवर करून आपणाला सळो की पळों करून सोडील, अशी भीती ह्या षंढांना वाटत आहे! एक चतुर्थांश लोक तीन चतुर्थांश लोकांना भारी होतील अशी ज्यांना भीति वाटते, त्यांनी त्या प्रसंगाची वाट न पाहतां एरव्हीच कोठे समुद्रांत जीव देऊन त्या भीतीचा परिहार करून घेतलेला बरा!

तात्पर्य, आपल्या खऱ्या परीक्षेचा काळ आता पुढेंच आहे. जितका जितका जास्त संयम, अधिक विवेक आणि विशेष सहनशीलपणा आपण धारण करूं, तितकें तितकें आपल्या हिताचें होईल. ज्यांना काँग्रेसचे धुरीणत्व मानवत नाही त्यांनी तें स्वत:कडे घ्यावे. पण स्वत: कांही एक न करतां कोणतीही जबाबदारी न स्वीकारतां नुसतें विध्वंसक आणि विघातक

स्वरूपाचें कार्यकरीत जाऊं नये. देशाला कौल लावावा. ज्या पक्षावर देश विश्वास ठेवील त्या पक्षाला स्वत:च्या धोरणाप्रमाणे आणखी पाच वर्षे कार्य करू द्यावे. व मग ती हिंदुसभा असो, की काँग्रेस असो, जे लोक असें करून न शकतील ते जातीनें हिंदु असले तथापि कृतीनें पंचमस्तंभी पाकिस्तानवालेच मानावे लागतील. त्यांच्याच साह्याने जीना स्वत:चे पूर्ण पाकिस्तान साध्य करून घेईल.

*(१७ जुलै १९४७)*

# पंधरा ऑगस्ट

तारीख पंधरा ऑगस्ट हा दिवस यापुढें हिंदुस्थांनांत एक अत्यंत महत्त्वाचा आणि पवित्र असा दिवस मानला जाईल. हिंदुस्थानाला या दिवशीं स्वातंत्र्य लाभ होईल. या अलौलिक व आज कैक वर्षे उराशी बाळगलेल्या आनंददायक घटनेमुळें प्रत्येक स्वातंत्रेच्छू मनुष्याला उत्साह वाटावा हें स्वाभाविक आहे. हा दिवस तशाच प्रकारच्या अलौलिकतेनें आणि आनंदानें साजरा व्हावा ह्यासाठी निरनिराळें कार्यक्रम जिकडे तिकडे आखले जात आहेत. आणि आह्माला खात्री आहे, की पंधरा ऑगस्ट हा दिवस हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनी नोंदण्या इतका अपूर्व ठरेल.

काहीं लोकांनी या दिवशीं सुतक पाळण्याला कारण काय, तर ह्मणे हिंदुस्थान खंडित झाला– आमचा हिंदुस्थान विभागला गेल्याचें शल्य आमच्या मनाला सारखें टोंचतें आहे. या अशुभ प्रसंगी उत्सव कसला? बरोबर एक रुपया आह्माला जेथे मिळावयाचा तेथें पंधराच आणे हाती आले, तर एक आणा गेल्याबद्दल अश्रु ढाळायचे सोडून पंधरा आण्याच्या प्राप्तीबद्दल आनंदोत्सव करावयाचे हें आह्माला मान्य नाही. आमचा रुपया आह्माला प्राप्त करून द्या. त्याबद्दल हत्त्या, रक्तपात, मारामारी, लुटालुट, वाटाबाटी, जाळपोळ काय होईल तें होवो पण ‘एक आणा सोडनेकु बात

न्है.’ हें झाल्यावरच आह्माला उठवावयाला या, तोपर्यंत आह्मीं आपले येथें झोंपून रहातो!

हिंदुस्थानची विभागणी झाली ती कां व कशा परिस्थितीत झाली ही गोष्ट जगजाहीर आहे. दोघां भावांचे पटेना, तर त्यांनी विभक्त व्हावें हें उत्तम. त्यांनी जन्मभर झगडत आणि भांडत राहण्यापेक्षा स्वत:ला लागू असलेला वाटा घेऊन आपापला व्यवहार पहावा. यांतच सौख्य व समाधान आहे. ज्या गोष्टींत एकाला सुख नाही, ती गोष्ट दोघांनाही असुखकर होत असते. हा साध्या व्यवहारांतील न्याय राष्ट्रालाही पण लागू आहे. हिंदु मुसलमान एकत्र राहिले असते, गुण्यागोविंदानें वागले असते तर ती गोष्ट सोन्याहून पिवळा झाली असती. असें होणें शक्य आहे की काय हे पाहण्यासाठी कॉंग्रेसने आज इतकी वर्षे प्रयत्न करून पाहिले, मुसलमानांना पुष्कळ सवलती दिल्या. त्यांच्या प्राथमिक मागण्या मान्य करून पाहिल्या. पण कशाही रीतीनें माघान न होता आपले ईप्सित साध्य करण्यासाठी जेव्हां त्यांनी नरमेधासारख्या आसुरी उपायास हात घातला तेव्हांच निरूपायानें व तात्पुरती ह्मणून फाळणीला रडत रडत संमति दिली.

या बाबतींत कांही गमावल्यासारखें वाटलें तथापि मिळविलें तें इतकें विपुल आहे की त्याबद्दल प्रत्येकानें अभिमान हा बाळगिलाच पाहिजे. आज दोनशें वर्षाचें पारतंत्र्याचें जोखड मानेवरून उतरण्यासाठी थोडीशी देवाण घेवाण केली तर त्यांत कोणालाच दोष देतां येणार नाही. उलटपक्षीं जें गमावल्यासारखें दिसतें तें टिकवण्यासाठी जर आणखी ह्या पारतंत्र्याचें आयुष्य वाढविण्यात आलें असतें तर तोच खरा प्रसाद ठरला असता. एकदा योद्धा रणांगणावर जातो व शत्रुशीं झगडतां झगडतां त्याचा एकादा हात तुटतो तथापि जयश्री त्याच्या गळीं माळ घालते, तो विजयी होऊन येतो, स्वत:च्या देशाच्या स्वातंत्र्याचें रक्षण करतो. अशा वेळी त्याचा हात तुटला ह्मणून रडत बसावयाचें, कीं त्यानें मिळविलेल्या जयश्रीबद्दल आनंद मानावयाचा? ज्या लोकांना पंधरा ऑगस्टांत आनंद दिसत नाही, ईर्षा, हर्ष विजिगिषा वृत्ति उफाळून वर येत नाहींत ते एक फत्तर किंवा मेलेले मुडदेच मानावयास पाहिजेत.

पंधरा आगस्ट हा एक राष्ट्रीय सण ह्मणून साजरा करावयाचा आहे. ह्मणजे या दिवसापासून स्वातंत्र्याची प्रभात सुरू झाली असाच त्याचा

अर्थ घ्यावयाचा. हिंदुस्थानाला जें काय आज मिळालें आहे. तेंच त्याचें पूर्णध्येय किंवा साध्य होऊं शकणार नाही. वाट चुकून संबंध रात्र रानांवनांत भटकणारा माणूस जसा सकाळी शहराला जाणाऱ्या रस्त्यावर येऊन पडला ह्मणजे आनंदित होतो, ह्मणजे वस्तुत: तो शहर व तो या दोहोंमध्ये कांही मैलांचें अंतर असलें तरी त्यांची तमा त्याला वाटेनाशी होते व आपण आता आणखी थोड्या तासांनी कां होईना, इच्छीत स्थळीं खास पोंचू अशी उमेद बाळगून तो झपाझप पावलें टाकून पुढें जात असतो आणि शेवटीं त्या शहरांत प्रवेश करतो तद्वत आजची स्थिति आहे. आज भारताला प्राप्त झालेलें पूर्ण स्वातंत्र्यही नसेल पण तो या स्वातंत्र्याकडे जाणारा अचूक आणि निश्चित मार्ग असून आता विशेष विलंब न लागता तो आपल्या पूर्ण ध्येयाकडे पोंचेल यात शंकाच नाही.

जें काय भारताला लाभलेलें आहे तो अल्लाउद्दीनाचा दिवा आहे. त्यानें शहाणपणा धरून ह्या दिव्याचा उपयोग करून घेतला, तर त्याला हवें तें तें प्राप्त करून घेता येईल. निर्जन बेटावर बोट फुटून पोंचलेल्या रोबिनहूडने हातीं आलेल्या धान्याच्या फोलपटांतूनही पीक काढून कैक वर्षे तेथें आपली उपजीविका करून घेतली, त्या प्रकारचा आत्मविश्वास व दृढनिश्चय बाळगून जर भारतानें पाऊल टांकलें तर जगांतील महान प्रबल राष्ट्र ह्मणून हिंदुस्थानला मिरविता येईल. पण आपण नाडलों, आपण दुभंगलो, आपण कमकुवत झालों वगैरे पराभूतवृत्ति मनाशी बाळगून जे सतत रडत बसतील, ते राष्ट्राचें भयंकर नुकसान करीत आहेत असेंच दु:खानें ह्मणावें लागतें. हिंदुस्थानची फाळणी ही अपरिहार्य व अनिवार्यपक्षी घडून आलेली आहे. त्याबद्दल कोणी कोणाला जबाबदार धरायला नको आहे. मनुष्याच्या तसेंच राष्ट्राच्याही जीवनांत असे चढउताराचे प्रसंग येतच असतात. त्यामुळे स्वत:चा किंवा इतरांचा तेजोवध न होऊं देतां मोठ्या घडाडीनें पुढें सरून गमावलें त्याच्या चौपट मी स्वपराक्रमानें मिळवूं शकेन अशी हिंमत धरून जर भारतीयानी हा पंधरा आगस्टचा उत्सव आनंदानें साजरा केला, तरच त्यामुळें आपल्या भावि कालांतील प्रगतीचा आदर्श निर्माण होईल.

*(७ ऑगस्ट १९४७)*

# ग्रहण निवळलें!

उद्यांचा पंधरा ऑगस्ट हा दिवस हिंदुस्थानांत अत्यंत मंगल, महा पर्वणीचा व अवर्णनीय महत्त्वाचा मानला जाईल. या दिवसाचें महत्त्व किंवा मांगल्या येथें वर्णन करून सांगणें शक्य नाही व तें आमच्या लेखणीच्या आटोक्यांतही नाही. जगांतील चाळीस कोटी लोकसंख्येचें एक मोठें खंड उद्यां स्वातंत्र्य युगांत पदार्पण करीत आहेत. पदार्पण असें आह्मीं याचसाठी ह्मणत आहों कीं, कदाचित तें पूर्ण स्वातंत्र्य जरी होऊ न शकलें तरी स्वातंत्र्याची ती सुप्रभात आहे. सूर्य उदयांचली आला ह्मणजे तो माध्यान्ही येईलच यांत शंका मानण्याचें कारण राहात नाही. हिंदी जनतेनें केलेल्या महान आणि उज्ज्वल स्वार्थत्यागाला शेवटीं फल आलें व ज्यांनी हें सुवर्णयुग निर्माण करण्यास स्वत:चे प्राण, श्रम, बुद्धि आणि वित्त कामी लावलें त्यांना किंवा त्यांच्या स्मृतीला सहस्त्रश: अभिवादन करण्याला आपलें शीर विनम्र झाल्याखेरीज राहात नाही.

आह्मांला या दिवसाचें जसें महत्त्व वाटतें तसें तें बहुसंख्य हिंदी जनतेला वाटतें व हिंदी लोकांव्यतिरिक्त बाहेरच्या लोकांनाही ह्या दिवसांचे तितकेंच महत्त्व वाटतें. याचें कारण हें की हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यावरच जगाचें स्वास्थ अवलंबून आहे. जगात शांतता नांदण्यासाठी हिंदुस्थान आधीं पारंत्र्यांतून मुक्त होणेंच आवश्यक होतें व तसा सुदिन आज उगवला आहे. हिंदी जनतेला आपण स्वतंत्र झालों ह्मणून आनंद होणें स्वाभाविक आहेच पण जगांतील प्रत्येक व्यक्तीमात्रला हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यामुळे जगाच्या स्वास्थ्याची आणि शांततेची सनद आज बहाल केली गेली असल्याबद्दल कल्पनातीत आनंद होणें अगदीं स्वाभाविक आहे. हिंदुस्थान हा एक शांतताप्रिय, अनाक्रमणप्रिय आणि निरभिलाष वृत्तीचा देश आहे. दुसऱ्यावर वर्चस्व मिरवावें, दुसऱ्याचें अपहारावें, दुसऱ्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणावी हें त्यास आवडत नाही. त्यामुळें नेहमी त्यांची वृत्ति शांतताप्रिय राहील व हिंदुस्थानचें सहाय्य घेतल्याशिवाय कोणताही देश उपक्रम करूं धजणार नाही. जेथें नाती तेथें जय हा महान सिद्धांत हिंदुस्थाननें आत्मसात करून

सोडला आहे. त्यामुळें ज्या बाजूला धर्म असेल, त्या बाजूला न्याय असेल त्याच बाजूला हिंदुस्थान मदत करील व प्रत्यक्ष सहाय्यही करील. यामुळें हिंदुस्थानचा वचक साऱ्या जगाला राहील. साऱ्या जगाचे भवितव्य उज्ज्वल करण्याचें पवित्र कार्य ईश्वरानें आपल्याकडे सोंपविले आहे याबद्दल कृतज्ञता वागविणें उचित ठरेल.

भारत आज स्वातंत्र्य वारूवर आरूढ झाला आहे. हा वारू इष्ट दिशेकडे नेऊन आपलें ध्येय गांठण्यासाठी अद्याप त्याला कमालीचा स्वार्थत्याग आणि प्रयत्न केला पाहिजे. हिंदुस्थान देशाकडें जगाचें पुढारीपण आल्याखेरीज राहणार नाही, असें जेव्हा आह्मीं ह्मणतों तेव्हां आमच्या लक्ष्यी ही गोष्ट नेहमी अढळ असते की, तें स्थान प्राप्त करून घेण्यास अद्याप आपल्याला मोठा प्रवास करावयाचा आहे. पण या प्रवासाला आरंभ करण्याची संधी उद्यांच्या दिवसामुळें लाभलेली असल्यामुळें तो दिन शुभदिन ह्मणून वंद्य आणि पर्वणीचा मानला जाणें स्वाभाविकच आहे. ज्या दिवशीं विद्यार्थी पाटीपेन्सिल घेऊन शाळेंत जातो, त्या दिवशीं तो पंडित नसतो. पण त्या स्थानाला जाण्याचा तो प्रवासी बनतो. हिंदुस्थाननें दोनशें वर्षे पारतंत्र्यांत घालविल्यामुळें तो अगतिक, परावलंबी आणि दुर्बल बनला आहे. त्यांतून तो आतां मुक्त होत असल्यामुळें आपली शक्ती, बल आणि उत्साह फिरून प्राप्त करून घेण्याला त्याला कसोशीनें प्रयत्न करावयाचा आहे. त्यासाठीं प्रत्येक व्यक्तीनें आणि घटकानें स्वत:ची संघटना करून अधिकारारूढ पक्षांशी सहकार्य केलें पाहिजे. बहुमतानें जो पक्ष निवडून येईल तो स्वत:च्या मताविरुद्ध जरी आला असला तरी शिस्तप्रिय व लोकशाहीचें तत्त्व मानणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें त्याच्याशीं सहकार्य केलेंच पाहिजे. कोणत्याही लोकशाहीप्रधान राष्ट्रांत याच मार्गाचा अवलंब केलेला असतो आणि तोच योग्य ठरेल.

सुदैवानें हिंदुस्थानांत अगदी उपेक्षणीय असला तरी एक पक्ष असा आहे, की त्याला आजचा दिवस मांगल्याचा वाटत नाही! तो ह्मणतो त्यांत कांही तरी अर्थ असलेला दिसला तरी, जी घटना घडून आली आहे ती सर्वथा आरिहार्य व अटळ अशीच होती व केवळ निरुपायामुळें ती स्वीकारली गेली!

ह्या पक्षाच्या अंगांत धमक असती तर तशी ती घडून यावी ह्मणून त्यानें काहीं उपाय सुचविला असता किंवा केला असता. मुसलमानांशी लढायाला पाहिजे होतें, ब्रिटिशांशीं झुंजावयाला पाहिजे होतें व हे कोणी करायला पाहिजे होतें तर तुह्मीं! विखंड राज्य तुह्मी आह्मांला मिळवून देतां तें आह्मांला मान्य नाहीं व प्रिय नाहीं असा ह्या पक्षाचा दावा आहे. 'न घरीं शस्त्र करीं मी गोष्ट सांगेन युक्तीच्या चार' या पक्षांतील हे लोक आहेत! निदान ज्या युक्त्या हे सांगतात त्या तरी समजसपणाच्या असावयास पाहिजे होत्या; कुठेंही नाही. अशा वेळी या पक्षाची उपेक्षा करणेंच शहाणपणाचें ठरेल. मुसलमानांनी जे अत्याचार आणि रक्तपात केले व स्वत:चें साध्य साधलें त्याबद्दल कांही हिंदूंना वैषम्य व राग वाटत आहे. परवां हिंदुमहासभेच्या आदेशाच्या आभासाखाली हा तिरस्कार लोकांनी स्वयंस्फूर्त व्यक्त केला. यानें ह्या लोकांना वाटलें, की आपला दर्जा वाढला. आपली आज्ञा लोकांनी पाळली. आतां निवडणूका लवकरच होणार आहेत. त्यावेळी त्याचा हा आत्मविश्वास कितपत टिकतो हे पाहावयाचे आहे. असो. उद्यांच्या दिवसाचें महत्त्व तसेचं अवर्णनीय असल्यानें तो हिंदुस्थानांत जिकडे तिकडे तितक्याच गौरवानें आणि उत्साहानें साजरा केला जाईल अशी भारताला उमेद आहे.

*(१४ ऑगस्ट १९४७)*

# हे आत्मबलिदान कीं आत्मविनाश?

स्वातंत्र्यप्राप्तीसाठी नितांत तळमळ वागविणें व त्यासाठी विधायक व रास्त मार्गानें चळवळ करणें, हेंच खऱ्या देशभक्ताचें लक्षण आहे. निष्क्रिय मनुष्य हा जसा एखाद्या देशाच्या उन्नतीला घातक होतों त्याप्रमाणें फाजील देशभक्तीच्या कैफानें बेफाम व उद्दाम झालेला मनुष्यही घातक होतो. आलपें ईप्सित साध्य करण्याचें ध्येय पुढें धरल्यावर त्यासाठी स्वीकारावयाच्या उचित मार्गाचे तारतम्य बाळगलें पाहिजे. गांधारीला ह्मणजे पुत्रप्राप्तीचा अतिरिक्त हव्यास लागला होता. ती गरोदर होती. निसर्गनियमानें घालून

दिलेली सीमा ओलांडल्यावर, तिला प्रभावी पुत्रसंतान लाभण्यानें वरप्रदान एका महान तपस्वाची दिव्य सेवा करून तिनें मिळविलें होतें. तो मार्ग चोखाळीत असतानांच तिच्या वात्सल्यभावना उद्दाम झाल्या आणि तिनें एक कठीण धोंडा घेऊन आपल्या पोटावर प्रहार केलें व अकाली बळजबरीचा गर्भपात घडवून आणला. याचा परिणाम असा झाला की, गांधारीचा तेजस्वी गर्भ शतश: खंडीला गेला व त्याच्यापासून दुष्ट प्रवृत्तीची स्वकुलद्रोही व आत्मविनाशी संतति निर्माण झाली.

बंगालमधील लोकांनी एका काळी स्वराज्यप्राप्तीसाठी अवलंबिलेल्या दहशतवादाचा कसा विचका झाला व त्यामुळें स्वराज्यप्राप्तीसाठी तारु ठराविक वेळी किनाऱ्याला लागण्याच्या ऐवजी तें अधिकच दूर दूर कसें चाललें व शेवटी पूज्यपाद महात्माजींच्या अहिंसावादाचा अवलंब केल्यानें अखेर तें कसें इष्ट ठिकाणी पोचलें, याचा इतिहास येथें पुनरपि निवेदन करण्याची आवश्यकता नाही. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी किंवा ते राखण्या-टिकविण्यासाठी जे दहशतवादाचा अवलंब करतात ते देशाची सेवा करतात, असें ह्मणणें चुकीचें ठरते. विधायक मार्गानें गेल्यानेंच निश्चित ध्येयप्राप्ती करून घेतलेलें अनेक देश आहेत. याच्या उलट दहशतवादानें फसगतच विशेष होतें, असा इतिहास दाखला देतो. दहशतवाद यशस्वी करण्यासाठी ज्यांनी देहत्याग किंवा आत्मबलिदान केलें त्यांची स्तुतिस्तोत्रें गाण्याचाही एक काळ होता; किंवा त्या प्रयोगाचा अनुभव घेण्याचाही कोणी त्या वेळी प्रयत्न केला, तर तो क्षम्य ठरण्याचा एकसमय होता; पण हा अनुभव घेऊन झाल्यावर किंवा त्या प्रयत्नाचें एकदा वैफल्य ठरल्यावर, त्याचा अवलंब करूं पाहणारे लोक देशभक्त न ठरतां देशद्रोहीच मानलें पाहिजेत.

ह्या लोकांच्या आत्मबलिदानाचें कौतुक करावें की काय, हा देखील वादच आहे, अनाठायी आत्मबलिदान हा गुन्हा होतो. 'समुद्रा, तूं मागें हट, न पेक्षा मी तुझ्या उदरांत आत्मसमर्पण करीन' अशा निश्चयानें कोणी समुद्रांत उडी घेतली, तर तो शहणपणा ठरत नाही. त्यासाठी स्थलकाल विशेष याचाही निर्णय अवश्य घेतला पाहिजे. आपले आत्मबलिदान समर्पक आणि उपकारक ठरेल, तरच तें करण्यांत फायदा असतो. जपानी युद्धाचें

वेळी एका पाणबुडीत बसून एक मनुष्य एका मोठ्या जहाजाचा नाश करी व त्यांत स्वत:ही मरून जाई. पण त्यामुळें तो शत्रूचें लाखो रुपयांचे नुकसान करूं शके. तसेच डॉ. कोटणीस यांची कथा कोणी वाचली किंवा पाहिली असेल, त्यांनाही कळून येईल की आत्मबलिदान हे उचित प्रसंगी उचित स्थळीं करावयाचें असतें व तरच त्याचा योग्य परिणामही होतो.

या दृष्टीनें पाहिलें असतां आपल्या गोव्यांत प्रस्तुत असलें अनिष्ट प्रकार जें चाललेलें दिसतांत त्यांचा धि:कारच करणें शहाणपणाचें वाटतें या वाममार्गानें चाललेल्या तरुणांचे जीवन विनाकारण खर्च होत असलेलें पाहून खेद वाटतो. या मार्गाखेरीज अन्य अनेक मार्ग आज उपलब्ध आहेत. त्या मार्गाने ते जातें तर त्यांच्या हातून देशाची महत्त्वाची सेवा घडली असती. समुद्रांत जीव देणाऱ्या मूर्ख माणसाप्रमाणें या लोकांचे आत्मबलिदान आज निरर्थक होतें, आणि त्यांच्या निष्ठेची आणि श्रद्धेची देणगी फोल ठरते. हें तरुण अन्य मार्गानें देशाच्या सेवेला लागतें तर खरोखरच स्वत:चें जिणें सफल करते आणि देशाच्या चरणी त्यांची सेवा रूजू झाली असती.

आह्मांस अशी सूचना या लोकांना कराविशी वाटतें, की या अनिष्ट मार्गापासून त्यांनी ताबडतोब निवृत्त व्हावें. व्हावयाच्या गोष्टी यथानुक्रम आणि कालपरत्वें होऊन जातील. त्यासाठी आपल्या जीवनाचा होम अशा अनिश्चित आणि अपेशी मार्गानें होणें इष्ट नाही. यासाठी प्रत्येकानें योग्य विधायक मार्गानें जावें. उचित स्थळी स्वार्थत्याग करावा व हमखास यशस्वी होण्याच्या मार्गावरूनच आत्मबलिदानाची गाडी न्यावी. दहशतवाद हा एक अनिष्ट, अपेशी आणि अयशस्वी मार्ग पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें ठरलेला आहे. त्याला आतां फिरून हात घालण्याचा प्रयत्न करणें ह्मणजें मागील अनुभावावरून शहणपणा शिकण्याला आपण लायक नसल्याचा निर्वाळा देण्यासारखें होईल.

महात्मा गांधीसारख्या जगद्वंद्य देशहितासाठी स्वार्थत्याग करण्याची इच्छा असणाऱ्या तरुणांपुढे अनेक विधायक कार्यक्रमांची मालिका रचून ठेवली आहे. आपापल्या मगदुराप्रमाणें आणि शक्तीप्रमाणें त्यांतील एक किंवा अनेक मार्ग आपणाला चोखाळता येतील. अहिंसामय मार्गांनी कार्य जितकें त्वरित

आणि निश्चित होतें, तितकें अत्याचारी मार्गांनी होऊं शकत नाही. अत्याचारांनी स्वत: तें करणाऱ्यांचा तर नाश होतोच, शिवाय विधायक कार्यांना ज्या प्रकारचें शांत आणि समंजस वातावरण पाहिजे असतें, तेंही लाभत नाही. तेव्हां शहाण्यांनी असल्या असत्प्रवृत्त मार्गाचें अवलंबन न करतां सन्मार्गाचेंच नेहमी अनुकरण करावें, असा सर्वांना आग्रहाचा सल्ला आहे.

*(गुरुवार, १९ ऑगस्ट १९४८)*

# जो दुसऱ्यावरीं विश्वासला!

आठ ऑगस्ट हा मुंबईतील कांही गोमांतकीय लोकांनी 'गोवा दिन' ह्मणून पाळाल्याचें कळतें, गोवा प्रांताला योग्य ते राजकीय हक्क मिळावे ही आकांक्षा प्रत्येक सुविद्य गोमंतकीय माणसाला असावी हें स्वाभाविक आहे. त्या उद्दिष्टासाठी उचित आणि सरळ मार्गांनी प्रयत्न केले जावेंत, अशी बहुजनसमाजाची इच्छा असावयास पाहिजे. कोणतीही चळवळ यशस्वी होण्याला ती करण्याला अनुकूल आणि प्रतिकूल कालस्थलमान पहावयाचें असतें. होडी समुद्रांत घालताना भरती-ओहोटी आणि वाऱ्याचें मान पहावें लागते. अनुकूल परिस्थितीत केलेली चळवळ लवकर यशस्वी होते व त्यांत श्रम आणि वित्त थोडें खर्च होते. या उलट प्रतिकूल परिस्थितीत केलेल्या चळवळींत अगणित श्रम व वित्त खर्च होते व यश अभावानें मिळण्याचा संभव उरतो.

गोव्यासाठी करावयाच्या चळवळीची सूत्रें मुंबईहून किंवा बाहेरच्या प्रांतांतून हलविली जावीत, हें जरा विचित्रच दिसतें. मुखत्यारपत्रें देऊन लग्न करण्यासारखी ही स्थिति आहे. गोव्यासाठी करावयाची चळवळ ही गोव्यांतच झाली पाहिजे व तेथें ती जशी करतां येणें शक्य आहे, तशीच करणें शक्य झालें तरी पुरें आहे. मला ती खुद्द गोव्यांतच झाली पाहिजे. गोव्यांत चळवळ करावयाची झाली ह्मणजे तिला जबाबदार माणसें हवी लागतात, आणि त्या चळवळीच्या पद्धतीत आणि कृतीत जबाबदारीची

छटा दृगोचर होते. 'हिटलरला नामशेष करा, चर्चिलला खाली ओढा किंवा निजामचें कंबरडें मोडा' ह्या घोषणा त्या त्या ठिकाणी करावयाच्या झाल्या तर त्यांचा विचार करावा लागतो; तें करणें शक्य आहें, की काय याची शहानिशा करावी लागते, आपले सामर्थ्य अजमावावें लागतें. साधनें शोधावीं लागतात– व त्यांच्यावर अवलंबून मग घोषणांच्या फंदांत पडावें लागतें. वाघाच्या जाळीकडें जाऊन वाघ शोधण्याचा प्रयत्न झाला तर आपल्या हातांत आहे ती काठी की बंदूक यांचा विचार करणें प्राप्त असतें. घरीं राहूनच जर नुसत्या वाघाच्या शिकारीच्या गोष्टी करावयाच्या झाल्या, तर मग हातात कांठीदेखील नसलेली पत्करेल.

सोशालिस्ट लोकांना प्रस्तुत कोठेंही तरी व कांही तरी गडबडगुंडा करावयाचा असतो. कार्य यशस्वी होवों किंवा त्यांत अपेश येवों समाजवाद्यांच्या नियंत्रणाखाली तें चालतें, एवढेंच श्रेय त्यांना पुरेसें होतें, हैद्राबाद प्रकरण घ्या, गोवा प्रकरण घ्या, त्यांत ह्या लोकांची लुडबूड आहेच. गोव्याची चळवळ कां फसली, ती योग्य वेळी सुरू झाली, की अवेळी झाली, ती शुभ शकुनावर झाली, की अपशकुनावर झाली व या सर्वांचे उत्तरदायित्व कोठें जातें याचें कोणी निरीक्षण करील, तर त्याला कळून येईल कीं स्वत:च्या बालबलावर न विश्वासतां भलत्यांच्या भूलथापांना भुलून आपण फशीं पडलां आहों. स्वत:चेंच बल पाहून चळवळ सुरू केली गेली असती, तर तिला यश विलंबानें किंवा कालान्तरानें आलें असतें. पण 'उतावळा नवरा व गुडघ्याला बाशिंग' अशी आपली गत झाली. अद्यापिही आपण झालेल्या चुकीचा बोध घेऊन पुढें पाऊल टाकण्याचा शहाणपणा दाखविला असता तर मनुष्य चुकीला पात्र असतो हा दाखला घेऊन पुढील मार्ग चोखाळणें शक्य होतें. पण प्रस्तुत आपणाला त्याग, हाल श्रम काढावयाचें नाहीत, तर नुसत्या राणाभीमदेवी गर्जना करावयाच्या आहेत. ह्मणून आह्मीं आमचें व्यासपीठ गोमांतकाबाहेर उघडलें आहे. तेथे कितीही गर्जना केल्या आणि तोंडाच्या वाफा दवडल्या तरी त्याबद्दल कोणीही विचारीत नाही.

वरील आठ तारखेच्या सभेंत सोशालिस्टांचाच वरचष्मा होता, असें त्यांत झालेल्या भाषणांच्या वृत्तांतावरून दिसतें. तुह्मांला नेहरू सरकार कांही

एक मदत देऊ शकत नाही. आणि शकणार नाही. कारण त्या सरकारचें धोरण कणखर, खंबीर किंवा एक घाव दोन तुकड्यांचे नाही. पाकिस्तानकडे पहा, काश्मीरकडे पहा, हैद्राबादकडे पहा. सदाच चालढकल, ओढाताण कुचंबणा असाच जणूं त्यांचा शिरस्ता लागून गेला आहे. आह्मी अधिकारावर असतों, तर तुह्मी केव्हांच राजपदावर बसला असतां व वरील सारी कुलंगडी आणि भिजत पडलेली घोंगडी आह्मी ताबडतोब खुंटीवर वाळत घालून घेतली असती, असेंच जणू काय त्यांना ह्मणावयाचें आहे. गोमंतकाच्या बाबतीत तरी निदान यापुढे सोशालिस्टांनी मुळीच तोंड उघडूं नये हें बरें. डॉ. लोहियांनी केलेल्या साऱ्या घोषणा कशा फोल झाल्या व प्रचीतिविनां जें बोलणें ते अवघेंच कंटाळवाणे यापैकी सारा प्रकार कसा झाला ह्या इतिहासावर कांही युगें लोटली नाहीत. तो अगदी काल आजचा ताजा आहे. अशा वेळीं स्वत: ला जें करणें शक्य आहे आणि इष्ट आहे, जेवढा स्वार्थत्याग करण्याचें पेलेल तेवढेंच कार्यकरीत जावें, हेंच योग्य होय.

गोमंतकांत कारवार सामील करावा किंवा कारवारात गोवा सामील व्हावा, महाराष्ट्रांत त्याचा समावेश व्हावा किंवा कर्नाटकांत तो गडप व्हावा ह्या वल्गना ह्मणजें 'बालिश बहु बायकांत बडबडला' अशांपैकीच आहेत. अशा दृष्टीच्या टप्प्यापलीकडे असलेल्या वादग्रस्त प्रश्नावर वक्तव्यें करून खुद्द गोमंतकीयांतच दुही माजवावी आणि आपणाला अप्रिय वाटणाऱ्या शंकरराव देवांसारख्या पुढाऱ्यांना शिव्या देण्याची संधी साधून घ्यावी या पलीकडे समाजवादी लोक गोव्याचें कोणतेंच हित करणार नाहीत. गोव्याचा प्रश्न गोमंतकीयांनीच स्वत:च्या बलावर आणि विधायक मार्गानी सोडविला पाहिजे.

*(गुरुवार, दि. २६ ऑगस्ट १९४८)*

# दार समितीचा निराशाजनक अहवाल

सुविद्य आणि सुबुद्ध जनतेत प्रक्षोभ उडवून देणारी अगदी अलीकडील एक घटना ह्मटली ह्मणजे, दार समितीचा वृत्तांत होय. घटनासमितीचे अध्यक्ष

डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी लखनौ हायकोर्टाचे माजी न्यायाधीश श्री. एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून तिच्याकडे आंध्र, केरळ कर्नाटक व महाराष्ट्र हे नवे प्रांत निर्माण करण्याच्या शक्याशक्यतेचा विचार करण्याची कामगिरी सोपविली होती. या समितीने दक्षिण हिंदुस्थानांतील सर्व प्रमुख प्रांतांना भेटी दिल्या. हजारांवर लेखी निवेदनें जमा केली. आणि आदमासें सातशें प्रतिष्ठित विद्वानांच्या तोंडी जबान्याही घेतल्या. या समितींत समाविष्ट झालेलें गृहस्थ या प्रश्नांचा विचार अगदी नि:पक्षपातीपणानें, अभ्यासपूर्वक आणि चालू परिस्थितीचें पूर्ण आकलन करूनच या महत्त्वाच्या प्रश्नावर निर्णय करतील अशी आशा करण्याला भरपूर वाव असता प्रत्यक्षात मोठा अपेक्षाभंग या बाबतींत घडून आलेला आहे असें खेदानें ह्मणावें लागतें. भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व गृहीत धरून तें अमलात आणण्याच्या तपशीलाचा विचार करण्यासाठींच या समितीची नेमणूक होती. पण या मुख्य जबाबदारीची सुतराम उपेक्षा करून आपल्या अधिकारक्षेत्राबाहेर असलेल्या अलबत्यागलबत्या कांही प्रश्नांना अवास्तविक आणि विकृत स्वरूप देऊन मुख्य प्रश्न सोईस्कर रीतीने डावललेला गेला आहे. असल्या महत्त्वाच्या मुद्यांवर विचार करण्यासाठी नेमलेल्या समितीचें कार्य पूर्वग्रहदूषिततेपासून अलिप्त, संकोचरहित आणि वैचारिक गोंधळाच्या दोषापासून पूर्णपणें मुक्त असलें पाहिजे. कोण काय ह्मणतो व कोणाला काय पाहिजे याचा विचार न करतां किंवा कोणाच्या दोषादोषाचीही पर्वा न बाळगतां अशा कमिट्यांकडून आपलीं कामें पार पाडली गेली पाहिजेत. दार समितीनें तयार केलेल्या या वृत्तांतावर अनेक पुढाऱ्यांनी देण्याच्या मेजवान्यांत साखरभात करण्योचं एकंदर ठरवून साखर आणण्यास बाजारांत पाठविलेल्या कारभाऱ्यांनी ते सामान आणण्याची कामगिरी तेथेंच टाकून तो साखरभात प्रकृतीला अपायकारक असतो, हिवाळ्यात कोठ्याला जड असल्यानें कोणतें अनर्थ ओढवू शकतात यांवर अनधिकृत 'शर्मन' झोडलें. जावयाला उपाशी ठेवण्याचा उपद्व्याप यासारखा हा प्रकार आहे.

भाषावार प्रांतरचना ही बाब आजकालची नाही. आज पंचवीस वर्षांमागे ती कॉंग्रेसच्या कार्यक्रमांत अंतर्भूत झालेली आहे. १९२० साली

महात्माजींनी तिला मान्यता दिलेली आहे. आणि आज इतकी वर्षे या ना त्या रीतीनें जनतेच्या पुढें ती आश्वासने आणि अभिवचने यांच्याद्वारां सतत नाचविली जात आहे. बहुसंख्य जनतेच्या हृदयांत अशा रीतीनें दृढमूल झालेली ही न्याय्य, नैसर्गिक, क्रमप्राप्त आकांक्षा हें आज लहान रोपटें राहिलें नसून तो खोलवर पाळेंमुळें धरलेला प्रचंड वृक्ष बनलेला आहे. समितीनें केलेल्या ह्या प्रतिकूल शिफारसीच्या झंजावातानें तो उलथून पडेल असें वाटावयाला कोणतंही कारण नाही.

भाषावर प्रांतरचनेविरुद्ध समितीनें जी कारणें पुढें केली आहेत, ती प्रस्तुत गैरलागू व बेपर्वाईची आहेत. हिंदी संघराज्याला मोठमोठ्या अडचणींना तोंड द्यावयाचें आहे. तर ह्या प्रकारचा बागुलबोवा समितीने कितीही वागवून पुढें केलेला असला, तथापि या प्रश्नांत आस्थेनें लक्ष्य घालणारी जनताही दूध खुळी नाही. हिंदी संघराज्यापुढे चलनवाढ, निर्वासितांचा प्रश्न, अन्नटंचाई, उत्पादनवाढ, साक्षरताप्रसार वगैरे अनेक अडचणींचा ढीग जरी उभा असला, तथापि भाषावर प्रांतरचनेचा संबंध अप्रत्यक्षपणे त्यांच्यांशी कोणत्याही रीतीनें येत नाही. वरील प्रश्न समोर उभें असतानांही भाषावार प्रांतरचनेहून कमी महत्त्वाचें अनेक कार्यक्रम आज सरकारनें अंगिकारलेलें आहेत. वरील अडचणींचे निराकरण ठराविक मुदतीतच होणार हें आज निश्चित नाही. किंवा या एवढ्याच अडचणी निभावल्या ह्मणजे पुढें सर्व कांही स्थिरस्थावर होईल असेंही कोणी भविष्य वर्तविलें नाही. तेव्हां एक तर भाषावार प्रांतरचनेवर कायमचा बोळा फिरवून जनतेच्या आज पावशतकावर हृदयाशी जोपासलेल्या एका महान रास्त आकांक्षेला मूठमाती दिली पाहिजे, किंवा अशा प्रकारच्या विसंगत, विस्कळित आणि अप्रयोजक सबबी पुढें न आणतां भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व ताबडतोब अंमलांत आणण्याच्या तयारीला लागलें पाहिजे.

भाषावार प्रांतविभागणी ही प्रस्तुतच्या परिस्थितीत अशक्य आहे हें जाणण्याला सदर दार समितीतील सभासद तेवढे लायक आहेत असें ह्मणतां येणार नाही. हा एवढा बुद्धिवाद ऐकण्यासाठीच घटनासमितीच्या अध्यक्षानी ही समिति नेमलेली नव्हती. पुष्कळशा अडचणी हिंदी संघराज्याच्या पुढें आहेत, ह्याची जाणीव ठेवूनच ही समिति नेमण्यांत आली होती. तसा प्रकार

नसता तर ही गोष्ट अशक्य हें आपल्या जबाबदार पुढाऱ्यांना या पूर्वीच जाहीर करतां आलें असते व ही समिती नेमण्याची यातायात टाळतां आली असती, व तन्निमित्त झालेला अमित खर्च व श्रमही वाचले असते. जनतेच्या हृदयांत पाळेमुळें धरून बसलेला हा प्रश्न आज पंचवीस वर्षांनी स्वातंत्र्य हाती आल्यावर पुरा केल्याशिवाय राहणें ह्मणजे काँग्रेसनें आतापर्यंत दिलेलीं आश्वासनें आणि अभिवचनें गटारांत फेंकण्यासारखें होईल.

भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व मान्य केलें ह्मणजे ताबडतोब त्यांची अंमलबजावणी करणें शक्य नाही हें आपण सर्व जाणतोच. त्याची पूर्वतयारी करण्याला जो कालावधि लोटणार, तेवढ्यानें सहजच हिंदी संघराज्यापुढील पुष्कळसें कठीण प्रश्न मोकळेंही होऊन जातील. 'जेथे इच्छा आहे, तेथें मार्ग आहे.' या न्यायानें जनतेची ही मागणी एकदतां रास्त, न्याय्य आणि प्रामाणिक ठरविली ह्मणजे ती पूर्ण करण्याच्या मार्गांत येणाऱ्या अडचणी सहज दूर करतां येतील. निर्वासितांसारखा जिकिरीचा प्रश्न, हैद्राबादसारखा कटकटीचा प्रश्न, काश्मीरसारखा खर्चिक प्रश्न वगैरे अनेक प्रश्न ज्या यशस्वी रीतीनें सोडविलें किंवा सोडवित आणलें आहेत, त्या सरकारला बाकीचें प्रश्न इतकें महत्त्वाचें खास नाहीत, की त्यासाठीं आज पावशतक जोपासलेली एक रास्त आकांक्षा पायाखाली तुडविली जावी.

भाषावार प्रांतरचनेच्या बाबतीत जो वृतांत दार समितीनें सादर केलेला आहे त्याच्यामागें दुसऱ्या कोणाचा तरी हस्तक्षेप असावा की काय, असा संशय येतो. निदान आह्मी वर ह्मटल्याप्रमाणे निरनिराळ्या परिस्थितींत नेहरूपटेलांनी जी भाषणें ठिकठिकाणी केलीं, त्यांची छाया या कमिटीनें आपल्या वृत्तांतावर पडूं दिली आहे असें ह्मणणेंच भाग पडते. त्याचप्रमाणें मुंबई, मद्रासचा प्रश्नही या वृत्तांतांत येण्याचें मुळीच कारण नव्हतें. एकदां भाषावार प्रांतरचना अनावश्यक हे तत्त्व गृहीत धरलें ह्मणजें, मुंबई महाराष्ट्रांत घालणें इष्ट की अनिष्ट, हा प्रश्नच उद्‌भवत नाही. आरोपी निर्दोषी असें ठरलें किंवा ठरविलें गेलें ह्मणजे त्यांला फांशीची शिक्षा द्यावी किंवा जन्मठेप द्यावी अथवा सश्रम कारावासाची द्यावी ह्याचा विचार आपल्या निकालांत न्यायाधीशाला करण्याचें कर्तव्य ठरत नाही. संन्याशाला रेशनिंगमध्ये साड्या

किती मिळतील किंवा धोतरें किती मिळतील हा प्रश्न जसा अभावित होईल, तशा प्रकारें एकदां भाषावार प्रांतरचनेचा मूलभूत हक्क अमान्य केल्यावर मुंबई, मद्राससंबंधीची चर्चा खाजवून खाज काढल्यासारखी अप्रासंगिक आणि अनावश्यकच ठरतें. पण आपल्या वृत्तांतांतील सूचनांपेक्षाही जनतेची इच्छा प्रबल ठरून जर करता भाषावार प्रांतरचना अंमलांत आलीच, तर निदान मुंबईच्या मिरासीला भांडवलदारांना मुकावें लागूं नये अशी सदिच्छा समितीनें उराशी धरलेली दिसतें.

काँग्रेस सरकार आज अधिकारावर आहे. आज पंचावन्न वर्षे काँग्रेसनें स्वराज्य संपादन करण्यांत जें महत्त्वाचें कार्य केलेलें आहे त्याचा इतिहास बनलेला आहे. या इतिहासांत भाषावर प्रांतरचनेच्या अभिवचनाचें आणि आश्वासनाचें लिहिलें गेलेलें पान आतां पुसून काढणें कोणालाही शक्य नाही. जर करतां तसा प्रयत्न कोणाकडूनही केला गेला तर, फार मोठ्या सुबुद्ध आणि सुविद्य जनतेचा रोष काँग्रेसला सहन करावा लागेल व पुढील निवडणुकांवर त्याचा अनिष्ट परिणाम झाल्याखेरीज राहणार नाही. समितींत समाविष्ट झालेल्या लोकांपेक्षा मोठ्या विद्वानांनी व अधिकारी व्यक्तींनी ह्या प्रश्नावर अनुकूल मत दिलें असल्यानें ह्या भाषावार प्रांतरचनेचा हा प्रश्न आतां कोणाला मागें घेता येणार नाही हें उघड आहे.

*(गुरुवार, दि. ३० डिसेंबर १९४८)*

◆◆◆





**'भारत'कारांचे केपे येथील 'भारत'चे मुद्रणालय.**

# सामाजिक अग्रलेख

''श्री. हेगडे-देसाई यांची या अडीच-तीन तपांतील कामगिरी इतकी श्रेष्ठ दर्जाची आहे की, त्यांस गोमंतकाच्या आधुनिक परिवर्तनाचे प्रणेते ह्मटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. श्री. हेगडे-देसाई यांचा त्याग, सार्वजनिक काम विषयक तळमळ, रंजल्या गांजल्यास आपले ह्मणण्याची तयारी इ. गोष्टींस आपल्या गोमंतकाच्या इतिहासांत तोड नाही... आमच्या 'भारत'कारांनी सर्व सुखांवर लाथ मारून सार्वजनिक कार्यास वाहून घेण्यासाठी फकिरी वृत्ती स्वीकारली. लोकोपयोगी कामांकरीता त्यांनी सोसलेले कष्ट नि भोगलेला भुर्दंड सर्वश्रुत आहे. या दोन तीन तपांतील गोमंतकातील कोणतीही चळवळ घ्या, तींत हेगडे-देसायांनी काया, वाचा, मनाने भाग घेतला नाही असे कधी झालेच नाही. या कामास त्यांनी चालविलेल्या 'भारत' पत्राचा फार उपयोग झाला.''

***- श्री. गोपाल कृष्ण गुडे यांच्या भाषणातून***

# सार्वजनिक चळवळ कां करावी?

गेल्याच्या मागील दोन अंकांमधून फोंडे महालांतील देवालय प्रकरणासंबंधाने आह्मीं जे दोन लेख लिहून लोकांस स्वकर्तव्यास जागण्याची इशारत दिली. तिच्यासंबंधानें त्या प्रकरणांत हितसंबंध आलेल्या कांही गृहस्थांकडून आह्मांस असा पोक्तपणाचा(!) खुलासा देण्यांत आला की, 'हजार जणांच्या या कार्याच्या सिद्धर्थ स्वत: पुढे सरून अधिकाऱ्यांशी विरोध आणि कोमिसावांतील श्रीमंतांशी शत्रुत्व कोण संपादन करून घेतो? स्वत:चा व्यक्तीश: फायदा ज्यांत नाही, आणि झाले तर नुकसानच व्हावयाचे, अशा कामांत निष्कारण पडण्याची उठाठेव कां करावी?'

केवळ प्रस्तुत प्रसंगीच नव्हे, तर इतरही अनेक प्रसंगी वेळोवेळ हे शब्द कानीं येत असतात. 'स्वत:चे नुकसान करून घेऊन, अनेकांशी विरोध संपादून, अमोलिक वेळ, अविश्रांत मेहनत आणि पै पै करून मिळविलेला पैसा यांचा अनाठायीं विनियोग करून अशा या चळवळी करण्यांत अर्थ काय, घरचें खाऊन बाजारच्या भाकरी भाजण्याची ही निरर्थक उठाठेव कां?' हाच त्या सगळ्या आक्षेपांचा मथितार्थ असतो.

आणि ज्याअर्थी एकदां मनांत उद्‌भवलेल्या शंकेचें कसें तरी समाधान करून घेतल्याशिवाय चैन न पडणें हा मनुष्याचा स्वभावधर्म आहे, त्याअर्थी या शंकेचें समाधान बहुधा अशा रितीनें केलेले दिसतें की, इतकेंही असून जर कांही मंडळी सार्वजनिक चळवळींत बुद्ध्या पडून आपलें सर्वतोपरी नुकसान करून घेतात, तर लोकांत कीर्ति मिळवून अजरामर होणें हाच त्यांचा त्यांत हेतु असला पाहिजे. कीर्तीला भुलूनच हा मार्ग त्यांनी धरला असला पाहिजे. एरवीं स्वत:च्या पदराला खार लावून घेऊन वेळ, मेहनत, पैसा यांवर पाणी सोडण्यास कोण तयार होईल?

या कोटिक्रमापासून साहजिकपणेंच असा एक दुष्परिणाम होतो कीं, आपला स्वत:चा लौकिक करून घेण्याच्या इच्छेनें वावरणाऱ्या या राजश्रीचे चोचले आपण कां पुरवा? यांनी आपला लौकिक करून घ्यावा व त्याकामी

आह्मी झीज सोसून यांना मदत करावी तें कां? असा विचार मनांत आणून पुष्कळजण सार्वजनिक कामीं परिश्रम घेणाऱ्यांना जी सहानुभूति व पाठिंबा द्यावयाचा, तो देईनातसे होतात. इतकेंच नाहीं तर प्रसंगी त्यांची (लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकणारे मानून) अवहेलना किंबहुना द्वेषही करतात. कार्याची हानि ज्या कारणांनी होते, त्यांतलेंच हेंही एक प्रमुख कारण आहे.

असो. तर अशा या परिस्थितीमुळे सार्वजनिक चळवळ कां करावी? या प्रश्नाचा ऊहापोह करणे जरूरीचें होत आहे. ह्मणून या ठिकाणी त्याचा विचार करण्याचें योजिलें आहे.

एवढी एक गोष्ट निर्विवाद आहे की, कोणताही, केवढ्याही दर्जाचा मनुष्य असो; श्रीमंत असो, गरीब असो, विद्वान असो, अविद्वान असो, शहाणा असो अगर मूर्ख असो; आपल्या एकंदर आयुष्क्रमांत-पाळण्यांतून निघून चित्तेवर जाईपर्यंत त्याच्याकडून जे जे कांही प्रयत्न होत असतात, ते सुखसंपादनाच्याच हेतूने होत. ह्मणजे केवळ सुखाकरीता मनुष्याची सारी धडपड चाललेली असते.

सुखाचे दोन प्रकार मानण्याची वहिवाट आहे; ऐहिक व पारलौकिक. पैकी ऐहिक जीवनक्रमाचाच विचार या ठिकाणी आह्मांकडून होत असल्यानें त्यासच अनुसरून आह्मीं लिहित आहोंत. या ऐहिक सुखाच्या स्वरूपांविषयीही पण सर्वांचे एकमत झालेले दिसून येत नाही. प्रत्येक जण आपापल्या बुद्धीप्रमाणें सुखाची कल्पना ठरवित असतो. तथापि सर्वसाधारण मानानें असें ह्मणावयाला हरकत नाही की, मनुष्याला स्वत:च्या जीवनाकरिता, सोईकरितां अगर मन:शांतीकरिता प्रपंचात ज्या ज्या गोष्टींची जरूरी लागते, ज्यांच्या अभावी त्याला अडचण भासते किंवा त्याची मन: शांति बिघडते, त्या त्या गोष्टींची अनुकूलता ह्मणजे सुख होय.

आणि या सुखाकरिता, ह्मणजे ज्या ज्या गोष्टींची प्रपंचांत आपल्याला उणीव भासते, त्या त्या अनुकूल करून घेण्याकरीतां, सर्व मनुष्यांचे प्रयत्न चाललेले असतात. या प्रयत्नांनी सर्वांना सर्वच मिळतें असें जरी नाहीं, तरी ते मिळावें अशी इच्छा बाळगूनच त्यांचे प्रयत्न चाललेले असतात आणि योग्य

दिशेनें व योग्य रीतीनें जर ते करण्यांत आले तर बहुधा यशस्वीच होतात.

आतां अशा रीतीनें आपल्याच सुखाकरितां प्रयत्न करण्याची तयारी व प्रवृत्ति जरी मनुष्याच्यांत असली, तरी कांही सुखें अशी असतात कीं, तीं त्याला एकट्याला साध्य होणे शक्य नसतें. आणि ह्मणून त्या सुखाच्या प्राप्तीमुळें ज्यांचे कल्याण होण्याचा संभव असतो, अशा पुष्कळांनी मिळून त्या कामीं प्रयत्न करावा लागतो, निदान एकट्यानेंच जरी प्रयत्न केला, तरी पुष्कळांचे हितसंबंध लक्ष्यांत ठेवून, त्यांच्या मदतीने तो त्यास करावा लागतो.

कारण, मनुष्य हा जन्मत:च समाजशील व समाजजींवी प्राणी असल्याने समाजाशिवाय त्याची आयुर्यात्रा सुखनैव चालणें शक्य नाही, कुटुंबाशिवाय मनुष्यांचे चालत नाहीं व समाजाशिवाय कुटुंबाचे चालत नाही. तसेंच, पद्धतशीर राजव्यवस्थेशिवाय समाजाचेंही चालत नाही. अशा स्थितींत तें चालावें ह्मणून कुटुंबात व समाजांत असणाऱ्यांना ज्या कौटुंबिक, सामाजिक व राजकीय बंधनांनी बद्ध व्हावें लागते, तीं बंधनें त्यास पत्करणें प्राप्त होतें.

ही बंधने जर सुखदायक असलीं (उत्तम प्रकारच्या समाजस्थितींतच तीं तशी असूं शकतील) तर गोष्ट निराळी. पण जर ती दु:खदायक असतील, तर त्यांच्या योगाने होणारें दु:ख मनुष्याला भोगावेंच लागते. त्याचा प्रतिकार करणें त्याला एकट्याला साध्य नसतें. तर सर्व समाजाची जागृति करून सर्वांच्या निदान त्यांतील बहुतांच्या अगर मुख्य मुख्यांच्या संमतीनें व सहाकारित्वानें त्या बंधनांचे स्वरूप पालटून तें इष्ट असें करावें, तेव्हा तज्जनित दु:खाचा परिहार होत असतो.

उदाहरणार्थ, सामाजिक बाबतींत केवळ एका बालविवाहाच्या चालीमुळें, किती किती तरी दु:खें उत्पन्न झालेली आपणास सोसावी लागतात! संतति खुजट, खुरट, रोगट निपजल्यानें तिच्या जोपासनेंच्या व संरक्षणाच्या कामीं केवढी तरी यातायात सोसावी लागतें! तसेंच, योग्य अवधीच्या अभावी अशिक्षित राहिलेल्या स्त्रियांच्या अज्ञानामुळे खरें विवाहसौख्य प्राप्त न होऊन उलट वेळोवेळ केवढा ताप सोसावा लागतो! शिक्षणाच्या अभावामुळे पोरगा

अनाचार करूं लागला तर केवढा हृद्रोग लागून राहतो! राजकीय बाबतींत प्रसंगी अधिकाऱ्यांच्या जुलमांने व औद्योगिक बाबतींत परदेशी मालाच्या चढाओढीमुळें उद्योगधंद्याला धोका आल्यानें, आपली जीवनयात्रा कशी कष्टमय होते, इ. चा अनुभव कोणाला नाही?

ही जी दु:ख–केवळ व्यक्तीविषयकच दु:खें प्रपंचात आपल्याला भंडावून सोडतात. त्यांचे निवारण, व्यक्तीश: एकट्याला शक्य नसल्याने वर सांगितल्याप्रमाणें सर्वांच्या संघशक्तीने अगर सहकारित्वानेंच तें करावें लागतें आणि अशा प्रकारचे प्रयत्न हीच सार्वजनिक चळवळ होय.

वरील विचारसरणी लक्ष्यांत घेतली ह्मणजे 'सार्वजनिक चळवळ कां करावी?' या प्रश्नास जागा उरणार नाही आणि ती चळवळ ह्मणजे कल्पनासाम्राज्यातील कल्पतरूंच्या फळांकरीता वावरणारी नसून उलट प्रत्येकाच्या कौटुंबिक व ऐहिक सुखांत प्रत्यक्षरीतीनें भर घालूं शकणारीच आहे या गोष्टीची जाणीव पडून येईल.

तसेंच सार्वजनिक चळवळीच्या कामी परिश्रम घेणारे मनुष्य ह्मणजे केवळ लौकिकाकरीता धडपडणारे प्राणी नसून त्याहून निराळ्या दृष्टीनें पहाण्यासारखे ते आहेत. आणि शिक्षणाच्या दृढ संस्कारानें मनें उदात्त झाली असतां तशी मन:स्थिती (निरपक्षपणे समाजकार्थी परिश्रम घेण्याची) होणें शक्य आहे. त्यांत आश्चर्य मानण्याजोगें कांही नाहीं हेंही त्यावरून दिसून येईल.

तथापि, घटकाभर लौकिकाच्याच लालसेनें हे अशा कामीं वावरतात ही गोष्ट जरी गृहीत धरली, तरी पण त्याकरीतां समाजहितार्थ स्वसुखावर पाणी त्यांकडून जर सोडण्यांत येते, आणि अशा रीतीनें समाजाचें कार्य घडून येत आहे, तर त्याच्या पारितोषिकादाखल तो त्यांची लालसा पुरविण्यास फुकांचे वाहवा वाहवा ह्मणण्यास काय हरकत आहे? हाही विचार मनांत आणला पाहिजे. बाकी या कामीं जी सहानुभूति अगर सहाय्य द्यावें लागेल, तें समाजकार्यार्थच होय.

तात्पर्य, सार्वजनिक चळवळ ह्मणजे कांही वृथा माजविण्यांत येणारें

ढोंग नसून उलट समाजाच्या गरजांपैकी अत्यंत महत्त्वाची ती एक गरज आहे आणि ह्मणून तीविषयीं उदासीन राहणें अगर तिच्या कामीं परिश्रम घेणाऱ्यांची कोणत्याच दृष्टीनें अवहेलना करणें कदापि इष्ट नाही ही गोष्ट लक्ष्यांत घेऊन प्रत्येकाने वागलें पाहिजे.

*(बुधवार, दि. २५ डिसेंबर १९१२)*

# आर्यभूमि कीं अनार्यांचा मुलूख?

आमच्या थोर पूर्वजांनी जो भाग्यशाली देश आह्मां वंशजांकरितां ठेवला, त्याची अवस्था आज कशी आहे, हें जाणण्याची एखाद्यास इच्छा झाली, आणि त्यानें हिंदु राष्ट्राच्या अंत:स्थितीकडे नजर पुरविली, तर त्याच्या मनांत जे अनेक प्रश्न उभे राहतील, त्या सर्वांचे सार एका प्रश्नांत सांगावयाचें झालें, तर तें शिरोभागी दिलेल्या वाक्यांत सांगता येईल. ज्या सदाचारी राष्ट्राच्या सर्वांगसुंदर सुधारणेवरून एका काळी त्याला पुण्यभूमि, आर्यभूमि, ही सार्थ विशेषणें लावण्यात येत असत, नव्हे लावणें हेंच अगदीं सत्यबोधक ठरलें होतें, तोच देश रहिवाशांच्या अनास्थेमुळें इतका अवनत दशेस पोंचला आहे, की त्यास आज तीं विशषणें लावणें ह्मणजे नुसता शब्दछलच नव्हे, तर सत्यापलाप करणें होय. नित्यनैमित्तिक कर्मांत वसिष्ठवामदेवादि थोर पूर्वजांचे नांवाचा घोष करून, त्या घोषाच्या गडबडीत आपले दुर्वर्तन छपवून आपल्या ब्राह्मण्याचा दिमाख दाखविणारें आजचे नामधारी ब्राह्मण ती पूज्य पदवी वापरण्यास ज्याप्रमाणें सर्वथा अपात्र, तद्वत् दास्यवृत्तींत संतोष मानणारे, अज्ञानी, कर्तव्यशून्य ह्मणून परतंत्र, व खुळचट रूढींनी ग्रासलेले लोक ज्या भूमींत रेंगाळतात, त्या प्रदेशास पुण्यभूमि हें नाव देणें, हें विझलेल्या निखाऱ्यास कोळशाचा अंगारा ह्मणण्याइतकेंच सरळ नव्हे काय? सहा सात कोटी धर्मबंधूंवर अस्पृश्येतेचा अर्थात अनार्यत्वाचा शिक्का मारून आपण अप्रत्यक्षता सोवळें आर्य असें भासविण्याचा प्रयत्न पांढरपेशा वर्गांने केला तरी, जोंवर इतरांच्या उत्कर्षार्थ सर्वस्व वेंचण्याचें सोडून स्वोदरपूर्तीसारख्या

शुद्र सुखांत रममाण होणारें लोक समाजाचे वर्णगुरू असतील, समाजास सदाचारदीक्षा देण्याकरीतांच ज्या संस्था स्थापण्यांत आल्या, ती धर्मगुरुपीठें दुराचारी अनुयायांकडून पैसा वसूल करून स्वताची चैन चालविण्यांत संकोच पावणार नाहीत. जनकविश्वामित्रादी महात्म्यांच्या तेजस्वी रक्ताचे अंश आपल्या धमन्यांतून वाहत आहेत, अशी खूण जगास पटविण्याचें काम क्षात्रियांकडून होणार नाही. सारांश वर्णाश्रमधर्मांत विहित अशी कर्तव्यें बजाविण्यात प्रत्येक वर्ग कुचराई करील, तोंवर हिंदुस्थान ह्या शब्दाचा अर्थ 'आर्यभूमि' असा न होता 'अनार्यांचा मुलूख' असाच होणार हें निस्संशय आहे. आणि एका दृष्टीने तें ह्मणणें बरोबर आहे, असें ह्मटलें पाहिजे. इतर धर्मबंधूस, नव्हे प्रत्यक्ष आपल्या आयाबहिणीससुद्धां शिक्षणाचा गंध न देतां, क्वाथोलिक पंथाच्या आचार्यांप्रमाणे, धर्मरहस्याची गुरुकिल्ली आपल्याच मुठींत दाबून धरणारे, ह्मणजे समाजांतील अज्ञान वाढवण्यास मदत करणारे लोक वर्णगुरुपदाचा उपयोग जेथें बिनधोक घेतात, हिंद्वेतरांस पावन करण्याचें नीतिधैर्य ज्यांच्या अंगी नाही, असे आचार्य जेथील धर्मगुरुस्थानें भूषवित आहेत, दहाबारा वर्षांच्या अर्भकांच्या डोकीवरून वस्तरा फिरविण्यात धर्मरक्षण होत आहे असा जेथील लोकांचा समज आहे, पवित्र धर्मस्थाना शेजारी दुराचारी अतएव अपवित्र लोकांस जागा मिळवून देणें, ह्मणजें देवाच्या ऊर्जेस हातभार लावणें आहे, नव्हे पोटच्या पोरीस व अनाथ बायांस वेश्यांच्या गोटात सोडल्यानें आपला पुण्यसंचय वाढीस लागेल, असल्या कुत्सित रूढींनी ज्या समाजाची दिशाभूल केली आहे, त्या समाजानें व्यापलेल्या भूभागास पुण्यभूमिं मानावयाची, तर भव्य सरस्वतीमंदिरांनी गजबजलेल्या, सुशिक्षित, कलाशास्त्र प्रवीण ह्मणून भाग्यशाली, कुत्सितजातिद्वेषविवर्जित, बंधुभावनायुक्त अशा इंग्लंडसारख्या देशाला कोणतें विशेषण लावायाचे? ब्रह्मचिंतनांत व समाजांत शिक्षण प्रसार करण्यांत जन्मसाफल्य ब्राह्मणांच्या वंशात जन्म लाभलें इतक्याच सबबीवर-पूर्वजांनी पुढें ठेवलेल्या कित्त्यांतले एक अक्षर देखील न गिरवितां जेथील लोकांस एखादी सन्मान्य किताबत वापरण्यास हरकत येत नाही, त्या देशास, विद्यमान रहिवाशयांच्या संसर्गानें तो दूषित झाला असला तथापि त्यास, पुण्यभूमि किंवा आर्यभूमि असलीं

सर्वस्वी विपरीतार्थबोधक विशेषणें लावण्यास विशेष तक्रार ती कां असावी, असा प्रश्न येणे संभवनीय आहे. व तो आमच्या दृष्टीनें बरोबर आहे. तरी पण आपण इतकें नजरेपुढून दूर करीतां कामा नये की, ब्राह्मण या नांवास सर्वथा विसदृश अशी कामगिरी करणाऱ्या लोकांस ते श्रेष्ठ किताबत लावण्यास विचारी माणसांस पराकाष्ठेचा खेद वाटत असतो. तर अशा माणसांनी हिंदुस्थानास आर्यभूमि हें विशेषण लावलेले पाहण्याचें भाग्य आमच्या नशिबी कोठून येणार? असो. तर जगद्वंद्य पूर्वजांच्या कुलास भूषणास्पद असें आचरण जोंवर आमच्याकडून होणार नाही, जोंवर उराशी कवटाळून धरलेल्या नासक्या रुढींचा त्याग आह्मीं करणार नाहीं, ज्ञानसंपादन व सृष्टिनिरीक्षण करण्याकरीतां परदेशगमन अवश्य आहे, असें मानणार नाहीं, जीर्ण अनावश्यक रूढीनियमाचें फाजील स्तोम माजविण्यांत संतोष मानूं, जातिसंस्थेने केलेली अव्यवस्था मोडून सगळा हिंदुसमाज एकजीव करणार नाही. सारांश, आर्य ह्या विशेषणास हिंदुसमाज खरोखर पात्र आहे. अशी खात्री जगास पटविणार नाहीं, तोवर हिंदु लोकांनी वसविलेल्या ह्या देशास आर्यभूमि असें न ह्मणतां, अनार्यस्थान असेंच जग ह्मणत राहील.

*(बुधवार, दि. २३ एप्रिल १९१३)*

# सुशिक्षितांचा धरसोडपणा

वैदिक काळीं एकरूप असलेल्या हिंदुसमाजाचीं कालाच्या तडाख्यांनीं हजारों शकलें झाली, तीं एकांत एक बसवून हिंदुसमाज पूर्ववत एकजीव करणें, हें आजच्या सुशिक्षितांचे कर्तव्यकर्म आहे. ह्या कामीं जे कोणी ढिलाई करितात, ते पापाचरण करितात, असें ह्मणण्यास हरकत नाही. आणि जे कोणी आपल्या वर्तनाने हिंदुसमाजाच्या भेगा जास्त वाढवीत असतात, त्या तिचा उच्चार करून लेखणी विटाळणें विहिंत नाही. हे उदात्त विचार जागृत झाल्यामुळें गेल्या दोन वर्षामागें वेदोक्त प्रकरण उपस्थित

करून धर्मगुरुंनी जेव्हां दुराग्रहवश होऊन बुजत चाललेल्या ज्ञातिमत्सराच्या भेगा मुद्दाम वाढविल्या, इतकेंच नव्हें, तर समाजाच्या फाटाफुटीबरोबर खुद्द आपली गादीदेखील फाडून तिचीं दोन शकलें केली, त्यावेळी महाराष्ट्राच्या पुढाऱ्यांनी धर्मगुरूंच्या त्या वर्तनाचा निषेध करण्याचें नीतिधैर्य दाखविले. वास्तविक ह्मटलें तर त्यास मिळालेल्या शिक्षणास अनुरूप असेंच त्यांचें त्या बाबतींत वर्तन होतें, त्यात स्वत:च्या नीतिधैर्याबद्दल पाठ थोपटून घेण्याचें कारण नव्हतें. आज विसाव्या शतकांत, फाटाफुटीच्या परिणामाचे भोग भोगून निर्मल दृष्टि झालेले व पाश्चात्य शिक्षण संपादून खऱ्याखुऱ्या वर्णगुरूपदास चढलेल्या सुशिक्षितांनी 'आपला तो बाब्या' ह्या संकुचित वृत्तीचा अवलंब करून जात्याभिमानपूर्वक धर्मगुरूंच्या दुर्वर्तनाची री ओढली असती, तर मात्र ती आश्चर्याची गोष्ट झाली असती खरी. परंतु महाराष्ट्राच्या सुदैवानें तसा प्रकार त्यावेळीं दिसला नाही, फारच थोडे धर्ममार्तंड वगळले, तर एकंदर वर्णगुरू, वेदोक्त प्रकरणाच्या बाजूस राहिले. परंतु त्या गोष्टीस कांही वर्षे लोटल्यामुळें असो, किंवा अन्य कांही कारणामुळें असो, पुढाऱ्यांस धर्मगुरूकडून झालेल्या त्या खेदास्पद प्रकाराचा पुरा विसर पडला असावा, असें धर्मगुरूंच्या आगमनानिमित्त मुंबईतील पुढाऱ्यांनी जे चार दिवस मौजेंत घालविले व महाराष्ट्रयांच्या तोंडास जेणेंकरून गालबोट लागले त्या प्रकरणाचा शेवट किवा जाहीर निषेध करण्याची आठवणसुद्धां त्यांस झाली नाही. ह्यावरून ह्मणण्यास हरकत वाटत नाही. वास्तविक पाहिलें तर म हाराष्ट्रीय समाजांची मत्सरबुद्धी जागृत करणाऱ्या ह्या धर्मगुरूंचा जो बडेजाव झाला तो अस्थानीं झाला, असें एखाद्या तिऱ्हाईतास खचित वाटेल. कंगाल महाराष्ट्राला धर्मपीठानिमित्त जो खर्च करावा लागतो, त्याचा मोबदला त्याला कोणत्या रूपांत मिळतो? किती विद्यापीठें ह्या धर्मगुरूंकडून चालविली जात आहेत? किती धर्मप्रचारकांना गावगन्ना धार्मिक विषयांवर व्याख्यानें देत हे धर्मगुरु फिरवीत आहेत? 'कण्या घालून कोंबड्या झुजविले' ह्मणतात. त्याप्रमाणें सामाजिक विषयांत झुंज खेळणारे धर्ममार्तंडरूपी कोंबडे पोसण्यापलिकडे, हजारो रुपयांची नासधूस करणारी ही धर्मसंस्थानें कोणती कामगिरी बजावीत आहेत? असे किती तरी प्रश्न पुढें येतात, की ज्यांची

समर्पक उत्तरें द्यावयाची असलीं तर ह्या धर्मसंस्थानास पाठीमागे राहिल्याखेरीज गत्यंतर नाही. मग अशा या धर्मसंस्थानिकांचा निषेध करण्याऐवजी सुशिक्षितांनी स्तुतिप्रचूर लेखांनी व व्याख्यांनानी गौरव केला तर तें बरोबर झालें असें कसें ह्मणता येईल? केवळ दुराग्रहवश होऊन वाढविलेली ब्राह्मणक्षत्रियांमधील दुही व तिच्या अनुषंगाने झालेली धर्मसंस्थेंची फाटाफुट ह्यांची तरफदारी तर उजळ माथ्यानें कोणास करता येणार नाहीं? दुराचारी लोकांवर कडक निर्बंध घालण्याऐवजी त्यांस पांघरूणाखाली घेण्याचें वात्सल्य ह्या धर्मसंस्थांकडून दाखविण्यात येत असतें. तें बरोबर आहे, असें तर ह्मणतां येणार नाही! तर मग ही व अशा मासल्याची अनेक कृत्यें जेथून उदय पावत असतात, त्यांचा डंका वाजविण्यास सुशिक्षितांना लाजच वाटली पाहिजे. जुनेपणाच्या अभिमानास वश होऊन अशांचा पाठीराखेपणा करणें ह्मणजे वडिलांनी खणलेल्या विहिरींतले खारें पाणी पिऊन तहान भागविणें होय. ह्या कृत्यांनी ज्यांच्या मनास खेद होत नाही, आणि कदाचित झाला तरी तो राजरोसपणे प्रगट करण्याचें नीतिधैर्य होत नाही. तो महाराष्ट्रीय सुशिक्षितवर्ग, सनातन धर्माभिमान्यांच्या दृष्टीनें कितीही स्तुतिपात्र ठरला, तरी सत्यप्रिय माणसांच्या अवज्ञेसच कारण होणार. पाश्चात्यांच्या इतक्या वर्षांच्या सहवासानें महाराष्ट्रीयांची दानत सुधारली आहे. असा पुरावा योग्य प्रसंगी आपणास पुढें मांडतां येत नसला, तर तो असून नसून सारखाच, उभय धर्मगुरू कोल्हापूरच्या बाजूस हमरीतुमरीवर आले होते, त्यावेळी मुंबईपुण्याकडची जी मंडळी खेदक्षीण झाली होती तीच मंडळी, न्यायकोर्टांत दिवाणी दावे खेळून हलाख झालेले धर्मगुरू धर्मप्रसाराच्या मिषानें धनोत्पादन करण्यास जेव्हा थाटाने मिरवीत आले, तेव्हा मागचें सारें विसरून सद्धार्मिकत्वाच्या कवचनिशीं पाद्यपूजेच्या उत्सवांत सामील झाले, ही गोष्ट महाराष्ट्रीय सुशिक्षितांच्या न्यायाप्रियतेचे अस्तित्व शाबीद करण्यास पुरेसी आहे की काय, ह्यांचा ज्याचा त्यानें विचार केलेला बरा. सरकारचें किंवा एखाद्या संस्थानिकांचे पाऊल जरा इकडचें तिकडे पडलें, तर कलकलाटानें आकाश-पाताळ एक करून आपली न्यायप्रियता सर्वश्रुत करणाऱ्या वीरांनी, धर्मगुरूंच्या हातून अत्यंत तिरस्करणीय आचरण झालेलें पाहिल्याबरोबर अत्यंत तीव्र शब्दांनी त्यांचा निषेध केला पाहिजे.

इतकेंच नव्हे, तर संधी सांपडेल त्या प्रसंगी आडवें होऊन ते ताळ्यावर येतील असें वर्तन ठेविले पाहिजे. सारांश लोकप्रियतेचे हलाहाल आपण पिऊन समाज सुखप्राप्तीचे मार्ग मोकळे करून दिले पाहिजेत. सुशिक्षणाचें अंतिम उद्दिष्ट तें हेंच. लोकहितास वाहिलेले आपले सध्याचे पुढारी असेंच आचरण करीत असतात, असे प्रामाणिकपणें ह्मणता येईल काय? वारा येईल तशी पाठ फिरविल्यानें लोकमान्यता संपादिता येत असली, तरी अबाधित राखतां येत नाही. वेदोक्त प्रकरणांमुळें कोल्हापूर सरकारासारखी बडीं प्रस्थे धर्मगुरूविरुद्ध खवळलेली पाहिल्याबरोबर आपल्यांतील पुढारी माणसें धर्मगुरूविरूद्ध कुरकुरू लागली. याप्रत ती शांत आहेत, तर हेही शांत झाले. समाजहितविघातक प्रकारचा पुरविण्याचें भान एकासही नाही. अशानें देशहित होणें शक्य आहे काय? क्षणोक्षणीं रंग पालटणाऱ्या पुढाऱ्यांस अनुसरणारा समाज सुधारणेच्या शिखरास कसा पोंचणार?

*(बुधवार, दि. २८ मे १९१३)*

# जुगार अप्रतिबंधच राहणार काय?

थोड्या भांडवलांत अतोनात संपत्ति मिळविण्याची लालूच दाखवून अखेरीस प्रापंचिकांच्या संसाराची राखरांगोळी करणारे हें दुर्व्यसन आपल्या गोवा प्रांतांत पराकष्टेचें बोकाळलें आहे, ही गोष्ट आतां कोणास नव्याने सांगावयाला पाहिजे असें नाही. विनाशकालाचें चक्र एखाद्या राष्ट्राच्या डोकीवर फिरूं लागले ह्मणजे सगळी दुर्व्यसनें त्या राष्ट्रांतील लोकांना जडतात, असा इतिहासाचा दाखला आहे. आणि तशा दृष्टीनें पाहिलें तर हिंदी समाजाला जडलेल्या अनेक दुर्व्यसनांच्या पंक्तींत जुगाराला स्थान मिळाले, तर त्यांत कांही नवल नाही. तरी पण हें व्यसन, पोर्तुगीज लोकांच्या संसर्गाने हिंदुसमाजाच्या गळ्यांत उतरलें नसले, तरी त्यांच्या सहवासामुळें हिंदी समाजांत भरभराटलें, असे सिद्ध करण्याचा प्रयत्न पुष्कळ लेखकांनी केला आहे. आणि पारिभाषिक शब्दांकडे नजर दिली, तर ह्या ह्मणण्यांत बरेंच

सत्य असावें, असें वाटतें. गोव्याबाहेर जुगार कोणत्या पद्धतींत चालत असेल तो असो; परंतु आपल्या प्रांतांत मात्र थेट पाश्चात्य पद्धतीनुसार, नव्हे तंतोतंत पोर्तुगीज पद्धतींत, चालत आहे, ही गोष्ट कोणासच नवी नाहीं. कसेंही असो; पोर्तुगीज लोकांच्या संसर्गाचा हा दुष्परिणाम असो, किंवा हतभागी हिंदी समाजाच्या दैवाचा हा एक दुर्विलास असो, त्यासंबंधाचा ऊहापोह करण्याचा आज आमचा विचार नाही. जुगारानें आपला हिंदीसमाज हतवीर्य, नीतिभ्रष्ट व आळशी बनवून सोडला आहे इतकेंच आह्मांस ह्मणावयाचें आहे. अशा लोकांना दुर्व्यसनपराङ्मुख करणें हें नीतिप्रसाराचें ब्रीद धारण करणाऱ्या लोकसत्ताक राज्यपद्धतीचें प्रमुख कर्तव्य आहे. किंबहुना इतर अनेक सुधारणा करण्यापूर्वी लोकांच्या मनोभूमीतून असल्या विषवृक्षांची पाळेमुळें खणून काढून ती सद्‌गुणबीजांच्या पेरणीस लायक करून ठेंवणे हेंच आद्य कर्तव्य आहे. तें आपल्या पोर्तुगीज राष्ट्राची सूत्रे ज्यांच्या हातांत खेळत आहेत, त्यांनी बजाविलें काय, किंवा त्यांनी बजाविण्याचा उपक्रम केला आहे काय, असा प्रश्न पुढें आला, तर त्यास काय उत्तर द्यावें ते समज नाही. राज्यक्रांति यशस्वी होऊन नवयुगास सुरवात झाल्यास दोहोंहून अधिक वर्षे झाली. इतक्या अवकाशांत पोर्तुगीज मुलखाच्या कानाकोंपऱ्यांत ह्या दुर्व्यसनाची इतिश्री करणें पुढाऱ्यांस कांही कठीण नव्हते. जेजुईत पंथी लोकांची हद्दपारी करण्यास पोर्तुगीज पुढाऱ्यांनी आजवर जितके श्रम घेतले. त्याच्या अर्ध्यांहून कमी श्रमांत, सदर पंथांच्या लोकांकडून होणाऱ्या दुराचाराहून पुष्कळ पटीने जास्त दुराचार समाजांतून कमी झाला असता. जेजुईत पंथी लोक कितीही वाईट झाले आणि समाजास बिघडवीत असले तरी ते, परोपकाराचा मुखवटा तोंडावर अडकावून सोडतीचा धंदा करणाऱ्या एखाद्या संस्थेंहून पुष्कळ पटीनें चांगले असले पाहिजेत. असें असता त्या लोकांची पाठपुरवणी करण्यांत पुढाऱ्यांनी किती तरी दक्षता दाखविलेली आहे. आणि हरतऱ्हेच्या मिषाने राजरोजसपणे चालणाऱ्या जुगाराकडे लक्ष्य देण्यास पुढाऱ्यांस सवड मिळाली नाही. हा खरोखरच चमत्कार होय. शिवाय हें लक्ष्यांत घेतलें पाहिजे की जेजुईत पंथाची इतिश्री करणें हें कांही नवीन राज्यपद्धतीचें अंतिम साध्य नव्हतें, उलटपक्षी जुगार व तत्सद्दश अनीतिप्रसारक प्रकार समूळ नाहीसा

करून समाजाची नीति शुद्ध राखणें हें आमचें ध्येय आहे, अशीं अभिवचनें पुढाऱ्यांकडून लोकांस अनेकदां मिळाली होती; व आजदेखील राष्ट्रांची नीति शुद्ध राखणें हें राज्यपद्धतीचे ब्रीद आहे. 'हेतु शुद्ध असला ह्मणजे पुरे, तो अमलांत आणतांना लोकांच्या मनोवृत्तीकडे पाहण्याचें आपणास कारण नाही.' हे ज्या पक्षाचें ब्रीद. त्या जहाल पक्षाचें अर्ध्वयु, प्रधानमंडळाचा केंद्र भूषवित असतां जुगाराविरुद्ध कोणतीच चळवळ झालेली ऐकूं येत नाही. उलटपक्षी 'समाजाच्या अपकर्षास कारणीभूत झालेल्या जुगाराचे बंड आह्मी पाहिल्या सपाट्यास मोडणार आहों' असें अभिवचन ज्यांच्या तोंडून पुन:पुन उच्चारलें जात असें, ते डॉ. आफोंस कोस्त, 'द्युतप्रतिबंधक कायद्याचा मसुदा पार्लमेंटपुढें येईल तर आपण जागेचा राजीनामा देऊ,' अशी धमकी देत आहेत, हा चमत्कार नव्हे तर काय? कांही प्रमुख पोर्तुगीज पत्रें डॉ. साहेबांच्या ह्या उफराट्या गतीचा खुलासा करीत आहेत, तो खरा असेल तर ही गोष्ट फारच खेदाची ह्मटली पाहिजे. एकंदरींत स्वत:च्या नफानुकसानीची नाजूक बाब पुढें आली असतां, राष्ट्रहितकारी प्रश्नाकडे दुर्लक्ष्य होणें, हें राष्ट्राचें नशीब ज्यांच्या हातांत आहे, अशा धुरंधर पुढाऱ्यांशी देखील शक्य आहे असा पोर्तुगीज पुढाऱ्यांचा दुलौंकिक होणें मोठेसे अभिमानास्पद नाही. बऱ्यावाईट लौकिकाची गोष्ट कशीही असो, पोर्तुगीज राष्ट्राच्या ऱ्हासास कारणीभूत झालेले हें दुर्व्यसन, राष्ट्राचें डोकं वर यावें एवढ्यासाठी तरी नाहीसें करण्याची सुबुद्धि पुढाऱ्यांस अवश्य झाली पाहिजे होती; परंतु तसे झाल्याचें चिन्ह कांही दिसत नाही. उलट जुगारासारख्या प्रकाराचे प्रश्न राष्ट्रीय ह्मणविणारी पोर्तुगालची पत्रें उपस्थित करीत आहेत. हा वाद अखेरीस विजयी होऊन जुगार आहे त्याच स्थितींत चालू राहिला तर पोर्तुगालाचें बरेंवाईट काय होईल ते होवो, गोव्याची मात्र धडगत नाही, हें खचित आहे. 'धनिक लोकांचा पैसा तिजोरीत पडलेला राहण्यापेक्षा फिरता राहणें देशास फार फायदेशीर आहे; आणि तो चांगल्या मार्गानें ज्या पक्षीं बाहेर येणें असंभवनीय आहे. त्यापक्षी तो ह्या द्वारानें तरी निघून समाजांत खेळणें कांही वाईट नाही. धनिक लोकांचे इतर ढंग ह्मणजे मोठेसे नीतिशुद्ध असतात असें थोडेंच आहे. ते बंद करणे सरकारास शक्य नाही. मग तेवढ्या जुगारावर

एवढा कटाक्ष कां?' असा कोटिक्रम जुगाराचे पक्षपाती पुढें आणतात, तो कांही खोटा नाही. पोर्तुगालचे झाले, किंवा गोव्याचे झाले तरी धनिक लोक साधारणत: सारखेच. त्यांच्या नीति विचारांवर जुगारानें चांगला बिब्बा पडतो, हें खरें. तरी पण थोड्याशा विचारशून्य लोकांची रंग जिरविण्याकरीतां इतरांच्या संसाराची होळी पेटविणारें हें दुर्व्यसन समाजांत अबाधित चालू देणें हे परिणामी फारच घातक आहे. हें तत्त्व पोर्तुगीज पुढाऱ्यांस लवकर उमजून द्युतप्रतिबंधक कायदा त्वरीत अमलांत येवो असें आह्मी इच्छितों.

*(बुधवार, दि. ११ जून १९१३)*

# ब्राह्मणांचें भूदेवत्व

'देव' ही पदवी फारच मोठी आहे. हिच्या तोडीचें विशेषण मानवी भाषेंत दुसरें नाही. अशी ही अतिश्रेष्ठ पदवी अखिल हिंदुसमाजानें एकमतानें ब्राह्मणाना कां दिली, आणि हिंदुराष्ट्रपुरुषाने ब्राह्मणवर्गाला आज अनंत काल शिरोभागी कां धारण केलें, ह्या गोष्टींचा विचार आजच्या नामधारी ब्राह्मणांनी अवश्य केला पाहिजे. सक्तीच्या खुषीनें एखाद्या नावडत्या राजांकडून अधिकाराचा राजीनामा घेतला जातो, तशा पद्धतीनें ब्राह्मणांनी ही किताबत मिळविली ह्मणावे, तर गेल्या पांचदहा हजार वर्षांत, लोकांवर सक्तीचा जुलूम करण्यास व तो बिनखटका पचला जाण्यास अवश्य असलेला राजदंड ब्राह्मणांनी धारण केल्याचा दाखला इतिहासांत सांपडत नाही. ह्यास अपवादात्मक असें एखादें दुसरें उदाहरण इतिहासांत सांपडणार नाहीं, असें नाही. तरी तितक्यावरून वरील ह्मणण्यास बाधा येत नाही. लोकांच्या मर्जीविरुद्ध देवत्व मिरविणें ह्मणजे सुळावरची पोळी आहे, हें सत्य आजकाल आपल्या प्रत्ययास येत आहे, तसेंच तें भूतकालिन लोकांच्याही प्रत्ययास आलें आहे. किंबहुना लोकमताविरूद्ध देवत्व मिरविण्याची हांव ज्यांनी धरली. त्यांची अखेर गत काय झाली, हें लोकनिदर्शनास आणणें, हेंच कार्य प्राक्कालिन इतिहास ठळकपणें करीत आहे. सारांश भूदेव ही पदवी ब्राह्मणांनी

घेतली नाही, तर ती इतर वर्णियांनी त्यांस स्वसंतोषानें दिली असली पाहिजे हें अगदी नि:संदेह आहे.

ज्ञान हें सगळ्यांना पूज्य असल्यामुळें तें संपादन करण्यांत जे आयुष्य वेंचतात ते इतरांना वंदनीय वाटतात. तशी कामगिरी ब्राह्मण वर्गाने अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत सहस्त्रावधि वर्षे केल्यामुळें इतर लोकांनी त्यांना भूदेव ही सर्वश्रेष्ठ पदवी दिली असावी. असा ह्या पदवीच्या उपपत्तीविषयी तर्क करण्यांत येत असतो. हा सर्वस्वी निराधार नसल्यामुळें सपशेल चुकीचा असावा, असें ह्मणतां येत नाही. तथापि इतक्याच कारणावरून ब्राह्मणांना ती सन्मान्य पदवी दिली असावी. असें ह्मणणें ह्मणजे इतर वर्णियांच्या पदरीं ढिलाई किंवा तारतम्यज्ञानाचा अभाव बांधल्यासारखे आहे. थोड्या कामगिरीबद्दल भक्कम मुशाहिरा कोण देतो! कदाचित प्रसंगविशेषी दिली तरी इतका दीर्घकाळपर्यंत तो बिनतक्रार चालला कसा? तसेंच विशेष कारण नसलें, तर एका नाहीं तर दुसऱ्या, ती नाहीं तर तिसऱ्या पिढीकडून तरी ह्या प्रकाराविरुद्ध तक्रार उद्‌भवल्याखेरीज राहती काय? ती उद्‌भवल्याचें आपण ग्रंथातंतरीं वाचलें नाही, त्यापक्षीं ती पदवी सर्वसंमत ठरली होती. हे निर्विवाद होय. आणि ती पिढ्यानपिढ्या सर्वसंमत ठरण्यात तसेंच बलवत्तर कारण असलें पाहिजे, हें सांगणें नकोच. आणखी तें कोणतें तेंच तर आपण समजून घेतलें पाहिजे.

सहजासहजी असो, किंवा परिश्रमपूर्वक असो, एखाद्याने ज्ञान संपादन करून स्वत:ची उन्नति करून घेतल्यानें लोकांना तो श्रेष्ठ वाटला तरी देवतुल्य वाटणार नाही. आणखी त्या श्रेष्ठत्वाचा अर्थ कौतुक असा करावावयाचा असतो. त्या श्रेष्ठत्वांत पुज्यत्वाचा अंश फारच थोडा असतो. एकाची डोकी दुसऱ्यापुढें लावायची झाली तर पहिल्याच्या मानेंवर कसलं तर वजन असलें पाहिजे. राजेलोकांपुढे लोकांच्या माना वांकतात त्या राजदंडाचा भार पडल्यामुळे, राजंदंड हातांत नाही, अशा पदभ्रष्ट राजपुरुषांपुढे कोणी मान वाकवायची नाहीं. मग त्याला देव ही पदवी अर्पण करण्याची गोष्ट लांबच राहिली. तर ब्राह्मणवर्गाने लोकांकडून भूदेव ही पदवी पटकवितांना स्वार्थत्यागाची जबरी किंमत दिली असली पाहिजे, हें उघड आहे.

बेकन हा मोठा विद्धान होता, तत्त्ववेता होता. तरी त्याला कोणी देव ह्मटलें नाही. तेंच टालस्टॉयला सगळें जग वंदनीय मानते. ह्यांचे कारण काय? तर बेकनची सगळी संपत्ति, विद्वता स्वार्थपर होती, आणि टालस्टॉयचें ब्रीद ‘वसुधैव कुटुंबकम्’ हें होतें. ह्मणजे बेकनची शक्ती सुखप्राप्तींत खर्च झाली होती. आणि कौंटने ‘स्वसुखानिरभिलाष: स्विद्वसेर्लोकहेतो’ हें व्रत धारण केलें होतें. ह्मणून पहिल्याला नुसता तत्त्ववेता तर दुसऱ्याला भूदेव मानण्यांत येत आहे.

भूदेव ही महत्तम पदवी ज्यांना अर्पण करण्यांत आली होती, ते आपले पूर्वज प्राणीमात्रांच्या कल्याणांत किती तत्पर होते, ह्यांचे वर्णन ग्रंथांतरी आहे, ते वाचलें ह्मणजे आश्चर्यानें मन थक्क होऊन जातें. इहपरलोकीं सद्‌गति देणारें ज्ञान भगीरथ प्रयत्नाने संपादन करावे, आणि त्याचा विनियोग लोककल्याणार्थ करावा, असें व्रत अखंड, वंशपरंपरेनें, हजारों वर्षे एकसारखें ज्या वर्गानें चालविले, त्याला भूदेव ही पदवी विशोभित दिसते, अशी तक्रार कोणत्याच काळी न उद्‌भवली तर त्यांत नवल तें कसलें? ज्ञान आहे तेथे सगळीं सुखें एकवटवीं हें अगदी साहजिक आहे. आणि ज्या जागीं ती एकवटतात त्या केंद्रस्थानापासून ती परत पूर्वस्थलीं फेंकण्यात आली, तर समाजाची समता उन्मळणें शक्य नाही. तर सहजप्राप्तसुखें समाजांत विभागून देऊन स्वत: निरिच्छ वृत्तींत समाधान मानण्याची अलौलिक कामगिरी ज्या वर्गानें अनंतकाल चालविली, त्याला भूदेव ही पदवी फारच नामी शोभली असावी, ह्यांत संशय नाही.

पण ती महत्तम पदवी आजच्या स्वार्थलोलुप ब्राह्मणांनी, नव्हे प्राक्कालिन ब्राह्मणांच्या विशुद्ध कुलांत जन्मलेल्या माणसांनी वापरणें नीतीस धरून आहे, असे ह्मणतां येईल काय? आपलें सर्वस्व परोपकारार्थ आहे, अशा भावनेनें व्यवहार चालविलेल्यांची संभावना ज्या विशेषणानें झाली, तेंच उत्कृष्ट विशेषण, आजकालचे स्वार्थसाधन करण्यांत पटाईत झालेले नामधारी ब्राह्मण वापरूं लागले, तर त्या शब्दाची अवहेलना केल्यासारखें होत नाही काय? सुशिक्षित जगास आदर्श झालेल्या वशिष्ठवामदेवादि महर्षींच्या सच्चरित्रास आजचे त्यांचे वंशज दूषवीत नाहींत, असें ह्मणतां येईल काय?

राजकीय, धार्मिक किंवा औद्योगिक अथवा कोणतीही बाब घेतली, तर तींत चाललेली ब्राह्मणवर्गाची घालमेल, इतरांसारखीच स्वार्थपर दृष्टीनें चालली आहे, क्षुद्रसुखप्राप्तीकरीतां होत आहे, हें नाकबुल करीतां येईल काय? ह्या सगळ्या प्रश्नांस प्रामाणिकपणानें उत्तर द्यावयाचें झालें तर 'नाही.' ह्या एकाच शब्दांत दिलें पाहिजे. तर मग इतर वर्णियांनी आह्मांस भूदेव ह्मणावे, वर्णगुरू मानावे, आमच्या पायांशी आपलीं मस्तकें नम्र करावी, असें प्रतिपादन करण्याचा आह्मांस मुळींच अधिकार नाही, हें उघड आहे. आणि ह्याविरूद्ध जे कोणी आचरण करीत असतील, ह्मणजे जुना शास्त्राधार दाखवून भोळया लोकांकडून मान्यता मिळवीत असतील, ते सामाजिक प्रकरणांत अत्याचार करीत असतात, असें ह्मणण्यास अडचण नाही.

वरील विवेचनावरून ब्राह्मणवर्गांतील गृहस्थ पोटाचे पाईक झाले आहेत, असें आह्मी ह्मणत नाही. इतर वर्गांत निस्वार्थबुद्धीची जशीं थोडीं माणसें आहेत, तशीं ती ब्राह्मणांतही आहेत. हें आह्मांस माहीत आहे. पण अशांची संख्या फारच थोडी असल्यामुळें एकंदर ब्राह्मणवर्गाची रूपरेखा तयार करताना त्यावर नि:स्वार्थबुद्धीचा रंग जास्त भरण्याचें कारण आहे, असें आह्मांस वाटत नाही.

*(बुधवार, दि. २५ जून १९१३)*

# मद्यपानाचा प्रसार

पाश्चात्य लोकांच्या संसर्गापासून ज्या कांही बऱ्या वाईट चाली आमच्या हिंदुसमाजांत शिरल्या, त्यांत मद्याचें सेवन ही एक अत्यंत अनिष्ट व भयंकर चाल होय! स्वर्गलोकांत वारुणी ह्या नांवाने प्रसिद्ध असलेली ही बया एका विशिष्ट अशा असूरजातींतच सुखनैव वावरत होती. आमच्या समाजातील तत्कालिन लोकाग्रणींनी या बयेचें पांढरें पाऊला घरांत पडूं नये ह्मणून अत्यंत सावधगिरी व कडेकोट बंदोबस्त राखला होता. त्यावेळेच्या सर्व ग्रंथांतून हिचा तिरस्कारपूर्वक निषेध केला, हें तर झालेंच. परंतु, हिंदुधर्मांशीं ज्यांच्या

प्राणाचा एकजीव झाला होता, व हिंदुत्वाचा अभिमान ज्यांच्या अंत:करणांत जागृत होता असे आमचे पवित्राचरणी पूर्वज या अवदसेंच्या वाऱ्याला देखील उभे राहत नसत. वर्णगुरू ह्मटलेल्या ब्राह्मणवर्गांत तर यद्विषयींचा इतका द्वेष होता, कीं दैत्यगुरू शुक्राचार्य एवढा त्यांत अपवाद निघाला होता. परंतु त्यासही अखेरीस परम अनुताप होऊन मद्यप्राशन करील तो पापी- आहे, अशी शापवाणी उद्धरावी लागली.

त्यावेळीं मद्यस्पर्शाचा कडक निर्षंध असतां, कित्यंक सेवनाभिलाषी झाले असतील, आपापल्या सोईप्रमाणें सवड काढून एकेक प्रकारच त्यांना आवडला असेल, अथवा आधुनिक भाषेत सांगावयाचे ह्मणजे कोणास फक्त बीरचीच गोडी लागली असेल, तर कोणी गांवठी दारूवरच आपली तृप्ति करून घेतली असेल, परंतु इतिहासकाराला ज्यावरून साधार माहिती देणें शक्य नाहीं, त्यावरून हें भ्रष्टतर पेय हिंदुसमाजांत मिसळलें नव्हतें असेंच खात्रीने वाटतें. हिंदुधर्मांत या पानाचा तितका तीव्र निषेध प्रगट केला आहे, पूर्वंकालिन हिंदूंनी याचा जितका परम तिटकारा दर्शविला आहे व याचा स्वीकार करणाऱ्या जातीशी जितका भयंकर विरोध केला आहे तितका दुसऱ्या कोणत्याही लोकांनी केला नाही. उलटपक्षी हिंद्वेतर लोकांच्या कित्येक पूज्य ग्रंथांत मद्य हे मनुष्याच्या सेवनोरीतां निर्माण केलेलें असून हितावह व सुखावह आहे अशी वचनें आढळतात!

ते कसेंही असो. मागल्या काळांतील लोकांच्या आदरानादराकडे लक्ष्य न देतां सध्याच्या परिस्थितीचे बारीक निरीक्षण केलें तर सर्व जगावर या वारूणीबाईचें साम्राज्य निष्कंटक चाललें असून तिचे पिढीजाद शत्रु असे हिंदुलोकही तिच्या भजनीमेळ्यांत सामील झाले व होत आहेत. इतकेंच नव्हे तर सर्व समाजाचे आलोचन केलें ह्मणजे बरेंच हिंदु सुरादेवीचे भक्त बनलेले दिसून येतात! ही स्थिति किती शोचनीय आहे बरें! जी सुरा आमच्या पूर्वजांनी अनर्थावह व धर्मकर्मभ्रष्ट करणारी ह्मणून पूर्ण बहिष्कृत केली होती, जिचें सेवन करणाऱ्या लोकांना नीच व पृथक मानण्यांत येत होतें, त्याच पवित्र हिंदु पूर्वजांचे शुद्ध वंशज आजला सुरापानांत किती दंग होऊ राहिले आहेत! हिंदुस्थानची वेस देखील ओलांडण्याची जिची पुण्याई नव्हती तीच

आतां हिंदुस्थानावर एकछत्री साम्राज्य चालवीत आहे हें पाहून कोणाच्या हृदयांचे पाणी पाणी होणार नाही?

आमच्या समाजाचें सर्वस्वी वाटोळें करणाऱ्या या बयेचे काय काय अत्याचार चालले आहेत, हें पाहिलें ह्मणजे पांचावर धारण बसते. या सुरापानाच्या योगेंकरून किती विद्वानांची विद्वत्ता निरूपयोगी होऊन गेली आहे, किती श्रीमंतांची संपत्ति धुळीला मिळाली आहे. किती पोरें पोरकी होऊन देशोधडीस लागलीं आहेत, किती तडफडून गतप्राण झालीं आहेत, किती पिढीजाद घरें जमीनदोस्त झालीं आहेत, यांची संख्या करणें चित्रगुप्तालाही कठीण जाईल, मग साध्या मानवी गणिताचा काय पाड? काय या अक्काबाईचें सामर्थ्य! हिच्या प्रतापामुळें जगांतील सद्‌गुणांचा ऱ्हास झाला, विवेक नेभळा बनला, नीतीचें मातेरें झालें, विद्वतेचा नामशेष उरला नाही, सत्याची धिंड निघाली, प्रेमादराचा मागमूस राहिला नाही, सर्वत्र अनाचार, बेबंदशाही, स्वैरपणा यांची यादवीच माजून राहिली!

सुरापानाबरोबर इतर अनेक गोष्टींत प्रगति पावलेले अन्य देश आहेत, परंतु हा गोमंतकप्रांत इतर अनेक बाबतींत पूर्ण मागसलेला राहून सुरापानांत मात्र तेवढा आघाडी गांठण्यासाठीं तातडीनें पळत आहे असें दिसून येतें. सुशिक्षण संपादून उच्च दर्जा पावलेल्या ख्रिस्ती समाजाशीं स्पर्धा करतांना हिंदुलोकांना ती इतर बाबतींत साधली नसली तरी सुरापानाच्या बाबतींत मात्र पूर्णपणें साधली आहे असें ह्मणण्यास हरकत नाही. आतां यापुढें ह्या शर्यतीत ख्रिस्तीसमाज पुढें जाण्याची आशाच नको. मद्यपानांत हिंदुसमाजाची आणखी कांही वर्षे अशीच चिकाटी व नेट राहील तर त्या समाजाला मद्याचा एक थेंब देखील चाखण्यास मिळणार नाही. इतकी हिंदूंची तयारी चालली आहे. हे वस्तुस्थिति पाहिल्यावर कबूल केल्याशिवाय राहवत नाही. ही स्थिति किती अनिष्ट- किती भयंकर आहे? सुरापानाचें हें दिवसें दिवस बळावत चाललेले व्यसन पाहून विचारी अंत:करणाला केवढा ताप व खेद वाटतो! समाजहिताला सर्वस्वी विघातक किंबहुना नाहत ठरणारी ही सुरा समाजांत खुशाल वावरत असलेली पाहून कोणाची आंतडी तळमळल्याशिवाय राहील? जिच्यामुळें एकंदर सुखस्वास्थाचा भंग होतो, स्वत्वाची विस्मृति पडते, शिष्टत्वाची बेपर्वा

वाटते, ती 'दुर्गतीची माऊली' केवढ्याही भाग्यशाली समाजाची क्षणांत धूळधाण करून टाकील, मग, अनेक सामाजिक रोगांनी पोखरलेल्या, अनिष्ट रूढींनी करकचून गेलेल्या, परवशतेच्या चरकांत सांपडून पिळून निघालेल्या, नीचतर मनोवृत्तींनी नेभळेपणा आलेल्या व चोंहोबाजूनीं हताश झालेल्या अशा हिंदुसमाजाची या सुरेच्या प्रभावामुळें निमिषांत माती होऊन जाईल यांत नवल तें काय?

गोमंतकात या मद्याविषयीं एकवेळ इतकां तिरस्कार होता कीं, हिंदुजातींतील एका विशिष्ट मच्छमारक जातीशिवाय- आणि तीहीअल्पसंख्यांक होती- कोणीही हिच्या वाऱ्यास उभे राहत नसत. मद्यप्राधन करणें हें भयंकर पाप आहे, स्वधर्मापासून भ्रष्ट होणें आहे, अशी शुद्राचीदेखील समजूत होती, इतकेंच नव्हे तर अजून देखील या खालच्या वर्गांत कांही कांही ठिकाणी, मद्यप्राशन केल्यास देवाचा कोप होऊन हरेक कामकाजांत अपेश येत जातें, अशी भावना जागृत आहे! परंतु हळूहळू मद्यपानाचा जसजसा प्रसार होत आहे तसतसी ती भावना लुप्त होत जात आहे व मद्यपाननिषेधकांची संख्याही तशीच संपुष्टात येऊ लागली आहे.

सुरापानामुळे समाजांत किती अनर्थावह स्थिति ओढवली आहे पहा! या मद्यपानामुळें सर्व सद्गुणांचा ऱ्हास होऊन समाजचैतन्य लुप्तप्राय होऊन जातें हें मागे सांगितलेंच आहे, पण याहूनही भयंकर नुकसान ह्मणजे आमच्या या व्यसनामुळे इतर समाजापुढें आह्मी कवडीमोल ठरतों हें होय! ख्रिस्ती लोकांच्या आग्रहाला बळी पडून त्यांचे मित्र बनूं पाहणारे लोक प्रथमत: या पेयाचा आदर करूं लागले; पुढें 'महाजने येन गत: स पंथ:' या न्यायानें इतर वर्ग त्याचें अनुकरण करूं लागला; मग प्रत्येकाला ती सवय जडली जाऊन सध्या तर पाण्यासारखा त्याचा खप जारीनें चालला आहे व त्याचप्रमाणे लोकही तिचा उपयोग समजत आहेत!

इकडे आमच्या समाजाची ही अशी अधोगती; व तिकडे गुरू झालेल्या ख्रिस्ती समाजाचें, 'हिंदु हे दारूंत नुसते पोहत असतात' असें उलट प्रशंसापत्रक! आपण त्यांना गुरूदेश देऊन तरबेज करायचें व मग आपापसांत,

'हिंदुनां दारू रीतसर घ्यावयाला मुळीं येत नाही.' ह्मणून सोदाहरण हिणविण्याचें व्रत स्वीकारावयाचें ही सर्वश्रुत गोष्ट आहे! 'चोराच्या उलट्या बोंबा' या ह्मणीप्रमाणे हा खोडसाळपणा जरी असला, किंवा मद्यपानाच्या बाबतींत हिंदुनां ख्रिस्तीसमाजाचे जरी अनुकरण असलें तरी पण गुरूंवर शिष्यांची अशी कडी झालेली पाहून धार्मिक व विचारी अंत:करणास परम खेद व ताप उत्पन्न झाल्याशिवाय कसा राहिल? परक्याचे हिणविणें असो, परंतु स्वसमाजाची अशी बेताल स्थिति पाहून मन चिंतेने भाराक्रांत होतें, व अशानें लवकरच हा समाज– खरें ह्मणावयाचें ह्मणजे ही मोडकळीस आलेली किंबहुनां खिळखिळी झालेली समाजरूपी इमारत अधोगतीच्या गर्तेत पार गाडली जावयाला फार वेळ लागणार नाही, अशी धास्ती वाटूं लागते. समाजाच्या मानसिक व शारिरीक शक्तीचा ऱ्हास करणाऱ्या या व्यसनानें इतर राष्ट्रांत घातलेला थयथयाट व त्यांची केलेली दुर्दशा पाहिली ह्मणजे या पुढें अशक्त व सर्वस्वी अपरिचित अशा हिंदुसमाजीची कोण दाणादण होईल, याची कल्पना अंगावर कांटा उभा करीत आहे; मग वर्णन करणें तर दूरच! इतर राष्ट्रांत हिचे दुष्परिणाम आतां जाणवूं लागल्यामुळें हिचें समूळ उच्चाटन करण्याचा प्रयत्न पाश्चात्य राष्ट्रांत जिकडे तिकडे जारीनें चालला आहे. मात्र तसतशी इकडे आपले हात पाय पसरीत चालली आहे. नसलेल्या गावांत गुत्ता अस्तित्वांत आला, असलेल्यांत कितीतरी वाढ झाली, विक्री कितीतरी पटींनीं वाढली, तसेंच देशी दारूची कोण पैदास झाली, हें सर्व दुश्चिन्ह हिंदुसमाजाला पुढचा अघोर देखावा दाखविणारें नव्हे काय?

आतां प्रत्येक नियमाला अपवाद आहे; त्याप्रमाणें याही गोष्टींत तो आहे यांत शंका नाही. मद्याला न शिवणारे किंबहुना विषवत् मानणारें सच्छील हिंदु आहेत, नाही असें नाही. परंतु तो अपवाद काय कामाचा? बहुजनसमाज दु:स्थितींत बुचकळी खात असला तर त्या राष्ट्राचें तारण कसें होऊं शकेल?

*(बुधवार, दि. १३ ऑगस्ट १९१३)*

# ब्राह्मणांवर गहजब

हिंदुसमाजाचा नाश करण्याच्या इराद्याने आजवर ज्या ज्या हिंदुद्वेष्ट्यांनी हिंदुसमाजतरूच्या मूलावर भयंकर प्रहार केले त्या त्या वेळी आणि तशा आपत्प्रसंगांत हिंदुसमाजाची जोपासना करण्याचें काम एकट्या ब्राह्मणवर्गाने केलें, आणि आज विसाव्या शतकांत भारतवर्षांत जर हिंदुसमाज दिसत असला, तर तो केवळ ब्राह्मणवर्गाच्या आत्यंतिक परिश्रमानेंच होय; हें हिंदुद्वेष्ट्यांच्या चिथावणीनें भ्रंशितबुद्धि झालेल्या कांही लोकांनी कबूल करण्यास आढेवेढे घेतले, तरी नि:पक्षपाती इतिहासग्रंथ आपल्या सहस्त्रमुखांनी जगजाहीर करीतच आहे, व पुढेंही जगत्प्रलयापर्यंत करीत राहणार. ह्यांत संशय नाही. बुडावयास आलेल्या एका युरोपियन जहाजावरील नाखव्यानें आपला जीव धोक्यांत घालून गलबतावरील मनुष्यमात्राचें प्राण वाचविल्याची गोष्ट माजी क्रमिक पुस्तकांत वाचल्याचें वाचकांस आठवत असेलच, हिंदी राष्ट्रनौका सुरक्षित राखण्याच्या बाबतींत ब्राह्मणवर्गानें उपरोक्त नाखव्याहून प्रशंसनीय धारिष्ट व अनुपमेय स्वार्थत्याग दाखविला आहे, ही गोष्ट मूठभर लोकांनी नाकबूल केल्यानें लुप्त होते, असें थोडेंच आहे. गोमांतकांत काय किंवा महाराष्ट्रांत काय, ब्राह्मणवर्गाने आजवर केलेल्या कर्तबगारीचें सार एका वाक्यांत सांगावयाचें झालें, तर 'लढनेकू हम आणि खानेकू मेरा भाई' अशा सुभाषितविपर्यासांत चांगलें सांगतां येईल. अगदीं प्राचीनतर वैदिककालाकडे पाहिलें, किंवा पौराणिक मध्ययुगाचे वाङ्मय चाळलें, अथवा अर्वाचीन इतिहासग्रंथ उघडले, तरी आपणास असे स्पष्ट दिसून येईल की, ब्राह्मणेतर हिंदी जनतेच्या सुरक्षिततेसाठी ब्राह्मणवर्गानें स्वार्थावर तुळसीपत्र ठेवून, किंबहुना सर्वस्वावर तिलांजली देऊन प्रसंगप्राप्त आपत्तीशी टक्कर देण्यास केव्हांही माघार घेतलीं नाही. प्रथमत: परकीय सत्तेचा पराभव करण्यांत व ती अनिवार्य ठरल्यावर तिच्या प्रखर ज्वालांनी हिंदी जनता होरपळून जाऊं नये ह्मणून राजसेवारूपी मध्यस्थी करण्यांत ब्राह्मणवर्गानं आत्यंतिक हालओष्टा सोसल्या आहेत. आजकाल ग्रामकंटक ठरलेल्या कुळकर्ण्यांपासून थेट दिवाणगिरी पदावर आरूढ झालेल्या ब्राह्मणांनी हिंदी

जनतेचें कल्याण हेंच आपले ध्येय ठरविल्याचें इतिहासानें नमूद करून ठेविलें आहे. प्राचीन वाङ्यांत तर ब्राह्मणेतर वर्गाच्या कल्याणाकरीतां हालअपेष्टा सोसून तपोधनाची वृद्धि करीत राहणें एवढेंच ब्राह्मणांचें उद्दिष्ट असल्याचें स्पष्ट दिसून येतें. सारांश कोणत्याही कालाकडे नजर दिली तरी ब्राह्मणवर्गानें 'स्वसुख निरभिलाष: खिद्यसे लोक हेतो' हें आपलें ब्रीद सांभाळण्यांत कसूर केली, असे सहसा सप्रमाण सिद्ध करता येणार नाही.

शांततेच्या काळांत सुभेदारी गाजविणें धोक्याचे नसतें, ह्या ह्मणीप्रमाणें परकीय सत्तेनें क्षित स्थितींत ब्राह्मणवर्गाविरुद्ध केवढीही कारवाई चालू केली, तरी कान पिळणारा कोणी नाही, किंबहूना उलटी फूस देणारेच पुष्कळ भेटतील, हें खरे. पण सत्यवचन इतिहसाच्या दरबारांत असल्या परप्रत्ययनेयबुद्धिच्या माणसांची छी:थु: झाल्याखेरील कदापि राहणार नाही. स्वराज्य असो किंवा परराज्य असो, सत्ताधिकारी वर्गाच्या डोळ्यांत ब्राह्मणवर्ग सलत असतो. आणि त्याचें कारण उघडच आहे. मेंढरांची राखण करणारे कुत्रे लांडग्यांच्या कपाळांत शूळ उठवीत असतात, त्याच न्यायानें सामान्य जनतेच्या संरक्षणाविषयीं तप्तर असलेला ब्राह्मणवर्ग, ह्मणजे आजच्या भाषेंत सुशिक्षितसमाज, स्वेच्छाचारी अधिकाऱ्यांना नको असतो; पण तो नाहिसा करणें आटोक्याबाहरचे असल्यामुळें, निदानपक्षीं सामान्य जनतेच्या मनोभूमींतले ब्राह्मणवर्गाचें अधिष्ठान तरी साधल्यास कमी करावें, हाच हेतु मनांत धरून अधिकारीवर्ग थोड्याबहुत अप्रबुद्ध लोकांना पोटाशीं घेत असतो. आजकाल महाराष्ट्रांत विचारी माणसांच्या खेदास कारणीभूत झालेलें ब्रह्मद्वेषमय वाङ्मय उजेडांत येण्याचें निंद्यकर्म, अशाच अप्रबुद्ध लोकांकडून होत आहे. 'घरचें खाऊन शेटजींची नोकरी' ह्मणतात, त्याप्रमाणें काडीचाही लाभ होण्याचा संभव नसतां, केवळ पूर्वोक्त श्रीमंतांच्या दारींच्या बड्या भाईच्या पक्तींत पान मिळावें, अशा हेतूनें निष्कारण ब्रह्मद्वेषाचें जहर ओकणारेही कांही असतात. आपल्या प्रांतांतील ब्रह्मद्वेष्ट्यांचा समावेश ह्याच कोटींत होतो. पण अशा निराधार, किंवा श्रीमंताच्या आश्रयावर सांवरलेल्या, लोकांकडून वाजविण्यात येत असलेल्या तुणतुण्याच्या नादांत, ब्राह्मणवर्गाच्या सत्कीर्तिरूपी नगाऱ्याची गंभीर गर्जना लोपली जाईल, अशी कल्पना करणें, हा देखील मूर्खपणा ठरणार.

श्री शिवाजी महाराजांच्या दिव्य प्राणज्योतीसमागमें हिंदुपदपातशाहीचे पंचप्राण निघून जाण्याची तयारी करीत होते. त्याची एक शतकभर ज्यांनी जोपासना केली, त्या पेशव्यांविषयी वेळींअवेळी ओरड करण्यांत काय मतलब असावा, ह्याचा उलगडा आह्मांस होत नाही. हिंदूंची राज्यश्री पेशव्यांनी घालविली, असें ध्वनित करण्याचा इरादा असेल तर तसें सांगण्यास बेशरमपणे पुढें यावें. आडून कुजबुजण्यांत अर्थ नाही. तुटपुंज्या माहितीवर विसंबून ब्राह्मणांच्या नावांनें बोटें मोडण्याचें महत्कार्य जे कोणी आज करीत असतील, त्यांना हें माहीत असलेच पाहिजे की, पेशवाईची वस्त्रें देणें न देणें हें सातारकर महाराजांच्या इच्छेवर अवलंबून होतें. तशांत पुण्याचे ब्राह्मण महाराजांकडून तीं खेंचून आणीत असत, असें गृहीत धरलें तर तीं प्रधानकीची वस्त्रें होती. महाराजांचें सिंहासन नव्हते. अर्थात पेशव्यांच्या हलगर्जीपणामुळें ह्मणा किंवा नामर्दपणामुळें ह्मणा, हिंदूंची राज्यश्री गमावण्याच्या बेतास आली होती, तर ती राखून ठेवण्याचा अधिकार सातारकरांस नव्हता, असें नाही. मदतीने मग तो त्यांनी स्वत: किंवा कोल्हापूरकर महाराजांच्या मदतीने बजावण्यास कां कसर केली? खुद्द स्वत:चे सिंहासन कां राखतां आलें नाही. वास्तविक ह्मटलें तर चंद्रराव मोऱ्यांच्या रूपानें जो मराठी अप्पलपोटेपणा अर्वाचीन इतिहासांत ठळकपणें दिसला. ज्याच्या उजळणीचें घोंर प्रायश्चित पेशवे व हिंदुपदपातशाही ह्यांस पानपतास भोगावें लागलें, त्याच दुर्वासनांनी पेशवाईचा बळी पडला, हें इतिहासज्ञांस अज्ञात नाही; परंतु तें मुद्दाम द्वेषग्नि पेटविणाऱ्या विघ्नसंतोषी प्राण्यांस काय होय.

शुत्रुचें घाले व मराठे सरदारांचा कुढेपणा अशा कात्रींतून मराठेशाहीच्या बचाव करतां करतां ज्यांच्या नाकीं नव येत, किंबहूना प्राणोत्क्रमण प्रसंगी राम ह्मणण्यापुरती शांति मिळत नसे, त्या पेशव्यांनी व इतर ब्राह्मणवर्गानें मराठेशाहीचा ध्वज अटकेपर्यंत फिरवून महाराष्ट्रियांचे मुख उजळ केलें; एतद्देशियांच्या वैभवांची जीं थोडीं ठळक चिन्हें आज आहेत, त्यांतलीं बरींच पेशव्यांच्या सागरांत पैदा झालीं आहेत; खुद्द ब्रह्मद्वेषप्रसारक चोपडीं ज्या कारखान्यांतून तयार होऊन निघत आहेत, त्याच्या घुमटावर ब्राह्मणवर्गाच्या निस्वार्थताब्रीदाचा द्योतक अशा भगव्या रंगाचा झेंडा अद्याप

फडकत आहे इतकेंच नव्हे तर 'व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम्' ह्या वचनानुरोधानें एखाद्यानें 'महाराष्ट्रीयांचे वैभव हें केवळ ब्रह्मवर्गाचे उच्छिष्ट आहे.' असें ह्मटलें, तरी अतिशोक्ती केल्याचा दोष त्याच्या माथीं येईल, असें खात्रीनें ह्मणता यावयाचें नाही. तर अशा प्रकारे निस्वार्थबुद्धीनें लोकरक्षण केलेल्या ब्राह्मणवर्गाच्या डोक्यावर इतर वर्गाच्या नादानपणाचें खापर फोडण्याचें पाप आचरणें हा निवळ कृतघ्नपणा होय.

पण भूतकालांत महाराष्ट्रीय जनतेची राज्यश्री हारविल्याबद्दल निरपराधी ब्राह्मणवर्गास जबाबदार धरून, त्यांच्या नावानें हातपाय पिटण्यापेक्षां, हरतऱ्हेच्या सबबीवर जो प्रस्तुत द्रव्यशोष चालू आहे ती थांबविण्यांत आपली शक्ती ह्या मंडळीनें कां खर्च करूं नये, हें आह्मांस समजत नाही. भूतकालांत इतरांस मागें खेंचून ब्राह्मण पुढें सरले होते, तर आज हिंदू तितकें मागें खेंचले जात आहेत, ह्या शोचनीय प्रकाराबद्दल ह्या मंडळीच्या आंतड्यांत पीळ कां पडूं नये. वर्तमानकालांत हिंदुमात्रास जी अवनतदशा प्राप्त झाली आहे ती घालवून पौराणिक रामराज्याचें सुख देण्यास ह्या मंडळीस स्फुरण आलें असतें आणि तदनुसार त्यांचें प्रयत्न चालू झाले असते, तर देखील ब्राह्मणवर्गाची अवास्तविक निंदा ऐकण्यास कोणी सरसावलें नसतें. मग निवळ परप्रेरित, अतएव अनुकंपनीय स्थितींत ब्रह्मद्वेषाचा खलबत्ता कुटलेला पहाणें कोणास आवडेल, असें मानण्यास मन धजत नाही. बायकी तळतळाटनें समाजोन्नति झाली असती, तर मराठेचसे काय, पण अंत्यजसुद्धां ऐश्वर्य गिरीच्या शिखरावर अधिष्टित झालेले दिसले असते. पण तसा प्रकार संभवनीय नाही. उद्धार किंवा अध: पात हा ज्याच्या त्याच्या हातांत असतो, असेंच भगवंतानी ह्मटलें आहे. आणि ह्या सिद्धांतास अनुसरून ह्मणावयाचें तर ब्राह्मणेतर वर्गांची अवनति त्याच्या आंगच्या दुगुर्णांनी झाली आहे. कदाचित, ब्राह्मणवर्ग उन्नत स्थितींत होता. असें जें विधान करण्यांत येत असतें, तें खरें असेल, तर त्यांना जी अवनत दशा प्रस्तुत आली आहे, ती देखील ब्राह्मणेतर वर्गाच्या संसर्गदोषाचें फल तर नाहीं ना? असा एखाद्यास तर्क होणें कठीण नाही.

शिवाय सध्याच्या काळांत ह्मणजे परकीय भाग्यरवीच्या प्रखर किरणांनी ब्राह्मणेतरांबरोबर ब्राह्मणसुद्धां होरपळले जात आहेत, अशा स्थितींत,

गेल्या चार पांचशें वर्षांमागील कल्पनिक पिच्छेहाटीचा सूड वाक्यप्रलापांनी मिळवूं पाहणें, हा वेडेपणा नव्हे तर काय? कालदेशवर्तमानानुसार असो, किंवा पूर्वोक्त मंडळी आरोप करीते, त्याप्रमाणें ब्राह्मणवर्गाच्या प्रयत्नानें असो, हिंदुसमाजतरूच्या मूळास जातिमत्सराची कीड लागली आहे, ती कोणत्या उपायानीं मरेल, आणि भारततरू पौराणिक कालांतल्यासारखा पुष्पफल युक्त कोणत्या उपायांनी होईल, हीच विवंचना आज विचारी माणसांच्या मेंदूत काहूर उठवीत आहे. तर 'महाराष्ट्रीय तितुका मेळवावा' ह्या मंत्रांनी अभिषिक्त झालेल्या, परमपुज्य महाराष्ट्रीयांचा केवळ सहावा प्राण – अशा भगव्या झेंड्याच्या सावलीत ब्रह्मद्वेषाचे विषवृक्ष निपजत आहेत! आणि महाराष्ट्रपदपातशाहीच्या मंदिरांत ज्याने धुळीचे दिवे पेटविले तो अप्पलपोटेपणा अजूनदेखील महाराष्ट्रीयांच्या अंगात सरसरत आहे, अशी खूण जगास पटत आहे हें भारतवर्षाचे खडतर दुर्दैव होय! जवळजवळ एक शतक पारतंत्र्याच्या आग्निकुंडांत भाजून निघाले असतांही महाराष्ट्रीय जनपदाच्या अंगावरील दोष जर पूर्ववत कायम आहेत तर यापुढें महाराष्ट्राचें नाव इतिहासांत मेलेलें राष्ट्र ह्या सदराखालीच नोंदलें जाणार, हें निःसंशय आहे. 'गोब्राह्मण प्रतिपालनार्थ' ज्यांनी आपलें दिव्य रक्त सह्याद्रीच्या कड्याखिंडींत सिंचित केलें, त्या देवरूप पूर्वजांना, आपले वंशी ब्राह्मणनिर्दालन करण्यांत सज्ज झालेले पाहिल्यावर पराकाष्ठेची व्यथा होईल! आणि महत्प्रयासानें कपाळीं लावलेला राज्यश्रीचा सौभाग्यटिळक पुसून आतां ही महाराष्ट्रीय जनता गाऱ्हाणीं गात आपसांतील वैमनस्यें वाढवीत असलेली पाहून अत्यंत दुःख होईल! पण ह्या लोकीचें अवतारकृत्य संपवून दिव्य लोकांत नांदण्यास गेलेल्या पुण्यपुरुषांना, पारतंत्र्यनरकांत लोळणाऱ्या वंशजांच्या स्थितीबद्दल हळहळ वाटली, तथापि तींत सुधारणा करतां येणे अवश्य असल्यावरून जे जें होईल तें तें पहावे ह्याहून ज्यास्त काही करतां येणार नाही.

*(बुधवार, दि. २२ आक्टोबर १९१३)*

# नोटिस

आह्मीं खाली सही करणार, राजसत्ताक पद्धतीचे अभिमानी, तूर्त वास्तव्य कलकत्ता यांजकडून राजश्री नष्ट पोर्तुगीज लोकसत्ताक सरकार मु. इलाखा गोवा, यांस या नोटिशीच्याद्वारें कळविण्यांत येत आहे की, तुमच्या आमच्या सरकारांमध्यें ह्या देशांत आल्यावर जो पहिला करार झाला त्यांत एकमेकांनीं परस्परांस साह्य करावें, असें एक कलम आहे. तुमचे रिपब्लिकचे पाहिले अध्यक्ष ह्यानीं जुने करार पाळण्याचें अभिवचन जाहीररीत्या दिलें होतें, ह्या गोष्टीस युरोपियन देशांतील सरकारें साक्षी आहेत. अर्थात आमच्याकडून ह्या देशांतील जनतेच्या कल्याणाकरीतां जें जें कांही प्रस्तुत होत आहे, आणि पुढें होईल, त्यास तुमचें सहायच नव्हे, तर उघड उघड पाठबळ असणें जरूर होतें, हें तुह्मांला नाकबूल करतां येणार नाही परंतु अनेक बाबतींत आह्मास तुमचें साहाय मिळावें असें मिळत नाही. ह्या सगळ्या प्रकरणांचा आजच्या वादाशीं विशेष संबंध नसल्याकारणानें ती ह्या नोटिशींत उल्लेखिलीं जात नाहींत, प्रकृत नोटिशीस कारणीभूत झालेलें, दुर्वर्तनीं बायांच्या दुराचारास आळा घालण्याचें प्रकरण, ह्याकडे तर तुह्मांकडून साफ दुर्लक्ष्य झालें आहे. तुमचें राज्य लोकसत्ताक पद्धतीनें चाललें आहे. त्या पक्षीं लोकांत नीतीची वृद्धि होईल अशा उपायाचें अवलंबन आमच्या अगोदर तुमच्याकडून झालें पाहिजे होते. पण आजवर तुमच्याकडून ह्या बाबतींत काहींच हालचाल झाली नाही. आज दोन वर्षे ह्या दुराचार प्रतिबंधक उपायासंबंधानें वर्तमानपत्रांतून गवगवा चालू आहे, तरी तुमची शिथिलता पूर्ववत कायम आहे. लोकांची ओरड इतकी दु:श्राव्य झाली की, लोकांच्या सामाजिक चालीरीतींत हात न घालण्याचा आमचा पूर्ण निर्धार असतांही निरूपायानें ह्या बाबतींत आह्मास आपला निश्चय बाजूस ठेवून नीतिसंरक्षणकायदा बनविण्याची यातायात करावी लागली. आणि धार्मिक बाबतीत तटस्थवृत्तीने वागणें तुह्मास कधींच ठाऊक नसतांही तुह्मी ह्या शोचनीय बाबतींत अक्षय्य हलगर्जीपणा दाखविला. हिंदुधर्म हा भाकडकथांचे गबाळ आहे. त्यास उराशीं कवटाळून बसेल, तर हिंदुसमाज खास नरकास जाईल, अशा काल्पनिक भीतीनें हिंदुदेवालयांचा

विध्वंस करण्यांत पोर्तुगीझ लोकांनी आपलें प्रेम धर्मांध राष्ट्रांच्या अगोदर उच्चारले जाईल अशी तजवीज करून ठेविली. पण नरकपुरीच्या खऱ्याखुऱ्या वतनदार लोकांना मात्र समाजांत हैदोस घालण्याची बंदी करण्याची तजवीज केली नाही. दियोग रुद्रिगानें जमीनदोस्त केलेंली साष्टी प्रांतांतील देवालयें आज कायम असती, तरी राष्ट्राची जितकी दुर्दशा झाली नसती, त्याहून किती तरी अधिक अवनति पूर्वोक्त लोकांच्या दुराचारास आळा न घातल्यामुळें प्रस्तुत होत आहे. आणि तीही एकट्या हिंदुसमाजाचीच नव्हे, तर त्याजबरोबर इतर समाजांचीही होत आहे. पण ती तुमच्या नजरेस दिसत नाही. ही फार खेदाची गोष्ट होय.

तुमच्या राष्ट्राच्या पिनल कोडांत दुराचार प्रतिबंधक कलमें अशी आहेत. कलम ४०५ दुराचारी माणसाची इच्छा तृप्त व्हावी अशी इराद्यानें जो मनुष्य आपल्या संततीस जारकर्माचे प्रोत्साहन, सवलत किंवा सवड देईल, त्यांस एकपासून दोन वर्षेवरील कैद, परिस्थितीनुरूप दंड आणि बारा वर्षेपर्यंत नागरिकत्वाच्या हक्काची बंदी एवढी शिक्षा व्हावी.

६१- पूर्वोक्त गुन्हा आपल्या धर्मपत्नी संबंधाने एखाद्या नवऱ्याकडून होईल तर त्यास तीन महिन्यांपासून तीन वर्षेपर्यंत ज्यास्तीत ज्यास्त हद्दपारी; त्याला जितकी मिळकत होण्याचा संभव असेल तितका दंड आणि बारा वर्षेपर्यंत नागरिकत्वाच्या हक्कांची बंदी, एवढी शिक्षा व्हावी.

६२- एकवीस वर्षांच्या वयाखालील मुलांचे पालक, शिक्षक, व्यवस्थापक किंवा रक्षक हे आपल्या ताब्यांतील अज्ञान मुलांसंबंधाने वरील गुन्हा करितील, तर त्यांस सहा महिने पासून दोन वर्षेपर्यंत कैद, परिस्थितीनुरूप दंड व पालक किंवा कुंटुंबव्यवस्थापक होणें, अथवा कोणत्याही शिक्षण संस्थेचा शिक्षक, व्यवस्थापक किंवा व्यवस्थेत मदतनीस होणें ह्या कामांची बारा वर्षेपर्यंत बंदी, एवढी शिक्षा व्हावी.

क. ४०६-एकवीस वर्षाच्या वयाखालील अज्ञान मुलांची नैतिक हानी किंवा जारकर्माकडे प्रवृत्ति होऊन दुराचारी माणसाची इच्छातृप्ती व्हावी एतदर्थ कोणतीही व्यक्ती प्रोत्साहन, मदत किंवा सवड देईल, मग ती कितीही शिताफीने दिलेली असो, तर तिला तीन महिन्यांपासून एक वर्षेपर्यंत कैद,

परिस्थितीनुरूप दंड व नागरिकत्वाच्या हक्कांची पांच वर्षेपर्यंत बंदी एवढी शिक्षा व्हावी.

ह्या नियमांची अमलबजावणी तुमच्या राज्यांत होत नाही. ह्मणून आमच्या अमलदारांची दहशत घेतलेल्या दुराचारी दाया तुमच्या मुलखांत जाऊन शेजविधी-अज्ञान मुलींस जारकर्माची दिशा देण्याचा संस्कार-उरकून घेतात विधि व संस्कार हे शास्त्रीय शब्द मानले आहेत. त्या पक्षीं त्यास धर्मशास्त्राची अनुज्ञा असली पाहिजे, निदान आह्मास तसा संदेह आहे, अशी समजूत करून घेण्याचें कारण नाही. गेल्या दोन वर्षांमागें दुराचार प्रतिबंधक कायदा करा, असें हिंदी समाजधुरीणांनी आमच्या मागें टुमणें लावलें त्या प्रसंगी प्रस्तुत विषयासंबंधानें हिंदुधर्माशास्त्राचें खरें मत काय आहे. हें मोठमोठ्या पंडितांशी आह्मी समजून घेतले. आणि संतोषाची गोष्ट ही कीं, दुराचारी मंडळीस पाठीशीं घालण्यास हिंदुधर्म साफ नाकबूल आहे असें आह्मास कळून आले. समाजास व्याधिग्रस्त, अनीतिमान क्षयी बनविणाऱ्या दुराचारी मंडळीच्या वर्तनाचें समर्थन करण्यांत कोणत्याही सुधारलेल्या धर्मास लाजच वाटली पाहिजे. आणि तशीच किंवा इतर धर्मांहून कांकणभर ज्यास्त आर्यधर्मास वाटत आहे, हे ऐकून हिंदुस्थानांत नांदणाऱ्या व्यक्तीस समाधानच वाटलें पाहिजे. सारांश दुराचारी मंडळी ज्याच्या तोंडावरून धर्माचा बुरखा ओढतो तो शेजेचा प्रकार सर्वथैव धर्मबाह्य होय, ह्यांत तिलमात्र संशय नाही. आणि ह्मणूनच त्याचा नायनाट करण्याचें काम आमचं गव्हर्नर जनरल इन कौन्सिल ह्यांनी अंगिकारिलें आहे.

तुमच्या देखरेखीखाली असलेली हिंदू देवालयें ही वरील लोकांची आश्रयस्थानें होत, हें सर्वश्रुत आहे. समाजाची धर्मबुद्धि जागृत ठेवण्याच्या इराद्यानें स्थापन झालेल्या ह्या धर्मसंस्था प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनें दुराचारनिरत लोकांना आधारभूत व्हाव्या ही फार खेदाची गोष्ट होय. परंतु ही गोष्ट तुह्मा आह्मांस आश्चर्यचकित करण्यास समर्थ नाही. हिंदुसमाजाची दानत गरीब झाल्यामुळेंच तें आज पतित होऊन आमच्या लगामांत सांपडलें आहेत. आणि त्यांचा उद्धार करण्याची जबाबदारी आमच्या शिरावर आली आहे. हें कर्तव्य अत्यंत प्रामाणिकपणे बजावून आह्मी ईश्वरीकृपेला स्वतः ला

पात्र करून घेतलें पाहिजे. परंतु तुमची समजूत अशीच आहे असें मानण्यास पुरावा नाही. अज्ञान मुलींना जारकर्माची दीक्षा देण्याचा प्रकार जो शेजविधी, तो उरकतेवेळी प्रत्येक देवालयानें अमुक मदत करावी, अशी वहिवाट तुमच्या देखरेखीखालील देवालयांत अद्यापपावेतों चालली आहे. देवालयांच्या कागदपत्रांची तपासणी तुमचे अमलदार दरसाल करीतच असतात, तरी त्यांना तें दिसत नाही. किंवा त्यांच्या उशाजवळ मोठ्या थाटानें साजरे होणारे ते संस्कारांचे उत्सव त्यांना ऐकू येत नाहीत; तुमच्या कायदे कौन्सिलांतील एकाही मेंबराला ह्या रानटी प्रकारास आळा घालतां येईल असें उपाय सरकारास सुचविण्याची बुद्धि होत नाही; तुमच्या राज्यांतील समाजधुरीण तर उघडउघड ह्या प्रकाराची तरफदारी करणारे आहेत; अज्ञान मुलींना शेजविधीद्वारें जारकर्माची दीक्षा देणाऱ्या पालकांना शिक्षा देण्याचा नवा प्रघात दोन तीन वर्षोपासून आह्मी पाडला आहे, ही गोष्ट तुह्मास जागृत करण्यास असमर्थ झाली. अशा स्थितींत नोटीस दिल्याशिवाय गत्यंतर नाही, असें दिसून आल्यामुळेंच ह्या उपायांचे अवलंबन केले आहे.

मोगलाईंत ठग लोकांना प्रजाजनांस लुटण्याची परवानगी देऊन तत्कालिन राजेलोक आपली गंगाजळी ठगांकडून घेतलेल्या खंडणींनें भरून काढीत असत, असा लोकापवाद आहे. प्रजा सुखांत सांभाळणें, हेंच ज्यांचें कर्तव्य ते प्रजाजनांचे माबाप ह्मणविणार राजे आपल्या प्रजेस ठगांकडून लुटवीत होते, ही गोष्ट सकृद्दर्शनीं असंभवनीय वाटते. धर्मनिष्ठ हिंदी राष्ट्रांत असा अधर्म खरोखर चालत होता काय? अशी शंका उत्पन्न होई. परंतु तुमच्या राज्यांत महाजन व वेश्या ह्यांचा जो संबंध चालू आहे, तो ऐकिल्यावर ठगराजांच्या गोष्टींत काडीचीही अतिशयोक्ती नाही, अशी आमची पुरेपुर खात्री झाली. पवित्र धर्मस्थानांचे संस्थापक जे धर्मनिष्ठ महाजन ते दुराचारी वेश्यांनी लोकांस लुबाडून आणलेल्या संपत्तीचा वाटा स्वीकारून आपल्या धर्मसंस्था भूषविण्यास शरमत नाहींत! हा प्रकार जर ह्या सुधारलेल्या विसाव्या शतकांत, ह्मणजे प्राचीन हिंदुराष्ट्राची उज्ज्वलता युरोप, अमेरिका इत्यादी दूरदूरच्या सुधारलेल्या राष्ट्रांस दिपवीत आहे, अशा कालांत, चालला आहे, तर यवनांच्या अत्याचारांनी मलिन झालेल्या हिंदुसमाजांत, ठग+राजांचा

व्यवहार बिनदिक्कत चालला असला पाहिजे. असो तुमच्या अमलांतील हिंदुसमाजांत ज्या लोकांचे वर्चस्व, त्यांचे भाईबंद डॉ. भांडारकर, दि. ब. चंदावरकर, असल्या थोर व्यक्ती पूर्वोक्त दुराचारी लोकांनी माजविलेल्या बखेड्याचा किती तिरस्कार करितात, त्यांच्या दुर्वर्तनास आळा पडून ते सदाचारी व्हावे एतदर्थ केवढी खटपट करितात, त्यांच्या संपत्तीस किती तुच्छ लेखितात, ह्याचा कांहीच परिणाम त्यांच्या गोमांतकस्थ भाईबदांच्या मनावर होऊं नये; संपादिलेल्या द्रव्याचा हविर्भाग घेऊन पवित्र धर्मस्थानांच्या सुकीर्तीस काळिमा आणावा, ही फार दुःखाची गोष्ट होय, ते कसेही असो. ज्या पक्षीं वरील दुराचारी लोक तुमच्या आश्रयास राहून आमच्या अमलांतील जनतेस नागवितात, भयंकर गुन्हे घडवून आणितात. दुराचारनिरत बनवून नरकाचे वतनदान करितात, त्यावरून बेळगाव जिल्ह्याचे पोलिस सबइन्स्पेक्टर ह्यांचे हस्तें ही नोटीस तुह्मास लागू करण्यांत येत आहे. ती लागू झाल्यापासून दोन महिन्यांचे आंत तुह्मी भानावर येऊन पूर्वोक्त पिनल कोडांतील कलमें कडकपणे अमलांत आणण्याची तजवीज करावी. न पेक्षां आह्मास वर्तमानपत्राद्वारें इलाज करावा लागेल. मग तुह्मास अब्रुनुकसानीचा खटला उभारण्याचा हक्क राहणार नाही, ह्या नोटिशीचा खर्च तुह्मावर आहे. कळावें.

सही – जान बूल दस्तुर खुद्द

*(बुधवार, दि. १२ नोव्हेंबर १९१३.)*

# जाहीर खबर

## एक लाख रुपयांची गोष्ट

चालू सालीं भारतानें अग्रलेखांत नोटिशी, जाहिराती वगैरे देण्याचा परिपाठ घातला आहे. तदनुसार ही 'भगवत्‌दर्शनीं आंगठ्यांची' जाहिरात आज अग्रलेखांत दिलेली असेल, असें समजून खऱ्या वाचकांनी ती न

वाचतां इतर मजकूर वाचण्याकडे आपली दृष्टि वळवूं नये (कारण खरे वाचक वर्तमानपत्रांतील जाहिराती वाचण्याकडे फुकट वेळ घालवित नसतात.) अशी आह्मी आमच्या प्रेमळ वाचकांस आग्रहाची विनंति करतों. खरोखरच आह्मी आमच्या वाचकांस एक लाख रुपयांचीच गोष्ट सांगत आहों.

*''जो करना सो आज कर,*
*आज कल सब साथ।।*
*कल कल क्या करत हैं,*
*कल कालके हाथ।।''*

तुलसीदासासारख्या सत्कवीच्या तोंडची वरील उक्ती एक लाख रुपयांची नाही असे कोण ह्मणेल! बाबारे? जें कांही तुला करावयाचे असेल, तें आमच्या आज करून टांक कांकी, आजकाल तुला सर्व कांही साधण्याजोगें आहे. तूं मनात आणशील तर करीन ह्मटलेली गोष्ट करून जाण्यास तुला साधनानुकूलता आहे. अर्थात्, अमुक करीन, असें जे तुझ्या मनांत येतें, ते तुझ्या शक्तीच्या आटोक्यांत असतें. तें करून जाणें शक्य असतें, तर अशा वेळीं 'कल करेंगे', उद्यां करूं, उद्यां करूं, असें ह्मणून दिवसगतीवर कां घालतोस? बाबा! कालचा (उद्यांचा) दिवस तुझ्या हातांत नाही. तो कालाच्या हातांत आहे. तर साध्य असेल ती गोष्ट आजची आज करून टाक, असा हा वरील दोह्याचा अभिप्राय आहे.

अहाहा! किती अर्थपूर्ण हा उपदेश आहे. अतर्क्य अशा कालाच्या गतींत उद्यांच्या दिवशीं काय परिवर्तन होईल याचा नेम कोणी सांगावा! हजारो लोकांस कालपरिवर्तनाचे हजारो दाखले आजपावेतों आलेले असतील. आज लक्षपति असलेला माणूस उद्या भिक्षापति झाल्याचीं उदाहरणें काय थोडी आहेंत! बलरामयुधिष्ठिरासारख्यांची स्थिति सार्वभौमपदवीवरून भणंग भिकाऱ्यासारख्या स्थितींत, अरण्यवासांत कंदमूलांवर दिवस कंठण्यापर्यंत आलेली आपण पुराणग्रंथातून वाचतो. 'सोहंव्रजामि विपिने गृहिणीसहाय:' अशा सारखे उद्‌गार उदयिक युवराज्याभिषेकासाठी तयारींत असणाऱ्या ईश्वरांश ह्मटलेल्या रामाला देखील काढावे लागले आहेत. आमच्या महाराष्ट्र-सत्वकवींच्या देखील अभंग वाणींतील 'कोण वेळ येईल कैसा!

नाही कालाचा भरवंसा' इ. प्रकारचे उद्‌गार माणसाला हेंच सुचवितात की, 'बाबारे! करावयाचें असेल तें आजचे आज कर. उद्यावर टांकूं नको.' आमचे पुरातन ऋषि देखील आपणाला हाच बोध करतात. किंबहुना, याहूनही त्यांची इतकी घाई चाललेली आहे की, 'श्वः कार्यमद्य कुर्वात् पूर्वान्हे चापरान्हिकम्!' ह्मणजे उद्यांचे कार्य आज करून टाकावें, व सायंकाळच्या वेळांत करावयाचें काम सकाळच्या वेळात उरकून टाकावें. सरैय्यासारख्यांच्या आकास्मिक मरणाची डोळ्यांसमोर असलेली गोष्ट आमच्या वाचकांस जास्त ठासून बोध देणारी आहे. यूरोपियन व्यापाऱ्यांस देखील आपल्या कर्तबगारीनें थक्क करून टांकणाऱ्या ह्या हिंदी नेपोलियनचे धाडस, धोरण, कर्तृत्व एका क्षणांत, डाक्तरांस पाच दहा मिनिटांचा देखील अवकाश न देतां कालाच्या विशाल उदरांत गडप झालेलें लक्ष्यांत घेतलें, ह्मणजे 'उद्यां करू' ह्मटलेल्या गोष्टी आमच्या हातून होतीलच असा कोणी नियम सांगावा?

अंगी सामर्थ्य असलेल्या थोर माणसांच्या तोंडून एकदा महत्त्वाचा शब्द निघावा, ह्मणजे सामान्य मनुष्यांना त्या त्यांच्या शब्दाविषयी जी आदरबुद्धि वाटते ती तें सामर्थ्य त्यांच्यात असल्यामुळेंच होय. नाही तर सामान्य लोकांत– हलक्या दर्ज्यांच्या लोकांत–प्रसंगविशेषींच असें नव्हे, तर सहजासहजीं काय थोडी वाक्यें बाहरे पडतात! पण त्यांची लोकांस मातबरी वाटत नाही. 'बत्तिशी रंगवीन' दांत घशांत उतरीन इ. प्रकारचे आवांक्याबाहेरचे शब्द हलके मनुष्य थोड्याशा कारणावरून दुसऱ्याला भिवविण्यासाठी उच्चारतात. पण त्यांच्या त्या शब्दाची किंमत दुसऱ्या माणसाला ठाऊक असते. त्यामुळें त्याच्या त्या बोलण्यापासून आपल्यावर भीतीचा ईषन्मात्र देखील परिणाम झाला नाही. हें दुसरा मनुष्य तेथल्यातेथें दाखवितो. मोठ्यामाणसांच्या शब्दांस ही गोष्ट लागू नाही. त्यांचें बोलणें खरें करून दाखविण्याची त्यांच्या अंगी शक्ती असते. आणि ह्मणूनच लोक त्यांच्या बोलण्यास किंमत आहे असें मानतात. एका कवीनें थोरांच्या उक्तीस हत्तीच्या उपमा दिलेली आहे. हत्तीचे दांत एकदां बाहेर निघालें, ह्मणजे ते आंत जाऊं शकत नाहींत. थोरांच्या उक्ती तशा असतात. हजारो लोकांसमक्ष, परिषदेचा मंडप हुर्रेच्या गजरानें व 'वीवा' च्या घोषानें निनादित करून टांकणारी लाख रुपयांची गोष्ट थोरा मोठ्या

अब्रुदार माणसाच्या तोंडातून निघालेली ती गोरगरीब लोकांच्या शिक्षणाची, विद्येच्या कामांत मागसलेल्या गोव्यांतील एका प्रांतापुरती तरी काळजी कमी करील, असें सर्वांसच वाटलें होते, पण तिचा परिणाम जाहिरातीनें प्रसिद्ध होणाऱ्या शाळेंत झालेला पाहून, आज आह्मी जाहीर खबरीच्या द्वारें आमच्या वाचकांपुढे साधुपुरूषांच्या उक्तीने लाख रुपयांची गोष्ट ठेवलेली आहे. तिचें चीज होईल अशी आशा करणें अस्थानी नाही.

आमच्या वाचकांतून प्रत्येकाने आपल्या हातून सर्वथैव न होणारी गोष्ट निदान तोंडानें तरी उच्चारू नये. आणि होण्यासारखी असलेली कोणतीही गोष्ट आजची उद्यांवर टाकू नये, इतका बोध घेतल्यास आमच्या 'लाख रुपयांच्या गोष्टी'चा योग्य उपयोग झाला असें आह्मी मानू. परमेश्वर सर्वांस तशी सुबुद्धि देवो, इतकें ह्मणून पुरें करूं.

*(बुधवार, दि. १७ डिसेंबर १९१३)*

# सामाजिक सुधारणा

वसंतऋतु आला ह्मणजे शिशिरत्रऋतूंतील अमृततुल्य वन्हि विषमय वाटू लागतो; भगवान सहस्त्ररश्मीचे आनंदकारक किरण तीक्ष्ण भासतात; वर्षाऋतूंतील किळसवाण्या पर्जन्याचे जलबिंदु सीतोपचारार्थ सुवासिक बनतात व महातापदायी झंझावात खरा गंधवाहक होतो; अतएव एकाकाळी सुखकर दिसलेल्या वस्तूंचा परिणाम कालांतराने असह्य वाटतो. हीच स्थिति सर्वस्थळीं व सर्वकाळी पृथ्वीवरील सगळ्या समाजास लागू होत असल्यामुळें, झुकणाऱ्या दुनियेप्रमाणे वागावयाचें सोडून देऊन जे समाज एकाच तत्त्वावर अथवा चालीरूढीवर अवलंबून राहिले, त्यांची स्थिति तिरस्करणीय व कींव करण्याजोगी झाल्यास कांही नवल नाही. आमच्या हिंदुस्थान देशास वस्तुस्थितीवरून सूवर्णभूमी हें यथार्थ नांव पूर्वी पडलें खरें परंतु त्यांतील रहिवाशांच्या अंगीं ते सुवर्ण राखून ठेवण्याची स्थलकालमानापरत्वे पाहिजे असलेली कर्तबगारी नसल्यामुळें तें 'सुवर्ण' जाऊन तिथें 'कुवर्ण'

राहिल्यास परिस्थित्यनुरूप योग्य प्रकार घडला असें ह्मटल्यास वावगे होणार नाही. हिंदुलोकांनी आपल्या पूर्वजांनी मिळवून ठेविलेल्या संपत्तीवर यथेच्छ फुशारकी मारून डामडौल मिरविण्यांत कसूर केलें नाही, नानातऱ्हेच्या आहारविहारांच्या गुंगीमुळें रंगेल बनून त्यांनी आनंदी आनंद केला; पण चालीरूढीच्या नौकेंतून योग्य दिशेकडे समाजपुरूषास पोंहचण्याकरीतां उपयोगी पडणारें सावधगिरीचें होकायंत्र जवळ नसल्यावरूनही नौका दुर्भेद्य अशा अंधपरंपरारूपी खडकावर आपटून तिचे बारीक बारीक तुकडे झाले. या विस्कळीत कणाचें एकीकरण करून त्यांतून आत्मस्थितींशी कितीकांचे पटेल व कितीकांस अग्राह्य ह्मणून सोडून द्यावयास पाहिजे याचा सारासार विचार न करीतां सर्व कणाची एक माला बनवून ती आपण गळ्यांत घालू लागतो; परंतु त्याचा परिणाम असा झाला कीं या भ्रममूलक माळेत गुंतून गेल्यामुळे आह्मीं खऱ्या तत्त्वास विसरून गेलों व आमच्या समाजांत सगळाच सावळागोंधळ माजून राहिला. यामुळे एकाकाळीं अन्यजनांस आमच्या वैभवांपुढे दिपविण्यांकरीता प्रचारांत आणिलेल्या कांहीचालीरीतींवर आह्मी धर्मांचे जड अवघड पांघरूण घालण्यास कमी केलें नाही.

पारतंत्र्याचें बिकट जूं आमच्या खांद्यावर पडल्यापासून व त्याच्या भारानें आह्मी अधिकाधिक वांकले जाऊन भुईसपाट होण्याचा प्रसंग आल्यामुळें आमच्या समाजांतील एकंदर चालीरीतींत योग्य फेरफार करून आमच्या दैन्यास आह्मींच सावरून धरिलें पाहिजे; कारण उलटपक्षी आह्मी अवहेलना केल्यास त्याची कटुतर फळें चाखण्याचे नशिबीं येऊन आमच्या सुखांत माती कालविण्यास आह्मीच कारण झालों व त्यामुळें आमच्या जन्माचें मातेरें होणार, असें खास समजावें. वरील विधानाच्या समर्थनार्थ आह्मीं आमच्या समाजांत प्रचलित असलेला लग्नामुंजीच्या समारंभातील बेसुमार खर्चच घेऊ. ही खर्चाची पद्धत सामान्य लोक मोठेपणाचें किंवा श्रीमंतीचे द्योतक असे समजात; परंतु वास्तविक पाहू गेल्यास हें उसने अवसान अंगी आणण्यास पुष्कळदां या बडे बापके बेट्यांनी आपणास थेट आजन्म न सोडविणारा ससेमिरा पाठीमागें लावून घेतला आहे हें त्यांस काय ठाऊक? स्पष्ट सांगावयाचें असल्यास ससेमिरा ह्मणजे तो समारंभरूपी सण साजरा

करण्याकरीतां धनकोपासून घेतलेले ऋण हे होय. 'अधिकस्याधिक फलं' या ह्मणीप्रमाणें जितकें कर्ज जास्त तितक्याच प्रमाणाने त्या शृंखलेचें बंधन दृढ व त्याची जर ठरविलेल्या मुदतींत फेड झाली नसली तर तें एक संहारक शस्त्रच बनलें ह्मणून समजावयाचें.

यावरून असें सिद्ध होते कीं एकाकाळी सुखकर वाटणाऱ्या चालीरिती सध्यासारख्या आपत्प्रसंगी दु:सह भासतात; आमच्या या लग्नामुंजींच्या समारंभांत धर्माच्या नांवांखाली घुसडून दिलेली अशी कांही खर्ची कलमें आहेत की, तीं झुगारून दिल्यास धर्मतत्त्वांस कांही बाध न येतां, त्यांपासून खर्चाचें मान थोडेंबहुत कमी होऊन त्यापासून जरा शांति मिळावयाची; परंतु दुर्दैवाची गोष्ट ही की, या आमच्या ह्मणण्याकडे समाजानें दुर्लक्ष करून अजूनपर्यंतत अंधपरंपरागत अनिष्ट चालींवर आपली पूर्ण भिस्त ठेविली आहे. या समारंभात बहुत कालपासून आंगवळणी पडलेली अनीतिप्रसारक विश्वयोषितांच्या नाचगाण्यांची चाल अजून बंद झाली नाही, समाजादर्श ह्मणून नावाजणाऱ्या पुढाऱ्यांनीसुद्धां याकडे कानाडोळा केला आहे; यापरती खेदजनक दुसरी गोष्ट कोणती आहे! ही मुसलमानीं बादशाही अमदानींतील चाल कर्मणुकीखातर ह्मणून जरी आमच्या समाजांत घुसली गेली तरी तीजपासून समाजाच्या नैतिक वर्तनांत पुष्कळ नुकसानी होते.याचा कोणी विचार करीत नाही. या चालीचा पुरा नायनाट झाल्यास आमच्या नैतिक व सांपत्तिक स्थितीच्या सुधारणेस अशंत: तरी सहाय झालें असें ह्मटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

ह्मणून या सर्व मुद्यांचा लक्षपूर्वक विचार करून आमच्या समाजानें अजून तरी सावध झाले पाहिजे. चर्वितचर्वणांचा जरी आह्मांवर दोष झाला तरी पत्करला; पण वेळोवेळ आमच्या समाजाच्या कामी आह्मांस योग्य वाटतील त्या सूचनांची ओरड केल्या शिवाय आह्मी राहणार नाही.

*(बुधवार, दि. २३ जून १९१५)*

# हा कोण व्यामोह?

समाजसुधारणा आधी करा, कारण समाजसुधारणा हा राजकीय सुधारेचा पाया आहे अशा अर्थाची सकारण ओरड हिंदुस्थानांतील कांही आजतागायत मोठ्या कंठरवाने करीत आले आहेत व त्याचा परिणाम शुभकारक झाल्याशिवाय कधींही रहाणार नाही अशी पूर्ण विचारान्ती आमची खात्री झाली आहे. समाजसुधारणेसबंधीच्या ह्या पायाशुद्ध ओरडीचा उद्देश आजपर्यंत फलप्रदच झाला आहे आणि पुढें ही तो होत राहणार याबद्दल शंका घेण्याचें मुळींच कारण नाही. गोवाप्रान्त हा राजकीयदृष्ट्या ब्रिटिश हिंदुस्थानापासून अलग असल्यामुळें ब्रिटिश हिंदुस्थानांतील नानाविध सामाजिक चळवळी पासूनही तो अलग असल्यास त्यांत आश्चर्य नाही. तेव्हा समाजसुधारणेशिवाय कोणत्याही देशाचा तरणोपाय नाही हे जर खरें आहे आणि ह्या गोष्टीचें महत्त्व जाणून एतद्विविषयक चळवळ जर आपणहून भिन्न अशा राजकीय अमलातील आपल्या देशबंधूंनी राष्ट्रोद्धारार्थ सुरू केली आहे, तर गोमांतकाच्या उद्धाराकरीता देखील आमच्या लोकांनी याच अध्यायाचें अवलंबन करणें जरूर आहे. आणि या गोष्टींचे महत्त्व ओळखून येथें देखील कांही समाजहितचिंतकांनी ह्या चळवळीची प्रचारणा करण्याचा थोड्या बहुत प्रमाणावर प्रयत्न केलेला मधून मधून दृष्टोत्पत्तीस येतो. आता इतकें खरें कीं ब्रिटिश हिंदुस्थानातील चळवळीचे विषय बहुविध आहेत. एक तर असें की, परिस्थितीभिन्नत्वामुळें व निरनिराळ्या सामाजिक चालीरीतींमुळें एखाद्या देशाची सुधारणाविषयक व्याप्ती निरनिराळ्या प्रमाणावर असू शकते, शिवाय सामाजिक सुधारक ज्या मानानें अधिक त्या मानानें त्या देशांतील सुधारणात्मक विषय ज्यास्त असा वास्तविक प्रकार असतो. गोमांतकांत सामाजिक चळवळ विशेष स्वरूपांत आढळून येत नाही, किंबहुना या विषयीची हालचाल येथें नाव घेण्यासारख्या रंगरूपास आलेली नाही असें ह्मटलें असतां चालेल. नाही ह्मटल्यास येथील देवालयांमधील अनाचार व गैरव्यवस्था पुष्कळ ठिकाणीं ऐकूं येतात. इतकेंच नव्हें, तर गेल्या दहाबारा वर्षांतील गोमांतकांत प्रसिद्ध झालेलें या विषयावरील वाङ्मय एकत्र गोळा

गेले असतां गोमांतकस्थांच्या शीलास अत्यंत लांच्छानास्पद असलेला सदरील देवालयांच्या भोवती होणारा हा अनाचार आमच्या पुढील वंशजांच्या व आमच्याही हिताच्या दृष्टीनें किती घातक आहे याची बरीच स्पष्ट कल्पना आपणास नि:शंकपणे करीतां येईल. वरील वाङ्मयाचें बारकाईनें परिशीलन केलें असतां आपणास असें आढळून येईल की, कित्येक लेखकांनी देवालयांच्या शेजारी वसतीस्थान करून राहिलेल्या व प्रसंगविशेषी खुद्द देवालयांत आपले कसब करून दाखविणाऱ्या वेश्यांवर यथामती तोंडसुख घेतलें आहे, तर दुसऱ्या कित्येकांनी 'व्रणार्त पशुच्या शिरावरि उभे काकसें.' असं ह्मणून त्यांना व्रणार्त पशूंची उपमा दिली आहे. कांहींनी 'वेश्याचाच गोमांतकांतून नायनाट झाल्यास ही एक मोठी कामगिरी होईल ह्मणून टाहों फोडला आहे, तर कांहीना वेश्या ह्या आमच्या शरीरास झोंबून रक्तशोषण करणाऱ्या जळवा होत, ह्मणून आक्रोश सूरू केला आहे. 'स्त्रीशिक्षणास योग्य मुली, ह्मणून एक ओरड करितो तर दुसरा या योग्य मुलींना, विद्यालयांत पाठऊन सदरहू लेखकांच्या या ओरडीला 'यथाशास्त्री' पाठबळ देतो. असे एक ना दोन, शेंकडों प्रकार दृष्टीस पडतात. परंतु एका गोष्टींचे आह्मांस नेहमी मोठे आश्चर्य वाटतें तें हें की, वेश्यांवर हे तडाखे उडविणाऱ्या कलम बहाद्दरांनी स्वत: विषयी कांही विचार करायला नको काय? बहुजनसमाज हा अज्ञानी आहे, त्यांच्या परिस्थितीचा विचार केला असतां त्यांच्या कोणत्याही कार्याबद्दल त्यांना दोष देणे कधींही रास्त नाही. कारण अज्ञान या सर्वांच्या मुळाशीं आहे. त्यांना शिक्षण देऊन आपल्या हीन स्थितीचा विचार करण्यास शिकवा' असे लेख तुह्मींच खरडतां व शक्तीनुसार योग्यायोग्य दृष्टीने प्रयत्न सुरू करितां आणि इतकेंही असून ज्याच्या देहविक्रीचा व अज्ञानाचा फायदा घेऊन आजपर्यंत तुह्मी आपल्या तारुण्याचा सद्व्यय (!) करून पुढील पिढीस योग्य उदाहरण घालून देऊन त्यांचें पुढारी ह्मणून नाचायाला आरंभ केलात व करीत आहां, त्यावरच कृतघ्नपणे वाग्बाण सोडण्यांस कसे तयार होता? होय. आह्मीही कबूल करीतों कीं वेश्या ह्या फार वाईट आहेत. त्यांच्या शिक्षणाकरीतां दुसरें एक कॉलेज उर्फ विद्यालय सुरू केलें पाहिजे. परंतु वेश्या या पुरुषांना बोलवण्यास जातात काय? कीं पुरुषच आपल्या दुष्ट

विषयवासनेची तृप्ती करण्याकरीतां त्यांच्याकडे जातात? आणि वेश्यांना बिघडविण्याऱ्या पुरुषावरच जर वरील दोष शाबीत आहे, तर शिक्षण देण्यास स्त्रीशिक्षणास योग्य मुलीच तुह्माला कां सुचतात? हा अव्यापारेषु व्यापार सुरू करण्यापेक्षां सुप्रसिद्ध लेखक दत्तोपंत बोरकर यांनी ह्मटल्याप्रमाणें ज्यांच्या हितसंबंधाची तुह्मांस विशेष चिंता आहे त्या 'पिढीजाद नांगऱ्यांना' शक्य असेल तर फुकट शिक्षण देण्याची कबूली देऊन विद्यालयांनी पाठविल्यास त्यांत काय नुकसान होणार आहे? ज्यांनी त्यांनी उठावें तें बिचाऱ्या वेश्यांवर शस्त्र उचलावें हा प्रकार वास्तविकपणें पहातां अनिष्ट आहे, अशांतली काही गोष्ट नाहीं. उलट आह्मी प्रथमत:च ह्मटल्याप्रमाणें समाजसुधारणातर्गंत ही एक प्रमुख बाब असल्यामुळे त्याच्याविरुद्ध होईल तितकी ओरड करणें इष्टच होईल. परंतु एखाद्या रोग्याला क्षयाची भावना झाली असता ज्याप्रमाणे डॉक्टर त्या भावनेच्या मुळाशीं एकदम धावतो व तदनुसार त्याला औषधोपचार सुरू करीतो, त्याचप्रमाणें वेश्यांना बिघडविणाऱ्या जंतूना भस्मसात करून टाकण्याचा अलीकडील सुशिक्षित लोकांनी एकसारखा प्रयत्न सुरू केला पाहिजे. परंतु खेदाची गोष्ट ही कीं हे सुशिक्षित लोक एक समयावच्छेदकरून दोन्ही पार्ट घेण्यास मोठ्या हौसेने तयार होतात आणि एक व्यवहारांत आणून व दुसरा सिद्धान्तरूपच ठेऊन परस्परविरोधी कृति आचरण्यांत मोठी मौज मानतात. लोकहित दृष्टीनें पाहू गेल्यास हा प्रकार अत्यंत आत्मघातकी होय व याची जाणीव जरी आज आह्मांला झाली नाहीं तरी ती थोड्या कालावधीनें होईल. 'चोराच्या उलट्या बोंबा' ह्या ह्मणीप्रमाणें सुशिक्षित लोक-किंवा सुशिक्षित जंतु असें ह्मटल्यास वावगे होणार नाही, मोठ्या प्रौढीने एखादे कृत्यकरून त्या कृत्याविरूद्धच बोंबाबोंब करण्यास प्रवृत्त होतात. त्यांचा हा धंदा तिरस्करणीय होय. वेश्यांच्या शरीराची प्रसंग विशेषी वित्ताची, त्यांच्या नैतिक शीलाची व शरीराची हानि करण्यांस स्वत: कारण होऊन त्यांच्यावर केवळ समाजांत 'नांगऱ्यांच्या' पुढारीपणाचा टेंभा मिटविण्याकरीतां उलटून पडावें हा कोण व्यामोह?

*(बुधवार, दि. २९ सप्टेंबर १९१५)*

# परीक्षेची वेळ आहे!

भारतीय तरुणहो! तुह्मी भरतभूमीचे आधारस्तंभ आहात. तुमच्यावरच तिची सर्व मदार आहे. तुह्मींच तिच्यावर भाग्यरवीचा उजेड पाडावा. तुह्मींच तिला दु:खार्णवांत लोळावयाची. एकंदरींत तुह्मींच तिचे तारक किंवा मारक. आजपर्यंत तिच्या पुत्रांकडून हजारो दोष झाले आहेत. वेळकाळ न पाहातां, दुराग्रहानें, अहंमन्यतेने, अंधश्रद्धनें मूर्खपणानें घातक रूढीनांच चिकटून राहून, आह्मी अनेक अक्षम्य अपराध केलेले आहेत. ह्या दारूण अपराधांचे दोष मार्जन जरी कष्ट साध्य असलें, तरी हताश न होतां समाजास हितावह असा मार्ग धरून अशा रीतीनें एकदां झालेली चूक भरून काढली पाहिजे. प्रयत्न करा–ईश्वर फळ देईलच.

केवळ अज्ञानी अशा बहुजन समाजाच्या वायफळ टीकेस बळी न पडता, निंदेस न भितां, मानसिक धैर्याचा अवलंब करून, स्वसुखावर पाणी सोडून पवित्र व शुद्ध अंत:करणाने प्रगतिपथाचे आक्रमण करा. व आपल्या ध्येयाकडे लक्ष देऊन, आपल्या अंगिकृत कार्यासाठी आत्मापर्ण करण्याची तयारी असूं द्या. जिकडे तिकडे आळसोबांचे साम्राज्य चाललेलें दिसत आहे. पूर्वजांच्या पराक्रमाची, दूरवर विचारांची, उदात्त ध्येयाची पवित्र आचारणाची आह्मांस विस्मृति पडत चालली आहे. व जूने ह्मणून भलत्यालाच आह्मीं कवटाळून बसलों आहोंत. ज्याला त्याला आपल्या पलीकडे कांही दिसत नाही. स्वार्थामध्यें पार मुरून गलों आहोंत. स्वत:च्या किंचित् फायद्या करतां दुसऱ्याचा सर्व नाश करण्यास आपणास दिक्कत वाटेनाशीं झाली आहे. आपलपोटेपणा सर्वत्र बोकाळला आहे. केवळ आपल्या कुटुंबाच्या पोटापाण्याची कशाही रीतीनें–व्यवस्था झाली ह्मणजे जन्मास आल्याची इतिकर्तव्यता संपली, असा घातक सार्वत्रिक समज होऊन बसला आहे. तात्पर्य समाजाच्या बुद्धीचा ओघ भलत्याच दिशेने वाहत असून त्यास अजून तरी योग्य वळण दिलें पाहिजें. व तें देणें न देणें सर्वस्वी तुमच्याच हातांत आहे. जुन्या लोकांवर रूढींचे संस्कार इतकें अढळ झाले आहेत की, ते बदलणें जवळ जवळ अशक्यच झालें आहे. अशा वेळीं आपण जर ह्या

समाजाच्या ओघाबरोबरच, त्यास प्रतिबंध न करीतां, वाहवूं लागले तर याचा परिणाम समाजाची अधोगति, हाच होणार व त्या आमच्या शूर, वीर पराक्रमी, प्राचीन पूर्वजांचें वंशज असें ह्मणून घेण्यास खात्रीनें लाज वाटेल-वाटत आहे. ह्यांत शंका नाही.

आजपर्यंत तुह्मी अनेक परीक्षा दिल्या असतील, परंतु आतां जी तुह्मांस द्यावी लागणार ती अत्यंत महत्त्वाची होय. पूर्वीच्या परीक्षांत तह्मांस तुमच्या पुस्तकीज्ञानांचे माप परीक्षकांच्या पदरांत घालावें लागत असे. आतां येणारा प्रसंग त्याहून अगदी भिन्न आहे. तुमच्या उच्च शीलाची, मानसिक धैर्याची, तुमच्या मनावर जगाच्या अनुभवापासून झालेल्या सुसंस्काराची, शहाणपणाची, दूरवर विचारांची, एकंदरीत सद्गुण समुच्चयाची कसोटी लागणार आहे. ह्याच परीक्षेकरीता हरिश्चंद्रराजानें सर्व राज्य गमावलें. इतकेंच नाही तर स्वत:स, राणी तारामतीस व कुमार रोहिदासास विकलें. कोण पवित्र परीक्षा ही! ह्याच परीक्षेंत जो पास झाला त्यानें ब्रह्मांड जिंकले, जन्मसाफल्य केलें! कांहीतरी घोकंपटी करून, पुस्तकीज्ञानाच्या परीक्षा दिलेले यांच्या पासंगासही लागतील काय?

मार्गशीर्ष महिना आला. यावेळी अनेक उपवर मुलींचे आईबाप रात्रीच्या रात्री घोर चिंतेत काढीत असतील. मुलींच्या रवानगी करीतां सामर्थ्याबाहेरच्या हुंड्याच्या रकमेची पूर्तता कशी करावी, लग्नामध्ये होणाऱ्या डोईजड निरर्थक खर्चाची सांगता कशी व्हावी, केवळ रहातें घर सोडून, बाकीच्या जमीन जुमल्यावर कोणी सावकार पुरेंसें पैसें देईल काय? सावकाराच्या पदरांत सर्वस्व घालून नंतर आपला कुटुंब भार कसा वहावा? संसार शकट कसा चालवावा? असे एक ना दोन हजार विचार एकामागून एक डोळ्यांपुढे दत्त ह्मणून उभे रहातात व हजार वृश्चिकांचा दंश झाल्याप्रमाणें त्यास यातना होत असतात. मुलीला जन्म देणें ह्मणजे भयंकर पातक करणेंच की काय? असेंच असलें पाहिजे. नाही तर ह्या घोरतर यमयातना कशा त्यास सोसाव्या लागल्या. इकडे ह्या बिचाऱ्याची अशी स्थिती! तिकडे वरपक्षाकडील कोण चंगळ विचारायची! कलावंतीचे ताटे किती आणावे, किती तऱ्हेची पक्वानें करावी, किती रुपयांचे दारूकाम आणावें, थोड्या शब्दांत हुंड्याच्या

रकमेंची कशी उधळ वाट लावावी? ह्या विचारांत चूर!! इतकें जरी असलें तरी आतांचा वधुपिता आपल्या मुलाच्या लग्नाच्या वेळीं मात्र राक्षसरूप धारण करतो व मुलीच्या लग्नाच्या वेळचा सूड मुलाच्या विवाहाच्या वेळीं उगविल्या शिवाय राहत नाही! अशा वेळी तुकाराम बोवांच्या-

*धिक् तो दुर्जन नाहीं भूतदया ।*
*व्यर्थ तया माय प्रसवली ।।१।।*
*कठीण ह्रदय तया चांडाळाचे ।*
*जो नेणें पराचें दुःख काहीं ।।२।।*
*आपुला हा प्राण तैसे सकळ लोक ।*
*न करी विवेक पशु जैसा ।।३।।*
*तुका ह्मणे सुखें कापितसे गळे ।*
*आपुलिया वेळे रडतसे ।।४।।*

ह्या अभंगाची आठवण होते.

हुंड्याचें महात्म्य केवढें तें पहा. हुंड्याची रक्कम मोठी असली ह्मणजे मुलगी थोटी असली तरी चिंता नाही. हुंड्याच्या नोटांची लोळी पाहिली ह्मणजे मुलगी पांगळी, काळी, खुळी किंवा कशीही असेना, बाप आपल्या मुलांच्या गळ्यांत तिला अडकवून त्यास जन्माचा दुःखी करण्यास मुळींच कचरत नाही. सर्व काय तो मानमान्यता पांढरेपणा, लठ्ठत्व हुंडोबाचें! धन्य हुंड्या तुझी! तूं व्यंगाला अव्यंग करतोस, खुळीला भोळी नाव देऊन शहाण्याच्या माळेंत बसवितोस, कापडाच्या पोतेऱ्यांत बसून वराचें जन्माचें मातेरें करतोस. स्वतःतुंद होऊन वरपित्याचें डोळे धुंद तूंच करतोस, तात्पर्य सर्व ढवळाढवळ तुझीच!

शास्त्रांत जे विवाहाचे, ब्राह्म, देव, आर्य, प्रजापत्य, आसूर, गांधर्व, राक्षस किंवा पेशाश्च असे प्रकार सांगितले आहेत, त्यापैकी सध्या आमच्यांत रुढ असलेल्यास ब्राह्म अशा नावानें संबोधित असतात. ज्या विवाहविधीत राग नाही, लोभ नाही, मोह नाही, स्वार्थ नाही, दया, क्षमा शांति ह्यांचे माहेर घर, स्मृतींनी पाहिल्या प्रतीचा ह्मणून वाखाणलेला, असा ब्राह्म विवाह

कोणीकडे व सध्या रूढ असलेला क्षुद्र विवाह कोणीकडे? हुंड्याविषयी करारमदार, अटीतटी, तंटेभांडणे, शिव्यागाळी, रुसणें फुगणें, क्रोध, मोह, स्वार्थ, अहंकार इत्यादीची ज्या विवाहांत रेलचेल त्यास ब्राह्म ही सज्ञा देणें ह्मणजे धर्मशास्त्राचा उपमर्द करणें इतकेंच नव्हे तर सावित्री नावांच्या स्त्रीनें देह विक्रयाचें दुकान थाटण्यासारखे नव्हे काय?

विवाह हें प्रेमाचें बंधन आहे. परस्परांसंबंधी थोडी तरी माहिती असल्याशिवाय, त्यांची विवाहास संमती घेतल्याशिवाय त्यांचा विवाह करून देणें अत्यंत गैर व परिणामी घातुक आहे. मुलानें वधूस पहावयाची नाहीच. परंतु वरपितासुद्दां ती मोडकी की आंधळी त्याकडे लक्ष देत नसतो. केवळ वाटाघात हुंड्याची! याची मनासारखी व्यवस्था लागली की सर्व ठीक.

मुलामुलींच्या वयांत तर कोणीही पंचाईत करतो का?

कुणीही नाही. हुंड्याची सांगता झाली की मुलगी सहा वर्षांची असेना, किंवा मुलगा आठ वर्षांचा असेना, त्याचा विवाह यांनी घडवून आणलाच?

तरुण हो! देवी स्नेहलतेनें आपल्या आत्मत्यागाच्या वेळीं अन्त: करण विदारणारा आपल्या बहिणीच्या दु:खविषयीं, समाजांतील ह्या अनिष्ट चाली संबंधी पत्र रुपाने जो अखिल भारतांतील तरुणास संदेश पाठविला होता त्याची विस्मृति तुह्मांस पडली कीं काय? जर पडली असेल तर तुमच्या सारखे निर्दय, पाषाणहृदयी तुह्मीच.

तुह्माला ह्या अनिष्ट चाली समाजातून जाव्या असें खात्रीनें वाटत असेल परंतु बाबांनो, प्रयत्ने साध्यान्तिं न मनोरथै: प्रयत्न केला पाहिजे व अशा वेळी पितृभक्तीच्या बाबतींत रामाचें अनुकरण न करीता प्रल्हादाचेंच चरित्र डोळ्यापुढें ठेवून निंदा, त्रास, उपहास, हाल सहन करणें भाग आहे.

आज विवाहामधील अनिष्ट चालीवर सडकून तोंड सुख घेणारे तरुण नाहीत असे नाही परंतु ते 'नवसें चुहा खा के, बिल्ली चली हाज को.' (नवसें उंदरांचा फन्ना उडवून मांजरबाई यात्रेस निघाल्या आहेत.) ह्या बिहारांतील ह्मणी प्रमाणें चापून हुंडा घेऊन दारुकामाच्या धडधडाटात व वेश्यांच्या मधूर

(हाय!) आवाजात आपला लग्न सोहळा किंवा मानवी देहाचे धिंडवडे उरकून घेतलेलेच असतात. असो.

भारतीय कुमारांनो! कर्तव्य स्मरा. बिकट परिस्थितीकडे लक्ष द्या. व खालील पांच नियमाप्रमाणे तरी आपला विवाह करून ह्या पवित्र परीक्षेंत पास व्हा व शेकडा शंभर मार्क मिळवा.

१. मुलांचे वीस वर्षापूर्वी व मुलींचे चौदा वर्षापूर्वी कधी ही विवाह होऊं देऊं नयेत.

२. आपल्या स्वत:च्या पायावर उभें राहतां आल्याशिवाय व मुली संबंधी योग्य ती माहिती असल्याशिवाय लग्नाच्या भानगडींत पडूं नये.

३. हुंडा मुळींच न घेतां मुलीचा बाप मुलीला सालंकृत करून देईल तेवढ्यावरच संतुष्ट रहावें.

४. विवाहा समयीं वेश्यांच्या नाचांस, एकदम फांटा देऊन दारुकाम मुळींच जाळूं नये.

५. विवाह विधि केवळ एकाच दिवसांत आटपून तो शक्य तेवढ्या कमी खर्चांत करावा.

अशा तऱ्हेनें वागण्यास आपपराच्या, दोषास पात्र व्हावें लागणा हें आह्मांस माहीत आहे. परंतु समाजास सुस्थितीत आणण्याकडे लक्ष देऊन ह्या सर्व यातना निमुटपणें भोगल्या पाहिजेत.

*(बुधवार, दि. १ डिसेंबर १९१५)*

## आमचे डोळे उघडणार तरी कधी?

शिक्षणांत, पूर्ण मागासलेला आमचा गोमांतक भयंकर, फारच भयंकर दुर्व्यसनांच्या वातावरणांत सांपडल्यामुळे, त्यांतील हिंदी समाजाची दिशाभूल होऊन तो भलतीकडेच वाहत चालला आहे. परंतु त्याला त्या

स्थितींतून काढून प्रगतिमार्गाकडे वळविण्याची खटपट समाजाचे हितचिंतक व सरकार करीत नसून त्याकडे बहुतेक दुर्लक्षच करीत असतात, हें आश्चर्य नव्हे काय? कालचक्राच्या भयंकर फेऱ्यांत सापडलेला समाज, 'दारू' व 'जुगार' या दोन व्यसनांमुळें लवकरच नामशेष होईल की काय, अशी भीति वाटते. हतभागी हिंदी समाजा! तुझ्या देवाच्या दुर्विलासामुळेंच वरील व्यसनें तुझ्यांत परकोष्टेची बोकाळून, तुला हतवीर्य, नीतिभ्रष्ट व आळशी बनवून सोडले आहे. बाकी अशा स्थितीत तूं कांही काळ राहिल्यास तुझी भयंकर अवस्था होणार हें खास!

अरेरे, वरील व्यसनांनी कोण ही हृदयद्रावक स्थिति आमच्या हिंदी समाजाची करून सोडिली आहे! गोमांतकांतील प्रिय हिंदीसमाजा! तुझी होत असलेली करुणाजनक स्थिति पाहून कोणाचें हृदय दबून जाणार नाही! परंतु तुझे विनाशकालचे दिवस अजून संपले नसल्यामुळें आमच्या सरकारचे लक्ष तुझ्याकडे जात नाही, त्याला काय उपाय!

राजक्रांति यशस्वी होऊन लोकसत्तात्मक राजपद्धतीच्या नवयुगास प्रारंभ झाल्यास आज पांचाधिक वर्षे झाली, इतक्या अवकाशांत सरकानें वरील व्यसनांस आळा घातलेला एकिवांत नाही. सरकाने मनात आणलें असतें, तर वरील व्यसनांची गोमांतकांतून केव्हांच उचलबांगडी झाली असती. परंतु हिंदीसमाजाचें नष्टचर्य अजून संपले नसल्यामुळें, दुर्व्यसनांची इतिश्री करणे असोच, निदान वाढत्या प्रमाणास प्रतिबंध करण्याचें सुद्धां सरकानें मनावर घेतलें नाही.

युरोपखंड ह्मणजे बहुतेक थंडीचे माहेर घरच होय. अशा ठिकाणी मद्यासारख्या गरम पदार्थाची आवश्यकता आहे. परंतु तिकडील बहुतेक समाज पुढारी व सरकार, दारूचे भयंकर दुष्परिणाम लक्षांत आणून लोकांस दारुपासून परावृत्त करण्याची खटपट करीत आहेत. रशियानें एकलक्ष उत्पन्नांवर पाणी सोडले, स्कॉटलंडातील समाजाने मद्यपान निषेधाची चळवळ चालविली आहे. व कानडातील स्त्रीसमाजानें मद्याची हकालपट्टी आपल्या देशांतून लवकर करावी ह्मणून सरकारकडे अर्ज पाठविला आहे. काय हें त्याचें स्वदेशावरील उत्कृष्ट प्रेम! गोमंतकीय देशबंधूंनो! तुह्मास समसितोष्ण हवा मिळत असतां

प्रंपचाची, देशाची व जीवीताची सर्वस्व हानी करणारें हें दुष्ट व्यसन तुह्मी कां जवळ बाळगितां? धर्मानेही दारुचा निषेधच केला असता, वरील व्यसनाविषयी विचार करण्याचें सोडून खुशाल झोप घेत आहांत, याला ह्मणावें तरी काय?

स्वसमाजाविषयी आदर व अभिमान बाळगण्याचे सुशिक्षण गोमांतकांतील जनसमूहाला अजून प्राप्त झालें नाही. असे वाटतें, कारण असें नसतें तर, समाजहिताचा कांही तरी मार्ग त्यानी शोधून काढिला असता. (नाही ह्मणावयास सांप्रत कोणे समाजचळवळीस सुरवात झाली आहे, परंतु तिचें क्षेत्र विस्तृत नसल्यामुळें त्याचा फायदा सर्वांना मिळत नाही) ते एकीकडेसच राहून कित्येक सुशिक्षित सुद्धां वरील व्यसनास बळी पडतात. प्रथम परदेशीचेच निस्सीम भक्त बनतात. आणि पैशाची टंचाई पडल्यावर स्वदेशभक्तीनें प्रेरीत होऊन स्वदेशीचाही अंगीकर करण्यास मागें पुढें पाहत नाहीत. अशाप्रकारची अद्विितीय व जीवीतास अपाय करणारी कृष्ण-कृत्यें करण्यांत आमच्या सुशिक्षितांचा (सर्वच सुशिक्षीतांविषयीं आमचें ह्मणणें नाही) बहुतेक वेळ खर्च होत असल्यामुळें, समाजाच्या उन्नतीकडे त्यांचे लक्ष गेलें नाही तर त्यांना दोष देणें योग्य होणार नाही. पूर्वी अस्पृश्य वर्ग (तोही शेंकडा पाच अशा प्रमाणानें) दारु पीत होता. परंतु आतां स्पृश्य वर्गही या अक्काबाईवर इतकें काही निस्सीम प्रेम करीत आहे की धर्माच्या नीतिमत्तेवर दिवसाढवळ्या घाला घालण्यास त्यांना कांहीच वाटत नाही.

आमच्या समाजाचा क्षय करणारें दुसरें व्यसन 'जुगार,' हे आहे. थोड्या भांडवलांत पुष्कळ पैसा मिळविण्याची लालूच दाखवून अंती प्रपंचाची धुळधांड उडविणारे यासारखें दुसरें व्यसन नाही. त्यानेही आपला पगडा गोमांतकावर बसिवला असून आपलें साम्राज्य विस्तृत करण्याच्या त्याच्या खटपटीत बरेंच यश प्राप्त झालें आहे. या व्यसनांचे पायी गोमांतकाची झालेली हानि भरुन येणें कठीण झालें आहे. असें असतां आमचे डोळे उघडणार तरी कधी?

आतां आमच्या समाजास दुर्व्यसनापासून पराङ्मुख करण्याची खटपट केल्यास ती साध्य होण्यास कठीण पडणार नाही व ती करण्यास समाज पुढाऱ्यांनी  कंबर बांधून तयारही झालें पाहिजे. पाश्चात्य लोकांसारखी

सुधारणाप्रीती दाखवून प्रगति मार्गाचे झपाझप आक्रमण करणें तूर्तच्या परिस्थितींत जरी कठीण असलें (तसाच प्रयत्न झाल्यास फारसें कठीण नाही.) तरी कर्तव्यजागृति बाळगून आत्मोद्धार करण्याच्या प्रयत्नास जरूर लागलें पाहिजे. प्रत्येक गोष्टीचा पूर्ण विचार करून आपल्या मनोभूमींत स्वदेशमूभीचें बीज पेरुन तूर्तच्या बिकट वातावरणांत आपल्या विचारनौकेस इष्टगती देण्याचे शहाणपण गोमांतकानें दाखविलें पाहिजे!

*(बुधवार, दि. १५ डिसेंबर १९१५)*

# आमचें कर्तव्य

जगांत असणाऱ्या एकंदर प्राणिमात्रांचा नियंता जो परमेश्वर तो जसा ठेविल तसें राहणें प्राणिमात्राला योग्य आहे. मनुष्य प्राण्याची बुद्धिमत्ता आज जिकडे तिकडे प्रख्यातीस आली आहे. व तिच्यापासून आजकाल जगांत मोठमोठे अद्‌भूत चमत्कार घडत आहेत. हें एक मानवीप्राण्याचें मोठें भाग्य आहे. हें भाग्य आह्मां मानवीप्राण्यास ज्या परमेश्वरानें दिलें आहे त्याचें आह्मी सर्वतोपरी ऋणी आहोत हें विसरतां कामा नये. प्रपंचात घडणाऱ्या नेहमीच्या गोष्टी जशा आपण अगदीं बेतवार करण्याविषयीं सावधगिरी राखतों त्याच प्रमाणें नित्य ईश्वरोपासना करण्याविषयीही आह्मी आमच्या मनांत दृढनिश्चय बाणला पाहिजे. 'सहा साठीं बारा मासी' एक वेळ देवाला हात जोडून उगी बसणारे ईश्वरभक्त होऊन गेले. आजच्या परिस्थितींत जरी ते आह्मांस पाहण्यास मिळाले नाहीत, तरी त्यांचा सुलौकिक आह्मांस त्यांच्या विषयी पूर्ण साक्ष देत आहे. ज्या अवाढव्य सृष्टींत आपण वास्तव्य केले, उत्तम प्रकारें प्रपंच केला, आणि अहंपणाचा त्याग करून संपत्तीचा सद्व्य केला, तसें आह्मी करावें, अशा हेतूने त्यांनी आपली कीर्ति मोठमोठ्या ग्रंथांत लिहून ती आमच्या ऐकण्यांत यावी असें केले आहे. जर आह्मी ती वाचून व ऐकून त्या प्रमाणें खरें सार्थक केलें नाहीं तर आह्मी ती वाचल्याचा व ऐकण्याचा उपयोग काय? शिवाय ज्या विभूतींनी जगाच्या कल्याणासाठी धडधोपट काढून जे

महान ग्रंथ तयार करून ठेविले आहेत, ते आह्मी उकीड्यावर रत्नाला तुच्छ मानणाऱ्या कोंबड्याप्रमाणे मानावें काय? आमची व कोंबड्यांची बरोबर समसमान झाल्यास आमच्यांत मनुष्यत्व कोणते राहील?

आमच्या प्रिय बंधूंनो, रागावू नका, या बद्दल विचार करणें हें आमचे कर्तव्य आहे. कोणताही कामधंदा करण्याचे मनुष्याच्या एक वेळ मनात आलें की मग तो धंदा करण्याविषयी त्याच्याकडून अहोरात्र एकसारखे श्रम चालत असतात. ज्याला थोडेंसे लिहिणें वाचणें येतें त्याला आपल्या धंद्याविषयीं अनेक पुस्तके वाचून आपला धंदा ऊर्जितावस्थेला आणतां येतो. परंतु ज्याला लिहितां वाचतां मुळीच येत नाही, त्याला मात्र वाचणाऱ्याच्या तोंडाकडे व लिहिणाऱ्याच्या हाताकडे पहात रहावें लागते. आपल्या गोमांतक प्रांतात जसे देवभक्त लोक दिवसेंदिवस कमी होत चाललें आहेत, तसें अशिक्षित व गावंढळ लोकही पावलो पावली आपले ठाणें करून बसले आहेत. गोवाप्रांतांत गावोंगावी मराठी शिक्षणाच्या शाळा हल्लीं बऱ्याच सुरू झाल्या आहेत. गोव्यांतील साधारण प्रतींच्या लोकांस तर शिक्षणाचें महत्त्व अजून मुळीच माहीत नाही. असें ह्मणण्यास देखील कोणतीच हरकत होणार नाही. आपल्या पोराटोंरांस अगदी झाडून शिक्षण देणारे ते ब्रिटिश इंडियेतील खालच्या प्रतीचेच लोक पहाना? आपण आपल्या पोटाची देखील दामटी वळवून मुलांच्या शिक्षणाविषयी पैका खर्च करण्यास ते मागें पुढें पहात नाहीत. आपल्या इकडील लोकांची स्थिति तर ह्याच्या उलटच आहे. मुलांना शिक्षण देण्याची आर्त येथील मुलांच्या पालकांत कितपत आहें हें तर मागें सांगितलेंच आहे. बरे, तशांत कोणी तरी समजून उमजून आपल्या मुलांस शाळेत पाठविलेंचच, तर मुलांच्या शिक्षणाची अवघी दोन चार आणे फी देण्यास शिक्षकाला ठायठाय करून सोडतात. व याबद्दल कधीं कधीं शिक्षकां बरोबर तंटे बखेडे करून आपल्या मुलांस शाळेंतून बळेंच काढतात. व पेढीवर किंवा अन्य ठिकाणी त्यांना ठेवून त्यांचे आयुष्य निरर्थक जाऊं देतात. अरेरे! नवनवस करून मागितलेल्या आपल्याच मुलांच्या खऱ्या हितास आचवल्याचा दोष ही माणसें कसा बरें आपल्या पदरीं घेत आहेत? आपल्या सोन्यासारख्या आयुष्याचा बिघाड करण्यास जी वडील माणसें कारण होतात त्यांच्या विषयीं

दगड फोडीत बसणें किती तरी मुलांच्या नशिबी येत आहे! तरी पण अजून ह्या विषयीचा विचार आपल्या पोक्त वडील माणसांच्या सूक्ष्म डोक्यात कसा बरें येऊं नये? ज्यांनी आपल्या वडील माणसांच्या पायाचे तीर्थादक प्राशन केले, व त्यांना देववत मानिलें त्याच वडील माणसांनी अपयशाचें खापर आपल्याच मुलाच्या अमौलिक नरदेहावर फोडावें काय? 'गोंयबाबु' हा किताब अशाच वेड्या वाकड्या कारणांनी आह्मी गोवेकरांच्या वाडवडिलांनी मिळविला ना? हा किताब हल्लींच्या प्रजासत्ताक झालेल्या गोव्यांत अजूनपर्यंत राहू देणे आह्माला लाजीरवाणे नव्हे काय? आता आह्मी आमच्या मुलांची वडील माणसें झाले आहो, तर आतांपासून आमचें वर्तन फार चांगल्या प्रकारें ठेवून आमच्या मुलांचे हीत उत्तम प्रकारें करण्याविषयी आमच्या कडून होईल तितके प्रयत्न करूं व आमच्या अंगांत असलेल्या पोक्तपणास साजेल अशी कामें करू. आमच्या मुलांविषयी तसेंच परक्याच्या मुलांविषयी मुळीच भेदाभेद न ठवितां त्यांचें जेणें करून कल्याण हाईल असें करणें, आपला देश आज इतर परकीय देशांपेक्षा खालावलेला कां आहे याची कारणें शोधून पाहणें, आपल्या देशांत उच्च शिक्षणाचा व अनेक कलाकौशल्यांचा प्रसार करणें आपल्या देशाची भरभराट व्हावी अशी मनापासून आस्था धरणे, व आह्मी सर्वांनी एकदिलाने व नेटानें प्रयत्न करून आमच्या देशाची उन्नति व्हावी अशी परमेश्वराकडे मागणी करणें, हें आमचे व आमच्या सुज्ञ देशबंधूंचे कर्तव्य आहे. याकडे आमचे सुज्ञ देशबंधू नजर देतील अशी आशा करतों.

*(बुधवार, दि. २२ डिसेंबर १९१५)*

# हिंदु व ख्रिस्ती

अगदी नसण्यापेक्षां कांही तरी असणें चांगले अशा अर्थाच्या पोर्तुगीज ह्मणीतील भावार्था प्रमाणें, आमची हिंदुसमाजाची तूर्तची स्थिति होऊन, अगोदरच्याहून थोडी चळवळ सुरु असल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें ह्मणजे हिंदुंची ऊर्जितावस्था अगदीं नजिक येत चालल्याचें पाहून खऱ्या

हिंदु अंत:करणास आनंदांचें भरते आल्याशिवाय राहाणार नाही; पण ही क्षुल्लक गोष्ट ह्मणजे हिंदूंची उदयोन्मुख प्रगति पाहून आजपर्यंत गोव्यांत प्रत्येक बाबतींत मी मी ह्मणणाऱ्या कांही ख्रिस्ती लोकांस आमच्या विषयीं चुरस वाढूं लागली आहे. ती त्यांची मनांतच न राहतां वाणींत किंवा लेखनांत आल्याशिवाय राहत नाहीं. त्यांस असें वाटत असावें की राजकीय प्रांगणांत ख्रिस्ती लोकांबरोबर कुस्ती देण्यास सरसावलेला हिंदुसमाज कधीं काळीं त्यांस चित केल्याशिवाय राहणार नाही. ही नाण्याची एक बाजू असली तरी दुसरी बाजू कांहीशी समाधानकारक आहे. ह्मणजे इतर कांही उदारमतवादी ख्रिस्ती बंधूंस हिंदूंची राजकारणात सहकारिता आवश्यक वाटून त्यांच्या उत्कर्षाबद्दल कौतुक करण्याचा प्रसंग ते दवडीत नाहींत, परंतु अशा वेळी आह्मी असें विसरतां कामा नये की, ख्रिस्ती बांधवांशी खऱ्या सहकरितेनें वागण्यासाठी त्यांजवळ आमचें समानशीलतेंचें नातें असून तें दृढ झालें पाहिजे. सुभाषितात 'समान शीले व्यसनेषु सख्यम्' असे ह्मटल्याप्रमाणे जर आह्मांस ख्रिस्ती समाजाशीं सख्य ठेविले पाहिजे- व तें ठेवणेंही आवश्यक आहे तर समान शीलतेवरून होय; व ही समान शीलता ह्मटली ह्मणजे शिक्षणातील बरोबरी होय, असें कोणांसही वाटेलच. असल्या समानशीलतेपासून निष्पन्न होणारें सख्य प्रयत्नसाध्य असून परिणामी हिकरही होय. न पेक्षां, ख्रिस्ती लोकांस असलेल्या व्यसनांचे किंवा दुर्व्यसनांचें ह्मणा पाहिजे तर-अवलंबन करून सख्य जोडण्याचें कोणी मनांत व कृतींत आणील तर तें कृत्य निंद्य ठरून परिणामही अहितकारक होईल. तांबडें पाणी पिऊन रागानें लाल झालेल्या माणसांत भांडण जुंपलेले प्रत्येक गुंत्यांत सहज दृष्टीत पडतें! मग असल्या घातक व्यसनापासून सख्य तें कसें निपजेल? आता व्यसनांतहि सख्य उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहे असें कोणीही ह्मणेल व आह्मांस कोणत्याही व्यसनाची आवश्कता असेल तर तें भतृहरीनें वाखाणललें विद्याव्यसनच होय; ह्या विद्याव्यसनांत आह्मीं मागसलेलो आहोंत. अशा स्थितींत ज्ञानप्रसारार्थ चहूंकडून प्रयत्न सुरू झाले पाहिजेत. तरच हळूहळू चालू असलेली हिंदूंची प्रगति न थंडावतां योग्य प्रमाणांत चालत राहील.

*(गुरुवार, दि. १७ जून १९२०)*

# एकीची आवश्यकता

'राहिला जरी एकजुटी मग काय विचारतां बळकटी' एखाद्या समाजांत राजकीय, धार्मिक, किंवा इतर कोणत्याही कारणामुळें कां असेना, एकदां फूट शिरली ह्मणजे उत्पन्न होणाऱ्या समाज-विभागांची ध्येयें निराळी ठरून एक प्रकारची भाऊबंदकी उद्‌भवते. असल्या भाऊबंदकीचे दुष्परिणाम, मुसलमानांचा प्रवेश भारतांत झाल्यापासून व ख्रिस्ती लोकांचा पांढरा पाय आमच्या मायभूस लागल्यानंतरही पिढ्यानिपिढ्या हिंदूंच्या आंगवळणीं पडले असल्यामुळे आज त्याचें वर्णन करण्याचा गरज नसली तरी ते कुपरिणाम शक्य त्या मानानें चुकविण्याची तन्निवारणार्थ कांही उपाय योजणे अत्यंत आवश्यक झालें आहे.

आजवर मिळालेला अनुभव असा आहे की, हिंदु समाजाचा एक भाग धार्मिक प्रकरणांत अलग झाला ह्मणजे, त्यानें, अगोदरच लुळ्या झालेल्या हिंदुसमाजाचें अहित करून आपल्या पोळीवर तूप ओढण्याचे निंद्य प्रयत्न करावे व नंतर, वरील दोन अडचणींच्या कात्रींत सांपडून खचलेल्या हिंदुसमाजांत ज्या वेळी मत वैचित्य शिरूं लागते तेव्हां त्याच्या आपत्तींस खरी सुरवात होऊं लागते. ह्या विषयींचा ऐतिहासिक पुरावा तर मुबलक सांपडतो. त्याकडे लक्ष्य पुरविल्यास असें वाटूं लागतें की, समाजांत एकात्म ता येण्यास मुख्य व आवश्यक असलेली गोष्ट ह्मणजे संकटकाल होय. व हा संकटकाल निरनिराळ्या बाजूंनीं बाधण्यासारखा असल्यामुळें त्या त्या मानानें एकीसही निरनिराळें स्वरूप येत असतें. याचें प्रत्यंतर पाहणें असेल तर ख्रिस्ती लोकांसही तो संकटकाल बाधल्यावांचून राहिला नाही असें ऐतिहासिक दृष्ट्या सिंहावलोकन केल्यास ध्यानी येईल. एकंदर विस्तृत हिंदुसमाजापासून जेव्हां बाटलेले थोडेसें ख्रिस्ती निराळे झाले तेव्हां त्यांस संकटावस्था प्राप्त होऊन एकीचा अवलंब करावा लागला. पारशी लोकांपासून तर हें एकाचें तत्त्व जास्त प्रमाणावर आह्मां हिंदूंस शिकतां येण्यासारखें आहे. हिंदुस्थानासारख्या परकी देशांत एकदम आल्याबरोबर त्यांस एकोप्याचे अवलंबन केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें व आह्मीं हिंदु तर स्वदेशांतच परकी झालों असल्यामुळें

आमच्या सगळ्या रोगांवर एकी हें एकच औषध कोणताही राजकारण भिषग्वर सुचविल्याशिवाय राहणार नाहीं.

आज आमचा समाज एकीविना कोणत्या अडचणींत सांपडला आहे त्याचे दिग्दर्शन सभोंवारच्या परिस्थितीकडे नजर फेंकल्यानें उत्तम प्रकारें समजून येण्यासारखे आहे.

तूर्त एकी व संघटना ह्या विषयीं आह्मांत इतकी तीव्र भावना जागृत झाली पाहिजे की, एकामेकांचें बरें भलें झाल्यास त्याकडे मत्सरग्रस्त दृष्टीनें पाहून जीव कष्टी करण्यापेक्षां एकमेकांच्या हितासाठीच देह कष्टविण्याकडे मनाची आतुरता दिसून आली पाहिजे.

*(गुरुवार, दि. २४ जून १९२०)*

# गोमांतकीय हिंदुपरिषद

प्रस्तुत विषय 'भारता'च्या वाचकांस बऱ्यांच दिवसांपासून परिचित झाला आहे व अतिपरिचयामुळे एक प्रकारचा कंटाळा येणें अस्वाभाविक नसलें तरी, हिंदुपरिषदेसारखा सार्वजनिक हिताचा मजकूर अनेक लेखकांकडून बहुविध बाजूंनी मांडला गेला असल्याने त्यावर जवळ जवळ महिना दोन महिन्याच्या अवघींत विचार करण्याची संधी वाचकास मिळाली व आह्मांस लोकमत थोडेंसें अजमावतां आलें. ह्या गोष्टी कमी महत्त्वाच्या नव्हेत.

आजपर्यंत झालेल्या वादविवादांचा हंसक्षीरन्यायानें विचार करावयाचा झाल्यास व्यक्तीविषयक कुरापती बाजूस ठेवून ऐन मुद्द्यासंबंधानें विवेचन केले असतां. वादांतून तत्त्वबोध तरी निघाल्याचें श्रेय मिळेल. वाद, त्याचा आरंभ व पर्यवसान या त्रयीकडे लक्ष्य देतां नि:पक्षपाती मनुष्यास असें वाटेल की, 'स्पष्टवक्ता' यांनी परिषदेविषयीं समतोल मनानें ऊहापोह कला असता तर इतरांसहि अतिशय शांत चित्तानें तो विचारांत घेण्यास फुरसत मिळाली असती व आघाताच्या मानानें प्रत्याघातहि अल्प प्रमाणांत राहून एकाची चूक दुसऱ्याकडून सुधारण्यासाठी हातांत लेखणी घेऊन मर्मभेद

करण्याऐवजी हातांत हात घालून पुढील कार्याकरीतां तरी तडजोड झालेली दिसली असती. ही एक बाजू असून, दृष्टिकेंद्र जरा सूक्ष्म केले असतां असें दिसेल की, परिषद नको असें कोणाचेंच मत नाही व दिसणारा मतभेद इतका सौम्य स्वरूपाचा आहे की तो कांही अवकाशानें नाहींसा होईल. हा प्रकार आशाजनक होय. तूर्तची वेळ अशी आहे की, आज एकमेकांचे उणे पाहत टाळ्या मारून स्वस्थ न बसतां. जें उणें असेल तें पुरें करण्याकरीतां हातभार लावण्यास झटलें पाहिजे. ह्मणजे सामाजिक कर्तबगारी परस्पर विरोधांत झिजून लय न पावतां सगळ्यांसच सुफलदायिनी होईल.

'भारता' वर परिषदेचें नांव पुकारण्यांत आल्यापसून तिच्या उपयुक्ततेविषयीं आस्थापूर्वक चर्चा करून, या गोवा हितसंवर्धक संस्थेसंबंधानें आपआपले विचार प्रदार्शित करण्याचा सुप्रसंग बहुतेकांनी दवडला नाही, हें उत्कर्षाचें सुचिन्ह होय. परिषद भरविण्यांत यावी, ती आवश्यक आहे असें प्रत्येंक पत्रव्यवहार लेखकाचें ठाम मत आहे. भानगड काय ती 'आताच परिषदेच्या कामास सुरवात करावी' की 'योग्य परिस्थिति येईपर्यंत ती भरवूं नये' या मतांतच संकलीत रूपानें दिसून येत. ह्मणून प्रकृत दोन मतवैचित्र्यांचे विवेचन करून जो निकाल लागेल त्या वरूनच परिषदेविषयींच्या एकंदर वादांतून थोडासा तत्त्वबोध निघेल असें आमच्या प्रांजल बुद्धीस वाटतें.

कोणत्याही कामाविषयीं योग्यायोग्य परिस्थितीची मीमांसा करून अमुकच निश्चित करणें हें प्रत्येकाच्या बुद्धिविशेषावर व प्रकृति भिन्नत्वावर अवलंबून आहे. लो. टिळक शंभर वर्षांपूर्वी जन्मते तर त्यांनी पेशवाई बुडूं दिली नसती, किंवा यापुढें शंभर वर्षांनी निपजते तर 'अनभिषिक्त राजा' ऐवजी 'अभिषिक्त राजा' हें सार्थ नाव मिळविण्यास समर्थ झाले असते. सबब ते अयोग्य परिस्थितींत जन्म पावले, असें एखाद्यास ह्मणतां येईल तर दुसरा असें ह्मणेल कीं, पेशवाईतून इंग्रजशाहींत संक्रमण करणाऱ्या कालावधींत त्यांचा जन्म झाल्यामुळें मावळलेल्या स्वराज्याच्या अंधुक प्रकाशांत व इंग्रजशाहीच्या तीव्र किरणांत, एकाची उणीव तर दुसऱ्याची प्रखरता भासत असल्यावेळी, ते ह्यांत असल्या कारणानें त्यांच्या स्वदेशप्रेमास ऊत येऊन मार्गदर्शकांचा मान त्यांस मिळला ह्मणून लो. टिळक योग्य त्याच वेळी जन्मास

आले. ह्यांत खरेपणा कोणत्या बाजूस आहे? हें ठरविणें अनिर्णयात्मक आहे. मात्र, प्रत्येक गोष्ट योग्य त्याच काळी होते ह्मणून योग्य परिस्थिति निर्माण झाल्याशिवाय तीं तीं कार्ये घडत नसतात. असें मानल्या खेरीज त्या मुद्द्यांचा समाधानकारक रीतीनें शेवट होणार नाही. तसेच हेंहि विसरून चालणार नाही की उत्तम पुरुष व शुभ कार्ये कालाच्या कोणत्याही भागांत अस्तित्वांत आलीं तरी तीं सुपरिणामकारक झाल्याशिवाय राहत नाहींत.

परिषदेविषयी आज परिस्थितीत हितकर नाही असें ह्मणणें ह्मणजे ती उद्यांवर ढकलणें होय व प्रत्येक दिवसास 'उद्या' असतोच, तर परिषद भरविणें कोणत्या 'उद्या' वर पडेल, हें परिषद आज नको ह्मणणारे सांगू शकतील असें वाटत नाहीं! तत्त्वत: परिषद पाहिजे ह्मणून सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला असला तरी 'उद्या'च्या सबबीवर ती अस्तित्वांत येऊं नये असेंच अथवा न करत्याचा वार शनिवार अशा सारखेंच कांही तरी त्यांस वाटत असावें असें कोणात्याही स्पष्ट व प्रामाणिक बुद्धीस वाटेलच. आतां परिस्थितीविषयी ह्मणाल तर, एकादे वेळीं कितीही चांगली परिस्थिती अनुकूल असली तथापि, तिजहून फार चांगली परिस्थिती यावयाची आहे अशा बाह्यत: व तत्त्वत: न्याय्य वाटणाऱ्या तार्किकपणे हातचे सोडून पळत्याच्या मागें लागण्याचा उपद्व्याप करण्यासारखें हें कृत्य आहे कीं नाही हें ठरविणे वाचकांच्या समंजसतेवरच सोपविलेलें बरें. कदाचित् कपिलाषष्ठी सारखी सुमुहूर्ताची परिस्थिती आली असली तरी ती साधून घेण्याच्या गडबडींत उडालेल्या धांदलीमुळेच तिचा फायदा न मिळता ती गुजरण्याचाही संभव आहे! ह्मणून परिषदेचें काम उद्यांवर न ढकलितां आजच सुरवात केल्यास योग्य ती परिस्थिती प्राप्त झाल्या वेळी तरी निदान परिषद फलद्रुप होईल असे तिच्या प्रवर्तकांस व हितचिंतकांस वाटल्यास अशक्य आशावादांत शिरल्याचा ठपका त्यांवर लागू होईल असें वाटत नाही. अशा प्रकारें परिषदेविषयीं भवति न भवति करणाऱ्या उभय पक्षांचा मतभेद नाहींसा होऊन, एका पक्षास आजच परिषदेचें काम सुरू झालेलें दिसेल व दुसऱ्या पक्षास योग्य परिस्थितीत परिषद यशस्वी झालेली पाहण्यास मिळेल. आणि एकाच बारांत दोन पक्षी मरतील.

आतांच परिषद भरवा, पुढारी दाखवा, पुढारी नाही तर परिषद

नाहीं असे ह्मणणें ह्मणजे, 'बाप दाखवा न पेक्षा श्राद्ध वाढा' असें ह्मणण्याप्रमाणेंच आहे. परिषद यशस्वी होण्यासाठी खटपट करील तोच तिचा पुढारी होईल. सुदैवाने आमच्यांतील तरुण पिढी सुशिक्षित असून बुद्धिमानही आहे. त्यांची दृष्टि परिषदेसारख्या सार्वजनिक हिताच्या बाबीकडे वळल्यास किती तरी चतुर आणि कार्यक्षम माणसांच्या कामगिरीचा फायदा परिषदेस मिळून अत्यंत स्पृहणीय राष्ट्र-हितबुद्धी सर्वत्र दिसून येईल. ह्या तरुण पिढीतील कांही व्यापारांत शिरलेले असोत, काही नोकरशाहींतील लहान मोठ्या हुद्यांवर विराजित झालेले असोत अथवा इतर कोणत्याही पेशाचे असोत त्यांतील प्रत्येकास कोणत्या ना कोणत्या रीतीनें हिंदुपरिषदेस हातभार लावतां येण्यासारखा आहे. व असें झालें तरच ती सगळ्या हिंदूंची परिषद असें होऊन तिचा फायदाहि सगळ्या हिंदूंस मिळेल. असल्या सार्वजनिक कार्यांत पडल्यापासून मनाचा एकलकोंडेपणा जाऊन अंगांत संचारणारा राष्ट्रीय उत्साह खासगी व सार्वजनिक कामांत कार्यक्षमता उत्पन्न करतो.

उदयोन्मुख परिषदेपासून एकदम मोठमोठ्या कार्याची अपेक्षा करणें ठीक नसून, तीं पहिल्याप्रथम पार्लमेंटास शक्य झाली नाहींत की, राष्ट्रीय सभेस पार पाडतां आली नाहींत, सबब सार्वजनिक कार्यांची आस्था उत्पन्न करून ती वाढीस लावणारी संस्था अशा दृष्टीनेंच परिषदेकडे तूर्त पाहण्यास हरकत नाहीं व पुढें तिची योग्य जोपासना होऊन अपेक्षित कार्ये घडवून आणल्याशिवाय राहणार नाही. परिषदेच्या कामास सुरवात झाल्यावांचून उद्भवणाऱ्या भानगडी व त्या निवारण्याचे उपायहि सुचणार नाहीत. गोव्यांत मोठ्या प्रमाणावर आरंभिलेली सार्वजनिक कार्ये यशस्वी होत नसतात हा डाग पुसून टाकून, हिंदू तरुणांच्या राष्ट्रीय कर्तव्याची पारख पाहण्यासाठी आतुर झालेली परिषद एकटीच काय ती त्यांच्यांत स्वाभिमान जागृत करणारी आहे.

प्रांतिक परिषद भरविण्यापूर्वी स्थानिक प्रयत्न करा ह्मणणाऱ्यांनी असें पाहिले पाहिजे की, भिन्न ठिकाणी केलेल्या स्थानिक प्रयत्नांचें ध्येय निरनिराळें असून ऐक्यवर्धक होईलच असें ह्मणणें संभवनीय वाटत नाही. व एकाच गावांत स्थापन झालेल्या दोन समान संस्थांपैकी, एखाद्या संस्थेच्या मुळाशीं

आवश्यक तितका उदात्त हेतु नसेल तर त्या संस्थांचें कार्य परस्परविरोधक होणें शक्यते बाहेरचें नाही. याकरितां स्थानिक प्रयत्नांस उत्तेजन देऊन त्यांत एकात्मता आणूं शकणारी संस्था ह्मटली ह्मणजे प्रांतिक परिषद होय. हेंच दुसऱ्या शब्दांनी सांगावयाचें झाल्यास, प्रांतिक परिषद ह्मणजे उदात्त हेतुमूलक व ऐक्यवर्धक स्थानिक प्रयत्न अस्तित्वांत आणण्यासाठी झटणारी नमुनेदार संस्था होण्यासारखी आहे. असें ह्मणतां येईल. ह्मणून तिचा उपयोग एकाच गांवांत एका दर्जाच्या दोन संस्था उभारून पक्षभेद वाढविण्याकडे न होता, गोव्यातील सगळ्या गांवांस, हिंदुत्वाच्या उच्च भावनेखाली एकत्र करण्याच्या कामी तिचा फायदा मिळेल असें एकदां ध्वनित झाल्याबरोबर तिच्या विषयींच्या मत-वैचित्र्यास जागा राहणार नाही.

शेवटीं, वरील साधकबाधक प्रमाणांचा विचार करून, परिषद पाहिजे असें सगळ्या पत्रव्यवहार-लेखकांचे मतैक्य असल्यावरून व ती खरेखरच उपयुक्त आहे असे वाटत असल्यावरून तिच्या कामास लवकर सुरवात होणें इष्ट आहे. त्याकरीतां क्षुद्र मतभेद बाजूस ठेऊन 'अखिल हिंदु परिषद' हे नाव यथार्थ असल्याची खात्री सर्वांस पटण्याजोगे प्रयत्न गोमांतकीय हिंदूंकडून होतील अशी आशा प्रदर्शित करून वाचकांची रजा घेतो.

*(गुरुवार, दि. ९ सप्टेंबर १९२०)*

# असहकारिता!

पारतंत्र्यांत रुतलेल्या हिंदुस्थानास आपली स्थिती सुधारून स्वतंत्रतेच्या उच्च व शुद्ध वातावरणांत अप्रतिहत विहरण्यास महात्मा गांधीसारख्या मांत्रिकांनी 'असहकारिते'चा तेजस्वी मंत्र सतत जपण्याविषयी उपदेशिलें आहे. या मंत्रसामर्थ्यांनें मृत्यूपंथास लागलेल्या पुष्कळ राष्ट्रांस आराम पडून तीं आज सौख्यामृताचे घुटके घेत आनंदाने दिवस घालवीत आहेत हें त्यांनी सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे. ह्या मंत्राची उपयुक्तता सर्वस्थळी व सर्वकाळी सारखीच असून ज्या ज्या दु:खसाध्य रोगांवर त्याचा उपयोग करण्यात येईल ते ते रोग हटकून हटतील हें

त्रिकालबाधित सत्य आतां तर सर्व विश्रुत झालें आहे.

इंग्रजी हिंदुस्थानांतील आमच्या देशबंधूंनी वरील मंत्राचा अवलंब आपली, राजकीय स्थिती सुधारण्याकडे केला आहे. सुदैवानें आमच्या या गोमांतकांतील पोर्तुगीज नागरिकांची राजकीय परिस्थिती फार चांगली आहे. असा बहुतेकांचा ग्रह झाला असल्याने आमच्या सामाजिक व्यथांवर या रामबाण औषधाची योजना केल्यास त्या पीडेचा समूळ नायनाट होऊन व अशाने आमच्या समाजास जोम व प्रफुल्लता येऊन तो ताजातवाना व कर्तव्यदक्ष होईल आणि आपलें योग्य स्थान पटकावण्यास सहज होईल.

आमच्या समाजास रुग्णावस्थेंत लोळवणारें हे कोणते रोग आहेत असें पाहू गेल्यास आळस, सुरापान व जुगार इ. दुर्व्यसने होत हें कोणासहि कळून चुकलेंच असेल. या अपायकारक व सांपत्तिक व शारीरिक ऱ्हासांस कारणीभूत दुर्गुणांवर जर 'असहकारितेच्या' तत्त्वाचा अवलंब करून तर उद्योग तत्परता व इतर सदुण यांचा विजय होऊन आमचा समाज सौख्य सागरांत या बाबतींत तरी चिरकाल निमग्न राहील ह्यांत संशय नाही. हा असहकारितेचा मंत्र, सर्वांस सुसाध्य आहे. त्यासाठी पैशाअडक्याची बिलकूल गरज नाही. मात्र दृढनिश्चय ह्या एकाच 'पंचाक्षरी' शब्दाचा आश्रय धरिला पाहिजे. या शब्दाचा महिमा तुकोबारांयासारख्या साधुपुरूषांनी आपल्या प्रेमपूर्ण व रसाळ वाणीनें 'निश्चयाचें बळ! तुकां ह्मणे तेचि फळ' असा वर्णिला आहे. यासाठी, आमच्या गोमांतकस्थ बंधूंनी उपरोक्त बाबतींत 'असकारितेचा' स्वीकार करून आपणास धन्य ह्मणवून घेण्याचें पुण्य संपादावें अशी त्यास आमची प्रेमाची विनंती आहे.

*(गुरुवार, दि. ३० सप्टेंबर, १९२०)*

# हिंदु–ख्रिस्ती–ऐक्य

गोमांतकस्थ हिंदु, ख्रिस्ती लोकांपासून दूर राहतात व राजकारण किंवा सामाजिक सुधारणा यांच्या होऊं शकणाऱ्या व्यवस्थित प्रगतीस

आपल्या धर्मजन्य असहकारितेमुळे अडथळा करतात अशा बद्दलचें रडगाणें गाऊन आपलें संगळें काय तें हिंदूच्या कारणानें अडून राहिलें आहे असे सांगण्यांस त्यास धन्यता वाटत होती. येथपर्यंत त्यांच्या दृष्टीनें सर्व काहीं ठीक चालत होते. इतक्यांत कालांतराबरोबर सहजासहजीं राज्यव्यवस्थेंत फेरफार होऊन रिपब्लिकन स्वातंत्र्य अवतीर्ण झाल्यावेळीं, एकजुटीने व परस्पर सहायानें ख्रिस्ती लोकांच्या पोटांत असूयेच्या ज्वाळा भडकून वेळीं अवेळी तिची दाहकता त्यांच्या तोंडांतून निघत असल्याचें प्रत्यही दिसतेंच आहे. वास्तविक वरील दोन प्रकारच्या वागणुका हिंदूशीं ठेवण्यांत ख्रिस्ती लोकांचा मतबल कोणता आहे हें कोणीतरी सांगेलच, तथापि, त्यांत खरा तथ्यांश किती आहे हें पाहू.

अगोदरपासून हिंदु समाजापासून ख्रिस्ती वेगळे करण्याच्या कामी इंक्विजिसांवांत दिसून आलेली भीषण क्रुरता व नंतर निराळ्या झालेल्या समाजानें उचललेल्या अंतर्बाह्य चालीरीति ही स्वयंसिद्ध कारणेंच दोनही समाजांची तोंडे दोन दिशांस वळविण्यास पुरेशी झाली. व हिंदुसमाजाचे तोंड पूर्वेकडे अखिल भारताकडे वळलें व ख्रिस्ती जनतेचे तोंड पश्चिमेकडे अर्थात युरोपियन आचारविचारांकडे वळलें. तोंडें परस्पर विरुद्ध दिशांस गेल्यानंतर एकाची पाठ दुसऱ्याच्या पाठीकडे वळून छत्तीसांचा आकडा तयार झाला. अशा स्थितींत सामाजिक सुधारणा करण्यांस प्रत्येक समाजास कोणी आडकाठी केली असें वाटत नाहीं. व राजकीय बाबतींत तर ख्रिस्ती लोकांचा बराच फायदा झाला. खुद्द मोनार्कींत देखील हिंदु व हिंदुधर्म यांवर इतकी करडी नजर होती कीं, त्यांचें प्रत्यक्ष नांव न उच्चारतां ''जेंतियु'' व ''जेतिलीस्मु'' (हलके लोक व हलका धर्म) या नावांनीं त्यांस संबोधित असून इकडे गोव्यांत सुद्धा हिंदूचा धार्मिक बाबतींत अपमान करण्याची संधी दवडली जात नसे. पोर्तुगीज शाळांचे शिक्षक होण्यास हिंदु नालायक होत अशी हिंदुत्वाची हेटाळणी होत असतानां केवळ धाडस करून बाशारेल होण्यासाठी पोर्तुगालास जाण्याचा कोणी हिंदु तरुण हिय्या करिता तर त्यास लायक अशी जागा मिळती काय? ह्या प्रश्नाचें उत्तर नकारार्थी दिल्यास अस्तगंत मोनार्कीतील प्रखर ख्रिस्ती लोकांवर ठपका दिल्यासारखें होईल. पण तें ऐतिहासिक सत्य

आहे. धर्मासारख्या परपीडारहित गोष्टींत प्रोफेसर न होण्यासंबंधी जर एवढा कटाक्ष तर बाशारेल होऊन योग्य ती जागा पटकावल्यास प्रत्यक्ष पोर्तुगीज न्यायदेवतेचा अपमान होऊन राजकीय वातावरण विषारी झाल्याचें सिध्द करण्यास फारसा अवकाश लागणार नव्हता. ह्यावरून, धर्मावर जास्त भिस्त ठेवल्यामुळें हिंदुसमाज मागें पडला असें ख्रिस्ती लोकांचे ह्मणणे साफ खोटें असून रिपब्लिक स्थापने पासूनच हिंदुत्वावरील दडपण गेल्यामुळें हिंदूंच्या कर्तबगारीस तरतरी येऊन त्याचें पाऊल बहुतेक बाबतींत ख्रिस्ती लोकांशी समांतर पडत आहे. व ख्रिस्ती लोकांची गोव्यांत उन्नती करण्यास ख्रिस्ती धर्मच कारणीभूत झाला असें सिद्ध करणाऱ्या लोकांनी असें पाहिलें पाहिजे कीं जीं कार्यें ख्रिस्तीधर्म चारशें वर्षात करूं शकला तींच कार्यें करण्यास दडपणांपासून मुक्त झालेलें हिंदुत्व दहा वर्षांच्या आंत सिद्ध झालें हेंच कायतें आमच्या धर्मांचें रहस्य.

हिंदुंची प्रगती ह्मणजे ख्रिस्ती लोकांच्या आचार विचारांचे अनुकरण असें समजून कोणी एखादा ख्रिस्ती सुख मानील तर असें समजण्यापर्यंत त्यानें आपल्या कल्पनेची धांव नेऊं नये. पाश्चात्यांचें जें अनुकरण करावयाचें तें हिंदु संस्कृती कायम ठेऊनच केलें पाहिजे त्याची पूर्ण जाणीव हिंदूस आहे. स्वदेशाची प्रीती पार नष्ट करणारी सबाह्यांतर सुधारणा अंगीकृत केलेल्या ख्रिस्ती समाजाचें स्वरुप डोळ्यांपुढे असे तोपर्यंत हिंदुत्वांत किती महत्व आहे हें आम्हांस कधीच विसरतां येणार नाही. धर्माच्या मूलतत्वांस बाधा न आणतील अशीं बाह्य देखाव्यापुरती व देशकालास इष्ट असणारी उपांगें स्वीकारून मूळ संस्कृती कायम ठेवण्यातच हिंदुत्वाची खरी थोरवी आहे. ती चिन्हें ख्रिस्ती समाजाचें अनुकरण करण्याची नसून बाह्य पेहेरावांतच सुधारणा आहे असें समजणाऱ्यांस, ह्याही गोष्टींत हिंदु मागें नाहींत असें दाखविण्यापलिकडे पाश्चात्य आचारांशी आह्मांस कांहींच कर्तव्य नाही. ह्मणजे एकंदरीत, ‘हिंदुधर्माच्या जुन्या व प्रगतिस्तंभक चाली सोडल्यामुळें हिंदु सुधारले’ असे आमचें अभिनंदन करण्यांत ख्रिस्ती धन्यता मानतील, तर ‘‘वाहवा! हिंदुत्व कायम ठेऊन प्रगतिपर पेहराव चढविलेले हिंदु धन्य आहेत’’ असें ह्मणवून घेण्यांत हिंदूनी धन्यता मानिली पाहिजे.

थोड्या शब्दांत सांगावयाचें ह्मणजे धार्मिक गोष्टींत हिंदूंचा ख्रिस्ती लोकांत मिलाफ होणे शक्य नव्हतें व आजही शक्य नाही, त्यांपासून झालेल्या छत्तीसांच्या आकड्याऐवजी त्र्येसष्टाचा आंकडा होण्यांस हिंदु-ख्रिस्ती लोकांनी परस्पर सहानुभूति बाळगून गोव्यांचें हित केले पाहिजे. न पेक्षां ३६ काय कीं ६३ काय शेवटी noves fora nada हें ठरलेलेंच आहे.

*(गुरुवार, दि. ७ ऑक्टोबर १९२०)*

# 'हिंदु-समाज'

जपानसारख्या चिमुकल्या राष्ट्राचें उदाहरण डोळ्यांसमोर धरलें तर त्या राष्ट्राची आकस्मिक उन्नति व उत्कर्ष पाहून कोणासहि आश्चर्य वाटल्यांवाचून राहणार नाही. १९०३ सालच्या रुसो-जपानी युद्धांच्या पूर्वी तें एक सध्याच्या पोर्तुगीज राष्ट्रासारखें राष्ट्र आहे या व्यतिरिक्त दुसरी कसलीही कल्पना मनांत येणे शक्य नव्हते, तीच कल्पना आज कायम आहे काय? दोन दशकांच्या अवधींत त्यानें जी प्रतिष्ठा व जें वैभव मिळवलें त्यामुळें अखिल जग दिपून गेलें नाही काय? ही उन्नति इतक्या थोड्या अवधींत झालेली आहे की, असें घडणें प्रथम दर्शनी अशक्य वाटतें!

जपानच्या उन्नतीच्या मुळाशी काय आहे, या उन्नतीचा पाया कोणत्या तत्त्वार उभारला गेला आहे, हें, जपानचे बादशहा मिकाडो यांचे उद्गार वाचले ह्मणजे, सहज कळण्यासारखें आहे. 'आमच्या राज्यांतल्या प्रत्येक खेडेगावातील कुटुंब सुशिक्षित झालें पाहिजे. नव्हे तर प्रत्येक कुटुंबातील प्रत्येक मनुष्य सुशिक्षित बनला पाहिजे.' शिक्षण खात्याचे नियम करतेवेळचे हे त्यांचे उद्गार आहेत.

वाङ्मयशिक्षण हें राष्ट्राच्या उन्नतीचें एक महत्त्वाचें साधन असलें तरी खरी उन्नति त्या राष्ट्राच्या सांपत्तिक स्थितीवरच अवलंबून असते. राष्ट्र सुसंपन्न असलें, राष्ट्राच्या मागें उदरभरणाची काळजी नसली ह्मणजे त्याला शांत चित्तानें विचार करवयास वेळ मिळतो व त्याकडून निरनिराळे प्रचंड शोध लागतात.

गोवा प्रांत किंवा हिंदुस्थान यांची स्थिति विचार करण्यायोग्य समाधानकारक आहे काय? एका काळी ज्यांची पूर्ण मालकी होती त्या संपत्तीची राजरोस लूट चाललेली पाहून, नवे शोध लावण्याजोगी त्याची मानसिक स्थिति स्वस्थ आहे काय? उदरंभरण कसें होईल हीच विवंचना ज्यांच्यामागें लागलेली आहे त्यांची डोकी नवें शोध लावण्यालायक शांत असतील काय? आमचा देश भुकेकंगाल होत चालल्यामुळें आमच्या शिक्षणाचीही शोचनीय स्थिति होत चालली आहे. जीवनार्थ कलह 'आ' पसरून प्रत्येकाच्या पाठीमागे लागल्यामुळे व शिक्षण हें नोकरीच्या पगाररूपी एक अल्पसें साधन असल्यामुळें नोकरीसाठीच शिकणारे फार! जे जास्त शिकतात ते जास्त पगाराकरीता. निवळ ज्ञानार्थ शिकणारे फार कमी! अशी स्थिति असतां देश संपन्न होण्याची आशाच नको. हरेक गोष्टीसाठी जें आह्माला परकीयांकडे पाहावें लागत आहे ही परिस्थिती बदललीच पाहिजे व ती बदलण्यासाठी आमच्या राष्ट्राच्या सांपत्तिक स्थितिची वाढ करण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे हें निर्विवाद आहे. आपल्या देशांत उद्योग धंदे स्थापणें, कलाकौशल्य शिकविण्याच्या शाळा व कारखाने उभारणे, हीच राष्ट्राच्या संपत्तीचीं खरी साधनें होत. ज्या देशांत ही साधनें नाहींत तो देश विपन्नावस्थेच्या खोल अंध:कार गर्तेत पडल्याविना राहणार नाही. ह्या कामीं परिपोषक असें सरकारी सहाय्य मिळणें शक्य नाहीं हें निदान, सध्याचे गोव्याचे गवर्नर सिं. मोरायस यांचे परवांचे सोन्यांचे बोल ज्यांनी ऐकिले किंवा वाचले असतील त्यांना पटलेंच पाहिजे. अशा परिस्थितींत आमच्या भांडवलवाल्यांनी-श्रीमंतांनी-पुढें सरसावलें पाहिजे.

आपल्या देशांत योग्य कामधंदा न मिळाल्यामुळें किती तरी लोक परक्या ठिकाणी जात आहेत व त्यांच्या उत्कर्षाकरीतां त्यांना मनाविरुद्ध काम करावें लागत आहे. ज्या शेंकडो परकी व्यापारी कंपन्या हिंदुस्थानभर पसरल्या आहेत व ज्यांची एकसारखी भरभराट होत आहे ती कशामुळे? आह्मी हिंदुस्थानवासी नामर्द ठरलो ह्मणून. नाही तर ह्या कंपन्या हिंदुस्थानांतील द्रव्यरूपी लोणी घुसळून काढून आपापल्या देशांत रवाना करते ना व आह्मी जे त्यांच्याकडे नोकरी करीतों त्याबद्दल ते दोन दिडक्यारुपी ताक आमच्या

हातावर टिचतेना! पण त्यांचा तरी यांत काय अन्याय? मुळींच हात पाय पसरण्यासाठी जर भटाला ओसरी देऊन आपण अंगणात जाऊन उभे राहिलों तर यांत त्यांचा काय दोष? पुष्कळ अक्षरांची एकेक लांब शेपटी अडकवून घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांपुढें लांगूनचालन करण्यांत जर आह्मांला श्रेष्ठतर इतिकर्तव्य वाटलें व महिन्याकांठी हाती पगार पडला ह्मणजे मोक्षपदाची एक पायरी चढल्यासारखें वाटलें तर परक्यांकडे काय दोष? तर आमचें आह्मीच पाहिलें पाहिजे. ते आमचें हक्क आह्माला देतील किंवा देण्याचा प्रयत्न करतील अशी कल्पना सुद्धां होऊं देऊं नये. अचानक डबोलं सांपडलें तरी ते परत करणारे 'चीनचे खरे व्यापारी' ते नाहींत हें लक्षांत ठेऊनच आह्मी पुढं सरसावलें पाहिजे. नाही तर ज्यांनी आमची मुस्कटदाबी केली आहे ते उद्यां आह्मांला अंधार कोठडींत ढकलण्यात कमी करणार नाहीत.

विविध प्रकारचे धंदे चालावे व त्यायोगें आमच्या मातृदेशाची संपत्ति वाढावी या उद्देशानें वरील नांवाची संस्था स्थापन झाली आहे. तिचें खरेंखुरें कार्य लोकांच्या उदार आश्रयावर अवलंबून आहे हें उघड आहे. संस्थेचे एकंदर कार्य विधायक व अखिल हिंदुसमाजाच्या सांपत्तिक उन्नतिप्रीत्यर्थ असल्यानें आमचें हिंद-बांधव तिला आपापल्या शक्तीनुसार सहाय्य करण्याचें कर्तव्य योग्य रितीनें बजावतील अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे.

*(गुरुवार, दि. ९ डिसेंबर १९२०)*

# भंडारी विजय?

आह्मी गोमंतकीय लोक आजपर्यंत संपांच्या विलक्षण व अद्भूत शक्तीची वर्णने केवळ वाचूनच आश्चर्यचकित बनत होतों. संपाच्या दैविक शक्तीची थोडीबहुत कल्पना आह्मांस 'पुस्तकी ज्ञानाने' होत होती. संघशक्तीच्या बळकट पायावर उभारलेल्या संपाच्या इमारतींस मोठमोठ्या मशिनगन्सचा मारासुद्धा काडीचाहि त्रास देऊं शकत नाही, हेंहि आह्मांला 'ऐकून' ज्ञात होते.

परंतु वरील प्रकारच्या विराटस्वरूपी संपांसारखा एखादा संप प्रत्यक्ष पहाण्याची संधी आह्मांस, सध्या चालू असलेल्या भंडाऱ्यांच्या प्रचंड संपापूर्वी, कधींच मिळाली नव्हती, असें ह्मटलें असतां अतिशयोक्ती होणार नाही. 'मासळी विक्या' लोकांनी व सरकारी बोटीवरील खलाशांनी आपल्या हक्कांसाठी एक वेळ संपाची चळवळ चालू केली होती, पण तिचें कार्यक्षेत्र अगदी संकुचित असल्यामुळे विशेष गाजावाजा न होता ज्या गरीब स्थितीत त्या चळवळीचा उगम झाला होता त्याच स्थितीत,मोठ्या प्रयासाशिवाय, तिचा अस्त झाला, हें सर्व मशहूरच आहे. अर्थात् भंडारी (रेंदेर) लोकांनी अत्यंत चिकाटीने सुरू केलेल्या संपाशी त्याची तुलना करणें ह्मणजे इंद्राचा ऐरावत शामभटाच्या तट्टाणीसारखाच आहे असा कबुलीजबाब देण्यासारखें हास्यास्पद होय!

भंडारी लोकांच्या भव्य संपामुळें आज गोमंतक प्रांत हादरून गेला असून, ज्याच्या त्याच्या तोंडात या संपा व्यतिरिक्त दुसरा कसलाही विषयच घोळत नाही. जिकडे तिकडे मिलिटरी लोकांची हालचाल दृष्टोत्पत्तीस येत असून भंडाऱ्याच्या झुंडीच्या झुंडी आपल्या चळवळीप्रीत्यर्थ, कसलीही पर्वा न करतां, निधड्या छातीने, सर्वत्र हिंडत असलेल्या नजरेस पडतात!

संपासंबंधी प्रसिद्ध झालेल्या सरकारी प्रेस नोटवरून संपावाल्यांच्या मागण्याचें खरें स्वरूप कळण्याचा मार्ग नाही; परंतु खाजगी रीतीनें समजतें की, भंडारी लोकांच्या 'नारळीच्या झाडांच्या ज्या माडी पासून दारू उत्पन्न होते त्या माडीवर नवीन कसलेही कर तर लादण्यांत येऊं नयेच, पण सध्या असलेल्या करांत सुद्धां छाटाछाट व्हावी!' अशी इच्छा आहे.

ही त्यांची इच्छा केवळ स्वार्थमय असल्यामुळें आह्मांला पसंत होणें अर्थात अगदी अशक्य आहे. शिवाय, त्यांच्या हेतूस मूर्त स्वरूप आल्यास मद्यपानाला जोराचें सहाय्य झाल्यासारखें होऊन, राष्ट्राच्या नैतिक उन्नतीला बराच धोका पोंचणार आहे, हें उघड आहे.

आह्मांस आश्चर्य वाटतें तें त्यांच्यात उत्पन्न झालेल्या संघशक्तीच्या अनुपयेमय बळाचें! महात्मा गांधीच्या सत्याग्रहाची कल्पना वरील संपावरून

चटदिशी लक्ष्यांत येण्यास बरीच मदत होते, या एकाच कारणामुळें आह्मी भंडारी लोकांच्या चळवळीचा येथें निर्देश केला आहे. पुढें मागें राष्ट्रहितासाठी असहकारीता पुकारण्याचा समय ओढवल्यास, चालू असलेल्या संपापासून आमच्या लोकांनी एव्हढाच धडा पाठ करून ठेवल्यानें त्याचा अगदींच उपयोग होणार नाही, असें नाही. बाकी आमचे 'मायबाप' सरकार आह्मांवर तसला 'दुर्धर' प्रसंग कदापिच आणणार नाही, अशी आमची खात्री आहे.

*(गुरुवार, दि. ६ जानेवारी १९२१)*

# आधीं कळस मग पाया रे

परमेश्वरी कृपेनें हिंदुसमाजांस राजकीय हक्कांपासून अलग ठेवण्यास राजसत्तेचा अंध:कार नष्ट होऊन, त्याला प्रजासत्तेच्या उज्ज्वल प्रकाशांत समान हक्कांचे फर्मान दाखल करण्यात आलें तो व या नंतर दहा वर्षांच्या अत्यल्प काळांत 'आंधळा मागतो एक डोळा तर देव देतो दोन डोळे' अशी भावना होणाऱ्या गोवाप्रांताला स्वराज्य-स्वातंत्र्यादानाचा दिवस, हे अखिल गोमांतकीय हिंदुसमाजाला अपूर्व आनंदाचे, पर्वणीचे किंबहुना आपल्या कर्तव्यांस स्फूर्तीचे वाटले असावे व आपला ऊर्जितावस्थेचा लखलखित काळ अगदीं समीप आला असेंही त्यास वाटलें असावें, यांत कांहीच आश्चर्य नाही. हा काळ हिंदुसमाजाच्या जागृतीचा किंवा क्रांतीचाही होता असें ह्मणणें अतिशयोक्तीचें होणार नाही. पण ही क्रांति झाली किंवा होत आहे अशी चिन्हें दृग्गोचर होत नाहींत हें समाजाचें दुर्दैवच समजलें पाहिजे.

असें होण्याच्या कारणांपैकी सरकारची आमच्याविषयी अनास्था हें एक कारण असलें तरी आमच्या समाजाची 'आपण आपणास देव समस्तांस' अशी वैयक्तिक वृत्ति, स्वराज्यास पात्र होण्यासाठी योग्य प्रयत्नाचा असलेला अभाव व 'आधी कळस मग पाया' हें धोरण हींही कारणें त्याला आघाडी मारण्यास देत नाहींत हें लक्ष्यांत ठेविले पाहिजे. व जोपर्यंत ही कारणें आमच्या समाजांत दृढमूळ धरून राहतील तोंपर्यंत आह्मी निकृष्टावस्थेच्या फेऱ्यांतून

सुटूं, आह्मी विपन्नावस्थेच्या खोल गर्तेतून वर येऊ किंवा अंध:पातापासून मुक्त होऊ असें मानणें शुद्ध वेडेपणां आहें हे आमच्या समाजाध्वर्यूनीं मनांत वागवून त्याप्रमाणें योग्य दिशेंने प्रयत्न केले पाहिजे हेंहि उघड आहे.

आमच्या ख्रिश्चन बंधुसमाजाची सध्या चैन असल्यामुळें त्यांच्या बद्दल प्रस्तुत कांही ह्मणावयाचे नाही; कारण 'आपल्या डोळ्यांतील मुसळ' दूर केल्याशिवाय 'अधिकार तैसा उपदेश' करण्याला आह्मी पात्र होणार नाही, ह्मणून पहिल्यांदा आह्मी, आमच्या समाजधुरिणांनी, आमच्या सम ाजाच्या अंत:करणावर संघशक्तीचे व परस्परानुकंपेचे महत्त्व पक्कें प्रस्थापित करून त्यास इष्ट वळण लावण्याचे, नैतिक व सांपत्तिक स्थिति सुधारून स्वराज्यासाठी खरी पात्रता अंगी आणण्याचे व नंतर राजकीय हक्कांसाठी सनदशीर रीतीनें योग्य किंवा लायक होण्याचे कसून प्रयत्न केले पाहिजेत हें निर्विवाद आहे.

प्रत्येक प्राणीमात्र स्वार्थी आहे. एखादा अति कृपण घ्या किंवा एखादा जीवन्मुक्त घ्या. एक द्रव्याचा लोभी तर दुसरा परामार्थाचा मोक्षाचा लोभी. दोघेही स्वार्थी; पण पहिल्यावर लोभी आप्पलपोट्या अशा विशेषणाचा भडीमार होतो तर दुसऱ्याची निस्वार्थी, निस्पृह, परार्थी देह कष्टविणारा अशी कीर्ति होते. याचें कारण काय? तर पहिल्या प्रकारच्या स्वार्थाची दृष्टि फक्त आपल्यापुरती, आपल्या कुटुंबापुरती किंवा आपल्या नातलगांपुरती असते पण दुसऱ्या प्रकारचा स्वार्थी आपला समाज किंवा अखिल जग आपलेंच कुटुंब समजतो. एकाचा स्वार्थ संकुचित. वैयक्तिक तर दुसऱ्याचा विस्तृत व विधायक एवढाच त्यांत फरक आहे. आमच्या समाजांत या वैयक्तिक स्वार्थाची भयंकर ज्वाळा पसरली आहे व आपल्या कर्तव्याचा हा एवढाच गोल आहे असें ते समजात; पण या गोलाच्या कांही अंतरावर जरा विस्तृत असा समाजगोल आहे. व त्याकडे आपलें लक्ष्य वेधलें पाहिजे व या बहिर्गोलाची समाजाची जी दशा होणार तीच अंतर्गोलाची- व्यक्तीची होईल हें ते उमजत नाहींत. अशा स्थितींत 'वसुधैव कुटुंबकम्' मानण्याचें दूरच राहिलें. या विधायक व विस्तृत गोलाचा टापू आकळतां न आल्याने किंवा संत तुकाराम नाटकांतील संन्याशी, रामेश्वरपंत व मंबाजीबुआ यांच्याप्रमाणे

'अहोरूप महोध्वनि' अशी आत्मप्रसंशा करण्यांत गढून गेल्यामुळें समाजाच्या दैनावस्थेकडे लक्ष्य देण्यास वाव मिळूं नये यांत कांही आश्चर्य नाही. अशा वृत्तीवर 'मूले कुठार' घालणें समाज पुढाऱ्यांचे पवित्र कर्तव्य आहे.

प्रत्येक हिंदुव्यक्तीला हा समाज आपला आहे अशी भावना झाली. प्रत्येक व्यक्तीच्या स्वार्थी दृष्टीची मजल येथवर पोंचली की आमच्या समाजाचें अध:पतन होईल अशी भीती बाळगण्याचें कारण नाही. आमच्यांत ऐक्य वाढेल व सध्या, काडीच्या गरजेसाठी सुद्धां परक्यांकडे 'भिक्षांदेही' करावी लागते, ती लागणार नाही. परकी नोकरशाही जी आमच्यावर अरेरावी करीत आहे तिला आळा पडेल. अगदीं जरूरीपुरत्या अन्नवस्त्राची मागणी परक्यांकडे करावी लागत आहे याची शरम वाटून तें आह्मी उत्पन्न करण्यांस शकूं अशी धमक अंगी येईल व अशा प्रकारें शेतकी सुधारली, कला व निरनिराळ्या धंद्यांचे प्रचंड कारखाने उभारण्यांत आले ह्मणजे प्रस्तुतच्या निकृष्टावस्थेच्या गर्तेतून वर येण्यास मुळीच उशीर लागणार नाही. समाजाची सांपत्तिक स्थिति उत्तम असून, जो स्वत:च्या कर्तबगारीवर विश्वासूं शकतो तोच समाज किंवा देश स्वराज्याला पात्र होतो.

अशी वस्तुस्थिति प्राप्त होण्यास न झगडतां केवळ स्वातंत्र्याच्या वायफळ बडबडींत काळ कंठून राजकीय सत्तेसाठींच हपापणें ह्मणजे 'कळस' उभारून नंतर इमारतीचा पाया तयार करण्यासारख्या हास्यास्पद, निरर्थक व अशक्य गोष्टीस मूर्त स्वरूप देण्याचा अव्यापारेषु व्यापार करणें होय, हें कोणीही कबूल करील.

*(गुरुवार, दि. २० जानेवारी १९२१)*

# एक सामाजिक प्रश्न – वरदक्षिणा

तूर्त आमच्या समाजांत ज्या कांही दुष्ट चाली आहेत, त्यां पैकीच वरील चाल होय. ह्या चालीनें आमच्या समाजास इतकें कांही पछाडून टाकिलें आहे की, त्यायोगें तो दिवसें दिवस खंगत चालला आहे. आणि

ही स्थिति जर अशीच चालू राहील. तर कांही काळानें आमचा समाज विपन्नावस्थेप्रत पोंचल्याशिवाय राहणार नाही. प्रत्येक समाजांत वरदक्षिणेची (हुंड्याची) दुष्ट चाल जरी असली, तरी ती आमच्या समाजास जशी तूर्त जाचक होत आहे, तशी ती इतर समाजास जाचक होत नाही. ही वरदक्षिणेची दुष्ट कृत्ये दिवसें दिवस उग्र स्वरूप धारण करून आमच्या दरिद्री समाजास कफल्लक स्थितीप्रत नेत आहे. अशी खेदजनक स्थिति असतां कोणीच तिज विषयी विचार करीत नाही, यांस काय ह्मणावें?

सभांत काय, किंवा वर्तमान पत्रांत काय अथवा खासगी संभाषणांत काय, अमुक झालें पाहिजे, तमुक घडलें पाहिजे; अमुक करावें, तमुक करूं नये इत्यादि वायफळ गोष्टींच बोललेल्या किंवा लिहिलेल्या ऐकण्यांत किंवा वाचण्यांत येतात; परंतु बोलण्याप्रमाणे किंवा लिहिण्याप्रमाणें, बोलणाऱ्या किंवा लिहिणाऱ्या व्यक्तींपासून तो इतर ह्मणजे ऐकणाऱ्या किंवा वाचणाऱ्या व्यक्तींपर्यंत कोणीच वर्तन केलेलें आढळून येत नाही; प्राय: उलट वर्तन झालेलें मात्र कधीं कधीं आढळून येतें.

आमच्या समाजात अठरा विश्वे दारिद्र्य नांदत असतां वरदक्षिणेचें प्रस्थ फारच माजावें, ही समाजाच्या दुर्दैवाची गोष्ट ह्मटली पाहिजे. समाजांत बहुतेकांस मुली व मुलगे हे असतातच. मुलीच्या विवाहाच्या प्रसंगी प्रत्येक आईबापास वरदक्षिणेच्या (हुंड्याच्या) भयानें अन्नपाणी रूचेनासें होतें; काळीज कंपीत होऊ लागते; नीज चांगली येत नसतें; परंतु तेच आईबाप आपल्या मुलाच्या वेळेस वरील सर्व दु:ख विसरून जाऊन, जब्बर हुंडा मागत असतात. अशांस काय ह्मणावें हें समजत नाही. मुली व मुलगे असलेले आईबाप मुलींस दिलेल्या वरदक्षिणेचें सव्याज उट्टें मुलांच्या वेळेस काढूं पहातात. मुली नसून मुलगेच असलेले आईबाप मुलांवरच आपला वरदक्षिणेचा व्यापार चालवू पहातात. परंतु ज्यांस मुलीच असतात, त्या बापड्यांस मात्र वरदक्षिणा ह्मटली ह्मणजे जीवावरचें संकट वाटतें! ज्यांस उत्पन्न किवा मिळकत भरपूर ह्मणजे खर्च वेंच वजा जाऊन बरीच शिल्लक रहाते, त्यांस कदाचित् वरदक्षिणा ह्मणजे जिवांवरचा प्रसंग वाटणार नाही. परंतु ज्यांची स्थिति तशी नाही, त्या बापड्यांस वरदक्षिणा ह्मणजे जिवावरच

प्रसंग होय! आपली मुलगी चांगल्या स्थळी पडावी, अशी इच्छा प्रत्येक आईबापास होणें साहाजिकच आहे. परंतु त्यासाठी त्यापाशी जब्बर हुंडा मागण्यांत यावा हे मात्र गैर होय! ज्याप्रमाणें चांगल्या स्थळीं मुलगी पडावी, अशी इच्छा होणें साहजिकच आहे, त्याप्रमाणें चांगल्या घराण्यांतील चांगली मुलगी मिळावी अशीही इच्छा होणें साहजिकच आहे. परंतु ही साहजिक इच्छा सोडून, वरदक्षिणेच्या बलावर कसलीही मुलगी मिळविणें हें अत्यंत निंद्य होय! चांगल्या घराण्यांतील चांगली मुलगी पहाणें व ती शक्यनुसार सालंकृत करून देणे, हें दोघांचेही खरें कर्तव्य हाये! व हेंच मनूनेंही आपल्या स्मृतींत सांगितलें आहे. अशी ही खरी वस्तुस्थिती सोडून देऊन निराळीच व कुस्थिति उत्पन्न करावी, हें सामाजिक व धार्मिक दृष्ट्या सुद्धां निंद्य होय, असें वाटतें. इतकेंच नव्हे, तर कांही जण वरदक्षिणाही मिळवून, शिवाय मुलीच्या बापाची इस्टेट मिळवूं पहातात. कोण नीचपणा हा! वरदक्षिणा मागण्याचे प्रकारही निरनिराळे असतात. ज्यांस साधारण स्थावर मिळकत असून, मुलगा साधारण शिकलेला सवरलेला असला ह्मणजे मग त्याची किंमत पुसूंच नका! त्यांस मग वरदक्षिणा मागावी तितुकी थोडीच वाटते! मोठे उत्पन्नदार तर आपल्या मुलाची किंमत जास्तच समजतात. उत्पन्न नसून मुलगा नुसतें थोडें फार शिकलेला सवरलेला असाल, तर त्याचीही किंमत कमज्यास्त होते आणि तऱ्हेनें हा वरदक्षिणेचा व्यापार चालतो. नांवानें वरदक्षिणा ह्मणावयाची आणि ती सर्व मुलीच्या अंगावर दागिन्यांच्या रूपानें घालायाची, असें करण्यापेक्षां मुलगी तिच्यां बापाकडून त्याच्या शक्त्यनुसार, सालंकृत करून घेऊन, त्यांच्याच शक्त्यनुसार मुलास वरदक्षिणा देण्यास सांगावी व तो देईल ती संतोषानें घ्यावी. मुलगी घेऊन शिवाय वर दक्षिणा मागावी हा कोठला न्याय? आमच्या शास्त्रांत रजोदर्शनापूर्वी प्रत्येक मुलीचें लग्न झालेच पाहिजे, असा कायदा असल्यानें व आमचा समाज मोठा असल्यानें ही वरदक्षिणेची कृत्या आमच्या समाजास जशी फार जाच करीत आहे तशी ती इतर समाजास ह्मणजे ख्रिस्ती वगैरे परधर्मीय समाजास व वाणी वगैरे स्वधर्मी समाजास जाच करीत नाही. वाणी वगैरे स्वधर्मी समाजास तर वधुदक्षिणा देऊनच वधू मिळवावी लागते.

सध्याच्या स्थितींत प्रत्येकास जीवनकलह कठीण झाला असतां, वरदक्षिणेचें प्रस्थ अतिशय माजून रहावें, हें समाजाचें दुर्दैव होय! मिळकत कमी, महर्गता फार अशा वस्तुस्थितीमुळे आमचा समाज दिवसें दिवस कृश होत असतां, वरदक्षिणेची बया पुष्ट होत जावी, हें कशाचें चिन्ह ते समजत नाही.

आमचा समाज यद्विषयी कांही तरी विचार करून उपाय योजना करील काय? न पेक्षां आमच्या समाजाच्या बोकांडीवर बसलेले हें वरदक्षिणेचें भूत आमच्या समाजास अखेर ग्रासून टाकिल्याविना कदापि रहाणार नाही. ह्मणून त्यास वेळींच जमिनींत गाडून टाकण्यांत आले पाहिजे. 'शुभस्य शीघ्रम्'

*(गुरुवार, दि. २६ मे १९२१)*

# प्रगतिपथ आक्रमा!

आमच्या देशापासून किती तरी दूर असलेल्या युरोपांतील लोकांनी इकडे येऊन हा देश पादाक्रांत केला व येथे आपलें राज्य स्थापून आपल्या सत्तेखाली आह्मांला दडपून टांकले; ह्याचें इंगित काय?

ह्या देशांतील लोकांच्या अंगी राष्ट्रीयत्वाची भावना जशी असावयास पाहिजे तशी नव्हती व नाही, हें त्या गोष्टीचें मुख्य कारण आहे.

गोमांतकांतील लोकांच्या ठायीं राष्ट्रीयत्वाची भावना कमी परंतु अभिमान मुबलक आहे. देशाभिमानाच्या ऐवजी गोमांतकीयांच्या अंगी कुलाभिमान व जात्याभिमान आहे. परंतु कुलाभिमान फाजील झाल्यामुळें रजपुतांच्या हातून व्हावें तसें देशाहित झालें नाही व जात्याभिमान फाजील झाल्यामुळें पेशवाईत मराठ्यांचे पुष्कळ नुकसान झालें. आतां आपणापैकी बऱ्याच लोकांना राष्ट्रीयत्वाची भावना उन्नत झाली आहे. परंतु फाजील जात्याभिमान अजून अंगी मुरून राहिलेला आहे. व त्यामुळें आपलें अनेक प्रकारें नुकसान होऊन आह्मांला हरएक तऱ्हेचे त्रास सहन करावे लागत आहेत.

ज्ञातीची बंधनें शिथील करून देशहित साधण्यासाठी आज आपण कंबर कसली पाहिजे. मी अमुक जातीचा आहे व गोमांतकाचें कल्याण साधण्यासाठी मला तनमनधन अर्पण केलें पाहिजे. ही गोष्ट प्रत्येकानें हृदयात बाळगिली पाहिजे.

मी हिंदू आहे, तो ख्रिश्चन आहे असा आमच्या मनांत द्वैतभाव पार उडवून देऊन बंधुत्वाचें क्षेत्र आपण वाढविले पाहिजे. आपण सर्वजण एका देशाचे, एका राष्ट्राचें, घटकायव आहों ही भावना नेहमी जागृत ठेविली पाहिजे. क्षुद्र रागद्वेष, क्षुद्र स्पर्धा, परस्परांतील जातिमत्सर इ. मत्सर बाजूला ठेवून हृदयाला जखडून टाकणारी, मनोवृत्ति आकुंचित करणारी बंधनें तोडून टाकून खुल्या हवेंत संचार करण्याची इच्छा बाळगिली पाहिजे. डोळे बांधून घाण्याला जुंपलेल्या बैलाप्रमाणे आणखीं किती दिवस आह्मी लहानशा जागेंत चक्राकार फिरत राहणार? इतर राष्ट्रें झपाट्यानें पुढें पाऊल टाकीत आहेत. आमच्या शेजारच्याच ब्रिटिश हिंदी लोकांकडे पहा!

प्रगतीचा मार्ग आपल्यापुढें खुला आहे. कर्तव्याची रेषा आपणाला स्पष्ट दिसत आहे. तर चला, अंधारातून आपण उजेडांत येऊं, निद्रावस्थेंतून जागे होऊ आणि आपल्या स्वार्थत्यागाने, विचार गांभीर्यानें, बाणेदार भाषणानें व उदार आणि थोर आचरणानें आमचें स्वातंत्र्य सर्वस्वी लुबाडणाऱ्यांना आह्मीं बायको माणसे नसून मर्द पुरुष आहों असें दाखवूं!

हर हर महादेव!

*(गुरुवार, दि. ४ ऑगस्ट १९२१)*

# मद्यपान व हिंदुसमाज

*न करील का पित्याची,*
*दुर्गतिची माडली मुरा माती।*

महानुभाव ल. रा. पांगारकर यांनी मडगांवच्या श्रीदामोदर विद्याभुवनांतील श्रीसरस्वत्योत्सवाच्या व श्रीदामोदर वाचन मंदिराच्या

वाढदिवसाच्या जोडसमारंभाच्या वेळीं अध्यक्ष या नात्यानें प्रसंगास अनुसरून वरील आर्यार्धाचा उल्लेख केला होता. त्या वेळची सभा मद्यपान निषेधार्थ भरलेली नव्हती हें खरें, पण या संस्था आपापल्या परीनें समाज कार्यार्थ अवतीर्ण झाल्यामुळें त्यांनी घडवून आणलेल्या या सभेंत चर्चेसाठीं निवडलेले विषय 'मद्यपानाचे दुष्परिणाम व मद्यपाननिषेध' हे होते. त्याबद्दल सदर संस्थांचें अभिनंदन केलें पाहिजे. वक्त्यांची भाषणें वाचून झाल्यावर पांगारकर बुवांनी आपल्या समारोपांत कविवर्य मयूरपंतांनी महाभारतांतील एका प्रसंगास उद्देशून काढलेले वरील उद्‌गार मोठ्या खुबीदार रीतीनें ग्रंथित करून श्रोत्याच्या मनावर बराच परिणाम केला होता, असें सांगतात.

मद्यपान हें व्यसन किती भयंकर आहे याची जाणीव हिंदुस्थानाला वेदकाळापासून होती ती अद्याप पर्यंत तशीच कायम आहे यांत बिलकूल संशय नाही. पण ह्मणतात ना 'समज आहे पण उमज नाही' तशी स्थिति परकी सत्तेच्या तडाख्यांत सांपडल्यामुळें आह्मां हिंदी लोकांची झाली आहे. वरचेवर होणाऱ्या परकी संस्कृतीच्या आघातींनी तत्त्वशून्य होऊन राहिलेल्या आमच्या समाजांत मद्यपानासारख्या व्यसनाचें स्तोम माजून राहिल्यास नवल नाही. अशिक्षित लोकांपेक्षां सुशिक्षित ह्मणविणाऱ्या वर्गांतच दारूची प्रतिष्ठा वाढत गेल्यावरूनच तिच्याविरूद्ध ब्र काढण्याची छाती अथवा धमक इतरेजनांस झालीं नाही. धर्मनिष्ठ हिंदुसमाजांत दारूबद्दल तिटकारा कांही कमी नव्हता. परंतु राजकर्ते युरोपियन सरकार पडलें दारूचें कैवारी!! त्यांमध्यें मानमान्यता मिळविण्यासाठी ह्मणून दारूचें व्यसन जडवून घेतलेलें! मग तो तिटकारा मनांतल्या मनांत दाबून टाकला नाही, तर अब्रु नुकसानीचा बागुलबोवा पुढें दाखविण्यांत येईल. यामुळेच त्या तिटकाऱ्यास ह्मणण्यासारखें तोंड फुटलें नाही. ह्मणूनच हे प्रतिष्ठित दारूबाज खाडिलकरांच्या शिष्यवराप्रमाणें आपल्या मालिकेंत नवेनवे मणि ओंवीत बसले. लो. टिळक, आगरकर, चिपळूणकर यांच्या सारिखे पुढारी पुढें आलें; तेव्हांच या प्रतिष्ठितांचें बंड मोडत चालले. मद्यपाननिषेधाची चळवळ वरील सारख्या लोकोत्तर व खंद्या वीरांकडून सुरू झाली व आतां महात्मा गांधी मद्यपानादि व्यसनें नष्ट होण्यांतच स्वराज्यसिद्धि आहे असें सांगून त्या कार्यार्थ अविश्रांत खटपट करीत आहेत. ही चळवळ

इतकी रंगारूपास आली आहे की हजारों लोक पिकेटिंगसाठी कायदा भंग करून कारागृहमंदिरांत जात आहेत; कांही मृत्युमुखी पडत आहेत, आणि लाखो लोक स्वयंसेवक वर्गांत नांवें नोंदवीत आहेत. याचें प्रत्यंतर पहावयास दूर जावयास नको. अगदीं शेजारी, गोमांतकांच्या उशीवर लोंढा, क्यासलरॉ सारख्या ठिकाणी कुणबी, महार, मांग, चांभार, भंगी आदि कनिष्ठ जाती सुद्धा आपापसांत सभा भरवून स्वत:स कडक नियम घालून घेत आहेत. आणि आह्मी! गोमांतकीय हिंदु!! वर्तमानपत्रें वाचून संतोष मानीत आहोंत!!!

वास्तविक पाहूं गेले तर मद्यपान निषेधाची चळवळ नावारूपास आणणें आह्मांस कठीण नाही. पण याचा विचार कोण करीतो?

'वर्णानां ब्राह्मणो गुरु' ह्मणून इतर वर्णांवर धार्मिक ताबा सांगणारें ब्राह्मण; आह्मी सोमसूर्याच्या वंशा जवळचे आहो, आह्मांस श्रीशिवाजी महाराजांप्रमाणे उपनयन संस्कार करून घेऊन वेदोक्तानें धार्मिक कर्मे चालविण्याचा अधिका आहे, असे ह्मणणारे मराठे क्षत्रिय, वर्णाश्रमधर्माप्रमाणें कृषि आणि वाणिज्य चालवूनच आह्मी आमची परंपरा राखिली आहे. ब्राह्मण क्षत्रिय याप्रमाणें आह्मांसहि वेदोक्ताचा अधिकार आहे असं ह्मणणारें वाणी-वैश्य लोक; त्याचप्रमाणे सेवावृत्ति हा आमचा धर्म असला तरी ती भटांची लबाडी आहे, सध्याच्या व्यक्तीस्वातंत्र्याच्या काळांत ती चालू देतां उपयोगी नाही, इतरांप्रमाणेच आह्मांसही धार्मिक अधिकार असणें न्याय्य आहे असें सांगणारे शुद्रवर्णीय लोक, या वेळीं आपसांतील चुरस बाजूस सारून समाजाच्या हाडींमासी खिळलेली व खिळू पाहणारीं मद्यपानादि व्यसनें निर्मूलन करण्यांस पुढें येतील तर हिंदुधर्म, हिंदुसमाज आणि हिंदुस्थान सोन्याप्रमाणें उज्ज्वल दिसूं लागतील.

हें सर्व खरें आहे. पण जोपर्यंत पणजी, मडगांव सारख्या शहरांतून देशी परदेशी दारूची दुकानें उघडणारे ब्राह्मण आहेत, जोपर्यंत काणकोण, आगोंदसारख्या गावांत दारू गाळण्याचा धंदा करणाऱ्यांत ब्राह्मण आणि मराठे दिसतात; जोपर्यंत दमणसारख्या प्रदेशांत दारूचा मक्ता घेण्यास ब्राह्मण जात असतात; जोपर्यंत दारूबाजांस चार चौघांत घेऊन मानमान्यता देण्यांत येत असते, तोपर्यंत या निंद्य व्यसनाची वाढ खुंटविण्सास बरेच श्रम व सायास

करावे लागतील. विचारी लोकांनी मनावर घेतलें तर हें काम भारी कठीण आहे असें नाही. मात्र मनाचा निर्धार पाहिजे. *'तुका ह्मणें तेथें पाहिजे जातीचे।। येरा गबाळाचें काम नाही।।२।।'* या श्री तुकारामोक्तीप्रमाणें जातीवंत, कळकळीनें भरलेले धर्मासाठी पर्वा न करणारे गृहस्थ पुढें येऊन त्यांनी आपणास या कार्यास वाहून घेतलें पाहिजे.

*(गुरुवार, दि. १९ जानेवारी १९२२)*

# पतितपरावर्तन

'भारता'च्या वाचकांस माहीत आहेच की, मडगांवच्या सारस्वत समाजांत वे. शा. स. एकसंभेकरशास्त्री यांचें 'हिंदुधर्म' विषयावर व्याख्यान झाले होते. या प्रसंगी दे. केळकर यांनी अध्यक्ष या नात्यानें समारोपादाखल केलेल्या भाषणांत धार्मिकदृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा एक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्याविषयी गोमांतकीय पुढाऱ्यांस विनंती केली होती.

उपरोक्त प्रश्न दुसरा तिसरा नसून पतितपरावर्तनासंबंधीचा होता. या विषयाची चर्चा चालू असताना, त्याला विरोध करणारी एकही व्यक्ती आढळून आली नाही. खुद्ध एकसभेकरांनी आपल्या मौनानें पतिपरावर्तनाला संमती दर्शविली. इतकेंच नव्हे, तर गोमांतकांचे इतर लोकमतही त्या विषयाला अनुकूलच आहे असे, आजपर्यंत तत्संबंधी कोणतेही विरोधात्मक अनुदार उद्‌गार ऐकूं न आल्यानें, ह्मणण्यास कसलाच प्रत्यवाय नाही.

करंबळी व चिंबल या दोन गांवात नावांने ख्रिस्ती पण कृतीनें निवळ हिंदु अशी सुमारें ३–४ हजार पतित स्थितींत खिचपत पडलेली माणसें आहेत. हिंदु शुद्र लोक जे आचार पाळतात तेच अक्षरक्ष: त्यांकडून पाळले जातात. मात्र जन्म व लग्न या दोन बाबतीत ते ख्रिस्ती पाद्रीचें व देवाचें दर्शन, संबंध आयुष्यांत, दोनदांच घेतात! या नावांने ख्रिस्ती लोकांचे हिंदुधर्मात परावर्तन झाल्यास हिंदूंचे नांव वाढणार आहे व जी आज हिंदुलोकसंख्या जवळ जवळ ख्रिस्ती लोकसंख्येबरोबर आहे ती चटदिशी वृद्धि पावून, हिंदूंचा राजकीय

दराराही त्यांच्या सामाजिक बलानें, सरकारी दरबारांत व इतर समाजांत प्रसृत होणार आहे.

हेच फायदे लक्ष्यांत घेऊन, आह्मांला वाटते, दे. तात्यासाहेब केळकरांनी, पतितपरावर्तनाचा प्रश्न सोडविण्याची आवश्यकता येथील जनतेस भासविली होती. केळकरांच्या लोककल्याणकारक विनंतीस मान देणें हें अर्थात आमचें पवित्रतम कर्तव्य ठरतें, हे ओघानेंच सिद्ध झालें.

कित्येक महिन्यांमागें सदरहू पतित लोकांच्या परावर्तनाच्या चळवळीस- ही चळवळ गोव्यांत सुरू झाल्यास आज अनेक वर्षे लोटली, हें नमूद करण्यास समाधान वाटतें. यशस्वी स्वरूप आणण्याच्या उद्देशानें, रायबंदरचे उत्साही व नि:स्वार्थी तरुण रामचंद्र लवंदे व त्रिविक्रम येळेकर यांच्या समवेत आह्मी चिंबेल येथे जाऊन त्या समाजांतील पुढाऱ्यांच्या भेटी घेतल्या होत्या. त्यावरून तेथील एकंदर पतित लोक हिंदु धर्मात परत येण्याविषयी फार उत्सुक आहेत, असें आह्मांस फिरून एकदां दिसून आलें. त्यांच्या परिवर्तनाची चळवळ आह्मांकडून अल्पप्रमाणांत कां होईना? - चालू होती तिला आतां केळकरांच्या शिफारसीमुळें जास्ती चलन मिळणार असून, ते पतित लोक पावन झाल्याचें पहाण्याचें भाग्य लवकरच गोमांतकीय जनतेस लाभेल, अशी आशा करण्यास मुबलक जागा आहे. पहावें काय होतें तें.

*(गुरुवार, दि. २० एप्रिल १९२२)*

## स्वामी विवेकानंदांचे विचार
# पतितपरावर्तन - हिंदुधर्माची मर्यादा

(गेल्या अंकी वचन दिल्याप्रमाणें श्री स्वामी विवेकांनदजींचे पतितपरावर्तनासंबंधीचे विचार खाली देत आहों. हे विचार स्वामींनी 'प्रबुद्ध भारता' च्या एका रिपोर्टरपाशीं, त्यांनी घेतलेल्या मुलाखतींत, प्रदर्शित केले (प्रबुद्ध भारत, एप्रिल, १८९९) ती मुलाखत जशाची तशी खाली प्रसिद्ध

केली जात आहे. सं. भारत)

पतित व परधर्मी लोकांना हिंदुधर्मात घेण्यासंबंधानें स्वामींचे विचार काय आहेत, हें मुद्दाम त्यांची मुलाखत घेऊन कळवावें, अशी आपली (प्रबुद्ध भारताच्या संपादकांची) आज्ञा झाल्यावरून एके दिवशीं सायंकाळीची मी तशी संधी साधली. गंगानदीवरील एका नौकागृहाच्या छपरावर आमची ही मुलाखत झाली. रात्र पडली होती. आह्मी आपली नौका रामकृष्णमठाच्या घाटाजवळ उभी केली, व मग माझ्याजवळ बोलण्यासाठी स्वामी मंठातून तेथें आले.

काळ व स्थळ ही मोठी रम्य होती, वरती लखलखीत तारे, आणि सभोवती खळाळणारी गंगा, एका बाजूला मंद दीपांच्या अंधुक तेजानें अर्धवट प्रकाशित अशी मठाची इमारत असून तिच्या पृष्ठभागी ताल व इतर काही विशाल वृक्ष दिसत होते. मी पहिल्यानें बोलण्यास सुरवात करून ह्मटले, स्वामींजी, पतितपरावर्तनासंबंधाने आपले विचार कळावे, ह्मणून मी मुद्दाम आपल्या भेटीला आलों आहे. हिंदुधर्म सोडून ज्यांनी परधर्माचा स्वीकार केला, त्यांना आपण परत घ्यावें, असें आपल्याला वाटतें काय?

स्वामी ह्मणाले, 'अलबत! त्यांना घेतां येईल व घेतलें पाहिजे.'

ते अगदी गंभीर मुद्रा करून कांहीवेळ स्वस्थ विचार करीत बसले व नंतर पुन्हा ह्मणाले, तसें आपण नाही केलें, तर आपली संख्या कमी होत जाईल. पहिल्यानें ज्या वेळीं मुसलमान आले, त्यावेळी आमची संख्या- मला वाटते अत्यंत प्राचीन मुसलमान इतिहासकार जो फेरिस्ता त्याच्याच ह्मणण्याप्रमाणें साठ कोटी होती. असें ह्मणतात. आतां आह्मी सुमारें वीस कोटी आहो. बरें, जो मनुष्य बाहेर पडतो, तो आमच्यांतून कमी होतो इतकेंच नव्हे तर आमच्या शत्रुची संख्या एकानें वाढवितो.

'बरें हिंदुधर्मातून जे ख्रिस्ती किंवा मुसलमानी धर्मात गेलेले आहेत, त्यांतील बहुतेक तरवारीच्या भीतीनें गेलेले आहेत, किंवा त्या भीतीने गेलेल्यांचें वंशज आहेत. तेव्हां कोणत्याही दृष्टीनें त्यांना कमी लेखणें, हा धडधडीत अन्याय आहे. जे जात्याच परधर्मी आहेत त्यांच्यासंबंधानेंहि आपण विचारलें, नाही का? प्राचीन काळीं अशा परधर्मी लाखों लोकांना

आह्मी हिंदुधर्मात घेतलें आहे, व तो क्रम अद्यापिही सुरू आहे.'

'भरतभूमींत वास करणारे मूळचे अनार्य रानटी लोक, हिंदुस्थानच्या सरहद्दीबाहेरची राष्ट्रें, आणि मुसलमानांनी आमच्यावर आपलें राज्य स्थापण्यापूर्वी आह्मांला ज्यांनी अंकीत केलें होतें, ते लोक, इतकेंच नव्हे तर ज्या जातीची नांवे विशेषकरून पुराणांत आढळतात. त्या जातीचे लोक, या सर्वांना माझ्यामतें माझें हे विधान लागू पडते मला असें वाटतें की, ते परधर्मी असून त्यांना नंतर आह्मी आपल्या धर्मात घेतलें.'

'आपखुषीनें ज्यांनी एकदां हिंदुधर्म सोडला, त्यांना जर पुन्हा परत आपल्या धर्मात येण्याची इच्छा उत्पन्न झाली, तर मात्र त्यांना प्रायश्चितविधी आवश्यक आहे, यांत काही शंका नाही. पण केवळ तरवारीच्या धारेमुळें ज्याना परधर्म स्वीकारावा लागला, त्यांच्यावर किंवा परधर्म जात असून जे खुषीने आमच्या धर्मांत येऊं इच्छित असतील त्यांच्यावर प्रायश्चिताचा बोजा अगदीं घालूं नये.'

मी भीत भीत ह्मटले, 'पण, स्वामीजी या लोकांची जात कोणती होणार? जात ही कोणती तरी त्यांना पाहिजेच, नाही तर हिंदुसमाजाच्या विराट देहाला ते चिकटणार कसे? तेव्हां आमच्या समजांत त्यांना योग्य स्थान कोणतें द्यावे?'

स्वामी शांतपणे ह्मणाले, 'परावर्तकांनी, अर्थात, आपापल्या मूळच्या जातीत जावे. आणि नवीन लोकांनी आपली नवीन जात बनवावी. वैष्णव पंथांत पूर्वी असें झालेलें आहे, हें तुमच्या लक्षांत असेलच. नाना जातींचे व नाना धर्मांचे लोक वैष्णवी निशाणाखाली गोळा होऊन त्यांनी एक आपली निराळीच जात बनविली, व ती पुढें चांगल्या योग्यतेसहि चढली. रामानुजांपासून चैतन्यापर्यंत सर्व वैष्णवसाधूंनी तसेंच केलें आहे.'

मी विचारले, 'आणि या लोकांचे शरीर संबंध कसे व्हावे?'

स्वामी शांतपणे ह्मणाले, 'सध्या त्यांच्यात चालू आहेत तसेच आपापसांत.'

मी ह्मटले, 'बरें त्यांच्या नावासंबंधानें काय? मला वाटतें, ज्या

पतितानें अहिंदु नांवे घेतली असतील त्यांची व अगदी नवीन जे परधर्मातून येतील त्यांची नवीन नांवे ठेवावी. त्यांना जातिवाचक नावें देणें आपणास बरे वाटतें, की दुसरी काही?'

स्वामी अर्धवट विचारात गुंग असल्याप्रमाणे ह्मणाले, 'होय, नावांत पुष्कळ आहे खरें!'

आणि या प्रश्नासंबंधने ते जास्त कांहीच बोलले नाहीत.

पण माझ्या पुढील प्रश्नानं ते लालच झाले. 'हिंदुधर्मात नाना पंथ व नाना मतें आहेत, तेव्हां त्यांपैकी कोणत्या पंथाला किंवा मताला त्यांनी अनुसरावं, ही गोष्ट त्यांच्या पसंतीवर ठेवावी, की त्यांना एक विशिष्ट मार्ग आखून द्यावा?'

ते ह्मणाले, 'काय तुह्मी विचारतां हें? त्यांच्याच पसंतीवर ठेवावें. प्रत्येक माणसाच्या पसंतीवर जर तें ठेविलें नाही, तर मग हिंदुधर्माचें ब्रीद गेलेच. इष्ट-स्वातंत्र्य हा तर आमच्या धर्माचा बाणा.'

हे उद्गार मला फारच महत्त्वाचे वाटले, कारण मला वाटलें, मजपुढें असलेल्या गृहस्थांनी हिंदुधर्माच्या सर्व सामान्य तत्त्वांचा शास्त्रीय व निर्दृष्ट पद्धतीनें अभ्यास करण्यास जितकी वर्षे खर्च केली आहेत. तितकी आज हयात असेलल्या कोणीही गृहस्थाने केली नसतील, आणि इष्टस्वातंत्र्याचें हें तत्त्व, अर्थात, एवढें थोर आहे, की त्यांत सर्व जगाचा समावेश होईल...

(विवेकानंद पुस्तक-माला-पुस्तक १ लें, मुलाखती व संभाषणे, पान ९२)

*(गुरुवार, दि. २७ एप्रिल १९२२)*

# गोहत्येतून मुक्त व्हा!

या आमच्या हिंदुस्थान देशाचें दारिद्र्य वाढवायला कारणीभूत होणाऱ्या अनेक परदेशी वस्तूंपैकी, कापडाच्या खालोखाल साखरेचा नंबर लागतो. या साखरेच्या पायी या गरीब हिंदुस्थानांतून, दरसाल जवळ जवळ

दहा कोटी रुपये परदेशी रवाना होत असतात. एकट्या गोमांतक प्रांतातून तीन साडेतीन लाखांची त्या संख्येत भर होत असते. या दहा कोटी रुपयांच्या मोबदल्यास मिळणारी जी साखर तिच्यामुळें आमचें जिव्हालौल्य तर वाढलेंच, शिवाय, चहा, कॉफी, कोको, यासारख्या आरोग्यास अपायकारक अशा अनिष्ट व्यसनांचा फैलाव जारीनें सुरू होण्यास बरीच मदत झाली. आणि झालें काय की, दिवसेंदिवस जनता चैनबाज होऊन बिनताकदवान व्हावयास लागली.

सांपत्तिक व शारीरीक बाबतींत अधोगतीला येणारी ही साखर इतकेंच करून थांबली नाही. तर मुसलमानी तरवारींनी आणि ख्रिस्ती मिशननीं केली नाही, इतकी धर्मभ्रष्टता, नकळत, मुखावाटे आमच्या हाडीं मांसी तिनें खिळविली. आह्मांला आमचा धर्म किती प्रिय होता व आहे हें आह्मी मोठ्या अभिमानानें सांगू शकतो. परंतु या, साखरेनें आह्मांला धर्मलंड बनविलें, चैनबाजी वाढविली. नादान करून सोडलें आणि परमवंद्य अशा गोमातेच्या रक्तानें व अनेक जनावरांच्या हाडकांनी इतकेंच नव्हे तर सजातीय अशा माणसांच्या प्रेतांनी आमचा देह विटाळून सोडला!! हें सर्व दुष्परिणाम आह्माला स्वदेशी चळवळीनें जाणवून दिले असें असतां आह्मांस त्याची लाज वाटत नाही. तिच्या अपवित्रतेची किळस येत नाही. प्रत्यक्ष गोहत्येचा डाग लागत असताना चीड येत नाही, अनेक अपवित्र पदार्थांनी पांढरी सफेंत झालेली ही साखर पाहून तिचा वीट यावयाचा तो येत नाही व उलट घरांतून, देवस्थानांतून हजारोंलाखो नव्हें कोट्यावधी रुपयांची साखर आह्मीं बिनदिक्कत वापरतो यास काय ह्मणावे? आमची धर्माभिमानता नष्ट झाली की, विचारशक्ती लयाला गेली की, दोन्ही ठार झाली? कसेंही असो, परदेशी साखरेच्या वरपांगी, निवळ वरपांगी स्वरूपाला, तिच्या क्षणिक रुचीला भुलून आह्मीं दिवसामागें चार आठ आण्याचा खर्च वाढीविला, नवीन नवीन व्यसनें जडवून घेतली, चैनबाज बनलो. दातांच्या व जंतांच्या विकारांनी बेजार झालो व देश शारीरिक सांपत्तिक, नैतिक व धार्मिक बाबतींत धुळीला मिळवून टाकिला.

प्रसिद्ध वंग–भंगा नंतर स्वदेशी बहिष्काराची जी लाट सर्व हिंदुस्थानभर पसरली तिनेच या साखरेची खरीखुरी ओळख साक्षीपुराव्यानिशीं करून दिली, पण आह्मी किती निगरगट्ट! एकदां आपलीशी केलेली ही साखर, मग ती

कितीही अपवित्र असेना, कितीही घातक असे ना सोडणें आमच्या जिवावर यावयास लागलें व उलट तिला सोकावलेली, चटावलेली आमची जीभ, तिची तरफदारी करण्यास पुढें सरसावून आली. कोणी ह्मणावें, ही साखर आज शेकडो, हजारो, लाखों वर्षें ह्मणजें जगाच्या उत्पत्तीपासून, आपण वापरीत आलो आणि आजच ही अपवित्र कशी झाली? हें सर्व स्वदेशीवाल्यांचे ढोंग आहे, यांना इंग्रजी मालावर बहिष्कार घालून स्वराज्य मिळवावयाचें आहे, ह्मणूनच तें हें गोहत्येंचें निमित्त पुढें करीत आहेत. कोणी ह्मणावें कीं, जर ही साखर आमच्या देवस्थानांतून वापरण्यांत येते तर तिच्या पवित्रतेची शंका आह्मांस काय ह्मणून यावी? ती अपवित्र असली तरी 'पदरी पडलें पवित्र झालें.' या न्यायानें तिला आह्मी पवित्र मानणार, कोणी ह्मणावें की, या साखरेंत कांही गुरांचे रक्त हाडकें वगैरे दिसत नाहीत. कारखान्यांत ती वापरीत असतील पण 'डोळ्या आड मसण पाव' असें समजून काय हरकत आहे? व कोणी याहि पुढें जाऊन ह्मणावें की, अहां हें सर्व त्या जहाल वर्तमान पत्रकारांनी उठविलेलें काहून आहे, त्यांना कोणत्याही तऱ्हेनें आपल्या पत्राचे रकाने भरुन काढावयास पाहिजेच होते, त्यांत ही वंगभंगाची, स्वदेशीची, बहिष्काराची संधी सापडली. मग काय विचारता? राजकीय, सामाजिक, औद्योगिक निमित्तें पुढें केली तरी व्हावा तसा परिणाम झाला नाही. ह्मणजे धार्मिक बाब पुढें करून परदेशी साखरेच्या अपवित्रतेवर दिले कोलमच्या कोलम खरडून. त्यांच्या त्या लिहिण्यावर हुरळून जाऊन साखर सोडूं गेलों तर आह्मी थोडेच पवित्र होणार आहों!! या पूर्वी खाल्लेली साखर आमच्या रक्तांत हाडांमासांत मिळली गेली आहे तिची वाट काय आह्मी आमच्या खाण्याच्या पदार्थांवर, 'अपवित्र पवित्रेवा' या मंत्रानें जलसिंचन करतों तें काय फुकटच? त्यापुढे या लटक्या अपवित्रतेची काय बिशाद लागून राहिली आहे? असे एक ना दोन शेंकडो युक्तीवाद शर्कराभक्तांकडून पुढें आलें होते व त्यांना त्या वेळच्या वर्तमानपत्रांतून समर्पक उत्तरेंही देण्यांत आलीच होती. परंतु 'न कर्त्याचा वार शनिवार' या न्यायानें या तसल्या लोकांवर त्यांचा योग्य परिणाम झालेला दिसला नाही. सुदैवानें महात्मा गांधीच्या असामान्य कर्तृत्वाने असहकारितेची जी चळवळ चालू आहे तिचें स्वदेशी हें एक मुख्य अंग आहे.

व या अंगानें चळवळ करणाऱ्यांनी परदेशी साखरेवर जे वाङ्मय प्रसिद्ध केले आहे ते अत्यंत किळसवाणें असलें तरी प्रत्येक हिंदुनें विचार करण्याजोगें आहे. ह्मणून नमुन्यादाखल बेळगावच्या गोसेवक पत्रांत जी माहिती आली आहे त्या पैकीं कांही या खाली आमच्या वाचकांस सादर करीत आहों.

साखर लोखंडाच्या एका कढईत टाकून गाळण्यांत येते. त्याला एक एक नळ लावण्यांत येतो त्यांतून गरम पाणी आत येत असतें. पहिल्यानें मळकट साखर रक्तांच्या योगानें साफ करतात. फिरुन त्या रसाला जनावरांच्या राखेमध्यें मिसळतात.

***– एनसायक्लो पिडिया ब्रिटनिया.***

साखर साफ करताना रक्ताच्या ऐवजीं जर अंड्याच्या आंत असलेल्या पांढऱ्या बलकाचा उपयोग केला तर फार चांगले.

***– डिक्शनरी ऑफ आर्ट.***

माझ्या विलायतच्या प्रवासांत जेव्हा विलायतेंतील साखरेचे कारखाने पाहण्यास गेलो तेव्हां पहिल्या मजल्यावर चढतांच नासकें रक्त आणि हाडांचे ढीग पाहून मला ओकाऱ्या येऊं लागल्या. साखर तयार करण्यास असल्या अपवित्र वस्तु वापरीत असतील याची माझ्या मनांत मुळीच कल्पना नव्हती. जेव्हां जेव्हां मला या भयंकर देखाव्याची आठवण होते. तेव्हा माझें डोकें फिरुन जाऊन मला ओंकारी येऊं लागते.

***– स्वामी भास्करानंद सरस्वती***

साखर सफेत करीताना मोरीशस मळेवाले गाईच्या चरबीचा उपयोग करीतात.

***– वृंदावन***

मोरस साखर बैलांचे रक्त आणि मनुष्याचें मूत्र यांच्या योगानें साफ करीतात.

***– श्री. व्यंकटेश समाचार***

शौचाला न साफ होणे आणि रक्त दुषीत होणें हें परदेशी साखरेचे उपकार आहेत.

***– पंडीत हनुमान***

मोरस साखर खाल्ल्यानें प्लेग उत्पन्न झाला आहे.

***– पंडित राम दयाळ***

परदेशी साखर साफ करताना नानाप्रकारच्या रोगानें मरण पावलेल्या गरीब मनुष्यांच्या प्रेतांचा उपयोग करतात.

***– वर्ल्ड***

वर देण्यांत आलेली माहिती त्या विषयावरील अधिकारी पुस्तकांतून पत्रांतून आणि जबाबदार व्यक्तींनीं दिलेल्या व्याख्यांतून आह्मी मिळविलेली आहे. हें त्या त्या खाली दिलेल्या नावावरून आमच्या सूज्ञ वाचकांस समजलेच. असें असतां तिजबद्दल संशय घेणें ह्मणजे आपल्या पदरांत अज्ञान बांधणें होय. त्यांतल्या त्यांत प्रस्तुत चळवळीशीं ज्यांचा काडी इतकाही संबंध नाही अशा इंग्रजी ग्रंथांतून, सर्वमान्य इंग्रजी ग्रंथांतून घेतलेली माहिती कधीही खोटी असणें शक्य नाही. तसेंच जोपासून परदेशी साखरेच्या कारखानदारांकडून किंवा व्यापाऱ्यांकडून उलट पुरवा पुढें आला नाही तोपर्यंत आह्मांस घरच्या घरी, बसल्याजागी, परदेशी अपवित्र साखरेने तयार केलेले पदार्थ चघळीत, अधिकारी पुस्तकांतून, पत्रांतून व जबाबदार व्यक्तीकडून मिळविलेली माहिती खोटी आहे असें ह्मणण्याचा कसलाच अधिकार नाही, यापुढें व असला जबरदस्त पुरावा पुढे असतानां देखील जर आह्मी या परदेशी साखरेशी संसर्ग ठेवूं लागलो तर आमच्या साखरें नादान, धर्मलंड, गोभक्षक, नरभक्षक आह्मींच ठरूं. ह्मणून सर्व देशबांधवांस व विशेषत हिंदुधर्मबांधवास अशी विनंती आहे की, स्वदेशाच्या कल्याणासाठी, गोमातेची हत्या चुकविण्यासाठी तसेंच इतर अनेक मूत्र मांसादि अपवित्र पदार्थांचे सेवन टाळण्यासाठी आपल्या घरांतून, देवस्थानांतून व इतरत्र ठिकाणी होत असलेला परदेशी साखरेचा अनिरुद्ध संचार कडकडीत बहिष्कारानें बंद

करा आणि जाणून बुजून, समजून उमजून होत असलेली गोहत्या टाळा. यांत तुमचें, तुमच्या देशाचें व तुह्माला प्राणाहूनहि प्रिय असणाऱ्या धर्माचें अत्यंत हित होणार आहे. गरीब जनता व गोमाता तुह्मांला आशीर्वाद देणार आहे. याच आशीवार्दानें गांधी महाराज सांगतात तें स्वराज्य, आत्मविश्वासाने मिळणारें स्वराज्य हळूहळू येणार आहे. यतो धर्मः स्ततो जयः

*(गुरुवार, दि. २६ ऑक्टोबर १९२२)*

# मद्यपान प्रतिबंध

मद्यपान प्रतिबंधाची आवश्यकता अनेकदां आह्मी सरकारच्या नजरेस आणिली आहे. परंतु त्याचा व्हावा तसा व तितका उपयोग झाला नसल्यानें खालील मजकूर आह्मी सरकारास अर्पण करीत आहों. त्यामुळें तरी नोकरशाहीची 'मद्यपि' दृष्टि निवळून तिच्या मेंदूत सुविचार जागृति होवो, असें इच्छितो.

अमेरिकेंतील मॅसॅच्युसेटस संस्थानामध्ये मद्यपान प्रतिबंधाचा–कायदा केल्यापासून गुन्हे, दारिद्र्य, रोगराई वगैरे समाजशत्रु कसें नाहींसें होत चाललें आहेत. ह्याबद्दल बोस्टन येथील सायंटिफिक टेम्परन्स फेडरेशनच्या चिटणीस मिस कोरो फ्रांसेस स्नॉडर्ड यांनी शोधक बुद्धीनें पाहणी करून हारवर्ड मेडिकल स्कूलचें डॉ. रिचर्ड सी कॅबॉट ह्मणतात– 'मद्यपानप्रतिबंधाने मॅशॅच्युसेट मधील गरिबांवर अनंत उपकार झाले आहेत. त्यांची प्रकृती आतां सुधारली गेली आहे. बायकांतील मद्यपानाचें प्रमाण तर फारच कमी झाले आहे.'

मिस स्नॉडर्ड यांनी तुलनेसाठी. मद्यपानप्रतिबंधाच्या आधींची स. १९११ ते १९१८ ही सात वर्षे, व मद्यपानबंदी झाल्यानंतरची दोन स. १९२० व २१ ही वर्षे घेतलीं व त्या अवधींत मद्यपानप्रतिबंधापासून किती फायदा झाला हें दाखविलें, आहे, त्यावरुन असें दिसतें;

दारुपायीं अटक होणारांची संख्या निम्याहूनहि कमी झाली. तुरुंगांतील कैद्यांची संख्या निम्याहून कमी झाली मद्यपानप्रतिबंधापूर्वी शेंकडा अठरा मुलांचे बाप, व शेंकडा तीन मुलांच्या आशा दारुबाज असत. आतां बापांचे प्रमाण शेंकडा एकावर आलें असून दारुबाज आयांचे तर नांव नाही.

शाळेंतील हजेरीचें प्रमाण वाढलें आहे.

मुलांना अन्नवस्त्र बरें मिळूं लागले आहे. दारुपायी होणाऱ्या मृत्यूचें प्रमाण निम्यापेक्षां कमी झालें आहे.

दवाखान्यांतील दारुबाज रोग्यांचें प्रमाण कमी झालें आहे.

कुटुंबवत्सल मनुष्य दारुबाजाच्या कंपूतून फुटला आहे त्यामुळें भिक्षागृहातील संख्या निम्यापेक्षां कमी झाली आहे.

मिस स्नॉडर्डची ही विधानें सत्य असल्याबद्दल कित्येकांनी ग्वाही दिलेली आहे.

सौथ एन्ड मिशनचे सुपरिटेंडंट ह्मणतात– मद्यपानप्रतिबंधाचा कायदा होण्यापूर्वी आमचेकडे जे लोक मदत मागण्यांत येत त्यांस कारण दारू हेंच होतें. आता आमच्याकडे शेंकडा दोन माणसेंही मदत मागण्यास येत नाहीत.

सौथ एन्ड हाऊसचे आलबर्ट जे. केनेडी ह्मणतात – 'मद्यपान प्रतिबंधाचा कायदा होण्यापूर्वी आमच्या भोवती जी स्थिती होती त्यापेक्षां आता किती तरी सुधारलेली आहे. कौटुंबिक सुखाची वृद्धी झाल्याचें दिसून येते. मद्यपान सोडल्यानंतर दुसरें तत्सम पेय घेण्याकडे लोकांची प्रवृत्ति कमी आहे. गुत्ते कमी झाल्यामुळें लोकांस बरेंच वाटत आहे. दारू हा मोठा शत्रू आपणांत शिरला होता असें मजुरांसहि वाटत आहे, व असें गुत्तें पुन: सुरू व्हावे अशी कोणाचीही इच्छा नाही.

मि. मूर ह्मणतात– गेली पंचवीस वर्षे या गुत्याचें फारच प्राबल्य माजलें होते. परंतु मद्यपान प्रतिबंधाचें युग सुरू होताच पूर्णांशाने जरी नाही तरी जुन्या प्रगतीशी तुलना करीतां पृथ्वीचा स्वर्ग झाला आहे, असें ह्मणण्यास हरकत वाटत नाही.

हारवर्ड युनिसिव्हटींचे अध्यक्ष डॉ. चार्लस डब्लू- एलिएट ह्मणतात- मद्यपान प्रतिबंधाने लोकांचे आरोग्य, सुख व काम करण्याची शक्ती वाढली आहे, अशा तऱ्हेचा पुरावा कारखानदार वैद्य, व इतर निरनिराळ्या संस्थांत कामें करणारीं मंडळी यांजकडून मिळत आहे. दारिद्र्य रोगराई, गुन्हेगारी व दुर्व्यसनें नाहीसीं होण्यास मद्यपानप्रतिबंधाशिवाय दुसरा उपायच नाही असें अनुभवास आलें आहे.

*(गुरुवार, ४ जाने. १९२३)*

# पतितपरावर्तन

करंबळी, चिंबेल, देवस वगैरे ठिकाणीं नांवानें ख्रिस्ती पण आचरणानें निवळ हिंदु असे 'गावडे' या संज्ञेने ओळखले जाणारे हजारो लोक आहेत. या लोकांस ख्रिस्ती ह्मटलेलें खपत नाही व ख्रिस्त्यांचे बहुतेक त्यांना पचत नाहीत.

तुळशीपूजन, श्राद्धकर्म, इत्यादी विधी ते राजरोसपणे आचरतात. हिंदु देवादिकांना श्रद्धापूर्वक भजतात. हिंदूत रुढ असलेल्या समजूतीही त्यांच्यात आढळून येतात. तात्पर्य मनानें हिंदू पण सोंगानें ख्रिस्ती, अशी त्या गावडे लोकांची स्थिती आहे.

उपरोक्त गावडे लोकांस शुद्ध करून हिंदुधर्मात विधियुक्त घेण्याची आवश्यकता आह्मी अनेकदां याच जागी भासविली आहे, परंतु त्याचा हवा तितका उपयोग झालेला नाही, ही दुर्दैवाची गोष्ट होय.

स्वामी श्रद्धानंदजींनी बाटलेल्या हजारों हिंदु लोकांस पुनीत करून, हिंदुधर्माच्या लौकिकात मनस्वी भर घातली आहे. स्वामीजींच्या या उदाहरणानें तरी पतित गावडे लोकांच्या परावर्तनाच्या शुद्धी चळवळीस प्रोत्साहन मिळेल, अशी आमची समजूत आहे व ह्मणूनच येथील हिंदुधर्माधिकाऱ्यांस आमची विनंती आहे की, त्यांनी काळजीपूर्वक हा पतितपरावर्तनाचा प्रश्न हातांत

घेऊन यशस्वी रीतीनें सोडवावा व हिंदुधर्माचें तेज सर्वत्र फांकवावे.

जागेच्या अभावीं प्रस्तुत विषयावर आज या पेक्षां जास्ती लिहिणें शक्य नाही.

*(गुरुवार, दि. १२ एप्रिल १९२३)*

# पतितपरावर्तन

मागे एकदां भारतानें स्वामी विवेकानंदजींच्या लेखांचा भरभक्कम आधार दाखवून गोमांतकांतील बाटविले गेलेल्या 'गावडे' लोकांस परत हिंदुधर्मात घेण्याची कसलीच आडकाठी नसावी असी इच्छा प्रदर्शित केली होती. नंतर स्वामी श्रद्धानंदजींच्या शुद्धचळवळीकडे वाचकांचे लक्ष वळवून, गावड्यांच्या परिवर्तनाचा प्रश्न शक्य तितक्या जलदगतीनें व यशस्वीरीतीनें सोडविण्याची भारतानें धर्माधिकाऱ्यांस विनंति केली पण उपरोक्त कार्यार्थ कोणीही पुढें सरसावल्याचें अजून आमच्या ऐकिवांत नाही.

ही गोष्ट अर्थात समाधानकारक नाही. गावडे लोकांची इतकीच इच्छा आहे की, हिंदुधर्मात शिरकाव झाल्यावर त्यसांस कोणत्याही हिंदुदेवालयांत जाण्यास प्रत्यवाय असूं नये. हिंदुवर्णांपैकी देवालयांसंबंधी जितके अधिकार क्षुद्र जातीस दिले जात आहेत. तितकेच त्यांस मिळाले ह्मणजे परावर्तनापासून ते आपणास धन्य मानून घेणार आहेत. रोटी किंवा बेटी व्यवहाराला ते सध्या विशेष महत्त्व देत नाहीत. कारण, त्यांची संख्या बरीच मोठी असल्यानें त्या बाबतीत त्यांना कसल्याच अडचणींशी झगडावे लागणार नाही. मात्र जबरीनें लादलेल्या ख्रिस्तीधर्माकडे आपखुषीनें पाठ फिरविली ह्मणजे हिंदुदेवांना राजरोस रीतीनें भजण्याची त्यांस अढळ सवलत मिळाली पाहिजे.

गावडे लोकांची इच्छा अर्थात सुलभ रीतीनें पुरविण्यासारखी आहे. कां. कीं, धर्म व राजकारण या उभय गोष्टींकडे लक्ष देऊन तिला विरोध करण्याचा मूढपणा कोणीही आचरील असें सहसा वाटत नाही.

अशा स्थितींत गावडे लोकांच्या परावर्तनार्थ न झटणें ह्मणजे पाप नव्हे काय?

*(गुरुवार, दि. ३ मे १९२३)*

# बळी तो कान पिळी

हें जुनें तत्त्व मानव जातीच्या जन्मकालीं समाजांत जितकें स्वैर संचरत होते, तितकेंच मानव जातीच्या सध्याच्या ऐन तारुण्यांतहि आपला हडेलहप्पी धिंगाणा घालण्याचें काम बजावीत आहे. पूर्वीच्या व आतांच्या माणसांत सुधारणेच्या मानाने जितकें अंतर आहे, तितकेंच अंतर शिरोभागी उल्लेखिलेल्या तत्त्वाच्या जुन्या व नव्या अमलबजावणींत दिसून येते. हा उत्क्रांतिशास्त्राला धरुन असलेला फरक वजा केल्यास. 'बळी तो कान पिळी' या जुन्या सिद्धांताला कसलाच बाध येऊ शकत नाही.

ही अति परिचयाची विचारसरणी आज लेखणींतून उतरण्यांचे कारण, आज कित्येक वर्षांपासून नवीन काबिजादींतल्या कांही गांवात बड्या माणसांकडून अशिक्षित व अनाथ माणसांवर चालत असलेला जुलूम हें होय. राजकीय वातावरणांत अनेक स्थित्यंतरे घडून आली, किती तरी गव्हर्नर आले व किती तरी गव्हर्नर गेले, खुद्द अनियंत्रित राज्यपद्धतीची शकले होऊन नवीन प्रजासत्ताक राज्यव्यवस्था प्रस्थापिली गेली, पण जुना जुलूम चालू आहे तो आहेच.

हा जुलूम कसा नष्ट होईल याचा प्रत्येक स्वातंत्र्याभिमान्यानें विचार केला पाहिजे. गुलामापेक्षांहि वाईट रीतीनें वागविण्यांत येणाऱ्या मानवी प्राण्यांस दुःखांत चांचपडत ठेवणें बड्यांच्या फायद्यांच्या दृष्टीनें योग्य असलें तरी कायद्यांच्या दृष्टीने खास वाजवी नाही. जनतेचे कैवारी ह्मणवून घेणाऱ्या प्रत्येक देशभक्ताचें पहिले कर्तव्य सदरील लोकांस दुःखमुक्त करणे हें होय. यामुळे बड्या लोकांकडून बराच छळ सोसावा लागेल. परंतु त्यांची पर्वा करतां कामा नये.

'बळी तो कान पिळी' या आसुरी तत्त्वाला कसून विरोध होणें सर्वतोपरी अगत्याचें आहे. हे काम अत्यंत कठीण पण जरुरीचे आहे. आमच्यांतील सात्त्विक व धैर्यशाली तरुणांनी नवीन काबिजादींतील गुलामगिरी झुगारुन देण्याप्रीत्यर्थ अविश्रांत सनदशीर प्रयत्न केले पाहिजेत. अत्याचारानें संशायास्पद स्वरुप सुद्धां त्या प्रयत्नांना शिवूं न देण्याची काळजीपूर्वक खबरदारी घेतली पाहिजे. असो.

तात्पर्य, जुलूमाच्या तावडींत सापडलेल्या लोकांना दुःखमुक्त करणें ही सांप्रतची महत्त्वाची कामगिरी आहे. तीजकडे दुर्लक्ष न होईल अशी आशा केल्यास, अगदींच 'अरण्यरुदन' होईल असें आह्मांस वाटत नाही.

*(गुरुवार, दि. ३१ मे १९२३)*

# तरुणांनो उठा!

लहानांनी मोठ्यांचे जुलूम निमूटपणें सहन करावे हा त्यांचा निसर्गसिद्ध धर्मच आहे असें समजलें जाते. या नियमाचा अनिष्टपणा लुप्त करणें सुद्धा रिपब्लिकसारख्या उदार धोरणी ह्मणून डंका वाजवून घेणाऱ्या राज्यपद्धतीला सुद्धां शक्य नाही असें अनेक कारणांवरुन वाटावयास लागत नाही.

अनाथ लोकांचा पक्ष स्वीकारुन, बड्या लोकांची कृष्णकारस्थानें उघडकीस आणणारानें आपलें मनःस्वास्थ्य धोक्यांत घातलें पाहिजे. जणूं काय अनाथ ह्मणजे नागरिकच नव्हेत. त्यांना मतःस्वातंत्र्य नाही. त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायांचा प्रतिकार करण्याचा त्यांना हक्क नाही. इतकेंच नव्हे, तर त्यांना सुख पाहिजे असल्यास त्यांना बडे लोक किंवा त्यांच्या हाताखालचें 'मुकदम' जें जें मागतील तें तें त्यांना नम्रतापूर्वक नजर केलें पाहिजे.

'बळी तो कान पिळी' या लेखांत आह्मीं नवीन काबिजादींत बड्यांकडून आचरल्या जाणाऱ्या अत्याचाराचें यथासांग वर्णन केलेंच आहे. आतां इतकेंच सांगावयाचें की, बड्यां विरुद्ध चळवळ करणाऱ्या सात्त्विक

वृत्तीच्या लोकांस यश येणें आमच्या पोर्तुगीज कायद्यांच्या दृष्टीनें जवळ जवळ अशक्यच आहे, पिदान अशक्यच करण्याचा बड्यांकडून प्रयत्न होत असतो, हें निर्विवाद आहे.

अशी जरी सांप्रतची परिस्थिती आहे तरी सत्याचा विजय होण्यासाठी सत्यप्रिय व अनाथ प्रेमी तरुणांनी आटोकाट प्रयत्न वेंचणे जरुर आहे. बड्यांच्या डुरकावणीने धैर्यविरहीत न होतां अनाथांचे ह्मणणें मुद्देसुद सरकार दरबारांत मांडण्याचें कामी हयगय करतां कामा नये. तात्पर्य, बड्यांनी लहानांना गिळंकृत करणें हा बड्यांचा धर्मच उर्फ हक्क मानण्याचा जो परिपाठ पडून गेला आहे, तो बदलण्याप्रीत्यर्थ आमच्या धैर्यवान तरुणांनी आपल्या कंबरा बांधिल्या पाहिजेत.

आजपर्यंत नि:स्वार्थ सहाय्य नसल्यानें निरपेक्ष पांठिब्याच्या अभावानें अनेक अनाथ कुटुंबें बड्यांच्या पोटांत जिरुन गेली आहेत. अनेक लोक आपल्या पिढीजात जमीनजुमल्यास कायमचे मुकले आहेत व अनेक गांव ओस पडले आहेत, हे दृश्य अत्यंत भेसूर असून, ज्यांच्यात माणूसपणाचा थोडा तरी गंध आहे, त्यांना फार लाजिरवाणें आहे.

ह्मणून तरुणांनो, पुढे या व अनाथ लोकांच्या अंत:करणांत बड्यांच्या त्रासामुळे बड्यांच्या अवन्वित छळांमुळे होत असलेली कालवाकालव शमविण्याचा प्रयत्न करा. यानेंच तुह्मांला मन:शांति लाभेल. याच कृत्यानें तुमचें जीवित पुण्यप्रद होऊन तुह्मांला अक्षय सुखाची प्राप्ति होईल. वेळ फार आणीबाणीचा आहे. या समयी जर तुह्माकडून तुमच्या कर्तव्याची हेळसांड होईल तर तुमचें अंत:करण तुह्मांला दोष दिल्याखेरीज रहाणार नाही. तेव्हा तरुणांनो, उठा! आणि केवळ आत्मिक बळाच्या तरवारीनें अनाथांचे संरक्षण करण्यास पुढें सरसवा!

*(गुरुवार, दि. १४ जून १९२३)*

# जुना इतिहास

‘स्वराज्य हाच माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तें मी मिळविणारच’

***– लो. टिळक***

‘आपणास अनेक हक्क नको असून एकच हक्क पाहिजे आहे व तो ह्मणजे स्वातंत्र्य, दास्यमुक्तता.’

***– इटालियन दे. माझीनी.***

वरील उद्गार आपल्या राजकीय जीवनाच्या महत्त्वाचे प्रसंगी, दोघां राष्ट्र विभूतींनी काढलेले आहेत. त्या उद्गारांत झळकणारा झळझळीत स्वदेशाभिमान, राष्ट्रीय भावनेचा त्यांत खेंचून भरलेला जोर व प्रतिबींबीत झालेली स्वदेशाविषयी तळमळ ह्या इतक्याच गोष्टी लक्षांत घेतल्यास त्यावेळी त्यांचा देश कोणत्या परिस्थितीत होता व त्यांची योग्यता काय होती. ह्याची कल्पना करणें फारसें कठीण जाणार नाही. आतां, पहिल्या व्यक्तीची इच्छा फलद्रुप झाली नाही, तर दुसरीच्या नशिबीं ती तशी झालेली पहाण्याचे भाग्य आले ही गोष्ट वेगळी. राष्ट्रीयत्वांत, स्वदेशाभिमानाचें ओलोव्यानं, वरील लोकोत्तर पुरुष कसे तादात्म्य बनले होते, हें जाणणें हा मुख्य मुद्दा होय.

पण, अंधारांत चांचपडत रहाणाऱ्या जगाला त्यांत तसेंच राहूं द्यावें असा ईश्वरी संकेत असल्यामुळें ह्मणा, अगर ‘राज्य स्थापनेचा जो नर तोचि जाणावा ईश्वरी अवतार.’ ही उक्ती स्वातंत्र्याची संस्थापना करण्याबद्दल झटणाऱ्या देशभक्तांकडे लागू करून चालल्यास, ईश्वरी अवतारांचें विरळत्व अपरिहार्य असल्यामुळें ह्मणा, जगांतल्या सर्वच राष्ट्रांना मानवी स्वरुपांत अवतीर्ण झालेल्या ह्या अवतारांना, जन्म देण्याचा मान मिळतोच अशी कांही गोष्ट नाही. उलट तो मान वाट्यास न आलेली अशी दुर्दैवी राष्ट्रेंच जगांत फार! बरें, ज्यांच्या वाट्यास तो आलेला आहे त्यांना तरी वरील प्रकारची नररत्ने सर्रास मिळालेली आहेत, असेंही नाही. परंतु ही, एकादे वेळीं, देशोद्धार करण्याला फारच थोड्या अवतारी पुरुषांची गरज बस्स असते,

ह्या नियमाची अंमलबजावणीही असूं शकेल. आस्ट्रियाच्या पारतंत्र्याखाली गाय बनलेल्या इटालीपाशी माझीनी, ग्यारीबाल्डी पुष्कळ नव्हते किंवा १८ व्या शतकांत, राजकारणाची बिघडलेली घडी नीट बसवून भुकंपामुळे नाभूत झालेल्या या लिस्बन शहरापासून, तो थेट शेतकीला पाठ देऊन तिची योग्य संभावना करणारे मार्केंज द पोंबाल पुर्तगालला उभ्या सात शतकांत एकच एक लाभले. भूतकालाकडे न वळतां आधुनिक कालाकडे बोट दाखवून सांगण्याचे झाल्यास बहुधा तोच प्रकार दृष्टीस पडतो. फळावर दृष्टि ठेऊन थोर लोकांस विशेषणे द्यावयाची झाल्यास. रशियाची भावी आशा लेनीन, त्या अफाट देशांत एकच होय, किंवा लो. टिळक, म. गांधी, यांच्यासारख्या दैविक विभूती सगळ्या हिंदुस्थानांत विशिष्ट शतकांच्या दरम्यानच निपजत असतात. असे सांगण्याचें तात्पर्य एवढेंच की, असल्या व्यक्तीकडे पाहून देशाच्या कल्पना करतांना त्यांच्या संख्येकडे पहाणे वेडगळपणाचें ठरेल.

आतां, कित्येक राष्ट्र नौका उत्तम नावाड्याचें अभावी बिकट संकटांत सांपडलेल्या आहेत, तर दुसऱ्या कित्येक कुशल कर्णधारांचे सहाय्याने, प्रतिकूल गोष्टींशी टक्कर देऊन व भौतिक सुधारणेचा मार्ग चोखाळित आहेत, ह्या दोन परस्पर विरोधी गोष्टींना कारणेंही पण तशीच असणार. न पेक्षा राष्ट्राराष्ट्रांशी द्विधा भाव ठेवणाऱ्या, परमेश्वराकडे आपण दोषीच ह्मणून बोट दाखविणे अपरिहार्य होऊन बसलें असतें. ती कारणें, राष्ट्राच्या अंतर्गत घडामोडींत होत असतात. तेव्हां प्रतिपाद्य विषयाची योग्य कल्पना होण्याकरीतां त्यांचा जरा विचार करून मग आपल्या गोमांतकाचा प्रश्न हाती घेऊं.

कोठेंही झालें तरी, जीत राष्ट्र व जेत्य राष्ट्र अनुक्रमें गुलाम धन्यांत चुरस ही आढळतेच. मात्र ह्या गुलाम राष्ट्राला आत्मज्ञान झालें असलें पाहिजे. हें उघड आहे. ही चुरस एकदम उद्भवते, अशी कांही गोष्ट नाही. युरोपियन राष्ट्रांचे उबदार पंजात, स्वत: होऊन आनंदानें पडलेल्या कित्येक देशांच्या सहनुभूतिदर्शक उष्णतेच्या पाऱ्याचें मान, शून्याखाली बरेच अंशाला पोहोंचलेले आजला दृष्टीस पडत आहे. त्यावरून आमच्या वरील विधानाची सत्यता पटण्यासारखी आहे. परकीय राज्यकर्त्यांना जीत देश पाहिजे

असतात. ते कांही त्यांच्या सुधारणेचें निरासक्त श्रेय पदरांत घ्यावें, ह्या उच्च हेतूनें नसते. तर जीत राष्ट्रांतील संपत्तीचा होईल त्या तऱ्हेनें आपल्या देशाकडे उपयोग करून, त्यांच्या तोंडातील घास स्वत: हिरावून घ्यावा, ह्या आप्पलपोट्या वृत्तीचाच अवलंब, एकंदर विजयी राष्ट्रांनी नसला तरी बऱ्याच जणांनी केलेला असतो. हें राजकारणाची ढोबळ माहिती असलेला सुधारणा मनुष्य देखील सांगू शकेल. तेव्हा सहजच होतें काय की, राष्ट्रांतील जनता घडलेली ही चूक होईल तितकी भरुन काढण्यांकरीता व पुढे तिला बळी न पडण्याकरीता विजयी राष्ट्राकडें विशिष्ट हक्काची मागणी करू लागते. ही मागणी लक्षांत घेतली गेल्यास आपल्या देशाच्या राज्यकारभाराच्या गाड्यावर चढण्याची, व फारच झालें तर चाबकाला फक्त हात लावण्याची संधी, तिला मिळण्यासारखी असते. जसजशी तिला आपल्या नैसर्गिक हक्काची व योग्यतेची जाणीव होऊ लागते, तसतशी जरा पुढें जाऊन ती, तो गाडा चालू रहाण्याकरता चाबकाचे फटकारे ओढण्यापुरते कांही हक्क आपणास मिळावें, ह्या खटपटीत लागते. ही तिची आकांक्षा पूर्ण झाल्यास राजकारभारांत राज्यकर्त्यांचें बरोबरीनें जरी नसलें तरी तिला बरेंच महत्त्व मिळू लागते. देशाचें उत्पन्न व खर्च यांची विभागणी वासलात वगैरे महत्त्वाच्या बाबतींत तिला हक्काने पण राज्यकर्त्यांच्या मतानुकूल्यानें पाहिजे त्या गोष्टी करतां येऊ लागतात. याहि, पुढें जाऊन आपल्या लायकतेची साक्ष राजकर्त्यांना पटवून ती जबाबदार राज्यपद्धतीची याचना करू लागते. ह्या नंतर, शेवटची पायरी ह्मणजे पूर्ण स्वराज्य! ह्या पायऱ्यांवरुन, अडथळ्याशिवाय तिला चढतां येतें असें नाही. ती गोष्ट राज्यकर्त्यांच्या स्वभावावर अवलंबून असे. कित्येक जेती राष्ट्रें, स्वातंत्र्य समता, व बंधुत्व, या त्रयीला स्वत:च्या स्वार्थापेक्षां ज्यास्त महत्त्व देऊन, तिचा उपयोग जीत राष्ट्राच्या सुधारणेकडे करण्याचें औदार्म्य दाखवितात तर दुसरी कित्येक-अशांचाच भरणा जगांत फार-स्वराज्यासारखी अमूल्य देणगी देण्याचें तर असोच. पण स्वत:च्या कृष्णकृत्यांवर साधी टीका ह्मणजे काय, पण ती देखील निर्भयपणे करतां येऊ नये, ह्या हीन हेतूने मुद्रण स्वातंत्र्यावर देखील आपल्या बळजबरीची कुऱ्हाड एका हातानें चालवीत दुसऱ्या हातानें स्वातंत्र्य, समता व बंधुत्व हे आधुनिक

सुधारणा-मालेचे मणी ओढतात. अशाच वेळी, राष्ट्रांत अस्वस्थतेंचे बी पेरलें जातें. व त्याला स्वत:ची चैन चालू राहण्याकरीता राज्यकर्त्यांनी लादलेल्या निरनिराळ्या असह्य करांमुळे कोंब फुटूं लागतात. न्यायदानाचे बाबतीत, आपलें देशबंधु व सर्वसाधारण लोक यांच्याशी होणाऱ्या तीव्र भेदामुळे, जनतेच्या नैसर्गिक हक्कावर गदा येऊ लागते. व दुसऱ्या बाजूनें अस्वस्थतेचें रोपटे फोफावूं लागते. स्वदेशाभिमान, राष्ट्रीयत्व यांच्या तीव्र भावनेच्या जाणीवेची वेळ ही अशी असते. असल्याच अशाच वेळी, लो. टिळक, म. गांधी, किंवा आपल्या देशमातेच्या स्वातंत्र्याप्रीत्यर्थ जवळ जवळ २।। महिने अन्न वर्ज करून त्या उपवासांचें पारणें स्वतःच्या मरणानें फेडणारे आयरीश देशभक्त, अवतीर्ण, होण्याची शक्यता आहे. देशाभिमान, राष्ट्रीयत्व, प्रचंड स्वार्थत्याग, वगैरे राष्ट्रीय गुण समुच्चयाच्या बोटांवर मोजतां येण्याजोग्या ह्या पुतळ्यांना, काय काय शक्य असते. हें जगाचा इतिहास मुक्तरवानें सांगण्यास आपलपोटेपणा खास करणार नाही.

असो. वर सांगितलेल्या परिस्थितींत राष्ट्र असलें ह्मणजे राष्ट्रोद्धाराक राष्ट्रवीर निपजतात असा कांही नियम नाही. व तो नियम आहे, असें धरून चालल्यास त्याला अपवादहि पण आहेत, हें विसरतां कामा नये. हें सिद्ध करण्याचें झाल्यास, अपवादभूत उदाहरणादाखल, आपल्या गोमांतकास पुढें करून राहिलेल्या मुख्य व विषयीभूत प्रश्नाचा थोडासा विचार आजच्या ह्या लेखांत करू.

विजयी राष्ट्र या नात्याने पोर्तुगालचा गोमांतकाशी संबंध असल्यास आज चारशेवर वर्षे झाली हें कोणास माहीत नाही असें नाही. ह्या संबंधाचा उपयोग, आपल्या सत्तेच्या प्रारंभी, त्यांनी कसा करून घेतला, हें इतरांच्या डोक्यांत असल्यास गोमांतकाच्या हृदयावर आहे. उजव्या हातांत सत्तेची जुलमी तरवार व डाव्या हातांत धर्मप्रसाराचें अवघड काम, अशा भेसूर स्वरुपांतच पोर्तुगीज लोकांनी आपलें पाहिले पांढरे पाय येथे ठेविले हे विसरतां कामा नये. मग, स्वत:च्या चीरकाल शवाचें प्रदर्शन करणाऱ्या सां. फ्रांसिस्कानें एका दिवसांत अमुक अमुक हजार हिंदु रहिवाशांना ख्रिश्चन बनवून टाकिलें, ह्यांत नवल ते काय? ह्यांत यक्षिणीची कांडी ती कुठें

फिरली? 'ख्रिश्चन हो नाही तर होपरळून मर' ह्या साधू लोकांच्या क्रुर धमकावणीपुढे इकडील मूळ रहिवाशांना दोनच मार्ग होते. एक प्राणापेक्षा प्रिय असलेल्या धर्माला पुष्कळ वेळां बळजबरीनें मुकणें व ख्रिस्ती धर्मात प्रवेश करणें हा पहिला मार्ग, न पेक्षां आपल्या मुलांबाळानिशी होरपळून मरण्यास अगर आपल्या मानेवर तरवार तरी चालवूं देण्यास तयार होणे, हा दुसरा. नाही ह्मटल्यास त्यांना आणखी एक मार्ग शिल्लक राहिला होता, तो ह्मटला ह्मणजे, ख्रिस्ती धर्म प्रसारकांचे वारें सहसा न पोंहचेल अशा कानाकोपऱ्यांत दडून दिवस काढणे, हा तिसरा पण शेवटचा मार्ग होय. ह्या मार्गाच्या अवलंबनाचे दृश्य फल ह्मणजे सध्या गोमांतकांत झळकणारी हिंदु जनता! ख्रिश्चन लोक हे पहिल्या मार्गातून वाट काढलेल्याचे सरळ वारसदार! रहातां राहिला दुसऱ्या मार्गाचा अनुयायी वर्ग. ह्यांची काय स्थिति झाली हें सांगणें नकोच. १५ व्या शतकाच्या शेवटच्या व १६ व्या शतकाच्या प्रारंभीच्या गोमांतकांतील मूळ हिंदू लोकांची पोर्तुगीजांच्या धाडीनंतरची कर्मकहाणी ही अशी आहे. १५१० पासून धर्माच्या नावाखालील वरील प्रकार येथें एकसारखा चालू होता, असें मात्र नाही. इकडे आलेल्या गव्हर्नरांत कित्येक चांगले होते. हें कबूल केलें पाहिजे. पण त्याच प्रमाणे भयंकर व जुलुमी असेहि पुष्कळ होते. हें नाकबूल करून चालणार नाही. जुवांव द कास्त्र यांच्या कारकिर्दीत पाद्री लोकांच्या असह्य जाचामुळें हिंदु लोकांची झालेली अन्नान्न दशा व वाताहात, दोलीम, उपरीनिर्दिष्ट कास्त्राचा मुलगा ह्यानें धर्मांध बनून हजारों पाद्री लोकांच्या सहाय्याने हिंदु लोकांच्या बायकांमुलांवर केलेले अमानुष जुलूम १५६४ त दोमिनेज नावांच्या व्हाईसरायानें धर्मप्रसाराकरातां लाखो लोकांची घेतलेली प्राणाहुती वगैरे गोष्टी इतिहासांत नमूद झालेल्याच आहेत. पोर्तुगीजांनी जर आपलें चिरकाल असें कोणतें नुकसान केलें असेल तर तें हेंच होय. व धर्माच्या कुऱ्हाडीनें हिंदु समाजाची धार्मिक दृष्ट्या झालेली ही दोन शकलें, हेंच झाल्यास जगाच्या व गोमांतकाच्या भविष्यकालीन इतिहासांत पोर्तुगीजांचे चिरकाल स्मारक होऊन बसेल!

*(गुरुवार, दि. ४ ऑक्टोबर १९२३)*

# जुगार, सरकार व प्रतिकार

पाद्री फ्रांसिस्क शाव्हियेर यांच्या मढ्याच्या शेंवटच्या प्रदर्शनानंतर जुगाराविरुद्ध लिहिणे आह्मां वर्तमानपत्रकारांस अरण्यरुदनवत् वाटणें साहजिक होय. कारण उघडच आहे. त्यावेळीं नवीन गोव्यासारख्या चालू व जुन्या गोव्यासारख्या स्मशानवत् बनलेल्या माजी राजधानीत त्या उत्सवाच्या निमित्तानें हजारों लोकांचा जमाव लोटावयाचा होता, ह्मणून, 'सेनाद दे गोव' या नांवाने इतिहासांत ओळखल्या जाणाऱ्या तिसवाडीच्या (ईल्याच्या) मुनिसिपालटीनें, बऱ्याच मोठ्या रकमेस जुगाराचा मक्ता एका मुंबईकडील जुगारी कंपूस देऊन टाकिला होता. व त्यास केवळ मुनिसिपालटीची मोहबत राखिली जावी ह्मणून सरकारनें उघड नसली तरी पडद्याआड तरी आपली संमती दाखविली होती. मक्तेदारांनी पणजी व जुनें गोवें येथें दिवसा व रात्रौ, एकसारखे लोकांना लुटण्याचा सपाटा चालविल्यामुळें वर्तमानपत्रांत टीकास्त्रांचा उपयोग सुरू झाला. पण पिनलकोडांत जुगार प्रतिबंधक कितीही भयंकर कलमें असली तरी ती सरकारी अधिकाऱ्यांनींच अमलांत आणावयाची असतात. आणि या प्रकरणांत सरकारचा अप्रत्यक्ष व लोकमुखी अशा मुनिसिपालटीचा प्रत्यक्ष हात असल्यानें अधिकाऱ्यांस मूग मिळून स्वस्थ बसावें लागलें. अशा रीतीनें पैशाच्या आशेनें सरकार व लोकसंख्या या उभयतांनी आपल्या राजधानीत परकी नीच लोकांना विकून टांकले, त्यांचा हात कोण धरणार? लोकसत्ता, स्वातंत्र्य ही नावें कागदावर राहून लोकांना नुकसानकारक, राजधर्मास विरुद्ध अतएव राष्ट्रास दुष्कीर्तिकारक अशी कृत्यें राजरोस घडावींत हा विपरीत कालाचाच परिणाम होय. असो.

वरील प्रसंग घडून गेल्यास जवळ जवळ दहा अकरा महिने झाले. आतां यापुढे काले, जत्रा सुरू होणार असल्यामुळें लोकांनी याचा प्रतिकार करण्यास पुढें आलें पाहिजे.

आजकाल जुगाराचा हा सांसर्गिक रोग काले, जत्रा यापुरताच न राहतां लग्नें, मुंजी, षष्टीपूजनें यांच्या समारंभप्रसंगी सुद्धां प्रगट होत आहे.

गेल्या गणेश चतुर्थीच्या उत्सवांत समुद्रकांठाच्या एका गृहस्थाचे घरी त्यानें आपलें ठाणें बसविलें होतें अशी बोलवा आहे. या व्यसनाची अशीच गय केल्यास यापुढें गर्भाधान संस्कार, श्राद्धविधी, स्मशानयात्रा यांच्यावेळांसुद्धा त्याचा रिघाव होवून समाजांतील एकहि स्त्रीपुरुष या द्यूतसर्पाच्या विषबाधेनें पीडित झाल्यांवाचून राहणें शक्य नाही. तेव्हां सर्व सुशिक्षित समाजहितेच्छु तरुणांनी याचा विचारपूर्वक प्रतिकार करावयास नको काय? जुगारी मग तो केवढाही श्रीमंत असो, व्यापारी असो, अधिकारी वर्गातील असो किंवा आपणास कुलीन ह्मणून लोकपुढारी असें समजणारा असो, त्याची भीडमुर्वत सोडूनच आपण पुढें सरसावून तांदुळांतील किडीप्रमाणें त्यांस समाजांतून निवडून काढलें पाहिजे. नाही तर ती कीड ज्याप्रमाणें, आपल्याभोवती तांदूळ पोखरुन टाकितें त्याप्रमाणें हे जुगारी लोक विशेषत: संभावितपणाचा, प्रतिष्ठितपणाचा आविर्भाव दाखविणारे जुगारी लोक, आपल्या भोवती वावरणाऱ्या लोकांत जुगाराचें व्यसन पसरविण्यास कमी करणार नाहीत.

कांही काळापूर्वी, नवीन काबिजादीतच हिंदु देवस्थानांचा भरणा असल्यामुळें तेथें होणाऱ्या कालें जत्रा हेंच जुगाराचें क्षेत्र असे, ह्माडदोळ, मंगेशी, कवळें, पंचवाडी, शिरोडों, फातर्पे, घुडो, काकोडे, सांगे, केपें, माशेल येथील काले जत्रांत तर त्याचा विशेष धुमाकूळ पाहावयास सांपडे. आताशा जुन्या काबिजादींत त्याचा बऱ्याच मोठ्या प्रमाणावर फैलाव झालेला दिसतो. या काबिजादींत जत्रा काल्यांचा जरी सुकाळ नसला तरी लग्न, मुंजी, षष्टीपूजनें वगैरेंच्या निमित्ताने जुगाराचें प्रदर्शन वरचेवर होत असते. किंबहुना बहुतेक असले समारंभ जुगाऱ्यांच्या तामसी लीलांशिवाय सुने जात नाहीत. एखाद्यानें हळूच तो ससेमिरा चुकविणयची पळवाट काढिली व त्याची दाद जुगारी कंपूस लागली तर, लोंचटपणानें ते लोक यजमानाच्या गळीं पडून प्रसंगी धाकधपट्या दाखवून आपणांस 'शेंद्रीमांद्री' युक्त खोली तयार करून घेतील आणि आपला अड्डा मांडितील. यजमानास कोणत्याही निमित्ताने त्यांचा रोष होऊ नये यासाठी सर्व तयारी राखणें भाग पडतेंच!

जुगार ह्मटला ह्मणजे, त्याच्या जोडीस मद्यपानाचें व्यसन मागोमाग तयार असते. हिंदु लोकांत मद्यपानाचें व्यसन वाढविण्यास जुगाराने, जितकी

मदत केली आहे, तितकी दुसऱ्या कोणीही केली नसेल. त्यांत अपवाद नसतील असें नाही, पण ज्यास्ती संख्या मद्यप्यांची. या दोनही व्यसनांनी देवस्थानचा धार्मिकपणा नाहींसा केला, लग्नमुंजीसमारंभातील पावित्र्य घालविलें षष्टीपूजनांतील घाण वाढीवली, इतकेंच नव्हे तर श्री गणपती विसर्जनसमारंभास इंद्रजीतानें आरंभिलेल्या यज्ञाचें स्वरूप आणलें. व या पुढें ती जोडी काय करील व काय नाही हें सांगणें कठीण आहे. तेव्हा आह्मीं वेळींच जागे होऊन त्या व्यसनाचा प्रतिकार केला नाही तर कोण करील? सरकार तर याकडे लक्ष देणार नाही, कारण तें सर्वस्वी परक्या संस्कृतीचे उपनेत्र लावून बसलेलें, काल परवांपर्यंत त्याकडूनच जुगारास प्रोत्साहन मिळालेलें! असें असतां केवळ त्याच्यावरच विसंबून राहणें योग्य राहणार नाही. आमच्या समाजाला नियमन करणारे खरेखुरें हिंदी सरकार असतें तर तें असल्या व इतर निंद्य व्यसनाचा पुरस्कार करण्याऐवजी हिंदुधर्मशास्त्रांस अनुसरून त्याना प्रतिबंधच करणार होतें. परंतु जोंपावतो तसा सुयोग आला नाही, तोपर्यंत आह्मी आमच्या जबाबदारीवर तें कार्य पार पाडलें पाहिजे. त्यांतच आमचा धर्माभिमानीपणा, आमची समाजहिततत्परता, आमची नैतिक दृष्टि दिसून येईल व पा. कांपूस सारख्या क्याथोलिक भटांना हिंदुसमाजास सकारण अकारण नावें ठेवण्यास जागा रहाणार नाही.

सध्या आह्मीं ज्या राज्यपद्धतीत आहोत तींत राजाचे सर्व अधिकार लोकसमुदायाकडे आलेलें आहेत. त्या अधिकारांस जागून जर आह्मीं वागलों तर सरकारवर रुसण्याचें कारणच उरणार नाही. तेव्हा हिंदुधर्माशास्त्रांत जुगार प्रतिबंधाविषयीं आधार आहे तर येत्या अंकी पाहू.

*(गुरुवार, दि. २२ नोव्हेंबर १९२३)*

# जुगार व हिंदुधर्मविचार

हिंदुधर्मातील अनेक धर्मग्रथांप्रमाणे मनुस्मृति हाहि एक ग्रंथ सर्वमान्य आहे. त्यांत समाजाचे व्यवहार सुरळीत चालण्यासाठी बरेच नियम सांगितले आहेत. चोर जार, जुगारी, मद्यपि, खुनी यांपासून राष्ट्राचें रक्षण कसें करावें,

त्यांस राजानें कोणते शासन करावें, राजा-प्रजा, पिता-पुत्र, पति-पत्नी, गुरु-शिष्य, धनी-नोकर, सावकार-कूळ वगैरेंनी एकमेकांशी कसें वागावें, राजानें त्यांस कसें वागवावे, या बद्दल त्यांत बराच विचार केला आहे. व ह्मणून तो ग्रंथ स्वकियांस परमपूज्य व परधर्मीय अशा युरोपियन, अमेरिकन आदि संस्कृतज्ञ पंडितांस आदरणीय होऊन राहिला आहे. या ग्रंथाचा कर्ता जो श्रीमनु, त्याची या ग्रंथामुळें युरोप अमेरिकेंत समाजशास्त्रज्ञ, नीतिशास्त्रज्ञ, आरोग्य शास्त्रज्ञ अशी फार ख्याति झाली व होत आहे. अशा या बहुमान्य ग्रंथांत, जुगार व जुगारी या संबंधाचें राजाचें धोरण कसें असावे, या विषयी जी वचनें आहेत ती मराठींत दिल्यास, यापुढील काले-जत्रांच्या हंगामात, त्यांचा बराच उपयोग होईल असें वाटून ती याखालीं देत आहो.

'द्यूत व समाद्वय हे दोष सर्वांनी आपल्या राष्ट्रांतून नाहीसें करावेत. कारण हे दोन्ही दोष राज्याचा नाश करणारे आहेत.'

'द्यूत व समाद्वय ह्मणजे उघड चोरीच होय. यास्तव त्याचें निवारण करण्याचा राजानें सतत प्रयत्न करावा.'

'अक्षकुशल लोक द्रव्यादि जड पदार्थ लावून जें करतात त्यास द्यूत असें ह्मणतात. व बकरी, कोंबडी इत्यादिकांच्या योगानें पण लावून जी क्रीडा करितात त्यास समाद्वय असें ह्मणतात.'

'जो द्यूत व समाद्वय करितो किंवा करवितो त्यांस व तशा प्रकारच्या सर्व दुष्टांस राजानें हात तोडणें इ. प्रकारच्या शिक्षा द्याव्या व यज्ञोपवित द्विजचिन्हें धारण करणाऱ्या शुद्रांस देहांत शिक्षा द्यावी.'

'जो कोणी गुप्त रीतीने किंवा उघड द्यूत करितो त्यास राजानें जशी वाटेल तशी शिक्षा करावी.'

वरील सर्व वचनांतून राजास उद्देशून जें सांगितलें आहे तें, आजकालच्या मानाप्रमाणे लोकसमाजानें सरकारच्या मदतीनें करावयाचें आहे, हें खरें असलें तरी समाजांतील सर्वच स्त्रीपुरूष कांही पुढें येणें शक्य नाही. याचा विचार समाजहितेच्छू व सुशिक्षित तरुणांनीच करणें आवश्यक आहे. आज ह्या व इतर अनेक व्यसनांच्या तावडींत सापडलेला

हिंदुसमाज जर मुक्त झाला नाही तर अनेक दृष्टींनी त्याची खुंटलेली उन्नति, दिवसेंदिवस अधिकाधिक खुंटत राहील, आणि मग त्याचा अध:पात झालेला आह्मांलाच दिसावयास लागेल. कोणताही रोग चांगला होण्यास वैद्यलोक ज्याप्रमाणें, वमनविरेचन करणें अगत्याचें समजून आधीं त्यावर इलाज करितात आणि नंतर रोगमुक्त होण्यास किंवा शक्ती येण्यास मात्रा रसायनादिकांचा प्रयोग करितात, त्याचप्रमाणें आमच्या समाजाची उन्नति केवळ त्याच्या व्यसनमुक्ततेवर अवलंबून आहे. जोपर्यंत आह्मी या अनेक, अनिष्ट व्यसनांच्या जाळ्यांत गुरफटून, गुदमरून जात आहोंत तोपर्यंत सभा, व्याख्यानें, समाज, संस्था निवडणुका वगैरे सारख्या रोगहारक व शक्तीवर्धक उपायांचा काडीमात्र उपयोग होणार नाही. त्यास व्यसनमुक्तता हाच उपाय आहे. तो स्वत:च्या जोरावर व प्रसंगी वयोवृद्ध व सुज्ञ लोकांचें आणि सरकारी अधिकाऱ्यांचें सहाय घेऊन, अमलांत आणणें तरुणांचे कर्तव्य आहे. ते कर्तव्य त्यांनी बजावलें तर या व्यसनाबरोबर पसरुं पाहणाऱ्या दारिद्र्य, चौर्य, पशुता इ. अनेक दुष्ट व समाजहितविघातक वृत्तींचा नाश होऊन हजार वर्षांचा शीलवंत व भाग्यवंत गोमांतक आज पुन्हां दिसूं लागेल. या पवित्र कार्यास आरंभ करावयाचा तो जुगाऱ्यांचे मन कळविण्यापासून झाला पाहिजे व त्यासाठी जगांतील सनातन व श्रेष्ठ असा ग्रंथ जो ऋग्वेद, त्यांतील एक वाक्य त्याच्या हिंदी व मराठी अर्थासह देऊन हा विषय आटोपता घेऊ.

*''अक्षेर्मा दीव्य: कृषिभित्कृषस्व।।*  
*वित्ते रमस्व बहु मन्थमान:...।।ऋ।।*  
*धनेश होंगे यह धारि लीजे।।*  
*जुआ बुरा है, कृषि ही भली है।।*  
*यही सदासे सुखकी गली है।।१।।''*

जुगार खेळूं नकोस, निश्चयाने शेती कर व यांत मिळणारा थोडा फायदाहि बहुत समजून समाधानानें रहा.

*(गुरुवार, दि. २९ नोव्हेंबर १९२३)*

# गोव्यांतील गोरक्षण

गोव्यांत गोरक्षणाची गोष्ट बोलणें देखील असंभाव्य आहे. कारण रायबंदर सारख्या हम रस्त्यावर लोक एकसारखे येत जात असतां त्यांस उघड दृष्टीस पडत असलेली दररोज ८/१० गुरांची हत्या 'तेथें होऊं नये व एका बाजूला व्हावी' ह्मणून तेथील कांही हिंदूची काम्रमंडळीची आणि सरकारची विनवणी केलेली देखील जेथें कस्पटासमान मानून मुद्दाम ती हत्या प्रसिद्ध ठिकाणावरच चालू ठेवण्यांत येते. आणि विनवणी करणारे चुरमुरे खात मूग गिळतात, त्या प्रांतांत गोरक्षणाचें नाव घेऊन काय उपयोग हें उघड दिसत आहेच. कारण कोणतीही गोष्ट तडीस नेण्यासारखी अंत:करणवृत्ति ज्या समाजांत शंभरांतून एकाही व्यक्तीचें अंगी शिल्लक नाहीं त्या समाजानें ती गोष्ट उच्चारणें हेंच लज्जास्पद किंवा निर्लज्जास्पद ह्मटलें पाहिजे. हें अक्षरश: खरें आहे. एकदांच नव्हे पण त्रिवार सत्य आहे. तथापि निबिड अंध:कारांत किंवा पूर्ण नरकनगरींत फार काळ वास करणाऱ्या प्राण्यालाहि प्रकाशाची व सुगंधाची आठवण आल्यावांचून राहत नाही व ती आल्याबरोबर त्यांच्या मुखांतून, आपले इष्ट विषय अथवा इष्ट परिस्थिती प्राप्त होण्याचे उपाय निघाल्याशिवाय राहत नाहीत. ह्या न्यायानें हा लेख लिहिणाराची लेखणी आज उद्युक्त झालेली आहे.

अंधार कोठडींत जन्मठेपींची शिक्षा भोगणाऱ्या कैद्याला आपण मुक्त होऊन प्रकाशांत स्वैरसंचार करण्याचे विचार सुचणें लज्जास्पद असलें तरी अपरिहार्यहि असलेंच पाहिजे! त्याच न्यायाचा हा आमचा लेख आहे. हा लेख पाहणारे सर्व जरी या अंधारकोठडीच्या भिंतीचे निर्जिव दगड असले, त्यांतून एक देखील सजीव आणि सारासार विचारसंपन्न प्राणी नसला, ह्मणजे ह्या लेखाचा उपयोग होण्याचा कांहीसुद्धां संभव नाही हें जरी व्यवहारदृष्ट्या खरें असलें, तरी सुद्धां, अंधारकोठडींतील कैदी त्या दगडांशी व त्या भिंतीवर त्यानें कल्पिलेल्या मानवी मित्रांशी तो आपलें मनोगत उघड उघड बोलल्यावांचून राहू शकत नाही, ही गोष्ट देखील व्यावहारिक असली पाहिजे. तसाच हा आमचा लेख आहे. ही ह्या लेखाची प्रस्तावना झाली.

गोव्यांत गोरक्षण शक्य आहे काय? ज्या गोव्यांतील अर्ध्यापेक्षा अधिक लोकसंख्या ख्रिस्ती आहे ह्मणजे अहोरात्र गोमांसावर हापापलेली आहे, गोमांसावांचून मनुष्य जगतच नाही, निरोगी रहातच नाही, बलवान असतच नाही, अशा दृढ समजुतीची आहे; इतकेंच नाही पण हीच लोकसंख्या सरकारी अमलदारी चालविणारी आहे आणि याहिपेक्षां अधिक दुःखाची गोष्ट ह्मणजे उत्तरोत्तर आपलें हिंदु जे जे सुशिक्षित होतात ते ते त्यांच्या अनुकरणातच शहाणपणा आहे असें समजत आहेत आणि त्यांच्या विचारसरणीशी असणारा हिंदूंचा विरोधभाव एकेका बाबतींत कमी करून, आपली त्याच्याशीं बरोबरी करण्याला मनोभावानें झटत आहेत, अशा प्रांतांत गोरक्षण शक्य होईल काय?

होईल! आह्मांला वाटतें खास होईल! कशानें होईल? कसें होईल? एकंदर हिंदूंना आज गोरक्षण इष्ट वाटत आहे ना? ते कांही गोहत्येला मदत करीत नाही ना? अहो पण हिंदुसमाजांत जीव तो कितपत आहे? त्याची मदत आणि त्यांचा विरोध ख्रिस्ती समाजाचे खिसगणतींत असता तर असें कशाला होते? उगीच हिंदुसमाज ह्मणून नांव मिरवण्याचा मूर्खपणा या बाबतींत कामाचा नाही. गोव्यांतील हिंदुसमाज हा ख्रिस्ती समाजाला अनिष्ट अशी एकही गोष्ट करूं शकणारा नाही. मनांत असो किंवा नसो पण तो ख्रिस्ती समाजाला प्रत्येक बाबतींत साह्यच करणारा आहे, असेच प्रत्येक ठिकाणीं दिसून येईल. भोक्ता आणि भोग्य ह्यांचा जो एकमेकांशी संबंध असतो तोच संबंध ख्रिस्ती समाजाला जी गोष्ट हवी असेल ती गोष्ट नाही करण्याचें सामर्थ्य हिंदुसमाजांत बिलकूल नाही, काल नव्हतें, आज नाही व उद्यांहि पण ते येण्याचें चिन्ह दिसत नाहीं. ह्मणून 'हिंदुसमाज' हीं पाच अक्षरे या बाबतीत उच्चारतांच कामा नयेत. त्याच्याशिवाय काय कल्पना असली तर निघूं द्या.

ठीक आहे. तुह्मांला गोव्यांत समाज या दृष्टीनें ख्रिस्ती अनुकरणच सर्वत्र दिसते तर समाज ही अक्षरें बाजूस ठेऊन व्यक्ती या दृष्टीनें विचार करून एक कल्पना दृष्टीस पडते ती समोर मांडून पसंत पडते तर पाहूं - गोव्यांतील गोहत्या बंद व्हावी आणि गोरक्षण घडावें असं वाटणाऱ्या कांही व्यक्तीं तरी इकडे आहेतच की नाहीं? पुरे. काही व्यक्ति त्या मताच्या आहेत

ह्याच बीजभूत समजा. बी मिळालें ह्मणजे त्याची लागवड करून त्याला अंकूर येतील. झाडें तयार होतील व त्यापासून यथावकाशें फळनिष्पति भरपूर होईल अशी आशा करण्यास आधार असतो. अर्थांत गोव्यातील गोहत्या बंद व्हावी असें ज्या कोणा गरीब, मध्यम, व श्रीमंत अशा व्यक्तींना वाटत असेल त्यांनी आपापल्या शक्तीपुरता चारी बाजूंनी प्रयत्न चालविणेचें जर मनावर घेतलें तर बरेंच काम भागण्याजोगी व आज नाहीं उद्यां तरी यशस्कर होण्याजोगी एक कल्पना आहे. ती एथें उघड करून तुह्मांला कितपत पसंत पडते ती पाहातो.

'थांबा. तुह्मीं जी कल्पना सांगणार ती मग सांगा. पण पूर्वीं थोडेसे त्या संबंधांत बोलावयाचें आहे, तें ऐकून घ्या. आजकाल गोहत्या होऊं नये अशा मताची जीं कांही माणसें आहेत त्यांची फसवणूक चालली आहे. ती आधीं लक्षांत घ्या. ही फसवणूक ह्मणजे गोव्यांत जे कसाई गुरें विकावयास आणतात त्यांच्यापासून गुरें विकत घेऊन, मी आज अमुक गाई किंवा अमुक पाडी मरणार होती ती वांचविली, असें समाधान मानणारें भोळे मनुष्यांची होय! ह्या बिचाऱ्यांना वाटत असतें की, कसाई मारावयास नेणार होता ती गाय वांचविण्याकरतां मी दुपट किंवा दीड पट रुपये दिले आणि त्या गाईचा जीव मी वाचविला, हें मी पुण्य केलें, स्वार्थत्याग केला. परंतु त्याचा परिणाम काय झाला? कसाई याला दुपट रुपये दिल्यास एक गाई व एक पाडी अशी दोन जनावरें खरेदी करून खाटकांनी आणून दिली! अर्थात् बिचाऱ्या पुण्येच्छु भोळ्या मनुष्यानें एक गाय वांचविण्यास दिलेल्या रुपयांनी दोन गोहत्यांची तयारी घडली! अर्थांत यांत पुण्य किती व शहाणपणाचा भाग किती याचा विचार करा. अर्थात कसायांस जास्ती द्रव्य देऊन गोरक्षण करणें या सारखा वेडेपणा व पाप दुसरें योग्य कल्पना असली तर ती समोर ठेवणें योग्य. येथ पर्यंत झालेल्या ऊहापोहावरून सिद्धांत असा होता की, कसायांस गाई विकतच मिळूं नये असा बंदोबस्त झाल्याशिवाय गोरक्षण होणें ह्मणजे गोहत्या बंद होणें शक्य नाही. पण जेथें वरचेवर दुष्काळ पडून स्वत:च्या पोटचीं मुलें विकत देण्याची पाळी प्रत्येक वर्षीं कोठें ना कोठें तरी येतच असते. तेथें गुरें फार अल्प किंमतीला कसाई खरेदी करितात आणि

ती गोव्यांत आणून विकतात. ह्याला आमच्यासारख्या क्षुद्र माणसांचे हातून उपयुक्त असा कोणता उपाय होणार? ही गोष्ट खुद्द सरकारनेंच कायदा करुन (गोहत्या बंदी) केली तर मात्र होणे शक्य आहे. पण खुद्द सरकारच गोभक्षक आहे तें गोरक्षक कायदे कां करील? अर्थांत ही कल्पना फोल!!'

परंतु आमचे विचारतरंग, आमचें मनोराज्य इतक्यावरच थांबून स्वस्थ बसणारें नाही. त्याची गती अव्याहत आहे. ह्या मनोराज्याला वेगळाच एक मार्ग सुचतो आहे. ह्या मार्गानें खटपट करावी ह्मणून गोरक्षणेच्छु श्रीमंत, मध्यम व गरीब अशा हिंदु व्यक्ती जर मनापासून प्रयत्न करतील तर, गोहत्येला निदान गोव्यांतील गोहत्येला एकदम नाही पण हळुहळु पण बराच जोरदार प्रतिबंध होऊ शकेल. याबद्दल बरीच खात्री वाटत आहे. हा मार्ग असा :-

सध्या अमेरिकेंत बऱ्याच वैद्यशास्त्रज्ञ शोधक डॉक्टरांची विचारसरणी एकंदरींत मांसाहाराला विरुद्ध बनत चालली आहे. ह्या विचारसरणीला अनुसरून तेथें फार मोठे प्रयत्न चालू आहेत. ह्मणजे त्या मतानें वागणाऱ्या डॉक्टरांनी कोठें कोठें रोग्यांची हास्पितालें उघडलीं आहेत, प्रयोग शाळा चालविल्या आहेत, त्यांचे सुक्ष्म अनुभव घेऊन तात्त्विक आणि व्यवहारीक सिद्धांताचे उत्तम उत्तम ग्रंथ तयार केले आहेत. आणि ह्या ग्रंथांतील प्रेमेयांचा सर्व लोकांत प्रसार व्हावा ह्मणून वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, व्याख्यान माला इत्यादि सर्व प्रकारचे उपाय तिकडे चालू आहेत.

आमच्या गोव्यांत जे कोणी श्रीमंत आणि मध्यम ऐपतदार असून गोहत्याप्रतिबंधाची खरी इच्छा बाळगणारे गृहस्थ असतील, त्यांनी गोरक्षण हें सर्वांत अगत्याचें कर्तव्य ह्मणून त्यासाठीं शक्य तितकें द्रव्य खर्च करण्याचा निश्चय करून, वर आह्मीं लिहिलेले हिंसानिषेधात्मक वाङ्मय मिळेल तितकें विकत घेऊन, आपल्याला शक्य तितक्या प्रयत्नानें त्या त्या ग्रंथांतील महत्त्वाच्या मुद्यांचे, त्या त्या ठिकाणच्या अनुभाविक सिद्धांताची वर्तमानपत्रें व मासिकें यांतील व विद्वानांच्या व्याख्यानांतील प्रतिपादनांचे, आमच्या गोव्यातील पोर्तुगीज भाषेंत भाषांतर (पैसे खर्चून) करून ते येथील चालू

वर्तमानपत्रांतून क्रमशः नेहमीं प्रसिद्ध होईल अशी योजना चालू ठेवावी. ही भाषांतरें उत्तम तयार करणारांस बक्षिसें लावाली, अशा रीतीनें कांही वर्षे सर्वत्र त्या वाङ्मयाचा जोरानें प्रसार करण्याचें बाबतींत होईल तितका स्वार्थत्याग आणि प्रयत्न करावा. ह्मणजे वर सांगितलेल्या अल्पही बीजापासून अहिंसामताचें पीक गोव्यांत हवें तितकें पिकणें संभवनीय आहे. त्याला हिंदूंच्या सद्वासनांचे सिंचन आणि गोरक्षणार्थ करण्यांत येणाऱ्या द्रव्यखर्चाचे खत भरपूर आणि वक्तशीर पडेल तर ह्या आमच्या कुजून घाण झालेल्या ख्रिस्ती समाजाच्या मनोभूमीवर भूतदया, अहिंसा पवित्रान्नसेवनाचे परिणाम, अंतर्बाह्य स्वच्छतेचें सुख इत्यादिकांची रोपें खचीत रुजून येतील आणि तो क्रम सतत चालू राहिला ह्मणजे पुढें आपोआप त्या रोंपाचें मोठे वृक्ष होऊन त्यांला जास्त फळें, त्या फळांपासून नवीन झाडें असा क्रम ईश्वरी कृपेनें आणि हिंदुव्यक्तींच्या पुण्यकर्मांने, तपश्चर्या निर्दोष चालविल्याने, प्राप्त होईल. आणि ह्या क्रमाचा परिणाम ह्मणजे, गोमास खाणें हेंच रोगाला आमंत्रण अशी ख्रिस्ती लोकांतील सुज्ञांची समजूत बनली की इतर त्यांचे अनुयायी आपोआपच मांसत्याग करीतील. मग कसाई लोक गवळी बनतील. दही, दूध, तूप, लोणी यांच्या विक्रयानें सधन होतील. तथास्तु,

*(गुरुवार, दि. १७ मे १९२३)*

# आमची आजची तरुणपिढी

आमची आजची तरुणपिढी जें कांही करीत आहे. ते स्वतःवरची जबाबदारी ओळखून करीत आहे की नाही, आणि करीत नसल्यास तें फळ कशाचें, तर सहजच मागच्या पिढीकडे बोट दाखवावें लागेल. चांगली नोकरी पटकवावी, पुष्कळ पैसा संपादन करावा, सरकारी माणसांत अब्रु सांभाळावी, मानमरातब मिळवावा, गौरसंस्कृति उचलावी, त्यांच्याकडून सिविलायझड आणि इलुस्त्राद ह्मणवून घ्यावें, वगैरे वगैरे विचार बाळपणांतच मुलांच्या डोक्यांत प्रत्यक्षाप्रत्यक्षपणें कोंबले गेल्यामुळें ऐन तारुण्यांत त्यांनी

नानाप्रकारचे खेळ खेळावे हे सहसा अन्यायाचें मानतां येत नाही. एखाद्या मराठी किंवा पोर्तुगीज शाळेंत चला आणि मुलांना विचारा. शंभरांत एकही मुलगा तुह्मांला मी टिळक, गांधीसारखा देशकार्याकरतां झटणारा होईन ह्मणून सांगणारा मिळणें अशक्य होईल. आपला देश स्वतंत्र, नीतिमान आणि धर्मशील व्हावा असें ज्याला वाटत असेल, त्यालाच देशाच्या स्वातंत्र्याचें, धर्माचें वगैरे महत्त्व असतें. त्यांचाच आत्मा रात्रंदिवस देशाच्या मोक्षाकरतां तळमळत असतो. मग तिथें सत्ताधारी गौरकायी असोत किंवा कोणीही असो, त्यांच्या जबड्यांत गडप झालेला आपला देश तत्काळ मोकळा व्हावा ह्मणून ते सतत प्रयत्न करीत असतात. त्यांच्या गोष्टी कितीही महत्त्वाच्या कां असेनात त्यांचा ते मनापासून तिटकारा करतात. आणि अशाप्रकारच्या माणसांनी भूषविलेल्या समाजांतील मुलांबाळांवर स्वाभिमानाला पोषक अशा प्रकारचेच संस्कार झालेले असतात. पण ज्या समाजाला दास्यांतल्या सुखांची आवड, स्वातंत्र्याकरतां आचराव्या लागणाऱ्या उग्र तपश्चर्येच्या दु:खाची भीति, आपला धर्म खालीं पडत चालला आहे, त्याच्याकडे चांगले लक्ष न पुरवितां केवळ पोकळ धर्माभिमानाच्या बडबडींत समाधान, नीतीची नुस्ती चिकित्सा करण्यापलीकडे ज्यांच्या हातून अजून कांहीच झालें नाही, अशा पाश्चात्यांचे अनुकरण करण्यांत आनंद आणि त्यांच्या कृपाछत्राखाली राहण्यांत शांति वगैरे सारखे गचाळ विचर आवडले, त्या समाजाची स्वदेशाकरतां स्वार्थत्याग, महात्माजींसारखी उग्र तपश्चर्या, कै. टिळकांसारखी निष्काम सेवा वगैरेसारखी खडतर व्रतें पाहिली ह्मणजे बोबडी वळलीच पाहिजे. ज्यांचा स्वाभिमान नष्ट झाला आहे. ज्यांना परधर्मीयांच्या मोकळ्या सुखाची वखवख सुटलेली; देशाची, धर्मची वगैरे सगळीं कांही ऋणें  फेडूनही मनुष्याला आपलें खरें स्वरून ओळखण्याकरता ज्या अधिकाराची गरज लागते तो अधिकार संपादन करतां यावा ह्मणून जे कांही निर्बंध घातले आहेत, ज्यांना दु:सह झाले आहेत. त्यांच्याकडून पुढच्या पिढीला देशसेवेचें बाळकडू पाजलें जाणें अगदीच अशक्य आहे.

आपला देश परतंत्र झाल्यास आज शेकडों वर्षे झाली. जरा पुष्कळ मागें जाऊन आपला समाज काय करीत होता तें पाहू. आह्मांला वाटतें त्यांना

'सोंवळे' रहाण्यापलीकडे कांहीच ठाऊक नव्हतें. ज्यावेळी युरोपियन 'भूदेव' हिंदु लोकांस हाल हाल करून बळजबरीनें बाटवीत असत, त्यावेळी त्यांनी आमच्या इकडे रूढ झालेल्या कांही समजुतींत जर फरक करण्याची तजवीज केली असती तर ह्या स्वत्वनष्ट ख्रिश्चन बंधूंची संख्य एवढी वाढली नसती. त्यांची संख्या वाढली हें आह्मांला कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तर नुकसानच झालें. आमच्या रस्त्यावर एक प्रचंड धोंड पडल्यासारखें झालें. तो समाज आह्मांपासून अगदी निराळा राहू पहात आहे. तो समाज युरोपियनांशी कां एकजीव होऊं पहात आहे ह्याचें आश्चर्य वाटतें. बिचाऱ्यांना स्वत:चें असें कांहींच नसल्याचें वाटतें काय? हिंदुस्थान देश तुमची मायभूमि नव्हे काय? तुह्मी आर्यांचे वंशज नाही काय? ख्रिश्चन धर्माचे ह्मणून काय झालें? पण आह्मांला वाटतें, आपण कोण हें विसरल्यामुळे पहा एवढा घोंटाळा झाला आणि त्या घोंटाळ्याचा परिणाम आमच्या चांगला बोकांडी बसला. युरोपियन पुरवले पण हे नकोत. असें आज आह्मांला झालें आहे. युरोपियन संस्कृति हिंदूंनी उचलली नाही ह्मणून हिंदू मागासलेले. हिंदूंच्या बायका मागसलेल्या! हिंदुंना हिंदूची संस्कृति आहे. आणि ती जगांत नि:पक्षपात बुद्धीने पाहिल्यास उच्च प्रकारचीच ठरेल. आता हिंदु त्यांना पुढें पुढें करतात त्यांच्यापुढे त्यांना कदाचित वाटले असेल की, हिंदु लोकांना आपल्या संस्कृतीचा कंटाळा आला असावा ह्मणून पण ही त्यांची चुकीची विचारसरणी आहे. इथें हिंदुहि चुकतात आणि ख्रिश्चन ही चुकतात. असो.

त्यांची संख्या एवढी जी वाढली ती बाटवणीमुळें नसून आमच्या बहिष्कारामुळे. गांवांतल्या एखाद्या भागांत एखादा इसम बाटविण्यांत आल्यावर तो सगळा भागच बहिष्कृत होई! हा बहिष्कार कुणाकरतां असावयाचा? जे कोण स्वत:च्या खुषीनें बाटले जात असत त्यांच्या करता ना? मग बळजबरीनें बाटविलेला इसम बहिष्कृत होण्याचे काय कारण? त्यावेळी त्यांनी आपण काय करतां ह्याचा विचार केला असता तर आजच्या सारखी बिकट परिस्थिती कधीच प्राप्त झाली नसती. ह्या बहिष्काराच्या ब्रह्मरांक्षसांत अजूनपर्यंत जीव असल्याचे

दृष्टोत्पत्तीस येत आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांत मद्रासांत हे मिशनरी देवदूत ह्या बहिष्काराचा अतोनात फायदा घेत आहेत. आणखी वीस वर्षेपर्यंत सतत जारीनें प्रयत्न चालू राहिल्यास तीनें वेळ्ळी ह्मणून गांवच्यागांव ख्रिश्चन होण्याची बळकट आशा असल्याचें त्यांनी प्रसिद्ध केले आहे. ह्या बहिष्कारामुळे परमर्धात गेलेले लोक आज पुन्हा हिंदुधर्मांत घेणें किती कठीण झालें आहे हें सध्याचें 'केसरी'चे अंक वाचले असतां सहज कळून येण्यासारखें आहे. ह्या बहिष्काराचा आह्मीं अजून विचार करीत नाही. ह्या बहिष्कारामुळें आमचा तोटा झाला की, परक्यांचा फायदा झाला? परक्यांचाच फायदा झाला. आह्मी सोंवळे राहिलो का? बहिष्कारामुळे अनाचार थांबले का? नाही. आतां तरी ह्या बहिष्काररूपी ब्रह्मराक्षसाला मूठमाती द्या आणि जें कांही लाभण्यासारखे आहे, तें सोडू नका. आजचा गावडे लोकांचा प्रश्न हाती घेण्यासारखा आहे. एखादें मिशन स्थापन करावें आणि भराभर त्यांना हिंदु धर्मांत घ्यावे. घरांत देवळांत कुठेच कसलीच आडकाठी असू नये. रोटी बेटी व्यवहार वगैरे जरी आज झाला नाही तरी पण हिंदु लोकांत हिंदु ह्मणून राजरोसपणें वावरायला कोणतीच हरकत करू नये. हें मिशन जास्ती बाचाबाची करू न देतां ताबडतोब स्थापन झालें पाहिजे. आज नोकरशाहींत ख्रिश्चन लोकांचा बराच उच्च दर्जा असल्यामुळें जास्ती कीस काढीत बसू तर भयंकर अडथळा होणें शक्य आहे. आमच्या हातून होणें शक्य नसेल तर मुंबईच्या हिंदु मिशनरी सोसायटीला आणवू. पण ह्या गोष्टीचा विचार झाला पाहिजे आणि आजच्या सुशिक्षित तरुणांनी हा प्रश्न हाती घेतला पाहिजे.

आमच्या वडिलांच्या हातून आणखी एक घोडचूक झाल्याची दिसून येत आहे. पोर्तुगीज भाषा अवगत करून घेणें, हिंदुसमाजाचें पोर्तुगालात वजन राखणे, आणि ख्रिश्चन नेटिवांच्या बरोबरीनें काम करीत राहणें, यांच्या पैकीं आमच्या वडिलांच्या हातून एकही गोष्ट झाली नाही. याचा परिणाम आमच्या पिढीला आज भोवत आहे. कांही रूढ झालेल्या समजुती उराशीं बाळगून राहिल्यामुळें परदेशगमन, अस्पृशता निवारण वगैरे

गोष्टी दु:सह झाल्या. परदेशगमनामुळें आमचें त्यांच्याशी दळणवळण राहिले असते. हिंदु लोकांस बुद्धिमत्तेच्या दृष्टीनें त्यांच्याशी केव्हांही बरोबरी प्रस्थापित करतां आली असती. हिंदु लोकांचा त्यांच्यावर वचक राहिला असता. आज जे आह्मांला नेटीवांची कास धरून चालावें लागते. तसें न होतां राष्ट्रांत स्वतंत्रपणे वावरतां आलें असतें. कदाचित इथें एक निराधार प्रश्न निघणें संभवनीय आहे. रिपब्लिक होण्याच्या पूर्वी गोव्यांतील हिंदू लोकांस कोणत्याच प्रकारची चळवळ करता येत नव्हती. पण हिंदु लाकांनी स्वातंत्र्याकरता किंवा कोणत्या ना कोणत्या तरी सुधारणेकरता खटपट केल्याचें कुठें तरी आढळते काय? नाहीच बरं. असे गृहीत धरून चाला की, त्यांनी हिंदूंना वाईट रीतीनें वागविले. पण हा परिणाम कशाचा? हलगर्जीपणा. दूरदृष्टी नसल्याचा. शहाणपणा गेल्याचा. त्यांना हिंदु लोकांत हिंमत नसल्याचें कळले. हिंदु लोकांचा बावळटपणा त्यांच्या दुष्टोत्पत्तीस आला. आणि हिंदु लोकांचे शहाणपण त्यांना अजमावता आलें. त्यांच्यामुळें त्यांचे हिंदु लोकांबद्दल अशा प्रकारचें मत झालें असेल की, हिंदु लोक ह्मणजे त्यांना कोणत्याच बाबतींत महत्त्व असू नये. आमचे हिंदु लोक नशीबावर हवाला ठेऊन गोऱ्यांना गौरवीत राहिले व अजूनही तेंच चाललें आहे. पहा. कोणत्याही शिकलेल्या तरुणाकडे पहा. त्याचें सगळें लक्ष पांढऱ्या समाजांत मिरविण्याकडे. गोऱ्या लोकांत मिळून मिसळून असण्याकडे, त्यांच्याकडून धन्य ह्मणवून घेण्याकडे. त्यांच्या पोषाखांत सजवून घेण्याकडे. गोऱ्या संस्कृतीनुसार वागण्यांकडें आणि आपल्या सगळ्याचा उपहास करण्याकडे. रिपब्लिक होण्याच्या पूर्वी आह्मां हिंदु लोकांना कोणत्याच प्रकारची सरकारी सुखें अनुभवण्यास मिळाली नव्हती. सरकारी नोकर होण्याचें मुष्कील. सरकारी मानमरातब तर दूरच. सरकारांत ह्या अघडभूत बंब्या पाद्रीचें वजन, यांनी हिंदु लोकांबद्दल हलकट मत पसरविलेलें, अशा परिस्थितींत हिंदूंना महत्त्व मिळणें अशक्य झालें. पण आज सगळे कांही बदललें आहे. बड्या बड्या नोकऱ्या पटकावतां येतात. कोणत्याही प्रकारचें उच्च शिक्षण मिळविता येते, युरोपियन समाजांत मोकळेणपणानें वावरतां येते. तेव्हा आजच्या ह्या परिस्थितीचा

गोड फायदा घेण्याचें सोडून स्वातंत्र्यानंतर मिळणाऱ्या लांबच्या सुखाकरतां तळतळत असणें जरा शहाणपणाचं दिसत नाही! जसा एखादा गरीबीतला भोजनभाऊ श्रीमंताच्या इकडे भोजनाचा लाभ लाभतांच भोजनावर यथेच्छ ताव मारण्याचे दवडीत नाही, त्याचप्रमाणे आमच्या आजच्या तरुणपिढीची स्थिति होणें संभवनीय आहे. शिकलेले सावरले तरुण देश कार्याकरीता सरसावण्याच्या ऐवजीं सरकारी लोकांत प्रतिष्ठा मिरवायला सज्ज झाले पहातांच, आमचें पुढें कसें हा प्रश्न डोळ्यांसमोर उभा रहातो. राजकीय, सामाजिक धार्मिक वगैरे गुंतागुंती दिवसेंदिवस जास्ती गुरफटत चालल्या आहेत. तिकडे आज डोळेझांक करून राहिलों तर उद्यां गळा दाबून घेईपर्यंत पाळी येईल. वरवर पाहिल्यास कुठेंच कसल्याच अडचणी भासमान झाल्याचें दिसून येत नाही. पण समाजाचें अंतरंग तपासावयास जाल तर इतकी कांही घाण कोंडलेली दिसेल की, आणखी कांही वर्षांनी ती उपसून टाकणें अशक्य होईल. हिंदुसमाज वैभवशाली झाला पाहिजे तर आजपासूनच खटपटीला लागले पाहिजे. तरच पुढच्या पिढीला वैभवाचें शिखर गाठणें सोपे जाईल. आणि आजची आमची जबाबदारी आह्मीं विसरलो तर कदाचित् हिंदुसमाज नामशेष होण्याचीही पाळी येईल. आजपर्यंत झोपेंचे सुख घेतलें तें पुरें नाहीं का झालें? श्रीमंत रंगमूर्तींना चांगला रंगबहार आपल्या रंगमहालांत उडवूं द्या. आमचें आजचें कर्तव्य ह्मणजे पोटापाण्याचा वगैरे प्रश्न मागें ठेवून देशकार्याकरता पुढें सरसावणें हे होय. पोटापाण्याचा प्रश्न प्रथम सोडवून मग देशाच्या गोष्टींत मन घालूं असें ह्मणणे खऱ्या सुशिक्षिताला कधींच भूषणावरह होणार नाही. खरा सुशिक्षित कोण? निरनिराळ्या खात्यांतील शिक्षण संपादन करून त्या शिक्षणाचा उपयोग स्वत:ची प्रतिष्ठा वाढविण्याकडे करणारा, आपलें सारे आयुष्य पैसे कमावण्यांत खर्च करणारा आणि सरकारची हांजीहांजी करून स्वत:चे वैभव वाढवूं इच्छिणारा माणूस खऱ्या सुशिक्षितांत केव्हांच गणला जाणार नाही. आजच्या परिस्थितीनुसार जी जी सामाजिक धार्मिक वगैरे कर्तव्यें स्वत:ला प्राप्त झाली आहेत ती स्वशक्तीनुसार जो बजावित राहील त्यालाच सुशिक्षित ह्मणतां येईल. एखादा बडा नोकर,

श्रीमंत व्यापारी, हुशार वकील, लाखो रुपयांची इस्टेट असणारा वगैरेपैंकी एखाद्या नि:स्वार्थ बुद्धीनें काम करणाऱ्या लहानशा देशसेवकापेक्षा कमी महत्त्वाचाच गणला जाईल. स्वत:ची तुंबडी भरवून घेण्यापलकडे यांच्या हातून कांहीच होत नाही.

आपल्या ब्रिटिश हिंदुस्थानाकडे पहा. ज्याला जें जें करावेसें वाटलें त्यानें तें तें उचललें. कै. लो. टिळकांनी सरकारी मदतीची अपेक्षा न करितां राजकारण चालविले. उलट जर त्यांच्या मनांतून पैसाच कमावण्याकडे आपल्या सर्वत्रांचा उपयोग करावा असे घेतलें असतें तर ते आज कोट्याधीश होऊन गेले असते. कै. गोखल्यांना सरकारला न दुखविता आपलें ध्येय गांठावे असें वाटलें. महात्मा गांधीजींनी दोन्हीही करून पाहिली. कै. आगरकर यांनी धार्मिक वेड्या समजूती घालविण्याचें मनावर घेतलें. स्वामी विवेकांनंदजीनी आर्यधर्म जगभर पसरविण्याकरीतां कंबर बांधली. श्री. कर्वे आज एक फार नाजूक पण महत्त्वाचे असें स्त्रियांबद्दलचें काम चालवित आहेत. एकूण जो तो कांहीना कांही करीत असल्याचें आह्मीं पहात आहों. पोर्तुगीज सरकारच्यामुळें जरी ते आज आह्मांस आमच्यापासून निराळें असे भासत आहे. तरी पण अशी एक वेळ येईल की, आह्मांला त्यांच्यापासून निराळेच ह्मणविता येणार नाही. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून जाऊं तर फार फलहितकारक गोष्ट होईल.

तरुणांनो! आपल्या देशाला धर्माला विसरूं नका. आपल्या देशाचा उद्धार आपणांसच करावयाचा आहे. इतर लोक जे येथें आहेत तें स्वत: चे कल्याण करण्याकरीता. आह्मीं जागे झालेले त्यांना कधीच आवडणार नाही. आपलें वर्चस्व आह्मां लोकांवर चालविलेलें त्यांना आवडते. आपल्या देशाचा अभिमान ते जितका बाळगतात तितकाच आह्मी आपल्या देशाचा बाळगला पाहिजे. आपल्या राष्ट्रीयत्वाबद्दल त्यांना जितका आदर आहे. तितकाच आह्माला आमच्या राष्ट्रीयत्वाबद्दल असला पाहिजे. त्यांना परतंत्रता जाचते आणि आह्माला सुखाची वाटते! तेव्हां जबाबदार तरुणांनो, आजपर्यंत झालें तें झालें. पुढें तरी कार्याला लागा.

*(गुरुवार, दि. २८ जून १९२३)*

# जनसेवा हीच ईश्वर सेवा

*–लाखों हमारे दीन दु:खी बंधु भूखों मर रहे।*
*पर हम व्यसनमें डुबकर कितना अपव्यय कर रहे।*
*क्या देशवत्सलता यही है? क्या यही सत्कार्य हैं?*
*क्या लक्ष्य जीवनका यही हैं? क्या यही औदार्य है?*
*दे कर उन्हें साहाय भरतक सब विपती व्यथा हरो।*
*निज दु:खसेही दुसरोंको दु:खका अनुभव करो।*

***– बाबू मैथिली शरण गुप्त.***
*भारत भारती.*

ईश्वरानें निर्माण केलेल्या सृष्टीमध्यें आज जें दु:खाचें साम्राज्य पसरलेलें दिसत आहे, त्यांस परम दयाघन प्रभूचा कांहीच दोष नसून, त्याच्या नियमाचें आपण योग्य रीतीनें पालन करण्यास विसरतों. त्याचेंच हें फळ होय. आपण जर योग्य नियमाप्रमाणें वागलों असतो, तर सर्व जगतांमध्ये सुखसमाधान नांदलें असतें.

जगामध्ये मानव जातीची अशी होत असलेली दुर्दशा पाहून, उदार अंत:करणाच्या महात्म्यांना लोकसेवेचें अवलंबन करावें लागतें, व ते अशा चुकलेल्या लोकांना मार्गावर आणण्याची खटपट करीत असतात.

सेवा हा पवित्र धर्म आहे. दु:खी लोकांना मदत करणें. संकटग्रस्तांना हात देणें, दुष्काळानें पिडलेल्यांना अन्नदान करणें, जलप्रलयानें सर्वस्वी निराधार झालेल्या लोकांना सर्व तऱ्हेची मदत करणें, अज्ञानानें मार्ग चुकलेल्या उपदेश करून मार्गावर आणणें, या सारखें पवित्र कर्तव्य दुसरें नाही. मात्र हें स्वत:च्या इच्छेनें व निरपेक्ष बुद्धीनें झालें पाहिजे. ईश्वरानें आपणाला मानव जातींत जो जन्म दिला आहे, त्यांत त्याचा उद्देश, आह्मी स्वत: खाऊन पिऊन स्वत:च्या मुलांबाळांचा सांभाळ करावा, एवढाच फक्त नसून, आमचें बांधव जे दु:खांत, संकटांत आहेत, त्यांना शक्य ती मदत करण्याकरिताच दिलेला

आहे. जगामध्ये शांतता नांदून मानव जातीचें कल्याण व्हावें, अशी इच्छा बाळगणाऱ्या प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य ह्मणजे अशी दु:खें शक्य तो कमी करण्याचा सतत प्रयत्न करणेंच होय. आपल्या बांधवांची सेवा करणें हेंच खरें साधुत्वाचें लक्षण होय.

सेवा करण्याचे मुख्य दोन मार्ग आहेत. पहिला उच्च कोटीतील मार्ग ह्मणजे स्वत:ला या कार्यार्थ वाहून घेऊन, तत्प्रीत्यर्थ आपला देहसुद्धां खर्ची घालणें हा होय. दुसरा ह्मणजे स्वत: संसार करीत असतांनाच आपल्याकडून शक्य त्या तऱ्हेनें व शक्य त्या द्वारानें सेवा करणें हा होय.

सेवेची कल्पना जुनी आहे. आमच्या हिंदुस्थानामध्यें त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणें घातली गेलेली कितीतरी धर्मशाळा व अन्नछत्रें दृष्टीस पडतात! आज जरी त्यांचा दुरुपयोग होत असला, तरी पण ज्या काळीं ती निर्माण झाली, त्यावेळी त्यांची अत्यंत गरज होती यांत शंका नाही. शिवाय हिंदुस्थानांत बौद्ध धर्माचा उदय झाल्यानंतर भूतदयेला जास्त चालना मिळालें होते. इ. सन ४०० मध्यें सुप्रसिद्ध चिनी प्रवासी फाहियान हा हिंदुस्थानांत आला होता. त्यानें आपल्या प्रवास वर्णनांत लिहून ठेविलें आहे की, 'या देशांतील मोठमोठ्या लोकांनी गरीब लोकांकरीता रोग चिकित्सालये काढलेली असून, त्यामधून पुष्कळ गरीब लोकांना राहाण्याची सोय होते. तेथें त्यांना सर्व मदत फुकट केली जात असून, रोगमुक्त झाल्याबरोबर त्यांना आपापल्या घरीं पाठविलें जाते.' यावरून त्यावेळींही आजच्या प्रमाणेंच जनसेवेचे प्रयत्न होत असत. सम्राट अशोक यानें बुद्ध धर्माचा स्वीकार केल्यानंतर पुष्कळ जनसेवेची कृत्यें केली. निरनिराळ्या रोग्यांकरीता इतकेंच नव्हे तर रोगी जनावरांकरीतांही चिकित्सालयें बांधलेली होती. या शिवाय ठिकठिकाणी धर्मशाळा, विहिरी, तलाव बांधून लोकांना ज्ञानाचा उपदेश देण्याकरीता आपले आदेशही खडकांवर खोदविले आहेत.

प्रत्येक धर्मांतील मुख्य सिद्धांत ह्मणजे मनुष्य हा ईश्वराचा अंश आहे. भगवान बुद्ध तरी हेंच सांगतात. प्रसेनजित राजाला धर्मबोध करतेवेळी भगवान बुद्ध ह्मणतात :– आपल्या गात्रांचा किंवा इंद्रियांचा उत्तम प्रकारें निग्रह करा. सन्मार्गाचा अवलंब करा. इतरांच्या हक्काची पायमल्ली करून

स्वोत्कर्ष करण्याची हांव धरू नका. जे दु:खी आणि दुर्बल विपन्न स्थितींत असतील त्यांच्या या दुर्बल स्थितीचें परिवर्तन करण्यास झटा व प्रेम संपादा. यावरून त्याचा सर्व भार जनसेवेवर होता असं दिसतें. आपलें साधुवर्य तुकाराम महाराज यांनीही 'जे का रंजले गांजले, त्यासी ह्मणे जो आपुले, तोचि साधु ओळखावा, देव तेथेंचि जाणावा.' या अभंगामध्येसुद्धां ईश्वराची खरी सेवा ह्मणजेच जनसेवा हें चांगल्या रीतीनें सिद्ध केलें आहे.

पाश्चात्य लोकांत समाजसेवेचे प्रयत्न फार दांडगे आहेत. जगातील कोणत्याही भागावर दुष्काळ अगर जलप्रल्यासारख्या आपत्तीने गांजलेले लोक असतील त्यांना मदत करण्याची त्यांची ताबडतोब तयारी असते. कोट्यावधी रुपये ते लोक या कामीं खर्च करितात, इतकेंच नव्हे तर अशा कामीं खर्च करणें हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे असें ते लोक समजतात. युद्धाच्या सुरवातीलाच जर्मन लोकांचा हल्ला बेलजम देशावर झाला. त्यामुळें बेलजम देश अगदीं उजाड होऊन, हजारों कुटुंबें निराश्रित झालीं. लाखों मुले उघडीं पडून, पोटापाण्याची सुद्धां व्यवस्था होण्याची पंचाईत झाली. अशी वेळी अमेरिकन लोकांनी त्या लोकांच्या मदती करतां धांव घेऊन, बोटींच्या बोटी भरून खाण्याचे पदार्थ व कपडेलत्ते पाठवून दिले, व त्या लोकांचे संरक्षण केलें. या प्रमाणेंच त्या लोकांचा दानधर्मात्म प्रयत्न सदोदीत चालूच असतो. फादर दामियन व कुमारी नायटिंगेल या दोघांचे परिश्रम इतिहासांत अमर राहातील. फादर दामियन यानें स्वत: आपला सगळा जन्म रक्तपितीने सडलेल्या लोकांची सेवा करण्यांत घालविला. रक्तपितीसारखा भयंकर रोग कीं ज्याचें नांव काढल्यास सुद्धां अंगावर शहारे येतात! त्या रोग्यांची सेवा करण्यांतच आपलें सगळें आयुष्य खर्च केलें. अखेरीस त्यास तो रोग होऊन त्याला स्वत:च्या प्राणाचा बळी द्यावा लागला! या प्रमाणेंच अशा प्रकारें कार्य करणाऱ्या युरोपमध्यें पुष्कळ संस्था चालू आहेत.

हिंदुस्थानांत मोपल्या बंडाने सगळा मलबार प्रांत उध्वस्त करून टाकला, व हजारों कुटुंबाना निराश्रित केलें. त्या वेळी भारत सेवक समाज, पुणें, या संस्थेनें फार उपयुक्त कार्य केलें. लाखों रुपयांचा फंड गोळा करून त्या लोकांस मदत केली. याच प्रकारें या प्रसंगी आर्य समाजानेंही महत्त्वाचें

कार्य केलें आहे. बंगाल मधील दुष्काळाच्या  वेळीख सर प्रफुल्लचंद्र राय यांनी ठिकठिकाणी भिक्षांदेही करून वर्गणी जमा केली व अशा लोकांना मदत केली. या शिवाय सेवासदन, सोशल सर्विस लीग, सेवा समिति, रामकृष्ण सेवाश्रम, वगैरे संस्था उत्तम प्रकारें जनसेवा करीत आहेत.

प्रस्तुत, गोमांतकामध्ये साखळी, वळवई वगैरे इतर ठिकाणीं जलप्रलय होऊन जो कहर उडाला आहे तो दैवी आहे, यांत शंका नाही. यांत मानवांचा कांही दोष नसून, या गोष्टी ईश्वराधीन असतात. अशा वेळीं आपलें कर्तव्य ह्मणजे अशा दु:खी व निराश्रित लोकांना शक्य त्या तऱ्हेची मदत करणें हे होय. आज गोमांतकामध्ये कांही ठिकाणीं या लोकांच्या मदतीकरीता फंड गोळा करण्याचे काम चालू आहे. परंतु वर्तमान पत्रांमधून जे आंकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यावरून पाहतां काम समाधानकारक नाही, हें मोठ्या खेदानें कबूल करणें भाग आहे. आपल्या गोमांतकांत पुष्कळ श्रीमंत लोक मोठमोठे उत्पन्नदार आहेत. पुष्कळ देवालयांतून व्याजी लावण्याकरीता पैसा पडून आहे. धर्मगुरुंकडेही पुष्कळसा पैसा सांठलेला आहे. परंतु या सर्वांना आपल्या पैशाचा व्यय करण्यास मुळींच समजत नाही. असें ह्मणावें लागतें. देवालयांनी मोठमोठे उत्सव करून आतषबाजीसारख्या निरुपयोगी कामांत पैसा खर्च करावा व धर्मगुरुंनी मठांतील प्रत्येक उपकरण सोन्याचें करण्याकडे शिलकेचा उपयोग करावा, या पलीकडे आपलें कांही कर्तव्य आहे यांची त्यांस जाणीव होऊं नये, यासारखी कोणतीच खेदाची गोष्ट नाही. भूतदया हें धर्माचें मुख्य अंग आहे. या विषयी सर्व साधुसंतांनी व धर्मग्रंथांनी टाहो फोडून कंठशोष केला असूनही आमच्या धर्मांच्या मुख्य अधिपतीची ही स्थिति मग इतरांविषयीं काय बोलावें? गोमांतकांत बऱ्याच गांवी जलप्रलयामुळें उडालेल्या दुर्दशेची करूण कहाणी या धर्मगुरूंच्या कानी गेलीच नाही काय? गेली असणारच. मग लोकांकडून मिळालेल्या देणग्या वर्गण्यातून अस्तित्वांत आलेल्या  चाललेल्या या संस्थानांतून अशा निराधार लोकांना मदत कां होऊं नये? परमार्थास आड येणारी इतकी स्वार्थबुद्धी, धर्मगुरूनीच दाखविल्यास, त्यांच्या संसारमग्न शिष्यवर्गांस तरी कां दोष द्यावा? संन्यासधर्माचा असा विपरीत अर्थ झाल्यामुळेंच हिंदुस्थान

अधोगतीला पोहोंचला आहे. हिंदु समाजाच्या धर्मगुरूंनी पाषाणाच्या निर्जीव मूर्ति सोन्यारूप्यानें मढवून आपल्या डोळ्याचें पारणें फेडण्यापेक्षां या चालत्या बोलत्या जिवंत देवांकडे आधी पहावें व त्यांसच संतुष्ट करावे. हेच देव आपल्या राष्ट्राच्या उपयोगी पडणारे आहेत. सोमनाथाच्या देवालयांत खंडो गणती संपत्ती एकत्र झाली होती. तिच्या लोभानेंच गजनीच्या महंमुदाचें इकडे आगमन झालें! हीच संपत्ति त्यावेळी जनस्वरूप देवांकडे खर्च करण्यांत आली असती तर महंमुदाच्या सेवेचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य या जिवंत देवांच्या अंगी आलें असते. मुसलमानांनी हजारों देवळें बाटविली! खंडो गणती संपत्ति लुटली! हजारों देवांच्या मूर्ति फोडल्या! परंतु या देवांनी त्या दांडग्या लोकांचा प्रतिकार करण्याचें सोडून उलट, आपलें राज्यच दीर्घाकार करण्याचें सोडून उलट, आपलें राज्यच दीर्घकालपर्यंत त्यांना देऊन टाकले! यांत परमेश्वराचा उद्देश आपल्या लोकांचे डोळे लवकर उघडून यापुढें तरी अशा संपत्तीचा विनियोग जनरूपी देवांकडे व्हावा हाच असला पाहिजे. परंतु अद्यापही या गोष्टीकडे डोळेझांक केली जाते, हें आपलें दुर्दैव होय. आपल्या धर्मगुरुनी ख्रिस्ती धर्माच्या मिशनरीकडे पहावें ह्मणजे ते लोक अशा निराश्रित लोकांकडे आपण होऊन कसे धांव घेतात, ते दिसून येईल. भूतदेयची तत्त्वें पोत्यांत गुंडाळून ठेऊन त्यांची पूजा करीत बसण्याकडे त्यांचा कल नसून, ती तत्त्वे ते शक्य तितकी अधिक व्यवहारांत आणीत असल्यानें आज त्यांच्या धर्माला उज्ज्वलता मिळाली आहे. असो.

ही स्थिति पालटण्याकरीता आपण शक्य तितकी अधिक मेहनत घेतली पाहिजे. याची जबादारी तरुण पिढीवर आहे. आपले लोक पुष्कळशा निरूपयोगी कामांकडे पैसा खर्च करतात. परंतु अशा लोकोपयोगी व राष्ट्रोपयोगी कामांस पैसा देण्याचें पुष्कळांच्या जिवावर येते. आमच्यांतल्या श्रीमंत लोकांनी हिंदु देवळांची गोष्ट सोडाच, पण ख्रिश्चन देवळें बांधण्याला सुद्धां भरपूर मदत केली आहे! परंतु त्याच लोकांचे अशा भूतसेवेच्या कामीं पडलेंले आंकडे पाहिले ह्मणजे त्यांच्या अज्ञानाची फार कींव येते. ही स्थिति श्रीमंत लोकांचीच नसून मध्यमस्थितींतील लोकांची हीच स्थिति दिसून येते. गोमांतकांतल्या देवळांतून जो पुष्कळसा पैसा व्याजी लावण्याकरीतां ठेविला

आहे, त्याचा विनियोग अशा वेळी व अशा कामीं केला पाहिजे. नुसते तीळ-तांदुळ जाळून अगर मोठमोठे उत्सव करण्यापेक्षां या जनरूपी देवांकडे त्या पैशांचा विनियोग केल्यास खरी ईश्वरीसेवा केल्यासारखें होईल. देवाकरीता मनुष्यें नसून, मनुष्यांकरितांच देवांचे अस्तित्व आहे.

गोमांतकीय तरुणांनो! आपल्या गोमांतका प्रमाणेंच मलबारमध्ये कहर उडालेला आहे; परंतु तिकडे सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटीसारख्या संस्था काम करीत आहेत. आपणांकडे अशी संस्था नाही. तरी आपण या कामीं प्रत्येक खेड्यापाड्यांतून फंड गोळा करून या निराश्रित लोकांना मदत केली पाहिजे. हीच खरी ईश्वर सेवा होय. यासारखा दुसरा पवित्र धर्म नाही. आपल्यापैकी पुष्कळ लोकांना अशा कामीं भिक्षांदेही करण्यास लाज वाटते. त्यांनी जरा बाहेर नजर फेंकून पाहिल्यास सर प्रफुल्लचंद्र राय यांसारखे थोर पुरुष अशा कामाकरीता फिरून कशी मदत मिळवीत आहेत, तें दिसून येईल. त्यांच्या सारखेंच आपण आपलें कर्तव्य बजावण्यास यावेळी तयार झालेंच पाहिजे.

*(गुरुवार, दि. २३ ऑगस्ट १९२३)*

# बुद्धिबळाचें पुढील धोरण

एका हतानें टाळी कधीही वाजत नसतें. टाळीचा आवाज ज्यावेळी आमच्या कर्णपटावर ध्वनित होतो त्यावेळी आमच्या मन:चक्षूंसमोर दोन हातांच्या सहकारितेचे चित्र उभें राहत असते. एका हातानें फार तर एकीकडची हवा दुसरीकडे वातावरणांतर करील. पण हा पराक्रम गाजवितांना, त्या एका हाताच्या हातून टाळीचा आवाज उत्पन्न करण्याची मर्दुमकी दाखविण्याचा जोड हातांचा पराक्रम कदापिही होणार नाही.

गोमांतकांत वाजलेल्या शुद्धीच्या 'टाळी'चाही हाच प्रकार आहे. शुद्धीची 'टाळी' ही एका 'येथील हिंदु समाज स्वरूपाची' हाताचीच कृति नाही. तसेच ती मसूरकर ब्रह्मचर्याश्रमरूपी दुसऱ्या हाताचीही कृति नव्हे. तर

गोमांतकातील शुद्धीचें कार्य उर्फ टाळी ही त्या दोन्ही हातांची समुच्चय कृति होय. यावर दुमत असणें संभवनीय नाही.

धर्मभास्कर विनायक महाराज मसूरकर यांच्या आश्रमाची तेजस्वी धडाडी, अनुपममेय नि:स्वार्थीपणा व अप्रतिम धर्माभिमान हे तीन महनीय गुण जितके शुद्धिचळवळीचें सुरुंग उडवून देण्यास कारणीभूत झालें तितकेंच गोमांतकीय लोकांचा मसूर-ब्रह्मचर्याश्रमाबद्दल निस्सीम आदर, अधिकृत धर्मप्रेम व असामान्य शुद्धिसंघटनेच्छा, हेहि गुण कारणीभूत झाले आहेत, हें कोणालाही कबूल करावें लागेल.

चिंबल येथें शुद्धीचा पहिला सुरुंग उडालेला ज्यांना पहाण्याचें भाग्य लाभलें असेल, त्यांना आह्मी वर नमूद केलेली विचारसरणी नि:शंकपणें मान्य झालीच पाहिजे, असा आमचा समज आहे. ब्र. आनंदमूर्तींसारखे जटाधारी महंत तर शुद्धि कार्यार्थ पुढे सरसावले नसते तर शुद्धि-दिनासारखा सुवर्णदिन येथें केव्हां उगवला असता, हें एका परमेश्वरांसच ठाऊक. तसेंच आमच्या समाजाकडून शुद्धिचळवळीला दिलें गेलेले प्रोत्साहन व त्यांच्याकडून सोंसण्यांत आलेली पदरमोड, या गोष्टी झाल्या नसत्या तर शुद्धिकार्यात दिसून आलेला जोम, कधीच आमच्या दृष्टोत्पत्तीस आला नसता. तात्पर्य शुद्धिकार्याचें श्रेय ब्रह्मचर्याश्रमाप्रमाणें येथील समाजलाही आहे.

टाळी ही दोन हातांची करामत आहे, ही गोष्ट जरी खरी असली तरी या करामतींत डाव्या हातापेक्षां उजव्या हाताचा पराक्रम जरा विशेष महत्त्वाचा असतो, हेंहि विसरतां कामा नये. तसेंच शुद्धिकार्याचें श्रेय हें आश्रमाला आहे, अशी आमची प्रामणिक समजूत आहे. येथील जनतेनें विशेषत: पणजी व मडगांव येथील पुढाऱ्यांनी बरीच चिकाटी व्यक्त केली असली व आपल्या खिशांचा द्रव्यभार बराच हलकाही केला असला, तरी त्याची बरोबरी आश्रमाच्या धडाडीकडे परिस्थितिभिन्नतेमुळें साहजिकच होणें शक्य नाही. सर्वसंगपरित्यागी वृत्तीमुळें आश्रमीय लोकांना शुद्धिकार्यात जितकें लक्ष्य घालण्यास फुरसत होते आहे, तितकें लक्ष्य घालण्यास गृहस्थाश्रमी लोकांस कालानुकूल्य कसें लाभेल?

श्रेयाची ही अशी वाटणी झाल्यावर प्रश्न काय तो राहिला पुढील धोरणाचा. येथें एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे ती ही की, शुद्धिकार्य येथे अजून पुष्कळ व्हावयाचें आहे. नुसता गावड्यांचाच प्रश्न घेतला तर शुद्धिकार्याचा एकच भाग पार पडला असून अजून त्याचे तीन भाग बाकी राहिले आहेत, असें मानणें भाग आहे. अर्थात स्वीकारण्यांत येणाऱ्या धोरणांची दिशा अशी असली पाहिजे की, निदान गावड्यांचे शुद्धिकरण पूर्णपणें शेवटांस पोचेपर्यंत कार्यपद्धतीत कसलेंच शैथिल्य येतां कामा नये. ही स्फूर्ति उपरोक्त कार्यभाग संपेपर्यंतहि निश्चल राहील तरच पुढील शुद्धिकार्य सुकर होणार आहे, असें आमचें मत आहे.

या दृष्टीनें विचार केल्यास व येथील एकंदर परिस्थिती जमेस धरल्यास, आमची मनोदेवता आह्मांस असें सांगतें कीं, ब्रह्मचर्याश्रमावरच पुढील शुद्धिकार्याचें उत्तरदायित्व संपवून आह्मीं त्यास शक्त्यनुसार हरतऱ्हेनें सहाय्य पुरविण्याचें धोरण संभाळणेंच योग्य आहे. आश्रमीय लोकांच्या मार्गात अडचणी उत्पन्न झाल्यास त्या काढून टाकून त्यांचा मार्ग निष्कंटक करण्यास आह्मीं पूर्वीपासून ज्या नेटानें झटत आलो आहोंत त्याच नेटानें पुढेंहि झटणें योग्य आहे. तें काय? याचा विस्तृत विचार पुढील अंकी करूं.

*(गुरुवार, दि. ७ जून १९२८)*

# शुद्धीची पुढील दिशा

पणजीच्या 'प्रकाश' पत्रांत दे. तात्यासाहेब केळकर यांची एक मुलाखत प्रसिद्ध झाली आहे. त्यांतून तेहि शुद्धिकार्याची येथील चळवळ ब्रह्मचर्याश्रमामार्फतच चालू रहावी, असा 'भारता'प्रमाणेंच आपला स्पष्ट हेतु व्यक्त करीत आहेत. दौऱ्याचा कार्यक्रम आटोपल्यानंतर दे. केळकरांनी मुलाखत दिलेली आहे, ही गोष्ट लक्षांत आणली ह्मणजे, येथील वस्तुस्थिति समालोचनाचा अनुभव जमेस धरूनच त्यांनी ब्रह्मर्चाश्रमावर शुद्धिकार्याचें उत्तदायित्व सोपविण्याची आवश्यकता दर्शविली आहे, ह्यांत संशय नाही.

तात्यासाहेबांसारख्या कसलेल्या पुढाऱ्यांचे मत जर ब्रह्मचर्याश्रमानें शुद्धिकार्य चालू ठेवावें असें आहे, तर त्या मतानुसार आमचें येथील धोरण निश्चित करण्यास कसली हरकत आहे?

ब्रह्मचर्याश्रमानें येथील शुद्धिकार्याचा प्रश्न पूर्वीप्रमाणेंच हाती घ्यावा व त्याला स्थानिक लोकांनी पूर्वीप्रमाणेंच पूर्ण पाठबळ द्यावें, ह्मणजे शुद्धिकार्याच्या मार्गात अडथळे उत्पन्न होण्यास वाव राहणार नाही, असा आमचा विश्वास आहे. शुद्धिकार्य हें धर्मकार्य असल्यानें धर्मकार्यासच वाहून घेतलेल्या अशा आश्रमीय लोकांकडून जितक्या सुलभ रीतीनें त्याला चालना मिळणार आहे. तितक्या सुलभरीतीनें गृहस्थाश्रमी लोकांकडून मिळणें अर्थातच अशक्य होय. शिवाय आपण हिंदु झालो ही भावना जटाधारी महंतांच्या सान्निध्यानें शुद्धिकृतांच्या अंत:करणात जितकी तीव्र व कायम ठशाची होत असते तितकी इतर लोकांच्या होमहवनांनी व मंत्रतंत्रांनी होत नसते, असा आमचा स्वानुभव आहे व ह्मणूनच आह्मी पुन्हां पुन्हां ब्रह्मचर्याश्रमानेंच शुद्धिकार्याचा प्रश्न होती घेऊन तो शेवटास पोंचविणे इष्ट आहे, असें प्रतिपादितों.

आश्रमाचे ब्रह्मचारी लोकांसंबंधी आमच्या सरकारची वृत्ति स्वच्छ नसून त्याकडून जो हद्दपारीचा 'अव्यापारेषु व्यापार' झाला. त्याला तरी कारण आश्रमीय लोकांची धडाडीच हें होय. आश्रमीय लोकांचें सामर्थ्य अल्पावधीत शुद्धिकार्य तडीस नेणारें असून, शिवाय तें अल्पावधीतच पचविणारेंही आहे अशी खात्री पटल्यामुळेंच व आनंदमूर्ती सारख्या आश्रमीय लोकांस सरकारी विरोध झाला. हा विरोध काढून टाकण्याऐवजी जर आह्मीं सरकारच्या इच्छेप्रमाणें येथील शास्त्र्यांकडून 'कशी बशी' व 'फावल्या वेळी' शुद्धिकार्याची चळवळ सुरू ठेविली तर तीत दृढत्व उत्पन्न होईलच असें ह्मणतां येत नाही. तेव्हां असें अदृढ व अनिश्चित शुद्धिकार्य करण्यांत कालाचा द्रव्याचा अपव्यय करण्यापेक्षां जर आह्मी आश्रमीय शास्त्रांवरील अन्याय्य निर्बंध काढण्यास प्रथमत: झटून व त्यांस शुद्धिकरणाचा दरवाजा खुला करून देऊन, नंतर शुद्धिकार्याची चळवळ पुनरेव चालू केली तर जास्त हितप्रद होणार नाही काय?

शुद्धिकार्याचा पहिला सुरुंग ब्रह्मचर्याश्रमाच्या लोकांनी स्थानिक लोकांच्या सहाय्यानें उडविला, हें जितकें खरें आहे तितकेंच आश्रमीय लोकांची स्फूर्ति तेजस्वी रुपानें प्रकट झाली नसती, तर शुद्धिकार्याची मुहूर्तमेढ येथें केव्हां रोवली गेली असती, हें अजमावणें कठीण झालें असतें, हेंहि तितकेंच खरें आहे. 'गोवें प्रांतातील शुद्धिकार्याची प्रगति ह्यापुढें तेथील हिंदुच्या धैर्याच्या, एकजुटीच्या व धडाडीच्या प्रयत्नांवरच अवलंबून आहे.' ह्या 'केसरी'च्या उद्गारांचा अर्थ असा खास नाही की, ब्रह्मचर्याश्रमांच्या कित्येक शास्त्रांस झालेल्या सरकारी निबंर्धाकडे दुर्लक्ष करून, त्यांच्या प्रेरणेंनें सुरू झालेलें शुद्धिकार्य कसेंबसें आह्मीं रेटून न्यावे. तर 'कसलाही संकोच मनात न धरितां गोवेंप्रांतातील लोकांनी यापुढें निर्भयपणें शास्त्रांशी सहकारिता करण्यावरच शुद्धिकार्याची प्रगती अवलंबून आहे.' असा केसरीच्या त्या उद्गाराचा आह्मी अर्थ करीतो. व तो तसा कां करीतों, याचें स्पष्टीकरण ज्यांना येथील शुद्धिचळवळीची आरंभापासूनची माहिती आहे, त्यांना करून देण्याचें कारण नाही.

नुकतीच जी बेळगांव शहरी आह्मी धर्मभास्कर विनायक महाराज यांची भेट घेतली तींत महाराजांनी गोमांतकांतील शुद्धिकार्य गोमांतकीय लोकच चालविण्यास पुढें येत असल्यास आपणांस आनंद असल्याचें ध्वनित केले. ते ह्मणाले: 'वसई, कोंकणप्रांत, विजापूर वगैरे ठिकाणच्या पुढाऱ्यांकडून आश्रमाला शुद्धिकार्यार्थ इतकीं आमंत्रणें आली आहेंत की, ती सर्व संभाळून यापुढें गोव्यांत ब्रह्मचारी पाठविणें बरेच जड जाईल. आश्रमाचा गोव्याबाहेरचा व्याप आतां इतका वाढलेला आहे की, त्याला धोका न आणतां गोमांतकांत कार्य चालू ठेवणें आश्रमाला अत्यंत कष्टकर होईल.'

मसूर-ब्रह्मचर्याश्रम धर्मकार्यासाठी अवतरला आहे. त्याला गोवा काय, कुठेही धर्म कार्य करावयाचे. अमूकच एका विशिष्ट स्थळीं धर्मकारणाकडे लक्ष्य पुरवून आह्मी त्यांचे सहाय्य घेतले पाहिजे. आह्मी त्यांच्या स्फूर्तीनें शुद्धिकार्य यशस्वी रीतीनें पचविले पाहिजे. असें करण्याचा प्रयत्न न करणें ह्मणजे भयंकर कृतघ्नपणा होय, असेंच कोणीही ह्मणेल.

दुसरें असें की, येथील शुद्धिकार्याला सुरवात आश्रमाकडून झाली असल्यानें त्याच्याच सहाय्यानें पुढील कार्यही चालू असलेलें काय वाईट? केव्हांही झालें तरी या बाबतीत पक्षभेद असणें फार घातक. शुद्धिकार्यासारख्या धर्मकारणांतही पक्ष-उपपक्षांचा धिंगाणा सुरू झाल्यास नवीन फलोत्पत्ती तर काही होणार नाहीच, पण जे कांही अल्पफळ पदरांत पडलें आहे त्याचा मात्र विनाश होईल. हें विसरता कामा नयें. शुद्धिकार्य आश्रमाच्या पुढारीपणाखाली झाले काय किंवा येथील स्थानीक पुढाऱ्यांच्या देखरेखीखाली झालें काय, मिळून एकच. शुद्धिकार्य झाले पाहिजे यात दुमत असणें संभवनीय नाही. आणि जर आश्रमामार्फत शुद्धिकरण विशेष धडाडीनें पार पडतें असा अनुभव आहे तर त्याचें मुख्य उत्तरदायित्व कांही लोकांनी आपल्या शिरावर घेऊन कार्याचा एकसूत्रीपणा बिघडविण्याची घाई कां करावी हें आह्मांला समजत नाही.

शुद्धिकरणाची चळवळ जोरावण्याला येथें एक स्वतंत्र संस्था स्थापून तिच्यामार्फत ती चालू ठेवण्याचा उद्देश कांही वाईट नाही. अशानें आश्रमाला आपला दुसरीकडील व्याप संभाळण्यास विशेष वाव मिळाला असता. पण दुःखाची गोष्ट की, गर्भावस्थेंत असलेली ती संस्था सूर्यप्रकाश पाहील किंवा नाही, अथर्वा यदाकदाचित् पाहिल्यास ती कार्यक्षम होईपर्यंत जगलेच किंवा नाही, हें निश्चयात्मक ठरवणें फार कठीण आहे. नवीन होऊं घातलेल्या या संस्थेविषयी लोकांची अनास्था पाहिली ह्मणजे, ब्रह्मचर्याश्रमानेंच गोमांतकांतील शुद्धिकार्य चालविणें इष्ट आहे, या आमच्या मताला पुष्टी मिळते. एतावता आजपर्यंत आमच्यांत स्थापन झालेल्या संस्थांचे सिंहावलोकन केलें, आजपर्यंतचा शुद्धिकार्याचा इतिहास लक्ष्यांत आणला, प्रस्तुतच्या परिस्थितीचें निरीक्षण केलें व आश्रमाविषयी गोमांतकांत वसत असलेल्या निरतिशय भक्तीभावाची छाननी केली. तर आमचेंच मत वस्तुस्थितिदर्शक आहे, असें वाचकांस वाटल्याविना रहाणार नाही. ह्मणून गोमांतकीय हिंदु बांधवांस आमची विनंति आहे की, ज्या मसूर येथील ब्रह्मचर्याश्रमाने अत्यंत कष्ट सोसून येथे शुद्धिकार्याची मुहूर्त मेढ रोविली, त्यालाच प्रार्थना करून येथील पुढील कार्याचेही उत्तरदायित्व स्वीकारण्यास भाग पाडावें, तसेंच आश्रमीय लोकांविरुद्ध असलेले सरकारी निर्बंध काढून टाकवून त्यांना येथें

मुक्तद्वार मिळेपर्यंत, नवीन शुद्धिकरण्याच्या भरीस न पडतां, झालेलीच शुद्धि पचविण्याचें धोरण संभाळावें.

अशानें कृतघ्नपणाचा आरोप आह्मांवर लादण्यास कोणलाही छाती होणार नसून, शुद्धिकार्यातील एकसूत्रीपणाही कायम टिकणार आहे. नाही तर वादविवादांतच आमच्या शक्तींचा निरर्थक व्यय होऊन एका शुभ निमित्ताने गोमांतकीय हिंदूंत घडून आलेलें ऐक्य चुटकीसरशीं नष्ट होईल, असें बजावल्याशिवाय आमच्यानें रहावत नाही. ऐक्य नष्ट तर होईलच शिवाय पुढील कार्यही कदापि जीव धरू शकणार नाही, असें आमचें प्रांजळ मत आहे. व हा काळ मानापमानाचे खेळ खेळण्याचा, वादविवाद करण्याचा किंवा 'तूस कांडून हाताला फोड काढण्याचा' नसल्यानें, केवळ कार्यावर नजर ठेवून केलेली आमची विनंती लोकमान्य होईल, अशी आमची पूर्ण निश्चिती आहे.

*(गुरुवार, दि. १४ जून १९२८)*

# अस्पृश्यता निवारणाचें कार्य

अपवित्रांस पवित्र करू शकणाऱ्या आह्मीं आर्यांच्या परमश्रेष्ठ व तेजोमय धर्माच्या कुशींत जवळ जवळ सहाकोटींना मोजतां येणारा एक वर्ग हजारों वर्षांच्या दीर्घ कालानंतरही अस्पृश्य मानलेला रहावा ही गोष्ट जशी आर्य धर्माच्या कमकुवतपणाची निदर्शक आहे तशीच ती त्याच्या अनुयायांना लज्जास्पद अशी आहे. भरतखंड हेंच ज्याचें व्यवहारांचे क्षेत्र त्या आर्यांनी आपल्यापुरत्या, समाजस्वास्थ्याच्या दृष्टीनें ही अस्पृश्यता निर्माण केली होती असें गृहीत धरलें तरी सध्याच्या जागतिक व्यवहाराच्या या कालांत तिला स्थान मिळणें कदापि शक्य नाही असें. पं. मदनमोहन मालविय सारख्या कट्टया धर्मनिष्ठ पुढाऱ्यांचे मत आहे. आमच्या गोमंतकातील रोजच्या व्यवहाराचा अनुभव पाहू गेलों. तर अस्पृश्य मानलेले व हरिजन या पवित्र नावानें आज संबोधण्यास येणारे हिंदुसमाजातील वर्ग दूर ठेवू पहाणे कठीण

होऊन बसले आहे. इतकेच नव्हे तर हिंदुधर्मानें म्लेंच्छ मानलेल्या परधर्मिय ख्रिस्ती, मुसलमानांचे संघटन होण्याचे प्रसंग अधिकाधिक वाढत आहेत. या सर्व व्यवहारास फाटा देऊं ह्मटले तर तें साध्य करू पाहणाऱ्यास वेड्याच्या कोटींत जाऊन बसावें लागेल.

ख्रिस्ती आणि मुसलमान यांची अस्पृश्यता आपोआप नष्ट होण्यास जीं कारणें धडून आली ती दिनदुबळ्या हरिजनांच्या वाट्यास आलीं नाही ही गोष्ट खरी आहे. राज्यकर्ते होण्याचा मान परमेश्वराने त्यांना प्राप्त करून दिला नाही या त्यांच्या दुर्दैवाचा फायदा घेऊन त्यांस निंद्य लेखणे हे आह्मा त्यांच्या धर्मबांधवांस शोभते काय याचा विवेकपूर्ण विचार स्पृश्य व श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या वर्गाने निदान भूतदयेच्या दृष्टीने करणे योग्य आहे. जगद्वंद्य म. गांधीनी स्वत:च्या आत्मयज्ञानें या गोष्टीची जाणीव आह्मास दिली आहे. ती जाणीव नसलेले सनातनी काही कमी नसले तरी *'देव यात्रा विशु: स्पर्श दोषों न विद्यते।।'* यासारख्या वचनांच्या आधारें त्यांचा हा विरोध दिवसें दिवस कमी होत जाईल असा भरवसा बाळगण्यास जागा आहे. आमच्या गोमंतक प्रांतातील हिंदु लोक सामाजिक व धार्मिक बाबतींत अखिल हिंदुसमाजाशीं निगडीत असल्यानें तेथील समाजोन्नतिकारक चळवळीचें लोण तेथील हिंदुसमाजापर्यंत पोंचणें अपरिहार्य आहे. तोच न्याय अस्पृश्यता निवारण्याच्या चळवळीसही लागू असून थोड्याबहुत प्रमाणात तिनें आपलें येथील स्थान पटकाविलें आहे. ठिकठिकाणीं साजरें होत असलेले स्पृश्यास्पृश्यांचे सार्वजनिक सत्यनारायण व श्रीगणेशोत्सव या आमच्या ह्मणण्याची साक्ष पटवित असून सुमारे अडीचशे सदगृहस्थांच्या नावाने निघालेलें व बहुजनसमाजाच्या वाचनात येत असलेले पत्र हे त्याचें द्योतक होय. या पत्रकाच्या शिरोभागी श्री. राव राजे वासुदेव, आ. देशप्रभु यासारख्या विद्वान व धर्मनिष्ठ गृहस्थांचे नाव असून शेवटी अस्पृश्यता निवारणकार्याचे एक सन्मान्य व निरलस प्रचारक सिताराम वामनराव कामत यांचे नाव आहे. पत्रकातील मजकुर साधा, समतादर्शक व व्यवहारास साजरा आहे, तसाच तो धर्मशास्त्रांच्या कक्षेत बसणारा आहे. या पत्रकाच्या वाचनानें आमच्या समाजाचे मत परिवर्तन झाले व हरिजनांना अगदी साध्यासुध्या व माणूसकीच्या सवलती देण्यास तो उदार बुद्धीनें तयार

झाला तरी हिंदुसमाजांत दिसत असलेले हें अस्पृश्यतेचें बंड निवारण होण्यास उशीर लागणार नाही. परमेश्वर सर्वांना सद्‌बुद्धी देऊन हें मंगल कार्य घडवून आणील असा भरवसा बाळगण्यास त्या दयाघनाचा आह्मी उपमर्द करीतो असें कोणीही विचारवंत ह्मणणार नाही, हें खास

*(गुरुवार, दि. ७ सप्टेंबर १९३३)*

# अस्पृश्यता दूर करा!

## (लेखांक १ ला)

वरील नावांचा मथळा शिरोभागी असलेल्या जाहीर पत्रकासंबंधाची साधारण ओळख गेल्या अंकी आह्मी दिली आहे. आजच्या अंकात, त्या पत्रकात ज्या कांही सवलती अस्पृश्य मानलेल्या हरीजनांन मिळवून देण्यास विनंती केली आहे. त्यांची माहित करून घेण्याचे योजिलें असून त्यामुळें मतपरिवर्तनास थोडीफार मदत झाल्याविना राहणार नाही, अशी आमची समजूत आहे. भारतांतून ‘हिंदु समाजांतील अस्पृश्यता’ या विषयावर एक लेखमाला प्रसिद्ध झाली असल्याचें आमच्या वाचकांस आठवत असेलच. आतां सुदैवानें ठिकठिकाणच्या समाजहितेच्छु लोकांकडून हा जो मतप्रचाराचा प्रथमोपाय करण्यात आला आहे तो अभिनंदनीय व भावी कार्याच्या दृष्टीनें आशाजनक होय. असो.

उल्लेखित पत्रकारच्या शेवटीं खालील गोष्टी प्रचारात आणण्याकरीतां झटावें अशी विनंती करून त्या लागोपाठ पांच क्रमांकांत पुढीलप्रमाणे दिल्या आहेत:

१) सार्वजनिक व्यवहारांत स्पृश्यास्पृश्यतेचे रुढिप्रणीत भेद यापुढें जमेस न धरणे.

ही सवलत अगदीं साधी असून ती व्यवहारांत अमलांत येण्यास प्रामाणिकपणें कोणाचीच हरकत येणे शक्य नाही. कारण आज असे कोणते

सार्वजनिक व्यवहार राहिले आहेत की तेथे स्पृश्यास्पृश्यतेचे भेद मानले जातात? बाजारहाट घ्या, सरकार दरबार घ्या, विद्यालयें घ्या, कोणत्याही जत्रा घ्या, नाटकें सिनेमा घ्या, आगगाड्या, आगबोटी, मोटारी यांचे प्रवास घ्या किंवा सर्वांत सोवळे देवस्थानचे उत्सव घ्या; त्यात ख्रिस्ती-मुसलमानांचे संघटन अधिकाधिक वाढलें असून लोकसंख्येच्या प्रमाणांत अस्पृश्य मानलेल्यांचीही सरमिसळ होत असलेली दिसून येते. मग एखादा आपणास अत्यंत सोवळा समजत असलेला हिंदु गृहस्थ अस्पृश्य इसम देखतांच, तितक्यापुरते आपले अंग बसल्याजागी आंखडून घेऊं लागला तरी तो आपली जागा सोडून निघून जाणार नाही. मग हिंदुधर्मांचे एक अगं असलेल्या अस्पृश्यांपुरतेच हे स्पृश्यास्पृश्यतेचे भेद उकरून काढण्याचे पातक करण्यांत कोणतें भूषण अहे, याचा विचार सद्विवेक बुद्धीनेंच करून पाहणें इष्ट आहे.

२) देवळें, शाळा व इतर सार्वजनिक जागा, तसेच धार्मिक सार्वजनिक स्वरूपाचे समारंभ व प्रसंग यांत अस्पृश्यांची सहकारिता स्वीकारणे.

सार्वजनिक व्यवहारांत स्पृश्यास्पृश्यतेचे भेद न मानण्याचे ठरविले ह्मणजे त्या दुसऱ्या क्रमांकांत सांगितलेल्या जागी व प्रसंगी अस्पृश्यांची सहकारीता स्वीकारण्यास कोणासही अभिमान वाटेल. अस्पृश्य बांधव हे आमच्या प्रमाणेच हिंदुसमाजाचे घटक आहेत, याचाविसर पडू देणें ह्मणजे विराट स्वरूपाच्या एका अंगाचा विसर पडूं देण्याइतकें अश्लाघ्य आहे. यावर कोणी असा प्रश्न करतील की, अद्याप अस्पृश्यांना आमची देवालयें खुलीं झाली नाहीत. मग त्यांत त्यांची सहकारिता स्वीकारणें कसें शक्य होईल?

'न कर्त्याचा वार शनिवार' ह्मणतात त्याप्रमाणे जर हा प्रश्न असेल तर त्यास उत्तर दिलें न दिलें, कार्याच्या दृष्टीनें सारखेच आहे. आणि सत्य शोधनासाठी जर तो असला तर मात्र त्या प्रश्नावर उलट प्रश्न असा करता येईल की, अस्पृश्यांना खुलीं झाल्याखेरीज राहिली आहेत

अशी तुमची कोणती देवळे ती आधी सांगा?

त्या उलट प्रश्नास उत्तर देताना पृच्छकांच्या लक्षात एकच गोष्ट आणून दिली पाहिजे की हिंदू धर्मांने अस्पृश्य मानलेल्या समाजात मुख्यत्वे करुन परधर्मिय असलेल्या ख्रिस्ती आणि मुसलमान यांचा अंतर्भाव होतो आणि या दोघां जबरदस्त समाजाचे पाय लागले नाहीत, असे देवालय गोमंतकांत सापडणे विरळा.

ख्रिस्ती मुसलमानांचा हिंदु देवालय प्रवेश ह्मणजे तो देवाच्या मूर्ती जवळ थेट गर्भागारांत किंवा गर्भागारांभोवती प्रदक्षिणेसाठी मधल्या चौकात झाला असे कोणी समजू नये व आह्मीही तसे ह्मणणार नाही. या दोन भागांखेरीज देवालयाचे सारे भाग त्यांना मोकळे असतात. हे डोळे शाबूत ठेवून पाहणाऱ्यास आह्मीं सांगावयास पाहिजे असे नाही.

देवालयाच्या चौकाभोवती असणाऱ्या परिसरांत कौल प्रसादाच्या निमित्ताने ख्रिस्ती लोक प्रवेश करतात ही गोष्ट सत्य आहे व त्याची तमा कोणाही धर्मनिष्ठास वाटत नाही. ह्यापसे येथें नवीनच स्थापन झालेल्या श्रीलक्ष्मीनारायण देवस्थानच्या घटनेत हिंदू असून अस्पृश्य असलेल्या वर्गास देवळात जाण्यास मज्जाव केला असताना देखील परधर्मीय असलेल्यांस चौक गर्भागाराखेरीज इतर भागांत जाण्याची सवलत ठेविली आहे. यावरुन येवढें सिद्ध होण्यास हरकत नाही की, ख्रिस्ती-मुसलमान लोक राजरोसपणें हिंदु देवालयांतील चौकाबाहेरील, ओट्यावर अथवा सभामंडपांत प्रवेश करतात. आणि हे लोक हिंदुधर्माने अस्पृश्य मानले नाहीत असे सिद्ध करणार धर्मब्रुव जोपर्यंत पुढें आले नाहीत तोपर्यंत हिंदु देवालयें अस्पृश्यांना खुली आहेत असे ह्मणण्यास कोणताच प्रत्यवाय नाही. इतके असूनही अतिशुद्रांना मात्र देवालयप्रवेशाची मोकळीक ठेवून त्यांच्याशी सहकारिता करणें इष्ट नाही असें ह्मणून आह्मी कोणतें धर्मकार्य करणार?

*(गुरुवार, दि. १४ सप्टेंबर १९३३)*

# अस्पृश्यता दूर करा!

## (लेखांक २ रा)

पहिल्या लेखांकात पत्रकांतील दुसऱ्या क्रमांकांत सांगिलेल्या सवलतींचा विचार करीतानां, 'ख्रिस्ती आणि मुसलमान या दोघां जबरदस्त समाजांचे पाय लागले नाहीत असें हिंदु देवालय गोमंतकांत सांपडणे विरळा' असे आह्मी ह्मटलें होते. विरळा असलेलें देवालय, सांखळी येथील श्रीदत्तमंदिर असें ह्मणतां येईल, कारण त्या देवालयाच्या प्राकारांत सुद्धा ख्रिस्ती मुसलमानास येण्याची मनाई आहे. मग, देवालयाच्या इमारतीत त्यांचा पाय कसा लागूं शकेल? पण इतर देवालयांची गोष्ट तशी नाही. त्यांच्या या ना त्या कोणत्याही भागांत ख्रिस्ती-मुसलमानाचा प्रवेश होत नाही असे ह्मणवत नाही. देव, देवालय व सेवाजन यांचे पावित्र्य सांभाळण्याची नमुनेदार संस्था या नात्याने श्री पर्तगाळ मठ संस्थानाचेंच उदाहरण घेऊं. या मठाच्या इमारतीत प्रवेश करावयाचा झाल्यास मुख्य दरवाजांतच दहा बारा पायऱ्या खाली उतराव्या लागतात. त्या उतरल्या ह्मणजे सभामंडपांत प्रवेश होऊं शकतो. त्यानंतरचा दरवाजा व चौकी ओंलांडून मग श्रीरामदेवाच्या मठांत जावयाचें असतें. या दरवाजाच्या आंत ख्रि. मु. चा प्रवेश होत नसला तरी तो सभामंडपांत होण्यास कसलीच आडकांठी नसते. श्री. स्वामीमहाराजांची भेट घेण्यास कोणी ख्रिस्ती, मुसलमान आले तर याच जागी त्यांस भेट देण्यांत येते. आणि त्यांच्या प्रवेशामुळें तेथील पावित्र्य नष्ट झालें असें मानण्यांत आलेलें कोण्याच्याही ऐकिवात नाही. पर्तगाळमठांतील ही रीति. तर इतर देवालयांत ती कशी असू शकेल याचा विचार वाचकांनी करावा.

देवालयातील इमारत ही सभामंडपापासून किंवा सोंड्यापासून गर्भागाराच्या भिंतीपर्यंत येथून तेथून एक असते. तिच्या नवप्रवेशवेळी जें विधिपूर्वक सूत्रवेष्टन केले जातें ते या सगळ्या इमारतीस केलें जाते मग अस्पृश्य अशा ख्रिस्ती मुसलमानांचा प्रवेश त्या इमारतीच्या कोठल्याही भागांत जरी झाला तरी सूत्रवेष्टन झालें असलेल्या इमारतीचें पावित्र्य नष्ट झालें असेंच

मानणें भाग आहे. ख्रिस्त्यांचा स्पशृ झाल्यानें हिंदु इसम अशूचि होतो असें मानलें तर तो स्पर्श 'सर्वेषु गात्रेषु शिर: प्रधान:' असलेल्या मस्तकास झाला काय, पोटास झाला काय किंवा पायास झाला काय अशुचित्व सारखेंच! त्याचप्रमाणें, ख्रिस्त्याचा प्रवेश चौकावर झाला काय, सर्वळीत झाला काय, देवालयाची सगळीच इमारत त्यामुळें अपवित्र होईल हें निराळें सांगावयास नको. बाकी ख्रिस्ती, मुसलमान भटाऱ्यांनी बनविलेले पाव कुरतडणारे, ख्रिस्ती मुसलमान कारखानदारांनी तयार केलेली सोडा लिमनेड गटागटां पिणारे आणि त्यांस हात देऊन दिवाणखान्यांत नेऊन बसविणारे, तसेंच या खालच्या चौकावर येण्यास हरकत नाही असें परधर्मीय अधिकाऱ्यांस काकुळतीनें सांगणारे या सर्वांस हिंदु महार, चांभार मात्र अधिक अस्पृश्य वाटत असतील तर 'शिरसि मा लिख मा लिख!' असेंच परमेश्वराला ह्मणावें लागेल! तसा प्रसंग, सुविचारी लोकांकडून, आजकालांत कोणावरही न येतां दुसऱ्या क्रमाकांत सांगितलेल्या, देवळें, शाळा वगैरे सार्वजनिक जागा आणि धार्मिक व सार्वजनिक स्वरूपाचे समारंभ यांत अस्पृश्य मानलेल्यांची सहकारिता संतोषानें स्वीकारली जाईल असा आह्मांस भरवंसा आहे.

३) अस्पृश्य बांधवांच्या शिक्षणास हस्ते परहस्तें उत्तेजन देणें.

महार, चांभार, भंगी, ढोर, डोंब वगैरे अस्पृश्य मानलेले लोक हे हिंदुधर्मीय असल्याने, ते आमचें धर्मबांधव आहेत हें नाकबूल करण्यास आज कोणताच मार्ग शिल्लक नाही. एकदां या लोकांचे बंधुत्व मान्य झाल्यावर त्यांस अज्ञांनातून वर काढून सज्ञान करण्याची जबाबदारी उच्च व श्रेष्ठ ह्मणविणाऱ्या वर्गावर येते. हिंदुधर्मात चार वर्ण सांगितले आहेत व त्या वर्णांचे गुरुत्व एकट्या ब्राह्मण वर्गाने *'वर्णांना ब्राह्मणो गुरु:।'* या वचनानें आपणाकडे घेतलें आहे. ज्या काळी हें गुरुत्व ब्राह्मण वर्गाकडे आलें त्या काळी वर्णगुरुत्वाला साजेशी कामगिरी झाली होती असें अभिमानानें सांगता येईल. पण आज *'ब्राह्मण बुद्धीपासून चेवले। आरामापासून भ्रष्टले।'* या श्रीसमर्थांच्या वचनाची आठवण करून देणाऱ्यांचाच सुकाळ झाला आहे. ब्राह्मण तरुणांनी या वस्तुस्थितीचा पूर्णपणें विचार करावा व स्वत: सज्ञान होऊन इतर वर्णियांसहि सज्ञान करण्याचा चंग बांधावा. कारण, *'नहि ज्ञानेन*

*सदृशं पवित्र इह विद्यते।'* असें श्रीमत्‌भागवद्‌वचन आहे. अशा या पवित्र ज्ञानाचा फायदा ब्राह्मणांनीच घेऊन न थांबता, क्षत्रिय, वैश्य व शुद्रातिशुद्र या आपल्या धर्मबांधवांस देऊन आपले कर्तव्य पार पाडावे.

ब्राह्मणानंतर क्षत्रिय वर्गावर, वैश्यवर्गावर व शुद्रवर्गावर क्रमाक्रमाने ही वरील जबाबदारी येते हें त्यांनी विसरू नये. आजचा काल हा समतेचा आहे. या कालांत अमुक वर्गाने अमूक करावे, हे माझें काम नाही ते माझे काम नाही असें ह्मणून भागावयाचे नाही. सर्वांनी एकजुटीनें व एक विचाराने कोणतीही कामें पार पाडली पाहिजेत, बुद्धिवंतांनी बुद्धि द्यावी, धनवंतांनी धन द्यावे, बलवंतांनी बल खर्चावें व या तिन्हीच्या योगाने अज्ञान्यास सज्ञान करण्याचे पवित्र भगवत्‌कार्य यथाशक्ती पार पाडावे. अस्पृश्यांना सज्ञान करण्याचें कार्य हेहि एक पवित्र कार्यच आहे. आर्यधर्माने त्यांस आपल्या विशाल उदरांत जागा दिल्यास आज दहा हजारांहून अधिक वर्षे झाली असती. त्यांची अपवित्र राहणीपाहून त्यांस दूर ठेवण्याची सावधानता राखीली तशीच त्यांना सज्ञान करण्याची व त्यांची राहणी सुधारण्याची खबरदारी घेतली असती तर आजचा हा अपमानकारक व परस्परांची मनें दुखविण्याचा प्रसंग ओढवलाच नसता! आर्यधर्मांत ज्ञानाचं महत्त्व ठिकठिकाणीं वर्णिले आहे. त्याचा इवलासा वाटा अक्षर ओळखीपुरताच अस्पृश्य जनांस मिळाला असता तर त्या वर्गातून अनेक थोर व कर्तृत्ववान निपजले असतें. भागवत धर्मांने या दृष्टीने थोडीफार कामगिरी केली व ह्मणूनच त्या निकृष्ट वर्गात

*ब्राह्मण तो एक सजन कसाई।।*
*विकी शेषशाई मांस ज्यांचे।।१।।*
*ब्राह्मण तो एक चोखोबा महार।।*
*वाही सर्वेश्वर भार त्याचा।।२।।*

अशा प्रकारच्या स्तुतीस पात्र झालेली नररत्नें निर्माण झाली. असा प्रयत्न या ज्ञानयुगांत झाला तर सहाकोटी इतक्या असलेल्या त्या समाजातून लाखों नसले तरी हजारो लोक चोखामहार, रोहीदास चांभार, सजन कसाई वगैरे सारखे निपजतील त्यांचा आह्मांस देश धर्मकार्यार्थ फार मोठा उपयोग

होईल, हें लक्षांत न घेता पूर्वीप्रमाणेच जर त्या लोकांची आह्मी उपेक्षा केली तर या आमच्या सहा कोटी धर्मबांधवांना अज्ञानात ठेविल्याचे पातक श्रेष्ठपणा मिरवणाऱ्या वर्गाच्या मस्तकावर सतत राहिल.

*(गुरुवार, दि. २९ सप्टेंबर १९३३)*

# अस्पृश्यता दूर करा!

## (लेखांक ३ रा)

मागील लेखांकात केलेल्या विवेचनावरुन स्पृश्यास्पृश्यतेचे रुढी प्रणीत भेद काढून टाकून देवळें, शाळा, व इतर सार्वजनिक जागा तसेच धार्मिक व सार्वजनिक स्वरुपाचे समारंभ व प्रसंग यात अस्पृश्य मानलेल्या हरिजन बांधवांची सहकारिता स्वीकारणे व त्याच्या शिक्षणास हस्तें परहस्तें उत्तेजन देणें हे इष्ट, न्याय्य व आवश्यक कसें आहे हें आमच्या वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. आता वरील मथळ्या खालील पत्रकाचा व चौथ्या क्रमांकांत सांगितलेल्या सवलतीचा विचार करू.

४) न्हावी, परिट, उपाध्ये, कासार इ. वर्गाच्या व्यवसायांचा फायदा इतरांप्रमाणे अस्पृश्य बांधवांनाही मिळण्याच्या कामी प्रतिबंध नसणें.

या क्रमांकात दिलेल्या वर्गापैकी उपाध्यांचा वर्ग वगळला तर राहिलेले न्हावी, परिट व कासार हे वर्ग, आपापल्या धंद्याचे वेळी अस्पृश्य मानण्यांत येत असत. कालांतरानें या वर्गावरील अस्पृश्यता नष्टप्राय होण्याच्या बेतांत आली आहे. मात्र या गोष्टीची जाणीव आजच्या हिंदुसमाजास नाही.

वरील चारही वर्गांकडून करण्यांत येत असलेले धंदे अत्यंत समाजोउपयोगी असून त्या वर्गाच्या उपजीविकेंची ती अखंड साधनें असल्याचें आजच्या आर्थिक हलाखीच्या काळांतही दिसून येते. हे वर्ग चालवित असलेल्या व्यवसायांचा फायदा हिंदुसमाजातील स्पृश्य वर्गांस मिळतो तसाच इतर धर्मिय समाजासही मिळत असतो. पण दुर्दैवाची

गोष्ट आहे की, हिंदु असून अस्पृश्य मानलेल्या वर्गांस तो मिळत नसतो. हिंदु न्हावी वस्तरा हातांत घेऊन तो ख्रिस्ती अगर मुसलमान असलेल्या इसमांच्या डोईवर व दाढीवर नि:शंकपणे चालवितो; कात्रीने त्याचें केशकर्तन करीतों व शेवटीं त्यांचा चेहरा झाडून पुसून साफसुफ करून, अत्तर पाण्यानें आणि सफेतीने सुगंधीत व झगझगीत करीतों. यांत न्हावी आपण घरी जाऊन स्नानाचमनानें आपली शुद्धी करून घेईल. परंतु महार, चांभारदिकांच्या बाबतींत मात्र त्यांचा सोवळेंपणा अती कडक दिसून आल्याविना राहणार नाही. आपल्या केशकर्तनालयात एखादा अस्पृश्य इसम हजामतीसाठी तोंड वेंगाडून आलेला दिसला तर तो एक हात ख्रिस्त्यांच्या डोईवर व दुसरा हात मुसलमानांच्या दाढीवर फिरवितां फिरवितां ह्मणेल की, तुह्मां अस्पृश्यांस आमच्या दुकानाचें दरवाजे खुलें नाहीत, चुकून सुद्धा तुह्मी लोक आमच्या दरवाजांत दिसाल तर झाडून सारे बामण वाणी, शेट, मराठे, नाईक गावडे, भट गुरव आमच्यावर बहिष्कार पुकारून आमचा धंदा बंद पाडतील व आमची जात आह्मांस वाळींत टाकील.

न्हाव्यांचे जसें उत्तर तसेंच परिटांचेही असेल. ख्रिस्ती लोकांचे कपडे धुण्यास घेताना ते मुत्रानें भरले आहेत की विष्टेंनें लडबडलेले आहेत, ते विटाळशीचें आहेत की बाळंतीणीचे आहेत, जेवणाच्या मेजावरील आहेत की रोग्यांच्या आंथरुणावरील आहेत हें तो पाहत नाही. दिसलें तरी अनमान करीत नाही. केवळ धंदा चालावा ह्मणून इतर बाबींकडे तो दुर्लक्ष करीत असतो. मात्र त्याला सुद्धा महार चांभार खपायाचा नाही.

कासारांचेही तसेंच. केव्हां घरांत तर केव्हां बाजारांत, केव्हां आंगणांत तर केव्हा चव्हाट्यावर बसून मिळेल त्या गिऱ्हाईक बायांचे हात चुरगळीत बांगड्या भरणे हे त्यांचे काम! त्यांना स्पृश्य वर्गांतील बाया चालतात तशाच ख्रिस्ती मुसलमान बायांही चालतात. महार, चांभाराच्या बाया दिल्या तर मात्र तो बांगड्याच्या सराची गाठ मोकळी करून, त्यांतील तीन चार किती पाहिजे त्या बांगड्या त्यास देऊन पैसे घेऊन मोकळा होईल. त्यांच्या पैशाला मात्र तो अस्पृश्यतेचा दोष लागू होत नाही. कारण ती लक्ष्मी प्रत्यक्ष श्रीविष्णूची पत्नी, सदाशुची!

स्पृश्यास्पृशतेच्या भोंवऱ्यांतून नुकतेच उठलेल्या या वर्गाची जर ही गत तर सर्वांत ज्यांचें सोवळें अधिक त्या उपाध्येवर्गांची गती किती तीव्र व भडक असेल याचा विचार वाचकांनीच करावा. यांना प्रसाद कौल देण्यास आणि नारळ, तांदूळ विडा दक्षणा घेण्यास ख्रिस्ती लोक चालतात, मुसलमान पतकरतात पण हिंदु महार, चांभारांची सावली खपावयाची नाही. हे महार चांभार हिंदु आहेंत. त्यांच्या धार्मिक कार्यांत त्यांस मदत करणे त्याच्या देहाची व मनाची शुद्धी करून त्यांच्या धर्मभावना जागृत ठेवणे हिंदुधर्माविषयी पूज्य भाव वाढवून आपलेपणा बाळगण्यास प्रवृत्त करणें वगैरे सारखी कर्तव्यें पार पाडण्याची कामगिरी जन्मजात श्रेष्ठत्वाने आपले शिरावर असल्याचें हा वर्ग विसरत चालला आहे. मग ती त्याकडून कशी घडून येईल तें दिसतच आहे!

हा अशा तऱ्हेचा चालत असलेला अन्याय यापुढें चालू देणें कीं न देणें हा आज हिंदुसमाजापुढील प्रश्न आहे. तो न्याय दृष्टीनें व समभावनेनें सोडवून अस्पृश्य मानलेल्यांस वरील वर्गाच्या व्यवसायांचा फायदा मिळवून देणें हें त्यांचे कर्तव्य आहे. हिंदु समाजातील धंदेवाल्यांनी परधर्मीयांच्या गरजा भागवाव्या व आपल्या समाजातील काहीं वर्गांस मात्र त्याचा फायदा मिळून देऊ नये हा कोठला न्याय? ज्या वर्गावर हा अन्याय होत आहे त्या वर्गाच्या जागीं आपणास स्पृश्य समजणारे वर्ग राहिले तर त्यांस काय वाटेल, त्याची स्थिती काय होईल याचा विचार त्यांनी आपल्या मनाशीच करून पहावा 'पर दु:ख शीतळ' असतें असें ह्मणतात. पण तेच आपणास प्राप्त झालें तर मात्र अति तापद वाटल्याखेरीज राहणार नाही. न्हावी, परिट, उपाध्यें व कासार या वर्गांनी आपल्या व्यवसायांचा फायदा जर महार चांभारादिकांस करून दिला नाहीतर त्यांच्या व्यवसायाचा फायदा आपणास करून घेण्याचा अधिकार त्यांस कसा राहिल हें आपण पाहिले पाहिजें. महार चांभारदिकांच्या येथे, उपाध्येंपणा न करणारे भिक्षुक, त्यांच्या हजामती न करणारे हजाम, त्यांचें कपडे न धुणारें धोबी व त्यांच्या बायका मुलींच्या हातात बांगड्या न भरणारे कासार हें कोणत्या अधिकारानें त्यास सुपसुपली, परडी वार्ली व जोडे वाहाणां आणावयास सांगतील? समाजाचे एकंदर व्यवहार आजपासून

श्रम विभागाच्या तत्त्वांवर चालले आहेत व यापुढेंही ते चालतील व चाललेच पाहिजेत मग, दुसऱ्यांचा उपयोग आपण करून घ्यावयाचा व आपण मात्र दुसऱ्यांस उपयोगी पडूं नये हे रास्त व हितावह ठरेल काय? हळूहळू काळ बदलत असून तदनुसार परिस्थितीही बदलत चालली आहे. त्यावेळी 'परिस्थितीप्रमाणें बदला. नाही तर मरून जाल' या ब्रह्मीभूत श्रीरामतीर्थ स्वामींच्या वचनास आह्मी जागलों नाहीं तर पश्चातापाची पाळी आमच्यावर आल्याविना राहणार नाही.

*(गुरुवार, दि. २८ सप्टेंबर १९३३)*

# अस्पृश्यता दूर करा!

## (लेखांक ४ था)

गेल्या अंकात प्रसिद्ध झालेल्या तिसऱ्या लेखांकात या लेखमालेस कारणीभूत झालेल्या वरील नावांच्या पत्रकांतील, चौथ्या क्रमांकात सांगितलेल्या सवलतीसंबंधाचें विवेचन आले होतें. आजच्या या शेवटच्या लेखांकांत पाचव्या सवलतीचा यथामती परामर्श घेऊन ही लेखमाला संपविण्याचे योजिले असल्याने ती सवलत कोणत्या प्रकारची आहे हे आपण पाहू :-

५) देवस्थानच्या महाजन मंडळीने अस्पृश्य बांधवांना मंदिर प्रवेशाची मोकळीक देऊन आपले मनौदार्य प्रगट करणे.

या क्रमांकांत अस्पृश्य मानलेल्या आमच्या धर्मबांधवांना मंदिर प्रवेशाची ह्मणजे देवालय प्रवेशाची मोकळीक करून देण्याची विनंती केली असून ती न्याय्य व रास्त असल्याचें धर्मग्रंथातील वचनांवरुन सिद्ध करून देता येईल.

पूर्वीच्या एकदोन क्रमांकातील सवलती संबंधीचा विचार करतांना देवालय प्रवेशाबद्दलचे विवेचन आलेंच आहे. तें जमेस धरुन सांगावयाचें झाले तर इतकें ह्मणता येईल की, मलमूत्राने लडबडलेल्या व लाळ व चिखल

यांनी बरबटलेल्या आपल्या अज्ञ बालकांस केवळ अस्वच्छतेंमुळे जवळ न करण्याचा दुराग्रह दाखविण्याचें पाप करणें खऱ्या आईला जसे शोभणार नाही. त्यांचप्रमाणें आपल्या कुशीत जन्मलेल्या मानीव अस्पृश्यांस देवालयासारख्या स्थानापासून दूर ठेवणे हें हिंदुधर्मांस व हिंदुसमाजास शोभण्यासारखे नाही. हिंदु ह्मटलां की त्याला समाजांत व समाजानें निर्माण केलेल्या सार्वजनिक जगांत स्थान असलेंच पाहिजे. व्यक्ती ही एक समाजाची घटक आहे, असे मानले तर त्या घटकांपासून समाज वेगळा राहणे शक्यच नाही. जन्म, संस्कार, कर्म वगैरेमुळें हिंदु समाजात वेगवेगळ्या जाती कल्पिल्या व मानल्या असल्या तरी त्या या अफाट पसरलेल्या हिंदुसमाज रुपी विराट पुरुषाचे अवयव आहेत असें मनुस्मृति, पुरुषसुक्त वगैरे ग्रंथांवरुन ह्मणतां येतें, मग त्या विराट पुरुषाच्या अवयवांत अस्पृश्य वर्ग तेवढाच वगळला गेला असें कसें ह्मणतां येईल? आणि दुराग्रहानें जर आह्मीं तसें ह्मणूं लागलो तर अस्पृश्य हे हिंदु नाहीत किंवा विराट पुरुष हा एक लंगडा, थोटा,व्यंग असलेला प्राणी आहे असे मानले पाहिजे. जोपर्यंत आह्मी अस्पृश्यांस हिंदु ह्मणतों व मानतो, जोपर्यंत हिंदुसमाजरुपी विराट पुरुषांचें ऋषीमुनींनी केलेले वर्णन प्रमाण मानतों तोपर्यंत त्या विराट पुरुषाच्या देहांतच अस्पृश्य बांधवांना कोणतीही एक जागा नेमून दिली पाहिजे. त्याविना त्या परमेश्वराच्या वर्णनास सार्थकता येणार नाही.

शुद्रवर्ण हा हिंदुसमाजांतील शेवटचा ह्मणून कनिष्ट वर्ण आहे असें गृहीत धरुन त्यांस विराटस्वरूपी परमेश्वराच्या चरणाच्या जागी कल्पिला आहे. या शुद्रांतील काही वर्ग त्यांच्या धंद्याच्या व रहाणीच्या अपवित्रतेमुळे अलग राखले गेले असले तरी ते धंद्यापुरतेच होतें हे विसरुन जाता येत नाही. न्हावी, परीट, कासार, कोळी वगैरे सारखे निरनिराळ्या धंद्याचे वर्ग धंद्याच्याच वेळी अस्पृश्य मानाण्यात येत होते व इतर वेळी ते समाजात मिसळत असत. या सवलतीमुळें त्यांची अस्पृश्यता साफ नष्ट झालेली आपणास दिसून येते. हा न्याय महार, चांभार, भंगी वगैरे सारख्या आजकाल अस्पृश्य मानलेल्या वर्गास लागू केला तर त्या विराटपुरुषाच्या अफाट पसरलेल्या देहांत पुरुषसुक्त काळी असलेलें त्यांचें स्थान त्यास परत मिळवून दिल्याचें श्रेय लाभून विराट पुरुषाच्या वर्णनाची सत्यता व सार्थकता पटवून घेतल्यासारखे होईल.

ज्या धर्मशास्त्रांच्या नावांवर ही अस्पृश्यता टिकवून धरण्याचा प्रयत्न होत आहे. ती धर्मशास्त्रेच तेवढी प्रमाण व इतर मात्र अप्रमाण असें थोडेच आहे! अस्पृश्य बांधवास देवालय प्रवेश मिळावा या दृष्टीने आह्मी वर केलेल्या विवेचनासही धर्मशास्त्रांचा भरपूर आधार आहे हें सहज दाखवून देता येण्यासारखे आहे. मात्र आमच्या स्पृश्य बांधवांनी तो प्रामाणिकपणे वाचून, मनन करून, सत्य असल्यास अंमलांत आणण्याचे यथाशक्ती प्रयत्न केले पाहिजेत. आणि असत्य वाटल्यास तसे सप्रमाण दाखविले पाहिजे.

धंद्याच्या व राहणीच्या अमंगलतेमुळें हिंदुसमाजांतील काही वर्ग अस्पृश्य मानले गेले हें सिद्ध करणारी वचने आहेत; तसेच, कोणत्या ठिकाणी ही अस्पृश्यता मानू नये ते दाखविणारी वचनें ही धर्मग्रंथांत आल्याची दिसून येतात. त्यांपैकी स्मृतिसार, या ग्रंथातील एका वचनाचा उतारा दिला ह्मणजे आमच्या ह्मणण्याची सत्यता कोणासही पटेल.

*संग्रामे हट्टमार्गेच यात्रा देवगृहेषुच्।।*
*अग्न्युत्पोत महापत्सु स्पृष्टास्पृष्टर्न दृष्याति।।*

***(स्मृतिसार)***

अर्थ – लढाई, बाजारहाट, यात्रा, देवालये, अग्निलागला असता व जलप्रलयकाळी स्पृश्यास्पृश्य दोष मानू नये. आजच्या या शेवटच्या लेखांकाचा विषय जो देवालय प्रवेश त्यांचा उल्लेख असंदिग्धपणे या वचनांत आला असल्यानें अस्पृश्य मानलेल्या आमच्या धर्मबांधवास देवालयाचे दरवाजे खुले करण्याचे मनौदार्य दाखविण्यात आमच्या हातून धर्मशास्त्राचा अनादर होणार असल्याची निराधार भिती कोणत्याही स्पृश्य हिंदुंनी बाळगूं नये. उलट, अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशाने धर्मशास्त्रांच्या वचनास आह्मी किती मान देत आहोत हेच जगाला दिसून येईल.

काही दुराराध्य व अप्रामाणिक लोकांच्या दुराग्रहाने हा मंदिर प्रवेश आज उद्या साध्य झाला नाही ह्मणून मात्र त्यांच्या खोट्या समजाप्रमाणे ती देवालये अद्याप शुद्ध राहिली आहेत असे कोणी समजू नये. गोमंतकातील शेंकडा नव्वद अधिक देवालये अस्पृश्य हिंदूंस नसली तरी अस्पृश्य

परधर्मियांस मोकळीच आहेत व त्याचा हक्क इतका शाबित झाला आहे की, ह्मापशें सारख्या शहरातील, उच्च ह्मणविणाऱ्या ब्राह्मण वर्गानें नवीनच स्थापन केलेल्या श्रीलक्ष्मीनारायण देवस्थानच्या घटनेंतच त्या हक्कांची प्रमाणगिरी देऊन टाकिली आहेच. ख्रिस्ती मुसलमानाचे देवालय प्रवेशाचें हक्क शाबित करणारा समाज धर्मशास्त्रांस किती मान देतो हें उघडच दिसत आहे. मात्र, अस्पृश्य हिंदूंच्या बाबतीत 'देवो दुर्बल घातक:' असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागते.

तात्पर्य, हिंदु समाजातील अस्पृश्य मानलेले वर्ग यापुढे सज्ञान व्हावें, त्यांची राहणी व धंदे सुधारावे आणि ते हिंदुसमाजास भूषणभूत व्हावे अशी सदिच्छा प्रत्येक हिंदुधर्मियानें बाळगून विषयीभूत झालेल्या मथळ्यावरील नावांच्या पत्रकांतील सवलती त्यास मिळवून देण्यास झटावे अशी आमची आग्रहाची शिफारस आहे.

*(गुरुवार, दि. ५ ऑक्टोबर १९३३)*

# वेश्याव्यवसायाचें उच्चाटन

वेश्याव्यवसायासंबंधाने प्रश्न निघाला की, तो व्यवसाय अजिबात नष्ट करणे अशक्य होय असे कांही जणांकडून समर्थन करण्यात येतें, तर कोण ह्मणतात की वेश्या व्यवसायाचे उच्चाटन झाल्यास उल्लू लोकांकडून कुलीन स्त्रियांच्या पातिव्रत्यास कलंक लावण्यासारखे प्रयत्न केले जातील. हे आक्षेप केवळ काल्पनिक असल्यावरुन त्याच्या शक्याशक्यतेचा मीमांसेत शिरण्यापेक्षां जेथें तो वेश्याव्यवसाय अगदी बंद करण्यात आला आहे त्या रशियांत त्या धंद्याच्या उच्चाटनामुळे कोणते परिणाम ओढवले आहेत. ते पाहू. ता. १५ जानेवारीच्या 'आठवड्याचा नवाकाळ' या पत्रात 'सुधारलेल्या रशियांतील सद्य:स्थिती' पाहून आलेल्या एका हिंदी गृहस्थाने आपले अनुभव करून केले असून, त्यांत इतर युरोपियन राष्ट्राच्या मानाने रशियन लोकांच्या सार्वजनिक आयुष्यातील विलक्षण सुधारणा व नैतिक दर्जा कितीतरी श्रेष्ठ

आहे इत्यादी गोष्टी सांगताना पुढील मजकूराचा उल्लेख केला आहे.

'रशियामध्ये वेश्याव्यवसाय कायद्याने बंद असला तरी सार्वजनिक व्यवहारातही वेश्या व्यवसायाबद्दलचा तिटकारा व्यक्त होत असताना दिसतो. झारशाहीत वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना सुधारून त्यांचा दर्जा वाढविण्याच्या हेतूने व त्यांना शिक्षण देऊन देशकार्यार्थ त्यांचा उपयोग व्हावा या हेतुने निरनिराळ्या ठिकाणी करेक्शन, प्रोटेक्शन अशा प्रकारची आश्रम पद्धती ठेवण्यात आली आहे. आपला उदरनिर्वाह कामकाज करून चालविण्याची पात्रता व शिक्षण वेश्यांना देण्यांत येऊन त्यांना वरिष्ठ दर्जाला पोहचविण्याचा उपक्रम गेल्या कित्येक वर्षांपासून येथें सुरू असल्यामुळे आज रशियासारख्या मोठ्या प्रदेशांत वेश्या सापडणार नाहीत, ही एक आश्चर्यजनक सुधारणा आहे. एक वर्षभर त्यांना करेक्शन हाऊसमध्ये ठेऊन शिक्षण द्यावयाचे, एक वर्षानंतर त्यांना उद्योगधंदा द्यावयाचा व तीन वर्षांच्या काळात त्यांना निट बंदोबस्तात ठेऊन योग्य रितीने सांभाळावयाचे अशा रितीने इतर स्त्रियांच्या योग्यतेला त्यांना चढविण्याचा सरकारी क्रम अत्यंत प्रशंसनीय आहे. त्यानंतरही मुक्तता झाल्यावर एखाद्या स्त्रीने पूर्वीप्रमाणे राहण्याचा व धंदा चालविण्याचा चोरून प्रयत्न केल्याचे समजून आले तर तिला अटक करून पुन्हा पूर्वी प्रमाणे ताब्यात घ्यावयाचे धोरण सरकारकडून कडक रितीने अंमलांत येत असते. वेश्या व्यवसायाला कायद्याने परवानगी होती त्यावेळी त्यांना 'पिवळ्यारंगाची' तिकीटे देण्यात येत असल्यामुळे ज्यू जातींच्या स्त्रियांनाही रशियात राहून वेश्याव्यवसाय चालविता येत असे. पण मॉस्कोमध्ये पंचवार्षिक सरकारी प्लॅन सुरू झाल्यापासून हा कायदा बदलण्यात आला. एकंदर चार हजार वेश्यांना लगेच उचलून सरकारी करेक्शन हाऊसमध्ये नेण्यात आले. आता वेश्यांचे अस्तित्व नसल्यामुळे करेक्शन हाऊसेस कमी करून फक्त एकच हाऊस ठेवण्यात आले आहे. त्यात यावर्षी ५७५ स्त्रिया होत्या. अनैतिक प्रचाराचा बंदोबस्त रशियन सरकारकडून व रशियन लोकांकडून कशा यशस्वी रीतीने चालला आहे याचा हा दाखलाच नव्हे काय? ज्या देशात अद्याप कायद्याने वेश्याव्यवसाय चालू आहेत ते देश नैतिक दृष्ट्या आपण रशियापेक्षा जास्त चांगले आहोत अशी प्रौढी मारतील काय?'

गोव्यातील सुधारणाप्रिय लोकांच्या खटपटीने वेश्याव्यवसायास पायबंद बसण्यासाठी 'शेंस' ह्या विधीचा अर्थ धार्मिक स्वरुपाचा असून व्याभिचार प्रवृत्त कुमारिकेचे लग्न एखाद्या पुरुषवेशधारी स्त्रीशी औपचारिकदृष्ट्या लावून देणे इतकाच आहे. मग ह्या औपचारिकबाबींचे उच्चाटन केल्याने वेश्या व्यवसायास आळा पडेल व वेश्याव्यवसायासंबंधाने गोव्यास लागलेला कलंक नाहीसा होईल असे ह्मणण्यास पुरेल इतका अनुभव अद्याप आला नाही. व पुढे येईल असेही पण वाटत नाही.

'शेंस' हा एक रुढीनें मानलेला विधी असल्यावरुन व रुढी धाब्यावर बसविण्याची प्रवृत्ती समाजात वाढत असल्यावरून 'शेंस' विधी केल्याशिवाय वेश्यावय्वसायास प्रवृत्त होणाऱ्या स्त्रीयांस कायद्याने अद्याप निर्बंध घातला नाही. व समाजानेही तसा कडक निर्बंध घालण्याविषयी सरकार दरबारात खटपट केल्याचे ऐकिवात नाही.

पण आनंदाची गोष्ट ही की, गोमंतकीय गायक समाजातील सुशिक्षित व विचारी लोकांस, वेश्याव्यवसायाबद्दल पुर्ण कंटाळा येत असून त्या व्यवसायाचे समूळ उच्चाटन करण्याविषयींचे त्यांचे प्रयत्न व चळवळी चालू आहेत असे असले तरी त्या प्रयत्नास यश लवकर येण्यासाठी, रशियातल्या प्रमाणे सार्वजनिक व्यवहारातही वेश्याव्यवसायाबद्दलचा तिटकारा व्यक्त होताना दिसला पाहिजे. व त्या व्यवसायास प्रतिबंधक कायदे करून अगोदर व्यभिचार करणाऱ्या स्त्रियांसाठी करेक्शन, प्रोटेक्शन ह्मणजे नैतिक-सुधारणा-साहाय्यक आश्रम उभारले पाहिजेत. अशा प्रकारच्या प्रत्यक्ष व तादृश फळ देणाऱ्या चळवळी बाजूस ठेऊन शाब्दिक व केवळ पुस्तकी पाल्हाळाचे कितीही प्रयत्न केले तरीही, तो लाजीरवाणा व्यवसाय बंद होण्याची आशा पूर्ण होणे ही गोष्ट शक्यतो संभवणारी नाही असे वाटते. ह्मणून, वेश्याव्यवसायाचे संपूर्ण उच्चाटन करून नैतिक दर्जाच्या बाबतीत आह्मी रशियाहून मागासलेले नाही हे सक्रीयरित्या सिद्ध करून दाखवू.

*(गुरुवार, दि. २५ जाने. १९३४)*

# शुद्धिकार्याला चालना

भाई सकलातवाला यांनी ब्र. आनंदमूर्ती प्रभूतींच्या हद्दपारीचा प्रश्न लंडन पार्लमेंटात उपस्थित केला असल्याने त्याला आता जोराची चालना मिळणार आहे. पोर्तुगीज धर्मप्रसारकांना इंग्रजी हिंदुस्थानात मनसोक्त ख्रिस्तीकरण करण्याची ऐसपैस मुभा असावी व इंग्रजी हिंदुस्थानातील शास्त्रास पोर्तुगीज मुलुखात स्वधर्म प्रसाराचे कार्य करण्यास मज्जाव असावा, या अन्याय्य स्थिती बद्दल भाईजींनी आश्चर्य व्यक्त केले. सकलातवाल्यांच्या प्रयत्नामुळे इंग्रज सरकार शास्त्र्यांच्या हद्दपारीची चौकशी करणार असल्याने, या प्रकरणाच्या दोन्हीही बाजू जगासमोर येऊन खऱ्याखोट्याचा निवाडा करण्यास लोकांना सुलभ होणार आहे.

शास्त्र्यांच्या हद्दपारीच्या बाबतीत स्थानिक सरकारचेच अंग होते व अजूनही आहे, असा येथील बहुतेक लोकांचा समज आहे. पण हा समज चुकीचा ठरवणारी वार्ता येथील वातावरणातून विहरत आहे. असे सांगतात की, ज्यावेळी ख्रिस्ती गावड्यांच्या हिंदुकरणाच्या 'भयंकर' व 'क्षोभजनक' बातमीने येथील ख्रिस्ती धर्माध्यक्षाचे 'क्याथोलिक' कान किटाळले, तेव्हां त्यांनी लगेच सरसुभे ज. मासाने द. आमोरी यांची भेट घेतली. या भेटींत पात्रियार्कसाहेबांनी हिंदुकरणाची चळवळ बंद पाडण्याचे उपाय योजण्याची विनंती गव्हर्नर साहेबास केली. पण ज. आमोरींनी या विनंतीकडे दुर्लक्ष केल्याने इरेस पडून पात्रियार्क साहेबांनी थेट पोर्तुगीज रिपब्लिकचे अध्यक्ष ज. कार्मोन यांचेच 'तारेने' पाय धरले व 'बाहेरील शास्त्र्यांच्या' हृदयपारीचा 'हम करेसो' हुकुम आणला. या हुकुमाला कसल्याच दंडकाचा आधार नसल्याने व तो धर्मस्वातंत्र्य विध्वंसक व समता विरोधकही असल्याने, इंग्रज सरकारने होऊ घातलेल्या चौकशीत डाव पोर्तुगीज सरकारच्याच अंगलट येणार आहे, यात संयश नाही.

पोर्तुगीज सरकारचा विरोध असला, तरी शुद्धिकार्याचा वाहत असलेला झरा आटविण्याचे सामर्थ्य त्या विरोधात मुळीच नाही. विरोधाची

अडगळ लाथाडून शुद्धीचळवळ यशस्वी व जोमदार करण्याची प्रवृत्ति दिवसेंदिवस येथील हिंदुंत वाढत चालली आहे. हे येथे नमूद करण्यास आह्मांस अभिमान वाटतो. ‘फुटो हे मस्तक तुटो हे शरीर’ शुद्धीची चळवळ सोडू नये. ‘अशाच तऱ्हेचा दैवी निर्धार हिंदुत उत्पन्न होऊ लागल्याची चिन्हे स्पष्ट चमकू लागली आहेत. ‘सत्य धारितां निर्धार काय न करी परमेश्वर?’ या न्यायाने पोर्तुगीज सरकारची हडेलहप्पी अखेर कमकुवतच ठरून परमेश्वरी कृपेने शुद्धीचा निर्धारच येथे गर्जत राहणार आहे. यात लवमात्र संदेह नाही.

एका ख्रिस्ती गावड्यापाशी एका पाद्रीने भाजीपाला विकत घेतला. आपल्या व्यापाराने पैसे मागण्यासाठी गावडा त्या पाद्रीच्या ‘आश्रमात’ गेला. पण ख्रिस्ताच्या त्या अनुयायाने गावड्याचे पैसे चुकते करण्याऐवजी त्याच्यावर आपले दोन पाळीव कुत्रे सोडले व कुत्र्यांनीही गावड्याचे दोन तीन चावे घेऊन धन्या विषयी वसत असलेले प्रेम प्रकट केले! भाजीवाला बापडा ‘देणे नको कुत्र्यांना आवरा’ असे बोंबलत ‘सुंबाल्या करीता झाला’! या गोष्टीचा उल्लेख करुन पणजीच्या ‘उ येराल्द’ पत्रातील एक लेखक ह्मणतो की, ज्या धर्मात अशा तऱ्हेचे पाद्री आहेत, त्यांस कंटाळून ख्रिस्ती गावड्यांनी हिंदु धर्माचा स्वीकार केला असल्यास त्यात नवल ते काय?

कोणत्याही धर्माची तत्त्वे कितीही उच्च असली तरी जोपर्यंत ती तपशीलांत उतरणार नाहीत, तोपर्यंत त्यांच्या उच्चपणाचा फायदा त्यांच्या अनुयायांना मिळणे कठीण होय. सोनारानेच कान टोचले असल्यामुळे ख्रिस्ती पाद्रयांत बोकाळलेली स्वार्थ परायणता संपुष्टात येते की काय, हे बघितले पाहिजे. असो, हिंदुधर्मीय काय किंवा ख्रिस्ती धर्मीय काय प्रत्येकानें तत्त्वनिष्ठ राहण्याचा सतत प्रयत्न करीत राहणे त्यांचे पवित्रतम कर्तव्य होय, हे विसरता कामा नये.

*(गुरुवार, दि. ३ मे १९२८)*

# कर्मवीर कर्वे

गेल्या ता. १८ एप्रिल रोजी महाराष्ट्रातर्फे कर्मवीर धोंडो केशव कर्वे यांचा ७१ वा जन्मदिन हिंगणे बुद्रुक येथे साजरा करण्यात आला. सत्तरवर्षे पूर्ण आयुष्य पाश्चात्य देशातील कर्मवीरांच्या वाट्यास येत असले तरी तितके आयुष्य हिंदुस्थानात– त्यांतल्या त्यात महाराष्ट्रांत – लाभणे दुर्घटनाच आहे. महाराष्ट्रातले बहुतेक कर्मवीर अकालीच निर्वतले आहेत. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर बत्तीसाव्या वर्षी, न्या. काशिनाथ त्र्यंबक तेलंग अडतीसाव्या वर्षी, प्रि. गोपाळ गणेश आगरकर एकूणचाळीसाव्या वर्षी, नामदार गोपाळकृष्ण गोखले एकूणपन्नासाव्या वर्षी, श्रीहरी नारायण आपटे चौपन्नाव्या वर्षी, न्या. महादेव गोविंद रानडे साठाव्या वर्षी आणि लो. बाळगंगाधर टिळक हे चौसष्टाव्या वर्षी निर्वतले आहेत. ह्या नियमाला फक्त डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे एकच अपवाद होय.

भारत देशात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, औद्योगिक इत्यादी सर्व कार्याचा भार एकाच कार्यकर्त्या देशभक्तावर पडत असल्याने त्याची जीवनशक्ती लवकरच क्षीण होते व तो अकाली कालाच्या तडाक्यात सापडतो. जनरल हिंडेनबर्ग, मिस्टर बालफोर्ड, मि. बोनरेलो सारखी ८० वर्षांनंतरही तारुण्यातील जोमाने कार्य करणारी माणसे हिंदुस्थानातील उष्ण हवेत निपजणे काही अंशी जरी शक्य नसले तरी आयुष्यमानच येथे कमी असते तेथे दीर्घायुष्याचा अनुभव तरी कसा येणार? ८० वर्षापेक्षा जास्त काळ वाचण्याचे भाग्य हिंदुस्थानात फक्त तिघा कर्मवीरांच्या वाट्यास आले होते. त्यापैकी बाबु देवेंद्रनाथ टागोर हे धर्मचिंतनातच निमग्न असल्याने त्यांच्या शरीरावर कार्याचा फारसा ताण पडला नव्हता. गुरुवर्य भांडारकर हे ८० वर्षंनंतर कार्यविन्मुख व गलितगात्र झाले होते व तिसरें दादाभाई नवरोजी मात्र ८० वर्षांनंतरही तारुण्यातील जोमाने कार्य करीत असत. महर्षि दादाभाईचें बहुतेक आयुष्य इंग्लंडांत गेले होते व तेथील थंड हवेचा परिणाम त्यांच्या शरीरायष्टीवर झाला होता. या मुळेच त्यांची कार्यतत्परता कायम होती. सारांश हिंदुस्थानासारख्या उष्ण देशात ७० वर्षे पर्यंत धडाडीने कार्य करणे

हेच कठीण आहे. व ते भाग्य कर्मवीर कर्वे यास लाभल्याबद्दल प्रथम त्यांचे अभिनंदन करणे योग्य आहे.

कर्मवीर कर्व्यांनी आपल्या आवाक्याच्या बाहेरील पुष्कळ कार्यास हात न घालता एकाच शैक्षणिक उन्नतीकडे लक्ष दिले आणि ते कार्य कल्पनेपलीकडे यशस्वी करून दाखविले. सरकारी विश्वविद्यालयातील घातक शिक्षण पद्धती लक्षात येऊन, ती पद्धती सुधारण्यास आधुनिक हिंदी देशभक्तांनी जे प्रयत्न केले आहेत, त्यात महात्मा मुन्शीराम (स्वामी श्रद्धानंद) यांना स्थापन केलेलें कांगडीचें गुरुकुल, महर्षी रवींद्रनाथ टागोर यांची विश्वभारती विद्यापीठ ही संस्था, पं. मदनमोहन मालवीय यांचे हिंदु विश्वविद्यालय, सर सय्यद अहमद यांचे अलीगड येथील मुस्लीम विश्व विद्यालय आणि कर्मवीर कर्वे यांचे महिला विद्यापीठ, हे प्रयत्न प्रमुख आहेत; परंतु वरील चारही संस्थांस कोणत्या ना कोणत्यातरी समाजांचे, राजे महाराजे यांचे किंवा हिंदुस्थान सरकारचें पूर्ण पाठबळ होते. डॉ. रवींद्रनाथांनी तर आपली स्वत:ची सर्व मिळकत - १० लाख रुपये - संस्थेस अर्पण केली होती. अशा प्रकारच्या श्रीमंत मनुष्यांना संस्था निर्माण करून स्वताच्या हिंमतीवर चालवणे फारसें अशक्य नाही. परंतु कर्मवीर कर्व्यांसारख्या एका अकिंचन मनुष्याचें दरिद्री महाराष्ट्राच्या मदतीवर संस्था निर्माण करून दाखविणे हेंच कर्तव्याचें द्योतक आहे. एकाच कालाच्या सुमारास बाबू शशिणद बॅनर्जी यांनी बंगालांत व कर्मवीर कर्वे यांनी महाराष्ट्रांत अनाथ बालिकांकरीता एकाच प्रकारच्या संस्था स्थापन केल्या होत्या. पण संपत्ति मान बंगालांतील संस्था नामशेष व्हावी आणि निर्धन महाराष्ट्रातली संस्था जोमानें वाढीस लागून तिचें विश्वविद्यालयात रुपांतर व्हावें, हा कालाचा महिमा नसून कर्व्यांच्या कर्मयोगाचें दृश्य फल आहे.

कर्वे हे इतर बोलघेवड्या सुधारकांप्रमाणे *'मनस्येकं वचनस्येकम्'* या प्रमाणें कधीच वागले नाहीत. पुनर्विवाहाच्या बाबतींत असो किंवा स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत असो त्यांनी फुकट व्याख्याने न झोडतां कृतीने इतरांस उदाहरण घालून दिले. त्यांच्या मनास जी गोष्ट पटली ती गोष्ट आचरणांत आणण्यास ते सरकारची किंवा आपल्या सहाकऱ्यांचीही पर्वा करीत नाहीत. चार वर्षांमागे आपल्या नेमस्त पक्षातील प्राय:सर्व लोक विरुद्ध

असतानाही आपल्या विश्वविद्यालयात एका बक्षिससमारंभाचे अध्यक्षस्थान श्री. नरसिंह चिंतामण केळकर यांस देऊन सरकारच्या व नेमस्तांच्या रोषास त्यांनी भीक घातली नाही. बक्षिस समारंभातील भाषणासंबंधी झालेल्या 'केसरी' व 'ज्ञानप्रकाश' यांच्या वादांत त्यांनी किती बाणेदारपणाचें वर्तन केलें होतें हे वर्तमानपत्री वाचकांना माहितच आहे.

सर विठ्ठलदास ठाकरसी यांनी महिला विद्यापीठास १५ लक्षाची देणगी देतांना अशी अट घातली होती की, ह्या विश्वविद्यालयास सरकारी मान्यता मिळवावी किंवा आणखी १५ लक्ष रुपये जनतेकडून जमवावे तोपर्यंत केवळ १५ लक्ष रुपयांचे व्याजच विद्यापीठाच्या हवालीं करण्यात येईल. कर्वे जर हाजी हाजीखोर असते तर सरकारी मान्यता त्यांच्या विद्यापीठास ताबडतोब मिळाली असती; परंतु असला हांजी हाजीखोरपणा त्यास बिलकुल पसंत पडला नाही. इतकेंच नव्हे तर राजद्रोहाच्या आरोपावरुन सरकारी पाहुणचार घेतलेल्या प्रो. वामन मल्हार जोश्यांसारख्या विद्वानास विद्यापीठाच्या अध्यापकस्थानी नियोजित करून आपण सरकारच्या नाराजीची यत्किंचितही पर्वा करीत नाही असें त्यांनी सर्वांच्या दृष्टोत्पत्तीस आणिलें.

त्यांचे सौजन्य, कार्यकुशलता, धडाडी इत्यादी गुणांचा तपशीलवार इतिहास सांगण्याचे स्थळ हें नव्हें. जिज्ञासू वाचकांस त्यांच्या आत्मवृत्ताच्या नूतन आवृत्तीत हा सर्व इतिहास वाचावयास सापडेल. त्यांचे कार्य इतकें हितावह आहे की, महाराष्ट्राला तरी ह्या कार्याचा विसर पडणें शक्य नाही.

*(गुरुवार, दि. ३ मे १९२८)*

# शिष्टांचे स्वागत व कार्य

पूर्वी प्रसिद्ध झाल्याप्रमाणें भारतीय हिंदु धर्ममहासभेने गोमांतकीय शुद्धिकार्याच्या निरीक्षणार्थ नेमलेल्या डॉ. मुंजेप्रभृति शिष्टमंडळांचे शुभागमन गोवा प्रांतात गेल्या ता. २४ रोजी संध्याकाळी झालें. दे. केळकर, डॉ. मुंजे, विद्यानिधि चित्रावशास्त्री, श्री. जठार वकील व हैद्राबादचे हिंदु पुढारी

श्री. वामन नाईक, या शिष्टमंडळाच्या पाच सभासदांशिवाय, कऱ्हाडाचे श्री. शिरोडकर, मसूर ब्रह्मचर्याश्रमाचे क्षीरसागरादी कित्येक ब्रह्मचारी, केसरीचे प्रतिनिधी श्री. नवरे वगैरे सन्माननीयांचाही गोमांतकाला दर्शनलाभ झाला.

श्री. दो. ज. का. शंखवाळकर, श्री. जना वि. कामत, श्री. यशवंत सूर्यराव सरदेसाई व भारतकर हे परस्थ पाहुण्याच्या स्वागतार्थ लोंढा स्टेशनपर्यंत सामोरे गेले होते. गाडी कुळे येथे पोचताच. त्यांना श्री. दो. सु. वि. प्रभुदेसाई, आर्यविज्ञानाचे संपादक पाटणकर व शिरोडेचे वेदशास्त्रसंपन्न विष्णु भट (गोमांतकीय शुद्धिकर्ते) ही नवी मंडळी येऊन मिळाली. पाहुण्यांना टीपार्टी, देण्याचा पहिला समारंभ येथेंच पार पडला. सावर्डे स्टेशनवर सन्माननीयांचे स्वागत फटाक्यांच्या प्रचंड कडकडाटांत करण्यात आले. गाडी स्टेशनांत स्थिर होताच प्रो. बाळकृष्ण वामन सांवर्डेकर यांनी सांगे तालुक्यातर्फे श्री. पाटकर यांनी आर्यविज्ञानातर्फे व श्री. सु. वि. देसाई यांनी भारतपत्र व केपेंचे बालोन्नति समाज या संस्थेतर्फे शिष्टमंडळास हारतुरे अर्पण केल्यावर पुन्हा फटाक्यांच्या निनादांत व शिष्टमंडळाच्या प्रचंड जयघोषात गाडी चालू झाली. श्री. द. व्यं. पै., श्री. नरसिंह दामोदर नायक, वैद्य विर्जिनकर व मडगांवच्या स्वयंसेवक पथकाचे तडफदार कॅप्टन श्री. दा. व्यं. रायतुरकर हे गृहस्थ शिष्टमंडळाच्या स्वागतार्थ सावर्डे येथे सामोरे आले होते.

पण खऱ्या व मोठ्या स्वागताला मडगांव स्टेशनापासून सुरवात झाली. सनातन हिंदु धर्माच्या जयजयकारात, फटाक्याच्या कडकडाटात व बँडच्या सुस्वर आवाजात स्वयंसेवक पथकाने पाहुण्यांना सलामी दिली. व त्यांना गाडीतून उतरुन घेतले. स्वागतार्थ आलेल्या मंडळींनी स्टेशन चिक्कार भरून गेले असल्याने, सेवादलाने पराकाष्टेची व्यवस्था राखली असताही, पाहुण्यांना चिरडाचिरडीचा थोडासा अनुभव घ्यावा लागतलाच. नंतर स्टेशनापासून श्री. विठ्ठल मंदिरपर्यंत व इथून विद्याभुवन पर्यंत मिरवणूक निघाली. या मिरवणुकीत हजारो लोकांनी भाग घेतला होता. शिष्टमंडळाच्या आगमनानें उत्पन्नलेला आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबीत झालेला दिसून येत होता. ठीकठिकाणी फटाकड्यांच्या निनादात शिष्टमंडळाचा जयघोष होत होताच. बँड वादन ही चालू होतेंच. अशा थाटात मिरवणूक

श्री विठ्ठल मंदिरापाशी पोहोचताच पाहुण्यांना देवदर्शनासाठी मंदिरात नेण्यात आले. देवदर्शन झाल्यानंतर मंदिरातर्फे श्री. पुरुषोत्तम शेटवेरेकर यांचे सन्मानियांच्या स्वागताप्रीत्यर्थ भाषण झाले व त्यांस हार तुरें इत्यादी अर्पण करण्यांत आले. पुन्हा मिरवणूक पूर्वीच्याच थाटात निघून ती विद्याभुवनाकडे थांबली व पाहुण्यांसह सर्व लोकांनी भुवनाच्या विस्तीर्ण दिवाणखान्यात प्रवेश केला.

दर्शनोत्सुक लोकांच्या दाटीने भुवन नुसते फुलून गेले होते. ठिकठिकाणचे पुढारी त्या भव्य समूहात चमकत होते. मंडळी स्थानापन्न होताच मडगांवचे सुप्रसिद्ध व्यापारी श्री यशवंत वि. नायक यांनी योग्य व यथोचित्त शब्दांनी सन्माननियांचा सत्कार करून श्री. दत्तात्रय व्यं. पै यांस शिष्टमंडळाचा लोकसमूहास परिचय करून देण्याची विनंती केली. श्री. पै यांनी ती कामगिरी उत्तम रीतीने पार पाडून, सन्माननियांच्या स्वागतार्थ जमलेल्या सभेचे अध्यक्षस्थान श्रीमंत रामचंद्र उर्फ लोलीबाब केंकरे यांनी मंडीत करावे, अशी सूचना आणली. तीस श्री. के. अ. नायक यांनी अनुमोदन व श्री. कमलाकांत दलाल यांनी दुजोरा दिल्यावर अध्यक्ष केंकरे टाळ्यांच्या कडकडाटात स्थानापन्न झाले व त्यांनी शिष्टांच्या स्वागतार्थ भाषण करून अखिल हिंदु समाजाच्या वतीनें डॉ. मुंजे यास रौप्य करंडकात घातलेले मानपत्र अर्पण कले. वैद्य विर्जिनकर यांनी मानपत्र आपल्या खड्या आवाजात वाचून दाखविले. स्वागताध्यक्षांच्या अनुज्ञेने मडगांव वाङ्मय विहार, मडगांव बालचमु, मडगांव दामोदर वाचन मंदिर, मडगांव दैवज्ञ समाज, मडगांव सारस्वत समाज, कुंकळी ज्ञानप्रसारक संघ, भट्टप्रभू समाज इत्यादी संस्थांतर्फे अनुक्रमे रा. दा. अ. कारे, रा. दा. व्यं. रायतुरकर, रा. दत्ता दलाल, रा. रायकर, रा. नागेशराव सडेकर, रा. व्यं. वि. वैद्य व रा. गांवकर यांनी शिष्टमंडळास व इतर पाहुण्यास हारतुरे अर्पण केले. नंतर दे. तात्यासाहेब केळकर हे बोलावयास उठले. त्यांनी आपल्या वक्तृत्वपूर्ण व मुद्देसुद भाषणात हिंदु महासेचा संदेश सांगितला. शुद्धिचळवळ ही राजकारणापासून कशी अलिप्त आहे हे सांगून ब्रह्माचर्याश्रमाचें ब्रह्माचारी हें आपल्या वैराग्य वृत्तीमुळें कसे निरुपद्रवी आहेत याचे विवरण केले. नवहिंदु गावड्यांच्या

उत्कट हिंदुधर्मभावनेमुळेच शुद्धीकार्य गोमांतकांत सुकर झाल्याचे सिद्ध करून दे. तात्यासाहेबांनी त्यांचा गौरव केला. शुद्धीकार्य हें मसूर ब्रह्मचर्याश्रमाचें परिश्रम व स्थानिक पुढाऱ्यांचे उत्साहपूर्ण साहाय्याचे फळ असल्याचें सांगून आश्रमाचे प्रचारक व स्थानिक पुढारी या उभयतांचेही त्यांनी कौतुक केले व टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात आपले भाषण संपवले.

नंतर धर्मवीर मुंजे यांचे व्याख्यान झाले. त्यांनीही हिंदुधर्मसभेचा संदेश सांगून भाषा व धर्म या दोन दृष्टीने गोमंतक महाराष्ट्रापासून कसा अविभाज्य आहे यांची चर्चा केली. व्याख्यात्यानें पाच वर्षांवरील मुलांच्या शारीरिक शिक्षणार्थ त्यांच्या पालकांनी पराकाष्टा करून परधर्मीय लोकांच्या अत्याचाराला तोंड देण्याची पात्रता त्यांच्यात निर्माण करावी, असा जोरदार भाषेने उपदेश करून आपले भाषण टाळ्यांच्या गजरात आटोपले. डॉ. महाशयांच्या भाषणानंतर विद्यानिधि चित्रावशास्त्री, श्री. जठार, श्री. वामन नाईक व श्री. शिरोळकर यांचीही धर्मभावना उद्दीपीत करणारी भाषणे झाली. सभेत दोन नव हिंदुही बोलले. पैकी श्री. गोपाळ गावड्यांचे भाषण विनोद पूर्ण झाले. फोंडेचे डॉ. आल्मेद व पोलिस यांनी प्रियोळ व केरी येथील गावड्यांच्या हिंदुकरणास कसकसें अडथळे आणले यांचे रसभरीत वर्णन करून एकच थडगे पुन्हा पुन्हा उकरुन त्यांत प्रेते पुरण्याच्या ख्रिस्ती 'नरकाला' आपले लोक कसें कंटाळून गेले होते हे सांगितले. हिंदुधर्माचें श्रेष्ठत्व पटल्यामुळेंच आपले लोक स्वखुशीनें हिंदू झाले, त्यांच्यावर कुणीही सक्ती केलेली नाही. असें सांगून गोपाळांनी आपले कोकणी भाषण आटोपते घेतले. टाळ्यांच्या कडकडाटांनी सभेने त्यांच्या भाषणाचें कौतुक केल्यांवर श्री. यशवंतराव सरदेसाई यांनी गावड्यांच्या भाषणाचा मराठी तात्पर्यार्थ सांगून आभार प्रदर्शनाचे काम उत्तम रीतीने पार पाडिले. शेवटी हारतुरे व पानसुपारी वाटण्यांत आल्यावर, शिष्टांच्या स्वागतार्थ जमलेली मडगांवची ही भव्यसभा बरखास्त झाली.

ता. २४ रात्रौ व ता. २५ दुपारपर्यंत शिष्ट व इतर पाहुणे यांची राहण्याची व्यवस्था श्री. पुरुषोत्तम सिकेरकर यांच्या बंगल्यात करण्यात आली होती. ता. २५ रोजी सकाळी शिष्टमंडळ व स्थानिक पुढारी यांच्यात

विचारविनिमय झाला. गव्हर्नर साहेबांची मुलाखत घेण्याच्या इराद्याने दिवस व वेळ निश्चित करण्याची विनंती करून तेथूनच दे. तात्यासाहेब केळकर व डॉ. मुंजे यांनी त्यांस विद्युतसंदेश पाठविला. नंतर पाहुण्यांनी सारस्वत ब्राह्मण समाज वगैरे स्थानिक संस्थांस भेट देऊन, दुपारचे भोजन आटपल्यावर कालापूर, व ताळगांव येथील नवहिंदुस भेट देऊन व तेथील परिस्थिती निरीक्षण करून, शिष्टमंडळ, मसुराश्रमाचें ब्रह्मचारी व इतर परस्थ पाहुणे रात्रौ श्री. यशवंत पांडुरंग प्रभु लवंदे यांच्या पणजी येथील वाड्यात उतरले.

ता. २६ रोजी सकळी पाहुण्यांनी चिंबलला भेट दिली. येथील शुद्धीकृतांचा अपूर्व उत्साह पाहून त्याचे अंत:करण सद्‌गदित झाले. नवहिंदुतर्फे दे. तात्यासाहेब केळकर यांस देण्यास आलेल्या मानपत्राचे श्री. रामचंद्र लवंदे यांच्याकडून वाचन झाल्यावर हिंदु महासीचे अध्यक्ष बोलावयास उठले. गावड्यांच्या शुद्ध भावनेच्या प्रेमळ स्वागताने गहिवरल्यामुळें दे. केळकरांच्या तोंडातून काहीवेळ शब्दच निघेना. दे. तात्यासाहेबांनी गावड्यांचा गौरव केला व शुद्धिदिन स्मारकार्थ लागेल तितकी मदत देण्याचे अभिवचन दिले. याचप्रसंगी हैद्राबादचे हिंदुधर्म पुढारी श्री. वामन नाईक व शिरोळचे हिंदुधर्मनेते श्री. शिरोळकर यांनी प्रत्येकी पाचशें रुपयेची यांच कार्यास उदार देणगी जाहीर केली. शेवटी आभार प्रदर्शन व हारतुरे होऊन मंडळी परत पणजीला आली व ठरलेल्यावेळी शिष्टमंडळ गव्हर्नर साहेबांच्या मुलाखतीस गेलें. मुलाखतीत गव्हर्नर साहेबांनी मंडळास सत्काराने वागवून, त्यांस पणजी हिंदू सभेच्या प्रतिनिधी मंडळास दिलेल्या उत्तराप्रमाणेंच उत्तर देऊन धर्मकारणाशी गोवा सरकारचा कसलाच संबंध नसल्याचे निक्षून सांगितले व आनंदमूर्ति प्रभृतींवरील निर्बंध काढून टाकण्याचेही मंडळास अभिवचन देऊन, आश्रमातील लोकांस आपल्याला भेटण्यास नेहमीच मुक्त द्वार असेल असेही कळविले. उदार धोरणाबद्दल गव्हर्नर साहेबांचे आभार मानून शिष्टमंडळ श्री. लवंदे यांच्या वाड्यात परत आले व तेथून भोजन विश्रांती झाल्यावर, पाहुणेमंडळी संध्याकाळी ४ वाजता करमळीला निघून गेली.

*(गुरुवार, दि. ३१ मे १९२८)*

# असे उघडे तरी व्हा!

मुंबईच्या आंग्लोलुझितान नावाच्या नेटिनीव वृत्तपत्रानें लिहिलेल्या एका लेखाचा सारांश देऊन आमच्या मठग्रामस्थ व्यवसाय बंधूनें त्यांवर टीका केली आहे. आंग्लोलुझितानाला या चळवळीत हिंदुंचा आक्रमक अविर्भाव दिसतो. त्याच्या मते अलिकडच्या काही वर्षात गोमंतकीय सरकारच्या बऱ्याच नोकऱ्या हिंदुंनी पटकावल्या असून पुढे मागे साऱ्याच सरकारी जागांवर त्यांचा डोळा आहे आणि शुद्धीकार्याचे पर्यवसान ह्मणजे निवडणुकीय बहुमत मिळविण्याचा उपक्रम होय. 'तेऱ्ह' कर्त्यांनी त्यांच्या या ह्मणण्यावर टीका करताना त्यांना दोष दिला असला तरी गोमंतकीय हिंदुना आता सारे गोमंतकच आपणांकरीता हवे असल्यामुळें त्यांच्या या साऱ्या चळवळी चालल्या आहेत अशी टिपणी पुरविली आहे. आह्माला तरी 'तेऱ्ह' कर्त्यांच्या गर्भित आरोपापेक्षा आंग्लोलुझितानचा सडेतोड सवाल विशेष मानवला. आणि तसा तो मानवण्याचे विशेष कारण ह्मणजे या त्याच्या विधानामुळें आमच्या ख्रिस्ती बंधूंच्या मनांत कसली खळबळ माजली आहे. त्यांच्या पोटांत शुद्धिकार्यामुळे चावते ते कशामुळें चावते हे उपरोक्त उद्गारावरून विशेष स्पष्ट झाले हेंच होय. दुसऱ्या ठिकाणी 'हाय' असा उद्गार येणे स्वाभाविकच आहे. शुद्धिकार्यामुळे ख्रिस्ती समाजास दुखले नसते तरच ते आश्चर्य झाले असते. येथवर सारे ठिकच आहे. पण आंग्लोलुझितान काय किंवा त्याच्या सुराने विचार करणारे आमचें प्रांत बंधु काय, सर्वांना आह्मी हिंदुसमाजातर्फे असे विचारतो की, आपली उन्नति करून घेणे किंवा राज्ययंत्रात आपल्या संख्या बळाच्या प्रमाणात, किंवा लायकीच्या प्रमाणात हिंदुंनी हिस्सा मागणे व मिळविणें हें कायद्यानें गुन्ह्याच्या सदरात येते काय? की साऱ्या सरकारी नोकऱ्या व निवडणुकीत बहुमताधिकार हा ख्रिस्ती समाजालाच कुणी आंदण दिला आहे? आज जवळ जवळ चारशें वर्षे अधिक, राजकीय, सामाजिक, इ. सर्व बाबतीत ख्रिस्ती समाजाने इकडे जो एकमेवाद्वीतीयम् अधिकार गाजवला तो अद्याप देखील पुढे चालावा आणि हिंदु समाज या साऱ्या बाबतीत नेहमीच अस्पृश्यासारखा दूर दूरच राहावा असें ख्रिस्ती समाजाने पुण्य तरी कोठचे केले

आहे आणि हिंदुंनी पातक तरी काय आचरिले आहे?

माजी राजसत्ताक राजवटीतील धार्मिक प्राबल्याखालील कायद्यामुळे मिळालेले सुरक्षित कुरण यापुढेही आपल्याच हाती राहावे अशी जरी ख्रिस्ती समाजाची इच्छा असली आणि तशी ती आहे हे आंग्लोलुझितानच्या उपरोक्त लेखावरुन दिसून येते तर ती मात्र हिंदु समाज चालू देणार आहे हें त्यांनी पक्के लक्षांत ठेवावे. इतकेंच नव्हें तर हिंदुसमाजदेखील ही सफल होऊ देण्याची संधी त्यांना देऊ इच्छिल तरी त्यालाही ते आज शक्य नाही. कारण हा काळाचा ओघ आहे. हा परिस्थितीचा परिणाम आहे. काळाच्या किंवा परिस्थितीच्या आड येणाऱ्यांना यश मिळणे ही गोष्ट दुरापास्त होय.

या परिस्थितीनेच हिंदुसमाजाला आक्रमणशाली बनविले आहे. हडूक टाकून विहीरी, नव्हे गाव बाटविण्याचा तो सुंदर काल मागें पडला. पार अश्मिभूत झाला. हिंदुसमाजाचे पुढते पाऊल मागे खेचण्यास आज कोणालाच शक्ती नाही. आणि तुह्मी दिवाभीत वाटेल तेवढे उद्योग केलेच तरी त्यामुळे हिंदुसमाजाचे काडीमात्र नुकसान होणे शक्य नाही. चहाड्या, चुगल्या, फुंकर, चावे वाटेल ती शस्त्रे वापरा. त्यांना यथायोग्य प्रकारांनी तोंड देण्यांस हिंदुसमाज केव्हा ही झाले तरी तयारच राहील. कारण आपला पक्ष, सत्पक्ष आहे हे त्याला पक्के ठाऊक आहे. चालू रिपब्लीकन राज्यपद्धतीत धर्माला वाव नाही. त्यामुळें दुसऱ्यास न दुखविता त्यावर जोर जुलूम न करता धर्मप्रसार करणें हे काम कायद्याच्या दृष्टीने मुळींच दोषास्पद नाही हें तो पक्केपणे जाणतो. बातीजम जेगल-ज्यांचे सुंदर वर्णन दमाल्य आर्तिगांव (?) यांनी आपल्या फार्पर्स मधून केले आहे. ख्रिस्ती बनलेल्या हिंदुंना हिंदु धर्माची जोवर तळमळ लागलेली आहे. आपल्या पूर्वकालीन बंधूंना ती जे केवळ 'आग्वबेतांच्या' छिटकाव्याने आह्मांला दुरावलें होते त्यांना प्रेमाने कवटाळण्यात हिंदु समाज जोवर धन्यता मानीत आहे तोवर हे कार्य हरघडी पुढेंच जाईल.

उघड्या डोळ्यांनी पाहाणाऱ्यांस याचा पुरवा आणखी निराळा नको. ठिकठिकाणी झालेल्या व होत असलेल्या सभांतून पास झालेल्या ठरावांचा बोल्शेविझमचे भूत कसे अंतर्धान पावले ते पहा. चहाड्या, चुगल्यानें निर्माण

केलेला जोर जुलमाच्या अस्तित्वाच्या आरोपाचा भस्मासूर हिंदुना तोडून आपल्या वरदात्याच्या मस्तकावरच हात ठेवण्यास कसा उठलेला आहे ते लक्षात घ्या. शास्त्रीपंडीतांना अलग उचलून ठेवण्याच्या तोडीस हिंदुकरणास उत्सुक कित्येक गावड्यांनी थेट मसूर येथे जाऊन शुद्धीविधी संपादून दिलेला जवाब ऐका. शास्त्री पंडीतांच्या अभावी शुद्धीकरण अडून राहिलेले पाहताच आह्मी मागील अंकात भाकीत केल्याप्रमाणे विजेच्या चमकीप्रमाणे निघणारें व वेदोक्त पूर्व शुद्धीकार्य पुढें रेटणारे कालापूर, करमळी व प्रियोळ येथील विधीत भाग घेणारे ते गोमंतकीय हिंदु तरुण पहा. बाटविण्याचा धाक, स्वामींना उपमर्दपूर्वक बोलावण्याची क्रिया, दादा वैद्यांसारख्या शिष्ट सदगृहस्थाला चौकीवर अडकविण्याचा प्रकार, पोलीस कवायीत, वकीली सल्ला इत्यादीकांना न जुमानता झालेले पर्वाचे कर्मळी प्रियोळ वगैरे ठिकाणचे शुद्धीकरण घ्या. ही सारी काय दर्शवितात? ती एवढेच सांगतात की हिंदुसमाज आता खडबडून जागा झालेला आहे. ती एवढेच बजावतात की हिंदुसमाज आता कार्य तत्पर झाला आहे. ती एवढेंच जाहीर करतात की हिंदुसमाजाने नेभळटपणा टाकून दिलेला आहे. ती एवढेच सुचवतात की, हिंदुसमाजात आतां नवजीवनाचा झंझावात संचरला आहे.

आणि अशा या झंझावाताच्या आड येणाऱ्या दिवाभीतांनो तुह्माला आमचे प्रेमाचे सांगणे आहे की, तुमचे ते वाममार्ग व गर्थीत आरोप सोडून द्या. झंझावातास तोंड देण्याचा अट्टाहास करु नका. त्यात तुमचें तर हित नाहीच आणि त्यामुळे हा उचंबळलेला झंझावातही स्थिरावणे अशक्य आहे. कारण आमचे धैर्य उघडे आहे. आमचा पक्ष सत्पक्ष आहे. आमची साधने कायदेशीर आहेत. सत्पक्षापुढे तुमचे काय चालणार? उघड्या धैर्याला तुह्मी काय दोष देऊ शकणार? आणि कायदेशीर साधनासह तुमचा वाममार्गी अट्टहास कितीसा टिकणार?

हिंदुंचा उत्कर्ष, हिंदुंची प्रगती, हिंदूंचे शांतपण अप्रतिहत चालू असलेले सर्वगामी पण कायदेशीर उन्नतिपथाक्रमण जरी तुमच्याने पहावत नसेल तरी त्याकडे पाहण्याचा व्यायाम आता तुह्मी केलाच पाहिजे. कारण तो हिंदुचा न्याय्य व कायदेशीर हक्क आहे. कारण तो चारशे वर्षे गांजलेल्यांच्या

आतंरआत्म्याला मिळालेली परमेश्वरी जबाब आहे.

या परमेश्वरी संदेशाविरुद्ध जाण्याने तुह्मी गोमंतकीय समाजात भयंकर दुही मात्र माजवाल. आणि दुहीचे परिणाम जरी तुह्मा आह्मांला सारखेंच भोवणारें असले तर त्यांची जबाबदारी मात्र एकट्या तुमच्यावर पडेल. शुद्धीकरणाचे पर्यवसान जे तुह्माला व्हावे असे वाटते ते हेच की काय? असे उघडे तरी व्हा!

*(गुरुवार, दि. १२ एप्रिल १९२८)*

## समाचार घ्या!

अनायासे आसनारुढ झालेली गोमांतकीय प्रजासत्ताक राज्यपद्धती ही खरी प्रजासत्ताक नसून ती केवळ कृत्रिम नकली बेगडी आहे, हे आज कोणास नव्याने सांगावयास पाहिजे असें नाही. दारु जुनी पण बाटली नवी हे पोर्तुगीज ह्मण येथील पोर्तुगीज राज्यकारभाराला पूर्णपणे लागू होते. प्रजासत्ताक पद्धतीची 'बाटली' नवी खरी पण तिच्यात बसलेली कारभाराची 'दारू' जुनीच आहे. मोनार्कीच्या सत्ताकालात जे 'हम करेसो' कायद्याचे अरेरावी व अनियंत्रितस्वरूप दृष्टीगोचर होत होते, त्याचीच छटा रिपब्लीकच्या राजकारणावर ही कमी अधिक प्रमाणानें उमटलेली स्पष्टपणे दिसून येते.

आमचे हे ह्मणणे पटविणारी अनेक उदाहरणें दाखविता येतील. पण स्थल संकोचामुळे तूर्त शुद्धीचळवळी संबंधानें सरकारनें स्वीकारलेले अकल्पित धोरणच वाचकांना नजर करितो. शुद्धीकार्य हे केवळ धर्मकारण असताही व 'धर्मकारणाला' कोणत्याच प्रजासत्ताक दंडकांचा विरोध नसतानाही, शास्त्र्याच्या हद्दपारीने व शुद्धीचळवळ पुढाऱ्यांच्या छळणुकीनें, शुद्धीकार्य ह्मणून पाडण्याची ही पोलीसशाहीनें पुंडाई माजविलेली आहे ती प्रजासत्ताक नावाला काळाकुट्ट काळिमा फासणारी आहे, असेंच लोक ह्मणत आहेत. पोलिस पुंडाईची पर्वा न करीता शुद्धीकार्य आपले पाऊल पुढें पुढें टाकीतच आहे. ही गोष्ट वेगळी पण त्यामुळें पोलिसांचा शिरजोरपणा

कोणत्याच दृष्टीनें समर्थनीय होत नाही.

राजसत्तेच्या शें-दिडशें वर्षाच्या अमदानीत सुद्धा ब्रिटिश सीमेतील शास्त्र्यांना आपला धार्मिक धंदा चालवण्यास कोणतीच आडकाठी येथे झालेली नाही. गोमंतकांत त्यांना मुक्तद्वार होते. पण हें मुक्तद्वार आता शुद्धिकार्याच्या निमित्ताने कायद्याचा कोणताच आधार नसताना, समता, बंधुता व स्वातंत्र्य या त्रयीवर उभारण्यात आलेली आहे, असें हरघडी तोंडानें वदणाऱ्या प्रजासत्ताकानेच एकाएकी पोलिसांकरवी बंद पाडावे हे नव्या बाटतील जुन्या दारुचीच घाण साचली असल्याचे दर्शवित नाही काय? शास्त्र्यांना करण्यात आलेली हद्दपारी ही शुद्ध पुंडाई नव्हे काय? एकीकडे तोंडानें ह्मणावयाचे की 'मी जात-गोत, धर्म-कर्म काहींच ओळखत नसून, सर्वांना समतेने वागवणे हेच मी जाणत असतो. मी सर्वांचा 'पापा' (बाप) आहे व सर्वांचे पुत्रवत पालन करणे हेच माझे पवित्र कर्तव्य समजाते, व पाठ फिरताच पोलिसांकरवी गुंडाईची बजबजपुरी माजवून शास्त्र्यांच्या धरपकडीनें धुमाकुळ घालावा, हे पाप कितीही 'राजकारणी' असले तरी प्रजासत्ताकाचें धिंडवडे उडवणारेच आहे हे कोणीही कबुल करील.'

पण सरकारने ताळतंत्र सोडला ह्मणून लोकांनीही विशेषत: हिंदुनी-हात पांघरुन व पाय जमिनीला खिळवून ताळतंत्र सोडणे कधीही उचीत नाही. सनदशीर मार्गाने सरकारचा दिडशाहणपणा वेशीवर टांगून त्याचा खरपूस समाचार घेणे हे गांजलेल्याचे आद्य कर्तव्य होय. हें कर्तव्य बजावण्यास कोणालाही प्राण अर्पिण्याचे कारण नाही. फार तर सरकारची अवकृपा व या अवकृपेपासून उत्पन्न होणारी कारावास परंपरा सहन करावी लागेल, इतकेच.

पण-पण लक्ष्यात कोण घेतो? ठिकठिकाणच्या देवालयांच्या कार्यकारी मंडळांनी ब्रिटीश सीमेतील शास्त्र्यांविरुद्ध गाजवण्यात येत असलेली अन्याय्य आज्ञा दूर करण्याची आवश्यकता सरकारास भासवावी, अशी जी मागे विनंती करण्यात आली होती तीच अजून मूर्त स्वरूपांत उतरत नाही! विनंती करण्याला सरकारच्या बापाला सुद्धा डरण्याचे कारण नाही. कारावासाचे किंवा देहदंडणेचे भय बाळगण्याचे कारण नाही. अवघे दोन तीन

तासाचे काम पण ते सुद्धा वेळेवर बजावण्यास आह्मांस वेळ नाही! अशा स्थितीत सरकारची हडेलहप्पीची हडळ कशी गाडली जाईल? तीचा हैदोस, आमची तटस्थ वृत्ती जोवर स्थानभ्रष्ट होणार नाही. तोवर असाच चालू राहील हे अर्थात उघड आहे.

पोलिसांची पुंडाई पक्की बेकायदा आहे हे तर स्वयंसिद्धच आहे, पण ही पुंडाई नष्ट होण्यास आह्मांकडून पराकाष्टेचे प्रयत्न झाले पाहिजेत. कदाचित् यासाठी सरकार विरुद्ध दावा झुंजणे झाल्यास त्यालाही आमची तयारी असली पाहिजे. पुंडाईच्या नावाने शंख करीत राहिल्याने पुंडाई थोडीच नरमणार आहे. तीची हड्डी नरम होण्यास जोराचाच सनदशीर प्रतिकार झाला पाहिजे.

पोलिसांच्या पुंडाईत स्थानिक सत्तेचाच हात असल्याचे प्रकाशात आले आहे. निदान पोर्तुगालचे सर्व सत्ताधारी सी. कार्मोन यांचे तीत अंग असल्याचे प्रकाश्य नाही. कसेही असले कार्य तरी, पुंडाईचा खरपुस समाचार घेणे हे हिंदूंचे पवित्र कर्तव्य आहे. कोणत्याही सबबीनें त्यांच्या बजावणीची चालढकल करणे अक्षम्य पाप होईल व हिंदूंच्या कपाळावर आत्मघातकीपणाचा शिक्का मारण्यास ब्रिटिश हिंदुस्थानातील आमचे धर्मबांधव मागे पुढे पाहाणार नाहीत. ह्मणून फिरून फिरून सर्व हिंदूंना आमची आग्रह पूर्वक प्रार्थना आहे की, पोलिस पुंडाईचा समाचार घ्या!

*(गुरुवार, दि. ७ मे १९२८)*

# अनावृत्त पत्रास उत्तर

मुंबईत वास करणाऱ्या काही गोमंतकीयांनी आह्मांस पाठविलेले अनावृत्त पत्र बहुतेकांनी वाचलें असेलच. आमच्या मागील कार्याबद्दल कौतुक व प्रेम बाळगून हे पत्र पाठविल्याबद्दल त्यांचे सौजन्य व शिष्टाचार यांची वाखाणणी करावी तितकी थोडीच आहे. आह्मां विषयी त्यापत्रात

जे काही प्रशंसापर शब्द वापरले आहेत त्यांस आह्मी मुळीच पात्र नाही. परंतु आमच्या बंधूंनी आपुलकीच्या भावनेने जी कळकळ प्रकट केली त्याबद्दल काही खुलासा न केला तर विशेषच गैरसमजास जागा राहील, ह्मणून शुद्धिकार्याच्या प्रारंभापासून आह्मी अवलंबून केलेल्या धोरणाचे आविष्करण करणे जरुर आहे.

गोमंतकात शुद्धीचा पहिला सुरुंग उडाल्यापासून आजपर्यंत 'भारत' पत्राचे धोरण सुसंगत आहे. कोणत्याही लाभासाठी किंवा लोभासाठी त्यांनी त्या ध्येयात फरक केले नाहीत. शुद्धीविषयी आमच्या मनांत अत्यंत प्रेमभाव असल्यानें त्यावेळी 'भारता'नें शुद्धिकार्य प्रणेत्यांचे अभिनंदन केले आणि आजही करीत आहे. यात शिंगे मोडून वासरांत शिरण्याचे पाप 'भारता'कडून घडलेले नाही. सध्या कालीन हिंदूधर्माला आलेली ग्लानी नष्ट होऊन तो आपल्या प्राचीन वैभवावर अधिष्ठित होण्यास शुद्धीकार्याची अत्यंत आवश्यकता असल्यानें, ते कार्य आपल्या महान कर्तबगारीनें, अपूर्व धाडसाने आणि प्रचंड परिश्रमाने घडवून आणणाऱ्या विद्यमान सर्व व्यक्तींविषयी 'भारता'च्या मनात निस्सिम आदर आहे. भारत व्यक्तिचा मिंधा नाही तर तत्त्वाचा बंदा आहे. लोकमतांचे यथास्वरुप आविष्करण करणे हें वृत्तपत्राचें कार्य असतेच पण त्यापेक्षा लोकमतास इष्ट वळण देणे हें वृत्तपत्राचें महत्त्वाचें कार्य आहे. आणि ही दोन्ही कार्ये एकसमयावच्छेदे बजावणे हेच भारताचें आजपर्यंतचे धैर्य आहे ह्या धैर्याकडे पाठ फिरविण्याचा शुद्धीप्रकरणांतही 'भारता'नें प्रयत्न केला नसून काही विशिष्ट हेतुकरीतां त्याजकडे जाणून बुजून दुर्लक्ष करणाऱ्या वावदुकब्रुवांस ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न केला आहे. गोमंतकीय जनतेच्या सत्प्रवृत्त भावना व विचार कोणते आहेत ह्यांचे मुंबईत वास करणाऱ्या लोकांनी आह्मांला ज्ञान करून देण्याची तसदी घेणे ह्मणजे लहान तोंडी मोठा घास घेण्यासारखे आहे. हा अव्यापरेषु व्यापार त्यांनी करावयास नको होता. गोमंतकाच्या सार्वजनिक कार्याचा 'भारत'कारांचा अनुभव आज पंचवीस वर्षाचा आहे. गोमंतकातील अगदी निकृष्ट वर्गापासून अगदी वरिष्ठ वर्गापर्यंत सर्व तऱ्हेच्या समाजांशी आणि व्यक्तींशी भारतकारांचा निकट परिचय आहे. त्यांच्या भावना, त्यांचे विचार, त्यांचे आचार आणि

त्यांच्या समजुती अजमावून पाहण्याची बुद्धी ‘भारत’कारांच्या मेंदूतही ईश्वरानें थोडीफार ठेवलेली आहे. गोमंतकातून मुंबईस जाताना ‘सत्याचा सर्व साठा’ काही व्यक्तींनी बरोबर नेल्याने आता ‘भारतकारांना त्याची चाड’ न राहिल्यास नवल नाही. जनतेच्या ‘मार्गदर्शकाचे कर्तव्य’ नोकरशाहीपुढे मान वाकवून ‘भारता’ने स्वार्थसाधूपणाने केले असते तर ज्यास्त चांगले झाले असते, असें गुलाम वृत्तीत मुरलेल्या काही व्यक्तींचे ‘भारता’च्या जन्मापासून जरी मत असले तरी त्याप्रमाणेच सर्वांचेही मत असावे अशातली गोष्ट नाही. ‘जनतेची दिशाभूल करून त्यांना अयोग्यमार्गाला’ ‘भारता’ने वळविले की वस्तुस्थिती त्याच्या उलटच आहे, हा निकाल देण्याचा अधिकार भावी इतिहासकारांचा आहे. स्वाभिमान, विचार स्वातंत्र्य, स्वावलंबन याचा मुक्ता कोणत्या पक्षाने घेतला होता. आणि याच्या उलट स्वाभिमानशून्यता, परप्रत्ययनेयता, भेकड परावलंबन, गुलामगिरीची प्रवृत्ति यांचा मक्ता कोणास मिळाला होता ह्याचीही शहानिशा करण्याचा अधिकार त्यांचाच आहे. व्यर्थ शब्दाची पिष्टपेशण करून अवडंबर माजविण्यात अर्थ नाही. हातच्या काकणाला आरशाची गरज नसून निर्विकार अंत:करणाचीच आवश्यकता असते.

‘भारता’च्या तेरा वर्षांच्या आयुष्यक्रमात त्याच्यावर इतके आणीबाणीचे प्रसंग आले आहेत की, त्यातून ‘भारत’ कसा बचावला याबद्दल आमचें आह्मांसच परम आश्र्चर्य वाटत आहे. दयाघन परमेश्वरानें ‘भारता’चा सत्यसंकल्पच जाणून त्यांस ह्या प्रसंगातून पार केले आहे. श्री. विनायक महाराज मसूरकर यांच्या बाबतीत ‘भारताने अंगीकृत केलेले धोरणच’ विजयी होत आहे. याचा प्रत्यय दिवसेंदिवस जास्तच येत आहे. गेल्या दिवसांत ‘तेऱ्ह’, ‘उलत्रामार’ ‘दियारियु द नोईती’ वगैरे ख्रिस्ती वृत्तपत्रांनी हिंदुलोकांची जी हेटाळणी चालविली होती त्यावरुन हा प्रत्यय आलाच आहे. जे हिंदुलोक मसुराश्रमाची तरफदारी करीत होते, त्यांतीलच काही लोक मसुराश्रमातील ब्रह्मचाऱ्यास पकडण्याकरीता सरकारची मदत मिळविण्याच्या आटोकाट प्रयत्न करीत आहेत. यावरुन ब्रह्मचाऱ्यांची गोमांतकांतून हकालपट्टी करण्याचे पूर्वी जे धोरण स्वीकारले होते तेच बरोबर होते असे त्यांचें ह्मणणे आहे. सरकारकच्छपी लागून आपसातील क्षुल्लक मतभेदांचा निर्णय करून घेण्याचीही

तऱ्हा काही अजब असून ती परकोटीस गेलेल्या गुलामवृत्तीची द्योतक आहे. श्री. विनायक महाराजांविषयी 'भारत'कारांच्या मनात जो निस्सिम आदर व आपलेपणा आहे तो ते गोमंतकातील शुद्धिकार्याचे प्रेणेते आहेत ह्मणून आहे. ज्यांच्याविषयी आपणाला आत्मीयभाव वाटतो त्यांना सुधारणात्मक चार उपदेशपर गोष्टी सांगण्याचा प्रत्येक कार्यकर्त्याला निसर्गदत्त हक्क असतोच. शुद्धिभगीरथ विनायक महाराजांना गोमंतकाविषयी आत्मीय भाव वाटत असल्यानेच धोक्याची सूचना ह्मणून दासबोधांच्या मलपृष्ठावरील मजकूर प्रसिद्ध केला आहे. त्यांत गोमंतकीय जनतेची बदनामी होणयासारखे काही नाही परंतु सर्वांचेच मत आमच्यासारखे असले पाहिजे असें कोणालाही ह्मणता येत नसल्याने योग्य पंच नेमून त्या शब्दांची व मजुकरांची रीतसर चौकशी करणे अगत्याचे होते. ते न करीता उगीच 'शेषं कोपेन पूरयेत' केल्याने कार्य हानी झाली आणि पुढेही होत राहिल. आता तरी रीतसर पंच नेमून योग्य चौकशी करण्यास आह्मांस अनावृत्त पत्र पाठविणारानेही आपल्या पक्षास प्रवृत्त केले तर काही कार्य केल्यासारखे होईल. कोणाच्याही रागालोभाची पर्वा करून 'भारत' आपल्या अंगीकृत कार्यापासून आजपर्यंत ढळलेला नाही. आणि पुढेही ढळणे शक्य नाही. 'भारत'कारांनी आपला आत्मा गमविण्याचा पंथ पत्करला असता तर त्याला इतकी झीज सोसण्याची आवश्यक्यताच नव्हती. फक्त गोमांतक ही आमची मायभूमी आहे आणि भारत वर्ष आमचे कोणीच नाही ही भावना आमची कधीच नव्हती व नाही. ह्मणून आह्माला देशकार्याचे पाठ शिकविण्याकरीता नक्राश्रु ढाळण्याचे कोणालाही कारण नाही. सत्य संकल्पाचा दाता भगवान यांनी आह्माला ज्याप्रमाणे बुद्धी दिली त्याप्रमाणे आजपर्यंत आह्मी जनतेची सेवा बजाविली आहे आणि जिवांत जीव आहे तोपर्यंत पुढेही अशीच बाजावीत राहू.

सर्व बाजार उरकल्यावर आपला माल विक्रीस मांडण्याचे आमच्या मुंबईकर मित्रांच्या मनांत का आले हेंच समजत नाही. असली वराती पाठीमागून घोडी नाचविण्यापेक्षा हा निरर्थक वाद, पुढें कोणत्यारीतीने मिटून शुद्धीकार्यास पुन्हा चालना कशी मिळेल याचाच प्रत्येक देशहितेच्छुने विचार केला पाहिजे. एकमेकाच्या चुका काढण्यात व्यर्थ कालक्षेप केल्याने झपाट्याने कार्यहानि

होऊ लागते हे आमच्या सुज्ञ मुंबईकर मित्रांस कथन करण्याची जरुरी नाही. जगजेता त्या नेपोलियनच्याही चुका दाखविणारेही प्राणी जगात आहेत. तर मसूरकरांच्या किंवा आमच्या चुका कोणीही दाखविल्यास आश्चर्य कसले? हा अनिष्ट वाद मिटवून शुद्धीकार्यास पुन्हा कोणी चालना दिल्यास त्यालाच गोमांतकाचा खरा अभिमानी असे आह्मी ह्मणू. बाकी बेगडी स्वाभिमान पांघरणारे लोक घरोघर पडलेलेच आहेत!

*(गुरुवार, दि. ७ फेब्रुवारी १९२९)*

# एकमेकां सहाय्य करुं! अवघे धरूं सुपंथ।।

गेल्या ता. २१ रोजी येथे गोमांतकीय हिंदु नागरिकांची सभा भरून अलिख भारतीय हिंदु महासभा शाखा गोमंतक ही संस्था स्थापन झाली. या नूतन संस्थेचे उद्देश व ही नूतन संस्था स्थापण्यार्थ जमलेल्या सभेत संमत झालेले ठराव, आजच्या अंकात दुसरीकडे दिले आहेत. त्यांच्या वाचनानें उपरोक्त सभा का निर्माण झाली आहे, यांचे संयुक्तिक व साधारण कारण आमच्या वाचकांस समजून येईल. राजकीय दृष्ट्या गोमांतक मात्र ब्रिटिश हिंदुस्थानापासून भिन्न असला तरी तो इतर सर्व बाबतीत सामाजिक, धार्मिक, ऐतिहासिक वगैरे त्यापासून निराळा नाही, हे आज कोणाला नव्यानें सांगावयास पाहिजे असेल असें नाही. अर्थात राजकीय बाब वगळून, इतर सर्व गोष्टीत परस्परांतील दळणवळण वाढून परस्परांत प्रेमाभिवृद्धी व्हावी, अशी परस्परांची इच्छा असल्यास, ही इच्छा राष्ट्राहीत विघातक आहे, असे ह्मणणाऱ्यास वेड्यांच्या रुग्णालयातच बसवावे लागेल यात संशय नाही.

गोमंतक व महाराष्ट्र या उभयतातील उपरोक्त संबंधाच्या दृढीकरणार्थ आड येणाऱ्या अडचणी नेस्तनाबूत होऊन, परस्परांतील एकोपा वृद्धींगत व्हावा हे उच्चतम धैर्य गोमांतक शाखेच्या संस्थापनेच्या बुडाशी असल्याने,

ही शाखा ह्मणून पाडण्यासाठी कितीही दीर्घ प्रयत्न केले तरी ते यशस्वी होणे कदापि शक्य नाही. कारण उच्च धैर्याने मार्गाक्रमण कितीही कंटकमय असले तरी त्याचा शेवटचा पल्ला सुयशाच्या सुमनांनीच नेहमी दरवळलेला असतो, असा त्रिकालाबाधीत सिद्धांत आहे.

शिवाय दुसरी एक महत्त्वाची गोष्ट ध्यानात ठेवण्यासारखी आहे ती ही की, 'गोमंतक शाखे'चा जन्म दुसऱ्या इतर कोणत्याही संस्थांशी विरोध करण्यासाठी झालेला नाही. तिच्या धैर्याला पोषक असे प्रयत्न मग त्याचा उद्भव कोठूनही होवो त्यांना हार्दिक मदत करण्यासाठी ती नेहमीच तत्पर असेल. थोडक्यात सांगावयाचे ह्मणजे महाराष्ट्र व गोमंतक या उभयतात परभावाचा अग्नी पेटू न देता ज्या ज्या उपयांनी परस्परांची मैत्री दृढतर होईल. अशाच उपायांची योजना गोमंतक शाखेकडून केली जाईल. बाकी हे तिने मान्य केलेल्या चौथ्या ठरावावरुन असंदिग्धपणे सिद्ध झालेच आहे.

आतापर्यंत केलेल्या विवेचना वरून वाचकांना कळून आलेंच असेल की, 'गोमांतक शाखा' ही संस्था कोणत्याही कारणाने का होईना आमच्यात पेटत असलेली दुहीची दिवटी विझवली जाऊन तिची जागा एक्य रवीच्या प्रकाशाने व्यापीली जावी. अशाच धोरणाने वागणार असून, आमच्या धार्मिकोन्नतिप्रीत्यर्थ झटणाऱ्या कोठल्याही संस्थांशी ती सहकारिताच करणार आहे द्वेषापासून अलिप्त असलेल्या या संस्थेला लोकमताचा भरपूर पाठींबा मिळाला व मिळत असल्यास त्यात नवल आहे काय?

'गोमंतक शाखे'चे उद्देश ज्यांना पटतील व ते बहुजन हिंदुसमाजाला हमखास पटतील, असा आमचा विश्वास आहे ते शाखेचे त्वरित सभासद होऊन तिच्या धैर्याला सहानुभूती दर्शवितील, अशी आशा आहे. अवघ्या ४/५ दिवसांत शाखेला मिळालेल्या सभासदांच्या संख्येकडे नजर दिली तर शाखा कार्यक्षम होण्यास कालावधी लागणार नाही. अशी निश्चिती वाटावयास लागली आहे. प्रचार कार्यार्थ गोमंतक शाखेचे प्रचारक श्री. रामचंद्र लवंदे, व्यंकटेश वि. वैद्य, वासुदेव विठ्ठल देसाई, गोपीनाथ नाईक कुराडे वगैरे तरुण ठिकठिकाणी दौऱ्यावर निघाले असून, त्यांच्याकडून होत असलेले प्रचार कार्य अत्यंत समाधानकारक आहे, हे येथे नमूद करण्यास आह्मांस अभिमान वाटतो.

शेवटी गोमंतक शाखेने दृष्टीसमोर ठेवलेले उच्चतम ध्येय अल्पावधीत मूर्त सृष्टीत उतरवण्याला तो दयाघन परमेश्वर आपल्या कृपेचे पाखर तिच्यावर घालो अशी उत्कट इच्छा प्रगट करून, वाचकांची रजा घेतो.

*(दि. २७ सप्टेंबर १९२८)*

# एकमेकां सहाय्य करूं अवघे धरुं सुपंथ।।

श्रीमत् सद्‌गुरु धर्मभास्कर मसुरकर महाराज यांनी तेजस्वी तपश्चर्येच्या जोरावर परधर्मीयांच्या तीव्र तडाख्यांनी निस्तेज बनलेल्या आमच्या हिंदुधर्माला गतवैभव प्राप्त व्हावें, या अत्युच्च उद्देशाने मसूर येथे ब्रह्मचर्याश्रम स्थापन केला. महाराज, श्रीसमर्थ रामदासांचे वैराग्यपूर्ण अनुयायी असल्यानें कठीण परिस्थितींत धर्मप्रसारार्थ समर्थांनी ज्या अचूक व यशस्वी मार्गाचे अवलंबन केले, तोच विजयशील मार्ग त्यांनी आश्रमाला आखून देऊन तो नि:श्चयी विरक्ततेने चोखळणारा शिष्यवर्गही निर्माण केला. पूर्वी जरी आश्रमीय शिष्यांची संख्या अवघी बोटाने मोजण्याइतकी अल्प होती, तरी महाराजांच्या तेजोबलाने ती दिवसें दिवस वृद्धिंगत होत असून आज शंभरापेक्षा जास्त तरुण स्वयंस्फूर्तीने सर्व संगपरित्यागी महाराजांचे शिष्यत्व पत्करुन आश्रमाच्या झेंड्याखाली ठिकठिकाणी धर्माची प्रभा फांकीत हिंडत आहेत. महाराजांचे प्रतापी तप ब्रह्मचर्याचीच संख्या वाढवीत आहे, असें नसून ज्या ज्या ग्रहस्थाश्रमी लोकांस आश्रमाचे अतुलनीय व महत्त्वपूर्ण धर्मकार्य अवलोकण्याचें भाग्य लाभतें, त्या त्या लोकांची अंत:करणें आश्रमाविषयीच्या भक्तीभावानें तें उत्फुल्ल करीत असते. तात्पर्य, महाराजांच्या योगबलाने त्यांचा आश्रम अत्यंत लोकप्रिय झाला असून, हिंदुस्थानांतील मोठमोठाले धर्मपुढारी आश्रमाच्या निरपेक्ष, कष्टमय व चिकाटीयुक्त कामगिरीमुळे त्याचे चहाते झालेच व होत आहेत.

मसूर ब्रह्मचर्याश्रमाची कीर्ति हिंदुस्थानांतच दुमदुमत आहे असें नसून खुद्ध यरोप अमेरिकासारख्या भौतिक सुधारणेच्या अत्युच्च शिखरावर विलसत असलेल्या देशांतही आश्रमाचा बोलबाला होत आहे. आश्रमाचा असा हा नावलौकिक शुक्लेंदुवत् का वाढत आहे? आश्रमाचा कीर्ति नगारा सर्वत्र का गर्जत राहिला आहे? ह्या प्रश्नांचे उत्तर आश्रमीय लोकांच्या 'आधी केले। मग सांगितले' ह्या धोरणाच्या धडाडीच्या कर्तबगारींत कोणालाही सापडेल. अशा उपयुक्त संस्थेबद्दल इतर हजारों गोमांतकीयांप्रमाणेच आमच्याही मनांत प्रेमादर वसत असल्यास त्यांत आश्चर्य आहे काय? उलट प्रकार मात्र आक्षेपार्ह झाला असता. असो.

आश्रमीय लोकांची सात्त्विक वृत्ती, त्यांचा उज्ज्वल धर्माभिमान, त्यागी स्वाभाव, परमावधीची निरपेक्षता वगैरे सद्गुणांची प्रत्यक्ष पारख करण्याचा योग आह्मांस अनेकदां आला असल्यानें गोमांतकीय शुद्धिचळवळीचें पुढील कार्यहि आश्रमांवरच सोपवण्यात यावे, असे आमचें मत होते व अजूनही आहे. खुद्द शुद्धिसहाय्यक मंडळाचे मत आमच्या मातप्रमाणेंच होतें, हें आह्माला माहीत आहे. आश्रमाकडून शुद्धि केली जावी व तिला शुद्धिसहाय्यक मंडळाकडून सहाय्य पुरविलें जावे, असेंच पूर्वी ठरलें होतें व हेच धोरण सर्वमान्य होतें व अजूनही आहे. पण, गोमांतकांच्या दुर्दैवाने, आश्रमाची तर असोच पण शुद्धिसहायक मंडळाची सुद्धां पर्वा न करितां, स्वतंत्र रीतीनें कित्येकांनी मनमानेल तशी शुद्धी केली व खर्चासाठी मात्र आश्रमाकडे धाव घेतली. आगाऊ न कळवितां शुद्धी केली गेल्यानें, आश्रमाकडून खर्चाच्या मागण्या अर्थातच, मान्य होणें शक्य नव्हतें. शुद्धीसहाय्यक मंडळानें मात्र आपापसांत कलहाग्नीनें पेट घेऊं नये ह्मणून दोनशे रुपये खर्च मात्र केला व 'एन केन प्रकारेण' झालेली ती शुद्धी पसंत ठरविली. पण स्वतंत्र रितीनें झालेल्या शुद्धी कार्याला आश्रमाकडून कसलाच विरोध करण्यात आला नाही. उलट कोणीही शुद्धीकार्य करो, तें पचविण्याचें काम शुद्धिसहाय्यक मंडळाच्या साहाय्यानें आपण करूच करूं, असें आश्रमानें आपलें धोरण निश्चित केले, असे असता, केवळ आश्रमाकडून त्याला किंवा शुद्धिसहाय्यक मंडळाला नकळत झालेल्या शुद्धीला सांपत्तिक मदत केली

गेली नाही ह्मणून आश्रमाविरुद्ध त्याच्या कार्याचे महत्त्व लक्षात न आणता, कित्येकांकडून गैरसमजाची वावटळ उठविण्यात येत आहे! आश्रमासारख्या केवळ धर्मप्रसारार्थ अवतरलेल्या जगद्वंद्य संस्थेविरुद्ध अकारण गैरसमज माजविण्याचा आततायीपणा करणे, ह्मणजे चार शतकानंतर आश्रमाच्या अपूर्व पुण्याईने शुद्धी चळवळीच्या निमित्ताने घडून आलेली एकी पायाखाली तुडविणे नव्हे काय? पण आश्रमविरोधकाने एक गोष्ट ध्यानात ठेवावी ती ही की, आश्रमाची पुण्याई इतकी लेचीपेची नाही की ती अप्रामणिक टीकांनी एकदम नष्ट होईल. उलट कुत्सित टीकाकारांविषयी जनतेत अप्रीति उत्पन्न होऊन आश्रमाचीच कीर्ति हडसून खडसून पूर्वीपेक्षाही दैदिप्यमान होईल, हे त्याने न विसरलेले बरे!

दुसरे असे की, आश्रमाकडून कोणतीच 'आगळीक' झाली नसता त्यांच्याशी अबोला धरून त्याची भरमसाठ निंदा करीत सुटणे, हे पाप होय. व या पापाचा परिणाम शेवटी शुद्धीकार्याला भोवणार नाही काय? आश्रम व त्याचे विरोधक या उभयतातील तेढीचा फायदा आमच्या उशाशी टपून बसलेले शुद्धी विध्वंसक ख्रिस्ती घेणार नाहीत काय? अवश्य घेतील हे सांगावयास नकोच. अशी स्थिती होऊ नये ह्मणून तरी निदान आश्रम विरोधकांनी आपली जिव्हा आवरुन धरणे योग्य असून, कसल्याही बाबतीत गैरसमज उत्पन्न झाला असल्यास त्याचे निराकारण खुद्द आश्रमाकडेच करून घेणे उचित आहे. आश्रमाचा बदलौकिक होईल ह्मणून नव्हे कारण तो – होणेंच मुळी शक्य नाही... तर तिऱ्हायत शत्रुंना टाळ्या पिटण्याची संधी मिळू नये ह्मणून, आश्रम विरोधकांनी आपल्या विरोधाला खिळ घातली पाहिजे. व यातच त्यांना भूषण आहे. या उप्पर त्यांची मर्जी!

आश्रमाविरुद्ध गैरसमज पसरविण्याचे बाकीचे लहान मोठे प्रयत्न दृष्टीआड केले, तरी गोमंतकीय शास्त्र्यांकडून साडेतीन हजार लोक शुद्ध करण्यांत आले, ही लोणकढी थाप मात्र डोळ्यासमोरून दूर होत नाही. या थापेने आह्मी चकीत होऊन तीजबद्दल खात्रीलायक खुलासा मिळविण्याचा प्रयत्न केला. व आह्मी गोळा केलेली माहिती आह्मांस असे सांगते की, गोमंतकीय लोकांनी स्वतंत्र रितीने शुद्ध केलेल्या लोकांची संख्या ११५७ पेक्षा

जास्त नाही; आणि इतकेही असून या संख्येतील बहुतेक लोक आश्रमाभिमानी गृहस्थांनीच शुद्धीला तयार केलेले होते. ११५७ या संख्येचे रूपांतर ३५०० या संख्येत कसे झाले? शिवाय ११५७ लोकांच्या शुद्धीकरणारत रा. शंकर नायक शंखवाळकर, (त्यांनी प्रतिज्ञालेख लिहिले) रा. रघुनाथ अनंत भाडारे (यांनी पुष्कळ हेलपाटे काढले), रा. जना कामत (यांनीही पुष्कळ हेलपाटे काढून, शिवाय शास्त्रीबोवांची कामे सुद्धा केली) वे. शां. गोविंद भट अग्निहोत्री (त्यांनी शुद्धी कार्य केले), वे. शा. केशळ गाळकर (यांनी स्वयंसेवकाचे काम केले), रा. दत्ता पै वेर्णेकर (यांनी पुष्कळ अंगमेहनत केली), वे. शा. स दत्ता भट बुकले व वे. शा. गणेश भट नवाथे (या दोघांनीही शुद्धीकार्य केले), रा. विनायक शाबा दळवी (यांनी शुद्धीला सक्रीय प्रोत्साहन दिले) सदाशिव ह्याडदोळकर (यांनी आपल्या मोटारने शुद्धीचळवळ्यांना महत्त्वाची मदत केली), रा. गोपाळ गावडा, राम गावडा व महादेव गावडा (या तिघांनी शुद्धीला सर्वथैव पोषक अशी अंत्रुज मध्ये भूमी निर्माण केली) या सर्व गृहस्थांनी भाग घेतला असता त्याचा नामनिर्देश न होता एका आकस्मिक कारणाने प्रसिद्धीस आलेल्या व न आलेल्या व्यक्तीचाच तेवढा बोलबाला व्हावा, हे योग्य आहे काय?

गोमंतकीय नवहिंदुंची एंकदर संख्या ७१३५ असून एका तिसवाडी महालातील ५०६१ आहे, तिसवाडीतील ही सर्व मंडळी आश्रमाने शुद्ध केलेली असून फोंडें महालातील ४४७ व साखळी महालातील १६७ जमा केली तर आश्रमाने शुद्ध केलेल्या मंडळींचा आकडा ५६७५ होतो. ७१३५ संख्येतून ५६७५ ही संख्या वजा केली तर १४६० ही बाकी राहते; व याही संख्येतून डेपुटेशनने शुद्ध केलेली ३०३ शुद्धकृतांची संख्या कमी केली तर गोमांतकीय शास्त्र्यांचा वाट्यास अवघी ११५७ संख्या पडते. अशी ही खरी वस्तुस्थिती असता साडेतीन हजारी थाप का ठोकण्यात आली? केवळ आश्रमाच्या कार्याचे महत्त्व कमी करण्यासाठी नव्हे काय? परंतु, अशानें त्याच्या कार्याचे महत्त्व कमी कसें होईल? जे काम ता. २६/२/२८ पर्यंत कोणालाच शक्य वाटलें नव्हतें, ते आश्रमानें केले व तेंही ४/५ वर्षांच्या कडेकोट तयारी नंतर, हे इतिहास विसरणार काय? जर नाही तर एवढा हा खटाटोप का?

आणखी लक्षात ठेवण्यासारखी महत्त्वाची गोष्ट ही की, आश्रमानें शुद्धीचें सर्व श्रेय आपणालाच मिळाले पाहिजे, त्याचा वाटा दुसऱ्यास देण्याची त्यांची तयारी नाही असा आग्रह धरला नाही. उलट गोमांतकीय लोकांची सक्रीय सहानुभूती लाभल्यामुळेच आपल्या हातून शुद्धीचें कार्य यशस्वी पार पडले असे त्यांचे ह्मणणे आहे. इतकेच नव्हे तर शुद्धीचें सगळेच श्रेय आश्रम गोमांतकीयांना देत आहे, आश्रमाचा हेतू एवढाच की, शुद्धीकार्याच्या गाड्याला कोणत्याही कारणाने खीळ पडूं नये तो अखंड व निष्कंटकपणें चालू रहावा.

असें जर आहे तर मग आश्रमाशी जो कित्येक–फारच थोड्या–लोकांनी अबोला धरला आहे, तो संयुक्तीक आहे काय? 'एकमेकां सहाय्य करूं / अवघे धरूं सुपंथ' हाच मार्ग चोखाळण्याचा सदिच्छेनें आश्रम विरोधकांनी आश्रमाशीं सहकार्य करण्यास सज्ज होणें धर्मप्रसाराच्या दृष्टीनें इष्ट नव्हे काय? इष्टच आहे हें अर्थात उघड होय.

गोमांतक हा महाराष्ट्राचाच अविभाजक भाग आहे असें जर आह्मी अंत:करणपूर्वक मानीत असतो व महाराष्ट्रांत जर आश्रमस्थापन झालेला आहे, तर आपलेपणाच्या नात्यानेच आश्रमाशी आचरण करणे आमचे कर्तव्य ठरत नाहीं काय? अवश्यक ठरतें, हें उघड होय. व हेंच कर्तव्य योग्य रितीनें परिपाळीलें जावें ह्मणूनच मोकळ्या मनानें प्रस्तुत लेख लिहिला आहे. आमच्या शुद्ध हेतूंकडे नजर पुरवून शांत चित्ताने आमचे प्रेमळ वाचक त्याचा विचार करतील, अशी आह्मांस आशा आहे.

*(गुरुवार, दि. १९ जुलै १९२८)*

**समाप्त**

❖ ❖ ❖

Ano I -- No. 2 | 139-5 | 13 de Novembro de 1912

G. P. HEGDO' DESSAY
*DIRECTOR*

GIVAJI D. S. MATMO'
*EDITOR*

**ASSINATURAS**

India Portugueza (*Anual*) 1:08:00
India Ingleza ,, 1:12:00
Numero Avulso 0:00:09

Para publicação dos anuncios, contratos especiaes.

Enderego telegrafico—'BHARAT'


# भारत

# BHARAT


Redação, administração e oficinas { Rua—Herois de 5 d'Outubro Nova-Goa

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक

शिवाजी दत्तू शे॰ महात्मे
प्रकाशक

वर्गणीचे दर (आगाऊ)
गोव्यांत (वार्षिक) ...
ब्रिटिश इंडिया ...
किरकोळ अंकास ...
जाहिरातीचे दर अलाहिदा ठरविण्यात येतील.
तारेचा पत्ता- 'भारत' नवीन गोवें.

वर्ष १ लें.] नवीन गोवें–बुधवार, तारीख १३ माहे नवंबर १९१२ [अंक २ रा.


## AGRICULTURA INDIANA

A India Portugueza è um paiz essencialmente agricola, oferecendo, graças á fertilidade do solo, todas as condições indispensaveis para o desenvolvimento progressivo d'agricultura.

E' uma idea velha que só o novo regimen parece querer concretisa-la por meio da Inspèção d'Agricultura, creada para este Estado, não a muito.

São louvaveis os fins, mas desastrados os meios; e tanto mais quanto é certo que o seu exercicio levará á matroca, especialmente, quando se revestir de caráter de permanencia o já exausto estado economico do paiz.

Todos aspiram com entranhado amor ao desenvolvimento agricola, mas no limite das forças economicas: querem que a agricultura progrida sem que, porem, os processos empregados para a consecução do fim que tem em mira, absorvam a milhor seiva do thesouro publico.

Eis a razão, tambem, porque, certa da derrocada financeira que o funcionamento d'Inspèção ameaça, toda a imprensa bradou com o grito unisono contra a mesma, não faltando quem pedisse a imèdiata revogação do decreto que a creou *ex abrupto*.

E' verdade. O *novo* regimen vae dar côrpo á *velha* idèa com processos que destoam, por completo, da seriedade...*economica*.

Protestamos porisso contra eles com veemencia, como o fizeram todos os nossos confrades, aventando ao mesmo tempo os meios que reputamos precisos para a realisação do fito a que se almeja chegar.

Todos sabem que no territorio visinho ha muita gente com conhecimentos d'agricultura pratica que al tem atingido uma tal ou qual perfeição, devida á perspicacia do espirito britanico.

Pois bem. O governo portuguez podia estabelecer em um logar adequado aos ensaios culturaes, em Assolnã, por exemplo, uma inštituição á maneira de colegio d'agricultura de Puna, e onde fosse ministradò o conhecimento pratico da ciencia agricola.

A perpetuidade e a economia deviam reger a referida instituição cuja dirèção podia ser, sob a inspèção do agronomo do Estado, confiada a um individuo que, funcionario do ramo d'agricultura britanica, tivesse evidenciado a superior competencia no desempenho das suas funções, o que seria facil verificar-se pelas informações colhidas das respètivas repartições, não se olvidando a circunstancia atendivel de que recaindo a escolha em um funcionario aposentado, encanecido na profissão, será milhor ainda; porque a aposentação, despreocupando o funcionario das funções que exercia, prende-lo-ha naturalmente com mais dedicação a sua nova *mother country*.

Não bastava sò isto. Como complemento do desenvolvimento agricola, era necessario promover, todos os anos, exposições de produtos fornecidos pelo nosso solo, e de aparelhos, utensilios empregados na agricultura, creando e generalisando desta feita uma estima espontanea com tendencias para a determinação do aumento da produtividade da terra, ou por milhor dizer, do aumento da riqueza publica.

Quer-nos parecer que o serviço de que se trata, organisado da forma indicada, além de poupar contos de reis e centos de rupias, operaria lenta mas progressivamente o desenvolvimento agricola da India Portugueza.

De resto, é escusado dizer, projètos estalhafatosos só farão proveito aos paizes que nadam no mar de abundancia. Para nós paiz pequeno e pobre, só planos modestos, proprios ás condições do nosso meio podem proporcionar-nos alguma coisa de utilidade positiva.

*Cada terra*...

## COISAS E LOISAS

### Berrata...irracional

Outro nome não o podemos dar ao sarceiro com que muita gente procura perturbar o socego...*apatico* do sr. Assunto Predial.

E' sinal evidente de que no nosso paiz se não faz idèa nitida e perfeita do que seja o progresso que, aliás, todos anceam, sem compreende-lo, todavia. Vão vêr que a demonstração da nossa asserção racional não é meter uma lança em Africa.

Como sabem, hoje em dia, graças ao pinaculo a que tem chegado a perfeição do mundo cientifico, tudo se pode medir, não sendo alheio a esta regra o proprio progresso que gerou o tal comodismo. E, assim, se a pressão atmosferica é avaliada pelo barometro, a tensão do vapor pelo manometro, a temperatura pelo termometro, etc., o progresso è calculado pelo aumento, venha donde vier, seja de que natureza fôr.

Encaradas as matrizes prediais sob este *prisma*, o aumento da colèta representa para nós o preludio duma epoca proxima, cheia da prosperidade...*franciscana* (palavra que com venia devida usurpamos a sua adversaria).

Não encordoe quem quer, porque, em fim, o que acaba de patentear-se para pacificação de espiritos exaltados, se refere ao dominio da infalibilidade dos principios axiomaticos da ciencia...*progressista*.

Que!!... O aumento da colèta esmagará o zè-pagante, metendo-o nas fauces iantes da miseria!!

Não è disto que cá se trata. Analisa-se, aprecia-se, discute-se o progresso; e o instrumento de calcular á justa a graduação deste curioso fenomeno é o aumento.

Ora, as matrizes prediaes na sua fase *progressiva* esmagando o contribuinte, determinarão o aumento da miseria...*goana* (em sustituição da *franciscana*.)

E sendo o *aumento* caracteristica *progressi-vatrica*, claro é que ele produzirá progresso da...miseria que em todo o caso è *progresso* em que se deve cifrar o patriotismo e por que se esfalpa tanto o esforço humano...

E', pois, *irracional*, isto è, sem *razão* de ser, a celeuma que se levanta em rèdor do aumento da colèta, porisso que, como se demonstrou *cientificamente*, ele è gerador e indicador do *progresso*...da miseria, no caso.

E vivam as matrizes!!

### Força da logica...

Um ilustre colega nosso receia que o aumento da alçada, estabelecido no projèto do Regimento de justiça, vá acabar com a Relação de Nova-Goa.

*Quot capita tot sententiae*: somos porisso doutro parecer e comnosco muita gente, quanto ao assuntò.

Elevando-se—diz-se—a alçada da Relação, a 1.000$000 reis, não haverá as demandas e não as havendo desaparecerá *ipso facto* a veneranda instituição. Quer isto dizer que um *conto* de reis porá *ponto* no *intento* demandista do goês *tonto*!...

Que mal estamos com isto!

Se a demanda denuncia o direito contro-vertido, ofensa á integridade pessoal etc; manifestando a sua existencia pelo estabelecimento dos respètivos tribunais, a não existencia destes será o sinal do completo esplendor da perfeição social em paizes civilisados como o nosso. E' isso.

O receo do mencionado colega não resiste, pois, à força da nossa *transcendental* logica e portanto alèm de injustificado è fantastico...

### Dura lex, sed lex

Ficou a olhar ao sinal, como se diz, um escriturario da fazenda de Guinè por exercer advocacia naquela colonia.

E' coerente e justo; pois o homem cumulava uma só profissão. Fosse ele ao mesmo tempo escriturario, diretor das obras publicas, ajudante do governador, inspètor de instrução, queriamos sempre ver se alguem levantava a *grimpa* para o *demissionar* das suas respeitaveis funções.

*Dura lex, sed lex*...

### Boa piada

O prodigioso principio da divisão do trabalho vai manifestando a sua *benefica* ação nas fases da eloquencia...barata.

Exgotam a atividade pulmonar em discrever os deveres dontrem, limitando-se eles, os oradores, a pregar...pètas.

E' logico, porque é justo; e é justo, porque é cientifico, como o é o principio da divisão do trabalho.

Vejam: se os discursadores fossem tambem executores dos principios que no meio da *berrata*...*cabala proclamam*, iria o seu *modus faciendi* ofender o principio da divisão do trabalho. Eis o motivo, porque eles restringem-se a.. parlar tão sòmente para...não irem de encontro com o principio da divisão do trabalho.

Pela identica logica, não admira que um arruinador da moralidade pregue sobre ela, um borracha sobre a sociedade da temperança, etc e tal...

Boa piada, não ha duvida.

### Necessidade urgente

Seja qual fôr a opinião d'outrem sobre guerras, a nossa é que elas constituem a necessidade urgente da epoca presente em que a barateza vae, de momento a momento, inprimindo proporções gigantescas à...proliferação.

Ora, se guerras não as houvesse, alem de o globo terraqueo ser pequenissimo, faltaria pasto á *Reuter* e á...imprensa mundial e portanto o muito leitor. ocioso.

१३ नोव्हेंबर १९१२ साली प्रसिद्ध झालेला 'भारत'चा दुसरा अंक

'भारत'कार हेगडे देसाई प्रतिष्ठान

कुसमण, केपे-गोवा

